IMPACT FACTOR (SJIF) 2021-7.380 ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL - JUNE,2021, VOL- 10, ISSUE-55

## राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक, मराठी विभाग, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, (जि. चंद्रपूर) महा.

मुख्य-संपादक
डॉ. सुबोध कुमार सिंह
प्राचार्य

संपादक
डॉ. जयश्री शास्त्री
मराठी विभाग प्रमुख



**IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380** **ISSN 2319-4766**

An International Peer Reviewed & Refereed Journal

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-55

## राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक, मराठी विभाग

# लोकमान्य महाविद्यालय वरोरा,

**जिल्हा चंद्रपूर महाराष्ट्र**

# समकालीन मराठी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा

**मुख्य संपादक**

**डॉ. सुबोध कुमार सिंह**

प्राचार्य

**संपादक**

**डॉ. जयश्री शास्त्री**

मराठी विभाग

**प्रमुख संपादक मंडळ**

डॉ. श्रीनिवास पिलगुलवर (समाजशास्त्र विभाग प्रमुख)

प्रा.तानाजी माने (राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

डॉ. दीपक लोणकर ( इतिहास विभाग प्रमुख)

प्रा. उत्तम देऊळकर (क्रीडा संचालक)

कु. लीना पुप्पलवार (ग्रंथपाल)

प्रा. श्रीकांत पुरी ( इंग्रजी विभाग प्रमुख)

© : AUTHOR

**Edition** : 2021

**Disclaimer:** We do not warrant the accuracy or completeness of the Information, text, graphics, links or other items contained within these articles. We accept no liability for any loss, damage or inconvenience caused because of reliance on such content. Only the author is the authority for the subjective content and may be contacted. Any specific advice or reply to query on any content is the personal opinion of the author and is not necessarily subscribed to by anyone else.

**Warning**: No part of this book shall be reproduced, reprinted, or translated for any purpose whatever without prior written permission of the Editor. There will be no responsibility of the publisher if there is any printing mistake. Legal aspect is in Warora jurisdiction only in favour of Editor in Chief for this Special Issue on **समकालीन मराठी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा.**

**NOTE:** Conference proceeding publication / Special issue publication/ Book with ISBN/ **Edited Book with ISBN publication** Contact us on **9881595917** either send your proposal to **srjisarticles16@gmail.com**

An International Peer Reviewed & Refereed
**SCHOLARLY RESEARCH JOURNAL**
**FOR INTERDISCIPLINARY STUDIES**
S. No. 5+4/5+4, TCG'S, Saidatta Niwas, D-Wing, Ph - II,
1st Floor, F. No. 104, Nr. Telco Colony & Blue Spring Society,
Dattanagar-Jambhulwadi Road, Ambegaon (BK), Pune – 411046.
Website: www.srjis.com



**मुख्य संपादकीय....................**

लोक शिक्षण संस्था द्वारा संचालित लोकमान्य महाविद्यालयाची स्थापना १९९८ या वर्षी झाली. 'उपक्रमशीलता हा स्थायीभाव' या ब्रीदावर काम करणारी महाराष्ट्राच्या चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील आमची अग्रणी संस्था उच्च शिक्षणाच्या दिशेने विकसनशीलदृष्ट्या वाटचाल करते आहे. या वाटेवर कार्यरत असतानाच महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे 'समकालीन मराठी साहित्य:चिंतन आणि चिकित्सा' या विषयावर २४ जून २०२१ ला राष्ट्रीय पातळीवरील वेबिनारचे आयोजन करून या विषयाला व्यापणारे विविध विद्यापीठातील प्राध्यापक,संशोधक, लेखकांचे शोधनिबंध एकत्र करून चर्चासत्र विशेषांकाचे प्रकाशन होत आहे, ही महाविद्यालयाच्या वैचारिक दालनाला समृद्ध करणारी अभिनंदनीय बाब आहे.

महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे आयोजिलेल्या वेबिनारचा हा चर्चासत्र विशेषांक *an International Peer Reviewed & Refereed Journal 'Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies'* च्या अंतर्गत *April-June 2021, Volume-10, Issue-55* मध्ये प्रकाशित होत आहे, जो अभ्यासकांसाठी महत्त्वपूर्ण ठरेल. सन्माननीय संचालक मंडळाचे कार्यवाह मा. प्राचार्य अनिल डोंगरे, मा. श्रीकृष्ण घड्याळपाटील डॉ. मिलिंद देशपांडे आणि अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील यांच्या शैक्षणिक दृष्टीने आजवर अनेक उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झालेत.

महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे यशस्वीरित्या आयोजिलेल्या वेबिनारच्या चर्चासत्र विशेषांकाला मनःपूर्वक शुभेच्छा!

**डॉ.सुबोधकुमार सिंह**
प्राचार्य
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा



**संपादकीय...............**

समकालीनता ही कालनिदर्शक अशी व्यापक संकल्पना आहे.साहित्यकृतीच्या वाङ्मयीन महात्मतेचा शोध घेताना त्यातील कालिक आणि ऐतिहासिक पर्यावरण महत्वाचे ठरते. तसे पहाता 'सम' म्हणजे सारखा. अर्थातच समान काळातील साहित्य म्हणजे समकालीन साहित्य. परंतु प्रत्येकच युगाच्या आणि काळाच्या काही युगजाणिवा असतात त्या संदर्भातच साहित्याची 'समकालीनता' तपासता येते असे मीमांसक मानतात. अशावेळी वाङ्मयाचे परिदृश्य अत्यंत व्यापक होते. प्राचीन,मध्ययुगीन,अर्वाचीन,नव यापैकी नेमक्या कोणत्या काळातील साहित्याची समकालीनता अभ्यासायची असा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा नव्वदोत्तर मराठी साहित्याचा साहित्यकाळ या वेबिनार मध्ये गृहीत धरला असून समकालीनतेची संकल्पना ,व्याप्ती ,समकालीन मराठी साहित्याच्या प्रेरणा आणि प्रवाह समकालीन मराठी दलित साहित्य ,ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य इ. प्रवाहातील कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र ,अनुवादित या सर्व विषयांवरील बहुआयामी लेख महाराष्ट्र आणि भारतभरातून आलेत .या वेबिनारसाठी आणि चर्चासत्र विशेषांकासाठी मार्गदर्शक समिती, आयोजक समिती, विशेष म्हणजे प्रा. डॉ. संजयकुमार करंदीकर (बडोदा विद्यापीठ) प्रा. डॉ.तुकाराम रोंगटे (पुणे विद्यापीठ) आणि प्रा.डॉ. राजेंद्र नाईकवाडे( नागपूर विद्यापीठ) या सर्वांचे तसेच सर्व निबंधलेखक, प्राध्यापक ,विद्यार्थी मित्रांचे विभागातर्फे मनःपूर्वक आभार !

लोकशिक्षण संस्था द्वारा संचालित लोकमान्य महाविद्यालयाचा मराठी विभाग १९९८ पासून कार्यरत आहे.तेव्हापासून लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील आणि प्राचार्य तसेच सुविद्य व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनात 'उपक्रमशीलता हा स्थायीभाव' या ब्रीदावर महाविद्यालयाचे शैक्षणिक उपक्रम होत असतात. खुद्द संस्थाध्यक्ष प्रा.श्रीकांत पाटील यांनी पाठपुस्तकावर संबंधित विषयाचे सारलेखन केले आहे .कोरोनाच्या आपत्तीजनक परिस्थितीत 'समकालीन मराठी साहित्य: चिंतन आणि चिकित्सा' या विषयावर चर्चासत्र विशेषांक करताना प्रकाशक डॉ . श्री. यशपाल नेत्रगावकर यांच्यासह अनेकांनी या

विशेषांकाला समृद्ध केले .रजत महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या आमच्या महाविद्यालयीन बौद्धिक उपक्रमातील ही मोठी उपलब्धी आहे,असे आम्ही समजतो.

**समन्वयक**

**डॉ. जयश्री शास्त्री**

मराठी विभाग प्रमुख

लोकमान्य महाविद्यालय वरोरा

**IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380** **ISSN 2319-4766**

An International Peer Reviewed & Refereed Journal

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-55

## Index


| SR. NO. | TITLE & AUTHOR NAME | PAGE NO. |
|---|---|---|
| 1 | **समकालीनता, नवीनता आणि अभिजातता**<br>*डॉ. राजेंद्र गोविंदराव नाईकवाडे* | 1-13 |
| 2 | **समकालीन स्त्रीवादी साहित्य प्रवाहातील नव्वदोत्तर स्त्रीवादी कथा**<br>*डॉ. मनीषा नागपुरे* | 14-20 |
| 3 | **समकालीन मराठी अनुवादित कादंबरी**<br>*डॉ. स्मिता वानखेडे* | 21-26 |
| 4 | **समकालीन मराठी अनुवादित साहित्य (नव्वदोत्तर साहित्यकाल)**<br>*डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत* | 27-34 |
| 5 | **समकालीन मराठी कथा**<br>*डॉ. कोमल वि. ठाकरे* | 35-44 |
| 6 | **वर्तमान परिप्रेक्ष्यात समकालीन दलित कविता**<br>*डॉ. अक्षय किशोर घोरपडे* | 45-51 |
| 7 | **फ. म. शहाजिंदे यांच्या साहित्यातील स्त्रीवादी दृष्टीकोन**<br>*डॉ. बालाजी व्ही. डिगोळे* | 52-56 |
| 8 | **समकालीन लेखिकांच्या कादंबऱ्यातील स्त्रीवाद**<br>*प्रा. उज्वला नामदेवराव जानवे* | 57-63 |
| 9 | **'तद्भव' कथासंग्रहाचे स्वरूप**<br>*प्रा. डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण* | 64-67 |
| 10 | **समकालीन मराठी गझलकाव्य**<br>*प्रविण रामकृष्ण मोरे, डॉ. भास्कर सु. ढोके* | 68-75 |

| | | |
|---|---|---|
| 11 | **समकालीन ग्रामीण वास्तवाचे प्रभावी चित्रण : 'पाडा'**<br>*प्रा. डॉ. विजयेंद्र विश्वनाथ पाटील* | 76-80 |
| 12 | **समकालीन स्त्रीवादी साहित्यप्रवाह**<br>*प्रा. सौ. रश्मी रमेश देसाई* | 81-87 |
| 13 | **समकालीन मराठी ग्रामीण कविता**<br>*प्रा. डॉ. राजकुमार मुसणे* | 88-102 |
| 14 | **केशव मेश्राम-दलित मुक्ती लढ्यातील विद्रोही कवी**<br>*डॉ. अशोक विठ्ठलराव वाहुरवाघ* | 103-105 |
| 15 | **समकालीन आदिवासी कवितेतील संवेदना**<br>*प्रा. डॉ. प्रकाश पी. वट्टी* | 106-114 |
| 16 | **समकालीन मराठी कादंबरी : निळया डोळयाची मुलगी**<br>*डॉ. अर्चना काटकर-सोनवणे* | 115-118 |
| 17 | जागतिकीकरणात समकालीन मराठी कवितेचे स्वरूप<br>*डॉ. नरेंद्र तुकडोजी आरेकर* | 119-128 |
| 18 | **'कोरकोंडा' कादंबरी — कायद्याच्या वाटेवरून होणारा संघर्ष**<br>*प्रा. डॉ. अरुण लाडे* | 129-134 |
| 19 | **'पोटमारा' या कादंबरीतील समकालीन जाणिवा**<br>*प्रा. प्रदिप केशव चापले* | 135-143 |
| 20 | **समकालीन मराठी नव कवींची ग्रामीण कविता**<br>*प्रा. डॉ. अतुल नारायन चौरे* | 144-151 |
| 21 | **रेखा बैजल आणि माधुरी शानभाग यांची विज्ञानकथा**<br>***प्रा. रंजिता वीरकर*** | 152-158 |
| 22 | **'आलोक' समकालीन दीर्घकथेचा यशस्वी अविष्कार**<br>*प्रा. विकास शंकर पाटील* | 159-163 |
| 23 | **समकालीन मराठी साहित्याचे स्वरूप आणि संकल्पना**<br>*प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत* | 164-168 |
| 24 | **आदिवासी आत्मकथने स्वरूप व आकलन**<br>*डॉ. विठ्ठल केदारी* | 169-173 |

| | | |
|---|---|---|
| 25 | **समकालीन मराठी दलित कविता**<br>*डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे* | 174-182 |
| 26 | **समकालीन आदिवासी साहित्य**<br>*अंकुश माणिक सोनुने* | 183-186 |
| 27 | **नव्वदोत्तरी दलित—आंबेडकरी कथा**<br>*अमित वासुदेव गजभिये* | 187-201 |
| 28 | **समकालीन मराठी कादंबरी**<br>*सहा. प्रा. उषा सिताराम पाटील* | 202-205 |
| 29 | **समकालीन आदिवासी कादंबरी**<br>*श्री. हर्षल गेडाम , डॉ. कोमल ठाकरे* | 206-215 |
| 30 | **समकालीन कवितेच्या प्रवाहात नवदोत्तरीतील स्त्री कवयित्रीच्या स्त्रीवादी कविता**<br>*डॉ. अमृता डोर्लीकर* | 216-226 |
| 31 | **समकालीन मराठी साहित्य:चिंतन आणि चिकित्सा**<br>*भूषण प्रदीपकुमार देशमुख, डॉ. प्रा. वंदना भोयर* | 227-231 |
| 32 | **स्त्रीचे वस्तूकरण म्हणजे हरण**<br>*डॉ. जयदेवी पवार* | 232-235 |
| 33 | **समकालीन समाजजीवनाचे आकलन मांडणारे कादंबरीकार रंगनाथ पठारे**<br>*डॉ. कोमल ठाकरे* | 236-243 |
| 34 | **दलित कांदबरीतून प्रकट होणारा आंबेडकरी विचार :मिमांसा**<br>*विकास गवई* | 244-247 |
| 35 | **समकालीन आदिवासी कादंबरीतील जीवनदर्शन**<br>*प्रा. चिन्नना मेंगाजी चालुरकर* | 248-253 |
| 36 | **शेतकरी जीवनाचा सर्वांगीण वेध घेणारी कादंबरी : बारोमास**<br>*डॉ. संभाजी शिवाजी जाधव* | 254-256 |
| 37 | **समकालीन वैदर्भीय समिक्षक आणि समीक्षा**<br>*प्रा. डॉ. बंडु चौधरी* | 257-260 |
| 38 | **दलित कविता आणि समकालिन वास्तव**<br>*डॉ. जगदिश्वर मेश्राम* | 261-265 |

| | | |
|---|---|---|
| 39 | **समकालीन स्त्रीवादी साहित्य प्रवाह**<br>*कु. वैशाली रामचंद्र धापोडकर* | 266-272 |
| 40 | **समकालीन आदिवासी कविता**<br>*प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर* | 273-277 |
| 41 | **मराठीतील समकालीन दलित साहित्य प्रवाह**<br>*तुळशिराम शंकर कांबळे* | 278-284 |
| 42 | **बाळासाहेब भडकवाड यांच्या 'फिरकी' या कादंबरीतील सामाजिक जाणिवा**<br>*प्रा. डॉ. लालबा दुमटकर* | 285-288 |
| 43 | **सदानंद देशमुखांच्या ग्रामीण कादंबरीतील समकालीनता : एक दृष्टिक्षेप**<br>*प्रा. डॉ. विजय रूपराव राऊत* | 289-293 |
| 44 | **जगतिकीकरणामुळे समकालीन भाषेचे बदलते स्वरूप**<br>*डॉ. मृदुला निळकंठ रायपुरे* | 294-298 |
| 45 | **समकालीन स्त्रीवादी प्रवाह**<br>*श्री भगत किशोर बाबुराव* | 299-302 |
| 46 | **समकालीन साहित्य प्रवाहात मराठी विज्ञान साहित्याचे योगदान**<br>*रजनीगंधा कंठीराम खिरटकर, प्रा. डॉ. सुदर्शन दिवसे* | 303-310 |
| 47 | **समकालीन मराठी कविता**<br>*प्रा. डॉ. गजानन आनंता देवकर* | 311-318 |
| 48 | **समकालीन मराठी कथा '' लाल चिखल '' एक आकलन**<br>*प्रा. डॉ. निलीमा दिगंबर कापसे* | 319-320 |
| 49 | **समकालीन मराठी साहित्य कविता**<br>*प्रा. ए. ए. नांदगावकर* | 321-325 |
| 50 | **समकालीन निवडक दलित आत्मकथने**<br>*प्रा. डॉ. संजय के. लाटेलवार* | 326-333 |
| 51 | **ग्रामीण समाजवास्तव आणि ग्रामीण कथा**<br>*डॉ. राखी जाधव* | 334-339 |

| | | |
|---|---|---|
| 52 | **आदिवासी कविता आणि जागतिकीकरण**<br>*डॉ. रामचंद्र मोरेश्वर वासेकर* | 340-346 |
| 53 | **समकालीन मराठी कविता : एक दृष्टिक्षेप**<br>*डॉ. सुधीर व. रायपुरकर* | 347-352 |
| 54 | **समकालीन लौकिकतावादी समीक्षा**<br>*प्रा. डॉ. रेखा जगनाळे—मोतेवार* | 353-360 |
| 55 | **समकालीन आव्हाने आणि मुक्तिबोधांच्या कवितेतील मानुषता**<br>*प्रमोद नारायणे* | 361-368 |
| 56 | **समकालीन साहित्यप्रकारांचे ठळक परिप्रेक्ष्य**<br>*डॉ. जयश्री शास्त्री* | 369-373 |
| 57 | **समकालीन साहित्य अभिव्यक्तीचे माध्यम : सोशल मीडिया**<br>*डॉ. पल्लवी ताजने* | 374-378 |

# समकालीनता, नवीनता आणि अभिजातता

**डॉ. राजेंद्र गोविंदराव नाईकवाडे**

*सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर*

*9850351025*

साहित्याच्या महात्मतेचा शोध घेताना त्या त्या साहित्यकृतीचे कालिक-ऐतिहासिक पर्यावरण महत्त्वाचे ठरते. विशिष्ट कालावकाशाच्या सीमांनी कलाकृती निबद्ध असतात. त्यांची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्येही कालीक भानाशी निगडीत असतात. मराठी साहित्यांत वापरली जाणारी 'आधुनिक साहित्याचे जनक, 'नवकाव्याचे जनक, 'विसाव्या शतकातील श्रेष्ठ कादंबरीकार'यासारखी अभिधाने साहित्याच्या ह्याच वैशिष्टयाकडे अंगुलीनिर्देश करतात. साहित्यकृतीचे मूल्यांकन करताना आणि तिचे श्रेष्ठत्व ठरवतानाही कालिक भान महत्त्वाचे असते. पूर्वपरंपरेच्या आधारानेच आपण प्रामुख्याने नवतेचे स्वरूप आणि मूल्य ठरवत असतो. परंपरा आणि नवता अशाप्रकारे परस्परांच्या साहाय्याने अर्थ प्राप्त करीत असतात. पूर्वकाळ आणि समकाळ ह्यांचे नाते अंतरंगात धारण केल्याशिवाय कुठल्याही कलावंताला सार्थकपणे आपल्या भावना आणि आपले विचार प्रकट करता येत नाहीत. पूर्वपरंपरेच्या पार्श्वभूमीवरच बहुधा नव्याचे मोठेपण ठरविले जाते. "या बड्या बंडवाल्यात ज्ञानेश्वर माने पहिला"ह्या ओळीत कवी 'बी' संत ज्ञानदेवांना मराठीतील पहिल्या बंडवाल्याचा जो मान देतात, तो पूर्वपरंपरेच्या संदर्भात असतो. आधुनिक काळात आणि विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात मराठी भाषेत निर्माण झालेले 'ग्रामीण'व 'दलित' हे दोन साहित्यप्रवाह पूर्वी मराठीत नसलेल्या आणि नव्याने निर्माण झालेल्या वेगळ्या आणि वैशिष्ट्यपूर्ण भावविश्वाचे निदर्शक ठरतात.

साहित्याचे स्वरूप हे बहुधा समकाळाशी निबद्ध असते. त्यामुळे साहित्यकृतींचे मूल्यांकनही काळाचा विचार मनात ठेवून करावे लागते. उदा. संतसाहित्याचे मूल्यमापन करताना आधुनिक विसाव्या शतकातील विचारधारा आणि बदललेली जीवनमूल्ये ह्यांचा वापर तारतम्यानेच करावा लागतो. संतांच्या काव्यातील सामाजिकतेचा किंवा समानतेचा विचार भारतीय अद्वैतचिंतनाच्या प्रभावातून आणि त्यास त्यांनी दिलेल्या युगानुकुल आत्मप्रत्ययाच्या सामाजिक जाणिवेतून आलेला असतो. तो काही कथित आधुनिकांच्या समाजनिष्ठ विचारसरणींचा प्रभाव असू शकत नाही, ह्याचेही भान अनेकजण हरवून बसतात, आणि आपल्याच विचारचौकटीत प्राचीन साहित्य कोंबण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत असतात. या उलट देशीय वृत्तीचे विचारवंत संतांच्या साहित्यातील कालसापेक्ष 'नव्या' जाणिवांना 'देशी आधुनिकता' म्हणून संबोधतात. प्रत्येक साहित्य-संस्कृतीची आणि साहित्य-परंपरेची स्वतःची देश्य अशी 'आधुनिकता' असते. त्यामुळे नव्या काळाचे निकष जुन्या काळातील साहित्यावर लादणे इष्ट नसते. त्या त्या काळातील सामाजिक-सांस्कृतिक धारणांच्या परिप्रेक्ष्यातच त्या त्या काळातील साहित्याची मौलिकता ठरत असते. योगायोगाने प्रत्येकच काळातील साहित्यात काळाच्या सीमा ओलांडून जाण्याचे, कालोत्तीर्ण होण्याचेही एक सामर्थ्य असते. भारतीय साहित्याच्या त्रिवेणी परंपरेचे (संस्कृत साहित्य परंपरा, लोकसाहित्य परंपरा आणि इतर

भारतीय भाषिक साहित्य परंपरा) अवलोकन करताना ह्याचा उत्कट प्रत्यय आजच्याही कथित अत्याधुनिक अशा एकविसाच्या शतकात येत असतो. अशा कालोत्तीर्ण ठरणार्या साहित्यासाठी सर्वसाधारणपणे 'अभिजात' अशी संज्ञा वापरली जाते. साहित्याच्या समकालीनेतेची चर्चा करताना वाङ्मयातील अशा 'अभिजात' जीवन-जाणिवांचे आणि शाश्वत अशा जीवनमूल्यांंचेही भान ठेवणे आवश्यक असते. त्याशिवाय कुठल्याही काळातील साहित्यकृतीचे साम्याने मूल्यांकन होऊ शकत नाही. पुष्कळदा विशिष्ट काळाशी बांधलेले किंवा विशिष्ट काळाच्या राजकीय-सामाजिक विचारांनी प्रसंगनिष्ठ ठरणारे वाङ्मय उथळ, सपक आणि सवंग निपजण्याचा धोका असतो. असे वाङ्मय काळाच्या प्रवाहात टिकत नाही, लवकरच कालबाह्य होऊन जाते! "ते इतके संकुचितपणे कालनिबद्ध असते, की ते पुरेसे समावेशक कालभान जोपासणारे नसते" असे मर्ढेकरांच्या "इतके परपुष्ट असते की पुरेसे परपुष्ट नसते" ह्या वचनाच्या धर्तीवर म्हणता येते. ह्या पार्श्वभूमीवर साहित्याची 'समकालीनता'जशी महत्त्वाची ठरते. आज एकविसाव्या शतकात जेव्हा आपण 'समकालीन'या संज्ञेचा विचार करतो तेव्हा स्वाभाविकपणेच जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरण, संगणक क्रांती आणि माध्यमक्रांती ह्या घटितानंतरचा कालखंड, म्हणजे नव्वदोत्तर कालखंड, म्हणजे एकविसावे शतक किंवा इसवीसनाचे तिसरे सहस्रक, असा कालखंड गृहीत धरायला हवा. स्वातंत्र्यानंरच्या 'नव', 'साठोत्तर' इत्यादी संकल्पना आता मागे पडलेल्या असून त्यांचे महत्त्व केवळ 'ऐतिहासिक' स्वरूपाचे राहिले आहे काय? असाही प्रश्न मनात येतो. ह्याच विचारांचे परिप्रेक्ष्य काहीसे पुढील चिंतनबिंदूंना लाभले आहे.

**समकालीनता**

'समकालीन' हा शब्द उघडपणेच काळाचा निर्देश करणारा आहे. विशिष्ट काळातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पर्यावरण, तत्संबंधित विविध प्रकारच्या समाजविषयक धारणा, आणि समस्या, तत्कालीन मानवी जीवनातील आणि नातेसंबंधातील ताणतणाव, सामाजिक आंतरसंबंधातील विसंगती आणि अंतर्विरोध इत्यादींचे प्रतिबिंब वेगवेगळ्या स्वरूपात साहित्यात पडत असते. त्यातूनच आधुनिक काळात मराठी साहित्याच्या आजवरच्या परंपरेला परिभाषित करण्याच्या प्रयत्नात आपण प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन, आधुनिक, समकालीन इत्यादी संकल्पना मांडत असतो. त्या संकल्पनाव्यूहांना परंपरेत काही निश्चित अर्थ प्राप्त होत जातात तर काही अंशी ह्या अर्थातली संदिग्धता आणि संभ्रमही कायम राहतात, ते कधीच मिटत नसतात. सर्वसाधारणपणे मराठीत आजवर झालेल्या समीक्षेने 'समकालीन' या संज्ञेचा पुरेसा गांभीर्याने उहापोह केलेला दिसत नसला, तरी 1945 नंतरचे म्हणजे नवसाहित्याच्या प्रारंभानंतरच्या कालखंडातले साहित्य असा एक सरधोपट अर्थ त्यास प्राप्त झालेला दिसतो. 'आधुनिक' किंवा 'नव' ह्या एकामागोमाग आलेल्या संकल्पनांप्रमाणेच 'समकालीन' ही संकल्पनाही कालसापेक्ष ठरते. कारण ह्या संज्ञामागील गर्भितार्थ त्या त्या काळाच्या संदर्भातच सार्थक ठरणारा असतो. त्यामुळे या संदर्भात केवळ 'समकालीन' ह्या संकल्पनेबाबतच तक्रार करता येणार नाही. कारण 1945 नंतरचे किंवा स्वातंत्र्योत्तर ते इ.स. 2000 पर्यंतचे साहित्य आज 2021 मध्येही समकालीन कसे? असा प्रश्न स्वाभाविकपणेच पडतो. परंतु हाच निकष 'नव' किंवा 'आधुनिक' किंवा 'अर्वाचीन' इत्यादी संज्ञांसाठीही लावता येऊन त्यास प्रशांक्ति करता येऊ शकते!

'सम'म्हणजे 'सारखा'! समकाळ म्हणजे सारखा काळ किंवा एक काळ. समान काळातील साहित्य म्हणजे समकालीन साहित्य. ही 'सम'ता कोणत्या संदर्भात आणि कुठल्या पातळीवर जोखायची असते हा एक महत्त्वपूर्ण प्रश्न या संदर्भात उद्भवतो. प्रत्येक युगाच्या, काळाच्या काही विशिष्ट जाणिवा असतात. ह्या युगजाणिवांच्या संदर्भातच समकालीन साहित्याची खरी 'समकालीनता' तपासता येते. सम-जाणिवा असलेल्या एका विशिष्ट कालखंडातील साहित्य असे त्यास म्हणता येते. किंवा "समकालीन जाणिवा+त्यांचे वाङ्मयातील प्रकटीकरण = समकालीन साहित्य", असेही समीकरण मांडता येईल. समकालीन जाणीव ही 'आधुनिकता' 'नवता' या सकंल्पनांशी वा त्यांतील अर्थवलयाशी नाते सांगणारी अशी जाणीव आहे. आधुनिक युगाच्या केंद्रवर्ती 'अंतर्विरोधांनी दुभंगलेले मानवी व्यक्तित्व हा या युगाच्या स्थायीभाव' ही गो. वि. करंदीकरांनी वर्णिलेली जाणीव असल्याचे प्रामुख्याने दिसते. हे अंतर्विरोध 'सुबत्तासमृद्धी आणि सामान्यांची दुरवस्था', 'वैज्ञानिक प्रगती आणि युद्धांनी घडवलेला अपेक्षाभंग', 'अध्यात्म-धर्म यांची ओढ आणि भोगवादजडवाद यांची लालसा', 'आदर्श जीवनमूल्ये आणि मूल्य-हास व दांभिकता', 'आंतरराष्ट्रीयता-जागतिकीकरण आणि राष्ट्रवाद-देशीवाद', 'सामाजिक सहवास आणि व्यक्तिवादाची तीव्र जाणीव', 'विश्वविजयी विराट अहंकार आणि लहानसहान गोष्टीपुढची हतबलता-अगातिकता, इत्यादि शब्दांमध्ये मांडले जात असतात. 'आधुनिक' ही संज्ञा अधिक व्यापक आणि इ.स. 1800 ते 2000 आणि आता 21वे शतक! अशा दोन शतकातील मानवी जीवन जाणिवांना आणि ह्या काळात प्रकटलेल्या सपूर्ण वाङ्मयाला लावली जाते. विशेषतः मराठीच्या संदर्भात 1900 ते 2000 हे शतक आधुनिक मराठी साहित्याचे शतक मानले जाते. 'नव' हे विशेषण 1945 नंतरच्या महायुद्धोत्तर मराठी वाङमयातील विशिष्ट प्रवृत्ती-प्रवाहाशीच फक्त जोडले जाते. मराठी साहित्यातला एक गट किंवा प्रवाह त्यातून सुचविला जातो. 1945 ते 1960 या छोट्याशा कालखंडातील साहित्याला साधारणपणे नवसाहित्य म्हटले गेले आहे. तुलनेने 'समकालीन' या शब्दात विशिष्ट प्रवृत्ती वा प्रवाह न सूचविता, केवळ कालिक भान सुचविले आहे. समकालीन मध्ये कालसापेक्षता महत्त्वाची आहे. त्यामुळे ही संज्ञा अधिक व्यापक, विविध 'कालखंडालाच' लागू होऊ शकणारी अशी एकीकडे, तर मराठीपुरता विचार करता एका विशिष्ट कालखंडातल्या 'साहित्यासाठी'वापरली जाणारी अशी दुसरीकडे दुहेरी स्वरूपाची असल्याचे दिसून येते. समकालीनतेत 'नवजाणीव' ही गृहीतच धरली जाते. मराठी साहित्यापुरता, रूढ झालेल्या संकल्पनांच्या प्रकाशात विचार करता 'आधुनिक' हे एक मोठे वर्तुळ, त्यात सामावणारे 'समकालीन' हे त्यापेक्षा छोटे वर्तुळ आणि त्याच्याही आत समाविष्ट होऊ शकणारे 'नव' हे अधिक छोटे 'वर्तुळ' असल्याचे निदर्शनास येते.

समकालीनतेत 'वर्तमान' हा महत्त्वाचा ठरतो. परंतु ह्याचा अर्थ असा नव्हे, की केवळ काळाने 'आजचेच'साहित्य फक्त 'समकालीन'होऊ शकेल. कदाचित 1990 नंतरच्या जागतिकीकरणाच्या प्रभावानंतरच्या 'आज'व लगतच्या 'काल'मध्ये मराठीत निर्माण झालेल्या साहित्याला आजच्या संदर्भात 'समकालीन' ही संज्ञा लावता येईल. परंतु या नव्या प्रभावाची चिन्हे आता कुठे म्हणजे 2000 नंतरच्या दोन दशकात उमटू लागली आहेत! आणि त्याचे पूर्णरूप कदाचित पुढील काही वर्षात साहित्यातून प्रकटलेले

राहील! त्यानंतर त्याचा विचार ‘नवे समकालीन साहित्य’ किंवा ‘एकविसाव्या शतकातील समकालीन साहित्य’ अशाप्रकारे अधिक नेमकेपणाने करता येईल.

समकालीनता ही काळाच्या संकल्पनेशी मूलतः निगडित आहे. या संकल्पनेत काळाचे परिमाण महत्त्वाचे आहेच, परंतु सोबतच काळाचे भानही त्यात महत्त्वपूर्ण आहे. तद्वतच केवळ तात्कालीकता किंवा वर्तमान म्हणजे समकालीनता नव्हे हेही लक्षात घेणे अगत्याचे आहे. एकीकडे वर्तमानकाळात लिहिणारे अनेक लेखक आपल्या अवतीभवती आपण पाहतो तर ते आपल्याला समकालीन वाटत नाहीत, तर अनेक भूतकालीन लेखक कथित समकालीन लेखकांपेक्षा अधिक ताजे, सार्थक व आजचे म्हणजे खर्या अर्थी समकालीन वाटतात. याचाच अर्थ केवळ वर्तमानकालीन असणे म्हणजे समकालीन असणे होऊ शकत नाही. कारण जो लेखक आजच्या वास्तव जीवनाला जागरूकपणे सामोरा जातो आणि गांभीर्याने आपल्या काळाचा आणि त्यातील विविध ताण्याबाण्यांचा शोध घेतो तो समकालीन म्हटला पाहिजे. त्यामुळेच समकालीनता ही केवळ वर्तमानकालनिबद्ध संकल्पना नसून तिच्यात भूतकाळ आणि भविष्यकाळही अनुस्युत असतो. तिच्यात काळाच्या अखंडत्वाची व प्रवाहीपणाची जाणीव असते. इथे परंपरा आणि नवता याचा अनुबंध तपासणे गरजेचे ठरते. यासंदर्भात गो.वि. करंदीकर म्हणतात- “नवता व परंपरा ही मात्र परस्परजीवी असतात. परंपरा ‘घडत असताना’ ज्याचा प्रत्यय येतो ती नवता, आणि नवता ‘आत्मसात केल्यावर’ जी मागे उरते ती परंपरा.” (परंपरा आणि नवता, पृ.7)

तर निशिकांत ठकार म्हणतात - “जी परंपरा आणि जी नवता जगण्याच्या प्रक्रियेत ऐतिहासिक विकासक्रमांच्या प्रक्रियेत सामील झालेली आहे, आजही आपल्या स्पंदनशीलतेचा प्रत्यय देत आहे, गतिशील आहे ती समकालीनतेला पोषकच असते. वस्तुतः कालस्वर ओळखणे म्हणजेच समकालीन होणे होय. मग त्याचे पडसाद परंपरेच्या पडदयातून झंकारत असोत नवतेच्या नांदीतून निनादत असोत.” (पृ. 10, साहित्याचे परीघ)

समकालीन साहित्याची व्याख्या प्रा. वसंत आबाजी डहाके पुढीलप्रमाणे करतात - “समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे. ज्या काळात ते निर्माण होत असते. त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे. त्या काळातील विचार, जाणिवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात, असे साहित्य.” (पृ.2, नवसाहित्य व नवसाहित्योत्तर साहित्य) स्वाभाविकपणेच आपल्या काळाशी आणि तत्कालीन परिस्थितीशी जवळचे नाते सांगणारे साहित्य समकालीन म्हटले पाहिजे. यासंदर्भात जागतिकीकरणाच्या प्रभावानंतरचे मऋश्रेलरश्र र्‌ीं‌ळश्रश्ररसशफ च्या संकल्पनेच्या छताखालचे, संगणक व माध्यमे ह्या क्षेत्रात घडून आलेल्या अभूतपूर्व बदलांनंतरचे साहित्य, म्हणजे ‘नव्वदोत्तर’ साहित्य (1990 नंतरचे जाणिवांचे साधारणपणे 2000 नंतर प्रकाशित झालेले) हे खर्या अर्थाने ‘समकालीन’ म्हटले पाहिजे. तसे जिवंत आणि प्रामाणिक साहित्यात स्वभावतःच कलावंताच्या व्यक्तित्वाचे आणि त्याद्वारा त्यांच्या काळाचे पडसादच उमटलेले असतात. साहित्यप्रवाहाच्या वेगवेगळ्या वळणावर निर्माण होणार्या श्रेष्ठ कलाकृती ह्या काळाचे भान आणि काळाचे ताण घेऊनच जन्माला येताना दिसतात. प्रा. डहाक्यांनी 1945 ते 1985 या कालखंडातील साहित्याला ‘समकालीन साहित्य’ म्हटले आहे. समकालीनतेत परंपरेचा धागा किती आणि कोणत्या प्रमाणात महत्त्वाचा

ठरतो हे सांगताना ते म्हणतात समकालीनतेत त्या विशिष्ट काळातील समस्या, प्रश्न, ताण, अंतर्विरोध यांचा समावेश होतो. म्हणजे समकालीनतेत तात्कालिकतेचा संदर्भ असतो. मनुष्याला तात्कालिक संदर्भ महत्त्वाचे वाटतात. तसेच काही तात्कालिकतेच्या सीमेबाहेरचे व्यापक संदर्भही असतात. काही शाश्वत प्रश्न, सनातन अवस्था असतात. मानवाची स्थिती, मानवाची नियती यांविषयीचे ते प्रश्न असतात. समकालीन समस्येची सोडवणूक करीत असतानाच त्या शाश्वत समस्येचीही सोडवणक करण्याचा तो प्रयत्न करीत असतो." (पृ.4) त्यामुळे वर्तमानपत्री स्वरूपाचे केवळ तात्कालिकतेत अडकून पडणारे प्रासंगिक व अभिनिवेशी साहित्य खूपदा काळाच्या ओघात टिकत नाही. त्यामुळे खरे 'समकालीन' साहित्य हे 'सार्वकालीन' रूप धारण करीत जाते. उदा. प्राचीन काळातील मोठे साहित्य हे आजही 'कालबाह्य'झालेले वाटत नाही; कारण समकालीनत्वाचा भूत-वर्तमान भविष्य ह्यांच्याशी भान राखणारा सम्यक समन्वयाचा सेतू त्यात कलावंताच्या प्रातिभ सामर्थ्याने आपल्या कलाकृतींमधून उत्कृष्टपणे, उत्कटत्वाने व सहजपणे साधलेला असतो.

'समकालीनता' ह्या संकल्पनेचे नेमके स्वरूप स्पष्ट करता येणे कठीण आहे असे मत व्यक्त करणार्या डॉ. मदन कलकर्णी यांनी पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे. "आपल्या आणि आपल्या आसपासच्या बदलत्या कालखंडातील व्यक्ती, घटना, प्रसंग, जीवनजाणिवा, विचारप्रणाली, भावानुभूती यांचे चित्रण युगभान सांभाळून ज्या साहित्यात केलेले असेल ते साहित्य समकालीन साहित्य म्हटले पाहिजे." (साठोत्तरी मराठी वाङ्‌‌यातील नवान प्रवाह' संपा. शरणकुमार लिंबाळे) यासंदर्भातली आणखी एक व्याख्या बघा- "ज्या साहित्याला आज आपण 'नव' हे विशेषण जोडतो ते साहित्य केवळ कालमानानच नव्हे तर एका वेगळ्या दृष्टीने फ्राईड, औद्योगिकरण आणि अस्तित्ववाद या तीन घटितानंतरचे साहित्य आहे... मानवाच्या ज्ञानाच्या क्षेत्रात आणि सामाजिक सबंध व भावजीवन यांच्या प्रांतात या तीन घटितांनी अभूतपूर्व क्रांती घडवून आणली. (प्रा. सु. श्री. पाढरीपांडे, वाङ्‌‌यीन नवताः अर्थ आणि अन्वय)

उपर्युक्त व्याख्या ही नवसाहित्याच्या संदर्भात केलेली असली त्यात 'समकालीन' या संज्ञेत सामावणारे वा त्यात अपेक्षित असणारे प्रमख घटक आलेले दिसतात. त्या अंगाने ही व्याख्यासुद्धा महत्त्वाची ठरते. साहित्याच्या समकालीनतेचा विचार करताना ह्या संकल्पनेला मूर्त करणारी साहित्याची काही वैशिष्ट्येही पुढे आलेली दिसतात. ही वैशिष्ट्ये विविध प्रवृत्ती-प्रवाहांच्या, वाद-विचारांच्या अनुषंगाने आपले स्वतःचे रूप घडवतात. कधीकधी या वैशिष्ट्यांचा एकत्र विचार करताना त्यात काही अंतर्विरोध असल्याचा भासहा होतो. परंतु 'समकालीनता' ही गोष्ट कुणा एखाद्या वाद-विचारधारेशी निगडीत नसल्याने किंवा कुठल्या विशिष्ट धारणा-विचारांची बटीक नसल्याने त्यात अनेक विशेषतांचा एकाच वेळी अंतर्भाव होऊ शकतो. अशी समकालीन साहित्याची वैशिष्ट्ये पढीलप्रमाणे सांगता येतील. ह्या वैशिष्ट्यांमधली प्रवत्ती आणि प्रवाहांची विविधता बघता हे समकालीनतेचे तत्त्व कुणा एखाद्या नवसाहित्यप्रवाहाशी अथवा दलित साहित्यप्रवाहाशीच निगडीत आहे असे म्हणता येणार नाही. समकालीनतेचा आविष्कार विविध प्रवत्ती-प्रवाहांमध्ये भिन्नभिन्न प्रकारे होताना दिसतो. या वैशिष्ट्यांमध्ये दुर्बोधता, अश्लिलता, पावित्र्यविडंबन, प्रयोगशीलता, संज्ञाप्रवाह, प्रतिमाप्राधान्य, विद्रोह अथवा परंपरानिषेध, बांधिलकी अथवा सामिलकी, मूर्तिभंजन, स्वातंत्र्य वा मुक्तपणा वा स्वैरचिंतन, कामचिंतन, धर्मनिरपेक्षता, नवअध्यात्म वा अस्तित्वचिंतन, समरसता, बंधुभाव, स्त्रीमुक्ती वा

भगिनीभाव, विज्ञाननिष्ठा वा वैज्ञानिकता, मृत्युचिंतन, देशीयता, सामाजिकता, इत्यादींचा समावेश करता येईल. इथे नवतेत मिसळलेले परंपरेचे धागेही आपल्याला दिसतात. समकालीनता याचा अर्थ परंपरेशी पूर्णपणे विलग होऊन अधांतरी अवकाशात लटकणे नव्हे! हा अनुबंध लेखात अन्यत्र चर्चिला आहेच.

**समकालीन आणि नव्वदोत्तर**

मराठी साहित्यात काळानुरुप महायुद्धोत्तर, साठोत्तर आणि नव्वदोत्तर साहित्य अशी स्वातंत्र्यानंतरच्या साहित्याची सरळ वर्गवारी केली जाते. महायुद्धोत्तर साहित्याने मराठी साहित्यात मोलाची भर घातली. 1960 नंतरच्या साहित्याला वैचारिक आधार मिळाला. घडत असलेले सामाजिक परिवर्तन, डॉ. आंबेडकरांच्या विचारधारेने आणि प्रेरणेने साहित्याकडे वळलेली नवी पिढी, नवशिक्षित ग्रामीण पिढी साठोत्तरी साहित्याला आकार देत राहिली. मराठी साहित्य एका विशिष्ट वळणावरून प्रवास करीत पुढे विस्तारत व प्रवाहित झाले. दलित कविता, आत्मकथने, ग्रामीण कथा, कादंबरी, कविता हे प्रकार दुथडी भरून वाहात होते ते 1990 पर्यंत म्हणजे जागतिकीकरणाच्या रेट्याला प्रारंभ होईपर्यंत! पुढे जागतिकीकरणाच्या प्रभावात या प्रवाहांची वैशिष्ट्ये धूमर झालेली दिसतात. सामान्य माणसाची जीवनशैली बदलली, त्याच्या वैचारिक निष्ठा आधीइतक्या प्रखर नि प्रभावी राहिल्या नाहीत. समाजहितापेक्षा व्यक्तिगत सुखाला अधिक महत्त्व आले. साहित्याची व साहित्यप्रकाराची लेबले कोणतीही असली तरी आणि त्यांनी कोणताही पवित्रा घेतला तरी, त्यांच्या निष्ठा आणि विचारधारांना धक्के या काळात पोहचलेले दिसतात. 'खाउजा'नंतर अर्थक्रांती ते शेतकरी आत्महत्यापर्यंतचे बिंब-प्रतिबिंब साहित्यात मोठ्या प्रमाणात उमटताना दिसते. भालचंद्र नेमाडेपासून सदानंद देशमुखांपर्यंत, अरुणा ढेरे ते कविता महाजन, नीरजापर्यंत नि विज्ञानवादी कवितेचे प्रवर्तक डॉ. शि. गो. देशपांडे यांच्यापासून आजच्या नवकवींपर्यंत सार्यांच्याच साहित्यात याचे कमी-अधिक पडसाद उमटले आहेत. विशेषतः शहरी नवकवी आणि लेखकांवर त्याचा जास्त परिणाम झालेला दिसतो. नव्वदोत्तर काळात सगळीकडे एक प्रकारचा वैचारिक गोंधळ ही माजलेला दिसतो. जागतिक वैचारिक प्रदुषणाला प्रतिबंध घालण्याचा ही ही प्रयत्न मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. बाबा रामदेव, श्री श्री रविशकर, जग्गी वासुदेव सद्गुरु यांच्यासारखी मंडळी समाजाला योग्य दिशा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करताना दिसतात. भारत जगाचे नेतृत्व करेल ही नेत्सोडेम्सची भविष्यवाणी खरी ठरण्याची चिन्हे दिसतात. आपला देश जगाचे वैचारिक नेतृत्व तर करीत होताच, सोबतच आता राजकीय नेतृत्वाच्या दिशेने प्रचंड वेगात पाऊल टाकतो आहे, याचीही काही शुभचिन्हे दिसतात. अब्दुल कलामांचा 'भारत 2020' सारख्या ग्रंथातून त्याची काही लक्षणे प्रकटली आहेत.

सोबतच समाज जीवनातील बदल, बदललेली कुटुंबव्यवस्था, नवतंत्रज्ञानाने तरुणतरुणींच्या जीवनात झालेले बदल, नको तेवढा स्वातंत्र्याचा पुरस्कार, लैंगिकतेचे प्रश्न, अशा परिस्थितीत आपल्या मूळांचा शोध घेण्याचा प्रयत्न इत्यादी विविध नवनवे प्रश्न आणि समस्या ह्यांच्या प्रतीक्रिया उमटताना दिसतात. संस्कार, नैतिकता यांच्या आधारानेच देशाची एकात्मता आणि अस्तित्व, टिकू शकेल असा आशावाद एकीकडे दिसतो, तर दुसरीकडे सारे जुने नाकारण्याचा अट्टहास दिसून येतो. एकीकडे अत्यंत व्यक्तिकेंद्रित आणि भान हरवलेल्या उत्तर आधुनिकतावादाने व्यक्तीला अधिक संकुचित स्वैर करण्याचा चंग बांधलेला असताना,

भारतीयत्वकेंद्री दृष्टी वैश्विक भान जपत समाजकेंद्रिततेला अधिक व्यापक रूप देताना दिसते. भारतीयत्वाच्या विचारांची अधिक प्रकर्षाने गरज भासत असताना, विविध वादांना म्हणजे 'इझम'ला आता पूर्वीचे 'चांगले दिवस राहिलेले नाहीत असेही दिसून येते. मार्क्सवाद असो की स्त्रीवाद की आणखी कुठलाही वाद. त्यांची वैचारिक फरफट होताना दिसते! आज जे काही शिल्लक आहे ते केवळ कागदावर उरले आहे की काय? असाही कळीचा प्रश्न निर्माण होण्याचा हा कालखंड आहे!

नव्वदोत्तर कालखंड हा प्रामुख्याने संक्रमणाचा आणि संभ्रमाचा कालखंड आहे. दोन शतकांना आणि सहस्रकांना जोडणारा हा संधिकाळ आहे. 20व्या शतकाच्या अखेरीस आणि एकविसाव्या शतकाच्या आरंभी विशेषतः माध्यमक्षेत्रात नवी क्रांती किंवा आमुलाग्र बदल झालेले दिसतात. विशेषतः ग्रंथनिबद्ध साहित्य आणि वाचनसंस्कृती, मराठी रसिकांच्या, वाचकांच्या आणि सर्वसामान्य मराठी माणसांच्या अभिरुचीच्या परिघावर आलेली दिसते. वाचनसंस्कृतीने केंद्रापासून कारकत घेतलेली दिसते. जागतिकीकरणाने साहित्यक्षेत्राचा परिघ विस्तारल्याने एकीकडे जागतिक प्रभावात अस्तित्व टिकवण्याचे आव्हान आहे, तर दुसरीकडे सर्व जगात प्रभाव निर्माण करण्याची संधी सुद्धा आहे! अशाप्रकारे एकविसाव्या ज्ञानयुगात, माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात, ऐीर ेष खढ च्या काळात संगणकक्रांती व माध्यमक्रांतीनंतर व्यापक अर्थाने माध्यमविश्वाचा एक भाग असलेले साहित्यविश्वही प्रभावापासून अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे वाचनव्यवहाराच्या आणि सात्यि व्यवहाराच्या क्षेत्रात अनुभवाला येणार्या आमुलाग्र बदलांची चर्चा करणे इब ठरते. नव्वदोत्तर-समकालीन काळाची वैशिष्ट्ये समजून घेताना ह्या संभ्रमकाळाचे नेमके स्वरूप लक्षात घ्यावे लागते. त्यातूनच मग नव्वदोत्तर साहित्याचे नेमके स्वरूप, त्या साहित्याची वैशिष्टये आणि त्यांचे वेगळेपण अथवा मोठेपण अधोरेखित करता येऊ शकते.

**समकालीन वाचनसंस्कृती आणि साहित्यव्यवहार**

मराठी वाचनविश्वाच्या उद्ध्वस्तपणाची कारणमीमांसा 21व्या शतकातील गेल्या दोन दशकांपासून अनेकजण करीत आले आहेतच. पण 'पेरले ते उगवते' ह्या न्यायाप्रमाणे महाराष्ट्रातील मराठी संस्कृतीच्या पुरोगामी धुरिणांनी जो आधुनिकीकरणाचा, इंग्रजीकरणाचा आणि पाश्चात्तिकरणाचा दुराग्रह गेल्या चार-पाच दशकांपासून आंधळेपणाने चालवला होता त्याचेच हे एक फलित आहे, हे स्पष्ट सांगण्याचे धाडस मात्र कुणी करताना दिसत नाही. आपली भाषा, भूषा, खानपान, आपले रीतिरिवाज, सण-उत्सव, आपल्या ग्रामीण-नागर परंपरा ह्या सार्यांचे पालन-संगोपन करणे म्हणजे 'पुनरुज्जीवनवाद' किंवा 'प्रतिगामीपणा' किंवा 'अंधश्रद्धा'! अशीच मांडणी मराठी साहित्य-मराठी पत्रकारिता यातला मोठा वर्ग आजवर हिरीरीने करीत राहिलेला दिसून येतो. 'मराठी मनाचा मानबिंदू', 'मराठी माणसाचा एकमेव आवाज' अशासारखी बिरुदे मिरविणारी माध्यमे धंदेवाईक बनून मराठी-भाषा-संस्कृतीच्या मूळावरच आघात करीत राहिली हे दुसरीकडे आपण विसरतो. आपणच आपल्या संस्कृती-धारणांविषयी घृणा, द्वेष, न्यूनगंड सातत्याने पेरत राहिलो. पुरोगामीपणाच्या ढोंगी बुरख्याखाली पाश्चात्यशरण मानसिकतेतून निर्मिलेला संस्कृतिद्वेषाचा विकार दडवित राहिलो. त्यातूनच मग कॉन्व्हेंटकल्चर, पहिलीपासून इंग्रजी, अमेरिकेकडे झेपावण्याचा ध्यास आदि अनेक गोष्टी अंधपणाने स्वीकारत राहिलो. पुरोगामी शासकांनी पर्यावरणातली जैवविविधता जपण्यासाठी 'प्रोजेक्ट

टायगर' राबविलेत, परंतु आपली 'भाषा-साहित्य-संस्कृती' ही त्रयी सुरक्षित राखण्यासाठी काही विशेष 'प्रकल्प' मात्र उभारल्याचे स्मरत नाही. महाराष्ट्रातल्या प्रमुख वृत्तपत्रांनी बदललेल्या व्यावसायिक परिप्रेक्ष्यातवाङ्मयविषयक मजकुरांची पाने फॅशन-चित्रपट-स्त्रीदेहदर्शन-रंजन ह्यांच्या भडक प्रक्षेपणाकडे वळविली. बहुतेकांनी पुरवण्यांना, विशेषावृत्त्यांना इंग्रजी नावांनी सजविण्यास सुरुवात केली. इंग्रजीमिश्रित मराठीचा सढळ वापर सर्वत्र सर्रास सुरू झाला. पाश्चात्यीकरणाच्या चंगळवादी आकर्षणाने बेभान झालेल्या मंडळींनी मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीची व त्याची बाजू घेणार्यांची सदैव टिंगलटवाळीच केली. दुर्दैवाने हीच माणसे राजसत्तेच्या (शासनव्यवस्था) व विचार-माध्यमसत्तेच्या केंद्रस्थानी राहिली. दृक्श्राव्य माध्यमे-वाहिन्या, संगणक-महाजाल आदि नव्या तांत्रिक साधनांमध्ये गुरफटून गेलेल्या समाजास अशा परभृत विचारदृष्टीचे पाठबळ मिळाल्याने मराठी वाचनसंस्कृतीचा पुरताच र्हास झाला. अर्थात याही काळात मराठी भाषा-साहित्य-संस्कृतीचा आग्रही पुरस्कार करणारी काही 'माध्यमे' व संस्था प्राणपणाने कार्यरत राहिल्या आणि थोडेफार आशादायी असे आपल्या हाती काही शिल्लक राहू शकले, हा भाग वेगळा!

आपण इथे मराठी वाङ्मयव्यवहारातील ज्या एका संवेदनशील प्रश्नाची चर्चा करीत आहोत, त्याविषयीचे अत्यंत मूलगामी चिंतन 'वाङ्मयीन संस्कृती' (मौज प्रकाशन, 2010) ह्या आपल्या महत्त्वपूर्ण ग्रंथात सुप्रसिद्ध मराठी समीक्षक-विचारवंत डॉ. सुधीर रसाळ यांनी केले आहे. जिज्ञासुंनी व अभ्यासकांनी हा ग्रंथ आवर्जून बघावा असे सुचवावेसे वाटते. कारण काळच असा कठीण आला, की मोठमोठ्या साहित्यिक-कादंबरीकारांनाही आपली बाजारात आलेली नवी पुस्तके वाचण्यासाठी साहित्यक्षेत्रातील लोकांना वारंवार व्यक्तिगत व जाहीर स्वरूपात आवाहन करावे लागते. अनेक मराठी लेखकांचा आणि पुस्तकांचा गाजावाजा होत असतो. त्याची प्रकाशनेही धुमधडाक्यात होतात. परंतु या पुस्तकांच्या वाचनाबद्दल मात्र मराठीच्या प्राध्यापक-शिक्षकांना, पत्रकारांना व मराठीसंबंधित इतर घटकांना प्रश्न विचारुन अडचणीत आणू नये, अशी वस्तुस्थिती आहे. भालचंद्र नेमाड्यांची 'हिंदू' कादंबरी, सदानंद देशमुखांच्या नव्या-जुन्या कादंबर्या, महेश एलकुंचवारांचे 'मौनराग' हे ललितगद्य, डॉ. अक्षयकुमार काळे यांचा 'मिर्झा गालिब'वरील नवा ग्रंथ इत्यादी अनेक नव्या पुस्तकांच्या भाळी वाचकविन्मुखतेचा जो टिळा लागला आहे, तो मराठी वाचनसंस्कृतीच्या दुःस्थितीचे निदर्शक ठरणारा आहे. जाणत्या वाचकांची ही स्थिती आहे. कदाचित अजाणत्या वाचकांपुढे ग्रंथालयात सामोरी आलेली पुस्तके ते वाचतीलही. किंवा उपरोल्लिखित पुस्तके मनोरंजनपर नसल्याने त्यापासून वाचकवर्ग दूर राहात असेल! परंतु मराठीतील सद्यस्थितीतला खूप मोठ्या प्रमाणावर होणारा प्रकाशनव्यवहार आणि आणि प्रत्यक्षचा वाचनव्यवहार यातली प्रचंड दरी कुणाही मराठी वाचकाच्या मनात चिंता उत्पन्न करणारी ठरते. मराठी 'वाचक' आज 'दर्शक' बनला आहे, कथा-कादंबर्यांनी करावयाचे स्वप्नरंजन आणि प्रबोधन 'मालिका' करीत आहेत, विनोदाची भूक वाहिन्यांवरील 'शो' भागवित आहेत, दैनिकांतील शिळी वृत्तकथने वाचण्यात 'न्युज चॅनेल'च्या दर्शकांना रस राहिलेला नाही, छोटे-मोठे विचारवंत भाषण-लेखन करण्याऐवजी 'फेसबुक-व्हाटस्अप-विचारवंत' बनण्यात धन्यता मानीत आहेत, कवीलोक काव्यसंग्रह काढण्यापेक्षा आपल्या कविता नटवून-सजवून 'पोस्ट' करण्यास बाध्य झाले आहेत, असे असले तरी वाचनाचे स्वतःचे वेगळे महत्त्व उरतेच हे लक्षात घ्यायला हवे.

## नव्वदोत्तर वाचकविन्मुख समृद्ध साहित्यविश्व

सर्वसाधारणपणे 90 नंतरच्या कालखंडातल्या मराठी वाङ्मयविश्वावर दृष्टी टाकल्यास समकालीन जीवनजाणिवांना भिडणार्या अनेक उत्तम साहित्यकृती समोर येतात. म्हणजे सर्वाधिक वाचकप्रिय वाङ्मयप्रकार तो कादंबरी; जो घरी आणि वाचनालयात वाचला जातो अशी माहिती मिळते. तर नव्वदनंतरच्या मराठी कादंबरीचा व्यापक पैस पाहू वानगीदाखल! आणि त्याचा संबंध तपासून बघू वाचनव्यवहाराशी! नव्वदनंतरचे भारतीय परीप्रेक्ष्य अनेक नवनव्या बदलांना सामोरे जाणारे! त्यास खर्या अर्थी भिडू पाहणारे प्रतिभावंत लेखक मोठ्या संख्येत सुदैवाने मराठीत निपजले आहेत. अगदी थोडक्या मान्य लेखकांचा मी इथे निर्देश करतो. भालचंद्र नेमाडे (हिंदू), विश्वास पाटील (महानायक, लस्ट फॉर लालबाग इ.), राजन गवस (कळप, तणकट इ.), रंगनाथ पाठारे (ताम्रपट, दुःखाचे श्वापद, नामुष्कीचे स्वगत सातपाटील कुलवृत्तांत), सदानंद देशमुख (तहान, बारोमास, चारिमेरा), आशा बगे (त्रिदळ, कुरुक्षेत्र, सेतू, भूमी), नामदेव कांबळे (राघववेळ, ऊनसावली, सांजरंग), रमेश इंगळे उत्रादकर (निशाणी डावा अंगठा, सर्व प्रश्न अनिवार्य), श्याम मनोहर (कळ, उत्सुकतेने मी झोपलो, खूप लोक आहेत), शिरीष गोपाळ देशपांडे (राजा शहाजी, प्रचारक, शिवछत्रपती), कृष्णात खोत (गावठाण, रौंदाळा, झडझिंबड), कविता महाजन (ब्र, भिन्न), मेघना पेठे (नातिचरामि), मकरंद साठे (अच्युत आठवले आणि आठवण, ऑपरेशन यमू), मिलिंद बोकील (शाळा, एकम्, समुद्र), राजन खान (हयात आणि मजार, सत ना गत, चिमूटभर रुढीबाज आभाळ), सानिया (स्थलांतर, आवर्तन), गौरी देशपांडे (मुक्काम, गोफ, उत्खनन), रवींद्र शोभणे (पडघम, अश्वमेध इ.), प्रवीण बांदेकर (चाळेगत) ह्या कादंबरीकारांप्रमाणेच भारत सासणे, सुमेध वडावाला यासारखे उत्तम दर्जेदार कथाकार, इत्यादींचा उल्लेख करता येतो. ह्यापैकी कितीजणांशी मराठी वाचकांनी नाते जोडले असेल? ह्या प्रश्नाच्या उत्तरात सद्यकालीन मराठी वाचनसंस्कृतीची खरी स्थितिगती दडलेली आहे. केवळ उत्तमोत्तम ग्रंथांच्या प्रकाशनातून नव्हे, तर त्यांच्या वाचनाने अभिरुचिसमृद्ध बनलेल्या मराठी वाचकविश्वामुळे आपल्या वाङ्मयीन संस्कृतीची समृद्धी मापली जाईल. परंतु मातृभाषेपासूनच दूर जाण्याची विचारदृष्टी आपल्याच काही लेखकांनी व माध्यमांनी गेल्या वर्षांत मराठी जनमानसातून पेरत आणली असेल, तर ज्या संस्कृतीवृक्षाच्या फांद्यांवर आपण बसलो आहोत (ज्याची एक डहाळी म्हणजे मायमराठी) त्यांनाच तोडल्याचे कार्य आपल्या हातून कळत-नकळत घडले असावे असा, मथितार्थ त्यातून निघतो.

## वाङ्मयीन संस्कृती आणि वाचन संस्कृती

आपली वाङ्मयीन संस्कृती ही आजवर आपल्या एकूण समाज-संस्कृतीच्या आणि अभिरुचीच्या केंद्रस्थानी राहात आली आहे आणि वाचनव्यवहार हा प्रामुख्याने ह्या एकूण वाङ्मयीन संस्कृतीचेच एक अविभाज्य अंग आहे. मराठी साहित्याची निर्मिती ही मराठी समाजव्यवहाराच्या प्रेरणास्थानी होती. मराठी भाषा आणि साहित्याचा परस्परानुबंध आणि त्याचे समाजमनाशी असणारे जिवंत नाते 'पसायदाना'सारख्या मराठी संस्कृतीला निरंतर उर्जा देणार्या अजरामर रचनांमधून पहायला मिळते. एका समृद्ध अशा, नित्य प्रवाहमान अशा वाङ्मयीन संस्कृतीचा वारसा मराठी समाजास लाभला आहे. लेखक-कलावंत, रसिक-वाचक, समीक्षक-विचारवंत, वाङ्मयसंस्था आणि शासन ही सतत चालणार्या वाङ्मयव्यवहाराची व त्यातून अस्तित्त्वात

येणार्या वाङ्मयसंस्कृतीची महत्त्वाची अंगे मानता येतील. वाङ्मयीन संस्कृती प्रवाहापुढे नव्या काळात मात्र निश्चितपणेच काही आव्हाने उभी राहिलेली दिसतात. ठळकपणे आजचे हे वाङ्मयविश्व संगणकक्रांती व माध्यमक्रांती ('क्रांती' हा शब्द 'बदल' वा 'परिवर्तन' या अर्थाने; 'विद्रोह', 'बंडखोरी' या अर्थाने नव्हे!) नंतरचे वाङ्मयविश्व आहे. त्यामुळे त्यापुढील आव्हाने ही प्रामुख्याने माध्यमविश्वातील नव्या बदलांशी निगडीत आहेत. एका संक्रमणावस्थेतून आणि त्यामुळेच संभ्रमावस्थेतून मराठी वाङ्मयव्यवहाराचा प्रवास होत आहे. दरवर्षी प्रसिद्ध होणारे शेकडोंच्या संख्येतील दिवाळी अंक, दरवर्षी व वर्षभर होणारी विविध साहित्य संमेलने, रोजच प्रसिद्ध होणारी कितीतरी नवनवी पुस्तके, मुद्रणसुलभतेमुळे कवी-लेखकांचे वाढते दिसणारे अस्तित्व हे सारे एकीकडे आणि मराठीच्या 'वाचनसंस्कृती'चा सर्वाधिक र्हास दर्शविणारा कालखंड दुसरीकडे, अशा विरोधाभासात वाङ्मयीन संस्कृतीची वाट हरवलेली दिसते. वाङ्मय म्हणजे लिखित साहित्य; हे जे शब्दब्रह्म, जे संपूर्ण कलाव्यवहाराचाच आधार आणि अधिष्ठान आहे, तेच कालपर्यंत वाङ्मयीन संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिले आहे. रंजन आणि प्रबोधन ह्यांची एकहाती जबाबदारी सांभाळणारे व जनमानसाची अभिरुची घडविण्यास कारण ठरणारे वाङ्मयमाध्यम संगणकक्रांती माध्यमक्रांतीनंतर मात्र आज एकदम अस्तित्त्वाच्या नव्या आव्हानास सामोरे जाताना दिसते. दृक्श्राव्य अशा माध्यमसंस्कृतीच्या आगमनामुळे वाचनसंस्कृतीचा हळूहळू र्हास होत गेलेला दिसतो. परंतु 'वाचन'हे ज्ञानग्रहणाचे, मनरंजनाचे केवळ एक 'साधन असल्याने, खरे आव्हान हे तर संस्कृतीचे ग्रहण, तिचे आदानप्रदान व तिची निरंतरता कायम राखण्यास्तव माध्यमरुपी 'नव्या साधनां'चा विवेकी वापर करण्याचेच मानले पाहिजे. ह्याउपर वाचनसंस्कृतीच्या र्हासाचा बाऊ करण्याचे कारण उरत नाही. नव्या वैश्विकरणानंतर (कारण अशी वैश्विकरणाची वादळे पूर्वीही आलीच) प्रत्येकी गोष्टीचे वस्तुकरण होत असताना वाङ्मयीन वा कलाभिरुचीचेही व्यावसायिकरण झालेले दिसून येते. एखाद्या वृत्तवाहिनीने निर्मिलेला एखादा मराठी चित्रपट कलात्मकदृष्ट्या, सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या नेमका कोणत्या दर्जाचा आहे ह्याचा निरपेक्षपणे विचार न करता त्याचे व्यावसायिक पद्धतीने समर्थन व उदात्तीकरण जर मोठमोठे कलावंत, लेखक, विचारवंत, पत्रकार करीत असतील तर मानवी अभिरुचीवर स्वार झालेले बाजारुकरण चिंतेचा व चिंतनाचा विषय ठरते. केवळ धंद्यासाठी जर 'वाङ्मय' व 'कला' श्रेष्ठ ठरविल्या जात असतील तर साहित्य-विचारविश्वापुढचे खरे आव्हान ते ठरते. कितीही तांत्रिक प्रगती झाली, बदल घडून आले तरी उत्तम व विवेकी समाजधारणेविषयीचा विचार, ज्याचे अधिष्ठान सत्य, शिव आणि सुंदर हे आहे; तो बदलत नाही. किंवा ज्ञानोबा-तुकोबांनी प्रस्फुटीत केलेल्या व आजवर निरंतरपणे वाहात आलेल्या मराठी मनांना जीवनरस पुरविणार्या मराठी वाङ्मयीन संस्कृतीचा विचारठेवा बदलण्याची गरज पडत नाही. 'वाङ्मयीन संस्कृती' ह्या आपल्या अलीकडील ग्रंथात डॉ. सुधीर रसाळ यांनी प्राचीन ते अर्वाचीन प्रवाहाचा अक्षुण्णपणा व सातत्यपूर्णता प्रभावीपणे अधोरेखित केली आहे. तद्वतच इंग्रजी वसाहतवादी आक्रमणामुळेच केवळ भारतीय सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात क्रांती झाली हा 'भ्रम' आणि 'स्मृतिभ्रंश' असल्याचे स्पष्टमत त्यांनी अमर्त्य सेन आदि भारतीय विचारकांच्या आधारे सिद्ध करून या ग्रंथात मांडले आहे. आजच्या नव्या वैश्विकरणाच्या अथवा सांस्कृतिक भाषिक आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मांडलेला भारतीयत्त्वाच्या परीप्रेक्ष्यातील व्यापक, उदार, समन्वयशील

असा खरा देशीवादी दृष्टिकोण नव्या पिढीच्या संस्कृती-अभ्यासकांसाठी विवेकाची वाट प्रशस्त करणारा आहे. आजच्याही वाङ्मयीन संस्कृतीचा विचार करताना हे मराठी संस्कृतीच्या नित्यप्रवाही परंतु सातत्यपूर्णतेचे सत्य नव्या सहस्रकातही तेवढेच महत्त्वाचे ठरते. कारण अजुनही साम्राज्यवादी-वसाहतवादी विचारदृष्टीचा दुराग्रही प्रभाव अनेकांच्या मनांवर व विचारांवर स्पष्टपणे पाहता येतो. प्रोफेसर धर्मपाल, अमर्त्य सेन व इतर अनेकांनी इंग्रज आगमनापूर्वीच्या ज्ञानप्रदान व्यवस्थेवर पुरेसे निःसंदिग्ध भाष्य केले असूनही नुसते 'भारतीय' वा 'हिंदू' म्हटले तरीही संतापाने पेटून अद्वातद्वा बोलणार्यांची, धर्म-संस्कृतीच्या वृक्षाखाली बसून त्याचीच फांद्या-मुळे छाटण्याची वल्गना करणार्यांची इथे कमतरता नाही. प्रोफेसर धर्मपालांनी भारतात इंग्रजपूर्व काळातील शिक्षणव्यवस्थेत सर्व जाती-संप्रदायाचे उभयलिंगी विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे भक्कम पुराव्यानिशी सिद्ध केल्यावरही काही मंडळी अट्टाहासाने भारतीय ज्ञानविज्ञान परंपरेला 'पुराणातली वांगी' म्हणून कुत्सितपणे हिणवण्याची एकही संधी सोडत नाहीत. काही जण भारतीयत्त्वाच्या प्राचीन शोधप्रवासाला 'भगवाकरण' म्हणतात, तर भारतीय एकात्मतेच्या व पर्यायाने राष्ट्रीयत्त्वाच्या जाणिवेला कसलाही विचार न करता 'फॅसिझम' म्हणून मोकळे होतात. अशा गल्लीबोळात बोकाळलेल्या व व्हॉट्सअॅप-फेसबुकवर सोकावलेल्या उठवळ अद्वातद्वा पंथाच्या विचारवंतांनी रसाळांचा 'वाङ्मयीन संस्कृती' व सदानंद मोर्यांचा 'गर्जा महाराष्ट्र' हे मराठी वाङ्मयीन संस्कृतीवरील दोन ग्रंथ आवर्जून वाचावे असे या निमित्ताने सुचवावेसे वाटते. मराठी संस्कृतीचे व त्याअंतर्गत वाङ्मयीन संस्कृतीचे नेमके भान व्यक्त करणार्या ह्या उपरोल्लिखित ग्रंथकारांच्या विचारांच्या प्रकाशातच आजच्या संभ्रमावस्थेतील वाचनव्यवहाराचा विचार नीट करता येऊ शकतो.

**संभ्रमाचे धुके आणि साहित्याची अभिजातता**

आजचा काळ हा संभ्रमाचा आणि गोंधळाचा काळ आहे. हौशीपणाच्या आणि सवंगपणाच्या समाजमाध्यमकेंद्री गदारोळात 'सब घोडे बारा टके' अशी साहित्याकाची अवस्था झाली दिसते. रसिकांचा वाचकांचा विलक्षण गोंधळ उडाला आहे. एक मात्र खरे, आजच्या या माध्यम-गोंधळातून उत्तम साहित्याचे व साहित्यिकाचे काही नवे निकष आपोआपच उदय पावत आहेत. म्हणजे, जे लोक अधिक भडकपणे आपल्या लेखकपणाचे सोशल मीडियावर वारंवार नित्यनेमाने प्रदर्शन मांडत आहेत. त्यांच्यात वाङ्मयीन कस नसण्याचीच दाट शक्यता आहे. याउलट या सार्या गोंधळास उबगून जे मौन झाले आहेत, किंवा पारंपरिक माध्यमातून तुरळकपणे जे प्रकट होताहेत, फारसा गाजावाजा न करता संकोचूनच जे स्वत:चे लेखकपण हळूच सांगू पाहत आहेत, अशांमध्ये काही एक साहित्यमूल्य सापडायची शक्यता अधिक आहे. या गर्दीत, गदारोळात निव्वळ वाचक-रसिकश्रोता कुणी नाहीच जणू? ती भूमिका स्वत:कडे घ्यायला कुणी तयारच नाही जणू? आजच्या वाङ्मयनिर्मितीच्या पार्श्वभूमीवर साहित्याचे वाचकसापेक्षतेने तीन वर्ग सर्वसाधारण स्वरूपात कल्पिता येऊ शकतात. पहिला उघड उघड असा रंजनप्रचारवादी हौशीव्यवसायसापेक्ष असा साहित्याचा निम्न स्तर, क्षणजीवी, अल्पजीवी लोकप्रियता, आभासी लोकप्रियता असलेला! दुसरा वाङ्मयीन गुणवत्ता व लोकप्रियता यांचा समन्वय साधणारा असा साहित्याचा मध्यम स्तर. आणि तिसरा स्तर म्हणजे लोकप्रिय असणारे, परंतु वाङ्मयव्यवहार व अभिरुची यास गती देणारे, समृद्ध करणारे, ऐतिहासिक

परीप्रेक्ष्यात नोंदण्याजोगे साहित्य. वाङ्मयव्यवहारास समृद्ध करणारा हा साहित्याचा वर्ग म्हणजे कालातीत लोकप्रियता लाभलेला अभिजात साहित्याचा!

अभिजात म्हणजे काय ? अभिजात म्हणजे मानवी जीवनदर्शनाचा निरंतर जळत-उजळत राहणारा कालातीत तुकडा! जे सदासर्वकाळ मानवमात्रांचे मनोपोषण, मनोरंजन आणि मनोबोधन करू शकते आणि खरी 'लोकप्रियता' त्यासच प्राप्त असते. अशावेळी 'पाप्युलर लिटरेचर' या पाश्चात्त्य जगतातील संकल्पनेसाठी वापरली जाणारी 'लोकप्रिय साहित्य' ही संज्ञा अयथार्थ वाटू लागते. कारण लोकप्रिय वा वाचकप्रिय असण्यात साहित्यकृतीचा कमीपणा आहे असे मानणे सर्वथा चुकीचे ठरते. उलट, जे वाङ्मय वर्षानुवर्षे वाचले जाते, म्हणजे जे खर्या अर्थी वाचकप्रिय वा लोकप्रिय (केवळ विशिष्ट काळात नव्हे!) असते त्यासच कालांतराने 'अभिजात' हा दर्जा प्राप्त होतो. तात्कालिक, प्रासंगिक, अल्पजीवी अशी लोकप्रियता आणि दीर्घकालीन, सर्वस्तरीय लोकप्रियता हे मग लोकप्रियतेचे दोन भिन्न आणि परस्परविरोधी असे प्रकार मानावे लागतील. रामायण, महाभारत यासारखी महाकाव्ये किंवा ज्ञानोबातुकोबांची भावकाव्ये दीर्घकालीन-सर्वस्तरीय लोकप्रियतेच्या म्हणजेच 'अभिजातपणाच्या' कसोटीवर उतरलेली दिसतात. काळाचे जुनेपण आणि संस्कृतिदर्शनाचे नित्यनवेपण या संगमावर स्थिर कलाकृतींनाच आपण 'अभिजात' मानले पाहिजे. 'जुने', 'प्राचीन' हा 'अभिजात'पणाचा एक निकष तर आहेच, परंतु जुन्यातील नवीन व प्राचीनातले अर्वाचीन हा निकष अधिक महत्त्वाचा व मध्यवर्ती आहे. 'क्लासिक', 'क्लासिकल' अथवा 'अभिजात' या शब्दसंज्ञेत विविध ज्या अर्थच्छटा मिसळलेल्या आहेत, त्यातली 'उत्तम', 'उत्कृष्ट', 'सरस', 'उच्चप्रतीचे, 'श्रेष्ठ', 'चिरंतन', 'महत्त्वाचे व 'शाश्वत मूल्ये असणारे' ही अर्थच्छटा साधारणपणे मध्यवर्ती ठरते. अभिजात साहित्यकृती म्हणजे सर्वोत्तम अशी महान साहित्यकृती! 'लोकप्रिय साहित्याची' पाश्चात्त्यधार्जिणी संकल्पना वापरताना आपल्याकडील वाङ्मयदृष्ट्या श्रेष्ठ, तरीही 'लोकप्रिय साहित्याचे' नीट आकलन करता येणार नाही त्यामुळे सुधीर रसाळ, नेमाडे, रवींद्र किंबहुने, रा. भा. पाटणकर या समीक्षकांनी पाश्चात्त्य संकल्पनांच्या वापराविषयी जो वारंवार सावधानतेचा इशारा आपल्या लेखनातून दिला आहे, तो नव्या पिढीच्या अभ्यासकांनी ध्यानात ठेवणे इष्ट ठरते.

'काळ तर मोठा कठीण आला' असे सर्वच काळात अनेकांना वाटत आले आहे. कारण 'विश्वाचा आकार केवढा ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा' हा प्रत्यय केशवसुतांप्रमाणेच इतरांनाही येतच राहतो. आजचा काळ म्हणजे विशेषत्वाने 'नव्वदोत्तर कालखंड' हा मराठी वाङ्मयव्यवहाराचा संक्रमण-संभ्रम काळ आहे, असे मला वाटते. 'उष:काल होता होता...' असे संवेदनशील मानवमनांना बरेचदा वाटू शकते. पण, काळाचा हा तुकडा विशिष्ट राजकीय सत्ताबदलाशी खरे वाङ्मयसेवक उठवळ पद्धतीने जोडत नाहीत!तर या र्हासपर्वातही वाङ्मयातले 'ध्यासपर्व' मात्र निरंतर सुरू असलेले दिसते. काही वाङ्मयसेवक स्वत:च्या मर्यादा स्वीकारून मौन होणे पसंत करतात. अर्थात सच्च्या वाङ्मयप्रेमीचे हे एक प्रकारचे व्रतच असते.

काही मंडळी वेड्यावाकड्या वर्तमानाला आपापल्या पद्धतीने वाङ्मयकृतींच्या द्वारे उत्तरेही
शोधत राहतात. यामुळे अनेकांच्या प्रतिक्रिया वेड्यावाकड्या, क्वचित विकृत, विचित्र व बीभत्सही वाटतात. रमेश इंगळे उत्रादकर, श्याम मनोहर, मिलिंद बोकील, भारत सासणे, प्रवीण बांदेकर, जयंत पवार, संतोष

पवार, मंगेश काळे, दिवंगत अरुण काळे (व इतर अनेक उत्तम कवी.) इत्यादी अनेक समकालीन लेखकांच्या साहित्यात अस्वस्थ वर्तमानाचे वेडेवाकडे परंतु प्रभावी प्रतिध्वनी उमटलेले पहायला मिळतात. मग अशा काळात वाङ्मयव्यवहारावर काही लिहिणे म्हणजे एक मोठे आव्हानात्मकच कार्य ठरते!

**संदर्भ ग्रंथ**


1. *परंपरा आणि नवता, गो. वि. करंदीकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1980 दु. आ.*
2. *नवसाहित्य आणि नवसाहित्योत्तर साहित्य, यशवंतराव चव्हाण म. मुक्त विद्यापीठ, नाशिक, 2001.*
3. *साठोत्तरी मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह, संपादक डॉ. शरणकुमार लिंबळे, दिलीपराज प्रकाशन, पुणे.*
4. *वाङ्मयीन संस्कृती, डॉ. सुधीर रसाळ, मौज प्रकाशन, मुंबई 2010.*
5. *साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण, डॉ. भालचंद्र नेमाडे, लोकवाङ्मय गृह, मुंबई.*

# समकालीन स्त्रीवादी साहित्य प्रवाहातील नव्वदोत्तर स्त्रीवादी कथा

**डॉ. मनीषा नागपुरे**

*सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग), डॉ. म.वा.पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर.*

*भ्रमणध्वनी ९८२३१५३००२*

**प्रस्तावना**

स्त्रीवादी साहित्याचा एक स्वतंत्र प्रवाह मराठीत विसाव्या शतकात साठोत्तर कालखंडात नव्याने रूजल्यावर स्त्री लेखिकांना अस्सल स्त्रीवादी शैली आणि स्त्रीचे अस्सल जगणे मांडण्यासाठी स्त्रीवादी चळवळींनी आत्मबळ आणि पाठबळ पुरविले स्त्रियांच्या लेखनाकडे स्वतंत्रपणे पाहण्याची वाचक आणि टीकाकारांची दृष्टीही विकसित झाली. स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह स्त्रीवादी चळवळीतून स्वतंत्रपणे आकाराला येवू लागला. विभावरी शिरूरकरांनी पहिल्यांदा स्त्रीलेखनाच्या पारंपारिक अभिजात गृहिणीपणाला शह देत समाजातल्या स्त्रियांच्या वाट्याला येणारा अन्याय—अत्याचार मानसिक गुलामगिरी पुरूष वर्चस्व इत्यादींचा वास्तव समाचार घेणारे साहित्य समाजासमोर ठेवले येथूनच पुढे स्त्रियांनाही आपल्या जीवनाचे वास्तव आणि सत्य मांडण्याची प्रेरणा मिळाली. परिणामी स्त्रीवादी साहित्याचे वास्तववादी आणि स्वतंत्र स्त्री प्रतिमाविश्व स्वयंभाषा आणि शैलीसह मराठीच्या साहित्य आणि संस्कृतीच्या प्रातांत साकार होवू लागला. कथा—कादंबरी, आत्मचरित्र आणि कवितेच्या माध्यमातून स्त्रीवादी साहित्यात आपल्या स्वतंत्र प्रतिभा दृष्टिचा आणि भिन्न स्त्रीवादाचा स्त्रीवादी स्वयंभू शैलीचा प्रत्यय देणाऱ्या अनेक लेखिका निर्माण होवू लागल्या. यामध्ये गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया, प्रिया तेंडुलकर, कविता महाजन, अनुराधा पाटील, मलिका अमर शेख, नीरजा, प्रतिभा जोशी, प्रज्ञा दया पवार, मोनिका गजेन्द्रगडकर, प्रतिमा इंगोले, अनुराधा गुरव, माधुरी शानबाग यासारख्या अनेक लेखिकांनी आपल्या साहित्यातून समकालीन वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. बदलत्या परिस्थितीचा अविष्कार स्त्री लेखनातून प्रकट होवू लागला. साहित्याच्या प्रत्येक प्रांतात स्त्रियांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. कथेच्या प्रांतात ही विपूल लेखन करून त्यांनी आपल्या विविध अनुभवांना वाट मोकळी करून दिलेली आहे.

नव्वदोत्तर कालखंडात सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पातळीवर बदल घडून आले त्याचबरोबर स्त्रियांच्या विश्वातही प्रचंड बदल घडून आले. जीवनमूल्यांपेक्षा, मानवी मूल्यांपेक्षा अर्थव्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवले जाऊ लागले. या कालखंडात ग्रामीण स्त्री, शहरी स्त्री, उच्चशिक्षित स्त्री, कामगार स्त्री, शेतकरी स्त्रिया, दलित स्त्री या सर्वच स्त्रियांच्या जीवन

जाणिवा स्त्री कथाकारांच्या कथांमधून व्यक्त झालेल्या आहेत. नव्वदोत्तर कालखंडातील जीवन जाणिवा घेवून लेखन करणाऱ्या कथा लेखिकामध्ये विशेषत्वाने मेघना पेठे, नीरजा, प्रज्ञा दया पवार, उर्मीला पवार, माधुरी शानबाग, रेखा बैजल, प्रतिभा इंगोले, प्रतिमा जोशी, सानिया, मोनिका गजेन्द्रगडकर यांच्या कथांमधून ग्रामीण, शहरी, दलित, कामगार, उच्चशिक्षित, अल्पशिक्षित स्त्रियांच्या भावविश्वात घडून आलेले बदल प्रामुख्याने चित्रित झाले आहे.

नव्वदोत्तर कालखंडात जी विशिष्टता आहे. ती म्हणजे अर्थकेंद्रित समाजव्यवस्था या अर्थकेंद्रिततेमुळे व्यक्तीचे मुल्य कमी व्हायला लागले व स्त्रीकडे एक भोगवस्तू किंवा प्रदर्शनातील वस्तू म्हणूनही बघण्याचा एक दृष्टीकोन नव्याने जन्मास आला आधीच्या धर्मांधतेची जागा नवधर्मांधतेने घेतली विविध पातळ्यावर स्त्रीचे भावविश्व बदलत असतांना कधी हतबल झालेली स्त्री, कधी निराश झालेली स्त्री, तर कधी आपले अस्तित्व शोधणारी स्त्री यांचे चित्रण संदर्भित कथा—लेखिकांच्या कथांमधून आले. नव्वदोत्तर कालखंडातील मेघना पेठे या अत्यंत महत्त्वाच्या कथालेखिका आहेत. 'हंस अकेला' आणि 'आंधळ्याच्या गायी' हे दोन कथासंग्रहातील त्यांच्या कथा या स्त्रीकेंद्री आशय बीजाच्या आहेत. स्त्रीच्या शरीर आणि मानसिक अनुभवविश्वाचे धीट, धाडसी आणि मोकळे वर्णन—चित्रण—निवेदन या कथांमध्ये आहेत. आजच्या काळात स्त्री—पुरूषांच्या वाट्याला येणारे उदास, भकास, एकटेपण, तुटलेपण त्यांच्या कथात येत राहते पुरूषी सत्ता नाकारणाऱ्या आणि स्त्री आहे म्हणूनच स्वतंत्रपणे जगणाऱ्या पारंपारिक चौकटीत न वावरणाऱ्या नायिका मेघना पेठे यांच्या कथेत येतात, मेघना पेठे याची कथा माणसातील विविध प्रवृत्तीच्या शोध घेण्याचा प्रयत्न करते 'समुद्री चोहीकडे पाणी', 'हो आवे लागे' 'आएँ कुछ' 'अब्र' 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथांमधील स्त्रिया धीट आहेत. विवाहसंस्थेला, कुटुंबसंस्थेला नकार देत आपल्या शारीरिक गरजा पूर्ण करीत एकटेपणाने, निर्भयपणे जगणे स्वीकारणाऱ्या आहेत या कथांमधून लेखिका पारंपारिक भारतीय विवाहसंस्था, कुटुंबसंस्था याविषयीची साधक—बाधक चर्चा—चिकित्सा करीत राहते तर स्त्री—पुरूषांमध्ये लिंगभाव निरपेक्ष आत्मियतेचे संबंध का असू नये असा सवाल अप्रत्यक्षरित्या काही कथात येतो. मेघना पेठे यांची कथा बंडखोर आहे. स्त्रीच्या नव्या मुक्त निर्भय आणि स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारणाऱ्या नव्या व्यवस्थेचा ध्यास त्यांच्या कथेला आहे.

जागतिकीकरणातील संपर्क क्रांतीचा, माध्यमक्रांतीचा अभिरूचीतील बदलांचा, लैगिंग सुख विकत घेण्याच्या लालसेचा कामपिपासू विकृतींना आलेल्या जीवनधारणांच्या रूपांचा फार मोठा परिणाम वेश्यावस्ती, देहविक्रय व्यवसाय, वेश्यांचे जीवन यावर झाला वेश्यांच्या वेश्यावस्तीच्या, देहविक्रयाच्या व्यवसायाच्या एकूणच पर्यावरणाचे चित्रण एखादा अपवाद वगळता आजच्या मराठी कथेत आढळतच नाही. पण स्त्री कथाकारांमध्ये प्रतिमा जोशी यांच्या जहन्नम, 'तेरावी गल्ली', 'नग्नसत्य', 'सत्यकाम जाबाली' या कथांमध्ये मात्र वेश्यांच्या

जीवनाचे वास्तव चित्र रेखांकित झाले आहे. त्याच्या जहन्नम या कथेत देहविक्रयाच्या बाजारात अल्पवयीन तरूणींना कसे विकल्या जाते त्यांचे कसे शोषण होते याचे वास्तवदर्शी चित्रण आहे. तर त्यांच्या 'दरी' या शीर्षकाच्या कथेत वेश्या व्यवसायाचा अखील भारतीय पातळीवरचा भव्य पट आला आहे. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे जग त्यांनी कुशलतेने चितारले आहे आणि त्या स्त्रियांच्या मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्या करतात.

जागतिकीकरणाच्या एकूणनच प्रक्रियेचा गंभीर परिणाम कामजाणिवा, कामविचार, कामविकृती यावर झाला कामसंबंधाचे व्यावयायिकरण नव्हते असे मुळीच नाही. वेश्या आणि देहविक्रयाची प्राचीन परंपरा येथे आहेतच परंतु स्त्रीला मादी समजून तिच्यावर लैगिंग अत्याचार करण्याच्या घटना गेल्या दशकभरापासून संवेदनशील मनांना अस्वस्थ करणाऱ्या हादरून सोडणाऱ्या आहेत. तर दुसरीकडे मुक्त लैगिकतेचे स्त्रोत माजले आहेत. तर प्रज्ञा दया पवार यांची 'तिघाडा' ही कथा यासंदर्भात महत्त्वाची ठरते. एकाहून अनेक जणांसोबत लैगिक सुख घेण्याच्या आजच्या विचित्र मानसिकतेचे चित्रण या कथेत केले आहे. बदलेली समाजव्यवस्था उच्चभ्रू, उच्चशिक्षित समाजातील नैतिकतेचा पाश प्रज्ञा दया पवार यांनी सैल केला. आंबेडकरी विचारांच्या चौकटीबाहेर निघून त्यांची कथा व्यापक अशा स्त्रीप्रश्नांचा वेध घेते. नव्वदोत्तरी कालखंडातील महानगरीय बदललेले जीवन, सुशिक्षित, मध्यमवर्गीय माणसातही कायम असलेल्या व खोल रूजलेल्या भयाण जातजाणिवा आणि समकालीन सामाजिक वास्तव प्रज्ञा पवार प्रखरपणे मांडते. महानगरातले समकालीन वास्तव इंटरनेट, सोशल मिडिया, नेटसर्फिंग, चॅटिंग यातून आकारास आलेले तरूण—तरूणीचे नवे भावविश्व चितारणारी 'टग्ट् अगेन' ही कथा आहे. इंटरनेटवर चॅटिंग करणाऱ्या स्त्री—पुरूषांने एकमेकांना समजून घेतांना श्लील—अश्लीलतेच्याही पलीकडे जाण्याची मानसिक तयारी ठेवावी लागते. ही कथा समकालीन सामाजिक—सांस्कृतिक पर्यावरणाच्या एक वेगळा पैलू दाखविणारी आहे.

प्रतिमा इंगोले या ग्रामजीवनावर लेखन करणाऱ्या सक्षम कथालेखिका त्यांनी आपल्या कथांमधून सक्षम कथालेखिका त्यांनी आपल्या कथांमधून प्रामुख्याने ग्रामजीवनाचा शोध आणि वेध घेतलेला आहे. त्यांचे आयुष्य हे ग्रामजीवनाशी निगडीत असल्यामुळे ग्रामीण बोलीभाषेचा समर्पक वापर करीत त्याची कथा ग्रामव्यवस्थेवर भाष्य करते. ग्रामजीवनातील आजचे राजकारण, समाजकारण, धर्म, संस्कृती आणि कृषीजीवन यांचा मागोवा प्रतिभा इंगोले आपल्या सशक्त लेखणीतून चितारतात.

अनुराधा गुरव यांनी सुद्धा आपल्या कथांमधून नवदोत्तर कालखंडात कृषीव्यवस्थेची आणि कृषीजीवनाची जी वाताहात झाली त्याचे चित्रण आपल्या कथांमधून मांडले तर रेखा बैजल या कथालेखिकेने ग्रामीण कुटुंबाची झालेली वाताहात आणि त्याच्या वाट्याला आलेल्या

समस्या अधोरेखित केल्या आहे. त्याची कथाही ग्रामजीवनाचा, तेथील पर्यावरणाचा व त्यात झालेल्या बदलांचा सुक्ष्मपणे वेध घेतांना दिसते.

निरजा या सुद्धा अलीकडच्या काळातील महत्त्वाच्या कथाकार आहेत त्यांचे 'जे दर्पणी बिंबले' 'ओल 'हरविलेली माती' 'पावसात सूर्य शोधणारी माणसे' हे तीन कथासंग्रह आहेत. निरजा यांच्या कथेचे एक वैशिष्ट्य असे की समकालीन वास्तवाच्या पार्श्वभूमीवर स्त्री—पुरूष संबंधाचे विविध पैलू, स्तर, अत:स्तर त्या सारे काही संयमाने व धाडसीपणे तपासतात निरजा यांची 'सुशांतचा सोळावा वाढदिवस' ही कथा समकालीन वास्तवाचा वेगळा पापुद्रा दाखविणारी आहे. आजच्या मुक्त वातावरणात आई, वडील, मुलगा, मुलगी या साऱ्यांचे संबंध अगदी मित्र—मैत्रिणीसारखे असावेत इंटरनेट, मॉल, पॉपरॉक, पफ, मल्टिफ्लेक्स या काळात मॉडर्न विचारांनी खुलेपणाने जगण्याचा प्रयत्न करतांना मागच्या पिढीच्या हातूनही कशा अक्षम्य चुका होतात त्याचेच दर्शन या कथेत घडते. आशयद्रव्याच्या दृष्टीने आजच्या मराठी कथेच्या प्रवाहात नीरजा यांच्या महत्वपूर्ण ठरतात. वाचकाला अस्वस्थ करीत विचार प्रवृत्त करण्याचे सामर्थ्य नीरजा यांच्या कथेत आहे. वैचारिकता व वैचारिक जाणिवेने संपन्न अशा नायिका हे नीरजाच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. 'ओल हरवलेली माती' ही कथा वेगळ्या थाटणीची आशयपूर्ण कथा आहे. या कथेतील फातिमा बी ही स्त्री फार वेगळी आहे. ती दु:खी आहे मानसिक आणि शारिरीक पातळीवर तिचे दु:ख कुणाला कळलेले नाही. ही कथा वाचकाला अस्वस्थ करते पण ही अस्वस्थता शब्दात सांगता येत नाही या कथेविषयी संजय भास्कर जोशी लिहितात. "अभिव्यक्तीत गोंधळलेली वाटणारी ही कथा अशा तऱ्हेने नीरजाच्या अनाग्रही आणि अनिर्णायक शैलीमुळे वाचकाला विचारात टाकते. आव्हान देते नकळत फातीमा बीची कहाणी एखाद्या भव्य शोंकातिकेसारखी होते."[४]

नव्वदोत्तर कालखंडाच्या अवकाशाचा विचार केल्यास मध्यमवर्गीय स्त्रिया मोठ्या प्रमाणात रोजगार आणि नोकऱ्या करायला लागल्या. स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणाऱ्या नायिका सानिया यांच्या कथांमधून दिसून येते. सानियाची कथा स्त्रीकेंद्री आणि स्त्रीवादी आहे. आपल्यावर आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडत कधी खिन्न होत कधी हताश होत पण पुढे निराशेतून बाहेर पडून आपली नवीन वाट चोखळण्याचा प्रयत्न करणारी नायिका त्यांच्या कथेत दिसते. सानिया यांनी स्त्रीची होणारी कुंचबना, दु:ख मनोव्यापाराच्या पातळीवर जावून चितारले आहे. नव्वदोत्तर कालखंडातील महत्त्वाच्या कथालेखिका म्हणून त्यांचा अंतर्भाव करावा लागेल.

मोनिका गंजेन्द्रगडकर या समकाळातील महत्त्वाच्या कथालेखिका आहे. 'भूप' 'आर्त' आणि 'शिल्प' हे तीन कथासंग्रह त्यांचे आहेत. मोनिका गजेन्द्रगडकर यांची कथा समकालीन मराठी कथेचा एक आश्वासक सूर आहे. त्यांच्या कथा वाचकांच्या मनावर खोल ठसा उमटविणाऱ्या आहेत. मानवी नातेसंबंधाची वीण या कथांतून उकलण्याचा प्रयत्न त्या करतात

त्यांच्या कथांची भाषा आशयद्रव्यास साजेशी अशी आहे. स्त्री अस्मितेचा आणि अस्तित्वाचा वेध आपल्या कथांमधून त्या घेतात. स्त्री—पुरूष नातेसंबंध त्यांचे भावजीवन, हळूवारता उत्कटता, नात्यातील घट्ट वीण ही सारी वैशिष्ट्ये त्यांच्या कथेतून दृग्गोचर होतात. स्त्रीच्या मनातील घालमेल, व्याकुळता, उत्कटता, भावनाशीलता याचा शोध त्या घेतात त्याच्या कथेविषयी अनंत देशमुख लिहितात, “मोनिका गजेन्द्रगडकर यांच्या अठरा दीर्घकथांमधून आणि ‘उगम’ या कादंबरी मधून एका प्रगल्भ, रसिक, जीवन—विषयक सूक्ष्म चिंतनवृत्ती असणाऱ्या, विविध कला प्रकारांविषयी जाणकारी असणाऱ्या एखाद्या शोभादर्शकाच्या वेगवेगळ्या कोनांतून काचचित्रे पाहावीत तसे जीवनाच्या अनेकानेक शक्यता आणि त्यातील प्रश्न जाणू शकणाऱ्या कथात्मलेखनावर निर्विवादपणे हकूमत असलेल्या रचना प्रकाराचे विविध प्रयोग करण्याची क्षमता असलेल्या आणि चित्रमय काव्यास व प्रवाहशैली ज्याला जन्मजात मिळाली आहे अशा कलावंताचे दर्शन आपल्याला होते.”[५]

समकाळाचे सजग भान ठेवून कथा लिहिणारी लेखिका म्हणून माधुरी शानबाग यांचा उल्लेख महत्त्वाचा आहे. बदलत्या विज्ञान दृष्टीचा विचार करून त्यांनी विज्ञानकथेचे दालन समृद्ध केले नव्वदोत्तर कालखंडाचे अत्यंत महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तंत्रज्ञानाचा विकास, संगणक व इतर तंत्रज्ञानाच्या विविध साधनांमुळे मानवी जीवनाला नवे आयाम व जीवन जगण्याची नवी दिशा प्राप्त झाली इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचा स्फोट होवून सर्व माहिती माणसाला सहज उपलब्ध होवू लागली नव्या विचारांना सुरूवात झाली या साऱ्या गोष्टीचे पडसाद माधुरी शानबाग यांच्या कथेत उमटलेले दिसून येतात. तंत्रज्ञानाच्या प्रचंड झालेला विकास त्याने मानवी जीवनाच्या समृद्धतेत केलेली वाढ हे दाखवित असतांना इंटरनेटच्या अतिरेकी वापराचे दुष्यपरिणामही त्या चित्रीत करतात त्यांच्या विज्ञानकथा लेखन हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे मल्लीका अमर शेखनेही आपल्या कथांतून अस्पर्श विषयाला हात लावण्याचा प्रयत्न केला.

समकालीन स्त्रीकथाकारांनी दर्जेदार अशी लक्षणीय मराठी कथा लिहिल्याचे दिसते. प्रज्ञा दया पवार, नीरजा, मेघना पेठे, मोनिका गजेन्द्रगडकर, प्रतिमा जोशी, उर्मिला पवार या स्त्री कथाकारांनी आजच्या मराठी कथेला निर्णायक असे वळण दिले आहे. या कथालेखिकांनी आपल्या कथांमधून स्पर्धात्मक, स्वार्थकेंद्री आणि बदललेल्या मानवी दृष्टिकोनाचा शोध घेतला आहे. आजचे जग हे दिखावटीचे प्रदर्शनाचे आणि तितकेच स्वार्थकेंद्रिततचे आहे अशा जगाचे सशक्त चित्रण या कथालेखिकांनी आपल्या कथांच्या माध्यमातून केले आहे.

समकालीन वास्तवात स्त्रीची होणारी वेगवेगळ्या पातळीवरील कुचंबना या लेखिकांच्या कथांचा विषय झालेला आहेच पण स्त्रीकेन्द्री प्रश्नांच्या पलीकडे जावून व्यापकपणे बदलणारे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण कवेत घेणारी नवी कथा या लेखिकांनी धीटपणे आणि

कलापूर्णरीतीने साकार केली आहे. या स्त्रियांनी कथेच्या माध्यमातून सिद्ध केलेली वाङ्मयीन प्रयोगशीलता देखील कथेला नवी उर्मी देणारी आहे. या लेखिकांच्या कथा समकालीन स्त्री प्रतिमेचे जसेच्या तसे दर्शन घडविण्यातही यशस्वी ठरल्या आहेत. वैशिष्ट्यपूर्ण निवेदनतंत्र, कथानकाच्या गरजेनुसार मांडणी, प्रभावी कथा—थाट आणि आशयाशी सुसंगत अशी शैली व भाषा यामुळे या काळातील कथालेखिकांनी कालच्या कथेपेक्षा वेगळी, वैशिष्ट्यपूर्ण अशी कथा लिहिली. समकालीन मराठी कथेच्या प्रवाहात या स्त्री कथाकारांचे योगदान मोठे आहे.

नीरजा या कथालेखिका समकालीन वास्तवाविषयी लिहितात, "या देशातल्या लोकांना अफूच्या गोळ्या घ्याव्यात तशा गोळ्या दिल्या जात आहेत. पैसा आणि समृद्धिची गोळी, धर्माची गोळी, आरक्षणाची गोळी या आणि अशा गोळ्या चघळत नशेत जगणारी माणसं जरा कुठ खुट्ट झालं की खळ्ळ खट्याक् करायला तयार असतात त्यांना नाही आवडल पुस्तक तर ते काढणाऱ्या हातांवर विस्तव ठेवतात ते पुस्तकाची होळी करतात, वस्तुची नासधूस करतात. नाही वाटल एखाद्या श्रद्धास्थान आपलं तर मूळापासून उखडून आपली वीट बसवतात घट्ट गाड्या जाळतात त्यातील माणसांना जिवंत जाळतात आणि मग त्यांचा बदला म्हणून ज्यांना जाळलंय त्याचे लोक जाळणाऱ्या लोकांच्या बायकाची गर्भाशयचं उखडून टाकतात. एकमेकांना जिवंत जाळण्याचा, एकमेकांना नेस्तनाबूत करण्याचा खेळ चालू आहे. अनेक वर्ष आणि प्रत्येक जण त्यात प्रत्यक्षपणे नाही अप्रत्यक्षपणे हिरिरीने भाग घेतो चांगले दिवस म्हणजे काय हेच न कळलेला माणूस आभासी जगात जगते आहे आणि त्या आभासाचा मागेच आहे. साऱ्या जगण्यातूनच हरवलेला माणुसकीचा ओलावा, विचार करण्याची आणि तारतम्य बाळगण्याची वृत्ती गमावत चालल्याने आलेल हताशपणे घेवून माझ्यातला लेखक मग साद घालत राहतो. काळजातून प्रत्येकाला माणसामाणसांच्या संबंधातला ओलावा हरवून जाईल अशी मनं घडत असण्याचा हा कठीण काळ आणि या काळातलं माझं जगणं मला अस्वस्थ करीत राहत"[६] ही अस्वस्थता थोड्याफार फरकाने आजच्या सर्वच साहित्यिक, कलावंताची आहे. समकालीन वास्तवाने दिलेले हे अस्वस्थपण या लेखक कलावंताना जीवनाकडे माणसांकडे, नात्याकडे, विचारांकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारे आहे. हे अस्वस्थपण नव्या सकस दर्जेदार लेखनाची उर्मी देणारे आहे आजची समकालीन स्त्रीवादी मराठी कथा देखील या प्रक्रियेला उपवाद नाही.

**संदर्भ ग्रंथ व टीपा**


*१) डॉ. महाजन वंदना — स्त्रीवाद आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती २०१३.*

*२) डॉ. शोभणे रविंद्र — जागतिकीकरण, समाज आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर.*

*३) डॉ. शोभा पाटील — स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.*

४) जोशी संजय भास्कर — दशकातील साहित्यिक : नीरजा, ललित मासिक, मुंबई. मे २०१५ पृ.क्र. ३२.

५) देशमुख अंनत — दशकातील साहित्यिक : मोनिका गजेन्द्रगडकर, ललित मासिक, मुंबई. एप्रिल २०१७ पृ.क्र. २८.

६) नीरजा 'या उदास काळात…'— महा अनुभव, पुणे ऑगस्ट २०१४, पृ.क्र. २८.

७) डॉ. देशपांडे अजय — आजची मराठी कथा काही नोंदी काही निरीक्षणे, सर्वधारा मासिक दशवर्षपूर्ती विशेषांक, मे—जून २०१७.

## समकालीन मराठी अनुवादित कादंबरी

**डॉ. स्मिता वानखेडे**
*मराठी विभाग, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा*
*भ्रमणभाष – 9922427110. smitawankhede1152@gmail.com*

एकविसाव्या शतकामध्ये सर्वत्र 'वसुधैव कुटुंबकम्' ची संकल्पना साकार होऊन महत्त्वपूर्ण ठरलेली दिसते. त्यामुळे संपूर्ण विश्व एकत्रित येऊन विश्व संस्कृतीचा जन्म झाला. हे विश्व संस्कृती अनेक घटकांचे अपत्य आहे. या घटकांमधील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणजे अनुवाद होय. विश्व संस्कृती, विश्वबंधुत्व, एकता आणि समरसता निर्माण करणारा सेतू म्हणजे अनुवाद. कारण अनुवादाच्या माध्यमातूनच विश्व ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात क्षेत्रीय वादाच्या संकुचित आणि सीमित परिघातून बाहेर पडून मानवी यात्रेच्या व भावनात्मक एकतेच्या केंद्रबिंदू पर्यंत विस्तारित होऊ शकला आणि हीच अनुवादाची उपयुक्तता आणि उपयोगिता आहे.

उत्तर आधुनिक युगात अनुवादाचे महत्त्व आणि उपयोगिता विश्वाने स्वीकारले आहे. वैदिक युगातील 'पुनःकथना' पासून ते आजच्या 'ट्रान्सलेशन' पर्यंत येता येता अनुवादाच्या स्वरूपात आणि अर्थात बदल घडून तर आलेच पण त्यासोबतच अनुवाद बहुमुखी आणि बहुआयामी स्वरूपाचा झाला आहे ही त्याची विशेषता होय. प्राचीन काळात 'स्वांत सुखाय' मानल्या जाणारे अनुवादाचे कार्य आज संघटित व्यवसायाचे मुख्य साधन बनले आहे. किंबहुना असे म्हणता येईल की, अनुवाद प्राचीन काळातील व्यक्ती रूपी परिघातून निघून आधुनिक युगातील समष्टी रूपी परिघात समाविष्ट / सामावला आहे आणि म्हणूनच आज विश्वभरात अनुवादाची आवश्यकता जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात कुठल्या न कुठल्या रुपाने जाणवते. त्यामुळेच आधुनिक युगातील जिवनाची अपरिहार्य आवश्यकता अनुवाद झाला आहे.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून तो एकविसाव्या शतकाच्या प्रारंभावस्थेच्या कालपरिघात आज जीवनाचे कोणतेच क्षेत्र असे नाही की जिथे चिंतन आणि व्यवहाराच्या पातळीवर अनुवाद महत्त्वाचा नाही. भारतात अनुवादाची परंपरा फार प्राचीन काळापासून आहे. परंतु एकविसाव्या शतकाचा उत्तरार्धात अनुवादाला जे महत्त्व प्राप्त झाले ते पहिले नव्हते. इसवी सन १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताच्या आर्थिक आणि राजनैतिक स्थितीत परिवर्तन घडून आले. जगातील अन्य देशांसोबत भारताचे राजकीय आणि आर्थिक समीकरण बदलले. राजकीय आणि आर्थिक कारणासह या काळात विज्ञान आणि प्रौद्योगिकीचा विकास या युगाची महत्त्वपूर्ण घटना होती, की त्यामुळे विभिन्न भाषा-भाषिक समुदायात संवाद प्रक्रिया विकसित झाली. जगातील बहुतांश मोठ्या देशांमध्ये एक प्रमुख भाषेसह अनेक गौण भाषेच्या ( सहभाषेच्या) रूपाने समांतर चालत आहे. एका भौगोलिक सीमेच्या राजकीय आणि प्रशासनिक घटकांच्या अंतर्गत बहुसंख्य एक भाषिक ही राहतात आणि अल्पसंख्यांक भाषेत पण राहतात. अंततः विभिन्न भाषकांच्या त्यांच्या भाषेमधून संपर्क साधणे ही लोकशाहीची सर्वात महत्त्वाची उपलब्धी आहे. कारण या संवाद संपर्कातून सर्वांचा सहभाग लोकशाहीत नोंदविला जातो. वस्तुतः आंतरराष्ट्रीय स्तरावर विभिन्न

देशांमध्ये राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील वाढती आदान-प्रदान याची अनिवार्यता अनुवादाचे महत्त्व सिद्ध करणारी आहे.

या समकालीन कालखंडात अनुवाद हा व्यक्तीची 'सामाजिक आवश्यकता' झाला आहे. भारतासारख्या बहुभाषिक देशामध्ये अनुवादाची उपयोगिता स्वयंसिद्ध आहे. भारताच्या विभिन्न प्रदेशातील साहित्यात अंतर्भूत असलेल्या मूलभूत एकतेचे स्वरूप दृगोचर करण्याकरिता अनुवाद हेच एकमेव साधन आहे. किंबहुना असे म्हणता येईल की, जी मानवी एकता भौगोलिक आणि भाषिक भिंतींमध्ये बंदिस्त झाली आहे. तिला मोकळे करण्याचे कार्य अनुवादातून सिद्ध होते आणि वैश्विक मैत्रीकडे मानवतेचा प्रवास सुरू होतो.

भारतासारख्या बहुभाषिक देशामध्ये जनसमुदायाच्या अंतर्गत अंतःसंप्रेषणाचा संवाहकाच्या रुपात अनुवादाचे बहुआयामी प्रयोजन सर्वविदित आहे. आणि म्हणूनच आजच्या या युगाला 'अनुवादाचे युग' असे संबोधल्यास वावगे ठरणार नाही. धर्म - दर्शन, तत्वज्ञान, साहित्य, शिक्षा, विज्ञान, औद्योगिकी, तंत्रज्ञान, वाणिज्य, व्यवसाय, राजनीति इत्यादी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात अनुवाद उपयुक्त आणि अभिन्न संबंधाने जोडला गेला आहे. अंततः चिंतन आणि व्यवहाराच्या प्रत्येक स्तरावर मनुष्य अनुवादावर विसंबला आहे. यातून विश्व संस्कृतीचा विकास घडून आला आहे. जगातील भिन्नभिन्न देशातील जनतेच्यामध्ये अंत:संप्रेषणाचे या प्रक्रियेत, त्यांच्यामध्ये भावात्म एकता निर्माण करण्यात, कायम ठेवण्यात, देश-विदेशातील नवीन ज्ञान - विज्ञान, शोध, चिंतन विश्वाच्या कानाकोपऱ्यात पोचवीत दोन भिन्न संस्कृतींना जवळ आणित एका धाग्यात गुंफण्याचे कार्य अनुवाद करते. यासंदर्भात प्रो. जी. गोपीनाथन असे म्हणतात की, "अनुवाद मानव की मूलभूत एकता की व्यक्ती चेतना एवं विश्व चेतना के अद्वैत का प्रत्यक्ष प्रमाण है।" आणि हे वक्तव्य आजच्या शतकाने सिद्ध केले आहे. किंबहुना असे म्हणता येईल की, एकविसाव्या शतकातील अनुवादांचे आपल्या संकुचित साहित्यिक परिघाला छेदून ज्ञान - विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, औद्योगीकरण, चिकित्सा, कला, संस्कृती, अनुसंधान, पत्रकारिता, जनसंचार, दूरशिक्षा, व्यवसाय इत्यादी प्रत्येक क्षेत्रात प्रवेश करून हे सिद्ध केले की, अनुवाद समकालीन जीवनाची अनिवार्यता आहे.

भारतीय जीवन आणि साहित्याचा परिप्रेक्षात जेव्हा आपण अनुवादाचा विचार करतो तेव्हा ती अनिवार्य निकड झालेली जाणवते. कारण आज हिंदी जरी बाजार तंत्राची, व्यवसायाची, संचार तंत्राची, शासकीय व्यवस्थेची भाषा झाली असली तरी भारतात बहुसंख्य भाषा बोलल्या जातात आणि त्या भाषांमध्ये लिहिल्या जाणारे साहित्य केवळ त्या भाषेपुरते सीमित आहे हा समज निरर्थक आहे. कारण भारतीय साहित्यात एक समानतेचे तत्व, समानतेचा धागा अनुबंधित आहे. त्यामुळेच अनुवादाच्या माध्यमातून या साहित्यातून एकात्मतेचा राष्ट्रीय सेतू निर्माण होऊ शकतो. तद्वतच तो सांस्कृतिक सेतूचे ही कार्य करतो. हीच भूमिका आंतरराष्ट्रीय स्तरावर ही अनुवादाच्या माध्यमातून साकार होत. त्यामुळेच साहित्याच्या अनुवादाचे महत्त्व व्यापक झाले आहे. तद्वतच साहित्य समाजाच्या आणि जीवनाच्या वास्तवाला प्रगट करते त्यामुळे

विभिन्न भाषेच्या साहित्याच्या सामूहिक अध्ययनातून समाज, देश किंवा विश्वाची चिंतनधारा, संस्कृतीची माहिती प्राप्त होते आणि म्हणूनच अनुवाद हा भारतीय साहित्याच्या अध्ययनात मदतगार होतो.

प्रस्तुत लेख लिहिताना या सर्व अंगाचा वेध घेणे अशक्यप्राय असल्याने प्रस्तुत लेखात आज विश्वभाषा झालेल्या इंग्रजी साहित्यातील कादंबऱ्यांचा मराठीत झालेल्या अनुवादाचा विचार करण्यात आला आहे.

भारतीय साहित्यात आंतरराष्ट्रीय साहित्याच्या अनुवादाची सुरुवात ही सुफिंच्या दार्शनिक सिद्धांतांच्या अनुवादाने सुरु झाली होती. परंतु त्याला अधिक मर्मग्राही स्वरूप आधुनिक कालखंडात प्राप्त झाले. शेक्सपियर, डी. एच. लॉरेन्स, मोपासा, सात्र इत्यादी विचारवंतांच्या कलाकृतींचे अनुवाद भारतीय जनमानसाचा साक्षात्कार घडविते तर कालिदास, रवींद्रनाथ टागोर, प्रेमचंद आदि च्या कलाकृतीने विश्व प्रभावित झाले.

जागतिकीकरणामुळे सर्व जग आज एका छोट्या खेड्यामध्ये परिवर्तित झाले आहे. विज्ञान आणि व्यापार याचे महत्त्व असलेल्या या जगात अनुवादाची नितांत गरज व आवश्यकता असल्याने त्याचे महत्त्व वाढले आहे. इंग्रजी ही जागतिक भाषा झाली असली तरी तिच्या साहित्याचा अनुवाद होणे महत्त्वाचा ठरतो. मराठी साहित्यात आणि विशेषतः मराठी कादंबरीच्या विश्वात अगदी प्रारंभावस्थेत म्हणजे कादंबरीच्या जन्मकाळीच हरी केशवजी पाठारे यांनी 'पिलग्रीम्स प्रोग्रेस' या इंग्रजी कादंबरीचे 'यात्रिक – क्रमण' या नावाने अनुवाद करुन अनुवादीच कादंबरीचा पाया रचला तो इसवी सन १९४१ मध्ये ही मराठीतील पहिली अनुवादीत कादंबरी होय.

मराठी साहित्यातही अनुवादाची प्राचीन परंपरा दिसून येते. संस्कृत महाकाव्याचे मराठीत झालेले अनुवाद ही या परंपरेची पहिली पायरी होय. आंग्ल काळात मुद्रणकलेच्या शोधामुळे त्यास वेगवेगळे आयाम प्राप्त झाले आणि त्यात बहुविधता आली. इसवी सन १८०० ते १८५४ या अव्वल इंग्रजी काळात मराठी साहित्यावर पाश्चात्त्य साहित्याची प्रेरणा प्रभावी होती. इंग्रजी साहित्य या काळात मोठ्या प्रमाणावर अनुवादित झाले. इसवी सन १८१८ पासून ब्रिटिश त्यामुळे मराठीचा इंग्रजी साहित्य, संस्कृती, भाषा यांच्याशी संपर्क आला. इसवी सन १८०० ते १८७४ या कालखंडाला भाषांतर युग असेही संबोधले गेले. अलीकडच्या काळात अनुवादित होणाऱ्या कार्याचा आढावा घेतल्यास असे म्हणता येईल कि साधारणतः इसवी सन २००० नंतरचा कालखंड हा अनुवाद युगाचा कालखंड आहे.

ब्रिटिश सत्तेचा अंमल दीर्घकाळ राहिल्याने भारतीय समाज माणसावर इंग्रजीचा प्रभाव प्रभावी राहिल्याने आधुनिक ज्ञानाची कवाडे इंग्रजी च्या माध्यमातून उघडल्या गेली होती. मराठीतही आधुनिक ज्ञानाची कवाडे इंग्रजी च्या माध्यमातून उघडल्या गेली होती. ललित आणि ललितेत्तर साहित्याचे मोठ्या प्रमाणावर मराठीत अनुवाद होऊ लागले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपूर्ण जगच बदलून गेले. याचा परिणाम साहित्यावरही झाला. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगातील अनेक समूह परस्परांच्या संपर्कात आले. दोन भाषा, दोन संस्कृती, दोन समाज परस्पर संपर्कात परस्परांच्या सान्निध्यात आल्यावर परस्परांचे भावविश्व जाणून घेण्याची जिज्ञासा जागृत झाली. या काळात इंग्रजी ही प्रमुख ज्ञान भाषा झाल्याने तिच्यातून इतर भाषांमध्ये मोठ्या प्रमाणात अनुवाद होऊ लागला. इतर भाषा समजून घेताना अडचणी येत

असल्याने इंग्रजीतूनच मराठीतही अनुवाद होऊ लागले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय घडामोडींचे प्रतिबिंब मराठी साहित्य विश्वात प्रकर्षाने दृग्गोचर होऊ लागले. अलीकडे तर अनेक दर्जेदार इंग्रजी साहित्यकृतींचा अनुवाद मराठीत झाले आहे.

मनुष्य स्वभावातच बद्धमूल असलेला साहित्यप्रकार म्हणजे कादंबरी होय. मनुष्य स्वभावाच्या, समाज स्वभावाच्या नुसार काळानुरूप जे विविधांगी बदल झाले त्या बदलांनी कादंबरी ही बदलत गेली आणि अधिकाधिक परिपुष्ट होत गेली. आधुनिक काळात तिला अनुवादाची जोड मिळाली आणि अनुवादित कादंबरीचे विश्व जन्माला आले. या अनुवादित कादंबरीने मराठी साहित्यविश्वाला अधिक व्यापक, समृद्ध केले ते नव्या भाषेच्या, नव्या कथानकाच्या आणि संस्कृतीच्या रुपाने. यातून एक नव भावविश्व मराठी साहित्यात उभे राहिले.

साधारणतः इसवी सन २००० च्या आसपास अनुवादित कादंबरी मराठी साहित्य विश्वात स्थिरावली. तिने स्थल, काल, भाषा, देश, धर्म, वंश या लौकिक निकषांना पार करून वैश्विक रूप धारण केले. कल्पना आणि वास्तव यांचा संगम असलेल्या या वांग्मय प्रकाराने मनुष्यावर अत्यंत परिणाम केला. किंबहुना असे म्हणता येईल की, जगाच्या प्रगतीत आणि संस्कृतीला कादंबरी वाङ्मय फार मोठे योगदान दिले, आयाम दिला. समाजात, जनमानसात क्रांती घडवून आणण्याचे कार्य ही कादंबरीने केले आहे. याचे उदाहरण म्हणून फ्रेंच राज्यक्रांतीचा उल्लेख करता येईल. आज ही फ्रेंच राज्यक्रांतीचे श्रेय इतिहासकार फ्रेंच कादंबरीकारांना देतात. यातच तिचे मोल लक्षात येते. समाज परिवर्तनात महत्त्वपूर्ण कामगिरी करणारी ही कादंबरी माणसाच्या मनावर प्रभावीरीत्या संस्कार करते. म्हणूनच विविध प्रकारच्या ज्ञानाचा, लोकशिक्षणाचा उत्तम स्त्रोत म्हणून कादंबरीचे मोठेपण मान्यच करावे लागते. याला मराठी अनुवादित कादंबरी ही अपवाद नाही. इंग्रजी शिक्षण आणि पाश्चात्त्य साहित्य परंपरेचे दर्शन कादंबरीच्या विकासात महत्त्वपूर्ण आहे. इंग्रजांच्या नव्या शिक्षणपद्धतीमुळे नवा सुजित शोधांचा वर्ग महाराष्ट्रात उदयास आला. या वर्गाने पारंपारिक साहित्यासह पाश्चात्त्य साहित्याचे अध्ययन केले. युरोपमध्ये एकोणिसाव्या शतकात कादंबरीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाने सामाजिक, आर्थिक, नैतिक क्षेत्रात पायाभूत बदल घडवून आणला होता. या काळात या सुशिक्षित वर्गाला इंग्रजी साहित्यातून एक नवे जगच उपलब्ध झाले होते. परंतु सर्वच वाचकांना इंग्रजी भाषा येत नव्हती. १९९१ च्या काळात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळाली आणि सर्वच क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाली. त्यामुळे समाजाच्या आणि वाचकांच्या मानसिकता प्रभावित झाल्या यातूनच मग अनुवादाच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली. या जागतिकीकरणाचा मुकाबला करण्यासाठी इंग्रजीतील ज्ञान मराठीत अनुवादीत होऊ लागले. सन २००० नंतर मोठ्या प्रमाणात अनुवादाचे कार्य मराठीत होऊ लागले आणि एक प्रवाहच मराठी साहित्यात मराठी अनुवादित कादंबरीच्या रूपाने सशक्तपणे प्रवाहित झाला आहे.

इसवी सन २००० नंतरच्या काळात इंग्रजीतून मराठीत अनेक महत्त्वाच्या कादंबऱ्या अनुवादित झाल्या. त्या कादंबऱ्यांनी विविधांगी जीवन वास्तवासह वेगवेगळ्या क्षेत्रातील जीवनानुभव अविष्कृत केला. या प्रभावातून येणाऱ्या काळात मराठी कादंबरी आणि देशांनी विकसित होईल असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण यातून विचारांचे क्षितीज विस्तारित होत आहे. मूळातच कादंबरी हितावह मार्ग दाखवीत

लोकशिक्षणाचे कार्य करते. समाज जीवनाच्या वास्तवाचे चित्रण करण्याचे सामर्थ्य असलेल्या कादंबरी या वाङ्मय प्रकारातील अनुवादित कादंबरीतून ही तेवढ्याच समर्थपणे प्रकट होते. किंबहुना अधिकच सामर्थ्यानिशी ते वास्तव आविष्कृत होते.

अनुवाद हा शेवटी दोन भाषांचे, भाषिक समाजाचे मिलन असते. तरी त्या भाषा-भाषिक समाजाची सांस्कृतिक संचित असतात. त्यामुळे ते स्वतंत्रही असतात. त्यांच्या स्वतंत्र परंपरा, रूढी, श्रद्धा संस्कृती ती भाषा जोपासत असते. अनुवादकाला जेव्हा अनुवाद करायचा असतो तेव्हा त्या शब्दांचे चपखल असे शब्द अनुवादासाठी मिळतीलच असे नाही तेव्हा तो आहे तोच शब्द घेतो. इंग्रजीतून मराठीत अनुवादीत मराठी कादंबऱ्यांमध्ये ही असे मूळ शब्द आलेले आहेत. पण त्यामुळे कुठेही मुळाशी आला समजायला वाचकाला अडचण येत नाही किंवा मूळ आशयाला धक्काही पोहोचत नाही. अनुवाद करताना मूळ कलाकृतीचा बाज आणि तिचे गुणविशेष अनुवादामध्ये उतरणे गरजेचे असते. केवळ दोन भाषा आल्याने उत्तम अनुवाद करता येतो असे नाही तर अनुवादकाला स्त्रोत भाषा आणि लक्ष्य भाषांमधील अद्यावत ज्ञानासह शास्त्रीय, सामाजिक व सांस्कृतिक संदर्भाचे ज्ञान, भाषेचे वैविध्यपूर्ण रूपे आणि जाण असणे आवश्यक आहे. चतुरस्त्र वाचन व व्यासंगातून ते साध्य होते. तर अचूक शब्दांसाठी शब्दकोश सहाय्यभूत ठरतो. इंग्रजीतून मराठीत अनुवादीत होणाऱ्या कादंबऱ्यांमध्ये ही जाण दिसून येते. इंग्रजी साहित्यात अग्रक्रमाने स्थान प्राप्त झालेल्या या कादंबऱ्या मराठीतून अनुवादित होताना मूळ कलाकृतीतील आशयाला धक्का न लावता केल्यामुळे ते मनाचा ठाव घेणारे झाले आहे. या कादंबऱ्यांमधून वैचारिक, सांस्कृतिक प्रबोधनाच्या महत्त्वपूर्ण कार्यासह दोन भाषांमध्ये सांस्कृतिक, वैचारिक देवाण-घेवाण साध्य झाली आहे. आशयाच्या विविधतेमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवरील सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक घडामोडींचा संदर्भ वाचकांना नवा वाटतो. या अनुवादित कादंबऱ्यांतून प्रतिबिंबित झालेला समाज हा मराठी वाचकाला माहित असलेल्या आणि जगत असलेल्या समाजापेक्षा वेगळा असल्याने एक नवे जग उभे राहते.

मराठी कादंबरीला एक आशयगर्भ नवा आयाम देणाऱ्या इंग्रजीतून मराठीत इसवी सन २००० नंतर अनुवादित झालेल्या कादंबऱ्यांमध्ये 'डिसग्रेस', 'द असोसिएट', 'द नेमसेक', 'स्लम डॉग मिलेनियर', 'टू सर विथ लव्ह' , 'डिजिटल फॉर्टेस', 'डाय फॉर मी', 'वन नाइट @ कॉल सेंटर', 'द डार्क होल्डर्स नो टेरर्स', 'लव्ह स्टोरी', 'द ब्रेडविनर' या कादंबऱ्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.

उपरोक्त सर्व अनुवादित मराठी कादंबऱ्यांतून अत्यंत प्रगल्भ दृष्टिकोन अविष्कृत झाला आहे. आशयाच्या दृष्टीने वैविध्यपूर्ण विषयांची मांडणी या कादंबऱ्यांमधून झाली आहे. जागतिक समस्या असलेला दहशतवाद, आधुनिकीकरण तंत्रज्ञानाचा वाढता दाब आणि त्यातून होत जाणारा नैतिकतेचा ऱ्हास, सामाजिक जीवनातील परिवर्तन, विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती, ग्रामीण जीवन, स्त्री-पुरुषांचे सहसंबंधाचे चित्रण, स्त्रियांचे प्रश्न, शिक्षण क्षेत्राचे वास्तव, वंशभेद, शहरी जीवन, आधुनिक विचारसरणी, गूढ व रहस्यमयता, विनोद, शासन व्यवस्थेचे अमानवी चेहरे, स्त्रियांचा स्वतःच्या अस्तित्वासाठी चाललेला संघर्ष, तरुण-तरुणींच्या जीवन शैली, त्यांच्यातील अश्लील संवाद, व्यसनाधीनता यातून येणारे मानसिक ताणतणाव अशा

अनेक अंगांनी ही अनुवादित मराठी कादंबरी विकसित झाली असून या अनुवादित मराठी कादंबरीने समकालीन मराठी साहित्य विश्वाला विविधांगी आयाम देऊन समृद्ध केले आहे. 'द ब्रेडविनर' या मराठीत अनुवादित कादंबरीतून अफगाणिस्तानातील तालिबानी राजवटीचे वास्तव प्रकट करीत तालिबानी राजवटीचा व मानवी चेहरा जगासमोर आणून शासन राजवटीचे सत्य उघड करते तर दुसरीकडे 'वन नाईट @ द कॉल सेंटर' ही कादंबरी आधुनिक काळात अस्तित्वात आलेली कॉल सेंटरची व्यवस्था आणि त्यात काम करणाऱ्या तरुण-तरुणींची आधुनिक जीवनशैली, त्यांची भाषा, एकमेकांचे शारीरिक संबंध, अश्लील संवाद, व्यसनाधीनता, त्यांची मानसिक ताणतणाव व्यक्त झाले आहे. कौर्याचा अनोख्या परिमाणाचा प्रत्यय देऊन शहरी आणणारी 'डाय फॉर मी' ही कादंबरी आणि आधुनिक भारताच्या सामाजिक पार्श्वभूमीवरील विविध स्तरांवरचा संघर्ष अविष्कृत करणारी 'स्लमडॉग मिलेनियर' सारखी कादंबरी. 'द नेमसेक' कादंबरी माणसाच्या अशाश्वत जीवनाचे प्रत्यय देणाऱ्या कादंबऱ्यांनी निश्चितच मराठी साहित्यविश्व मध्ये 'मैलाचा दगड ' निर्माण केले आहे. एकंदरीतच मराठी साहित्यातील अनुवादित कादंबरी ने सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या धर्तीवर अनुवादाची सर्जन प्रक्रिया स्पष्ट केली आहे. समकालीन साहित्याच्या पार्श्वभूमीवर मराठी साहित्यातील अनुवादित कादंबरीने मराठी भाषा व साहित्य समृद्ध केले आहे. एवढेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडीचे प्रतिबिंब मराठी साहित्यातून अविष्कृत केले आहे. तद्वतच सामाजिक मूल्य जाणिवा प्रगल्भ करीत आधुनिकतेचा गांभीर्याने विचार करायला भाग पाडणारी ही अनुवादित कादंबरी आहे आणि हेच तिचे समकालीन साहित्याला लाभलेले योगदान आहे.

# समकालीन मराठी अनुवादित साहित्य (नव्वदोत्तर साहित्यकाल)

**डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत**
*प्रभारी प्राचार्य, व्ही. पी. एस. कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स, लोणावळा, तालुका मावळ, जिल्हा पुणे, पिन ४१० ४०१ (महाराष्ट्र राज्य) फोन नंबर ९२२६८५२५५२,*
*इ मेल आयडी bhagatsir.kp@gmail.com*

**प्रास्ताविक :**

समकालीन मराठी अनुवादित साहित्य या विषयावर शोध निबंध सादर करण्यापूर्वी साहित्याची संकल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे. साहित्य ही एक अतिशय व्यमिश्र संकल्पना आहे. साहित्याची अनेक अंगे—उपांगे आहेत. साहित्याची निर्मिती करणारा निर्माता लेखक ज्या समाजात रहात असतो. त्यानुसार त्याची साहित्य निर्मिती होत असते. ही निर्मिती म्हणजे लेखकाची सृजनशीलता असली तरीही साहित्यिक, निर्माता यावर जो समाजाचा प्रभाव कमी—अधिक प्रमाणात होत असतो त्यातून त्याच्या संवेदना, जाणिवा तयार होत असतात. त्या मांडण्यासाठी तो आपल्या प्रांतिक बोली भाषेचा उपयोग करत असतो. त्याच बरोबर तो जे साहित्य लिहितो त्यात केवळ बोली भाषा म्हणून भाषेचा उपयोग तो करत नसतो तर, आपले भाव, विचार, संस्कार, अवकाश (सह—संस्कार) आणि संस्कृती याचा त्याच्यावर घडलेला प्रभाव आणि त्याला जाणवलेल्या भावना यातून तो आपले साहित्यविश्व साकारत असतो. याच अर्थाने साहित्य हे समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते. साहित्यातून उमटलेले प्रतिबिंब म्हणजे लेखकाच्या मनातील केवळ विचार नसून तत्कालीन (समकालीन) राष्ट्रचळवळी, राजकीय परिस्थिती, स्वातंत्र्य, सामाजिक राजकिय चित्र याचे भान ठेऊन लेखक समाजाला एक नवी दृष्टी देण्याचा प्रयत्न तो आपल्या कलाकृतीतून देत असतो. म्हणून प्रत्येक कथा, कविता, कादंबरी आपला नवा ठसा काळवर उमटवत असते.

लेखकाने लिहिलेले साहित्य हे एक देश, भाषा, समाज, संस्कृतीचे दर्शन असले तरी त्याचा जेव्हा अनुवाद होतो, मग तो भावा नुसार असो वा शब्दानुवाद तीच कलाकृती त्यातील विचार सर्वापर्यंत पोहचतात. म्हणूनच अनुवादित साहित्य हे सर्वात पुढे जाणारे—एक पाऊल पुढेअसणारे साहित्य म्हणावे लागेल. या अनुवादित साहित्याची परंपरा, प्रेरणा, वैशिष्ट्ये आणि समकालीन अनुवादित साहित्याचा थोडक्यात आढावा यात आपण घेणार आहोत.

**भाषा आणि साहित्य :**

मराठी भाषा ही सुमारे १५०० वर्षा पूर्वीची भाषा आहे. देशातील प्राचीन भाषांपैकी हीएक भाषा आहे. देशात मराठी भाषा बोलणा—यांची संख्या ९ कोटी पेक्षा जास्त असून वैश्विक स्तरावर ७२ देशांमध्ये मराठी भाषिकांचे समूदाय आढळतात. मराठी भाषेतून प्रतिवर्षी ३६ हजार पुस्तके नव्याने प्रकाशित होत असतात. अनुवादित साहित्य प्रकाशनाची टक्केवारी २०१० पासून वाढत असून आज ३७ टक्के जगभरातील विविध भाषांतून मराठीत अनुवादित होत असतात.

या व्यतिरिक्त महाजालावरिल दररोज स्वत:च्या ब्लॉग वर लिखाण करून प्रसिध्द करणारे, स्वत:चे वेब पेज असलेले, मराठी संकेतस्थळावर विचार मांडणारे, फेसबुक विकिपिडीया इत्यादी पेपर, व्हॉटस्—ॲप, इंन्स्टाग्राम, आदि आधुनिक ई—साधनांद्वारे लेख लेखन करून आपले विचार मांडणारे विचारवंत त्या सोबत प्रत्यक्ष दैनिक, साप्ताहिक व मासिकाचे लेखन, संपादन करणारे विद्वान अशा विस्तीर्ण अर्थाने मराठी भाषेचा वाढता पसारा बघितला की मराठी साहित्य खऱ्या अर्थाने मुक्त हस्ते कसे विस्तारत आहे याची जाणीव होते.

मराठी साहित्याची ही एकूणच परंपरा अभ्यास करीत असताना त्याचे स्थूल मनाने खालील कालखंड मांडता येतील:

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचीन मराठी साहित्य | प्रारंभ ते इसवी सन १८१८ |
| २. | अर्वाचीन मराठी साहित्य | इसवी सन १८१८ ते १९२० |
| ३. | आधुनिक मराठी साहित्य | इसवी सन १९२० ते १९६० |
| ४. | नव मराठी, साहित्य (साठोत्तर कालखंड)<br>(ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्याचा नवप्रवाह) | इसवी सन १९६० ते १९९० |
| ५. | समकालीन साहित्य (नव्वदोत्तर) | इसवी सन १९९० ते २०२० |

**प्राचीन मराठी साहित्य (प्रारंभ ते इसवी सन १८१८) :**

प्राचीन मराठी साहित्याचा कालखंड हा 'संत वांङमयाच्या' निर्मितीचा कालखंड मानला जातो. या कालखंडात संत ज्ञानदेव, नामदेव ते संत तुकाराम, संत रामदास. या शिवाय महानुभवीय वांङ:मय चरित्रग्रंथ यांचा कालखंड आहे. या कालखंडात गद्य—पद्य रचना, अभंग रचना, अध्यात्मपर काव्य रचना झाल्या.

प्राचीन मराठी वांङमयाच्या कालखंडात समकालीन समाजमूल्यांचा व विचारांचा प्रभाव साहित्यावर होता. धार्मिक पारमार्थिक साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. या साहित्याने मराठी मन व संस्कृती जतन व संवर्धन करण्याचे कार्य केले.

**अर्वाचीन मराठी साहित्य (इसवी सन १८१८ ते १९२०) :**

प्राचीन मराठी वांङमयाच्या अखेरीस हा कालखंड सुरू झाला. यात गद्य—पद्य रचना झाल्या. मराठी भाषेबरोबर फारशी, यवनी, उर्दू आदि भाषेतील शब्दांचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. संस्कृत काव्याची छाप आणि उर्दू भाषेतील व्यावहारिकता ही तत्कालीन मराठी वांङमयावर काही अंशी पडताना स्पष्टपणे दिसत होती.

या समकालीन साहित्याची सुरुवात जरी इंग्रजी राजवटीत होत असली तरी छत्रे युगापासून याचा आरंभ झाला. याच काळात भाषांतरीत, रूपांतरीत, अनुवादित ग्रंथांचा श्री गणेशा झाला. मुलांकरिता सुबोधगोष्टी रचण्यापासून थोरांकरिता महाराष्ट्र कोश, केनेडी कोश, मोल्स्वर्थ कोश, आदिंपासून जांभेकरांच्या ज्योतिष, गणित, भाषाशास्त्र, इत्यादी विषयावरील भाषांतरित ग्रंथ निर्माण झाले.

अनुवादाचा आरंभ याचकाळात झाला असला तरी काही अनुवाद मात्र कृत्रिम व वरवरचे वाटत होते. त्यात सहजता नव्हती. पण काही प्रमुख ग्रंथांनी मात्र अव्वल दर्जा मिळवला. त्यात दादोबा पांडुरंग यांचे व्याकरण, वृत्तपत्र लेखनालेचा आरंभ याच काळात झाला. दर्पण, प्रभाकर, ज्ञानोदय, ज्ञान प्रसारक इत्यादी नियतकालिके दैनिके सुरू झाली. याच कालाखंडात 'शास्त्री युगा' ची सुरूवात झाली. चिपळूणकरांचे ललित वांङमय, राजवाडे यांचे मालती माधव, मुद्राराक्षक, विक्रमोवंशीय, इत्यादी संस्कृत नाटकांची रूपांतरे झाली. कोल्हटकरांनी 'ॲथेल्लो' विनायक किर्तने यांचे 'थोरले माधवराव पेशवे' तर 'जयमाला' हे इंग्रजी नाट्याधारे रचलेले नाटक अतिशय लोकप्रिय झाले.

थोडक्यात या कालखंडात कथा, कादंबरी, नाट्ये रूपांतरीत, भाषांतरित, अनुवादित साहित्य मोठया प्रमाणात निर्माण झाले. मात्र यातील पात्रे संवाद यात बऱ्याचदा तोच—तोचपणा येताना दिसून येत होता.

**आधुनिक मराठी साहित्य (इसवी सन १९२० ते १९६०) :**

मराठी साहित्याच्या इतिहासात हा कालखंड आधुनिक मराठी साहित्याचा कालखंड म्हणून ओळखला जात असला तरी, समकालीन कालखंडातील नाविन्यपूर्ण प्रयोगांमुळे याला आधुनिक संबोधता येते. १८७४ नंतरच्या युगाचा आरंभ हा 'मालाकार' युगाने झाला. यात चिपळूणकरांची 'निबंधमाला', आगरकरांचे, 'निवडक निबंध' व त्यांचे सुधारक वृत्तपत्र, शिवराम म. परांजपे यांचे, 'काळ वृत्तपत्र' तर लोकमान्य टिळकांचे 'केसरी' वृत्तपत्र यांनी हा काळ गाजवला.

महात्मा फुले यांचे 'तृतीय नेत्र' शेतकऱ्यांचे आसुड या सारखे साहित्य. ह. ना. आपटे यांच्या कादंबऱ्या यामुळे हा कालखंड वाचकांना बहर आणणारा: स्वातंत्र्याची जाणीव, स्व–त्त्वाची ओळख करुन देणारा होता. त्यातच केशवसूत, बालकवी, गोविंदाग्रज यांनी काव्यक्षेत्रात राम गणेश गडकरी, आदिंनी वैचारिकतेला जोरकसता प्राप्त करून दिली. परिणामी ज्ञानरंजन ते लोकरंजन हे या आधुनिक कालखंडाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले.

आधुनिक मराठी साहित्याच्या दुसऱ्या टप्प्यातील अर्थात १९२० ते १९४५ च्या कालखंडात समाज जीवन स्थिर राहिल्यामुळे साहित्य लोकरंजनाकडे जास्त कललेले दिसते. जीवनाचा सखोल विचार, चिंतन, प्रेम आणि कल्पनाविश्व यांनी भारलेले साहित्य आढळते. यात वि. स. खांडेकर, वा. म. जोशी यांनी कला आणि जीवन, तसेच ध्येयवाद आणि रंजकता आपल्या कादंबऱ्यातून रंगविला. विभावरी शिरूरकरांच्या कथांनी लोकजीवन, स्त्री समस्या आणि प्रणयावरील वास्तव रेखाटले. ना. सी. फडके यांच्या कादंबऱ्या आणि माधव ज्युलियन, कवी यशवंत, कवी अनिल, बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज यांनी काव्य परंपरेला नवी उंची मिळवून दिली.

अखेरच्या दशकात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. स्वातंत्रय संग्राम, चळवळी यातून लोक जागृती होउ लागली. साने गुरूजी, विनायक दामोदर सावरकर, श्री. म. माटे, पु. ग. सहस्त्रबुध्दे, दत्तो वामन पोतद्दार, रा. श्री. जोग, केतकर, के. ना. वाटवे, भावे यांनी साहित्याला राष्ट्रीयतेचा साज दिला, नवे वळण लाभले. स्वातंत्र्यपुर्व काळातील प्रमुख कालाखंड म्हणून याचा उल्लेख करता येईल. समकालीन चळवळींचे सत्याग्रहांचे चित्र यातून स्पष्टपणे दिसते.

**नव मराठी साहित्य (साठोत्तर साहित्याचा कालखंड) (इ.स.वि. सन १९६० ते १९९०) :**

प्राचीन, अर्वाचीन, आधुनिक पेक्षा हा कालखंड मराठी साहित्यातील मैलाचा दगड म्हणून ओळखला जाईल. नाविन्यपूर्ण साहित्य निर्मिती, विविध नव प्रकारांचा उदय आणि मराठीची परंपरा समृध्द करणारा हा कालखंड होय. याच काळात दलित, ग्रामीण आणि स्त्रीवादी साहित्याचे नवे प्रवाह सुरू झाले.

या कालखंडात दुसऱ्या महायुध्दाचे पडसाद सामाजिक स्तरावर मोठ्या प्रमाणांत दिसू लागल्यामुळे कथा, कादंबरी, काव्य यातून जीवनातील निराशावाद, असफलता, विषण्णता, नैराश्य प्रतित होत होते. याकाळात गाडगीळ, भावे, अरविंद गोखले यांनी लेखन केले. त्यातून मनोव्यापाराला प्राधान्य, प्रणयापेक्षा तत्वांना, प्रेम यापेक्षा राष्ट्र–भक्ती यातील नायकांतून अभिव्यक्त होताना दिसते.

दलित साहित्य तथा विद्रोही साहित्याचे बीज याच काळात रोवले गेले. स्वातंत्र्योत्तर काळात जातीय व्यवस्थेवर प्रहार होत होते. त्यातून विभाजीत समाजव्यवस्था उभी राहिली. सामाजिक

न्याय, जाणिवेची नवी नांदि दिली गेली. स्वातंत्र्य, समता बंधूता ही मूल्ये घेऊन नवीन साहित्यप्रवाह निर्माण झाला.

या कालखंडात अण्णाभाऊ साठे, डॉ. आंबेडकर, दया पवार, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, अमर शेख, शांताबाई कांबळे, भिमराव गस्ती, डॉ. केशव मेश्राम, प्रज्ञा पवार, शंकरराव खरात, नरेंद्र जाधव इत्यादीचे बंड व्यक्त करणारे साहित्य निर्माण झाले. लोकशाही मूल्यांसाठी जपणारे नव साहित्य म्हणून याकडे पाहता येईल.

ग्रामीण साहित्याचा एक नवाप्रवाह याचकाळात निर्माण झाला. ग्रामीण समस्या प्रधान जीवनाचे, संघर्षाचे चित्रण कथा, कविता, कादंबरी यातून होऊ लागले. यात निसर्ग आणि मानवी जीवनाचा संघर्ष, ग्रामीण आणि शहरी जीवनाचा संघर्ष, नवे ग्रामीण प्रश्न, समस्या यातून साहित्यात उतरल्या. यामध्ये प्रमुख लेखक र. वा. दिघे, आनंद यादव, गो. मा. पवार, टिकेकर, ग. ल. ठोकळ, शंकर पाटील, श्री. म. माटे, वि. वा. हाडप, यांनी ग्रामीण जीवन सचित्र डोळयांसमोर साकारले. यातील वास्तव चित्रण व्यंकटेश माडगूळकर, रांगणेकर, कालेलकर, श्री. ना. पेंडसे, रणजित देसाई, ना.स.इनामदार यांनी ऐतिहासिक जीवन वाचकांसमोर उभे केले.

वरील दोन प्रमुख प्रवाहांप्रमाणेच याचकाळात स्त्रीवादी साहित्याचा एक नवा प्रवाह सुरू झाला. पाश्चात्य देशात १९६० नंतर स्त्रीवाद आला. तो आपल्या देशात १९७५ नंतर रुजला. स्त्रीयांच्या भिन्न—भिन्न जाणिवा, पुरुषांच्या अभिव्यक्तीतून स्पष्ट होऊ शकत नाहीत. स्त्रियांचे समाजातील गौणत्व नष्ट व्हावे या हेतूतून स्वतंत्र स्त्रीवादी साहित्याचा जन्म झाला. यातून स्त्री एक व्यक्ती म्हणून स्वत:चा शोध घेणारे साहित्य निर्माण झाले. यात प्रामुख्याने पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले यांनी सुरुवात करून आज गोदावरी परूळेकर, विभावरी शिरूरकर, कृष्णामाई मोरे, छाया दातार, आदिंनी स्त्री साहित्याचे विश्व साकारले.

एकूणच साठोत्तर साहित्य हे केवळ एक प्रवासी किंवा साचेबंद नव्हते तर नव प्रवाहांनी युक्त सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक स्थित्यांतरासहीत वैशिष्ट्यपूर्ण होते.

**समकालीन साहित्य (नव्वदोत्तर कालखंड) (इ.स.वी. सन १९९० ते २०२०) :**

वास्तविक १९६० पासून आजपर्यतचे साहित्य हे समकालीन म्हणता येईल. तरीही साठोत्तर आणि नव्वदोत्तर कालखंडात काही प्रमुख भेद आढळतात. साहित्यात वेगळे बदल जाणवण्याइतपत स्पष्टपणे अधोरेखित करता येतील इतके बदल जाणवतात. म्हणून नव्वदोत्तर साहित्य हे समकालीन सहित्य असे आपण म्हणू शकतो. समकालीन या शब्दाचा अर्थच मूळी सम + काल म्हणणे काळानुरूप चालणारे, काळासोबत पुढे जाणारे, अथवा काळा समान सहित्य हे समकालीन सहित्य. नव्वदोत्तर सहित्य हे समकालीन सहित्य म्हणण्याचे प्रमुख कारण म्हणजे, या कालखंडात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला जोर आला होता. जागतिकीकरण, उदात्तीकरण, खाजगीकरण यामुळे माणूस हा घटक ग्राहक बनला होता. उत्पादन आणि विक्री

यामुळे मानवी जीवन फरफटत पुढे रेटले जात होते. कष्टकरी, दुर्बल, बहुजन यांच्या जिवीताला धोका निर्माण झाला. पर्यटन, मनोरंजन, संगणक क्रांती, स्मार्ट फोन, इंग्रजी माध्यमांच्या शाळा, मॉल संस्कृती, वाहनांची वाढणारी संख्या. यामुळे व्यक्तिगत, सामाजिक जीवनात बरेच बदल झपाट्याने होत गेले. हा ओघ इतका प्रचंड होता की यालाच समकालीन तथा आधुनिकतेचा वेग असे स्पष्टपणे म्हणता येईल. हा बदल जागतिक पातळी वरील असल्यामुळे समकालीन प्रवाहासोबत आपले राष्ट्र, राज्य सहभागी होण्याशिवाय पर्याय नव्हता.

साठोत्तर कालखंडातसुध्दा यासारख्या घटना नोंदवता, दाखवता येत होत्या पण याकाळात संवेदना व्यक्त करायला जागा मिळत नव्हती. खेडी ओस पडून शहरे बकाल होऊ लागली तरीही माणसांचे लोंढे थांबण्याचे नाव घेतले जात नव्हते. यांचा परिणाम झाल्यामुळे पुढे अभिव्यक्ती, रुपबंध आणि भाषा यांचे स्वरूप पालटले. हिंदी, इंग्रजी भाषांचा प्रभाव वाढला. विविध भाषांकरिता काम करणाऱ्या राष्ट्रीय अंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थेची वाढ झाली. यामुळे केवळ मराठी भाषिकांपुरते लेखन, वाचन हे मर्यादित न राहता देशातील विविध भाषांमध्ये ह्या मराठी साहित्य अनुवादित होऊ लागले.

**समकालीन काळातील अनुवादित साहित्य :**

समकालीन कालखंडाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्रकाशन आणि छपाई व्यवस्था आधुनिक तंत्रज्ञानाने विकसित केली त्याचा परिणाम साहित्याच्या प्रकाशनांवर झाला. प्रति वर्षी किमान ३ – ४ हजार पुस्तके प्रकाशित होऊ लागली. उदा. कादंबरी, नाटक, समीक्षा अशा विविधांगी सहित्य प्रकारांची प्रसिध्दी होऊ लागली. त्यातून वाचक वर्ग वाढीस लागला. नव लेखकांचे विश्व साकारले यात भालचंद्र नेमाडे, आनंद यादव, राजन गवस, सदानंद देशमुख यांनी प्रादेशिक शब्द सर्वदूर पोहोचवले. यात 'शब्दवेध' या नियतकालिकाने 'नव्वदोत्तरी कविता विशेषांक' प्रसिध्द केला. यात श्रीधर तिळवे यांची 'चौथी नवता' व 'नव्या चिन्हा सृष्टीची भूमिका' मांडली. त्यातूनच पुढे अमिधा हेमंत दिवटे, सौष्ठव (राहुल सरवटे) यांचे लेखन पुढे आले. संजीव खांडेकर, खलील वाघ, वर्जेश सोलंकी, मा. ना. जोशी, निमीत कुलकर्णी, सचीन केतकर आदी कवींनी काव्यबहर घडविला. कादंबरी क्षेत्रात रमेश इंगळे, जी. ए. ऐनापुरे, प्रविण बांदेकर, मेघना पेठे इत्यादींनी लेखन करून मराठी वाचन संस्कृतीपुढे आणली.

वरील सर्व लेखकांनी रूपांतरीत समकालीन लेखन केले होते. त्यामुळे अनुवादित साहित्याची एक स्वतंत्र परंपरा याच काळात सुरू झाली. मानवीमूल्ये बोलकी असल्यामुळे याचकाळातील डॉ. विणा मुळे यांनी लिहिलेल्या 'अनुवाद ग्रंथसुची' मुळे मराठी अनुवादित साहित्याला मोलाचा दर्जा प्राप्त झाला. त्यात केवळ समकालीन अनुवादित साहित्याची यादी नसून अनुवादनातील कार्याचा आढावा आणि अनुवादातील उणिवाही दाखविण्यात आल्या आहेत.

**अनुवादित साहित्याचे वेगळेपण :**

अनुवाद लेखन हे देशात अगदी अगोदर पासून होत होते. संस्कृत, बंगाली साहित्य मराठी भाषेत येत होते. पण मराठीत प्रकाशित होताना कानडी आणि बंगाली या दोन भाषांपुरते मर्यादित होते. अपवादात्मक मल्याळम, उडिया, गुजराती, कथा, गोष्टी, तेलगू भाषेतील स्त्री लेखिकांच्या वोल्गा कथा मराठीतून अवतरल्या. पणख जागतिकीकरणाच्या या प्रवाहात अनेक प्रकाशकांनी अनुवादित साहित्याकडे आपले लक्ष वळवले. 'केल्याने भाषांतर' हे विद्वासागर यांनी काढलेले त्रैमासिक, ज्योत्सना प्रकाशनाने अनेक इराणी पुस्तके प्रकाशित केली. ग्रंथप्रेमी तरुणांनी सुरू केलेल्या 'पपायरस' या प्रकाशन संस्थेने मोठे नाव कमवले. त्यातूनच 'पासोडी' हे श्री नितीन रिंढे यांचे पुस्तक सर्व दूर पसरले. पाश्चात्य देशातील विविध भाषांतील सकससाहित्य मराठीत अनुवादिक करण्याचे मोठे कार्य पारपडत आहे. यापूर्वी केवळ इंग्रजी भाषेतूनच अनुवाद होत होते. पण आता जर्मन भाषेतील हेसे, स्टेफान याच अनुवादीत लेखन तर दिलिप चित्रे यांचे जर्मनी भाषेतून काही अनुवादित ग्रंथ झाले. शिवाय स्पॅनिश, इटालियन, फ्रेंच, मादाम बोवारी, अजेनी ग्रांदे यांच्या कादंबऱ्या, बादलेर, वेटलेन यांच्या जगप्रसिध्द कविता, मुस्लीम देशातून आलेली 'नॉट विदाउट माय डॉटर' सारखे ग्रंथ मराठीतील बहुचर्चित ठरले आहेत. थोडक्यात यातून बहूभाषिकता ही संकल्पना पुढे आली. वाचकांचीही त्यात अभिरूची वाढली.

मराठी साहित्यामधील समकालीन साहित्याचा आढावा घेताना एक गोष्ट मात्र लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे मध्यंतरीच्या काळात महामैफिल ने पिंपरी—चिंचवडच्या साहित्य संमेलनात वाचकांकडून आपणास आवडणाऱ्या सर्वोत्तम दहा पुस्तकांची यादी मागवली. या सर्वेक्षणातून वाचकांनी महानायक, मुसाफिर, प्रकाशवाटा, अग्निपंख, के.ई.एम. वॉर्ड नंबर ५, झिम्मा, समिधा या पुस्तकांना पसंती दिली. अगदी तसेच सर्वेक्षण नार्वे मधल्या बुथ क्लबने अनुवाद संस्कृती अंतर्गत सर्वेक्षण केले. त्यातून सर्वश्रेष्ठ १०० पुस्तकांची यादी तयार केली. त्यातील अनेक पुस्तकांची भाषांतरे व रूपांतरे झाली आहेत. त्याचेही वाचक वर्ग आज मराठी आहेत. मात्र जगातील २९ इंग्रजी, ११ फ्रेंच, १० जर्मन, ९ रशियन, ६ स्पॅनिश, ५ इटालियन, ५ ग्रीक पुस्तके आहेत. यातील काही ग्रंथ मराठीतील विजय तेंडुलकर, मंगेश पाडगावकर, पु. ल. देशपांडे, उमाकांत ठोंबरे, शांता शेळके यांनी अनुवादित केले आहेत. त्यांचे मोठे वाचक वर्गही आज आहेत. अनुवादित साहित्याचा एक स्वतंत्र वाचक वर्ग आहे.

आपण जेव्हा समकालीन साहित्य असा शब्द वापरतो त्या वेळी मागील काळाचे वेगळे असे काही तरी त्यात अध्याहत असते. नव्वदोत्तर साहित्य याचा अनुभव पहायला मिळतो. उदा. डॉ. सत्यवान शंकर मेश्राम यांच्या षष्ठ्यब्दीपुर्तीचा 'नव्वदोत्तर मराठी साहित्य' हा गौरव ग्रंथातुन डॉ. देवानंद सोनटक्के यांचे दलित कविता वरील लेख, डॉ. मदन कुलकर्णी यांच्या लघु

कादंबरी वरील लेख, 'जागतिकीकरण आणि ग्रंथ व्यवहार' अरूण जाखाडे यांचा लेख, जागतिकीकरणात, 'समाज विचारशून्य करायचा आहे का', किंवा माणसाला 'केवळ उपभोक्ता' म्हणून पाहिले जाते हे कितपत योग्य आहे १ अशा अनेक समकालीन प्रश्नांची उत्तरे यातून शोधण्याचा प्रयत्न केला आहे. नव संस्कृतीचा परिचय खऱ्या अर्थाने यातून आपल्याला घडतो. म्हणून ही वाटचाल अशीच सुरू राहाणे गरजेचे आहे तरच समाजोन्नती घडेल. त्यातूनच भाषांची संस्कृती, विचारांची मोठी अदान प्रदानता होउन वैचारिक समृध्दी प्राप्त होत आहे. जागतिकीकरणाने जग जवळ आले आहे. अनेक देशातील खाद्य पदार्थ, वस्तु, सण, उत्सव महाराष्ट्रातील अन्य कोपऱ्यात झिरपत आहेत. त्यातूनच नवे शब्द, संस्कृती आकार घेत आहे. अनुवाद हे माध्यम असले तरी अनेक लहान थोर लेखकांच्या हातभारामुळे मराठी भाषा विश्वात्मकतेकडे, बंधुत्वाकडे वाटचाल करत आहे. हेच खरे ऐश्वर्य महाराष्ट्राला बहुआयामि तत्वाचा संदेश देउन मोठे करणार आहे. मात्र ही वाटचाल अविरत सुरू असायला हवी. कवी, लेखक, प्रकाशक, वाचक यांची साखळी घट्ट विणलेली असली पाहिजे तरच मराठीचे भाषा वैभव उंचावेल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

*१. मोतीराम कटारे, प्रतिभास प्रकाशन, २०२०, समकालीन साहित्याचा वेध, प्रथम आवती, परभणी.*
*२. प्रा. दत्ता भगत, रजत प्रकाशन, २०१०, समकालीन साहित्य आणि साहित्यिक, प्र. आ. औरंगाबाद.*
*३. सत्यवान मेश्राम, विजय प्रकाशन, २०१९, नव्वदोत्तर मराठी साहित्य, प्र. आ. नागपूर.*
*४. शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन, साठोत्तरी मराठी वांङमयातील नवीन प्रवाह, पुणे*

**लेख सूची :**

*१. लेखक श्री मुकुंद काळे, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, १७ जानेवारी, २०१६ पंचवीस वर्षातली सर्वोत्तम दहा पुस्तकं.*
*२. लेखक डॉ. नंदकुमार मोरे, दैनिक सकाळ, ५ नोव्हेंबर, २०१७ मराठीचे समकालीन वास्तव भाग २ रा.*
*३. प्रो. डॉ. शशिकांत लोखंडे, दैनिक सामना, २१ एप्रिल, २०१९ नव्वदोत्तरी साहित्य संपदा.*
*४. लेखक रणधिर शिंदे, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, १३ जानेवारी, २०१९ साठोत्तरी आणि नव्वदोत्तरी आणि पुढे.*

# समकालीन मराठी कथा

**डॉ. कोमल वि. ठाकरे**
*प्राध्यापक,तायवाडे महाविद्यालय, महादुला–कोराडी, जि.नागपूर*

समकालीन हा शब्द काळाचा निर्देश करणारा आहे. त्या त्या विशिष्ट काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि इतर विविध समस्या, त्यातील ताणतणाव, अंतर्विरोध, तत्कालीन विचार याचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. प्राचीन, अर्वाचीन आणि समकालीन अशा परंपरा साहित्यात मानल्या गेल्या आहेत. सर्वसाधारणपणे १९४५ नंतरच्या साहित्याला समकालीन साहित्य असे मानण्यात येते. जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे, ज्या काळात ते निर्माण होत असते, त्या काळातील परिस्थितीशी जवळचे नाते सांगते, त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे, त्या काळातील विचार ,जाणिवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य म्हणजे समकालीन होय. समकालीन मराठी कथेचा विचार करताना हरिभाऊ ते नवकथाकार यांच्यापर्यंतच्या कथेचा ओझरता आढावा या शोधनिबंधात घेतला आहे.

इंग्रजांच्या राज्याबरोबर मुद्रणकला भारतात आली. मुद्रणकलेमुळे मराठीत विविध साप्ताहिके, पाक्षिके, मासिके छापली जाऊ लागली. यांच्या गरजेतूनच मराठी कथा साहित्याला बाळसे प्राप्त झाले. १८९० साली हरिभाऊ आपटे ह्यांच्या 'करमणूक' या नियतकालिकातून आधुनिक मराठी कथेचा जन्म झाला. हरिभाऊची गोष्ट घटनाप्रधान, प्रसंगप्रधान, स्थलप्रधान आहे. क्वचितच ही गोष्ट व्यक्तिच्या अंतरंगात शिरण्याचा प्रयत्न करते. कथानकप्रधानता हे यांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. त्यांचे कथालेखन बोधवादी आहे.असत् प्रवृत्तीच्या माणसांना शिक्षा सत् प्रवृत्तीचा विजय असे जीवनाच्या न्यायासंबंधीचे ढोबळ गणित हरिभाऊ मांडतात. चमत्कारिक, उत्तान श्रृंगारिक गोष्टीला त्यांनी वास्तविकतेत उभे केलेले दिसते. काही कथांतून मानवी मनाचा वेधही घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. कथेची विविध रूपे निर्माण करणाऱ्या हरिभाऊंनी मराठी कथासाहित्यात पृथगात्म कामगिरी केल्यामुळे त्यांची कथा एका ऐतिहासिक टप्प्याचा भाग ठरते. हा काळ करमणुकीचा काळ म्हणून ओळखल्या जातो.करमणुकीनंतर कथेला मानाचे स्थान देण्याचे कार्य मनोरंजन मासिकाने केले त्यामुळे त्यानंतरचा काळ मनोरंजनाचा काळ म्हणून ओळखल्या गेला. या काळातील लोकप्रिय कथाकार वि.स. गुर्जर (१८८५–१९६२) यांनी शेकडो कथा लिहिल्या पण प्रकाशित होऊ शकल्या नाहीत. यांचे कथाकर्तृत्व हे काळाशी बांधलेले होते. यांची हरिभाऊप्रमाणे स्फूट गोष्ट नसून संपूर्ण गोष्ट होती.कथेची लांबी वाढली , सुबकपणा आला होता. गुर्जरांनी फडक्यांच्या पुर्वी रंजक, श्रृंगारिक कथेची पार्श्वभूमी निर्माण करून ठेवली आहे. कौटुंबिक जीवनातील प्रश्न विशेषत:

नवविवाहितांच्या जीवनातील प्रश्न, त्यातील नाजुक भावबंध मांडण्याचा व या काळच्या मध्यमवर्गीय वाचकाला मोहित करण्याचा प्रयत्न गुर्जरांनी केला. यानंतर श्री.कृ.कोल्हटकर, न. चि.केळकर, ना.ह.आपटे, वा.ना.देशपांडे, दिवाकर कृष्ण, गो.ग.लिमये, वि.वि.बोकील, कुमार रघुवीर, ख.सा.दौंडकर अशा अनेक लेखकांनी कथा लिहिल्या. हरिभाऊंच्या स्फुट गोष्टी ज्या केवळ श्रवणीय होत्या त्यांना वाचनीय करण्याचे कार्य दिवाकर कृष्ण आणि गो.ग.लिमये या दोन कथाकारांनी केले. याच काळात ना.सी.फडके, वि.स.खांडेकरांच्या कथालेखनाला सुरूवात झालेली आहे. फडक्यांनी लघुकथेचे तंत्र मंत्र विशद केले. प्रारंभ, निरगाठ व उकल हे कथेच्या रचनेचे तीन टप्पे त्यांनी सांगीतले. यांची कथा मराठी मनाला विशेष आवडली. त्याकाळच्या तरूण मनाला ती विशेष भावली. कारण त्यांनी स्त्रीपुरूष प्रेमसंबंधाचे विश्व हेच कथेचे प्रधान विश्व मानले होते. खांडेकरांनी महाराष्टाच्या जीवनातील विषमतेचे, विसंगतीचे, सुखदु:खाचे संघर्षनाटय टिपण्याचा प्रयत्न केला.खांडेकर हे जीवनवादी तर फडके हे कलावादी होते. फडक्यांच्या स्वप्नरंजनपर तंत्रनिष्ठ कथेची प्रतिक्रिया म्हणून य.गो.जोशींची कथा निर्माण झाली. त्यांनी केवळ स्त्री पुरूषांच्या प्रणयरंगाऐवजी कुटुंबातील विविध नात्यातील व्यामीश्र भावभावना चित्रित करणारी कथा लिहिली. श्री.म.माटे यांनी उपेक्षितांचे अंतरंग दाखविणारी कथा लिहिली. बी. रघुनाथ यांनी आपल्या कथेतून ग्रामीण जीवनदर्शन घडविले.लक्ष्मणराव सरदेसाई यांनी गोमंतकीय संस्कृतीचे दर्शन घडविणारी कथा लिहिली. कृष्णाबाई, विभावरी शिरूरकर यांनी स्त्रीमनातील आंदोलने प्रकट केलीत. कथानकाचा बडेजाव न दाखविता भाववृत्तीला प्राधान्य देणाऱ्या वामणराव चोरघडे व कुसुमावती देशपांडे यांनी लिहिलेल्या काव्यात्म कथेने स्वत:ची स्वतंत्र शैली सिध्द करीत फडके—खांडेकरांच्या तंत्रचौकटिला धक्का देत लघुकथेच्या क्षेत्रातील कोंडी फोडली. यानंतर मराठी लघुकथेचे स्वरूप पूर्णपणे बदलून गेले. १९४५ नंतर मराठीत नवकथा जन्माला आली.

नवकथा : नवकथा ही वाङ्‌मयातील विशिष्ट प्रवृत्तीतून, जीवनाच्या नव्या अनुभूतीतून निर्माण झालेली आहे. तिचे स्वरूप अधिक लवचिक आहे. ही कथा उत्कर्षावस्थेचा जशी प्रत्यय देणारी आहे तशीच ती काही नवे उन्मेष व्यक्त करणारी आहे. मानवी मनात उठणाऱ्या विचारांची नोंद तिच्यात घेण्यात आली. तिच्यातील अनुभवांची गुंफण फडके खांडेकरांच्या कथेपेक्षा वेगळी आहे. जुनी चाकोरी सोडून नवे स्वरूप धारण केलेल्या या नवकथेने वेगवेगळया बाबतीत नवक्रांती केल्याचे दिसून येते. नवकथेने अनुभव हा कथेचा आत्मा समजून अनुभव घेणारे लेखकाचे मन त्याहून वेगळे नाही हे अभिव्यक्तीबाबत गृहित धरले होते. तिच्यातील अंतर्मुखता केवळ चिंतन मननातून नव्हे तर कथेच्या सर्वच घटकांतून प्रत्ययाला येत होती. जीवनाचे अधिक वास्तव, अधिक सूक्ष्म आणि अनुभवाच्या विविध पातळयांवरून घडणारे दर्शन होउ लागले. मानवी मनाच्या आतील गााभ्यापर्यंत पोहचतांना एकप्रकारचे कुतुहल निर्माण

झाले. संशोधक वृत्ती बळावली गेली.अनुभूतीच्या कक्षा रूंदावल्या गेल्या. मराठी साहित्यात जो संकेतांचा बुजबुजाट झाला होता तो नवकथेने झुगारून दिला. हे तिचे महत्वाचे वैशिष्टय ठरते.

नवकथेचे अग्रदूत म्हणून जर कुणाचे नाव समोर येत असेल तर ते म्हणजे वामनराव चोरघडे आणि कुसुमावती देशपांडे यांचे होय. या दोघांच्या कथेतून फडकेप्रणित कथांपेक्षा निराळा घाट स्पष्टपणे दिसतो. अर्थातच त्यांनी फडकेप्रणीत तंत्र जाणीवपूर्वक टाळले. कथानकाच्या काचातून कथेला मुक्त करण्याचे पहिले श्रेय वामनरावांच्याच कथेला दिले पाहिजे. त्यांच्या कथेला ग्रामीण आणि गांधीवादी असे दोन आयाम आहेत. व त्यांच्यात एक नाते आहे. ग्रामीण जीवनाचे मनोगत अस्सलप्रकारे मांडणारी कथा त्यांनी लिहिली. नाजुक व तरल वैयक्तिक भावनेपासून तीव्र सामाजिक भावनेपर्यंत अंत:करणाच्या विविध छटा ते सूक्ष्मपणे रंगवू शकतात. '' त्यांच्या कथेत कहाणीची सहजता व उत्कटता आहे. चित्रकाराच्या कुंचल्याचे सामर्थ्य आहे आणि कविहृदयाचा हळुवारपणा व कल्पनाविलास आहे. या सर्वांच्या जोडीला मानवी जीवनाबद्दल वाटणारी निष्ठा व सांस्कृतिक मूल्ये जतन करण्याचे सामर्थ्य आहे.''[१] मराठी कथेला तंत्राच्या चौकटितून व कथानकप्रधानतेच्या कोंडीतून मुक्त करण्याच्या दृष्टिने चोरघडयांनी केलेले लेखनकार्य अतिशय महत्वपूर्ण ठरले.म्हणूनच मराठीतील पहिले यशस्वी कथाकार म्हणून त्यांचा गुणगौरवही झाला. कुसुमावती देशपांडे यांच्या कथा मोजक्या असूनही त्याला आगळे स्थान प्राप्त झालेले आहे. मानवी जीवनातील गुंतागुंत, त्यातील भावभावनांची आंदोलने आणि त्यामधील विसंगती याचे चित्रण अतिशय नाजुकपणे आणि अतिशय सहानुभूतीने त्या करतात. त्यांनी मराठी कथेला प्रौढ दृष्टिचे लेणे दिले. त्यांच्या कथेत जिव्हाळा तसाच उमाळाही आहे.बाह्यघटनांपेक्षा व्यक्तिमनांमध्येच त्यांची प्रतिभा अधिक रंगते. ''य.गो. यांच्याप्रमाणे तिच्यात काव्यात्मकता आहे. पण खांडेकरांची अलंकरणाची हौस तिला नाही.''[२] खांडेकरांप्रमाणे तिच्यात सामाजिकता आहे.पण त्या बाबतीतही तिची वाट निराळी आहे. त्यांच्या चिंतनशीलतेला सामाजिकतेची जोड मिळाल्याने एक आगळीच आशयगर्भता प्राप्त झालेली आहे. अंतर्मुखता व मनोविश्लेषणपरता कुसुमावतींच्या कथांत बऱ्याच प्रमाणात आढळत असल्याने आजच्या नवकथांची बीजे त्यांच्या कथांतून आढळतात.

१९४५ च्या सुमारास एक नवे युगप्रवर्तन झालेले दिसून येते.सत्यकथा, अभिरूचीसारखी नियतकालिके नवी कथा, कविता प्रकाशित करू लागली. आशयाभिव्यक्तीच्या बाबतीत कथेचा तोंडवळा बदलल्या गेला व नवकथा हे नाव नव्या प्रवृत्तीच्या कथेला देण्यात आले. दुसऱ्या महायुध्दाने जगावर जी विफलतेची व विकलतेची छाया पडली होती. तसेच मानवी मूल्ये धडाधड कासेसळून पडल्यामुळे जी अश्रध्द वृत्ती समाजमनात निर्माण झाली होती त्याचे कटु व प्रत्ययकारी चित्रण कविता आणि कथा या

दोहोतही येऊ लागले.'' लघुकथा या वाङ्मयप्रकाराचे साधनरूप संपले. आपल्या स्वयंसिध्द अशा रूपात अर्थपूर्ण अनुभवाला प्रकट होऊ देण्यातच खरोखर त्यांची सार्थकता आहे. या नव्या जाणीवेचा जन्म झाला त्यामुळे कथावाङ्मय या प्रकाराचा केवळ कथाकल्प नव्हे तर कायाकल्प घडून आला''[३] अनेक प्रकारच्या वैचारिक कलावंतांची मने व्याकुळ झाली. मानवी जीवनातील व मानवाच्या स्वभावातील विसंगती पाहून त्यांची मने संभ्रमित झाली. निरर्थकत्वाची जाणीव होऊन त्यांनी मानवी नियतीच्या प्रश्नाला हात घातला. माणसाचे विश्वात स्थान काय?, कौटुंबिक संबंधांना अर्थ काय?, सामाजिक विषमता कशामुळे येते?, मरण म्हणजे काय? या प्रश्नांची उत्तरे विज्ञानाने स्वकारायला लावलेल्या बुद्धिवादाने देता येतात काय? नसल्यास दुसरे साधन कोणते? असे अनेक प्रश्न प्रतिभावंतांच्या मनात निर्माण झालेत. यंत्रयुगीन संस्कृतीमुळे यंत्राचा गुलाम झालेला अगतिक मानव, शास्त्रांनी निर्माण केलेल्या नव्या विध्वंसक अस्त्रांनी बावरलेला मानव, भोवतालच्या परिस्थितीशी समायोजन करता न आल्याने आतल्या आत गुदमरलेला मानव हा मराठी कथेचा विषय झाला. नवकथेनी ही वाटचाल जोमाने सुरू केली. दा.वि.कुळकर्णी म्हणतात त्याप्रमाणे,'' केवळ तंत्राचा बदल किंवा नवतेचे एक फॅड म्हणून नवकथा अस्तित्वात आली नसून नव्या अनुभूतीच्या नव्या जाणिवेच्या आत्मप्रकटीकरणासाठी चाललेली ती एक धडपड होती.''[४] असे दिसून येते. अनेक प्रवृत्ती तिच्यात नव्याने व्यक्त होऊ लागल्या. माणसाच्या मनात दबलेल्या विकारांची व विकृत भावनांची चित्रे, खोलवर दडून बसलेल्या सुप्त व अर्धसुप्त आकांक्षाची चित्रे ही कथा रंगवू लागली. त्यासाठी तिने आपले बाह्यस्वरूप व आकारही बदलला. हा अंतर्बाह्य बदल प्रामुख्याने अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे आणि व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांतून स्पष्टपणे जाणवू लागला.

मराठी कथेच्या विकासाचे हे चार प्रमुख आधारस्तंभ आहेत. त्यांना नवकथाकार म्हणून गणले जाते. प्रत्येकाच्या कथेचे स्वरूप वेगळे आहे. अरविंद गोखले यांच्या कथेचे केंद्र व्यक्ती असून त्याच्या अंतरंगात खोलवर शिरून तिच्या अंतर्मनातील व्यथा ते बोलक्या करताना दिसतात. १९४४ मध्ये त्यांचा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला तो म्हणजे नजराना. १९४६ला उन्मेष व त्यानंतरचा जन्मखुण प्रकाशित झाल्यानंतर ''चमत्कृती, अनुभूती व प्रगती या तिन्ही गोष्टी एकत्र करूनच उत्कृष्ट कथा बनते '' [५] असे त्यांचे मत झाले. त्यांच्या कथांतील व्यक्ती अनेक थरांतील आहेत. मात्र त्यांचा ओढा सर्वसामान्यांपेक्षा असामान्याकडे अधिक आहे. त्यांच्या कथेची निवेदनशैली आकर्षक आणि प्रभावशाली आहे.

गंगाधर गाडगीळ यांच्या कथेने मराठी कथेच्या दालनात इतके नवे प्रयोग केले की, नवकथाकार ही पदवी यथार्थतेने त्यांनाच लागू पडावी. अनुभव घेण्याच्या त्यांच्या पध्दती व ते आविष्कृत करण्याच्या वेगवेगळया तऱ्हा यातून त्यांच्या कथेची विविध रूपे प्रकट झालेली

आहेत. जीवनातील अनेक व्यक्ती व प्रसंग पाहतांना त्याच्या मुळाशी जाणे व आपल्या अनुभवातून, आशयाच्या वेगळेपणातून आपल्या आकर्षक शैलीत शब्दबध्द करण्याचे गाडगिळांचे सामर्थ्य त्यांच्या कथांतून प्रत्ययास येते. मध्यमवर्गीय समाजातील परिस्थिती, त्यातील रूढ समजुती, व्यक्तिमत्वावर येणारी बंधने, नीतिकल्पना, दारिद्रय, जीवनात आलेली यांत्रिक चाकोरी यामुळे ज्यांच्या भावना दडपल्या गेल्या, ज्यांची मने मुर्दाड झाली, ज्यांच्या ह्रदयात व्यथांचे तडे गेलेत. अशा दुबळया व्यथीत मनाचे चित्रण गाडगिळांच्या कथांतून विशेष तऱ्हेणे झालेले दिसते. गाडगिळांचा भर व्यक्तीपेक्षा व्यक्तिमत्वावर असतो. वर्णनांपेक्षा सूचनांवर असतो. त्यांचा शोध खराखुरा माणसाचा शोध आहे. लहान मुलांच्या अंतर्मनाची हाकही त्यांनी तरल, चंचल व क्षणोक्षणी निरनिराळे रंग घेणाऱ्या भावनांशी व संवेदनांशी एकरूप झालेले दिसतात. माणसांच्या व्यथित मनाचे चित्रण गाडगीळांनी केले या व्यथित मनाच्या संवेदना त्यातील विकृती व विसंगती, त्यांच्या जाणीवा व नेणीवा यांचे रंगीबेरंगी चित्रण गाडगीळ अत्यंत परिणामकारकरीतीने करतात.‘‘ गाडगीळांच्या कथांचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांची प्रयोगशीलता नवनवीन प्रयोगाने वाचकांना ते स्तिमित करित असतात. कथानकाचा ठरीव सांगाडा, शंका येण्याइतक्या गोष्टीच्या भाववृत्ती संक्रात करणे हे त्यांच्या कथांचे प्रयोजन दिसते.या प्रयोगशिलतेमुळेच त्यांची कथा सदैव टवटवित नवी अशी दिसते.’’[६] त्यांच्या निवेदनशैलीत उपमा, उत्प्रेक्षा व प्रतिमा यांच्या कल्पकतापुर्वक केलेला वापर आहे. आशयाशी एकरूप झालेली त्यांची शब्दसंहिता आहे. मराठी कथेला पिंजऱ्यातून मुक्त करून गगनभरारी मारण्यासाठी पंख दिले ते गाडगिळांनीच त्यामुळेच मराठी कथा साहित्यात त्यांचे स्थान असाधारण आहे.

नवकथाकारातील मानकऱ्यांत ज्येष्ठ आणि श्रेष्ठ ठरलेले कथाकार म्हणजे पु.भा.भावे होय. उद्दाम भावना व तिला तोलनारी कणखर, प्रभावी भाषा यातून त्यांनी आपलं कथाविश्व फुलविले आहे. भाव्यांचे कथाविश्व विशाल आहे. समाजाच्या अनेक अंगांना , अनुभवाच्या अनेक पातळयांना त्यांच्या कथाविश्वाचा विस्तार छेदून जातो. त्यांच्या कथेत अनेकप्रकारचे प्रसंग घडतात.विविधप्रकारच्या वैशिष्टयपूर्ण व्यक्ती येतात. या व्यक्तींवर भावे अनेक स्तरांवरून अनपेक्षित असा प्रकाश पाडतात. जीवनातील चमत्कृती निवडतात. कोणताही धुंद ,थरथरता क्षण जिवंत करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कथेत आहे. भाव्यांच्या कथेत कल्पनाविलासापेक्षा उत्कट भावनेचा निसंकोचपणे प्रभावी आविष्कार झालेला दिसतो. अनेक कथांतून आपणास त्यांच्या निरोगी प्रेमभावनेचे दर्शन घडते. ही प्रेमभावना सकस, निकोप अशी दिसते. मंगल आठलेकर सांगतात त्याप्रमाणे,‘‘ भाव्यांच्या प्रेमविषयक कथा पहिल्या की, प्रेम म्हणजे काय हे निटसे कळत नाही, पण मनाला ती भावना जाणवते व स्त्रीदेहाच्या नकळत झाालेल्या म्हणा अथवा जाणिवपूर्वक केलेल्या स्पर्शाने शरीरावर मोरपिसाऱ्यासारखे हळुवार रोमांच उभे राहतात’’[७].

अशा अजान अवस्थेतील प्रेमापासून ते अगदी प्रौढ परिपक्व प्रेमापर्यंतच्या अनेक कथा त्यांनी रंगविल्या आहेत. ही प्रेमभावना रंगवितांना किंवा फुलवितांना भाव्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोण वाचकाच्या ध्यानी आल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या कथांतून व्यक्त होउ पाहणारे अनुभव कथानकाच्या बंधनात आकसून राहत नाही. किंबहुना कोणतीच बंधने स्वीकारावयास भावे यांची कथा तयार नसते.त्यांची प्रेमकथा सांकेतिक स्वरूप धारण करीत नाही. प्रेमानुभव हा एक अपूर्व अनुभव असून तो मानसाचा पशू तरी बनविल किंवा देव तरी बनविल. मानसाचे जीवन उध्वस्त तरी करित किंवा त्यांचे नंदनवन बानविल. पण हे चित्रण करताना भावे सुसंस्कृतपणाला व सनातन जीवनमूल्यांना अधिक किंमत देतात. भाव्यांच्या सामाजिक मनाचा आविष्कार त्यांच्या बऱ्याच कथांतून झाला आहे. ज्याठिकाणी पाश्चात्यांचे अंधानुकरण आहे, ढांग आहे तिथे भाव्यांच्या लेखनीला उपरोधाची धार आलेली आहे. अशावेळी भाव्यांच्या प्रतिभेची विलक्षण झेप आपल्याला दिसते. भाव्यांना लोकविलक्षण पात्रे शोधण्याचे वेड आहे. अशा व्यक्तींचा भाव्यांनी घेतलेला शोध भारावून टाकण्यासारखा असतो. त्यांच्या भाषाशैलीमागे त्यांच्या कसदार भावनेचे सामर्थ्य आहे. भावनेनुसार तिचे रंग रूप बदलते. कधी उद्दाम, कधी धरदार, कधी हळवी, कधी काव्यात्म. त्यांच्या कथेतील आशयाला संवादी अशी असते. त्यांच्या या विलक्षण भाषाशैलीवरच अनेक रसिक मोहित झालेले दिसतात.

व्यंकटेश माडगूळकरांची कथा म्हणजे नवकथेचा आणखी एक वेगळया जातीचा फुलोरा. गाडगीळ, भावे, गोखले यांच्या कथेपेक्षा त्यांची कथा निराळी आहे.मांडगूळकरांच्या कथेत इतका जिवंतपणा आणि जातीवंतपणा येण्याचे कारण म्हणजेत्यांचे या माणदेशाशी असलेले विलक्षण नाते होय. ज्या जीवनरसावर त्यांच्या कथेचा पिंड पोसला आहे. त्याच्यावरच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा पिंड पोसला आहे. या माणदेशाने मांडगूळकरांवर विलक्षण संस्कार केलेले आहेत. गाडगिळांच्या भाषेत सांगायचे तर '' माणदेशाच्या आणि त्यांच्या नंदनवनाच्या सीमारेषा एकच आहेत.''[८] या माणदेशाच्या मातीत त्यांच्या कथेची पाळेमुळे खोलवर रूजलेली आहेत.

ग्रामीण जीवनाचे चित्रण आजपर्यंत अनेक कथांतून अनेकांनी केलेले दिसते. पुष्कळांच्या कथांतून अद्भूतता आली, काहींचया कथांतून कृत्रिमता व ग्रामीण जीवनाचे पारंपरिक संकेत आले, पण माडगुळकरांची कथा माणदेशांच्या नंदनवनात फुललेली , तिथल्या अंगभूत गुणालंकारांनी नटलेली दिसते. माणगंगेच्या परिसरातील व्यक्तिचे दारिद्रय, त्यांचा भोळेपणा, त्यांची कणखर वृत्ती, अडाणीपणा व विकारसुलभता, त्यांचया समजुती या सर्वांचे दर्शन त्यांच्याच अस्सल भाषेतून घडवितात. त्यामुळे त्यांच्या कथा वाचताना आपण माणदेशाच्याच परिसरात फिरायला गेल्याचे समाधान लाभते. आशय आणि अभिव्यक्तिच्या बाबतीत माडगुळकरांच्या कथेने स्वतंत्र असे नवे रूप सिध्द केलेले आहे.

गाडगीळ , गोखले, भावे, माडगूळकर यांनी आपआपल्यापरीने नवकथा प्रस्थापित केली. कथेसाठी नवे प्रांत खुले करून दिले. अनुभवाची नवी भांडारे उघडली. आशय आणि अभिव्यक्तीच्या अनेक दिशा त्यांनी सूचित केल्या. प्रयोगाच्या नव्या दिशा दाखविल्या. त्यामुळे तंत्रबध्दतेची चौकट निखळून पडली. व्यक्तिमनातील जाणीवा – नेणीवांचा शोध अधिक जागरूकपणे घेतल्या जाऊ लागला. पुढे व्यक्तीच्या शोधाच्या संदर्भात सामाजिक जाणीवांची देखील दखल घेतली जाउ लागली . या काळात नवकथेचा मागोवा घेत अनेक लेखक नव्या जाणिवांचा वेध घेऊ लागले. शांताराम, दि.बा. मोकाशी, सदानंद रेगे, श्री.ज.जोशी यासारखी नावे सहजच पुढे येतात.

शांतारामांची सुरूवातीची कथा जुन्या वळणावर जाणारी आहे. पण १९५५ नंतरच्या कथेत सूक्ष्म व्यक्तिचित्रण, तरल भावचित्रण, संयमित आविष्करण याचा प्रत्यय येऊ लागतो. जीवनातील लहानसहान सत्ये ती शोधते. विरोध तिच्या नजरेला चटकण दिसतो. पण जीवनात खोलवर कुठे शिरताना ती दिसत नाही. नवकथेचा मार्ग रूंदावण्याचे श्रेय दि.बा. मोकाशी यांनाही जाते. यांच्या कथांतून प्रयोगशीलता जाणवते. व्यक्तिच्या अंतर्मनाचा वेध घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या अनेक कथांतून आढळते. तरल भावनांचे हलक्या हातानी हळुवार चित्रण करणे हा मोकाशींचा विशेष, जीवनातील प्रखर आणि वास्तव दर्शन त्यांच्या अनेक कथांतून घडते. सदानंद रेगे यांची कथाही अशीच तरल व अंतर्मनाचा वेध घेणारी आहे. त्यांच्या कथांतून त्यांच्या बहुरंगी व्यक्तिमत्वाची साक्ष पटते. कधी तिरकस, कधी विक्षिप्त, तर कधी तरल, कधी गूढ असे जीवनातील विविध अनुभव वेगवेगळया पातळयांवरून त्यांनी घेतले आहेत. कोकणातील भुताखेतांच्या गोष्टीतून किंवा रहस्य कथांतून त्यांची अद्‌भुताची आवड व्यक्त होते. मध्यमवर्गीयांच्या विशेषत: गरीब कारकुणांच्या जीवनावर लिहायला त्यांना आवडते. त्या जीवनातील वैफल्य, लाचारी, हेवेदावे, यांत्रिक चाकोरी यावर कधी उपरोधाने तर कधी अपार करूणेने भिजुन ते लिहितात. यानंतर पु.शी.रेगे हे मुळातच कवीचा पिंड असणारे लेखक. पण 'रूपकथ्थक' या नावाखाली ज्या कथा त्यांनी लिहिल्यात त्यात कवीमनाचे नाजुक पदर प्रकट झाल्याचे दिसतात. याशिवाय शशिकांत पुनर्वसू, गो.रा.दोडके, पंडित शेटे यांच्या कथांतून तरल भावाविष्कार आणि व्यक्तिमत्वाचा खोलवर शेध घेण्याचे सामर्थ्य या विशेषांचा प्रत्यय येतो. त्यांच्या कथेचे विश्व पांढरपेशांचे आहे. पण त्यांच्या जीवनातील बारीक सारिक मनोव्यथा, दु:खे, समस्या याचे हळुवारपणे केलेले चित्रण मोठे मनोज्ञ वाटते.

श्री. ज. जोशी यांची कथा ही जुन्या व नव्या कथेच्या संगमावरची आहे. एका विशिष्ट परिघातले, मध्यमवर्गीय जीवनापुरते तिने आपले क्षेत्र मर्यादित केले असले तरी या जगातील विविध समस्या व बदलते जीवन , त्यातील ताण आणि भावनात्मक गुंतागुंत यांचे दर्शन त्यांनी घडविले आहे. माणूस या नावाने लेखन करणाऱ्या अंबादास अग्निहोत्री यांचेही

कथाविश्व पांढरपेशाचेच आहे. याशिवाय मध्यमवर्गीय यांचे जीवनदर्शन घडविणारे अच्युत बर्वे, रा. भि. जोशी, र. विद्वांस, ज्ञानेश्वर नाडकर्णी, श.ना.नवरे, स. आ. जोगळेकर, इ. कथालेखकाची नावे यासंदर्भात सहज पुढे येतात. या प्रत्येकाच्या कथेचा रंग व ढंग निराळा असला तरी कथेचा घाट जुना रूळलेलाच आहे. जुन्या वळणाचा आश्रय करूनही रसिकांचे मन आकृष्ट करून आपले कथाविश्व फुलविणाऱ्या कथाकारात महादेवशास्त्री जोशी यांचीही गणणा करावयास हवी. त्यांच्या कथेवर गोमंतकीय जीवनाचे संस्कार झालेले जाणवतात. गोव्याचा सुंदर निसर्ग तेथील विविध स्वभावविशेषांनी युक्त असलेली पात्रसृष्टी, तेथील भावजीवनाचा ठसा यांच्या कथेवर पडलेला दिसतो. जीवनातील मांगल्याची जोपासना करण्याचा प्रयत्न त्यांची कथा करते.

१९५५ नंतरच्या काळात ग्रामीण कथा अतिशय लोकप्रिय झाली . व्यंकटेश माडगुळकरांनी ग्रामीण कथेला दिलेले निराळे वळण सहजच उलथवून टाकणारे ग्रामीण कथाकार म्हणजे शंकर पाटील, द.मा.मिरासदार, उध्दव शेळके, ग.दि.माडगुळकर, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, गो.नि.दांडेकर, मधु मंगेश कर्णिक, हमीद दलवाई, रा.र.बोराडे, आनंद यादव, मनोहर तल्हार हे होय. या लेखकांनी ग्रामीण कथेला एक वेगळेच परिमाण प्राप्त करून दिले. १९४५ नंतरच्या काळात विनोदी कथांचे पिक सुध्दा अमाप आले. त्यात ग्रामीण कथांतून आलेला विनोद भरपूर प्रमाणात दिसून येतो. द.मा.मिरासदार यांची कथा यादृष्टिने उल्लेखनीय आहे. रा.र.बोराडे, शंकर पाटील यांच्याही कथांतून प्रसंगनिष्ठ विनोद आढळतो. अतिशयोक्तीवर मानवी स्वभावातील विसंगतीवर आधारलेला विनोद अनेक कथाकारांच्या कथांतून आढळतो. पद्माकर डावरे, वि.आ. बुवा इ. अनेक लेखकांची नावे या क्षेत्रात विशेष नजरेत भरतात.

स्त्रीजीवनाच्या समस्या, त्यांची सुखदु:खे, त्यांच्या भावभावना रंगविण्यासाठी अनेक कथालेखकांनी या काळातील कथाक्षेत्रात फार गर्दी केलेली दिसते. उदाहरनार्थ कमला फडके, शांता शेळके, सुमती क्षेत्रमाडे, योगिनी जोगळेकर, वसुंधरा पटवर्धन, स्नेहलता दासनूरकर इ. नवकथेच्या काळात यांची कथा जुन्या वळणाची असली तरी तिथून स्त्रीयांच्या जीवनातील भिषण व करूण नाटये अतिशय उत्कटपणे व्यक्त झालेली आहेत.

मराठी कथा वाङ्मयात १९६० पर्यंतची कथा गोखले, गाडगीळ यांच्या पावलावर पाऊल टाकत जाणारी नवकथा, जुने वळण स्वीकारून साधी गोष्ट उत्कटपणे सांगणारी अशी होती. या कालखंडावर पडलेला नवकथेचा प्रभाव हा निराळे वळण लावणारा आहे. व्यक्ती हे या कथेचा केंद्रबिंदू ठरला आणि येथूनच खऱ्या अर्थाने माणसाचा शोध सुरू झाला. कथेत सूक्ष्मपणा आला. मानवी भावभावनांचे विविध पदर, तिच्यातील गुंतागुंत व ती उकलून दाखविण्याचे सामर्थ्य आणि सखोल असे जीवनदर्शन ही कथा घडवू लागली या नवकथेने

मराठी कथेला अधिक चिंतनशील बनविले. तत्वज्ञानाची दृष्टी दिली. पण हे सर्व करतांना ती कथेची चौकट हरवून बसली. तिच्या व्यापक आशयाला ही चौकट अपुरी पडली.

१९५८ ते १९६० या सुमारास मराठी नवकथा ही फडके युगातील कथेच्या तंत्राच्या साच्याप्रमाणे बनली होती. तिच्यात तोचतोपणा जाणवायला लागला होता. साचलेपणाची कळा तिला आलेली दिसत होती. ज्या जाणिवा घेऊन नवकथेने जुन्या कथेच्या तंत्राची चौकट मोडली होती त्याच जाणिवांनी एक नवी चौकट नवकथेच्या भोवती उभी केली. त्यामुळे आघाडीच्या नवकथाकाराचे कथालेखन मंदावले. आणि नवीन कथालेखकांचे कथालेखन केवळ अनुकरणामुळे कृत्रिम होऊ लागले. पुन्हा मराठी कथेत पोकळी निर्माण झाली. पण ही पोकळी फार काळ टिकली नाही. ही मरगळ नष्ट करण्यासाठी १९६० च्या सुमारास मराठी साहित्यात अमुलाग्र असा बदल झाला. पुन्हा एकदा नवनिर्मितीची लाट आली. ती जी.ए.कुळकर्णी, चि. त्र्यं.खानोलकर, विद्याधर पुंडलीक, दिलीप चित्रे, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, श्री.दा. पानवलकर, शरच्चंद्र चिरमुले इ. नवीन कथाकारांची पिढी उदयास आली. ही पिढी नवकथेने प्रवर्तित केलेले काही विशेष अधिक समृध्द करणारी असून तिचे भरीव कार्य कथेची परंपरा व नवे अविष्कार यांना जोडणारा एक महत्वाचा दुवा म्हणून लक्षात घेण्यासारखे आहे. यांची कथा एका व्यक्तिच्या भोवती न फिरता समूहमनाचे दर्शन घडवून त्यातून माणसाचा शोध घेण्याचा प्रयत्न करू लागली. हा माणसाचा शोध घेतांना त्यांना जीवनाच्या अर्थशून्यतेची, वैफल्याची, एकाकीपणाची, जाणिव झाली. आणि जाणिवेने नैराश्याचे सावट या काळातील कथांवर पडलेले दिसून येते.

मराठी कथाक्षेत्रात या काळात विशेष महत्वाचे ठरलेले आघाडीचे कथाकार म्हणजे जी.ए.कुळकर्णी. नवकथेप्रमाणे त्यांची कथा जीवनातील सूक्ष्म, खोल व्यथांचा शोध घेणारी अशी आहे. त्यात जीवघेण्या यातना जशा असतात तसाच भेदक आविष्कारही असतो. माणसाच्या अंत:करणात खोलवर जाऊन त्याचा तळ शोधण्याचा ते प्रयत्न करतात. त्यासाठी त्या व्यक्तीचे सर्व अंतरंग ढवळून काढतात. त्यांची मनोविश्लेषणची पध्दतीही तेवढीच सूक्ष्म आहे. मानवाच्या अथांग दु:खाचा वेध घेणारी जी.एं.ची कथा वरून साधी वाटणारी पण अंतरंगात लाव्हा खवळणारी माणसे ते दाखवितात. त्यांच्या कथेतील प्रत्येक पात्राचे दु:ख वेगळे असते. या दु:खाचा जन्म नियतीत, सामाजिक विद्रोहात असतो., तर पुष्कळदा त्या व्यक्तीच्या मनातच असतो. त्यांच्या कथेतील प्रतिमांचा मुक्त वापर आशयाची सघनता वाढविणारा, त्यातल्या बारीकसारिक तपशीलातील अनुभवविश्वाचे रंग गडद करणारा आहे. त्यामुळे जीएंची कथा वाचकाला वेगळा अनुभव देते. ही कथा नवकथेप्रमाणे कथानक गमावून न बसता ते कथानक अधिक पेचदार व बांधेसूद असते.यामुळे,‘‘त्यांची कथा महाकाव्यासारखीच वाटते’’[९] हे म्हणणे अधिक पटते. जीवनाचा विशाल पट ती उलगडून दाखविते. त्या कथेत

लोकसाहित्याचे वैचित्र्य आहे. मिथ्य कथांचे सामर्थ्य आहे आणि वैश्विक सत्याचा शोध घेण्याचा तत्वचिंतक ध्यास आहे.

चि.त्र्यं.खानोलकरांनी कथेच्या क्षेत्रातही काव्य, नाटक, कादंबरी याक्षेत्राप्रमाणे वेगळेपण टिकविले आहे.मानवी जीवनातील अतर्क्य आणि अद्भूत याचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. कोकणातील परिसराची पार्श्वभूमी त्यांचया कथांना लाभली आहे. एकप्रकारे गूढ व धूसर वातावरणाचा पडदा त्यांच्या कथेवर पडलेला दिसतो. ती कथा काव्याच्या पातळीवर गेल्यासारखी वाटते.

दिलीप चित्रे हेही या कालखंडातील महत्वाचे कथाकार आहेत. त्यांच्या कथेचे स्वरूप हे भिन्न स्वरूपाचे आहे.ते म्हणतात की,'' माझा लेखनस्वभाव निव्वळ वाङ्मयीन संस्कारातून उत्पन्न झालेला नाही.स्वत:च्या अस्तित्वशोधाशी तो जोडलेला आहे.''[१०] हा अस्तित्वशोध त्यांच्या कथेचा गाभा आहे. त्यांच्या कथा नीति—अनीती, श्लील—अश्लील या वर्गीकरणाच्या पलीकडील असतात. एका दृष्टिने त्यांची भूमिका सामाजिक ,सांस्कृतिक व नैतिक मूल्यांवर आघात करणाऱ्या विद्रोहाची वाटते.

याशिवाय ज्यांनी याकाळात वैशिष्टयपूर्ण कार्य केलेले आहे अशा कथाकारांमध्ये ज्ञानेश्वर नाडकर्णी, जयवंत दळवी, सिनिक, ए.वि.जोशी, श्री.दा.पानवलकर, शरच्चंद्र चिरमुले, व.पु. काळे ही नावे मराठी कथेच्या वाटचालीत महत्वाची ठरतात.या सर्वांचे कथेच्या क्षेत्रात आगळे असे स्थान आहे. या प्रत्येक कथाकाराला त्याच्या अनुभवविश्वाचे सखोल व व्यामिश्र स्वरूप जसे व्यक्त करता आले तसेच स्वत:चा वेगळा ठसा असलेली आणि अनुभवाच्या स्वरूपाला नेमकेपणाने झेलणारी संरचना उभी करता आलेली आहे. या काही विशेष कसदार लेखन करणाऱ्या कथाकाराखेरीज अनेक इतर कथालेखक वाचकाची गोडी व भूक वाढवित आहेत.

**संदर्भ टिपा :—**

*१.म.ना.अदवंत, मराठी विश्वकोष, खंड १२,पृ. १२३९*
*२. इंदुमती शेवडे, मराठी कथा उगम आणि विकास, मुंबई, १९७३, पृ. ३१२*
*३. भालचंद्र फडके, प्रस्तावना, सहा कथाकार, पुणे, १९८७, पृ. ८*
*४. दा.वि. कुळकर्णी, मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद, पुणे, १९७६, पृ. ३२२*
*५.अरविंद गोखले, आत्मपरिचय (ग्रंथमाला), मनोहर सप्रे, १९४८,पुणे*
*६., म.ना.अदवंत मराठी विश्वकोष, खंड १२,पृ. १२४०*
*७. मंगला आठलेकर, पु.भा.भावे साहित्यविचार, अमळनेर, १९८८,पृ.८*
*८. गंगाधर गाडगीळ, खडक आणि पाणी, मुंबई, १९६६ (दु.आ.),पृ.२५०.*
*९. म.ना.अदवंत मराठी विश्वकोष, खंड १२,पृ. १२४२*
*१०. दिलीप चित्रे, सत्यकथा, जुलै १९६७, पृ.५*

# वर्तमान परिप्रेक्ष्यात समकालीन दलित कविता

**डॉ. अक्षय किशोर घोरपडे**

*सहा. प्राध्यापक मराठी विभाग, जा. ता. ए. सो. संचालित, गि. द. म. कला, श्री. के. रा. न. वाणिज्य, म. धा. विज्ञान महाविद्यालय जामनेर, ता. जामनेर, जि. जळगाँव ४२४२०६ ( महाराष्ट्र) मो. नं ९४२०२२३७१३*

*ई मेल : ghorpadeakshay7@gmail.com*

वर्तमान परिप्रेक्ष्यात समकालीन दलित कवितेचा विचार करताना आपणास अनुक्रमे वर्तमान परिप्रेक्ष्य आणि समकालीन या दोन संकल्पना समजावून घेणे गरजेचे आहे. वर्तमान परिप्रेक्ष्य ही संकल्पना मुख्यतः 1990 नंतरच्या कालखंडाच्या अनुषंगाने वापरण्यात आलेली आहे. 1990 नंतरचा कालखंड हा जागतिकीकरणाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. फार मोठ्या सामाजिक बदलाचा, परिवर्तनाचा हा कालखंड आहे. या कालखंडास माहिती तंत्रज्ञानाचे युग असेही संबोधले जाते. इंटरनेट,संगणक,सॅटॅलाइट आणि मोबाईल इत्यादींनी पारंपारिक जीवनाला नवा आकार दिला. मानवी प्रवृत्ती ही स्वाभाविकपणे या आधुनिक जीवनाकडे आकर्षिल्या गेली. सदर कालखंड हा उदारमतवादी कालखंड म्हणून जरी प्रत्ययास येत असला तरी प्रचंड विरोधाभास, विसंगतीने भरलेला हा कालखंड आहे. एकीकडे माहितीचे खुले जग तर दुसरीकडे माहितीपासून वंचित असलेला समाज, एकीकडे प्रचंड अवर्षण तर दुसरीकडे प्रचंड प्रमाणात साधनसंपत्ती, एकीकडे प्रचंड गरिबी दुसरीकडे प्रचंड श्रीमंती आणि हे सर्व आकाराला आले आहे ते याच कालखंडात. सर्वसामान्यांप्रमाणे दलित जीवनही या कालखंडाच्या कचाट्यातून सुटलेले नाही. त्यांच्या स्वतःच्या स्वतंत्र अशा काही समस्या या कालखंडाने निर्माण केल्या. ज्यात दलित जीवन भरडल्या जात आहे म्हणून या अनुषंगाने वर्तमान परिप्रेक्ष्य ही संकल्पना सदर शोधनिबंधाच्या अनुषंगाने समजून घेणे गरजेचे आहे. समकालीन म्हणजे एका काळाबरोबर असणे किंवा काळाशी समांतर असणे साहित्य म्हणून ज्या वेळेस आपण समकालीन साहित्याचा विचार करतो त्यावेळेस "समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे ज्या काळात ते निर्माण होत असते त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे त्या काळातील विचार जाणिवा मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात, असे साहित्य"१ म्हणून मग वर्तमान काळाशी दलित साहित्य किंवा दलित कविता ही समकालीन आहे का? की ती काळाशी फटकून वागते ? किंवा दलित जीवनाचा पूर्वसुरच ती अभिव्यक्त करते का? इत्यादी प्रश्नांचा शोध सदर शोधनिबंधात घ्यावयाचा आहे. सदर काव्यसंग्रहाची चिकित्सा करताना प्रस्तुत शोधनिबंध लेखकाने स्वतःला काही मर्यादा घालून घेतल्या आहेत. त्या अशा आहेत की, ही चिकित्सा करताना समकालीन असणाऱ्या या कवितेच्या वर्तमान जीवन जाणिवांचा शोध फक्त येथे अपेक्षित आहे. त्यांच्या कवितेला असणारी जागतिकीकरणाची पार्श्वभूमी तपासणे या कवीच्या कवितांमधून काही समान सूत्रे हाती लागतात का? प्रतिमांचे विश्व त्यांच्या कवितेमध्ये कितपत समान आहे? वर्तमानाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन कसा आहे? हे या शोधनिबंधाचे संदर्भात अपेक्षित आहे. 'एकच ओघ आम्हातून वाहत' असल्यामुळे तोच ओघ फक्त इथे शोधायचा आहे. त्यामुळे सदर कवींची कविता

वाईट आहे की, चांगली आहे किंवा केवळ तिची भलामण करून स्तुतिपर मांडणी करण्याचाही उद्देश नाही. इथे फक्त कविता गृहीत धरलेली आहे. शोधनिबंधाला सुरुवात करण्यापूर्वी १९९० नंतरच्या कवितेच्या संदर्भात आणखी एक निरीक्षण येथे नोंदवता येते ते असे की, कविता लिहिणाऱ्या दलित कवींची संख्या उदंड झाल्यामुळे काव्यसंग्रह आणि त्यांच्या प्रकाशनांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. उत्तरोत्तर ही संख्या वाढत जाणार हे निश्चित यात दुसरी गोष्ट अशी की, या प्रकाशित काव्यसंग्रहापैकी बहुतांश कवींनी स्वतःचे काव्यसंग्रह स्वतः प्रकाशित केलेले आहे. आणि यात काही वावगे आहे, असे नाही. उलट यामुळे आपल्या कृतक वाङमयाभिनिवेशात अडकलेला मराठी प्रकाशन व्यवहार हा खिळखिळा झाला किंवा सुलभ झाला. असेही म्हणता येईल. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून साहित्य निर्मितीचा हा ओघ सुरु असल्याने वर्तमान जीवन जाणिवांचा समृद्ध संदर्भ या कवितांमधून पहावयास मिळतो. ही संख्या पाहता विषय विवेचन अधिक व्यापक होऊ नये याकरिता १९९० नंतर प्रकाशित झालेल्या काही निवडक दलित कवींच्या कवितासंग्रहाचा विचार सदर शोधनिबंधात करण्यात येणार आहे.

सदर शोध निबंधासाठी एकूण सहा काव्यसंग्रहाची निवड केलेली आहे. ते पुढीलप्रमाणे - १. नंतर आलेले लोक - अरुण काळे २. धगीवरची अक्षर - उत्तम अंभोरे, ३. पुन्हा चाल करु या ! - लोकनाथ यशवंत, ४. अजूनही अस्वस्थ रोहिणी - अविनाश गायकवाड, ५. ग्लोबल वर्तमानाच्या कविता - सुनिल अभिमान अवचार, ६. तळ ढवळताना- लहू कानडे. हे सहाही काव्यसंग्रह प्रामुख्याने दोन हजार सालनंतर प्रकाशित झालेले आहेत. इथे एक गोष्ट आधीच स्पष्ट करायला हवी की, या निवडलेल्या काव्यसंग्रहाव्यतिरिक्तही याच कवींचे इतर काव्यसंग्रहही प्रसिद्ध आहेत त्यांचा आपण विचार करणार नाही.

या सहाही काव्यसंग्रहाची शीर्षक अत्यंत बोलकी आहेत. शीर्षक उच्चारताच जाणिवेच्या पटलावर प्रतिमा दृश्यमान करण्यात ते समर्थ ठरतात. या शीर्षकापैकी 'धगीवरची अक्षर' हे शीर्षकनाम वजा केले असता उर्वरित पाचही काव्यसंग्रहाची शीर्षक जागतिकीकरणाच्या रेट्यातून जन्मास आलेली आहेत. जागतिकीकरण अटळ आहे व ते धोकादायक असल्यामुळे त्यापासून सावध राहण्याचा व त्याच्या चाहुलीचा इशाराच प्रस्तुत शीर्षकातून प्रत्ययास येतो. सदर शीर्षकाना आपणास खालिल नामिक गटात समाविष्ट करता येते.

१. **सामान्य नाम:** नंतर आलेले लोक, ग्लोबल वर्तमानाच्या कविता, तळ ढवळताना.

२. **विशेष नाम :** धगीवरची अक्षर.

३. **भाववाचक नाव** : पुन्हा चाल करु या !, अजूनही अस्वस्थ रोहिणी .

या शीर्षकामध्ये उद्गार चिन्हाचा वापर फक्त एकाच काव्यसंग्रहाच्या शीर्षकांमध्ये केला गेलेला आहे. बाकी कुठल्याच शीर्षकात विरामचिन्हांचा वापर केलेला नाही तसा वापर केला गेला असता तर शीर्षकनाम प्रभावी ठरले असते या सबंध शीर्षकाचा बारकाईने विचार केला असता असे दिसून येते की, ही शीर्षक पुन्हा एकदा परिवर्तनासाठी उद्युक्त झालेली आहेत. जागतिकीकरणाच्या अदृश्य पावलांना त्यांनी ओळखल्यामुळे व्यवस्थेतील संभाव्य धोक्याबद्दल ते सजग झालेले आहे. व्यवस्थेने कूस बदलली मात्र मूळ ढाचा कायमच ठेवला छद्मी मुखवटा धारण करून जन्माला आलेली ही व्यवस्था या व्यवस्थेची वारंवारिता कायम आहे.

पुन्हा ज्यांनी ही व्यवस्था जन्माला घातली त्यांनीच ही जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान केली. हे नवनिर्माण करण्याचा आव आणणारे लोक 'नंतर आलेले लोक' आहेत या नंतर आलेल्या लोकांनी 'दुसऱ्या देशावर आपले राष्ट्रगीत लिहिले' त्याहूनही मुळच्या लोकांना हद्दपार केले म्हणूनच 'तळ ढवळताना' 'ग्लोबल वर्तमानाच्या कवितां'मध्ये 'अजूनही अस्वस्थ रोहिणी'साठी 'धगीवरची अक्षर' सोबत घेऊन नंतर आलेल्या लोकांवर 'पुन्हा चाल करु या!' ही या पाठीमागची भावना होय. शिर्षयुद्धाला पुन्हा सुरुवात झाली आहे. असा भावार्थ सदर शीर्षकामधून प्रकट होतो.

जागतिकीकरणात ग्लोबल वॉर्मिंग आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तीव्रतर होत आहे. कदाचित पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होण्याचीही शक्यता वर्तविली जाते. पाण्याला भारतीय संस्कृतीमध्ये पवित्र मानले जाते. भारतामधील कुठलाही धार्मिक रीतिरिवाज पाण्याशिवाय पूर्ण होत नाही. मुळात पाणीही नैसर्गिक देणगी असली तरी धार्मिक सोपस्कारामुळे व त्याच्या जैविक गरजेमुळे पाणी हे एकाच वेळी समतेचे तसेच विषमतेचेही प्रतीक बनले. भारतामध्ये क्रांती आणि प्रतिक्रांतीसाठी पाण्याचा वापर केला गेला. बाटलीबंद पाणी कुठेही सहज उपलब्ध होत असले तरी अजूनही विकसनशील अथवा विकसित राष्ट्र अथवा महासत्ता पाण्याची मूलभूत गरज पूर्ण करू शकलेले नाहीत हे वास्तव सत्य आहे. म्हणून अविनाश गायकवाड यांना 'अजूनही रोहिणी अस्वस्थ' वाटते.

'पाणी' या प्रतिकाचा वापर जवळपास सर्वच काव्यसंग्रहातून झालेला दिसतो. उत्तम अंभोरे यांच्या कवितेत पाण्याचा संदर्भ कावळ्या सहित येतो. 'पाण्याचाच नवा साठा शोधण्याच्या गोष्टी ते कोवळ्या कावळ्यांना शिकवताहेत' सुनील अवचार यांना 'पाण्याशिवाय तू काही दिवस जिवंत राहू शकतोस' असे वाटत असले तरी 'साध्या पाण्याऐवजी : Bisleri Aqua Guard 'ची होणारी ग्लोबल संस्कृती पाण्याच्या अभावी भटकंती करणाऱ्या सामान्यांच्या समूहाविषयी प्रश्न उपस्थित करते 'मोर्चे आडवा, मोर्चे जिरवा, पोलिसांचा कर्तव्यदक्ष कार्यक्रम, दलितांची एक संपूर्ण पिढी नेस्तनाबूत' येथे लोकनाथ यशवंत पुन्हा पाण्याचा संदर्भ रूपकात्मक वापरतात.

रोहिणी नदी बौद्ध संस्कृतीमध्ये विशेष संदर्भात ओळखली जाते. शाक्य आणि कोलीय यांच्यात रोहिणीच्या पाण्यावरून संघर्ष निर्माण झाला असताना राजपूत्र सिद्धार्थाने हा प्रश्न सामोपचाराने, अहिंसेने सोडवावा यासाठीचा आग्रह धरला. बहुमताच्या विरोधी गेल्याने राजपूत्र सिद्धार्थ शिक्षेस पात्र ठरला. आणि सर्वसंगपरित्याग करून दुःखाचा शोध घेण्यास निघालेला राजपूत्र सिद्धार्थाचा गौतम बुद्ध झाला. हिंसेने अस्वस्थ झालेली रोहिणी पुन्हा एकदा खळाळली. ही रोहिणी नदी अजूनही अस्वस्थ आहे असे अविनाश गायकवाड यांना वाटते.

पाणी हे जीवन आहे आणि त्याच्यावर सर्वांचा समान हक्क आहे. परंतु याच पवित्र पाण्यापासून माणसांना अस्पृश्य म्हणून दूर ठेवले. पाण्यालाही विटाळ होऊ लागला. पुन्हा एकदा रोहिणी अस्वस्थ झाली. आणि पुन्हा एकदा तथागत जन्मला.

"चवदार तळ्याच्या अंगावर उडाले शहारे
पुन्हा एकदा माणसाच्या मुक्तीचा

फडकावला जाहीरनामा तथागताने
रोहिणीचा कुंठित प्रवाह असा
खळाळून वाहीला जोमाने"२

'वॉटर किंग्डम-१' आणि 'वॉटर किंग्डम-२' पाण्याचं महात्म्य सांगणाऱ्या अशा दोन कविता 'नंतर आलेले लोक' या काव्यसंग्रहात येतात.

"पाण्याचा तंटा आणि लवाद
आपल्याला मिळतो एक बुद्ध
पाण्याच्या पायऱ्या चढून
आकाशाच्या वर जातो कबीर
हौदातून उगवते चिरंतन ज्योती
तळ्याचा नक्शा उतरवतो भीम
पाणी अन्यायाची बाजू
पाणी क्रांतीच माध्यम"३

नव्वदनंतरच्या जागतिकीकरणात पाण्यावर अधिसत्ता गाजवणारे नवे वॉटर किंग्डम अस्तित्वात आलेले आहे. हजारो रुपये मोजून घंटा दोन घंटे पाण्यात मनसोक्त डुंबा किंवा बाटलीबंद पाण्यासाठी पैसे मोजा 'नुकतेच जगण्याला दोन कोंब फुटले असताना' हे असे पाण्याच्या विक्रीचे नवे भांडवली अर्थशास्त्र जन्मास आल्याने कवी अस्वस्थ होतो. बाजारात विक्रीला आलेल्या बाटलीकडे पाहून 'बिसलेरीची बाटली निळ्या झाकणाची, तसाच तो निळा टोपीवाला' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर निष्ठा असलेला सच्चा भीमसैनिक दिसतो. पाणी वापरून बाटली फेकून द्यावी, अगदी तसाच हा भीमसैनिक

'चैत्यभूमीच्या रस्त्यावर निपचित पडला, रिकाम्या बाटलीसारखा'

"माणसाने कायम शुद्ध पाणी प्यायला हवे म्हणून
पाणी गाळून घ्यावं उकळून घ्यावं
झालं तर दोन थेंब औषध टाकून सुद्धा ठेवावं
पण पाणीच मिळत नसेल तर काय कराव ?"४

हे मात्र कोणीच सांगू शकत नाही याकडे लहू कानडे लक्ष वेधतात जशी पाण्याची चव तसा त्या गावातील लोकांचा स्वभाव किंवा बारा गावचं पाणी प्यायलेला माणूस कणखर असतो अशी लोकोक्ती आहे. म्हणूनच समुद्र असलेल्या गावात लहू कानडेना करमत नाही.

सदर सहाही काव्यसंग्रहातून जागतिकीकरणाच्या भयाचा ओघ वाहताना दिसतो. जागतिकीकरणाची सुरुवात झालेल्या या सहस्त्रका बद्दल आणि हे सहस्त्रक ज्यामुळे आपल्या अंगावर आलेले आहे. अशा माहिती-तंत्रज्ञान युगाबद्दल उद्देशून अरुण काळे म्हणतात,

"हे महान गवशा
बंद कर तुझा हा मल्टीमीडिया
पोरगी झाली नाही भटक्यांची देवाण-घेवाण
वार्षिक जत्रांमधून"५

जग ग्लोबल झालंय; जवळ आलय. माणसं एकात्मिक पातळीवर एकत्र आली. असा कितीही भ्रम निर्माण केला तरी भारतातल्या 'मध्ययुगीन आवरासावरीकडे कोण पाहिल?' हीच जाणीव लहू कानडे आणखी पुढे घेऊन जातात.

"हे मल्टिमीडिया सॅटॅलाइट हँगओव्हर गाजर
ती दुबळ्यांचे माणूस पण नाकारून
गळ्यात हायटेक ची घंटा बांधून धावणार मांजर ?"६

जो तो ज्याच्या त्याच्या परीने या सहस्त्रकाच स्वागत करीत सुटलाय नव्या सहस्त्रकाच्या गुणगान सुरू आहे. क्षणार्धात जग बदलेल असा भास निर्माण केला जातोय. विज्ञान-तंत्रज्ञान, सुख-समृद्धीचे सहस्त्रक म्हणून त्यांचा उल्लेख होतोय तर मग झोपडीतल्या विझत चाललेल्या दिव्याबद्दल काय? त्याबद्दल मात्र कोणीही बोलू इच्छित नाही.

"माहिती तंत्रज्ञानाने जग जवळ आले
आणि कुटुंबच झाले ! आनंद झाला
(लढाया मात्र सुरूच )"७

माहिती-तंत्रज्ञानाच्या स्फोटाने माहितीचे जाळे जगभर विणले जात असताना 'माहितीच्या विषमतेचे अंतर भारी पायाने कापले गेले. ई स्फोटात माझ्याच वर्गात दोन गट पडले' माहिती मिळविणारा एक गट व माहितीपासून अनभिज्ञ असलेला दुसरा गट ज्याला अजूनही पोटभर भाकरीची शाश्वती नाही 'इंटरनेटवर दलित युवक डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू जॉब डॉट कॉम वर आणि ते डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू सेक्स डॉट कॉम वर' माहितीचा स्फोट कितीही झाला तरी इंटरनेट वापरणाऱ्यांचे विश्व मर्यादित आहे. किंवा तसे करून दिले जात आहे. एका विशिष्ट विचारांच्या मर्यादित चौकटीत तुमची बुद्धी बंदिस्त करणे हा त्या पाठीमागचा प्रधान हेतू असे करताना इंटरनेट कशासाठी तर,

"इंटरनेट: पुरुषांसाठी
बघता येते जगातील कोणत्याही देशाची भोंगळी बाई
इंटरनेट : स्त्रियांसाठी
चाखता येतो जगातील कोणत्याही देशाचा माणूस नंग धडंग"८

यासाठी एखाद्या मादक पदार्थाच्या व्यसनाने गुंगून जावे. आणि भोवतालच्या वास्तवाचा विसर पडावा त्याप्रमाणे इंटरनेट माणसाच्या बुद्धीवर हावी होत आहे. संगणकाच्या पडद्यावर गुंतून पडलेल्यांना त्यावर दिसत नाहीत भूमिहीन, आदिवासी, दलित, अस्पृश्य, विझत चाललेल्या झोपड्यातील वाती, फुटपाथवर अर्धपोटी झोपणाऱ्याचे आकडे इत्यादी छातीला छाती भिडवणाऱ्या माणसापेक्षा ही संगणकाच्या

पडद्यावरील आभासी मनुष्य अधिक जवळचा वाटत चाललाय. जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या समस्येच्या मुळाशी हे कवी जातात. अग्निशामक दलाच्या गाडीची धोक्याची घंटा खणखणावी आणि आपण सावध व्हावे, अगदी त्याप्रमाणे हे कवी आपणास सावध करतात. जागतिकीकरणात 'दलितत्व नष्ट होण्याऐवजी डिलीट झाला. वापरा फेका आणि तुमचा भाव सांगा, चुपचाप बसा. माहिती एन्जॉय करा. चोरण्यापासून ते कायमचूर्णपर्यंत' हरेक गोष्टीच्या तत्वज्ञानात ट्रेड संस्कृतीने मूळ धरला आहे. संस्कृतीच रखेल झाली आहे. खुल्या आर्थिक क्षेत्रात कितीही मुक्त स्पर्धा असली तरी आडनावावरून समजणारे इंगित ते लपवू शकत नाही. आणि आलेली निनावी ओकारी ही दाबू शकत नाही.
यातील काही कवी आपल्या काव्यसंग्रहातून मुलांशी संवाद साधताना आढळतात. मुळात त्यांना संवाद का साधावा वाटतो? याचे उत्तर आपल्याला अवतीभोवतीच्या पर्यावरणात आढळते. दिवसेंदिवस वडील आणि मुलगा यामध्ये विसंवाद वाढतो आहे. जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाने तरुणांच्या मनोविश्वावर केलेला कब्जा हा जुन्या पिढीसाठी चिंतेचा विषय. नव्या पिढीची म्हणजेच मुलांची जुन्या पिढीकडे म्हणजेच वडिलांकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. चळवळ, समाज, विचार या गोष्टी त्यांच्यासाठी आउटडेटेड झाल्यात. तर ज्याला वरची कमाई, तो लोकप्रिय हा सिद्धांत त्यांनी मनात घट्ट रुजून घेतलाय. त्यामुळे गल्लोगल्ली, नाक्यानाक्यावर झळकणाऱ्या बॅनर्स वरील गळ्यात सोन्याच्या चैनी आणि बोटात अंगठ्या असलेले लोक त्यांचे रोल मॉडेल ठरत आहेत. वडील आणि मुलगा यांच्यातील वाढलेल्या विसंवादाचे कारण आणि बदलती वर्तमान व्यवस्था याचे यथार्थ चित्रण आपल्याला अरुण काळे यांच्या 'प्रेमाचं होऊ द्या ना जागतिकीकरण' या कवितेत प्रतीत होते. 'दहा किलो दप्तर वाहणारा माझा मुलगा' ही येणारी ओळ बरेच काही सांगून जाते. लोकनाथ यशवंत यांची 'वडिलांनी मुलाला पोस्ट न केलेले पत्र' ही कविता थेट मुलाशी संवाद साधणारी आहे. तर अविनाश गायकवाड यांना मात्र असं वाटतं की, 'मुलांच्या पुढ्यात तर इच्छा भोगाचं प्रसरणशील अनंत आकाश' आहे. वास्तवापासून तो दूर आहे. आभासी दुनियेत तो गेम ॲडिक्ट झालाय. आभासालाच वास्तव समजणाऱ्या आपल्या मुलाला,

"भिकारी बाप मिळाल्याची मधूनच
डोळे गुरगुरतात मुलाचे घरभर
संगणकाचा माऊस कीबोर्ड वर
सनासन फिरतात सैरभैर बोट
तो करतो सारखा गाड्यांचे एक्सीडेंट"९

बाप करत राहतो संघर्ष मुलाला सकारात्मक विधायक मार्गावर आणण्याचा हे करत असताना बापालाच पडतो प्रश्न,

"बाप रिप्लेस करायचा क्रांतीकारक विचार
येत असेल का कधी मुलाच्या डोक्यात ?"१०

लहू कानडे यांच्या कवितेत आनंदी होऊन पहिल्यांदा मतदानाला निघालेला मुलगा मित्राच्या बोलल्याने हिरमुसतो, तेव्हा बाप त्याला प्रेमाने समजावतो; धीर देतो; नवे बळ देतो.
जागतिकीकरणाच्या व्यवस्थेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा ॲंटिव्हायरस लागू पडणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच दलित साहित्याचे मुख्य प्रेरणास्त्रोत असल्याने त्यांच्या विषयीची आदराची

भावना या कवितासंग्रहातून व्यक्त होते. त्यासाठी विविध प्रतिमाने या कवींनी वापरली आहेत. सदर काव्यसंग्रहातून आलेले ही प्रतिमाने नाविन्यपूर्ण आहेत. आधुनिक जीवनशैलीमुळे बदललेल्या भाषाशैलीचा प्रभाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वापरल्या जाणाऱ्या या प्रतिमामधून दिसून येतो. अरुण काळे, 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा' हे प्रतीक वापरतात. उत्तम अंभोरे, 'ओझोन लेयर' ही प्रतिमा वापरतात. अविनाश गायकवाड यांना बाबासाहेब 'तथागत' असे वाटतात. सुनिल अवचार, 'एक बोट दिशादर्शक' असे म्हणतात. लहू कानडे यांना बाबासाहेब 'रापीची धार' वाटतात.

या सहा काव्यसंग्रहातील समान सूत्रांचा शोध घेतल्यानंतर आपल्याला काही ठोस निष्कर्ष नोंदवता येतात.

१. जागतिकीकरणाच्या भयाचा ओघ या काव्यसंग्रहातून स्त्रवतांना दिसतो.
२. सदर कवी हे विद्रोही गटात समाविष्ट होतात.
३. आधुनिक जीवनशैलीच्या प्रतिमांचा वापर काव्यसंग्रहात वैपुल्याने झालेला दिसून येतो.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवरील अव्यभिचारी निष्ठा हाही विशेष नोंदवावासा वाटतो.
५. इंग्रजी शब्दांचा वापर अधिक्याने दिसतो.
६. सदर कवितेची भाषाशैली ही वर्तमानाशी संवादी दिसते.

या सहाही काव्यसंग्रहातील समान सूत्राचा शोध घेणे प्रस्तुत शोधनिबंधात अपेक्षित होते. त्यासाठी सदर कवी कोणत्या प्रतिमा वापरतात? त्या समानार्थी आहेत का? वर्तमानाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन कसा आहे? याची चर्चा करणे येथे क्रमप्राप्त होते. आणि त्याचबरोबर आजच्या वर्तमान परिप्रेक्ष्यात वर्तमानाकडे पाहण्याचा कवींचा दृष्टिकोन नेमका कसा आहे? दलित जीवनाचे नेमके चित्र यात कसे येते? याचा शोध घेताना हे सहाही कवी वर्तमानाकडे व्यापकपणे पाहताना दिसतात. दलित जीवनाचे आमुलाग्र चित्र त्यांनी मांडलेले आहे. दलित जीवनाची दुखरी नस पकडण्यात त्यांना यश आलेले आहे. आणि त्याचबरोबर त्यांनी मांडलेला विचार हा केवळ दलितांपुरताच मर्यादित राहत नाही तर तो सर्वव्यापक होताना दिसतो. त्यामुळे ही दलित कविता निश्चितच आश्वासक असली तरी वर्तमानाच्या संदर्भात ती अधिक समकालीन वाटते.

**संदर्भ ग्रंथ :**


१. *डहाके वसंत, नवसाहित्य आणि नवसहित्योत्तर साहित्य, संपादक व अभ्यासक्रम संयोजक - डॉ. शरणकुमार लिंबाळे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन २००१, पु.मु. २०१२, पृ. २.*
२. *गायकवाड अविनाश , साद घालतेय रोहिणी अजूनही अस्वस्थ रोहिणी , आशय प्रकाशन , ठाणे, पहिली आवृत्ती २००८, पृ. ६७.*
३. *काळे अरुण, वॉटर किंगडम-१, नंतर आलेले लोक, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती २००८, पृ. ६८.*
४. *कानडे लहू,पीआरए, तळ ढवळतांना, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती २०१२, पृ. २९.*
५. *काळे अरुण, अर्थयुदध, उनि, पृ. ९.*
६. *कानडे लहू, बाप्पा नव्यासहस्त्रका...! उनि, पृ.४.*
७. *लोकनाथ यशवंत, शेवटी भाजी- भाकरीचा सवाल, पुन्हा चाल करू या!, यंग इंडिया पब्लिकेशन, मुंबई, पहिली आवृत्ती २००९ पृ.९७.*
८. *तत्रैव, पृ. ९७.*
९. *गायकवाड अविनाश, रिपलेसमेंट, उनि, पृ.५८.*
१०. *तत्रैव, पृ. ५८.*

# फ.म. शहाजिंदे यांच्या साहित्यातील स्त्रीवादी दृष्टीकोन

**डॉ. बालाजी व्ही. डिगोळे**
मराठी विभागप्रमुख, शिवजागृती महविद्यालय नळेगाव, ता. चाकुर जि. लातुर
मो. ८६९८५५४४०३, email –bdigole007@gmail.com

समाजाचे लिंगभेदावर आधारित स्त्री व पुरुष हे दोन भेद आहेत॰ स्त्री पुरुष यांच्यामध्ये लिंग भेद असला तरी दोघेही मानवच आहेत. हा दोहोतील फरक निसर्गनिर्मित आहे. प्रत्येक स्त्री ची गुणामुळे, अनुभवामुळे भिन्न आहे पण या भिन्नतेतही या पुरुष प्रधान संस्कृतीत वावरणाऱ्या स्त्रियांमध्ये साम्य आहे. जीवनातील काही अनुभव हे फक्त स्त्रीचे स्त्री म्हणून तर पुरुषाचे पुरुष म्हणून असतात॰ काही नैसर्गिक तर काही मानवी अनुभव असतात. अशा प्रश्नांचा शोधही स्त्री-पुरुष भेदांच्या निमित्ताने सामाजिक स्तरावरून स्त्रीवादी दृष्टिकोनातून शहाजिंदे आपल्या साहित्यातून मांडतात. इस्लामी धर्मशास्त्राचा अर्थ लावणाऱ्या हनीफी, शाफि, मालिकी आणि हंबली या चार विचारधारा आहेत असे त्यांनी म्हंटले आहे. कुराण मधील स्त्रीविषयक आयतांचा वेगवेगळा अर्थ लावला जातो. त्यांचा रब (पालन कर्ता अल्लाह) मी कुणाचेही कर्म व्यर्थ जाउ देणार नाही, मग तुम्ही पुरुष असा की स्त्री माझ्या नजरेत सगळे एक आहात, सहजात आहात. स्त्री पुरुषाबद्दल पवित्र कुराणाचा पर्यायाने अल्लाहचा हा संदेश असूनही मुस्लिम स्त्रीला फार मानाचे स्थान आहे असे म्हणणे धाडसचे ठरेल. एकीकडे पवित्र कुराणाचा दिव्य संदेश अत्यंत उदात्त पण प्रत्यक्षात मुस्लिम स्त्रीचे जीवन वेगळेच ही तफावत का? असा प्रश्न आजही मनाला भेडसावणारा वाटतो. ईस्लाम दोन प्रकारे चालतो एक मौलवीचा धर्मादेश दुसरा पवित्र कुराणाचा संदेश व त्याचे सिद्धांत या दोन्हीत आकाश-पाताळाचे अंतर आहे. मुल्ला मौलवींच्या धर्मात मुस्लीम स्त्रीला कुठेच अधिकार नाहीत. मुस्लिम स्त्रीला अशिक्षित ठेवून कफनरुपी पडद्यात स्त्रीला कायमची बंद ठेवण्यात येते. याउलट पवित्र कुरान च्या सिद्धांतानुसार मुस्लिम स्त्री ही गरिमा मंडित व गौरवान्वित होण्याची अधिकारी आहे. पुरुषापेक्षा काकणभर उणी नाही कारण तिच्या पायाखाली बहिशस्त स्वर्ग आहे. (संपादक डॉ. नागोराव कुंभार, मुस्लिम साहित्य व समाज चिंतन डॉ. तसनिम पटेल पृ. 87) असे असले तरी पुरुषी वर्चस्व असलेली मुस्लिम समाजव्यवस्था ही सतत पुरुषांच्या वर्चस्वाचेच गोडवे गातात. पुरुष हे स्त्रियापेक्षा श्रेष्ठ आहेत. अशा पुरूषांना महंमद पैगंबरांनी चार बायका करण्याची परवानगी दिली असली तरी एकापेक्षा अधिक बायकांशी पुरुषाला नि:पक्षपातीपणे वागणे कठीण आहे. आपल्या सोयीचा तेवढा निम्मा भाग पुरुष वर्ग उचलतो. दूसरा निम्मा भाग विसरून जातो. त्यामुळे जनानखाणे भरले गेले. त्यामुळे पुरुषप्रधान व्यवस्थेने जाणीवपूर्वक असे रूढ केले की एक पत्नी असेल तर तुमच्याशी भांडते, दोन असल्यास तुम्ही भांडणात गोवले जाता, तिसरी असेल तर जिच्यावर तुमचे मनापासून प्रेम आहे तिच्याविरुद्ध उरलेल्या दोघी फितुरी करतात. चौथी असल्यास त्या आपापसात गुण्यागोविंदाने नांदतात. त्यामुळे पतीला शांति लाभते. इतकेच नव्हे तर पुरुषी वर्चस्व असे सांगते की या चार बायका चार प्रकारच्या असाव्यात. पुरुषाने संभाषणासाठी इराणी, घरकामासाठी, खुरमानी, मुलांच्या संगोपणासाठी हिंदू

आणी या तिघिवर जरब ठेवण्यासाठी स्त्री करावी. या सर्व जुन्या परंपरेमुळे आजही मुसलमान स्त्रियांना असे वाटते की, सवत आणणे हा नवऱ्याला अधिकारच आहे. (फ. म. शहाजिंदे, अनुभव, पृ. 68) हे सर्व भोगविलासि राज्यकर्त्यांनी, संस्थानिक नवाबानी रूढ करून स्त्रीला कायमचे गुलाम करून टाकले आहे. असले चोचले आजही आर्थिकदृष्ट्या मागासलेला मुसलमान घटस्फोट देऊन करू धजतो. परंपरागत इस्लामच्या रूढीमध्ये अडकलेली स्त्री व परंपरांचे पालन करण्यात पुरुषांकडून स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाला फ. म. शहाजिंदे वाचा फोडतात. या पारंपारीकतेमुळे स्त्रियांची बंदिस्त झालेली अवस्था प्रकाशात आणतात. हनीफी, शाफि, मालीकी, आणि हंबली ही व्यक्तींनामे आहेत. हे चौघे पैगंबर साहेबांचे अनुयायी असून एकामागे एक असे नेतृत्व करणाऱ्यापैकी होते. त्यांच्या स्वतंत्र अशा विचारधारा नव्हत्या. हे शाहजिंदे यांच्या स्वताचे मत अनुभव या ललित लेखातून मांडले आहे. कुराणात असा उल्लेख येत नाही.

प्राचीन काळापासून स्त्रीदास्याची शृंखला पहावयास मिळते. स्त्रियांचा इतिहास शोषणाचाच आहे. दरोडेखोरांची लुटालूट, लुटीतून तयार झालेली राजसत्ता, महसूल, गुलामगिरी, वेठबिगारी, धर्म, जातीव्यवस्था, सावकारी, जमीनदारी, वसाहतवाद, रंगभेद इत्यादी अवस्थेतून जाताना स्त्रियांच्या मार्गात स्त्री दास्याच्या बेड्या पडल्या आहेत. इतिहास व पुराणातूनसुद्धा स्त्रियांना पुरुषांपेक्षा वेगळे ठेवून स्त्री म्हणजे एक न उलगडणारे कोडेच आहे. असे गूढतेचे वलय तिच्याभोवती पुरुषप्रधान व्यवस्थेने निर्माण केलेले आहे. एकाचवेळी अनेक रूपातून तिची मांडणी केली आहे कधी अबला तर कधी शक्ती, कधी कामुक, कधी शक्ति, कधी भोगदासी, कधी शरणागत तर कधी अंकुशधारिणी, कधी लक्ष्मी, माता तर कधी कुलटीन, पांढऱ्या पायाची, काळ्या तोंडाची, फुटक्या नशिबाची, पिढ्यावाणी पायाची, नकोशी तर कधी दुधावरची साय, अनंत काळाची माता, दुर्गेचा अवतार, रणरागिनी, प्रेमाचे, सौंदर्याचे प्रतीक इत्यादी भूमिकेतून स्त्रीचे वर्णन साहित्यातून करण्यात आले आहे. स्त्रिया भोवती परंपरा रूढी प्रथिने निर्माण झालेले या गूढतेचे कारण म्हनजे स्त्रीचे आर्थिक व सामाजिक परावलंबित्व आहे. कारण जे जे काही आहे ते पुरुषांचे आहे आणि ते सर्वोत्कृष्ट आहे व जे काही स्त्रीचे आहे ते दुय्यम आहे. अशी पुरुष प्रधान समाज व्यवस्थेची मानसिकता बनलेली आहे. स्त्रियांची सामाजिक स्थिती ही निसर्गदत्त नाही. ऐतिहासिक भौतिक परिस्थितीतील परिवर्तनामुळे श्रम व मालमत्तेच्या बदललेल्या स्वरूपाचा परिपाक म्हणजे कुटुंबसंस्था होय. कुटुंबसंस्था, विवाहसंस्था या नैसर्गिक नसून भौतिक विकासाच्या टप्प्यावर उदयास आलेल्या ऐतिहासिक संस्था आहेत असे मार्क्सवादाचे म्हणणे आहे. यासंदर्भात फ. म. शहाजिंदे स्त्री मनाची उकल करून दाखवितात, स्त्रीच्या जीवनात सर्वात महान सत्य काय असेल तर भाकर आहे ती पतीने लादलेली बाळंतपण मनातून नाकरू लागली आहे. कुटुंबनियोजन करून घ्यावेसे वाटते. पण पुरुषी अहंकार परंपरावादी प्रभाव तिच्या इच्छेआड येत आहे. मग ही स्त्री परंपरेच्या तोंडून बोलते, "अल्लाह की देन है, पैदा करे वैसा वायदाबी करे, हम कितने के खीलाने वाले? अल्ला खिलाता है" तर मार्क्सवादी स्त्री वादाने घर काम हे अनुत्पादक श्रमात मोडत नसून ते उत्पादक श्रमातच गणले पाहिजे असे म्हटले आहे. मारिया रोजा डोला कोसा या मार्क्सवादी स्त्रीवादी लेखिकेने घरकामाचा भांडवलनिर्मितीशी असलेला संबंध दाखवून दिला आहे. त्यांच्यामध्ये एका बाजूला स्त्रिया घरात राहून श्रमिक दलाचे पुनरुत्पादन करतात. श्रमिकांचा सतत पुरवठा ही भांडवलशाहीची निकड

असते. परंतु स्त्रिया कुटुंबात राहून भांडवलशाहीची एकमेव गरज भागवितात असे म्हणणे चुकीचे ठरेल. उलट यापुढे जाऊन आपल्या घरातील श्रमात त्या अतिरिक्त मूल्याची निर्मिती करतात म्हणून त्यांचे घर काम हे उत्पादक समाजातच गणले. गेले पाहिजे एक तर कामापासून पुरुष श्रमिकास आर्थिक मोकळीक देते व घराबाहेरील प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी ती पुरुष सहकारी श्रमिक जास्तीत जास्त अवसर उपलब्ध करून देते स्त्रीविषयक एकंदर कार्यकर्तृत्वाची उदात्त स्वरूपाची विचारसरणी या स्त्रीवादी लेखिकेने व्यक्त केली आहे. परंतु महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव असलेले शहाजिंदे स्त्रीच्या व त्याचे समर्थन करत नाहीत. त्यांनी त्यांच्या मी तू या पत्रात्मक कादंबरीतील रेणू या प्राध्यापक स्त्रीचे कौतुक मात्र त्यांनी केलेले आहे. अडाणी अशिक्षित असणाऱ्या स्त्रीकडे आकृष्ट होणारे मन शेवटी स्त्री उद्धाराच्या कल्याणाच्या आव्हानाला कुठेही सामोरे जात नाही. पत्नीच्या स्वभावाला प्रेमाने एक स्त्री म्हणून बदलून टाकण्याचा प्रयत्न करत नाहीत. एका प्राध्यापक प्रेयसीसोबत तिची तुलना करताना म्हणतात, “तिने माझ्या आयुष्यातील विनोदी भागच खाऊन टाकला.” यातून असे लक्षात येते की लेखकही पुरुष असल्याने आपला पुरुषीपणा दाखविताना दिसतात परंतु सत्य अनुभव त्यांनी मांडले आहेत. वास्तवता दडवलेली नाही शहाजिंदे उत्पादकतेच्या व पर्यायाने महत्त्वाचा घटक म्हणून पहात नाहीत त्यांचा स्त्रीवाद हा व्यापक वाटत नाही समाजवादी दृष्टिकोनातून विचार केल्यास समाजवादी स्त्री वादाने स्त्री मुक्तीचा लढा हा लिंग आणि वर्ग या दोन्ही पातळ्यांवर लढताना पुरुष सत्ता विरोध म्हणजे विरोध नसून पुरुषसत्ताक व्यवस्थेचा इतिहासच आहे असे सांगतात फ. म. शहाजिंदे मात्र स्त्रीच्या स्त्रीत्वाचा विशेष असा उदोउदो न करता तिच्या बौद्धिक क्षमतेला जास्त महत्त्व देतात. घरातील जबाबदाऱ्या प्रजोत्पादन घर कामाच्या निमित्ताने होणारी भांडवल निर्मिती यातून होणारी स्त्री मनाची घुसमट यातील कुठल्याही घटकाला त्यांनी महत्त्व दिलेले नाही तसे पाहता परिपूर्ण स्त्रीत्वाचे दर्शन घडविणारी स्त्री कुठेही रेखाटलेली नाही. त्यांची लेखणी रेणूची बौद्धिकता व सौंदर्याभोवती रुंजी घालत असलेले दिसते स्त्रीही कामवासणा परिपूर्ती वासना तृप्त करणारी असावी यालाच त्यांनी जास्त महत्त्व दिलेले आहे 30 जुलै 1978 च्या पत्रात आणिक रेणूला म्हणतो हे प्रश्न जीवघेणे आडवी जिथे शहाणे हाती धनुष्य ज्याच्या त्याला कसे कळावे? हृदयात बाण ज्याच्या त्यालाच दुःख ठावे, तिरपा कटाक्ष भोळा आम्ही इथे दिवाणे तुझं अशारिरी प्रेम कळतय मला पण उमगत नाही..... मी तुझी वाट पाहतोय, तू तिथं बसून प्रेम कर मी इथं बसून प्रेम करतो म्हणत राहू मनातल्या मनात की आमचं दोघांचं एकमेकांवर प्रेम आहे. शहाजिंदे मीतु या कादंबरीतून विवाहबाह्य संबंधाचे जणू समर्थनच करताना दिसतात. त्यांच्या लिखाणातून येणारी स्त्री परंपरागत चालत येणाऱ्या स्त्री पुरुष संबंधाच्या पावित्र्यपेक्षा पुरुषप्रधान संस्कृतीची बळी म्हणून डोळ्यापुढे येते ही स्त्री मग आई, पत्नी, प्रेयसी च्या रुपाने आपल्यामोर येते. निधर्मी काव्यसंग्रहातून आई तर मीतू कादंबरीतून पत्नी व प्रेयसी शेतकरी या दीर्घकाव्यातून कष्टकरी स्त्री आढळून येते. आईच्या रेखाटनातून स्त्रीत्वाच्या मोठेपणाला मानाचा मुजरा केला आहे. ही आई अगतिक आहे या अगतिकतेने मागे अनेक कारणे आहेत. वाट्याला आलेली विदारक परिस्थिती हे सर्वात महत्त्वाचे कारण ठरते. गणिका कुळातील आई अक्करमाशी अशा दुहेरी अगतिकतेचा वेदनेत आई ही सतत होरपळत राहते. नवस-सायासाने झालेले पोर म्हणून पोराला जीवापाड जपताना परंपरेच्या अधीन झालेली आई

मातृत्वाच्या निमित्ताने येणाऱ्या जिव्हाळ्याने ओतप्रोत भरून गेलेली आहे. फ. म. शहाजिंदे यांच्या आई विषयक कवितेतील ग्रासलेले मन सतत उद्विग्नतेचे झंकारच व्यक्त करताना दिसते. त्यामुळे जगण्याला एक आक्रोशाचे, वेदनेचे नकाराचे तिरस्कृततेचे वलय सतत जाणवते. आई गणिका असली तरी आपली जन्मदात्री आहे. म्हणून आपल्या जीवनात तिचे स्थान अतुलनीय आहे.

फ. म. शाहजिंदे यांनी पत्नीचे चित्रण तक्रारवाजा केले आहे. पत्नीच्या स्वाभावरेखाटणातून सर्वसामान्य स्त्रीचे दर्शन घडते. ही पत्नी सर्वसामान्य स्त्रीयासारखी हट्टी आहे. आपले लग्न तडजोडीतून झालेले आहे. याची जान असूनदेखील त्याचा आनंद सहजपणाने स्वीकारत नाही. ती पत्नी म्हणून कुठल्याच न पटणाऱ्या गोष्टीत तडजोड करीत नाही. आपल्या स्वभावातील हेकटपणा सोडत नाही. पती म्हणून आपले म्हणणे पत्नीने ऐकावे ही अपेक्षा पूर्ण करत नाही. पतीशी नेहमी फुगून, हेकेखोरपणा ने वागणारी स्त्री शहाजिंदे रेखाटतात. "उगीच धुमसत राहून हसायला भाग पाडणारी वस्तू म्हणजे माझी ही होय." ही पत्नी खऱ्या अर्थाने व्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेणारी आढळते. पटत नसणाऱ्या गोष्टी करत नाही परंपरागत पद्धतीने पुरुषाच्या होकारात होकार मिसळत नाही स्वतःचा हट्टीपणा जपून स्वतःचे व्यक्तिमत्व जपत जपत स्वतःच्या प्रवृत्तीने जगण्याचे धाडस दाखविणारी ही स्त्री नीतीवादीपणाचा डोलारा मिरविणाऱ्या रेणू पेक्षा बरीच सच्ची व अस्सल वाटते खरे तर ही पत्नी म्हणून येणारी स्त्री स्वतःची स्त्रीवादी भूमिका पार पाडताना दिसून येते.

अशाप्रकारे मुस्लीम स्त्रीची निरक्षरता, परंपरागत बुरखा पद्धती, तलाकपद्धती या प्रथेमुळे या स्त्रिया आजही पुरुषी अहंकारी वर्चस्वाखाली दडपलेल्या आहेत. ग्रामीण भागातील स्त्रियांचा अडाणीपणा, अंधश्रद्धाळूपणा, वाट्याला आलेले दारिद्र्य या सर्वांचा वेध शहाजिंदे घेतात. त्यातून स्त्री च्या जीवनाची दैन्यावस्था पुरुष दोन दोन बायका करण्याची वृत्ती, व्यसनाधीनता, स्त्रीची इच्छा नसताना वाढविली जाणारी अपत्य संख्या, मुलगा हवा हा अट्टाहास इत्यादीमुळे ग्रामीण भागातील स्त्री धड पुरोगामी व प्रतिगामी ही झालेली नाही याची खंत शहाजिंदे यांना वाटते. मुस्लिम स्त्रियांनी शिक्षण देऊन विचार करण्याची क्षमता वाढविले तर त्यांची या सर्व समस्या यातून सुटका शंभर टक्के जरी झाली नाही तरी काही प्रमाणात नक्कीच या समस्येतून तिची मुक्तता होऊ शकेल असा आशावाद व्यक्त करतात. स्त्रीवादी दृष्टिकोनातून स्त्री चित्रणाचा आस्वाद घेतल्यास असे लक्षात येते की आईचे चित्रण परंपरावादी रेणू जातीवादाची पुतळा वाटते हा नितीवाद बऱ्याचदा स्त्रीवादाच्या जवळ गेलेला दिसतो कारण ही स्त्री आपली मानसिकता नीतीवादाच्या निमित्ताने का होईना स्पष्टपणे मांडताना दिसते. विवाहित असलेली ही रेणू हनीफ ला उपदेशाचे डोस पाजताना दिसून येते परंतु हा तिचा नितीवाद उपरा वाटतो कारण सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत ती जीवन जगते स्वतःच्या मनाचा कोंडमारा सहन करत आलेल्या परिस्थीतीत सामोरे जाऊन धैर्याने टक्कर देते. येथे आईप्रमाणेच परंपरागत पत्नीदेखील परंपरांच्या ओझ्याखाली दबलेली शहाजिंदे रेखाटतात. आईच्या वयाचा विचार केला तर परंपरावादी पण परिस्थितीच्या कवेत टक्कल बसलेले आहे. एकूणच परिस्थितीजन्य परवशतेच्या निर्देशक म्हणून या स्त्री चित्रणाचा आवाका आहे. स्त्रीचे विशेष उदात्तीकरण

वगैरे शहाजिंदे करीत नाहीत तर परंपरागत मनाचा होणारा कोंडमारा दूर न करता स्त्रीच्या स्वभावाचे कोडी सोडविण्याचा प्रयत्न करत नाहीत.

**निष्कर्ष**

1. परंपरागत इस्लामच्या रूढी, प्रथा, परांपरमध्ये अडकलेली स्त्री आणि परंपराचे पालन करण्याचे बंधने लादले जातात. पुरुषप्रधान व्यवस्थेकडून स्त्रीयावर होणाऱ्या अन्यायाला शाहजिंदे वाचा फोडतात. ही स्त्री बदलण्याचा प्रयत्न करते. पण पुरुष अहंकार, परंपरावादी वर्चस्व तिच्या इच्छेकडे येते.
2. महात्मा फुले यांच्या उदात्त विचारांनी प्रभावित असणारे फ. म. शाहजिंदे स्त्रीच्या उदात्ततेचे विशेष असे समर्थन करत नाहीत.
3. स्त्रीच्या स्त्रीत्वाचा उदोउदो न करता बौद्धिक क्षमतेला अधिक महत्व देऊन स्त्री म्हणून प्रपंच या जबाबदाऱ्या पेलावताना स्त्री मनाची घुसमट सोडवित नाहीत आई परंपरावाद मांडताना स्वतः लेखक मात्र जुनाट रूढी प्रथा परंपरा आहारी जात नाहीत स्त्रीवादी दृष्टिकोनातून स्त्रीच्या कर्तृत्वाला महत्त्व देतात
4. आई गणीका असली तरी आपली जन्मदात्री आहे म्हणून आपल्या जीवनात आईचे स्थान मौलिक आहे जे उदात्त मूल्य शहाजिंदे स्वीकारतात
5. जीवन जगताना सौंदर्यवादी दृष्टीने सौंदर्याचा आस्वाद घेतला पाहिजे असा दृष्टिकोन शहाजिंदे यांचे कविमन झोपा असते बौद्धिक क्षमतेला महत्त्व देताना पत्नीवर अन्याय शहाजिंदे करतात

**संदर्भ ग्रंथ**

1. *फ. म. शहाजिंदे अनुभव*
2. *फ. म. शहाजिंदे इत्यर्थ दिलीपराज प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती 1986*
3. *फ. म. शहाजिंदे निधर्मी आंतर भारती प्रकाशन औराद शहाजानी प्रथमावृत्ती 1979*
4. *फ. म. शहाजिंदे मितू भूमी प्रकाशन लातूर जितिया वृत्ती 2003*
5. *फ. म. शहाजिंदे शेतकरी आंतरभारती प्रकाशन औराद शहाजनी प्रथमावृत्ती*

# समकालीन लेखिकांच्या कादंबऱ्यातील स्त्रीवाद

**प्रा. उज्वला नामदेवराव जानवे**
*शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, गडचांदूर*
*ujwalakayarkar79@gmail.com* ९७३०६११९५२

***सारांश***

*समकालीन नव्वदोत्तरी कालखंडात लेखन करणाऱ्या सर्वच लेखिकांच्या कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी 'स्त्री' असल्याचे दिसते. शिक्षणाने आत्मभान जागृत झालेल्या स्त्रीचा जीवनसंघर्ष, पारंपरिक आणि आधुनिक जीवनपध्दतीतून निर्माण होणारे पेच त्यांच्या कादंबऱ्यांच्या मुळाशी आहे. पारंपरिक स्त्रीप्रतिमांचा विध्वंस करीत 'बाई' पणा नाकारत स्त्रीच्या 'माणूस' पणासाठीचा हा लढा आहे. स्त्रियांचे अनेक प्रश्न, जाणिवा, त्यांची अभिव्यक्ती,तिचे समाजातील दुय्यम स्थान, विवाहित स्त्रीच्या व्यथा, करियरला प्राधान्य देणाऱ्या स्त्रीच्या समस्या, आधुनिकतेतून येणारा चंगळवाद व त्यातून बदललेले स्त्रीजीवन, पुरूषसत्ताक व्यवस्था व पुरूषी मानसिकतेचे सडेतोड दर्शन या नव्वदोत्तरी स्त्रीवादी कादंबरीतून होते. लिंगभावाधिष्ठित विषमता मांडत, स्त्रीपुरूष निखळ मैत्रभाव जपत, आपल्या लैंगिक अनुभवाची संयमित अभिव्यक्ती या काळातील लेखिका करतांना दिसतात. व्यवस्थेच्या विरोधात जाण्याची ताकद निर्माण झाल्याने नायिका प्रेम, लग्न, संसार, कुटुंब, मातृत्व, सगेसोयरे, कर्तव्यभावना या मायावी पसाऱ्याला निर्धारपूर्वक बाजूला सारून व्यक्तिवाद व स्वातंत्र्य ही मूल्ये प्रमाण मानतांना दिसतात.*

***बिजशब्द :—*** *स्त्रीवाद, आत्मभान, व्यक्तिवाद, स्त्रीप्रतिमा, स्त्रीपुरूषसमानता, पुरूषप्रधानता, मैत्रभाव, लिंगभावाधिष्ठित विषमता.*

## ❖ प्रस्तावना :—

साठोत्तरी कालखंडात ग्रामीण, आदिवासी, दलित, स्त्रीवादी असे अनेक नवे साहित्यप्रवाह मराठी नभांगणात उदयाला आले. त्यातलाच आपल्या वेगळेपणाने उठून दिसणारा प्रकार म्हणजे 'स्त्रीवादी' साहित्य होय. १९६० मध्ये अमेरिकेत स्त्रीवादाचा प्रचार प्रसार झाल्यानंतर आपल्याकडे १९७५ च्या आसपास ही स्त्रीवादी संकल्पना रूढ व्हायला लागली. ज्या काळात स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती यासारख्या शब्दांचा उच्चारवही नव्हता त्या काळात ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले यांनी भारतीय स्त्रीवादाची पायाभरणी केली. 'स्त्री' ला केंद्रस्थानी ठेवून स्त्रीच्या अस्मितेच्या शोधाला प्राधान्य देणारी, स्त्रीला 'स्त्री' म्हणून नव्हे तर एक 'व्यक्ती' म्हणून जगण्याचा अधिकार देणारी ही महत्त्वाची विचारधारा आहे. म्हणूनच सिमॉन द बोव्हा म्हणतात, कोणी बाई म्हणून जन्माला येत नाही पण नंतर ती बाई बनवली जाते. या बाईपणालाच स्त्रीवाद्यांचा विरोध आहे.

''स्त्रीवाद स्त्रियांना स्वत:बद्दल बोलायला शिकवितो. स्त्रीवाद हा स्त्रियांना असे का ? असे प्रश्न विचारायला शिकवितो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्त्रीवाद स्त्रियांना अन्यायाची जाणीव करून देतो आणि त्याविरूध्द असेल तसा संघर्ष करायला प्रेरणा देतो.'' अशी

स्त्रीवादाची व्याख्या डॉ. सीमा साखरे करतात. पुरूषांना विरोध नाही तर पुरूषी वर्चस्वाविरूध्द स्त्रियांचा लढा आहे. ''स्त्रीवाद म्हणजे पुरूषांपासून फारकत घेऊन स्वत:चा सवतासुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली, त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे.'' अशी स्त्रीवादी साहित्याची वैशिष्टये अश्विनी धोंगडे अचूक टिपतात. समाजसुधारकांचे प्रयत्न, शिक्षणाची संधी व संविधानाने दिलेले अधिकार यामुळे स्त्री विकासाची वाट मोकळी झाली. पुढे १९७५ ते १९८५ या आंतरराष्ट्रीय महिला दशकाने महिलांविषयीचे हक्क, अधिकार याविषयी जनजागृती केली. त्यामुळे स्त्रीवादी साहित्य खऱ्या अर्थाने या दशकानंतर सक्षम होत गेले. १९९० मध्ये भारतात खुले आर्थिक धोरण लागू होत जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. या नव्या संस्कृतीच्या आगमनाने येथील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक मूल्यांमध्ये बदल झाला. माणूस म्हणून स्वत:ची ओळख सिध्द करण्यास पोषक वातावरण निर्माण झाले. स्त्रीवरील चंगळवादाचा प्रभाव, राहणीमान व पेहरावातील आधुनिकता, शिक्षण—रोजगाराच्या संधीने बाहय जगाशी संबंध, प्रागल्भ राजकीय विचारधारा या सर्वांचे पडसाद नव्वदोत्तरी कादंबरीत उमटायला लागले. पुरूषांनी लिहिलेल्या बऱ्याच कादंबऱ्यांतील स्त्री ही पुरूषप्रधान समाजातील पुरूषी अहंकारी मूल्यदृष्टीतून रेखाटलेली होती. अशा वर्तनाच्या आदर्शवत अपेक्षांना, बेगडी स्त्रीप्रतिमांना लाथाडत विभावरी शिरूरकरांपासून ते आजच्या अरूणा सबाने पर्यंतच्या लेखिकांनी स्त्रियांच जगणं, भोगणं अगदी वास्तवपणे आपल्या कादंबऱ्यांतून मांडण्याचा प्रयत्न केला. अशाच नव्वदोत्तरी कालखंडामध्ये मराठी कादंबरीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या स्त्रीवादी लेखिकांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

*** नव्वदोत्तरी कालखंडातील कादंबऱ्यांमधील स्त्रीवाद**

*** शांता गोखले**

भारतीय स्त्रीजीवनाचा निराळा आलेख, निराळे संवेदन मांडणारी 'रीटा वेलिणकर' (१९९०) ही शांता गोखले यांची वैशिष्टयपूर्ण कादंबरी. सुशिक्षित होऊन आर्थिक स्वावलंबन करणाऱ्या एका अविवाहित स्त्रीच्या जगण्याची धडपड, पारंपरिक समाजाच्या चौकटीत राहून 'स्व' ची जाणीव झालेल्या नव्या आत्मभान जागृत स्त्रीची सहवेदना, कुटुंब, समाज आणि नोकरीच्या ठिकाणी स्त्रीचे होणारे शोषण, स्त्रीपुरूषसंबंधातील ताणतणाव ही कादंबरी अचूक मांडते. रीटा—साळवीच्या रूपाने स्त्री—पुरूष लैंगिक संबंधाची संयमित अभिव्यक्ती निर्लेपणाने करते. स्त्रीने आपल्या हिंमतीवर पुरूषाविनाच केलेले फक्त एकटया स्त्रीचे घर ही नविन संकल्पना या कादंबरीतून पुढे येते.

बदलती जीवनमूल्ये व त्यातून वाढलेल्या विद्वेषी स्पर्धेचे चित्रण पत्रकार 'जानकी' च्या रूपाने 'त्यावर्षी' (२००८) या कादंबरीत येते.

*** अंबिका सरकार**

अंबिका सरकार यांच्या 'एका श्वासाचे अंतर' (१९९०) व 'अंत ना आरंभही' (२००८) या कादंबरीच्या नायिका कावेरी आणि उषा या घटस्फोट व पुनर्विवाह या प्रक्रियेतून गेलेल्या आहेत. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, निर्णय स्वातंत्र्य यामुळे स्त्रीजीवन व समाजात परिवर्तन होत असले तरी पुरूषप्रधानता मात्र आपल्या चिवट अवशेषांसह अजूनही शिल्लक असल्याचे लेखिकेला जाणवते. म्हणूनच एक 'माणूस' म्हणून स्वत:ची ओळख स्वत:ला व समाजाला खऱ्या अर्थाने पटावी म्हणून धडपडणाऱ्या, आपण जग बदलवू शकत नाही पण स्वत:ला बदलू शकतो आणि तसा बदलाचा प्रयत्न केला पाहिजे अशा नव्या विधायक विचारातून चकाकणाऱ्या, संघर्षास सिध्द नायिका अंबिका सरकार आपल्यापुढे उभ्या करतात.

*** रोहिणी कुळकर्णी**

'कृतार्थ' (१९९१), 'सातवं दालन' (१९९४), 'स्वातीचा उ:शाप' (२००२), 'तिन्ही सांज' (२००२), 'पिंपळफेरे' (२००६) व 'गर्भनाळ' (२००६) या रोहिणी कुळकर्णी यांच्या कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी विविध वर्गातील, विविध सामाजिक स्तरावरील स्त्रीपात्रे आहेत. त्यांच्या बऱ्याच नायिका घर आणि अर्थार्जन या दोन्ही जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळतांना दिसतात. कालबाहय न ठरलेल्या पारंपरिक जीवनमूल्यांकडे पाहण्याची एक नवी उन्नत दृष्टी देत, लेखिका विवाहित मुलीच्या कुटुंबात तिची आई तिच्या कुटुंबाचा अविभाज्य भाग कल्पितात. पतीपत्नी संबंध, आईमुले संबंध याकडे मर्मग्राहीदृष्टीने बघत वैशिष्टयपूर्ण कुटुंब रचनाबंध मांडतात.

*** निर्मला देशपांडे**

'टिकलीएवढं तळं' ही यांची विशेष गाजलेली कादंबरी. 'कथा एका बकुळीची' (१९९२) या कादंबरीतून आजच्या कर्तृत्ववान स्त्रीचे चित्रण येते. बायकोला गृहित धरणे, बायकोच्या कर्तृत्वाबद्दल आत्मीयता नसणे असा अकर्तृत्ववान नवरा वाटयाला आल्यानंतर नायिका बकुळ परिस्थितीवर मात करीत, नवऱ्याला आयुष्यातून वजा करीत, समंजसपणे आपल्या आयुष्याचे निर्णय घेते. नोकरी, अर्थार्जन, एकटीने स्वतंत्र राहणे, स्त्रीपुरूष मैत्रीला निरोगीपणे सामोरे जाणे असा बकुळचा होणारा प्रवास स्त्रीमुक्तीच्या दिशेनेच जाणारा आहे.

'सलत सूर सनईचा' (१९९६) ही माँ या जुन्या काळातील स्त्रीची समर्थ व्यक्तिरेखा उभी करणारी कादंबरी आहे'.

*** गौरी देशपांडे**

नव्वदोत्तरी कालखंडात आपल्या प्रखर व्यक्तिवादी विचाराने व स्त्रीवादी लेखनाने उठून दिसणारी कादंबरीकार म्हणजे गौरी देशपांडे ' मुक्काम' (१९९२), 'गोफ' (१९९९) व 'उत्खनन' (२००२) या कादंबऱ्यातून स्वतंत्र, प्रगल्भ व मुक्त स्त्रीची अनेक रूपे येतात. व्यक्तिस्वातंत्र्य व स्वभानजागृती हा त्यांच्या लेखनाचा गाभा आहे. त्यांच्या कादंबरीतून स्त्री विशेषत: उच्चवर्गीय स्त्री समोर येते. ज्यांच्या पोटापाण्याची भ्रांत संपली आहे अशा उच्चभ्रू समाजातील स्त्रियांचेही काही प्रश्न असतात हे गौरी कादंबरीतून मांडते. प्रचलित संकेतनिष्ठ समाजव्यवस्था ठोकरून स्त्रीवरील अन्यायाला कारणीभूत ठरणाऱ्या बंधाना झुगारण्याची ताकद त्यांच्या नायिकात आहे. गौरीच्या नायिका परपुरूषाच्या शोधात दिसतात. कारण आपल्या मानसिक व लैंगिक समाधानासाठी अनेक पुरूषांशी संबंध स्थापूनही त्या सतत असमाधानी राहतात. मित्रमैत्रिण या नात्याची कितीतरी परिपक्व रूपे कादंबरीत येतात. योनीशुचिता या मूल्यांचे माजलेले अवडंबर, शरीरसंबंधाबाबत वाटणारा संकोच, त्यातून स्त्रीच्या संपूर्ण व्यक्तिमत्वालाच येणारे आक्रसलेपण, विवाह—मातृत्व—कुटुंब यांच्याविषयीच्या गोंडस, तकलादू कल्पनांना त्यांच्या कादंबरीत थारा नाही. म्हणूनच आईला मुलांची कटकट वाटणे, रक्ताच्या नात्यापेक्षा मित्रमंडळींनी बनलेले पर्यायी कुटुंब, विवाह न करता आवडत्या पुरूषासोबत सहजीवन, लैंगिक स्वातंत्र्य, नवरा समोर मृतावस्थेत पडला असतांनाही आईसक्रिम विरघळून गालिच्यावर ओघळत असेल असे नायिकेच्या मनात येणे यासारख्या जगावेगळया वाटणाऱ्या गोष्टी त्यांच्या कादंबरीत सहजपणे येतात.

*** आशा बगे**

समकालीन कादंबरी जगतात आपली वेगळी छाप उमटविणाऱ्या आशा बगे मानवी नात्याची गुंतागुंत समर्थपणे उलगडतात. स्त्रियांची जीवने व त्यातील आव्हाने हा त्यांच्या कादंबरीचा गाभा आहे. त्यांच्या 'त्रिदल (१९९४), 'सेतू' (२०००), 'भूमी' (२००४), ' भूमिका आणि उत्सव' (२०११) या कादंबऱ्यांतून स्त्रीच्या भावविश्वाचे अनेक पदर हळूवारपणे व्यक्त होतात.

स्त्रीवादीदृष्टीने बघता त्यांच्या नायिका समर्थ व्यक्तिमत्वाच्या व चाकोरीतले जीवन नको असणाऱ्या आहेत. त्यामुळेच काळाच्या ओघात एकत्र कुटुंबपध्दतीचा झालेला लोप, नोकरी, अर्थार्जनाने स्त्रियांना आलेला आत्मविश्वास, स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याची आकांक्षा त्यांच्या कादंबरीतून व्यक्त होते. व्यक्तिस्वातंत्र्याला अधिक महत्व देणाऱ्या, करियरच्या विळख्यात अडकलेल्या, उच्चशिक्षणाची भूक असणाऱ्या व त्यासाठी कुटुंबाला डावलून परदेशात जाणाऱ्या त्यांच्या नायिका आपले ठसठशीत वेगळेपण जपतात.

*** सानिया**

सानिया यांच्या 'स्थलांतर' (१९९४), 'आवर्तन' (१९९६) व 'अवकाश' (२००१) या कादंबऱ्यातून आत्मभान जागृत झालेल्या आधुनिक स्त्रियांची संवेदनशीलता व प्रस्थापित मूल्यांचा संघर्ष व्यक्त होतो. बुध्दिनिष्ठ व कणखर वृत्तीची समर्थ स्त्री त्यांच्या कादंबरीतून चित्रित होते. स्त्रीवादी विचारधारेच्या अनुषंगाने येणाऱ्या प्रेम, स्वातंत्र्य, विचारपूर्वक स्वीकारलेले मैत्रीपूर्ण सहजीवन, सहजीवन संपल्यानंतर येणारा एकटेपणा, असुरक्षितता आदी कल्पनांविषयीचे मूलभूत विचार सानियांच्या कादंबरीत येते. स्वावलंबी व स्वयंपूर्ण जगायचे असेल तर 'स्व' जपणुकीसाठी संघर्षाशिवाय पर्याय नाही हेच लेखिका सूचित करते.

*** तारा वनारसे**

नव्वदोत्तर कालखंडातील तारा वनारसे यांची 'श्यामिनी' (२०००) ही कादंबरी प्राचीन पुराणकथांचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून नवा अन्वयार्थ लावणारी अशी वैशिष्टयपूर्ण कलाकृती आहे. स्त्रीवादी तथ्यांवर रामाच्या वर्तनाला तोलले तर सीता आणि शुर्पणखा यांच्यावर झालेल्या अन्यायाव्दारा पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीवर सहजगत्या होणाऱ्या अत्याचाराकडे लेखिका रसिकांचे लक्ष वेधते.

*** कविता महाजन**

स्त्रीवादी जाणिवेचा संयमित आविष्कार म्हणजे कविता महाजन यांची 'ब्र' (२००५) कादंबरी. शीर्षकातूनच वेगळेपण जपणारी ही साहित्यकृती आदिवासी जीवनासोबतच पितृसत्ताक समाजव्यवस्थेत सत्तास्थानी काम करतांना स्त्रियांना येणाऱ्या सकारात्मक व नकारात्मक वास्तव अनुभवांना पुढे मांडते.

महानगरीय स्त्रियांचे बदलते आर्थिक जीवन, त्यांच्या जाणिवा, एड्ससारख्या रोगामुळे स्त्रियांच्या आयुष्यात निर्माण झालेले प्रश्न 'भिन्न' (२०१०) कादंबरीतून अनेक कंगोऱ्यासह चित्रित होते.

*** मेघना पेठे**

समकालीन कादंबरीकारांमध्ये जिचे नाव आवर्जून घेतले जाते अशा मेघना पेठे यांची 'नातिचरामि' (२००५) ही कादंबरी एक व्यक्ती, स्वतंत्र माणूस म्हणून जगू पाहणाऱ्या आधुनिक स्त्रीची गाथा आहे. घटस्फोटामुळे निर्माण झालेले प्रश्न, मानवासंबंधीची व्यामिश्रता त्यांच्या कादंबरीतून येते.

*** अरूणा सबाणे**

स्त्रीवादाचा जोरकस पुरस्कार करणाऱ्या, अरेरावी पुरूषी संस्कृतीचा कडाडून विरोध करणाऱ्या अरूणा' सबाणे यांच्या 'विमुक्ता' (२००६), 'मुन्नी' (२०१०) या कादंबऱ्यातून

नव्या जगातील नव्या स्त्रीची विधायक रूपे दिसतात. कुटुंबाच्या पडझडीचे, विघटनाचे, विदारक जीवनसंघर्षाचे दाहकत्व त्यांच्या कादंबऱ्यातून आकार घेते.

याशिवाय जाई निंबकर — 'साथ' (१९९०), शांता योगी— 'परकी' (१९९०), माधवी देसाई — 'हरवलेल्या वाटा' (१९९१), प्रिया तेंडूलकर — 'जन्मलेल्या प्रत्येकाला' (१९९१), अंजली सोमण — 'बंदिश' (१९९४), प्रतिमा इंगोले — 'बुढाई' (१९९९), शिल्पा कांबळे — 'निळया डोळयांची मुलगी' या कादंबऱ्यातूनही कमी अधिक प्रमाणात स्त्रीवादी जाणिवा व्यक्त होतात.

## * समारोप

शांता गोखले पासून अरूणा सबानेपर्यंतच्या लेखिकांच्या कादंबऱ्यांचा स्त्रीवादीदृष्टीने विचार करता, या कादंबरीकारांनी स्त्रियांच्या प्रश्नांची, व्यापक अनुभवविश्वाची व त्यांच्या बदलत्या जीवनाची वैविध्यपूर्ण मांडणी केलेली दिसते. पुरूषांनी निर्माण केलेल्या सांकेतिक स्त्रीप्रतिमा नाकारून मानवी जीवनातील स्त्रीचे महत्वाचे स्थान अधोरेखित केले. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, लैंगिक अशा सर्वच स्तरावर प्रस्थापित समाजव्यवस्थेकडून स्त्रीच्या झालेल्या शोषणाविरूध्द नव्वदोत्तरी काळातील लेखिकांनी आवाज उठविला व स्त्रीला आदरासह समान दर्जाची मागणी केली. चहुबाजूंनी येणाऱ्या दाहक वास्तव जीवनानुभवाने या कादंबऱ्या सजल्या असल्याने लेखिकांच्या कादंबरी लेखनाचा परिघ निश्चितच अधिक उंचावाला आहे.

## ❖ निष्कर्ष :—

१) नव्वदोत्तरी कादंबरीच्या केंद्रस्थानी स्त्री असून तिच्या व्यामिश्र जीवनानुभवाचा वेध घेण्याचा प्रयत्न या लेखिकांनी केलेला आहे.

२) स्त्रीविषयक कायद्यांमुळे व समाजसुधारणांमुळे स्त्रीच्या पारंपरिक प्रतिमा बदलत गेल्याचे दिसते.

३) 'स्व' भान जागृत झालेल्या, शिक्षण — अर्थार्जन करणाऱ्या, जाचक परंपरांच्या परिघाबाहेर झेप' घेत जुन्या मूल्यांचा उपहास करणाऱ्या नायिका कादंबऱ्यातून भेटतात.

४) पितृसत्ताक समाजात स्त्रीमनाचा विविध पातळयांवर होणारा कोंडमारा चितारत स्त्रीपुरूष समानता, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य व हक्काची मागणी कादंबऱ्यांतून येते.

५) नायिकांवर व्यक्तिवादाचा प्रभाव आहे. परंतु स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या जबाबदारीचे भानही आहे.

६) लिंगभावाधिष्ठित विषमता मांडून स्त्रीची लैंगिक गरज ही नैसर्गिक व सहज भावना आहे हे कादंबऱ्या स्पष्ट करते.

७) एकत्र कुटुंब ते एकटीचे कुटुंब असा नायिकांचा प्रवास, विवाह व कुटुंबसंस्थेला पर्याय शोधण्याचा प्रयत्न कादंबऱ्यातून दिसतो.

८) पुरूषनिष्ठ शैलीतल्या आशयापेक्षा आपल्या शरीरनिष्ठ अनुभवातून कादंबरी लेखन या लेखिकांना महत्वाचे वाटते.

**❖ संदर्भ :—**

*१) साखरे डॉ. सीमा — 'स्त्रीवाद' (FEMINISM) ,सीमा प्रकाशन, नागपूर, दु.आ. १९९५, पृ. ०८*

*२) धोंगडे डॉ. अश्विनी — 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९३, पृ. ०६*

*३) ढेरे अरूणा संपादीत १ — ' स्त्री — लिखित मराठी कादंबरी (१९५० ते २०१०) पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१३.*

# 'तद्भव' कथासंग्रहाचे स्वरूप

**प्रा. डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण**
*मराठी विभाग, महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर-442701*
*badalchawhan@gmail.com Mob.No. 8007928227*

डॉ. रवींद्र शोभणे हे नाव मराठी कथेला नवीन नाही. 'वर्तमान' (१९९१), 'दाही दिशा' (१९९४), 'शहामृग' (१९९८) या तीन कथासंग्रहानंतर 'तद्भव' हा त्यांचा चवथा कथासंग्रह २००४ मध्ये प्रकाशित झाला. वरील तीन कथासंग्रहापेक्षा 'तद्भव' या कथासंग्रहाचे स्वरूप निश्चितचं वेगळ आहे. रवींद्र शोभणे यांच्या कथा अनुभवाच्या आणि आकृतीबंधाच्या दृष्टिने वेगळ्या आहेत.

एखाद्या कथाकाराने कलात्मक पातळीवरून भोगलोलुपता चित्रित केली तर वाचकांच्या आस्वादात काहीही फरक पडत नाही. दृकश्राव्य माध्यमांमुळे वाचनप्रेम कमी होत असलेल्या आजच्या काळात भारत सासणे, आशा बगे, प्रकाश खरात, चंद्रकांत वानखेडे, रवींद्र शोभणे इत्यादी मोजके लेखक कलामूल्यांची जाणीव ठेवून आपल्या अनुभूतीचे यथार्थ चित्रण करीत आहेत. रवींद्र शोभणे यांच्या 'तद्भव' या कथासंग्रहात 'एका शिंगाचा घोडा', 'भग्न गोकुळाच्या वाटा', 'उदाहणार्थ: एक सत्वपरीक्षा', 'तद्भव', 'ओली धिप्पाड भिंत ', 'दौड', 'अदृष्टाच देणं', 'वर्तमानाची खवलेदार पाठ' अशा आठ कथा समाविष्ट आहेत. शोभणेंनी आकृतीबंधाच्या आणि अनुभवाच्या संदर्भात आपण अतिशय समज आहोत असा दावा प्रस्तावनेत केला आहे.

**वर्तमानाच्या कथा :**

'तद्भव' या कथासंग्रहामध्ये पूर्वप्रसिद्धी मिळालेल्या आठही कथांचा समावेश आहे. त्या वर्तमानातील कथा आहेत. माणसाच्या जगण्याचं एक आदर्श मूल्यनिष्ठ वर्तुळ असतं. समाजाच्या नीतिनियमांनी रूढी-परंपरांनी, जन्म-मृत्यू-विवाह बंधनांनी, जात-धर्म-विचारसरणींनी माणसं बांधलेली असतात. काळ बदलतो परंतु माणसाच्या विचारांच आदर्श वर्तुळ मात्र त्याचं अस्तित्व पोखरत असते. मूल्यांचा पुन्हा विचार करायला भाग पाडते. मूल्यांची, आदर्शाची पडझड होणे हे प्रत्येक कालखंडाचे विशेष आहे. काळानुरूप नवीन मूल्यव्यवस्था जन्माला आलेली असते, परंतु तिचा स्विकार करतांना माणसांसमोर अनेक प्रश्न उपस्थित होतात. शेवटी जगणं हेच सर्वोच्च असतं, या निष्कर्षापर्यंत आलेली माणसं जीवनातला मूल्य-हासही पचवितात आणि जीवनाचे सोनं करू पाहतात. काहींना ते जमतं तर काहींना जमत नाही. ज्यांना जमत नाही ते मुळासकट कोसळतात तेंव्हा समाजात नविन प्रश्न निर्माण होतात. रवींद्र शोभणे यांच्या 'तद्भव' या कथासंग्रहातील कथा वर्तमानाच्या परिप्रेक्षात विचारांच्या आणि मूल्यांच्या अभिसरणात, माणसांच्या वर्तमान जगण्याला अर्थपूर्ण करू पाहतात.

माणसं स्वकेंद्रित असतात, भोगलोलूप असतात, मतलबी असतात, काळाला आणि मूल्य-हासाला शरण जाणारी असतात, स्वार्थी असतात. ही सर्वच माणसाच्या जगण्याची केंद्रे आहेत. म्हणूनच माणसाच्या जीवनातील अनुभवही माणूसपण हादरविणारे असतात. रवींद्र शोभणे यांच्या कथांमधून साकार होणारी माणसे त्यामुळेच आपल्याला भोवतालची वाटतात.

**माणसांच्या पराभूत वृत्तीची चिरफाड :**

'एका शिंगाचा घोडा' ही रूपकथा आहे. ती काहीशी दुर्बोध आणि अगम्य अशीच आहे. माणसाच्या मनातील कामगंडामुळे पराभूत झालेली माणसिकता एका म्हातारीच्या निमित्ताने लेखकाने मांडलेली आहे. काखेमध्ये शबनम बॅग घेऊन आपला एका शिंगाचा हरविलेला घोडा शोधण्यासाठी एक म्हातारा गावोगावी फिरतो आणि विचारतो - "माझा घोडा हरवला, घोड्याच्या शोधात आलो होतो."१ गावातील लोक त्याची टिंगल करतात तेंव्हा तो निघून जातो. तो गेल्यावर एक म्हातारी त्याच गावात येते व आपल्या म्हाता-या पतीविषयी विचारणा करते. "त्याला एकच शिंग आहे याचं ते शिंगसुद्धा बोथट झालेलं आहे. त्याला दुसर शिंग फुटलचं नाही."२ लोक तिलाही वेड्यात काढतात. ती गावातून निघून गेल्यावर पुन्हा तोच म्हातारा आपल्या हातात लाकडी घोडा घेऊन गावामध्ये येतो. आपल्या बचावासाठी शिकारी कुत्र्यावर लाकडी घोड्याने वार करतो. लाकडी घोड्याचे तीन तुकडे होतात. आणि तो पुन्हा दुस-या गावात एका शिंगाचा घोडा शोधण्यासाठी निघुन जातो. इथे ही कथा संपते.

हातातील लाकडी घोड्याचे तीन तुकडे होणे आणि पुन्हा घोडा शोधायला निघणे इथे कथा जरी संपत असली तरी ती वाचकांच्या मनात सुरूच राहते. एखाद्याला मूलं न होणे आणि त्याकरिता जन्मभर तशी त्या शिंगाच्या शोधात वणवण करणे याचे अतिशय भेदक चित्रण या कथेत आले आहे.

**मानवी संबंधाचे ताण दाखविणारी कथा :**

'भग्न गोकुळाच्या वाटा' या कथेतून मानवी संबंधाचे ताण तीव्रतेने आले असून मनोवैज्ञानिक विश्लेषणही आले आहे. मध्यमवर्गीय भावभावनांचे रेखाटन अधिक प्रत्ययकारी व प्रभावी असे आहे. साहेबराव आपल्या आईच्या वाईट कृत्यामुळे तिचा राग करायचा. दुर्गामावशीकडून जेंव्हा त्याला सत्य कळले तेंव्हा तो आपल्या आईच्या आठवणीने व्याकूळ होतो; पण वेळ निघून जाते. त्याची आई जगातून निघून जाते. खरे तर मानवी संबंधाचे ताणं प्रस्तुत कथेत दिसून येतात.

**व्यक्तिची सत्वपरीक्षा :**

**उदाहरणार्थ**: 'एक सत्वपरीक्षा' या कथेतील नायक हा क्रांतीकारी आहे. तो समाजातील कर्त्या सुधारकाचे बोट धरून चालणारा कार्यकर्ता आहे. तो रूढीभंजक, मूर्तिभंजकही असतो, रूढीप्रिय गोष्टींवर आघात करतो, "आपल्या कृतीनं, विचाराणं वादळ निर्माण व्हावं, आपल्या कृती-उक्तीची समाजातील सर्व स्तरावर चर्चा व्हावी, ही त्याची प्रामाणिक इच्छा असायची; किंबहुना तीचं त्याची महत्वाकांक्षा होती."३ हा नायक समाजकार्यात अग्रेसर असणा-या नानासाहेबांचा खरा अनुयायी होता. त्यासारखीचं 'चेतना' ही सुद्धा अनुयायी होती. लग्नापूर्वी ती गर्भवती झाली, तेंव्हा तीने नानासाहेबांना खरी वास्तविकता सांगितली.

आपल्या मर्यादीत विश्वात काहीतरी अव्दितीय, अपूर्व, काहीस वेगळ करू इच्छिणारा, संधी शोधणारा क्रांतीकारक नायक गर्भवती चेतनाशी लग्न करतो, त्याच्या मनातल्या क्रांतीविचारांची वाफ लयाला गेल्यावर मात्र, त्याला चेतनाशी जुळवून घेणं शक्य होत नाही. समाजाच्या दबावानं तो जीवनमूल्यांची बदलती क्रांतीकारक रूपं स्विकारू शकत नाही. जीवनाच्या प्रत्यक्ष रणांगणात क्रांतीची वाफ होते. हा खरे तर आजच्या सामाजिक जीवनाचाच पुनर्विचार करायला भाग पाडणारा प्रश्न आहे. अशाप्रकारे क्रांतीकारक युवकाची सत्त्वपरीक्षा घेणारी प्रस्तुत कथा आहे.

**व्यावहारिक भूकंपाची घसरण :**

'दौड' या कथेतून व्यावहारिक भूकंपाची घसरण व्यक्त होते. पठाण उद्योग समुहामध्ये रायभाने नावाचा व्यक्ती मशिनिष्ट या पदावर कार्यरत असतो. प्रोबेशन मध्ये असतानाच त्याचा अपघात होवून तो स्वतःचे दोन्ही हात गमावतो. नूकतेच त्याचे लग्न झाले त्यातच हा अपघात; त्याच्या पत्नीवर आघात झाला. तीची स्वप्ने बेचिराख झाली.

रायभानेची पत्नी, कामगार युनियन लीडर दादा गावंडे, मॅनेजर एम.डी. पठाण यांचे वेगवेगळे धेय्य असतात. नव-याचे हात अपघातात निकामी झाल्यावर जगणं सुंदर करण्यासाठी तिची शोधयात्रा सुरू असते आणि शेवटी पठाण साहेबांच्या नादी लागून, ती आपला अधःपतीत जीवनाचा गाडा पुढे नेऊ पाहते, म्हणूनच व्यावहारिक तडजोडीपोटी होत चाललेली मूल्यांची घसरण 'दौड' या कथेत दिसून येते.

**विस्मयकारक प्रत्यय देणारी कथा :**

माणसाच्या स्वार्थी जगण्यावर प्रकाश टाकणारी आणि विस्मयकारक प्रत्यय देणारी 'अदृष्टाचं देणं' ही कथा आहे. "मानवी मनाची क्षुद्रता व नियतीचं वरदान यामध्ये नाट्याचा विस्मयकारक प्रत्यय आणून देणारी 'अदृष्टाचं देणं' ही कथा प्रस्तुत संग्रहाचं भूषणच म्हणता येईल."४ गणोबा वाणी आपल्या गिरजा नावाच्या पत्नी सोबत आणि दोन मुलीसोबत राहतो. त्याचे गावामध्येच दुकान असते. पावसाळ्याच्या दिवसात एक म्हातारी दुकानातील सामान खरेदीसाठी येते. मुसळधार पाऊस असल्यामुळे रात्रभर गणोबाच्या पत्नीच्या आग्रहाखातर त्यांच्याकडे मुक्काम करते. मात्र आपल्याजवळील मोहरा गमावते. गणोबाची स्वार्थीवृत्ती जागी होते. माणसांच्या स्वार्थी जगण्यावर प्रकाश टाकणारी ही कथा आहे. माणसातील स्वार्थ त्याच्यातल्या माणूसपणाचा मृत्यू घडविणारा आहे.

**आजच्या पिढीची कथा :**

'तद्भव' ही आजच्या पिढीची कथा आहे. ती वास्तवातील मग्नतेचे कलापूर्ण दर्शन दाखविणारी आहे. एका आघाडीच्या वृत्तपत्राचे नंदू आणि बेला हे दोघेही प्रतिनिधी असतात. नागपूर जिल्ह्यातील मोवाड हे गाव वर्धा-वैनगंगा नदीच्या महापूराने वाहून जाते. ही बातमी सर्वत्र पसरते. गेल्या शंभर वर्षामध्ये असा महापूर कधी आलाच नाही. "या परिसरातल्या साध्या वार्ताहरांवर विसंबून राहण्याइतपत ही घटना नगन्य नाही. याची जाणीव राष्ट्रीय प्रसारणातल्या बातमीनं बहुतेक वृत्तपत्रवाल्यांना झाली आणि त्यांनी तिथल्या विशेष वृत्त सेवेसाठी आपापले प्रतिनिधी छायाचित्रकारांसह रवाना केले."५ नंदू आणि बेला हे दोघे तिथे गेले. नंतर

त्यांच्यात प्रेमसंबंध प्रस्थापित होवून बेला गर्भवती होते. तेंव्हा नंदू तिला ॲबॉर्शन करण्यास भाग पाडते. ही कथा फार अलवार आहे, संवेदनाक्षम आहे. बदलत्या जीवनाचे, वासनांचे आवेग तरूण-तरूणींच्या वागण्यात कसे प्रतिबिंबित झाले ते कळते. एका तरूण मुलीच्या मनाचा प्रश्न लेखक फार हळवेपणाने मांडतो. तिच्या वाटण्याला तरूणाईचा नवीन संदर्भ देतो. पराभूत मनाला कणखर बनविण्याचा तो प्रयत्न करतो.

'तद्भव' कथेसंबंधी रवींद्र शोभणे लिहितात, "'तद्भव' या कथेकडे जेंव्हा मी आज तटस्थपणे पाहतो तेंव्हा या कथेतून व्यक्त होणा-या अनुभवाचा पोत हा एकपदरी निश्चितच नाही; तो तीनपदरी किंवा त्रीस्तरीय स्वरूपाचा आहे. हे प्रथमच जाणवले."६ आजच्या पिढीला जवळचे वाटणारे कथानक प्रस्तुत कथेमध्ये आहे. तरूणांच्या मनाची घुसमट, त्यांचे प्रश्न, त्यांची जिद्द, नवीन गोष्ट करू पाहण्याची आकांक्षा, युवक-युवतीचे प्रेमसंबंध नंतर त्यामध्ये आलेले विघ्न इत्यादी गोष्टी कवेत घेत ही कथा साकार होतांना दिसते. त्यामुळे ही कथा आजच्या पिढीला जवळची वाटते.

**समारोप :**

समाजातील माणसाचे मूल्यहीन वर्तन कथाकार रवींद्र शोभणे यांनी चितारले आहे. जीवनातील दुःख, त्याच्या अलक्षित अनुभवाचा शोध घेण्याची धडपड कौतुकास्पद आहे. शोभणेंनी टिपलेले संवेदन अर्थवाही व गंधवाही आहे. त्यामुळे वाचकांना वाचनाचे वेढ लागते. 'तद्भव' कथासंग्रहातील संपूर्ण कथा ह्या वर्तमानाच्या आहेत. माणसांच्या पराभूत वृत्तीची चिरफाड, मानवी संबंधाची तान-तनाव इत्यादी विषय घेऊन त्यांची कथा प्रकटलेली आहे. त्यांच्या कथा विस्मयकारक प्रत्यय देणा-या आजच्या पिढीच्या कथा आहेत. ह्या कथासंग्रहातील कथांमधून माणसांच्या ठिकाणी असणा-या आत्मकेंद्रितता, स्वार्थीबुद्धी, भोगलोलुपता या स्वभावदोषातून परिणाम होणा-या जीवनानुभवांची विभिन्न रूपं साकार झालेली आहेत.

**निष्कर्ष :**

(१) 'तद्भव' कथासंगहातील कथा वर्तमानाच्या कथा आहेत.

(२) 'तद्भव' कथासंग्रहाचे स्वरूप इतर कथासंग्रहापेक्षा वेगळे आहे.

(३) अनेक नविन विषयांना कवेत घेत प्रस्तुत कथासंग्रह लिहिलेला आहे.

(४) कथेतील व्यक्तिरेखा आपल्या सभोवतीच्या वाटतात.

**संदर्भ ग्रंथ :**

*(१) रवींद्र शोभणे, 'तद्भव', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००४, पृ. १२*
*(२) तत्रैव, पृ. २१*
*(३) तत्रैव, पृ. ४६*
*(४) तत्रैव, मलपृष्ठावरील मजकुरातून*
*(५) तत्रैव, पृ. १२२*
*(६) रवींद्र शोभणे, 'कथा लेखनासंबंधी माझी भूमिका आणि तद्भव' यामधून*

# समकालीन मराठी गझलकाव्य

**प्रविण रामकृष्ण मोरे**
विद्यार्थी संशोधक, सा.फु.पुणे विद्यापीठ, के.टी.एच.एम कॉलेज, नाशिक (मराठी विभाग)
**मार्गदर्शक डॉ. भास्कर सु. ढोके**
*चलभाष : 94222 73846*
***email :*** *pramo_73@rediffmail.com*

## प्रास्ताविक

'समकालीन मराठी गझल' या विषयावर भाष्य करतांना आपल्याला समकालीन मराठी साहित्याची परिभाषा समजून घेणे क्रमप्राप्त आहे. साहित्यनिर्मितीची प्रयोजने कीतीही असली तरी साहित्यामध्ये त्या त्या काळाचे प्रतिबिंब पडलेले असते. (झालेले असते.) समकालीन मराठी साहित्याच्या परिप्रेक्षेतून बघितले असता आपल्याला या साहित्याचे वर्गीकरण पहावयास मिळते. उदा. समकालीन कादंबरी, समकालीन कथा, समकालीन कविता, समकालीन नाटक, ललीतसाहित्य, स्त्रीसाहित्य वगैरे वगैरे.

प्रस्तुत विद्यार्थी संशोधकास 'मराठी समकालीन गझल' या विषयावर भाष्य करतांना ''समकालीन मराठी गझलकाव्य'' असां अर्थ अभिप्रेत असून गझल हा एक विशिष्ट काव्य प्रकार आहे आणि समकालीन गझलकडे एक वैशिष्ट्यपूर्ण रुपबंध 'तंत्रानुसारी' या दृष्टीकोनातून बघितल्यास आकलनाच्या दृष्टीने सुगमता होऊ शकते.

कोणत्याही भाषेतील साहित्याचे स्वरुप तपासतांना किंवा साहित्याचा अभ्यास करतांना काही कालखंड मानावे लागतात. म्हणजे या बाबींसाठी कालावकाश ही संज्ञा अपारिहार्य नसली तरी आवश्यक बाब ठरते. ''कालावकाश ही संज्ञा समाजाची स्थितीगती, त्याचा वास्तव चेहरा उन्नती तथा अधोगती जाणण्यासाठी महत्त्वाची ठरते, तेवढीच ती साहित्य प्रांतातही प्राधान्य क्रमाने महत्त्वाची मानली जाते.''[1]

मराठी काव्याला शेकडो वर्षाची परंपरा असून मराठी कवितेचे ढोबळ मनाने तीन कालखंड मानले जातात. पहिले पर्व केशवसुतांचे म्हणून ओळखले जाते त्यांना आधुनिक कवितेचे जनक मानले जातात. दुसरी परंपरा ही मर्ढेकरांची मानली जाते. यात यांत्रिकीकरणातून माणसाच्या आयुष्याला आलेले बकालपण त्यांनी पहिल्यांदा मांडले आणि मराठी साहित्यात त्यांच्या म्हणजे मर्ढेकरी साहित्याने एक वेगळा प्रवाह निर्माण केला. मर्ढेकरी जाणिवा आणि शैलीचा प्रभाव पुढील पिढीत पहावयास मिळतो. मराठी कवितेचे तिसरे पर्व अरुण कोलटकर दिलीप चित्रे, यांचे मानावयास हवे कारण रुढ परंपरेला छेद देवून आधुनिकतावादी कवितेचा त्याांनी अधिक विस्तार केला तसेच पुढे नारायण सूर्वे, नामदेव ढसाळ त्यांच्या कवितेने सामाजिक आशयांनी अधिक व्यापक रुपात आविस्कृत केले

त्यांनी शोषित पिडित आणि दिन दलीतांच्या व्यथांना आक्रोशाला, नकाराला एक नवा चेहरा दिला. नव्वद नंतरच्या कवितेला आपण चौथे पर्व मानूयात.''[2]

उपरोक्त प्रमाणे कालखंडाच्या दृष्टीने आपण मराठी काव्याची चिकित्सा केल्यात काही ठळक बाबी लक्षात येतात. त्या ह्या की मराठी कवितेला विविध प्रवाहात समाविष्ट करण्यात आले आहे व विविध परिप्रेक्षांतून त्यांची समीक्षा करण्यात आली आहे. उदा. साठोत्तरी कविता, दलित कविता, ग्रामीण कविता, स्त्री कविता वगैरे. तथापि मराठी गझल किंवा मराठी गझलकाव्य केंद्रस्थानी ठेऊन अशाप्रकारे मराठी गझलेचा तथा गझलकाव्याचा अभ्यास अद्यापपावेतो मराठी काव्यक्षेत्रात अभावानेच निदर्शनास येतो. उपरोक्त कालखंडाप्रमाणेच आपणांस मराठी गझलेच्या मराठी साहित्यातील शिरकावापासून कालनिहाय मांडणी करुन चिकित्सा करणे शक्य आहे असे प्रस्तुत विद्यार्थी संशोधकाचे मत आहे. परंतु ह्याकरिता सर्वप्रथम मराठी गझलकाव्य कशास म्हणावे हे समजून घेणे इष्ट ठरते.

अरेबिक भाषेतील एका काव्य प्रकाराला कासिदा म्हणतात. काशिदा म्हणजे स्तुतिकाव्य कासिदा म्हणण्याच्या आधि एक लहानसे दोन किंवा चार ओळींचे प्रणयगित म्हणण्याचा प्रघात होता. या ओळींना त बीब असे म्हणत असत. अरबांनी इस्लाम कबीज केला. इराण काबिज केला. इराणनंतरच्या सांस्कृतिक देवाण घेवाणातून अरबांचा काशिदा इराणात गेला आणि बघताबघता पर्शियन कविंमध्ये अत्यंत लोकप्रिय झाला. तथापि पर्शियन कवि कासिदा या काव्याप्रकाराच्या आधि म्हणण्यात येणाऱ्या 'त बीब' च्या दोन ओळींवर खूप जास्त भाळले आणि त्यांनी त बीब हा एक वेगळाच काव्यप्रकार निर्माण केला आणि तो आपल्या प्रतिभेने समृद्ध केला. या काव्यप्रकाराला आज आपण गझल असे म्हणतो.[3]

**गझलची व्याख्या** :

अ) गझल या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ 'सुखज अज माशूक गुफ्तन' म्हणजे महबूबासे बाते करना ''एकाच वृत्ताच्या व यमकाच्या बांधणित गुंफलेली एक परमोच्च काव्यबिंदूंची मालिका (series of climaxces) म्हणजे गझल होय.''[4]

ब) एकाच वृत्तातील एकच यमक (काफिया) व अंत्ययमक (रदीफ) असलेल्या प्रत्येक दोनदोन ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांची बांधणी म्हणजे गझल होय.[5]

क) उर्दू फार्सी कवितेचा एक प्रकर म्हणजे गझल यात प्रामुख्याने प्रेमाचे वर्णन असते. एका गझलमध्ये सामान्यतः पाच ते सतरा शेर (द्वीपदी) (सोप्या भाषेत कडवे) असतात. प्रत्येक शेराची (द्विपदाची) दुसरी पंक्ती (ओळ) सयमक असते. तसेच प्रत्येक शेरात (द्विपदीत) वेगवेगळा विषय /आशयद्रव्य असते. पहिल्या शेराला मतला म्हणतात. त्याचे दोन्ही चरण सानुप्रास असतात. शेवटच्या शेराला मक्ता असे नांव आहे. यात कविचे उपनाम असते.[6] वरील सर्व व्याख्यांचा विचार करता गझलेचे वैशिष्ट्ये कविता या प्रकारापासून कोळी कशी आहेत हे आपल्याला निश्चितपणे सांगता येतील. गझल हा विशिष्ट आकृतिबंध (तंत्रानुसारी) (form) असणारा काव्य प्रकार असून गझलेच्या

तंत्रानुसारी शैलीगत (form with style) आकृतीबंधामुळे आपल्याला कविता व गझल यांच्यात फरक स्पष्ट करता येतो. गझलच्या आकृतीबंधाला काही नियम (कायदे) आहेत ते नियम (कायदे) तोडता येत नाहीत आणि आकृतिबंधाचे नियम मोडल्यास ते काव्य, गझल म्हणून प्रमाणिक करता येत नाही. गझलेतील प्रत्येक द्विपदी (शेर) स्वतंत्र विषय असणारी कविता असते. तसेच एका शेरातील विषयाचा/आशयद्रव्याचा दुसऱ्या द्विपदीतील (शेरातील) विषय/आशयद्रव्यास अर्थाअर्थी काहीएक संबंध दिसून येत नाही. परंतु गझलेच्या विशिष्ट आकृतिबंधामुळे (form) म्हणजे यमक आणि अन्त्य यमकांमुळे संपूर्ण गझलकाव्य वाचकाला एकरुपतेची / एककेंद्रीत्वाची अनुभूती देते. अशा एका गझलमध्ये वेगवेगळे विषय अंतर्भूत असणाऱ्या गझलेला गैरमुसलसिल गझल असे म्हणतात. परंतु काहीवेळा एका गझलेत संपूर्णपणे एकच विषय/आशयद्रव्य जाणवते. (Sole subject with one containe) अशा गझलेला मुसलसिल गझल असे म्हणतात. प्रामुख्याने आंबेडकरी जलशात गायली जाणारी गझल ही मुसलसिल गझल मानली जाते. दोन्ही प्रकारची उदा. खालीलप्रमाणे सांगता येतील.

*हे असे आहे तरीपण हे असे असणार नाही.*
*दिवस आमुचा येत आहे तो घरी बसणार नाही.*
*छान झाले दांभिकांची पंढरी उदध्वस्त झाली*
*ह्या पुढे वाचाळ दिंडी एकही निघणार नाही* **(गैरमुसलसिल)**

उपरोक्त द्वीपदी सुरेश भट यांच्या रंग माझा वेगळा या काव्यसंग्रहातील असून यात असणार नाही, बसणार नाही, निघणार नाही हे अंत्ययमक आहे. दोन्ही द्विपदींचा अर्थाच्या अनुषंगाने विचार केल्यास त्यातील आशयद्रव्यात कमालीची तफावत आहे. प्रथम द्विपदीत प्राप्त परिस्थितीचा विचार म्हणजे वर्तमानातील स्थिती आणि या स्थितीतून पुढे भविष्याकडे सकारात्मक वाटचालीची शाश्वती आणि त्याची निश्चित शाश्वती असा आहे तर दुसऱ्या द्वीपदीत 'दांभिकांची पंढरी', 'बाचाळदिंडी' अशा उपरोधीक प्रतिमांचा वापर आहे.

*विचारु कशाला कसा भिम होता*
*खरा भारताचा सखा भिम होता*
*गुलामीची बेडी रणी तोडणारा*
*खरा झुंजणारा सखा भिम होता* **(मुसलसिलगझल)**

उपरोक्त दोन्ही चरणात वामनदादा कर्डक यांनी एकाच विषयाला अनुसरुन लिहिलेल्या गझलेत डॉ. बाबासाहेब आंबेडकराविषयी लिहिले आहे.

मराठी गझल काव्याच्या बाबतीत मराठी समकालीन कवितेच्या बाबतीत जो कालखंडानुसार विचार होतो तसा विचार व वर्गीकरण करण्याची शक्यता तपासून पाहिली असता असे निदर्शनास येते की, मराठी गझलेची चिकित्सा करतांना मराठी साहित्यात गझलेचा शिरकाव जेथून झाला तेथून तिची मिमांसा करणे शक्य आहे. गझल या परकीय साहित्यविधेचा मराठी साहित्यात शिरकाव कसा

झाला यावर तज्ज्ञांची मते—मतातंरे आढळून येतात. गझल या काव्यप्रकाराचे व्यासंगी समिक्षक डॉ. अविनाश सांगोलेकर यांच्या मते अमृतराय (जन्म 1698 मृत्यु 1753) यांचे ''जगव्यापकाहरिला नाही कसे म्हणावे'' हे पद मराठीतील सर्व प्रथम गझल आहे. डॉ. सांगोलेकर यांच्या मते माधव ज्युलिअन यांनी सर्व प्रथम 1927 मध्ये याचे सूतोवाच केले होते. नंतर ना. ग. जोशी यांनी 1968 मध्ये तर प्रा. रमेश तेंडुलकर यांनी 1977 मध्ये या बाबतीत अधिक विवेचन केले असे आणि प्रामुख्याने मराठी गझल लेखनाचा प्रथम लेखनकाल हा 1729 असा निश्चित केला. पुढे गझल लिहिण्याचा प्रयत्न पंडीत कवी मोरोपंत यांनी केला. (जन्म 1729, मृत्यू 1794) त्यांची ''रसने न राघवाच्या थोडी यशांत गोडी'' आणि हृदया ! बरे विचारी नाम आरे, न तापें ही दोन पदे गझल या प्रकारात मोडणारी आहेत.[7] परंतु डॉ. सांगोलकरांच्या मतापेक्षा भिन्नमत गझलेचे अभ्यासक डॉ. अझिझ नदाफ यांनी मांडले आहे. त्यांच्या मते गझलेला अरबी, फार्शी, भाषेतून महाकवि अमीर खुसरो यांनी (1250—1325) खडी बोलीत आणले त्याच काळात संत नामदेव (1270—3050) हे पंजाब मधील घुमान येथे होते. त्यांच्या 2337 अभंग व पदांमध्ये अनेक गझलनुमा (गझलसदृष्य) रचना आहेत. त्यामुळे अमृतराय व मोरोपंत बाद होतात.[8] तथापि प्रस्तुत विद्यार्थी संशोधकाने डॉ. नदाफ यांचे मत हिंदी गझलकाव्याच्या बाबतीत योग्य वाटते आणि मराठी गझलकाव्याचा विचार केल्यास अमृतराय व मोरोपंत यांची पदे ही गझल सदृष्य रचना असून फार मोठ्या प्रमाणात लिहील्या न गेल्यामुळे, तसेच गझलेच्या मूळ रुपबंधाशी एकरुप नसल्यामुळे मराठी गझलेचा संबंध अमृतराय व मोरोपंत यांच्या कालखंडापर्यंत घेऊन जाणे उचित होणार नाही असे वाटते.

मराठी गझल काव्याची सुरुवात खऱ्या अर्थाने कोठून झाली याचा परामर्श केला असता प्रामुख्याने माधवराव पटवर्धन यांच्या कालखंडाजवळ येणे क्रमप्राप्त ठरते. परकीय भाषेत विकसित झालेली काव्यविधा मराठीत आणण्याचे काम माधव ज्युलियन उफ माधवराव पटवर्धन यांनी केले. 1920 ते 1940 हा कालखंड मराठी काव्यक्षेत्रात रविकिरण मंडळाचा मानला जातो. या मंडळातील एक प्रमुख कवि माधव ज्युलिअन (1894—1939) यांनी छंदोरचना या ग्रंथाद्वारे उर्दू गझलेचे छंद मराठीत आणले व गज्जलांजली या आपल्या काव्यसंग्रहात त्यांनी गझलवृत्तात काव्यरचना केली. म्हणजे गजल हा स्वतंत्र काव्यप्रकार आहे अशी जाणिव त्यांनी मराठी काव्यक्षेत्राला करुन दिली असे म्हणणे फारसे गैरलागू होणार नाही. असे असले तरी गज्जलांजलीच्या 1933 च्या प्रथम आवृत्तीत ते म्हणतात, '''गज्जल' व काशिदा हे एक यमकिच असावे लागतात. 'गज्जल' हा भावगीत किंवा भावकाव्याप्रमाणे एकपिण्डी असतोच असे नाही. यमक सुत्रात गोवलेला (मन्झुम) गज्जल हा द्विपदी मुक्ताफळीचा जणू सरच होय हा दोष मराठी गज्जलांत टाळला आहे. शास्त्रोक्त गज्जलासू आवश्यक असणारे एक यमकिपणाचे बंधन हे एखाद्या क्लीस्ट लगाक्रमाप्रमाणे भावगीताच्या रचनेत जाचक होते, या बंधनामुळे फार्शी गज्जलांतील द्विपद या भावदृष्ट्या विलग व असंबंध झाल्या असाव्या. हे बंधन चार पाच द्विपद यांच्या पुढे पाळणे झाल्यास बळी द्यावा लागतो आणि यमकेही तितकी सुंदर जुळत नाहीत या कारणाने कित्येक भावगीतात हे बंधन पाळले नाही.[9]

याचा अर्थ प्रत्यक्ष माधव ज्युलियन यांच्या लेखी अरबी, फार्सी, उर्दू गझल आणि मराठी गझल समवाय साधायचा झाल्यास मराठी भाव काव्याला फार्सी गझलेचा आकृतिबंध (form) मानवणारा नाही असे वाटले असावे म्हणून पुढे त्यांनी त्यांच्या शैलीत गझलाचे मूळ कायदे सुधारुन गझल/भावकाव्य लिहिले असे म्हणावे लागते. गझलेची मूळ रचनाबंधावर माधवज्युलियन यांनी असणाऱ्या आक्षेपांवर पुढे समिक्षकांची मतेमतांतरे पहावयास मिळतात. हे असे असले तरी माधव ज्युलियन यांची काव्यशैली पाहता गझलेचा मूळ 'प्रेमालाप' हा गाभा त्यांना भावला असावा असे दिसते. कारण त्या काळच्या साहित्यीकांनी त्यांना प्रणयपंढरीचा वारकरी हा खिताब बहाल केलेला होता. म्हणून गझलेची मूळभाषा (प्रेमाची, भावकाव्याची) माधव ज्युलियन यांनी स्वीकारली व गझलेची परंपरा माधव ज्युलियन यांच्या गझलेने जपली आहे हे ही तीतकेच खरे आहे.

मराठी गझलेचे दुसरे पर्व : सुरेश भट आणि त्यांचे समकालीन यांचे गझल काव्य – सुरेश भट यांनी मराठी गझलेला अस्सल मराठी बाज दिला असे जाणकार समीक्षकांचे मत आहे तसेच या बाबतीत स्वतः सुरेश भट यांच्या मते माधवराव पटवर्धन यांनी अरबी फार्सीतून गझल मराठीत आणली खरी परंतु ती सुधारुन आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांची गझल गझलेची मुलभूत वैशिष्ट्ये हरवून बसली. सुरेश भट यांनी निश्चित अशी भूमिका घेऊन जाणिवपूर्वक गझल या काव्यप्रकाराच्या अंतर्भूत वैशिष्ट्यांसह (आकृतिबंध) गझलवृत्तात गझल निर्मिली. त्यांची गझल गझलेची परंपरा पाळते तथापि तीच्यामध्ये पारंपारिक प्रतिमा यांचा वापर दिसून येत नाही. सुरेश भटांनी मराठी भाषिक प्रतिमा, प्रतिके, मिथके, संदर्भ यांचा वापर त्याांच्या गझलेत केलेला दिसून येतो.

उदा.

*1) पुन्हा बिऱ्हाड थाटतो बिऱ्हाड मोडल्यावरी*
*तुटून चालती घरे, सुटे नही कलंदरी*
*2) तेंव्हा सदेह स्वर्गी केला जरी तुका*
*येथील भाविकांना भंडावती भुका*

सुरेश भट यांचे 'रुपगंधा' (1961), रंगमाझावेगळा (1974), एल्गार (1983), झंझावात (1994) इत्यादी गझल/काव्य संग्रह प्रकाशित आहेत.

उर्दू भाषेत रिवायती गझल आणि जदीद गझल असे दोन भाग आहेत. म्हणजे पारंपारिक साच्याची गझल आणि परंपरेला छेद देऊन निर्मिलेली गझल ती जदीद (सुधारणामतवादी गझल) सुरेश भट यांच्या गझलेत दोन्ही प्रवाहांचा मिलाफ पहावयास मिळतो. सुरेश भट यांच्या गझलेला विद्रोहाचे अधिकार आहे. त्यांच्या गझलेत सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिवेशातील तसेच साहित्य व्यवहारातील विवेक/अविवेकाचे पडसाद आहेत. सुरेश भटांनी त्यांचा एक समुदाय निर्माण केला हे मान्य करावे लागते.

''कलेचे व म्हणून अर्थातच साहित्य कलेचे एकमेव व अंतिम मूल्य 'सौंदर्य' हेच आहे व साहित्य कलेत ते आशयाच्या संघटनेतून प्रकटते असे मर्ढेकरांचे प्रतिपादन आहे. सुरेश भट यांनी

आपल्या काव्यनिर्मितीतून व प्रास्ताविक विवेचनातून मर्ढेकरांच्या या भूमिकेला कडवा विरोध केला. आपल्या भूमिकेचे प्रतिपादन आणि त्या भूमिकेशी सुसंवादी काव्यनिर्मिती करुनच भट थांबले नाहीत तर नवोदीत कविंना त्यांना तशी प्रेरणा दिली. आपला एक मर्ढेकरांविरोधी काव्यसंप्रदाय निर्माण केला. केशवसूत, तांबे, मर्ढेकर यांच्या नंतर स्वतःचा असा संप्रदाय निर्माण करणारा सुरेश भट हा एकमेव कवी आहे.[10]

मराठी समकालीन गझलकाव्याच्या अनुषंगाने विचार केल्यास मराठी गझलेच्या दुसऱ्या पर्वातील सुरेश भटांचे समकालीन कविंचा विचार करावा लागतो. यात प्रामुख्याने वामनदादा कर्डक, मंगेश पाडगांवकर, खावर, श्रीकृष्ण राऊत, वा. न. सरदेसाई, घनश्याम धेंडे, संगीता जोशी, ललिता बांठीया, मनोहर रणपिसे, सदानंद डबीर इलाही जमादार, रमण रणदिवे, इ. ची नावे घेता येतील. याठिकाणी प्रामुख्याने वामदादा कर्डक यांच्या मुसलसिल गझलेकडे लक्ष वेधावे अस वाटते. 3 मे 1943 पासून वामनदादा कर्डकांनी विडंबन गीतांपासून काव्यलेखनास सुरुवात केली. तथापि वामनदादा कर्डकांनी गझल लेखनास कधी सुरुवात केली याचे पुरावे मिळत नाहीत. स्वतः वामनदादांनी 1943 ते 1956 पर्यंत जे लिहिले ते लोकांकडे आहे असे त्यांच्या स्वकथनात त्यांनी म्हटले आहे.

प्रा. सागर जाधव आणि माधवराव गायकवाड यांनी संपादीत केलेल्या महाकवि वामनदादा कर्डक समग्र वामय खंड–1, आणि खंड–2, यामध्ये सुद्धा याचा खुलासा नाही. परंतु त्यांनी अत्यंत महत्त्वाची नोंदयात करुन ठेवली आहे. ते म्हणतात, ''वामनदादांची काव्यप्रतिभा, त्यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची आकलन क्षमता आणि त्यांच्या लेखनाची गती पाहुजाता वामनदादा 1950, 1955 पासून गझल लिहित असावेत असे निश्चित अनुमान काढता येते. (खंड क्र.1, पृ. 73) या संदर्भात भिमा कोरेगांव च्या शौर्यावर लिहिलेल्या गझलेचा हवाला देता येईल.[11]

*इकडे पहाटवारा येउ दिलाच नाही*
*घरट्यात गारवा हा नेउ दिलाच नाही.*
*जाऊन कोरेगांवी पाहुन घे निशानी*
*झेंडा दुजा कुणाला रोवू दिलाच नाही*

वामनदादा कर्डक यांची गझल सर्वार्थाने आंबेडकरी विचारधारेला वाहिलेली असल्याने ती मुसलसिल गझल ठरते. कारण आंबेडकरी गझल ही एक स्पष्ट भूमिका होऊन समता, स्वातंत्र्य, बंधुता या तात्त्विक अधिष्ठानातून कदाचीत वामनदादा कर्डक यांची गझल लिखित स्वरुपात तत्कालीन अभ्यासकांना उपलब्ध झाली नसेल म्हणून मराठी गझलकाव्याचा विचार ज्यावेळी होतो त्यावेळी वामनदादा कर्डकांच्या गझलेचा तात्विक विचार मागे पडतो असे सकृत दर्शनी निदर्शनास येते.

सतत बदलत राहणे हा समष्टिचा नियम आहे. हीच बाब साहित्य क्षेत्रालाही लागू पडते. कवि, कलाकार आपल्या कलाकृतितून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, वैचारिक बदलांचे संदर्भ

अभिव्यक्त करीत असतात. कालपरत्वे होणारे साधक बाधक बदल हे अपरिहार्य जरी असले तरी स्वागतार्ह ठरतात. जगाच्या एकूण एकंदर साहित्य व्यवहाराचा विचार केल्यास प्रत्येक कालखंडातील साहित्यात त्या त्या काळाच्या नोंद आढळतात. मराठी काव्यक्षेत्राच्या बाबतीतही ह्या बाबी जाणवल्याशिवाय राहत नाही. भारताची अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, राजनैतिक व्यवस्था ही 1990 नंतरच्या जागतिकीकरणानंतर झपाट्याने बदललेली दिसून येते. या जागतिकीकरणानंतर सर्व जग एक 'ग्लोबल हिलेज' म्हणून मान्यता पावले आणि समष्टिमध्ये माहितीचा स्त्रोत धबधबल्यासारखा कोसळायला लागला. मानवाची जीवनशैली आणि विचारशैली मूळापासून बदलली. मूलभूत प्रश्नांच्या, मानसिक गरजांच्या, शारीरिक गरजांच्या संकल्पना अमुलाग्र बदलल्या आणि नव्वदोत्तरी साहित्याचा चेहरामोहरा, आशय—अभिव्यक्तीच्या दृष्टिकोनातून बदलायला सुरवात झाली. मराठी गझल काव्यानेही भटानंतरच्या काळात कात टाकली आणि एक वेगळा आशय घेऊन गझलेची वाटचाल सुरु झाली.

1990—1995 नंतर गझलकाराच्या दोन पिढ्या दृष्टीस पडतात. पहिली पिढी म्हणजे अभिमन्यू आळतेकर, गौरवकुमार आठवले, अरुण चिंचकर, शिवाजी जवरे, ललिता बांडीया, डॉ. अनंत ढवळे, संदीप माळवी, नितिन भट, बिराजदार, दुसऱ्या पिढीत वैभव जोशी, चित्तरंजन भट, वैभव देशमुख, अनंत नांदूरकर, भूषण कटककर, अजय जोशी, डॉ. समिर चव्हाण, सिद्धार्थ भगत, संजय इंगळे, प्रमोद खराडे, प्रफुल्ल भुजाडे, प्रकाश मोरे, सुनंदा शेळके, वंदना पाटील, विजय आव्हाड, क्रांति साडेकर, जनार्दन म्हात्रे[12] ही नावे लक्षात आहेत.

विशोत्तरी म्हणजे 2000 सालानंतर भाषिक अन्वयाने गझलेची आशय व अभिव्यक्तीच्या अंगाने जी वाढ झाली त्यात प्रामुख्याने पुढील गझलकारांचा हातभार आहे. ज्ञानेश पाटील, रुपेश देशमुख, सतिष दराडे, अमित वाघ, सुधीर मूळीक, कमलाकर देसले, खलील मोमीन, ममता सपकाळ, सुप्रिया जाधव, संध्या पाटील इ. व अनेक नवगझलकार गझल शिकत असून गझल वृत्तांत गझल लिहिण्याचा प्रयत्न करीत आहेत.

प्रस्तुत शोधविद्यार्थी यांना नव्वदोत्तरी गझलेचा अभ्यास करतांना स्त्री गझलकारांच्या बाबतीत काही बाबी प्रकर्षाने जाणवल्या आहेत.

स्त्रियांच्या कवितांचा अभ्यास हा एकापरिने संपूर्ण समाजाचा आणि संस्कृतिचाच अभ्यास असतो[13] आणि एका अर्थाने स्त्री ही तिच्या परिप्रेक्षातून जगाकडे पाहत असते. परंतु गझल लिहिणाऱ्या स्त्रियांच्या गझलेचा अभ्यास अभिव्यक्ती आणि आशय अशा दुहेरी अंगाने केल्यास त्यात लिंगभाव अभिनिवेश दिसून येत नाही.

पारंपारिक स्त्री कविता ही लिंग असमानतेवर जशी उभी आहे तशी 1990 नंतर ची स्त्री लिखित गझलातील कथनकार हा लिंगभावविरहित पात्रातून अभिव्यक्त होतांना दिसतो.

**उदा.**

*क्रांति साडेकर यांच्या गझलेतील द्विपदी*
*'आता'स या 'उद्या'शी मी जोडणार नाही*

*प्रारब्ध काय आहे ? मी जोखणार नाही*
*ग्रासेल दोन क्षणांचा काळोख, काय त्याचे ?*
*मी सूर्य तेज आहे मी लोपणार नाही.*

**सारांश :**

गझलेची निर्मिती परकिय भाषेत झाली आणि गझल या काव्यप्रकाराचा प्रदीर्घ प्रवास झाला आहे. गझलेची तांत्रिक अंगाने चिकित्सा तसेच गझलेच्या गुण अवगुणांची चर्चा आणि चिकित्सा तिच्या निर्मितीकाळापासून चालत आली आहे. मराठी गझलेचा विचार करता मराठी गझल 1920 पासून साहित्यक्षेत्रात अवतरली आणि आज पावेतो मराठी गझल शतकाकडे वाटचाल करते आहे असे लक्षात येते. या शकतभराच्या प्रवाहात गझल मराठीत रुजली असे आपण म्हणू शकतो तथापि तिची निकोप वाढ होण्यासाठी गझल या काव्यप्रकाराची साधक–बाधक चिकित्सा होणे गरजेचे आहे तसेच गझलेचा विविध परिप्रेक्षातून अभ्यास होणे अगत्याचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. *येवले विनायक, मराठी साहित्याचे समकालिन संदर्भ, अक्षरवामय प्रकाशन, पुणे, 2015, पृ. 9*
2. *विठ्ठल पी., मराठी कविता समकालिन परिदृष्य, कब्लास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 2019, प्रथमावृत्ती, पृ. 13.*
3. *वाईकर डॉ. विनय, गझलदर्पण, अमित प्रकाशन, नागपूर, 1988, पृ. 5.*
4. *नाडकर्णी डॉ. सुरेशचंद्र, गझल, मेहता पब्लिशिंग हाऊस, द्वितीय आवृत्ती, 2005.*
5. *भट सुरेश, रंग माझा वेगळा, (गझलेची बाराखत), विजय प्रकाशन, बारावी आवृत्ती, ऑक्टोबर 2018, पृ. 111.*
6. *डॉ. नदाफ अझिझ, मराठी उर्दू गझल रुप आणि छंद, सूर्या प्रकाशन, 2013, सोलापूर, पृ. 4.*
7. *सांगोलेकर डॉ. अविनाश, मराठी गझल 1920 ते 1985, किर्ती प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, पृ. 46.*
8. *तत्रैव, क्र. 6.*
9. *तत्रैव क्र. 7.*
10. *कुलकर्णी डॉ. द. भी., सुरेश भट नवे आकलन, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती, पृ. 2.*
11. *वाळके प्रमोद, संग्रामपिटक, भाग–5, (वामनदादा कर्डक यांची गझल) युगसाक्षी प्रकाशन, पृ. 5/8*
12. *पंडित डॉ. राम, मराठी गझल (अर्धशतकाचा प्रवास) (संपादन), साहित्य अकादमी, न्यु दिल्ली, प्रथमावृत्ती, 2014.*
13. *गणोरकर प्रभा, मराठीतील स्त्रियांची कविता, लोकवामयगृह, प्रथमावृत्ती, 2000, मलपृष्ठावरील मजकूर*

# समकालीन ग्रामीण वास्तवाचे प्रभावी चित्रण : 'पाडा'

**प्रा. डॉ. विजयेंद्र विश्वनाथ पाटील**
*गि.द.म.कला, के.रा.न.वाणिज्य व म.धा.विज्ञान महाविद्यालय, जामनेर*
*ता.जामनेर जि.जळगांव*

मराठी साहित्यात अनेक साहित्यप्रवाह उदयांस आले. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, मार्क्सवादी इ.या साहित्य प्रवाहांना साठोत्तरी साहित्य प्रवाह म्हणूनही ओळखले जाते. १९६० नंतर नवीन विषय, नविन आशयप्रधान लेखनघाट बोलीसह अवतरले. ग्रामीण साहित्यात पहिल्या पिढीतील लेखकांनी ग्रामीण माणूस रंजनात्मक, विनोदी ढंगाचा रंगवला सुरुवातीच्या काळात ग्रामीण साहित्यात कथा, कादंबरी लेखन पुष्कळ झाले. परंतु ग्रामीण साहित्यात ग्रामीण वास्तवाचे जीवन चित्रण फारसे सुक्ष्मपणे, परिणामकारक व गंभीरतेने सुरुवातीला झाले नाही. कारण पहिल्या पिढीतला लेखक हा शहरातील पांढरपेशा वर्गातील होता. त्यामुळे शहरातील एखाद्या तरुणाने बांधावर बसून शेती आणि शेतकऱ्यांचे जीवन रेखाटण्याचा कृत्रिम सदृश्य प्रकार सुरुवातीला झाला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षणाचा प्रसार झाल्याने ग्रामीण शेतकऱ्यांची, शेतमजूरांची मुल शिक्षण घेऊ लागली. शिक्षणाच्या निमित्ताने विविध साहित्य त्यांच्या वाचनात येऊ लागले. आपले जीवन या साहितात कुठे दिसत नाही हे त्यांच्या लक्षात आले. आपले जीवन, व्यथा, वेदना, प्रश्न, समस्या, बोली, भुप्रदेश हा साहित्याचा भाग व्हावा या उर्मीने नवसाहित्यिक निर्माण झाले. मराठी ग्रामीण साहित्यात नवसाहित्य निर्मिती प्रक्रिया सुरु झाली. ग्रामीण परिसर, शेती, शेतकरी, शेतकरी जीवन, शेतकरी समस्या, प्रश्न, निसर्ग, पशु हे सर्व नवसाहित्याकांसाठी ऊर्जाकेंद्र ठरले. १९६० ते १९८० या काळात विविध स्थित्यंतरे झाली. युध्द, दुष्काळ, भूकंप, अवर्षण या घटना साहित्य निर्मितीसाठी प्रेरक ठरल्या. परंतु १९९० नंतर जागतिक घडामोंडीचा परिणाम मानवी जीवनावर झाला. जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, या नवीन संज्ञांनी मानवी जीान ढवळून निघाले. १९९० च्या दशकातील लेखकांनी आक्रमकपणे व वास्तवतेच्या अनुषगांने ग्रामीण साहित्याची निर्मिती केली.

१९९० नंतरच्या बदलत्या जीवनशैलीची, विचारांची, जाणीवांची नोंद ठोसपणे साहित्यात अवतरलेली दिसते म्हणून १९९० नंतर निर्माण झालेल्या ग्रामीण साहित्याला समकालिन ग्रामीण साहित्य ही संज्ञा वापरलेली पहावयास मिळते. समकालीन म्हणजे एका काळाबरोबर असणे किंवा काळाशी समांतर असणे. साहित्य म्हणून आपण जेव्हा समकालिन साहित्याचा विचार करतो. त्यावेळेस ''समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या

काळाबरोबर आहे. ज्या कळात ते निर्माण होत असते त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे. त्या काळातील विचार, जाणीवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य''[१]

साधारणपणे १९९० नंतर निर्माण झालेल्या साहित्याला काळाचे विशिष्ट परिमान लाभले आहे. जागतिकीकरणाचा हा काळ म्हणून ओळखला जातो. मुक्त अर्थव्यवस्था हा काळ म्हणून ओळखला जातो. मुक्त अर्थव्यवस्था, मुक्त बाजारपेठा या सर्वांनी मानवी जीवन कसे व्यापले आहे. जागतिकीकरणाच्या या प्रभावाने शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेती हा येथिल लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. शेतीवर आधारित देशाची अर्थव्यवस्था आहे. पण जागतिकीकरण आणि मुक्त बाजारपेठेच्या धोरणामुळे शेती व शेतकरी अडचणीत सापडला. जागतिकीकरणाचे गाजर शेतकऱ्यांना दाखवून शेतकऱ्यांना नागवण्याचा प्रयत्न झाला. जागतिकीरणाचा प्रभाव ग्रामीण साहित्यीकांनी प्रामुख्याने आपल्या साहित्यात नोंदवला यालाच समकालीन ग्रामीण साहित्य असे म्हटले जाते. सदानंद देशमुख, वासुदेव मुलाटे, भास्कर चंदनशिव, अशोक कोळी, रविंद्र पांढरे, प्रकाश किनगांवकर, पांडुरंग सुतार, इंद्रजित भालेराव, रावसाहेब कुंवर, श्रीकांत देशमुख, आसाराम लोमटे या सारख्या साहित्यीकांनी आपल्या कथा, कविता, कादंबरी मधून जागतिकीकरणाचा शेतकऱ्यांच्या जीवनावर होणाऱ्या परिणामांची नोंद आपल्या साहित्यातून केली आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर साधारणपणे ५० वर्षे उलटूनही शेतकरी सुखी झाला नाही.'शेतकरी सुखी तर देश सुखी' यासारख्या घोषणा हवेस विरल्या आहे. शेतीला आधारभूत ठेवून अर्थसंकल्पात मोठ मोठया घोषणा केल्या जातात. शेतीसाठी पंचवार्षिक योजना आखल्या जातात पण तरीही शेतकऱ्यांची जीवनमान उंचावत नाही शेतकऱ्यांना मदत नको, शेतीसाठी पॅकेज नको तर शेतकऱ्याला हवा आहे फक्त त्याने घामाने कष्टाने पिकविलेल्या मालाला भाव, शेतीसाठी पाणी आणि वीज पण मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणामुळे शेतकरी हवालदिल झाला. त्याने पिकवलेल्या मालाला कवडीमोल भाव मिळाला. या सर्व बदलांची नोंद समकालीन ग्रामीण वास्तवाचे हदयद्रावक चित्रण अशोक कौतिक कोळी यांच्या २००६ ला प्रकाशित झालेल्या 'पाडा' या कादंबरीत केले आहे. अशोक कोळी यांनी प्रामुख्याने खानदेशातील केळी उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा कादंबरीत मांडली आहे.

शेती आणि शेतकरी यांचे नाते आई मुलाप्रमाणे आहे. काळया आईशी इमान राखत आपल्या घामाने शेतकरी या काळया आईची सेवा करतो.जगाचा पोशिंदा म्हणवून घेणाऱ्या या शेतकऱ्यांची व्यथा, वेदना परखडपणे 'पाडा' या कांदबरीतून मांडली आहे. समकालीन ग्रामीण वास्तवाचे प्रभावी चित्रण या कांदबरीतून केले आहे. १९९० नंतरचे बदलते ग्रामीण जीवन शहरीकरणाचा प्रभाव शासन, प्रशासन यतील वाढता भ्रष्टाचार अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणा या सर्व घटकांमुळे शेतकरी कसा व्यथित होतो व शेवटी तो आपले जीवन संपविण्याचा मार्ग

स्विकारतो. या समकालीन स्थित तरांचे प्रभावी चित्रण 'पाडा' कांदबरीतून पहावयास मिळते. ज्येष्ठ समीक्षक/लेखक रंगनाथ पठारे म्हणतात. ''सदानंद देशमुख यांच्या 'तहान', 'बारोमास' कांदबऱ्यांनंतर खेडयातील शेतकऱ्यांची परवळ इतक्या प्रभावीपणे मी तरी पहिल्यांदा अनुभवली. अशोक कोळी हे नव्या पिढीतील साने गुरुजींच्या महाराष्ट्रातील महत्त्वाचे कांदबरीकार आहेत.''२

समकालीन ग्रामीण साहित्याचा दृष्टीने 'पाडा' ही महत्त्वपूर्ण कांदबरी समाज वास्तव, सामाजिक घटना, संदर्भ यांचे वास्तव चित्रण केले आहे. खानदेशातच नव्हे तर संपूर्ण कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली आहे. 'पाडा' हे कांदबरीचे शीर्षक केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनाशी संबंधित आहे. 'पाडा' म्हणजे कापणीस तयार झालेली केळी, केळीचे घड कापून जेव्हा ते व्यापाऱ्यांना विक्रीसाठी दिले जातात. त्यासाठी 'पाडा' हा शब्दप्रयोग केला जातो.

खानदेशची केळी ही जगात प्रसिध्द आहे. केळी पट्टा म्हणून खानदेशचा भूभाग ओळखला जातो. परंतु याच खानदेशातील केळी उत्पादक अल्पभूधारक शेतकऱ्यांची व्यथा चांगदेव तापीकरच्या रुपाने 'पाडा' या कांदबरीतून मांडली आहे. चांगदेव तापीकर हा कांदबरीचा नायक संबंध खानदेशातील शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करतो.

सर्वसामान्य अल्पभूधारक केळीउत्पादक शेतकरी चांगदेव हा पिढयांन्पिढया शेती हा व्यवसाय करुन केळीचे उत्पन्न घेऊन आपला कुटूंबाचा गाढा ओढत असतो.पत्नी कमळाबाई, मुलगी सुनिता, मुलगा कैलास हे इतर कुटूंबातील सदस्य त्याला क्षेत्रीत मदत करत असतात. यासोबत घरात वावरणारी मांजर, पिंजऱ्यांतला राघू, शेतातील राखण करणारा कुत्रा, म्हैस, बैल हे सुध्दा चांगदेवच्या कुटूंबातीलच व जीवनातील महत्त्वाचे घटक असतात. आजही शेतकरी कशाप्रकारे जीवन जगतो त्याची कुटूंबव्यवस्था ही कशाप्रकारची असते हे चांगदेवच्या कुटूंबावरुन पहावयास मिळते. शेतकऱ्यांचे जीवन हे कसे कष्टप्राय असते.हाडची काडं, आन् रक्ताच पाणी करुन तो संसाराचा गाडा हाकतो अस्मानी सुल्तानी संकटांना सामोरे जातो. स्वाभिमानाने जीवन जगतो पण शेवटी जेव्हा शेतकऱ्यांचा स्वाभिमान, आत्मसन्मान हा जेव्हा व्यवस्थेच्या चौकटीत सापडतो तेव्हा तो शेतकरी स्वत:ला संपवू पाहतो तो व्यवस्थेचा बळी ठरतो.

चांगदेव तापीकर ही 'पांडा' कांदबरीचा नायक शेतीवर कुटूंबाचा गाडा हाकतो. मुलगी सुनिता हिच्या लग्नाच्या ठरावापासून चांगदेवच्या जीवनात ज्या समस्या निर्माण होतात त्या संपण्याचे नांव घेत नाही. हुंडयामुळे मुलीचे लग्न मोडते, मुलाला शिक्षण अर्धवट सोडावे लागते. म्हशीचा साप चावून मृत्यू होतो, पत्नीचे ऑपरेशन करावयाचे असते त्यासाठी बैल

विकावे लागतात घटनांमागून घटना चांगदेवच्या जीवनात घडतात. अशातच शेतात पिकवलेली केळी ही फेकावी लागते.

कष्टाने पिकवलेली केळी विकून कुटुंबाच्या गरजा भागविण्याचे स्वप्न चांगदेवचे भंगते केळी पिकवतांनाचे कष्ट विजेचा सतत होणारा लपंडाव, पाण्याची कमतरता, केंळीसाठी लागणाऱ्या खतांची काळाबाजार या सर्व संकटांवर मात करुन चांगदेवच्या केळीचा 'पाडा' निघतो पण, शेअर बाजारा प्रमाणे केळीचे भाव गडगडतात.व्यापाऱ्यांचा संप, ट्रक चालकांचा संप, सोसायटीचे राजकारण यामुळे पाडयातली केळी पिकण्याची वेळ येते या सर्वांनी व्यथित होऊन चांगदेवला केळी फेकण्या पलीकडे दुसरा मार्ग नसतो शेवटी चांगदेव 'केळी फेको' आंदोलन करतो रस्त्यावर उतरतो. मुलीचे लग्न हुंडयामुळे मोडले जाण्याचे दु:ख आधीच चांगदेवच्या मनात असते. यावरुन आजही समाजात हुंडयाचा प्रश्न किती बिकट आहे. अजून ही अनिष्ट प्रथा नष्ट होऊ शकली नाही. 'पाडा' या कादंबरीतून सामाजिक प्रश्नाचीही उकल करण्यात आली आहे.

दोन वर्ष रक्ताच पाणी करुन मोठया मेहनतीने आलेलं केळीच पिक त्या केळीच्या पिकावर मुलीचे लग्न, कर्ज, पत्नीचा दवाखाना अशा अनेक आशा त्यांच्या असतात. पण केळीने भरलेले ट्रक्टर घेऊन जेव्हा चांगदेव मार्केटला जातो. व्यापारी—आडते कवडीमोल भावात त्याची केळी मागतात. सोसायटी व्यापाऱ्यांप्रमाणे चालते. शेवटी चांगदेव हतबल होतो आणि केळी रस्त्यावर फेकतो. शेतकऱ्यांना आक्रोशाने संबोधून सांगतो,''महया शेतकरी भावान्हों! पिढयांपिढयांपासून सुरु असलेली शेतकऱ्यांची लूट थामली पायझे! दबावाला बळी न पडता कामा नाही. आपल्या मालाची किंमत आपनस ठरविली पायझे. आपला अधिकार हाय तो ! त्येंच्यासाठी आंदोलन उभारलं पायझे! ''[३]

पाहता पाहता चांगदेव तापीकर शेतकऱ्यांचा नेता बनतो. भांडवलदार, व्यापारी यांच्यामुळे शेतकऱ्यांना झुकावे लागते. भ्रष्ट शासन, प्रशासन, अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणा, व्यापारी व पिढयान्‌पिढया शेतकऱ्यांच्या नावावर निवडून येणारे राजकारणी नेते. या सर्वाविरुध्द चांगदेव पेटून उठतो. शेतकरी संघर्ष ही कांदबरीचा अर्पण पत्रिकेतूनच सूचित होतो. शेतकऱ्यांना सैनिक संबोधून त्यांच्यात लढाऊ वृत्ती लेखकाने निर्माण केली आहे.

''अन्यायाची दुस्सर झुगारुन
आंदोलनाचं रणसिंग फुकणाऱ्या
शेतकरी सैनिकांना.........'' [४]

समकालीन शेतकऱ्यांचे प्रश्न 'पाडा' या कांदबरीत पहावयास मिळतात. कादंबरीतील घटना, प्रसंग, वर्णन व कादंबरीचे खानदेशी तावडी बोलीतील संवाद निवेदन हे कांदबरीला

सकसपणे समकालीन प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करतात. आजही शेतकऱ्यांना सावकारी जाच, खते टंचाई, बाजारपेठा, व्यापारी आडते, वीज टंचाई या समस्यांना सामोरे जावे लागते.

'पाडा' कादंबरीच्या निमित्ताने खानदेशातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या, प्रश्न व समकालीन ग्रामीण वास्तवाचे प्रभावी चित्रण अशोक कोळी यांनी पहिल्यांदा केले. आहे.

**संदर्भ :—**


१. डहाके वसंत आबाजी, नवसाहित्य आणि नवसाहित्योत्तर साहित्य, पूर्वपीठीका, य.च.मु.वि.नाशिक पुनर्मुद्रण १२, पृ.क्र.२ व ३.
२. पठारे रंगनाथ — ज्यु.औ.स. २००६नवाक्षर दर्शन पृ.क्र.६
३. कोळी अशोक कौतिक — 'पाडा'— कादंबरी शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर प.आ.२००६पृ.क्र.१२.
४. तत्रैव — अर्पणपत्रिका.

# समकालीन स्त्रीवादी साहित्यप्रवाह

**प्रा. सौ. रश्मी रमेश देसाई**

*कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खारेपाटण, ता.कणकवली, जि. सिंधुदुर्ग*

*रा.राजापूर , प्रियदर्शनी वसाहत नं.२ ता.राजापूर, जि.रत्नागिरी. पिन कोड ४१६७०२*

*मोबा. नंबर- ७५२२९८८०१३/७४४७८०४५७५ ई-मेल : rashmidesai556@gmail.com*

**प्रस्तावना :–**

निसर्गाने समाजामध्ये जो लिंगभेद आहे ,तो स्पष्टपणे दाखविला आहे ,पण लिंगभावाची जाणीव समाज प्रत्येक व्यक्तीला करून देत असतो.स्त्रियांचे स्वतच्या वेगळेपणाची जाणीव प्रकर्षाने व्यक्त करणारे व स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. साहजिकच पुरुषी साहित्याहून ते स्वरूपता वेगळे ठरते .तथापि स्त्रीवादी साहित्य याचा अर्थ केवळ स्त्रीनिर्मित साहित्य नव्हे तर,पुरुषकेंद्री विचार व्युहातून मुक्त अशा परिप्रेक्ष्यातून कोणीही स्त्री वा पुरुषाने निर्माण केलेले साहित्य म्हणून स्त्रीवादी साहित्य असेही व्यापक अर्थाने म्हणता येईल .वास्तविक साहित्याच्या आविष्कारातील कोणत्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल ,कि मानव म्हणजे पुरुष स्त्री हे त्याचे उपांग ह्या विचारला छेद देणारे ,त्याबद्दल प्रश्न उपस्थित करणारे त्यात्तील जटिलता ,धूसरता यांची जाणीव करून देणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल .

बाईच्या असण्याचा ,होण्याचा म्हणजेच अस्तित्वाचा ,स्वत्वाचा व अस्मितेचा समग्रतेने वेध घेणारे तिच्या आत्मशोधाचा प्रवास वाड्मयीन अविष्कार म्हणून मांडणारे लेखन स्त्रीवादी म्हणता येईल.

**उद्दिष्टे :-**

१) स्त्री-पुरुष समानतेचे तत्व प्रस्थापित करणे .

२) स्त्रीवादाविषयी जाणीव-जागृती करणे.

३) स्त्री-ही एक माणूस आहे ही भावना प्रबळ करणे.

४) स्त्री पुरुषापेक्षा क्षमतेने मोठी आहे ,हे पटवून देणे.

५) स्त्री शक्तींचे महत्त्व पटवून देणे.

**स्त्रीवादी साहित्य -**

स्त्रीवाद ही एक समाजपरिवर्तन घडवू पाहणारी राजकीय जाणीव आहे.या स्त्रीवादी जाणीवेचा विवीध दृष्टीकोनातून भिन्न,भिन्न पातळ्यावरचा आविष्कार स्त्रीवादी साहित्यात आढळून येतो.उदारमतवादी, मार्क्सवादी ,समाजवादी,उत्तर-आधुनिक अशा अनेक विचार प्रणालीमध्ये स्वतची भर घालून, स्त्रीवादी भान स्त्री-पुरुष विषमतेच्या प्रश्नांची मीमांसा करते, म्हणून काळाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीवादाची भिन्न रूपे तर दिसतातच परंतु त्यांच्यात अनेकदा परस्पर विरोधही आढळून येतो. ह्याचेच प्रतिबिंब वेगवेगळ्या काळात लिहिल्या गेलेल्या स्त्रीवादी साहित्यात दिसते ह्या भिन्न भिन्न स्त्रीवादी साहित्य पुरुषांच्या आधाराशिवाय

स्त्रीच्या व्यक्तिमत्वाला परिपूर्णता येऊ शकते आणि प्रेमाइतकीच ,माणसासारखे जगण्याची भूक स्त्रीलाही असते हे दर्शविणारे आणि स्त्री म्हणून घडताना आलेल्या विविध अनुभवांना अभिव्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य.पुरुष प्रधानतेला विरोध करणारे आणि स्त्रीवादी माणूस म्हणून चित्रण करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय.

पाश्यात्य देशात स्त्रीवादाचा उदय साधारणपणे १९६०च्या आसपास झाला व भारतात स्त्रीवाद १९७५ नंतर रुजला,असे असले तरी स्त्रीवादी जाणीव तत्पूर्वी अस्तित्वात नव्हती असे मात्र नव्हते.व्यक्तिगत पातळीवर स्त्रियांना आपल्या वाट्याला आलेल्या दुय्यमत्वाची ,गौण स्थानाची जाणीव होतीच आणि ती त्यांच्या साहित्यांतून व्यक्तही होत होती पण आपला हा अनुभव व त्याचा आविष्कार व्यक्तिगत आहे,असे त्यांना वाटत होते,त्याला संघटीत चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते मात्र जे खाजगी आहे,ते राजकीय आहे हे भान स्त्रीजातीला आल्यानंतर स्त्रीवादी तत्वज्ञानाच उदय झाला.

**स्त्रीवादी जाणीव :-**

जगभर प्रदीर्घकाळ जी पितृसत्ताक समाजव्यवस्था अस्तित्वात आहे,त्या व्यवस्थेने जैविक लिंगभेदाला सांस्कृतिक लिंगभेदाचे रूप दिले.आपले हितसंबंध जोपासण्यासाठी स्त्री-पुरुष यांच्यात एक विशिष्ट सततसंबंध रचला.या सतत संबधात स्त्रीला गौण व दुय्यम ठरविले गेले.स्त्रीचा स्वभाव, लक्षणे ,कार्यक्षेत्रे ,कर्तव्य या सत्तेने निश्चित केली व स्त्रीवर लादले या गोष्टीची जाणीव म्हणजे स्त्रीवादी जाणीव होय.'स्त्री ही स्त्री म्हणून जन्मत नाही,तर ती घडविली जाते.हे फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सिमॉन द बोव्हारचे विधान म्हणजे स्त्रीवादी जाणिवेचे महत्त्वाचे प्रमेय आहे. स्त्री-पुरुष विषमतेचे भान येणे ,ही या जाणिवेची पहिली अवस्था होय. पुरुष रचित स्त्रीत्वचा कल्पनेला नकार देणे ,ही या जाणिवेची दुसरी अवस्था ,तर एक व्यक्ती म्हणून स्वतचा शोध घेता घेता स्त्रीत्वाचा शोध घेणे ही स्त्रीवादी जाणिवेची अंतिम अवस्था होय. या अवस्थामधून जात असताना स्त्री-पुरुष समतेच्या तत्वावर आधारलेल्या नवसमाजाची निर्मिती करणे ,हे स्त्रीवादाचे उद्दिष्ट आहे.स्त्रीवादी जाणीवेच्या या तिन्ही अवस्थांचे आविष्कार वाड्मयतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर ,वेगवेगळ्या कालखंडात आढळून येतात.

स्त्रियांच्या साहित्यातील वेगळेपण शोधून त्यांची चिकित्सा करण्याचे कार्य गेल्या काही वर्षात स्त्रीवादी समीक्षकांनी केले आहे. स्त्रियांचे स्त्रियांनी केलेले चित्रण ,स्त्रियांचे खास वेगळे अनुभव व विषय यांचे स्त्रीवादी दृष्टीकोनातून दर्शन घडविणारे साहित्य,स्त्रीच्या स्त्रीत्वाचा शोध घेऊ पाहणारे ,स्वत्वाच्या जाणीवेने केलेले आत्मप्रकटीकरण व आत्मशोध ह्या स्त्रीवादी साहित्याच्या वेगवेगळ्या दिशा आहेत.स्त्रीवादी समीक्षा ही अशा अनेक दिशीय,बहुजिनसी स्वरूपाच्या स्त्रीवादी साहित्याचे विवेचन-विश्लेषण करून त्यातील स्वत्वाचा , वेगळेपणाचा शोध घेऊ पहाते.

स्त्रीवादी साहित्य व स्त्रीवादी समीक्षा हे प्रकार स्त्रीमुक्ती चळवळीतून उदयाला आले. सिमॉन द बोव्हारने लिहिलेल्या 'द सेकंड सेक्स' या ग्रंथापासून स्त्रीमुक्ती चळवळीचा प्रारंभ झाला,असे मानले जाते.स्त्रीवादी साहित्यात एक अभिजात ग्रंथ म्हणून तो मान्यता पावला आहे. शास्वत स्त्रीत्व ही पूर्वग्रहदुषित संकल्पना समाज जीवनातून हद्दपार करण्यासाठी तिने या प्रबंधातून बौद्धिक व भावनिक पातळीवर

युक्तिवाद मांडले. पुरुष प्रधान समाज व्यवस्थेत व पुरुषी मूल्यांच्या चौकटीत स्त्रीही पुरुषाशी अनेक नात्यांनी आखडून ठेवली जाते. त्यात ही पुरुष हा मुख्य व स्त्री ही दुय्यम असा विषम भाव आहे. स्त्री-पुरुषातील ही विषमता जीवशास्त्रीय वा दैवी नसून ती संस्कृती निर्मित आहे. दोघांत इतर कुठलाही भेद नसताना केवळ नैसर्गिक शारीरिक रचनेतील भेदामुळे स्त्रीला दुय्यम स्थान दिले. तिला स्वतःच्या मुल्यांची निर्मिती करता येत नाही. या पार्श्वभूमीवर जन्मतःच कोणी 'स्त्री' असत नाही तर स्त्रीत्व हे समाजाने, संस्कृतीने घडविले असते – अशा आशयाचे सिमॉन द बोव्हारचे विधान संस्कृती निर्मित स्त्री-पुरुषभेदावर स्त्रीच्या दुय्यम स्थानावर अचूक शरसंधान करणारे आहे. अर्थातच स्त्री-पुरुष शरीरभेद इथे नाकारायचा नाही. परंतु स्त्री-देहाबरोबरच तिचा लाजाळूपणा, विनयशीलता, नाजुकपणा, भावना प्रधानता, मातृभाव, स्वार्थत्याग, समर्पण वगैरे तिला बहाल केले जाणारे गुण हे जन्मजात असतात, हे येथे नाकारावयाचे आहे. हे गुण समाजाने व संस्कृतीने स्त्रीत्वावर लादलेले असतात. तेव्हा जैविक लिंग भेद म्हणजे सांस्कृतिक लिंगभेद नव्हे, हे या स्त्रीवादी भूमिकेने स्पष्ट केले. २०व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रीवादी चळवळीला एक सखोल तत्वज्ञानात्मक परिणाम लाभले.

पाश्च्यात देशात १९व्या शतकाच्या अखेरच्या कालखंडात स्त्रीवादी साहित्य प्रभावीपणे जोम धरू लागले. शार्लट गिलमन ही स्त्रीवादी लेखिका, व्याख्याती व सिद्धांतकार ह्या काळात जगभर नावाजली गेली. 'विमेन अँड इकॉनॉमिक्स' ह्या तिच्या विख्यात ग्रंथात तिने स्त्रीच्या आर्थिक स्वावलंबनावर व स्वातंत्र्यावर विशेष भर दिला. स्त्रीच्या लैंगिकतेला व मातृत्वाला जास्त प्राधान्य दिले गेल्याने तिच्या सामाजिक व आर्थिक क्षमताना हानी पोहोचली आहे. आणि आर्थिक स्वावलंबन हेच तिला खरे स्वातंत्र्य मिळवून देईल, असे आग्रही प्रतिपादन त्या काळात तिने केले. स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भात तिची उल्लेखनीय कामगिरी म्हणजे 'द यलो वॉलपेपर' ही तिची अत्यंत गाजलेली लघुकथा. तिची ही कथा आणि व्हर्जिनिया वुल्फाचा 'ए रूम ऑफ वन्स ओन' हा निबंध म्हणजे स्त्रीवादी साहित्यातील एक महत्वाचा टप्पा मानला जातो. स्त्री वा पुरुष असण्यातील निरर्थकता दाखवून, सांकेतिक व साचेबद्ध व्यक्तित्वाच्या समाजमान्य संकल्पना नाकारणारे हे लेखन बंडखोरीचा आदय अविष्कार घडविणारे आहे.

अमेरिकन स्त्रीवादी समीक्षिका ॲलन शोवॉल्टर हिने स्त्रीवादी समीक्षेचे प्रारंभिक अवस्थेतील आद्य प्रारूप विकसित केले. इंग्रजी वाड्मयातील उपेक्षित स्त्रीलेखिका शोधून काढून त्यांना समीक्षेतून न्याय दिला. १८व्या शतकातील ब्रिटीश स्त्री कादंबरीकारांच्या लेखनातून तिला जे तीन प्रवाह दृष्टोत्पतीस आले. त्यांचे तिने तीन टप्प्यात वर्गीकरण केले. केवळ स्त्रियांनी केलेले लेखन पुरुषसत्ताक समाजात गौणत्व स्वीकारून जगणाऱ्या स्त्रियांनी त्याबद्दल राजकीय भूमिका न घेता केलेले लेखन आणि पुरुषसत्ताक वा लिंगवादी समाज व विचार सरणी यांच्या विरुद्ध ठाम राजकीय दृष्टीकोन स्वीकारून स्त्रियांनी केलेले लेखन असे या तीन टप्प्यांचे स्वरूप तिने विशद केले. स्त्रियांच्या लेखनाचा असा वेगळा स्वतंत्र विचार करणाऱ्या समीक्षेला ॲलन शोवॉल्टरने गायनोसेट्रीक फेमिनिस्ट क्रिटीसिझम व समीक्षकाला गायनेक्रिटीक असे म्हटले आहे. स्त्रीवादी समीक्षेचा 'वाचाकस्त्री' असा वेगळा घटकही तिने मानला आहे. स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रियांच्या लेखन

परंपरेचा इतिहास सिद्ध करण्याचे जे प्रयत्न झाले, त्यातून एक स्त्रीकेंद्र साहित्यप्रवाह निर्माण करून. स्त्रियांमध्ये भगिनीभाव निर्माण करून, पुरुषप्रधान संरचनेला हादरवून टाकण्याचा हा राजकीय प्रयत्न आहे.

सँड्रा गिल्बर्ट व सुसान ग्युबर यांनी 'द मॅड वूमन इन द ॲटिक : द वूमन रायटर अँड द नाईनटीथ सेंचुरी लिटररी इमॅजीनेशन' या ग्रंथात १९ व्या शतकातील लेखिकांच्या साहित्याचे विश्लेषण करून स्त्रीवादी काव्यशास्त्राची मांडणी करणारे विवेचन केले. पुरुषांनी साहित्याच्या क्षेत्रामध्ये दडपशाही करून स्त्रियांची मुस्कट दाबी केली आहे. या पुरुषी अत्याचाराला स्त्रियांकडून विविध प्रकारच्या प्रतिक्रिया मिळाल्या आहेत. या प्रतिक्रिया व त्यामागची मानसिक प्रक्रिया समजून घेण्यासाठी तार्किक अनुबंध तयार करणे, हे स्त्रीवादी काव्यशास्त्राचे प्रमुख उद्दिष्ट या लेखिकांनी मानले. गिल्बर्ट व ग्युबर यांना इंग्रजी लेखिकांच्या साहित्य कृतीत दबलेल्या रागाचा स्फोट करणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा बऱ्याच आढळल्या मॅडवूमन म्हणजे विद्रोह करणारी, उद्वेगाने सर्व उध्वस्त करायला निघालेली स्त्री. पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेत उपेक्षित व एकाकी अवस्थेत जगणाऱ्या व शेवटी संतप्त होऊन स्वतःलाच घेणाऱ्या स्त्रिया ही मॅड वुमनची रूपे केवळ स्त्रीवादी साहित्यातच दिसतात, असे गिल्बर्ट-ग्युबर यांचे प्रतिपादन आहे.

लेखिका बनू पाहणाऱ्या स्त्रीला १९व्या शतकातील पितृसत्ताक व पुरुष प्रधान समाज चौकटीमध्ये वेडसर मानले जाई, असा त्यांचा दावा होता. पाश्च्यात देशात स्त्री-मुक्ती चळवळ वेगाने फोफावली व तिचाच एक भाग असलेली स्त्रीवादी साहित्य समीक्षा वेगवेगळ्या अंगोपांगावर भर देत विकास पावली. उदा. इंग्रजी स्त्रीवादी समीक्षेने स्त्रियांच्या शोषणावर भर देऊन मार्क्सवादी दृष्टीकोन स्वीकारला. फ्रेंच स्त्रीवादी समीक्षेने विरचनावादी पद्धती स्वीकारून मुख्यत्वे भाषिक अंगाने स्त्रीवादी साहित्याचा वेध घेतला. तसेच मानसशास्त्रीय भूमिकेतून स्त्रीवादी साहित्यातून प्रकटनाऱ्या स्त्रीच्या मानसिक कोंडमाऱ्याचे परवेशतेचे विश्लेषण केले. अमेरिकन स्त्रीवादी समीक्षेने पाठ चिकित्सक पद्धतीवर भर देऊन स्त्रियांच्या वाङ्मयीन आविष्कारांचा शोध घेतला. हे सर्व प्रकार स्त्री साहित्याचा स्त्रीवादी भूमिकेतून अभ्यास करणारे आहेत. केट मिले, बेट्टी फ्रेडीन, जर्मन ग्रीअर या लेखिकांनी समाजातील सांस्कृतिक घटकांची अन्वयार्थ लावून समकालीन सामाजिक स्थितीतील स्त्रियांच्या सांस्कृतिक कुचंबनेचा व दडपणुकीचा अर्थस्पष्ट केला. पुरुषप्रधान व पित्तृसत्ताक व्यवस्थेचे त्यामागचे राजकारण स्पष्ट केले आणि ही पुरुषी सांस्कृतिक दडपशाही नष्ट करण्यासाठी स्त्रीवादी समीक्षेची आवशक्यता प्रतिपादन केली.

इंग्लंडमध्ये मेरी वूलस्टोन क्राफ्ट हिने 'थॉट्स ऑन द एज्युकेशन ऑफ डॉटर्स' आणि 'अ व्हिंडिकेशन ऑफ द राईट्स ऑफ विमेन' ही पुस्तके तसेच 'मेरी: अ फिक्शन' ही कादंबरी लिहून शैक्षणिक व सामाजिक पातळीवर स्त्री-पुरुष समतेचे तत्व प्रतिपादन केले. मेरी वूलस्टोन क्राफ्ट पासून बेटी फ्रीडन पर्यंतच्या स्त्रीवादी चळवळीच्या मागण्यांना उदारमतवादी बैठक आहे. बट्टी फ्रिडनचे 'फेमिनिनमिस्टीक' हे पुस्तक नव्या स्त्रीवादी चळवळीसाठी पायाभूत मानले जाते. १९७० सालापर्यंत ही चळवळ स्थिरावली. केट मिलेटच्या 'सेक्शुअल पॅलिटिक्स' या पुस्तकात मान्यवर पुरुष लेखकांच्या साहित्य कृतीतून स्त्रीप्रतिमांचे साचेबद्ध, सांकेतिक चित्रण कसे केले जाते, ह्याचे धारदार विश्लेषण केले आहे. हे पुस्तक जहाल स्त्रीवादी

विचारसरणीचा प्रारंभिक बिंदू मानले जाते. जर्मन ग्रीअरचे 'द फिमेल यूनक'हे पुस्तकही सामाजिक सांस्कृतिक स्त्रीवादी समिक्षेच्या संदर्भात महत्त्वाचे मानले जाते.

स्त्रीवादी फेंच लेखिका जुलिया क्रीस्तोवा (१९४१) हिच्या मते बाई किंवा स्त्री या शब्दाची रूढ व्याख्या स्वीकारणे आणि आपण बाई किंवा पुरुष आहोत हे मान्य करणे ,ह्यातच एक प्रकारची अर्थशून्य विसंगती आहे. स्त्रियांचे स्थान परीघावर असते,अशी मांडणी पुरुषप्रधान मूल्यव्यवस्था उलथवून टाकण्याचे प्रयत्न करणारे साहित्यच स्त्रीवादी साहित्य मानले पाहिजे अशी टोकाची आग्रही भूमिका घेतली जाते.क्रीस्तेववादी विचार सरणीनुसार अस्मिता व अस्मितेचे राजकारण हे संशयास्पद आहे. मूलतः बाईपणा व त्यातून लिहिले गेलेले साहित्य असे काही नसतेच. क्रीस्तेवान मुलाच्या भाषापूर्व अवस्थेत आईवर पूर्णपणे निर्भर असण्याच्या टप्प्याला सेमेॲटिक भाषा आणि नंतरच्या समाजात तो मिसळल्यानंतरच्या टप्प्याला सिबॉलिक व्यक्त भाषा अशा संज्ञा वापरल्या आहेत. या संकल्पना तिने व्यक्तिमत्वाशी जोडल्या आहेत. थोडक्यात समाजातील माणसांशी जुळवून घ्यायची समाजाच्या नीतीनियमांची भाषा सिबॉलिक तर स्त्रीची एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःच्या मनाची, शरीराची भाषा ही सेमेॲटिक अशा प्रकारचे भाषिक प्रतिमान क्रिस्तेवाने स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भात सुचवले आहे व या दोन्ही भाषांचा समन्वय स्त्रीवादी साहित्यात साधला जावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

स्त्री जातीपर झालेल्या जुलुमाच्या कारणांची मीमांसा करताना व स्त्रीवरील अन्यायाचा परिहार करण्याचे उपाय सुचविताना स्त्रीवादी विचारवंतांनी विविध दृष्टीकोन स्वीकारले आहेत, त्यामुळे स्त्रीवादी विचारसरणीचे विविध प्रवाह निर्माण झाले. यातील काही प्रमुख प्रवाह असे उदार मतवादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद, समाजवादी स्त्रीवाद, आणि कृष्णवर्णीय स्त्रीवाद ह्या विविध स्त्रीवादी प्रवाहांचे प्रतिबिंब स्त्रीवादी साहित्य व समीक्षेत वेळोवेळी उमटले आहे. आज पाश्च्यात देशांतील स्त्रिया कलावंत म्हणून आपल्या बाईपणातून वेगळे शहाणपण आत्मशक्ती गवसल्याचा दावा करीत आहेत. त्यात कृष्णवंशीय स्त्रियांच्या लेखनाने फार मोलाची भर घातली आहे.

भारतातील स्त्री-लेखनाची परंपरा जाणीवपूर्वक एकत्र आणून ,भारतीय स्त्रियांच्या लेखनाचा इतिहास निर्माण करण्याची स्त्रीवादी प्रयत्न विमेन रायटिंग इन इंडिया ६०० बी.सी.टू द प्रेझेंट खंड १ व २ या ग्रंथाने केला. विविध कालखंडातील स्त्रियांनी लिहिलेले तेरा भारतीय भाषांतील १४० साहित्यिक वेचे त्यात आहेत. त्यातून अगदी बुद्धकालीन थेरीगाथा पासून भक्तीकाळातील स्त्रियांचे लेखन ,आधुनिक काळातील स्त्रियांची चरित्रे ,आत्मचरित्र व वर्तमानकालीन बंडखोर लेखन एकत्र सापडते. प्रस्थापित पुरुष प्रधान मूल्यव्यवस्थेचा प्रतिकार करणारे वा ती उलथवून टाकण्याची शक्यता व शक्ती दाखवून देणारे विपुल व वैविध्यपूर्ण स्त्री-साहित्य भारतीय भाषांमध्ये दिसते.

**स्त्रीवादी - मराठी साहित्य :–**

मराठी साहित्यात साधारणत: १९६० नंतरच्या दशकात स्त्रीवादी साहित्य जाणीव पूर्वक लिहिले जाऊ लागले आणि ७०-८० व नंतरच्या दशकातही स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह काव्य,कथा,कादंबरी अशा प्रकारात जोमाने विकसित होऊ लागला. मात्र तत्पूर्वीही स्त्रीकेंद्री साहित्याची निर्मिती अगदी प्राचीन

काळापासून मौखिक वा लिखित स्वरुपात होत होती,असे दिसून येते. स्त्रियांच्या साहित्याचे मूळ प्राचीन काळापर्यंत जाऊन पोहचते. स्त्री आपल्याशीच किंवा आपल्या सारख्याच दुसरीशी चाललेल्या संवादातून 'बाई असण्याचा' ,'बाईपणाचा' अर्थ व्यक्त करीत आली आहे. मराठी लोकगीतात हा स्त्रीत्वाचा स्वर सतत एकू येतो. अन्याय,बंधने,शिक्षा,दंड ,तक्रार ,शोषण,पुरुषांकडून मिळणारी अन्यायकारक व अपमानास्पद वागणूक ,सततची अवहेलना व उपेक्षा ,इजा,आपल्याकडून चूक घडेल का ह्याची स्त्रीला वाटणारी धास्ती इत्यादी स्त्रियांच्या अनुभव विश्वाच्या कक्षेतील अशा अनेक भावना आणि तथ्ये त्यांनी लोकवाड्मयातून शब्दांकित केलेली दिसतात. समाजाने दुर्लक्षित केलेले हे वाड्मय स्त्रीवाद समीक्षकांनी शोधून त्यावर नवा प्रकाश टाकला आहे. मराठीत तारा भवाळकर, कुमुद पावडे, सरोजिनी बाबर इत्यादींनी लोकगीतांचे संशोधन केले आहे. महाराष्ट्रातील महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई इत्यादींनी तसेच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक इत्यादी लेखिकांनी ललित व वैचारिक पातळीवर स्त्री-पुरुष विषमतेचे, पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेचे, तसेच स्त्रियांवरील अन्याय, जुलूम, शोषण व त्यातून स्त्रियांना भोगावी लागणारी दु:खे, वेदना यांचे प्रभावी चित्रण केले आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुषतुलना' ह्या ग्रंथात पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेत स्त्रियांच्या होत असलेल्या शोषणाविरुद्ध लिहून, स्त्रीपोषणाचे विश्लेषण करणारी सैद्धांतिक मांडणी केली. विभावरी शिरुरकर यांच्या लिखाणातही पुरुषांकडून स्त्रीच्या शारीरिक व मानसिक पातळीवर होत असलेल्या शोषणाची जाणीव व्यक्त झाली आहे. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'भरली घागर' कवितेत स्त्री-पुरुष भेदावर भाष्य आहे. तर स्मृतिचित्रेमध्ये विनोदाच्या, उपरोधाच्या अंगाने स्त्री-पुरुष विषमेचे चित्रण आहे.

विसाव्या शतकातील आधुनिक स्त्रीवादी साहित्यात कमल देसाई, गौरी देशपांडे, शांता गोखले, कविता महाजन, प्रिया तेंडूलकर, नीरजा यांच्या कथा-कादंबऱ्यांनी मोलाची भर घातली आहे. कमल देसाईच्या 'काळासूर्य' आणि 'हॅट घालणारी बाई' या कादंबरीत प्राचीन मिथ्यक यांना नवे स्त्रीवादी अर्थ दिले आहेत. आशा बघे यांची 'भूमी' ही कादंबरी तसेच प्रिया तेंडूलकरांच्या कथा यांचे मूल्यमापन भारतीय स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून करता येते. कविता महाजन यांची 'ब्र' ही कादंबरी भारतीय व समाजशास्त्रीय अशा द्वितीय स्त्रीवादी दृष्टीकोनातून अभ्यासता येते. मेघना पेठे यांच्या लिखाणात मुक्त जीवन पद्धतीचा बिनधास्त जीवनशैली यांचा पुरस्कार आढळतो. नीरजा ह्या अलीकडच्या स्त्रीवादी साहित्यप्रवाहातील एक प्रमुख व महत्वाच्या कवियत्री व कथाकार असून, स्त्रीवादी जाणिवांचे विविध पैलू यांनी वास्तववादी चिंतनशील पद्धतीने व्यक्त केले आहे.

साठोत्तरी कालखंडात १९७०-८० च्या दशकात व नंतरच्या काळातही काव्यनिर्मिती करणाऱ्या अनेक कवयित्रींनी स्त्रीवादी काव्याचे दालन समृद्ध केले आहे. स्त्रियांच्या आत्मकथानांनी स्त्रीवादी साहित्यात

मोलाची भर घातली आहे. उदा. सुनिता देशपांडे यांचे ‘आहे मनोहर तरी’ कमल पाध्ये यांचे ‘बंध अनुबंध’ ही आत्मकथने उल्लेखनीय आहेत.

दलित स्त्रियांची आत्मकथने ही स्त्रीवादी साहित्यातील एक महत्वाचा दस्तऐवज आहे. बेबी कांबळे ‘जिणे आमचे’, कुमुद पवाडे -‘अंतःस्फोट’, शांताबाई कांबळे -’माज्या जलमाची चित्तरकथा’ उर्मिला पवार -‘आयदान’, सिंद्धुताई सपकाळ – ‘मी वनवासी’ इत्यादीचे स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भात महत्वाचे योगदान आहे. भारतीय व समाज शास्त्रीय अशा दुहेरी स्त्रीवादी भूमिकांतून त्यांचे मूल्यमापन होणे गरजेचे आहेत.

**निष्कर्ष :** –

स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे चित्रण हे वास्तवातील त्यांच्या नात्यातील स्वरूपा प्रमाणे आहे. जोपर्यंत स्त्रियांचा वापर केवळ एक वस्तू म्हणून होतो, जोपर्यंत तिच्याकडे एक व्यक्ती म्हणून बघितल जात नाही, नात्यात तणाव आहेत तोपर्यंत साहित्यात तसचं चित्रण येणार.

खर तर स्त्री हिच स्त्रीची शत्रू असलेली मोठ्या प्रमाणात दिसते. समाजातील स्त्रीचे नाते संबंध बघितले तर आज शिक्षण घेऊनही २१व्या शतकातही सासू-सून, नणंद-भावजय, जाऊ-जाऊ ही नाती भांडतानाच दिसतात. या नात्यात मैत्री होणे, जिव्हाळा येणे गरजेचे आहे. स्त्रीने प्रथम स्वतःला ओळखून दुस-या स्त्रीला समजून घेतले पाहिजे. या नात्यातील दरी जेव्हा संपेल तेव्हाच स्त्रीवाद प्रगती करेल. आज स्त्रीने इतरांशी स्पर्धा करण्यापेक्षा स्वतःशीच स्पर्धा केली पाहिजे. स्वतःच अस्तित्व ओळखून शिक्षणाच्या सामर्थ्यावर स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. स्त्रीने स्वतःला प्रामाणिकपणे ओळखणे हीच आज खरी गरज आहे. स्त्रीवादामध्ये देखील हेच अपेक्षित असलेले दिसते.

**संदर्भ साहित्य :–**

*१) स्त्रीजन्माची वाटचाल – भागवत विद्‌युत*
*२) स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन – वरखडे मंगला*
*३) स्त्रीवादी कादंबऱ्या – सारडा शंकर*
*४) भारतीय संदर्भातून स्त्रीवाद – नाईक शोभा*
*५) स्त्री मुक्ती आंदोलन स्त्रीवाद स्त्रीवादी साहित्य समीक्षा*

## समकालीन मराठी ग्रामीण कविता

**प्रा. डॉ. राजकुमार मुसणे**

*महात्मा जोतीबा फुले महा.आष्टी, जि.गडचिरोली ९४२४६३९५३२*

**प्रास्तविक -**

समकालीन ही संज्ञा गतिमानतेशी संबंधित आहे. वर्तमान जीवनानुभव ,नव्या प्रवृत्ती या ज्या कलाकृतीतून आविष्कृत होत असतील त्याला समकालीन म्हटलं जातं. अर्थात " आपल्या आणि आपल्या आसपासच्या बदलत्या कालखंडातील व्यक्ती, घटना ,प्रसंग ,जीवन -जाणिवा, विचारप्रणाली, भावानुभूती यांचे जीवन चित्रण युगभान सांभाळून ज्या साहित्यात केलेले असेल ते समकालीन साहित्य"१ वर्तमान काळाशी संबंधित प्रश्न-समस्याना उजागर करणारे समकालीन साहित्य काळाच्या कसोटीवर टिकून राहते. डॉ. वसंत आबाजी डहाके म्हणतात "समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे, ज्या काळात निर्माण होत असते त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे. त्या काळातील विचार ,जाणिवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य "२ समकालीन होय.

समकाळ हा सामाजिक , धार्मिक ,राजकीय , सांस्कृतिकदृष्ट्या गुंतागुंतीचा, जटील व आव्हानात्मक आहे. क्षणाक्षणाला बदलणारा असा हा वर्तमान आहे. जागतिकीकरण , भांडवलशाही, आर्थिक उदारीकरण, जीवघेणी स्पर्धा ,तीव्र बदलांना सामोरे जाणारी पिढी ,आंतरराष्ट्रीय स्तरावरसुद्धा क्रांतिकारी बदल,दहशत आणि आनिश्चिततेचे सावट,चंगळवादी दृष्टिकोन ,स्वैराचार, आभासी वास्तव, अस्थिरता, माहिती तंत्रज्ञानासह इंटरनेट, सोशल मीडियातील आमूलाग्र क्रांती ,मध्यमवर्गीयातील आर्थिक स्थैर्य , क्षणाक्षणाला बदलणारा वर्तमान असे एकूण समकालाचे स्वरूप आहे. अर्थातच मूल्यबदलाचा असा व्यामिश्र व गुंतागुंतीचा समकाल आहे. उपरोक्त समकालीन बाबींचा प्रभाव साहित्यावर पडून जे साहित्य निर्माण झालेले आहे,ते साहित्य हे समकालीन आहे.अर्थातच समकाळातील जीवनदर्शन, प्रश्न-समस्या, जीवन-जाणीवांचे दर्शन घडविणारी कविता समकालीन कविता होय.

ग्रामीण माणसांच्या अंतर्मनातल्या जीवन-जाणिवांचे ,सुख-दुःखाचे ,अडचणीचे ,प्रश्न -समस्यांचे ग्रामीण संवेदनशीलतेने केलेले चित्रण म्हणजेच ग्रामीण कविता होय.

कृषी संस्कृती, कृषिकेंद्रित निसर्ग निष्ठा, गावगाड्यातील प्रश्न-समस्या, शोषण ,अन्याय-अत्याचार ,आणि जागतिकीकरणामुळे बदलत्या ग्राम वास्तवाचं प्रतिंबिंब प्रामुख्याने ग्रामीण कवितेमध्ये आहे.सदर लेखात २०१० ते २०२० या काळातील ग्रामीण कवितेचा विचार केला आहे.

या समकाळात ग्रामीण जीवनावर लिहिणाऱ्या कवींची संख्या ही लक्षणीय आहे .इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख ,केशव सखाराम देशमुख, जगदीश देशमुख, केशव वसेकर ,कल्पना दुधाळ, संतोष पवार, ऐश्वर्य पाटेकर, धनराज खानोरकर , बालाजी मदन इंगळे गणेश मरकड ,श्रीराम गव्हाणे ,रवी कोरडे, किशोर

कवठे,अविनाश पोईनकर,अनंता सूर,राम वासेकर,रत्नाकर चटप,रामकृष्ण भोगे, अनंता सूर,बंडोपंत बोढेकर हे कवी समर्थपणे ग्रामजीवन आविष्कृत करीत आहेत.

अस्सल ग्रामजाणीवा समर्थपणे अभिव्यक्त करणाऱ्या इंद्रजित भालेराव यांचा ' भूमीचे मार्दव'३ या संग्रहामध्ये निसर्ग ,शेती आणि ग्रामीण जीवन यांच्याशी अनुबंध राखणाऱ्या कविता आहेत. विविध पिकांची माहिती, संकेत, पिकांना पडलेली नावे ,भूमी आणि भूमीतील विविध रूपे साकार झालेली आहेत. उगवणाऱ्या पिकांचा स्वभावधर्म ,प्रचंड परिश्रम करणाऱ्या शेतकऱ्यांची व्यथा मांडताना इंद्रजित भालेराव लिहितात

'उत्पादित केलेल्या पिकांवर मात्र व्यापाऱ्याचा नंबर' असतो .शेतकरी हा केवळ काबाडाचे धनी असल्याचे वास्तव

"पान केळीचे फाटले
आणि कुणी दुकान थाटले" पृ.२१

रेखाटत शेतकऱ्यांची वाताहत स्पष्ट करून बाजारातील व्यापारी दलालांची वाढती मक्तेदारी व हतबल शेतकरी चित्रित केला आहे .परिश्रम करणाऱ्या शेतकऱ्याला अत्यल्प दाम व उर्वरित नफा मात्र या व्यापाऱ्याना. परिणामी शेतकऱ्यांचे दारिद्र्य हे पाचवीला पुजलेले असल्याचे विदारक वास्तव कवीने रेखाटले आहे.

ग्रामीण संवेदनशीलता उत्कटपणे 'मेलं नाही अजून आभाळ' ४ मधून आविष्कृत करणारे कवी बालाजी मदन इंगळे ..

"कष्ट ,वेदना, बैलासोबतचा नांगरटीतला युगांचा प्रवास,
इंटरनेटवर अपलोड करावा म्हणतो " पृ.२५

बालाजी मदन इंगळे यांची कविता सुद्धा ग्रामीण संवेदना अत्यंत प्रत्ययकारीपणे प्रकटणारी आहे. 'मेलं नाही अजून आभाळ ' कवितासंग्रह समकालीन ग्रामीण कवितेतील मैलाचा दगड आहे.

"सजून बसली तिफन आसूसून गेली माती ,
नक्षत्रावर नक्षत्र गेली
कोरड्या ढगांची दिंडी आली आणि गेली,
आता पिशवीतील बियाण्यांची पोत्यातील डीएपीची
एक्सपायरी डेट संपण्याआधी आणि
सगळ्या जीवांची तडपड होण्याआधी पोरा,
तिकडचा थोडा पाऊस इकडे इ मेल कर" पृ.५७

दुष्काळ ,कोरडे नक्षत्र, पर्यावरणावर एकूण प्रदूषणाचा प्रभाव झाल्यामुळे पाऊस कमी होणे, या सर्व बाबी डोळ्यासमोर ठेवत बालाजी इंगळे यांची कविता जागतिकीकरणाच्या संदर्भात महत्वपूर्ण असून मुलास तिकडच्या पावसाचा ई-मेल करण्यास सांगणारी ही कविता शेतीच्या बदलत्या पर्यावरणाचा आलेख मांडणारी प्रयोगशील, आशयघन, चिंतनगर्भ स्वरूपाची आहे. बालाजी इंगळे यांच्या कवितेने मराठी

ग्रामीण कवितेच्या कक्षा रूंदावत समकाळाचे तीव्र आकलन मांडणारी उल्लेखनीय कविता आहे.तद्वतच ना धो महानोर हे 'वाहाटूळ' संग्रहात बदलत्या ग्रामविशवाचे विविध पदर उलगडतात.

ग्रामजीवनाचा सखोल अभ्यास असणारे समकालीन संवेदना उजागर करणारा कवी ऐश्वर्य पाटेकर यांच्या 'भूईशास्त्र' हा संग्रह जागतिकीकरणाची चिकित्सा करणारा मौलिक संग्रह आहे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याने कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करावी लागते ,याचे विश्लेषण कवी करताना.

"शेतकऱ्यांनं कसावी शेती व पीकवावं पीक,
ठरवू नये मालाचा भाव,
एवढा सहज असतो का घामाचा ठाव ..!
आणि भाकरीचं रामायण " (पृ.१०५)

शेतकऱ्याने कष्ट करून धान्य पिकवायचे ,मात्र त्या धान्याचा भाव व्यापारी त्यांच्या सोयीनुसार ठरवत असल्याने कायम दुर्दशेतील शेतकऱ्यांच्या वेदनांना शब्दरूप देत वास्तवचित्र रेखाटले आहे.

केशव सखाराम देशमुख हे कृषिनिष्ठ जीवनदर्शन घडविणारे या दशकातील आघाडीचे कवी , ग्रामजीवन सर्वंकष बदलासह चित्रित करतात. सर्जनाचा बाप असलेला शेतकरी हा चित्रकार,लेखक,मूर्तिकार आहे.परंतु त्यालाच अविरत राबावे लागते.प्रचंड परिश्रमानंतरही त्याला योग्य मोबदला न मिळाल्याने विपन्नावस्थेतच जगावे लागते. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा गोषवारा काढताना हाती काहीही न आल्याने शेतकऱ्यांचे दारिद्र्य त्यांना अस्वस्थ करत असल्याची जाणीव "गाभा"तून ६ प्रकर्षाने व्यक्त करतात.

"कापूस विकून त्याला मिळत नाही सदरा
भुईमूग काढून त्यालाच नाही खाद्यतेल
सगळं मिळूनही त्याला काय ?सगळं पिकवायचं धान्य हाती मात्र शून्य
शेतकऱ्यांच्या फाटक्या खिशाभोवती वाढत चालली आहे शून्यांचीच रांग"

सर्व पिकविणाऱ्यासच कपडे ,खाद्यतेल मिळत नसल्याने अत्यंत दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथांना देशमुख यांनी उजागर केले आहे .जगाचा पोशिंदा असलेला सर्व धनधान्य निर्माण करूनही शेतकरी मात्र सगळं होऊनही त्यांच्या हाती शून्यच राहते .त्याचा खिसा नेहमी फाटलेलाच असल्याची जाणीव कवी व्यक्त करतो.

' अजून दुःखांच्या किती परीक्षा द्याव्या लागतील ?'
'मरणासमवेत करावी लागणारी न संपणारी लढाई आमच्याच पुढे का ?',
'फाटलेल्या स्वप्नांना जोडून देणारा सुईदोरा कधी गवसेल?' पृ.११

या विदारकतेवर बोट ठेवणाऱ्या ओळीं अंतर्मुख करीत विचारप्रवृत्त करणाऱ्या आहेत. केशव देशमुख यांना समकालीन ग्रामीण प्रश्न-समस्यांची सखोल जाण व अनुभवात्मकतेला कलात्मक अभिव्यक्तीचे भान असल्याने त्यांची कविता समकाळाशी भिडणारी आहे,

ग्रामीण जीवनातील शेतकऱ्यांच्या मुलांना भेडसावणार्या बेरोजगारीच्या प्रश्नाची चर्चा केशव सखाराम देशमुख करतात.

"जमीन-जुमला मोडून तोडून मुलं ज्ञानाच्या जवळ पोहोचली आहेत
आई-वडिलांचे कष्ट डोळ्यात भरून मुलं शहरात आली आहेत
पोतंभर ग्रंथ पढून आमची मुलं ज्ञानोपासक झाली आहेत
आणि नोकरीची कवाडं धाडकन बंद झाली आहेत " ७ पृ.१३६

शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारामुळे व जनजागृतीमुळे पदरमोड करून गरीब शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेऊ लागली .वाढती बेरोजगारी यावर भाष्य करणारी केशव सखाराम देशमुख यांची कविता बापाच्या अविरत कष्टाच्या घामाची व मुलाच्या शाहीच्या न्यायाची लढाई अखंड सुरू असल्याचे वास्तव चित्रण करणारी आहे.

"कधी दुष्काळ मारून टाकतो तर कधी पावसाळा डोळ्यात उतरतो
कधी शिवार सगळं बरबाद
कधी पीकपाणी जातं करपून
अहोरात्र दुःखाचे पाढे वाचणं सरता सरत नाही " पृ.१३७

सतत दुःखमय जीवन जगणारा हवालदिल शेतकरी सूक्ष्मछटांसह देशमुख उभा करतात.

दारिद्यमय जीवन जगत आयुष्यभर उघड्या पाठीवरून ऊन झेलून जगाला खाद्य देणाऱ्या जगाच्या पोशिंद्याची वेदना केशव वसेकर मनस्वीपणे व्यक्त करतात.

"धरताही येईनंआणि सोडताही येईनं,
कुणबिकीनं केलाय जगण्याचा वांदा ,
शेती करणं झालाय आजकाल आतबट्ट्याचा धंदा"८

शेती करणं हा बिनभरवशाचा धंदा असून ज्यांना इतर काही करता येत नाही; त्यांनीच शेती करावी. कारण शेतकऱ्यांची मातीच होत असते. बळीराजा हा भिकारी होत असून त्याला जगू दिले जात नाही, अशी व्यथा मांडतात.

कल्पना दुधाळ यांची कविता ग्रामीण स्त्रीयांच्या दुःखाचे विविध पदर उलगडविणारी विलक्षण असून ग्रामीण जीवनातील व्यवस्थेविषयी अंतर्मुख करणारी आहे. फोटो काढणाऱ्या बातमीदाराला कवयित्रीने उपस्थित केलेला सवाल विचारप्रवृत्त करणारा आहे.भांडवलदारांनी उभारलेल्या कारखान्यामुळे पाणी दुषित होत असतानासुद्धा फोटोमध्ये दृश्य चांगलं यायला पाहिजे याचा विचार करतात; तेव्हा कवयित्री म्हणते ,

" माणसाच्या आतड्यात मायेचा दुष्काळ किती पडलाय,
अश्रूंची पातळी किती टक्के खालावलीय?
ते ना सोनोग्राफीत दिसेल ना कॅमेरात,
तुमच्या बातमीत सापडतय का बघा "९

ग्रामीण भागातील उघडंवाघडं वास्तव अधोरेखित करणारी कल्पना दुधाळ यांची कविता व्यवस्थेला हादरे देणारी आहे.

समकालीन ग्रामीण अस्वस्थता उत्कटपणे व्यक्त करणारा दशकातील उल्लेखनीय कवी म्हणजेच किशोर कवठे होय. 'गावसूक्त'१० या दीर्घकवितेतून शेतकऱ्यांच्या जीवनाचा एकूण पट उलगडत समस्या -प्रश्नांची चर्चा करत ,समकालीन व्यवस्थाचित्र मांडणारी कवठे यांची कविता आहे.

"दाणे कर्जात जन्मले आणि उगवले कर्ज
शेत मरणाचा अर्ज "
किंवा
"वीज-पाणी दावणीला त्याचा उभा कारखाना बळीराजा दीनवाणा ",

अशा ओळींतून शेतकर्यांचे खडतर जीवन, उत्पन्नापेक्षा खर्च अधिक झाल्यामुळे येणारा कर्जबाजारीपणा ,अभावग्रस्ततेने आलेली हतबलता, शेतकऱ्यांचे कंगालपण अधिक स्पष्ट स्वरूपात मांडतात. शेती करणे म्हणजे मरणाचा अर्जच असल्याचे निक्षून सांगत बळीराजाची दीनवाणी अवस्था कवी रेखाटतो. शेतकर्यांच्या कसदार शेतीमध्ये कारखाना उभारला जातो आणि सुपीक शेती कारखान्यासाठी अधिग्रहीत करून भूमीहीन बनविले जाते.अर्थातच कवठे यांची कविता वास्तवचित्र रेखाटणारी आहे.शेतकऱ्यांच्या भल्यासाठी मत मागणाऱ्या राजकारण्यांचा नेमका डाव व भूमिका कशी भिन्न असते. याचे चित्रण शब्दबद्ध करताना कवी म्हणतो,

" येता इलेक्शन पुढे घोषणांची ही खैरात दारी नेत्यांची वरात ,
खोटे अश्रू गाळुनिया करी भडवा सांत्वन लावी देशाला चंदन "

केवळ वल्गना करून भूमिपुत्रांना आकर्षित करणारे राजकारणी,त्यांचे ढोंग व सत्तेची हाव आणि स्वविकासातून ते देशाला कसे चंदन लावतात.याचे भेदक व्यवस्थाचित्र कवीने रेखाटले आहे.भयंकर वास्तविकतेचे विश्लेषण करताना कवठे यांची भाषा विद्रोहाचे रूप धारण करते.तर शेतकऱ्याच्या भल्यासाठी सयंत होते.कष्टकरी माणसांचे सर्व परी होत असलेले शोषण ,सावकारी पाश कर्जबाजारीपणा, प्रश्न- समस्यांचे वास्तव दर्शन, फसवे राजकारणी ,भकास होत चाललेला गाव ,तुटलेपणा, ग्रामीणांच्या विविध जाणीवा कवठे शब्दांकित करतात. ग्रामीण संवेदना त्यांच्या कवितेचा आत्मा आहे. प्रामुख्याने अस्सल अनुभूतीच्या तळातून आणि नवतेच्या बळातून साकारलेली कवठे यांची कविता सामर्थ्यानिशी अभिव्यक्त होते.

जागतिकीकरण,उदारीकरण, औद्योगिकीकरण आणि विकासाच्या नावावर शेतकऱ्यांना भूमिहीन बनविले जाते, हे समकाळाचं भेदक चित्र कवितेत विराजमान होते.

"दारावर घोंगावत ,धूर्त जागतिक वारे ,पाणी ओंजळीत खारे ,पृ.२६
किंवा
गावातल्या वावराला , मिळे लाखो एकराला, उभा कंपनीचा ढोला "पृ.२७
तसेच
"नोंदीनोंदीने रंगला, जिंदगीचा सातबारा कधी, होईल का कोरा "पृ.३१

या ओळींतूनकिशोर कवठे यांची अभिव्यक्ती समकालीन प्रश्न तथा समस्यांना थेट भिडत, शेतकरी जीवनाचे वास्तव रेखाटत, ग्रामीण भागात शिरकावलेल्या असभ्य बाबींची चिकित्सा करते. गावातील माणसांचे अविरत कष्ट ,सावकारी पाश पडझडीचे -तडजोडीचे जगणे,भकासपण ,तुटलेपण संदर्भासह अभिव्यक्त करणारी आहे . तद्वतच जागतिकीकरणामुळे होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देणारी आहे. विविध कंपन्या मुख्यत्वे कोळसा खदान ,सिमेंट कारखाने यांसारखी महासत्तेची प्रतीकं गावात येऊन गावातली शेती लाखो रुपयाला विकत घेतात. आपले मायावी पाय पसरतात. आणि शेतकऱ्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्या परंपरेच्या भाकरीची माती करतात.परिणामी ग्रामीण संस्कृतीच नष्ट होते. केवळ शेती जात नाही तर शेतीबरोबर संस्कृती नष्ट होत असल्याचे दुःख आणि या शेतकऱ्यांच्या जीवनाच्या काय होईल? हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे."बदललेली ग्रामरचना, बदललेले सांस्कृतिक जीवन, शेतीची होत चाललेली वाताहात ,नात्यांमधील कोरडेपण, तेथील सोयीचे गलिच्छ राजकारण ,पराकोटीची वाढत चाललेली व्यक्तिकेंद्रितता, सर्वत्र सुरू होणारी शेतकरी शेतमजूर आणि बलुतेदारांची गळचेपी आणि वंचना या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे युवा पिढीमध्ये वाढत चालेल्या नैराश्य ,वैफल्य या सर्वांमुळे कवी अस्वस्थ होतो". ११सभोवताल डोळसपणे पाहत, तेथील समाजजीवन ,मानवांची दुःखे त्यांच्या दुःखाची कारणे यांची तीव्र जाण, अनुभव, निरीक्षण यामुळे अस्सलपणा कवितेमध्ये येऊन त्यांची कविता समृद्ध होत जाते.

कोळसा खाणीत काम करणाऱ्या कामगारांच्या हतबलतेचे जीवनदर्शन अर्थात वेदनेची झूल पांघरलेल्या खाणग्रस्त्यांची व्यथा म्हणजेच किशोर कवठे यांचा 'दगान'१२ मधील कविता होय. " असंख्य शेतकरी व कामगारांच्या जीवनाशी निगडित पण अलक्षित विषयास किशोर कवठे यांनी पहिल्यांदाच वाचा फोडली आहे. चंद्रपूर जिल्ह्याची ओळख ही 'ब्लॅक गोल्ड सिटी' म्हणून आहे. भूगर्भातील खनिज संपत्तीने समृद्ध असलेल्या जिल्ह्यात कोळसा खाणी सर्वत्र आहेत. अंडरग्राउंड व ओपन कास्ट खाणीमुळे इथल्या जनजीवनावर, भूमीवर, निसर्गावर ,कृषी संस्कृतीवर ,कामगारांवर होणाऱ्या विपरीत परिणामाचे चित्रण कवी किशोर कवठे 'दगान' काव्यसंग्रहामध्ये करतात. परिसरातील माणसे, भूमी, संस्कृती, ग्रामव्यवस्था, घरे ,गावे कशी खचत व ढासळत चालली आहे, याचे संसंदर्भ विश्लेषण कवी सूक्ष्मपणे करतो. भूमिहीन शेतकरी , हतबलतेचं जिणं,

बोगद्यामध्ये गडप झालेले प्राणी व मानव, दगानमुळे घराला पडणाऱ्या भेगा, अनेकांसाठी कर्दनकाळ ठरणारे ढिगारे, ब्लॅकडस्टरने जल व वायु प्रदूषण, पर्यावरणामधील प्रचंड बदल ,दुष्काळ, पाण्याचा अभाव, शेतीबरोबर माणूसही नष्ट होत असल्याची जाणीव१3 , वृद्ध व्यक्तीना गाव सोडवत नाही .याचा सार्वत्रिक परामर्श दगान संग्रहात दिसून येतो. "कॉलवॉशरीने खुंटत चालले पीक आणि आमचे सर्वस्व ", या कवितेच्या ओळी ग्रामसंस्कृती उदध्वस्त होत असल्याचे जाणीव करून देतात.

"जेव्हा शेती जाते कंपनीत तेव्हा केवळ माती जात नाही
परंपरेची भूक करपली जाते प्राणी जातो पक्षी जातो
आणि शेवटी माणूसही जातो" पृ.२३

कोळसा उत्खननासाठी शेती जाते; तेव्हा त्या शेतीबरोबर प्राणी, पक्षी ,झाडं ,शुद्ध हवा, पाणी, परंपरा या सर्व नाहीसे होऊन येणारी विपन्नावस्था येते. माणसांचे तुटलेपण प्रत्ययकारीपणे कवठे यांनी रेखाटले आहे.

जागतिकीकरणाच्या या काळात उद्ध्वस्त होत असलेली ग्रामव्यवस्था ,उन्मळून पडलेल्या ग्रामीण जीवनाचा सखोल ,व्यापक आणि सर्वदूर वेध किशोर कवठे यांची कविता घेते. ग्रामीण समाजाच्या वाताहतीचे,झपाट्याने बदलत जाणाऱ्या खेड्यांचे,वाढत्या भ्रष्टाचाराचे,वृत्ती -प्रवृत्तीचे ,गुंतागुंतीचे, दारिद्र्य-उपासमारीचे, उपेक्षा व दुर्दशेचे चित्रण कवीने केले आहे.खदानीत शेती गेलेल्या शेतकऱ्यांची दुरावस्था, त्यांचे कौटुंबिक ,सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विपन्नावस्थेचे चित्रण कवीने केले आहे.

आशयसंपन्न व विलक्षण जाणीवा अभिव्यक्त करणारी किशोर कवठे यांची कविता निसर्गाचा होत चाललेला ऱ्हास आणि उद्याच्या भयाणतेची चाहूल अधोरेखित करणारी मराठी काव्यप्रांताच्या कक्षा विस्तारणारी वैश्विक स्वरूपाची आहे.

मोहन कुंभार हे या दशकातील ग्रामीण जाणीवा समर्थपणे व्यक्त करणारे महत्त्वाचे असून त्यांची कविता समकाळाशी भिडत ग्रामीणांचा हुंकार व्यक्त करणारी आहे.

"ग्लोबलायझेशनचा चिखल दूर करून
पायाखालची माती विस्कटून शोधतोय मी मला,
पण कुठेही येत नाही माझ्या जगण्याचा वास या मातीला,
... माती हरवून बसलीय सत्व, गावपण, शेत, झाडे
माझ्या मनाची मशागत करणारी माणसे ,
...मातीला लागलाय शहरीकरणाचा ध्यास
मातीला सुटलाय जागतिकीकरणाचा वास जागतिकीकरणाचा वास"१४

जागतिकीकरणाचा प्रभाव ग्राम जीवनावर कसा पडतोय याचे विश्लेषण करणारी मोहर कुंभार यांचे ही कविता समकालीन वास्तव अधोरेखित करणारी आहे.

विलास पगार हे शेतकऱ्यांच्या श्रम,पीकांची लागवड खर्च ,उत्पादनाच्या रक्कमेचा पंचनामा करतात .तेव्हा समोर आलेले वास्तव विदारक असते.अविरत कष्ट करणारा ,राबणारा, शेतकरी नांगरतो,वखरतो परंतु त्यांच्या उत्पादित केलेल्या पिकापासून चा लाभ मिळतो कष्टाची कमाई खारे मोठे होतात आणि कुणबी मात्र त्याच्या नशिबी

नांगरतो शेत धरतो वखर, तोंडात साखर दलालांच्या ,
कष्टाची कमाई खातात गिधाडे, कुणब्याचे पाढे भोगाचेच "१५

कुणब्यांच्या भोगाचा पाढा वाचताना येणारा कवीचा अनुभव विपरित व धक्कादायक स्वरूपाचा आहे .शेतकऱ्यांच्या श्रमावर व्यापारी ,दलाल श्रीमंत होतात .मात्र दुसरीकडे गरीब शेतकरी हवालदिल होतो ,अगतिक होतो .दारिद्रयाच्या खाईत लोटला जातो, हे वास्तव कवीने चितारले आहे.

गावांमधील चौकात वा झाडाखालच्या पारावर लोकांची गर्दी जमून विविध विषयावर चर्चा व्हायच्या.जमीन-जुमला,पीकपाणी, मुला-मुलींचे लग्न, सुख -दुःखांवर चर्चा होऊन अनेक प्रश्नांची सोडवणूक

सामंजस्याने केली जायचे .एकमेकांविषयी आपुलकी असणारा हा पार जागतिकीकरणामध्ये हद्दपार झालेला आहे .

"...आस्था, आपुलकी,सहिष्णूता दाटीवाटीने मायेची उब पेरायची,
जीवनाची बरीच रहस्य अलगद चांदण्यात उलगडायची ,
एखाद्या बेवारस कुत्र्याच्या केकाटण्याशिवाय,
आज कुणीच नाही चौकात
गाव कधी जागतिकीकरणाच्या आगीत भस्म झालाय ,
काहीच कळले नाही "१५

सुरेश खोब्रागडे या कवीने जागतिकीकरणामध्ये गाव कसा उद्ध्वस्त होतो आहे .पूर्वापार चालत आलेली समृद्ध परंपरा ,संस्कृती कशा हद्दपार होत आहेत. एकमेकाविषयीचा जिव्हाळा आटत चालल्याचे वास्तव कवीने रेखाटले आहे.अर्थातच संपन्न ग्रामसंस्कृतीचे उद्धवस्तीकरण समकाळात होत असल्याचे वास्तव ग्रामीण कवी रेखाटतात.

गावगाड्यातून खडतर पायवाट चालत संघर्षमय जीवनाची वाटचाल करीत आलेला उमदा कवी म्हणजे अविनाश पोईनकर .अभावग्रस्ततेच्या जगण्यामुळे अस्सल अनुभूतीतून सभोवताल डोळसपणे धुंडाळत बदलत्या ग्रामीण विश्वाचा वेध घेणाऱ्या या कवीचे नाते मातीशी असल्याने शेतकरी व शेतमजूर हा चिंतनाचा विषय होऊन त्यांच्या प्रश्न- समस्येसह कवितेतून अवतरतात..ग्रामजीवनातील विविध छटा प्रत्ययकारीपणे 'उजेड मागणारी आसवे'"१७ तून प्रतिबिंबीत झाल्यात.खेड्यातील भाऊबंदकी त्यांच्यातील वाद,स्वार्थ,संघर्ष व ताटातूट याचे प्रत्ययकारी वर्णन अविनाश यांनी केलेले आहे .हातभर जागेसाठी भावाभावातील टोकाची भांडणे,प्रसंगी जन्मदात्याचे विलगीकरण हे वास्तव कवी अधोरेखित करतो.

"जशी वाटली जमीन तसे मायबाप दूर ,
ताटातुटीच्या घरात आले आक्रोशाचे सूर
इस्टेटीच्या वाटणीत ,जीव झाला वेडापिसा
न्यायासाठी भांडतांना, खाली फाटलेला खिसा"पृ.२४

कौटुंबिक कलहामुळे थोड्याशा जागेकरिता कोर्टकचेरी करत प्रचंड पैसा खर्च करावा लागतो .परिणामी दारिद्रयाच्या खाईत लोटले जात असल्याचे वास्तवचित्र कवी रेखाटतो.

शेतीत अविरत राबून शेतकरी कापूस पिकवतो. कापूस विकण्यासाठी जिनींगात जातो. पण त्याच्या पिकाला योग्य भाव मिळत नाही. पिकाच्या उत्पन्नापेक्षाही कमीच दर त्याला मिळतो.सर्व उत्पादनखर्च जाता सावकार बँकेचे कर्ज बाकीच असते ; त्यातही कौटुंबिक गरजा,मुलांचे शिक्षण अशा अनंत समस्यांनी त्रस्त झालेला हा शेतकरी नाईलाजास्तव आंब्याच्या फांदीला जवळ करतो ..हे वास्तव चित्र अविनाश त्यांच्या कवितेमध्ये आहे

"बाप कोरभर जेवलाही नाही
रात्रभर जागून सकाळी ओसाड पऱ्हाटीच्या धुऱ्यावर,
उभ्या आंब्याच्या फांदीवर डोळे उघडे ठेवून गळफास लावून....
बाप कधी शांत निजलाही नाही
कुऱ्हात खोसलेल्या चिठ्ठीत बापाचं मूळाक्षर सापडलं
कापसाले भाव नाही जिंदगीले नाव नाही "पृ.३९

पदोपदी वाट्याला येणाऱ्या उपेक्षेने शेतकरी आत्महत्येस बळी ठरत असल्याचे वास्तव कवी रेखाटतो."माणूसपणावर अन् श्रमावर प्रचंड निष्ठा असलेली ही कविता भाकरीचं गाणं गाता गाता भाकरीने उभे केलेले दशावतार दाखवते"१७

" हायब्रीडच्या कणसातील दाण्याएवढाही ,
मिळत नाही उभ्या जिंदगीत दाम
काय करावं कुणाला सांगावं ही जीवघेणी दैना ,
आभाळाएवढा दुःख सोसून रिकामी चुल फुकते बयना" पृ. " पृ.४४

शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचे प्रत्ययकारी चित्रण अविनाशची कविता करते.एकूणच भूमिपुत्राचे जीवन ,भाऊबंदकी ,वाटणी,विदारकता, पिकाला भाव मिळत नसल्याचे शल्य,दारिद्रय , दुष्काळ ,आत्महत्या, नात्यांची ताटातूट ,सावकारी पाश ,नापिकी वाढती महागाई , कर्जबाजारीपणा,घरांची पडझड ,कुटुंबाची वाताहत, गाव आणि शहरातील अंतर, बेरोजगारी या सर्व बाबींचा परामर्श घेत अत्यंत प्रत्ययकारी चित्रण अविनाश पोईनकर यांच्या कवितासंग्रहामध्ये येते .

'सरकारचे सातवे वेतन अन्
लालफीतशाहीत गुंडाळलेल्या योजना,
का लागू नयेत अन्नदात्यांना ? पृ.४५
' हा कवीने उपस्थित केलेला प्रश्न अंतर्मुख करणार आहे .

"विज्ञान-तंत्रज्ञानापुढे माणूस झाला छोटा ,
जागतिकीकरणात गाव -शहरांचा झालाय गोठा
नगरातील माणसं धडपडतात मोकळ्या श्वासासाठी,
गावातली माणसं सुखसोयींच्या ध्यासापोटी
मित्रा गावातल्या मातीला अजूनही गवसली नाही हरितक्रांती
अन् नगरात गजबजायला लागली संगणक क्रांती" पृ.५8

जागतिकीकरणाच्या पडसादाची नोंद घेणारी अविनाशची कविता शहर आणि गाव ,विकास की भकास असे समकालीन वास्तव संदर्भासह उलगडणारी असल्याने मौलिक वाटते.

मागील दोन दशकांपासून अव्याहत लेखन करणारे कवी अनंता सूर यांनीसुद्धा 'अस्वस्थ वर्तमानाच्या कोलाहलात' या संग्रहात समकालीन ग्रामीणांचे वास्तव चित्रण रेखाटलेले आहे . शेतकऱ्यांच्या पिढ्यानपिढ्याच्या दुःखाचा शोध कवी घेतो.

"साऱ्यांना जगवून तू मात्र राहिलास पिढ्यांचा उपासी
कुटुंबाच्या रहाटगाडग्यात नेस्तनाभूत झालेलं तुझं जगणं
गळ्यात दोर टाकण्या इतपत कसं बेदखल करतं कळत नाही
शासन कुचकामी,योजना निरर्थक,
महागाईचा राक्षस ,अपुरा पाऊस
सारेच मानगुटीवर बसतात एकापाठोपाठ " पृ.४२

समकालीन जीवनवास्तव अधोरेखित करताना शेतकऱ्यांच्या दूर्दशेची मांडणी अनंता सूर कवितेमध्ये करतात. एकूणच निरर्थक योजना ,उदासीन सरकारच्या दुष्टचक्रामध्ये अडकलेला चगाचा पोशिंदा शेतकरी पिढ्यानपिढ्या उपाशीच असल्याचे वास्तवचित्र कवी स्पष्ट करतो.

समकालीन मराठी काव्यप्रांतात राम वासेकर यांनी 'वर्तमानातील कविता' २० या काव्यसंग्रहात वर्तमान वास्तवाचा मर्मस्पर्शी आलेख रेखाटला आहे.वासेकर यांच्या कवितेचा आशय आणि मांडणी धगधगत्या वर्तमानाला शब्दबद्ध करून व्यापक माणव्याची भूमिका साकारणारी आहे. व्यामिश्र वर्तमानाची विविध रूपे सर्व अंगोपांगासह या संग्रहात कवींनी टिपले आहे. वाढती महागाई, बोकाळलेला भ्रष्टाचार, भांडवलशाही, दहशतवाद, अर्थकेंद्रीवृत्ती, शिक्षणाचा बाजार, जातीयता, लोकशाहीतील बेबंदपणा, स्वार्थी राजकारण, असुरक्षितता, नक्षलवाद, शेतकऱ्याची व्यथा, स्त्रीभ्रूणहत्या, माफिया व मुखवटा बदलणारा माणूस आदी ज्वलंत धगधगत्या वास्तवातील आशयांना कवेत घेत समग्र वर्तमानाचा पटच या संग्रहातून साकार होतो. ग्रामीण मातीशी नाळ जोडलेली असलेल्या राम वासेकर या युवाकवीची निरीक्षणशक्ती , विश्लेषणवृत्ती व अभिव्यक्ती वाखाणण्यासारखी आहे.शेतकरी हा त्याच्या चिंता व चिंतनाचा विषय असल्यामुळे शेतकऱ्याची भयावहता, दयनीयता, हवालदिलपणा, कवडीमोल जगणे, पदोपदी निराशा कवीला पाहवत नाही. महागडी बी- बियाणे खते किटकनाशके, विविध रोगांचा प्रादुर्भाव, वारंवार येणारे दुष्काळ असे विदारक वास्तव कवी उत्कटपणे चितारतो. महागडी बियाणे ,रासायनिक खते,औषधींकरिता हवालदिल झालेला शेतकरी दुष्काळ , अतिवृष्टी, गारपीट अशा अस्मानी आणि उत्पादित मालाला भाव नाही वाढती महागाई अशा सुलतानी संकटाने हवालदिल होऊन खच्चून जातो.असंख्य संकटांनी त्याचे वेढलेले असून शेतकऱ्यांच्या जीवनात बेरीज- गुणाकाराऐवजी नेहमी वजाबाकी व भागाकाराची गणित असते ,म्हणूनच शेतकऱ्याच्या आशा फोल ठरत स्वप्न धुळीस मिळतात ,असं वास्तव चित्र कवी रेखाटतो .मुळात भुमीपुत्र असलेल्या वासेकर यांच्या कवितेत अनुभवाची अस्सलता व जीवनानुभातील प्रामाणिकपणा व्यक्त झाला आहे. अपार परिश्रमाच्या बळावर संकटावर मात करीत मातीतून सोने पिकवणारा सृजनशील शेतकरी जगाचा पोशिंदा नाहक जीवन संपवितो कसे, हा कळीचा प्रश्न वाचकाला अस्वस्थ करणारा आहे.

"नको आम्हाला सहावा वेतन आयोग आणि महागाई भत्ता

आमच्या मालाची किंमत ठरवण्याची आम्हाला हवी सत्ता"

हे कवीचे शब्द शेतकर्याच्या सनद प्राप्तीसाठी हक्काचे बोल सुनवतात तर

"जास्त काही नको आहे
पाहिजे घामाला मोल
एवढे नको होऊ कोरडे
असू द्या जरा ओल "

या काव्यपंक्ती माणसाच्या मानव्याला साद घालताना शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे वाचकाला अंतर्मुख करतात .समकालीन परिप्रेक्ष्यात वासेकर यांची कविता समकालीन प्रश्नांचा वेध घेत वर्तमान वास्तव अधोरेखित करते. "आजचे वर्तमान वटवाघळाच्या सारखे उलटे होऊ पहात आहे. लोकशाहीत साध्या माणसाला तर जागाच उरलेली नाही. भ्रष्टाचाराचे तोंड जास्तच रुंद होत चालले आहे. सगळी वर्तमान परिस्थितीत सामान्य माणसाच्या जगण्याला मदत करू शकेल अशी उरलेली नाही. अशा स्थितीत कवीचा शब्द हा टोकदार आणि धारदार बनत जातो" २१ हे डॉ. केशव देशमुख यांचे निरीक्षण वासेकर यांच्या कवितेचं सामर्थ्य स्पष्ट करणारे आहे.तद्वतच "पोखरत चाललेले ग्रामीण व्यवस्थाचित्र रेखाटणारी राम वासेकर यांची कविता असत्य, बेईमानी, भ्रष्टाचारावर वखर फिरवत मानवतेचे नाते निर्माण होण्यासाठी, अंधकाराच्या दिशा नष्ट करण्यासाठी प्रकाश पेरणारी निश्चित आहे. "२२ जागतिकीकरण आणि ग्रामीण जीवनविश्व यातील बदल टिपत

"प्रांत सीमा पुसून टाक
जाती वर्ण भेदून टाक
पण विसरु नकोस नाती
उंच उंच घे झेप
अंतराळात मार आता खेप
पण विसरु नकोस माती"

कवीने दिलेला संदेश

प्रगतीची, विकासाची शिखरे पादाक्रांत करीत असताना मातीशी नाळ जोडून ठेवण्याचे केलेले आव्हान मौलिक वाटते .

रक्त आठवणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांची परवड, बदलत्या ग्रामसंस्कृतींचे आक्रंदन, ग्रामीणांच्या भणंगतेचे चित्रण म्हणजे प्रा.डॉ.धनराज खानोरकर यांचा 'मास्तर मातीचे '२३ काव्यसंग्रह होय. जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणामुळे ग्रामजीवन पूर्णतः ढवळून निघाले आहे .नात्यातील दुरावा, स्वार्थीपणा ,अर्थकेंद्री मनोवृत्ती,राजकारणाने गाठलेला कळस यामुळे एकेकाळी एकीने सुखी- संपन्न असणाऱ्या गावांमध्ये बेकी येऊन ग्रामजीवन दुभंगत चालले आहे. जिथे मानवी जीवनाची वाताहत तिथे जित्रांबाचे काय? खेड्यातील झालेल्या बदलामुळे, यांत्रिकीकरणामुळे, शेती करण्याच्या पद्धतीमुळे नांगराऐवजी ट्रक्टरआल्याने बैलाचे महत्त्व कमी झाले.

"आम्ही नुसतेच जुंपले होतो तुम्हाला कामालं !
या खाऊजाच्या सध्याच्या युगात माझं तसं कोणतं काम म्हणा?
... ते मंतरलेले दिवस कुठे गेले मालक ?
...जुना मालक जसा खाटल्यावर गेला ना ,
अगदी तसाच मला माझ्या गोठ्यात मरू द्या " पृ.२०

यांत्रिकीकरणामुळे कृषी संस्कृतीच्या बाहेर पडल्याची खंत बैलाच्या माध्यमातून कवी व्यक्त करतो. जित्राबांविषयी नवीन पिढीतील उदासीनता, दोन पिढ्यात होत जाणारे भावनिक बदल खानोरकर अचूकपणे टिपत दिवसेंदिवस उद्धवस्त होत चाललेल्या कृषीसंस्कृतीवर भाष्य करतात. भ्रष्ट राजकारण, वाढती बेरोजगारी, शासनाची उदासीनता आणि ढोंगी नेते या वास्तविकतेचे निदर्शन कवीने केले आहे.'ढेपखाई सिस्टीम ,
जुगार खेळणारा कास्तकार' बोलक्या प्रतिमातील उपरोधातून भेदकपणे व्यवस्थाचित्र रेखाटतात.

"राजकारण्यांची काटेरी डूक अन समाजकंटकांची सततची घोडचूक ,गावभर पसरलेली बकाल बेकारी
पोशिंद्याची अमृतकलशी रिकामी वखारी
हिंसक तरंगासारखे शासनाचे दुःशासन हे उदासी धोरणाचे प्रदूषण
या पाताळयंगी योजनेलाच आता आहे. कुणी गाव घेता का गाव?
मला माझे गाव आत्ता विकायचे आहे."

सर्व बाजूने नागवल्या गेलेला गाव विकावा वाटतो

ग्रामीण कुटुंबातील स्त्रीयांची व्यथा तर अधिकच भयंकर आहे. कौटुंबिक जबाबदारी सांभाळत अविरत कष्ट करणाऱ्या स्त्रीला घरातील व उंबऱ्याबाहेरच्या शेतातीलही खाच-खळग्यांना तोंड देत राबावे लागते. दारिद्र्य, अज्ञान, पुरुषी वर्चस्वामुळे अहोरात्र राबणाऱ्या ग्रामीण कष्टकरी माऊलीच्या दुःखाना वाचा फोडत स्त्रीयांचा आकांत मांडणारी कविता श्री दुःखाच्या कष्टाचे मालिका अधोरेखित करणारी आहे .उरी वेदना झेलत जिद्दीने जगणारे स्त्री ऊन, वारा ,पाऊस, दिवस, रात्र यांची तमा न बाळगता हाडाची काडं करते. ग्रामीण स्त्रीच्या कष्टाची दाहकता कवी अधोरेखित करतो. धान कापणाऱ्या बाया आणि बाई आणि स्वयंपाक या कविता उल्लेखनीय . पहाटे लवकर उठून शेण -सडा,सारवण रांगोळी, स्वयंपाक, घरकाम,धानाची कापणी अशा न थांबता राबतात.

"..पण धान कापणाऱ्या बाया
यांची मूठ घट्ट आहे अजूनही धानरोपाच्या बुध्यांशी
अन् पाय मातीवरच आहेत जीवनाची माती होऊ नये म्हणून!" पृ.२३

प्रचंड राबणाऱ्या स्त्रियांना कोणतीही कीड शिवत नाही. चिवटपणे संकटांशी सामना करत जिद्दीने मातीशी नाळ कायम जोडत जगणारी ग्रामीण स्त्री आहे.

बळीराजाला बळी देण्याचा प्रकार हा थांबणार का ?
शेतमालाचे भाव पाहून गाव आमचे गाडणार का ?
पोशिंद्याने संप करू नये का?

अशा प्रश्नात्मकतेने ग्रामीणांचे गहिरे रंग उलगडत, दुःखाला वाचा फोडून अस्वस्थ वर्तमानाची स्पंदने टिपणारी कविता समकाळाशी भिडणारी विचारकविता आहे.

बंडोपंत बोडेकर यांची नाळ ग्रामजीवनाशी जुळलेली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा वसा आणि वारसा पुढे चालवणारे बंडोपंत बोढेकर हे विविध चळवळीत सक्रिय आहेत.ग्रामीणांविषयीची आस्था त्यांच्या कवितेतून सदोदीत अभिव्यक्त होते.

"शेतकरी पुत्रा घाबरू नको रे |परिश्रम घे रे अभ्यासात |
जो तो लुबाडतो,मूर्ख समजतो |शोषण करतो बिनधोक|
तूच सावर रे आपल्या त्या पित्या|नको आत्महत्या आता तरी " २४

शेतकऱ्यांच्या मुलांनी सजग होऊन कौटुंबिक स्थैर्य निर्माण करणे गरजेचे आहे. सर्व परिस्थितीचा अभ्यास करून उत्पादन खर्च ,मिळणारी रक्कम ,नफा या शेतीच्या अर्थशास्त्राचा अभ्यास करून शोषणव्यवस्था बदलविण्यासाठी मुलांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.वडिलांना आत्महत्येपासून परावृत्त करण्याची जबाबदारी आता शेतकऱ्यांच्या मुलांवर असल्याने शिक्षित शेतकरी पुत्राने काळाची पावले ओळखत सजग होण्याचा इशारा कवीने दिला आहे.राष्ट्रसंतांच्या विचारांची पेरणी करणारी बोढेकर यांची कविता असल्यामुळे गाव हा विश्वाचा नकाशा आहे . गावाचा विकास झाला की सर्व जग सुखी होईल हे सूत्र त्यांच्या अनेक कवितांमधून व्यक्त होते. तद्वतच शेतकऱ्यांच्याअनेक पिढ्या जाऊनही फारसे बदल होत नसल्याने पारंपारिकता बाजुला सारत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करीत शेतकऱ्यांच्या मुलांनी कात टाकत सजगतेने नव्या आव्हनांना सामोरे जायला हवे.असा आशय समकालीन ग्रामीण कवितेतून अभिव्यक्त होतो.

एकूणच ग्रामजीवन रेखाटणार्या कवीमधील लोकवांग्मय परंपरा ,ग्रामजीवनातील कृषीकेंद्री वास्तव, खेड्यातील जीवनानुभव,कृषी व्यवस्थेची पडझड, तुटलेपणा, ग्रामव्यवस्थेची चिकित्सा, बकालपण,भ्रष्ट राजकारण, दुष्काळ ,लोप पावणारी ग्रामीण संस्कृती ,कृषी परंपरेची पडझड ,स्त्रियांचे कष्टमय जीवनानुभव, अभावग्रस्तता ,अनुभवाची विविध रूपे ,गाव पातळीवरील अस्तित्वाचा संघर्ष व भीषण रूप, दुःख-दारिद्रय, ताणतणाव निसर्गाचा लहरीपणा ,बदलत्या पर्यावरणाची नोंद ,संघर्ष ,उदासीन सरकार, कर्जाचे ओझे ,आत्महत्या, जातीयता व जागतिकीकरणाच्या पडसादाचे भेदक चित्रण कृषिनिष्ठ प्रतिमांनी उपरोल्लेखित कवींनी केले आहे.

समकालीन ग्रामीण कवितेने ग्रामीण समाजाचे वास्तव चित्र आपल्या कवितेतून उत्कटपणे उलगडून दाखविले आहे.समकालीन कविता ही बदलता वर्तमानातील ग्रामीण माणसाचे वास्तवदर्शी चित्रण करणारी कविता आहे. ग्रामीणांच्या कळवळ्यातून अवतीर्ण झालेल्या कवितेने ग्राम जागरणाची परिवर्तनशील भूमिका घेतल्याचे दिसून येते. आधुनिक कृषी संस्कृतीचा समर्थ आविष्कार घडविणाऱ्या ग्रामीण कवितेने वेगळीषाओळख निर्माण केली आहे. शेतकऱ्यांचा संघर्ष आणि वेदनेचा वेध प्रत्ययकारीपणे

घेणारी कविता आहे .समकालीन वास्तवाला शब्दांकित करण्यात हे कवी यशस्वी ठरलेले आहेत. ग्रामीणांविषयी असणारा अंतस्थ कळवळा आणि त्यांच्या सुखमय जीवनाच्या ध्यासातून वाटचाल करणारी कविता लक्षवेधी आहे.

बहुतांश कवींची नाळ ही ग्रामीण जीवनाशी जोडले गेल्यामुळे ग्रामीण जीवनातील दुःख, दैन्य विषमता, अन्याय-अत्याचाराना शब्दरूप देण्यात अस्सलपणा जाणवतो. जीवन आणि अनुभवातून साकारलेली ही कविता वास्तवदर्शी आहे .शेतकर्यांच्या जीवनाचे वास्तव विविधांगाने चित्रित करणारी आहे. ग्रामजीवनातील प्रश्न ,शेतकऱ्यांचे दारिद्य , दुरावत चाललेल्या नातेसंबंध ,प्राणीसृष्टी, नव्याने उद्भवणारे प्रश्न ,निसर्गचित्रण ,मातीशी नाते ,परंपरांचे भान, बदलते भावविश्व, स्त्री जीवनाचा कष्टमय प्रवास उत्कटपणे आविष्कृत झाले आहे .बदलत्या काळात आजूबाजूच्या परिस्थितीत होत असलेले बदल , दुर्दशा ग्राम वास्तवाचं आकलन मांडून शेतकऱ्यांचे प्रश्न -संघर्ष चित्रित करतात .ग्रामजीवनातील विविध पैलू, ग्रामीण संस्कृती, व्यवहार, प्रथा-परंपरा या सगळ्या संस्कारातून अंकुरलेल्या कविता अस्वस्थ करणाऱ्या आहेत.

***निष्कर्ष***

१) जागतिकीकरणाच्या गदारोळात ग्रामीण संस्कृती व मूल्यऱ्हासाचे तथा विविध भावविश्वाचे ग्रामीण संवेदनशीलतेने चित्रण करणारी कविता अवतीर्ण होत आहे.

२) शेतकऱ्यांचे जीवनवास्तव, दारिद्य, कर्जबाजारीपणा, आत्महत्या, भकासपणा, तुटलेपणा, वाताहात, भाऊबंदकी अशा ग्रामीण जीवनाचा पट उलगडणारी कविता अर्थगर्भ आहे.

३) समकालीन ग्रामीण कविता ही शेतकऱ्यांसाठी फसव्या योजना, भ्रष्टाचार, ढोंगी सत्तालोलूप दुट्टपी राजकारणी याचे विदारक विखार कधी संयतपणे तर विद्रोहाने व्यक्त करणारी आहे.

४) उन्मळून पडणार्या ग्राम वास्तवाचा वेध घेणारी ग्रामीण कविता चिंतनाभिमुख व विचार प्रवृत्त करणारी आहे .

५) शेतकऱ्यांच्या जीवनवास्तव चित्रणप्रमाणेच उन्नतीच्या ध्यासाने अंगारलेली कविता उपाय सुचवत उज्वलतेकडे वाटचाल करणारी आहे.

६) प्रमाण व बोलीतून उपरोध,उपहासात्मतेने भेदक वास्तव साकारणारी कविता कृषिनिष्ठ प्रतिमातून अवतरणारी आहे.

## संदर्भ

*१.मदन कुलकर्णी,( शरणकुमार लिंबाळे संपा. ),साठोत्तरी मराठी वाड्मयीन प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे ,२००७,पृ.७*

*२. वसंत आबाजी डहाके, (आनंद यादव संपा.), स्वातंत्रोत्तर वांड्मयीन प्रवाह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, सप्टेंबर २०१७, पृ.२*

*३) इंद्रजित भालेराव, 'भूमीचे मार्दव',मनोविकास प्रकाशन, पुणे २०११*

*४)बालाजी मदन इंगळे, 'मेलं नाही अजून आभाळ', लोकवांगमय गृह मुंबई, २०१०*

*५)ऐश्वर्य पाटेकर, भूईशास्त्र, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर २०१२*

*६)केशव सखाराम देशमुख, 'गाभा',अथर्व पब्लिकेशन जळगाव,द्वि.आ.२०१८*

७) केशव सखाराम देशमुख, अक्षर वांग्मय, संपा नाना सूर्यवंशी, डिसेंबर २०२०
८) केशव वसेकर , 'संवाद शेतकरी मित्रांशी ' स्वरूप प्रकाशन परभणी
९) कल्पना दुधाळ सर्व धारा संपा सुखदेव ढाणके एमेजून 2015
१०) किशोर कवठे , गावसूक्त, संवेदना प्रकाशन, नागपूर, २०१४
११) प्रमोदकुमार अणेराव , ग्रामजीवनाचे वेदनासुक्तः गावसुक्त, सर्वधारा संपा. सुखदेव ढाणके, अमरावती, मार्च २०१६, पृ. ४४
१२) किशोर कवठे, 'दगान', सप्तरंग प्रकाशन, राजुरा २०१९
१३) राजकुमार मुसणे , खाणग्रस्तांच्या वेदनेची झूल पांघरलेला व्यथा, काव्यसंग्रहःदगान', अक्षरवैदर्भी संपा. सुभाष सावरकर, अमरावती , २०२० पृ. ६०
१४) मोहन कुंभार , मुराळी संपा. टी. एस. गडकरी, गारगोटी, फेब्रुवारी २०१५, पृ. ३२
१५) विलास पगार, अक्षर वैदर्भी, संपा. सुभाष सावरकर, अमरावती, जानेवारी २०१५पृ. ५८
१६) सुरेश खोब्रागडे, सर्वधारा, संपा. सुखदेव ढाणके, मार्च २०१६ पृ. ५६
१७) अविनाश पोईनकर, उजेड मागणारी आसवे, पायगुण प्रकाशन अमरावती, २०१७
१८) ऐश्वर्य पाटेकर, तत्रैव, बल्र्ब.
१९) अनंता सूर , 'अस्वस्थ वर्तमानाच्या कोलाहलात ', सुगम प्रकाशन , अमरावती २०१५
२०) राम वासेकर,' वर्तमानातील कविता ', राघव पब्लिशर्स नागपूर २०१३
२१) केशव सखाराम देशमुख, वर्तमानातील कविता ', बल्र्ब., राघव पब्लिशर्स नागपूर २०१३
२२) राजकुमार मुसणे, समकालीन वास्तवाचा धगधगता आलेख , लोकशाही वार्ता, ७ मे २०१७ , पृ. ३
२३ ) धनराज खानोरकर ,'मास्तर मातीचे, युरो वर्ल्ड प्रकाशन, मुंबई २०१९
२४) बंडोपंत बोढेकर, 'आनंदभान', शब्दजा प्रकाशन, अमरावती २०२०, पृ. ४४

**केशव मेश्राम-दलित मुक्ती लढ्यातील विद्रोही कवी**

**डॉ. अशोक विठ्ठलराव वाहुरवाघ**
*भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्ट्स कॉलेज,पिंजर*
*ashok.wahurwagh76@gmail.com Mo – 9767615292*

दलित मुक्ती साहित्य क्षेत्रात प्रा.केशव मेश्राम हे एक प्रतिभासंपन्न कवी व विद्रोही साहित्यिक म्हणून ओळखले जातात. त्यांनी सर्वप्रथम आपले पाऊल काव्यप्रांतात टाकले. सुरुवातीला अनुकरणारत्मक काव्यलेखन केले; पण पुढे त्यातून बाहेर पडले आणि स्वत:ची वेगळी शैली निर्माण केली. त्यांनी 'उत्खनन' च्या रुपाने व्यक्तिगत आणि सामाजिक अनुभवाला शब्दामध्ये बांधले. त्यांच्या कवितेतील विद्रोह ज्वालेसारखा धगधगणारा नसून संयमी आहे. त्यांचे वास्तव अनुभवाने पोळून निघालेले मन त्यांच्या दाहकतेची जाणीव करुन देते. त्यांच्या काव्यात आशावाद आहे. त्यांची कविता धर्मांधतेविरुद्ध, अन्यायाविरुद्ध, परंपरागत जातिमूल्याविरुद्ध, अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारी आहे. ती परंपरा नाकारणारी आणि मानवतेची उपासना करणारी आहे.

प्रा.केशव मेश्राम यांचा 'उत्खनन' हा काव्यसंग्रह (१९७७) प्रकाशित झालेला पहिला काव्यसंग्रह होय या संग्रहात एकूण ७६ कविता समाविष्ट असून दलितांचे दुःख व्यक्त करणाऱ्या आहेत. त्यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून जनमाणसावर ठसा उमटविला आहे. ते म्हणतात. "दलित साहित्यात कविता हा वाङ्मयाप्रकार फार मोठ्या प्रमाणात आविष्कृत झाला आहे. 'कविता" ही पहिली आंक्रदनाची, विश्वसंवेदनाची मातृभाषा आहे."१ ही संवदेनशीलता मेश्रामांनी आपल्या अंगी जोपासली आहे. त्यातून काव्यनिर्मिती करुन 'जुगलबंदी (१९८२), 'अकस्मात' (१९८४), चरित (१९८९), 'कृतकपुत्र' (२००१), दाम्पत्यगीता' (२००४) व 'अनिवास' काव्यलेखनाचा प्रवासाचा झरा सदोदीत वाहत ठेवला आहे. त्यांच्या कवितेतील विद्रोहात कुठेही भडकपणा नाही. प्रत्येक कवितासंग्रह आपले स्वत्व जपण्याचा प्रयत्न करतो. चरित या काव्यसंग्रहात आंबेडकरी व बौद्ध तत्वज्ञानाचे दर्शन घडते. ते काव्य निर्मिती करीत प्रतिमांचा वर्षाव करतात. मर्यादित आणि उत्तम शब्दरचना आणि उच्च प्रतिभा हे त्यांच्याकवितेची खास वैशिष्ट्ये होत.

स्वातंत्र्यपूर्व काळातच महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहा पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकार्याला सुरुवात झालेली असली तरी तिचा उत्कर्षबिंदू 14 आक्टोंबर १९५६ रोजी धर्मांतराच्या वेळी गाठला गेला. धर्मचक्रप्रवर्तनामुळे दलितांना त्यांच्या स्वतंत्र अस्मितेचा बोध झाला. जातिव्यस्थेमुळे वाट्याला आलेली वेदना या प्रेरणेचा प्राण होती. तो आत्मविष्कार अतिशय जोरकसपणे 'दलित मुक्ती काव्य' या वांग्मय प्रकारात विशेषत्वाने प्रगट झाला. १९६० च्या दरम्यान दलितामधून कवींचा मोठा वर्ग समोर आलाआणि मराठी काव्यप्रांतात एका नव्या परंपरेला सुरुवात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विशाल व्यक्तिमत्व 'दलित मुक्ती कवितेसमोर' उभे होते. संवदेनशील कवींनी हा अविष्कार शब्दांच्या निर्मितीमधून केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षाने दलित मुक्ती कवींना चालनामिळाली. वैदिक परंपराप्रिय हिंदूधर्माचा नकार त्यांच्या मानसिकतेचा भाग बनला. दुःख वेदना संताप, नकार इत्यादी भावनांचा 'विद्रोह'

दलित कवीनी काव्यत्मकतेने मांडण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. दलित कवींची पहिली पिढी काव्यनिर्मिती करु लागली. नामदेव ढसाळ पवार, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, त्र्यंबक सपकाळे आदी कवी सामाजिक विषमतेवर प्रहार करीत होते. त्या कवीमध्ये प्रा.केशव मेश्राम हेही आपली काव्यनिर्मिती करीत होते . व समाजाच्या वेदना, दुःख व्यक्त करीत व अभ्यासू प्रवृत्तीचा, चोखंदळ आणि निग्रही स्वभावाचा हा कवी समाजातील दैन्य, दारिद्रय, विषमता आणि सर्व सांस्कृतिक क्षेत्रातील अनास्था ह्याची नस नेमकेपणाने पकडतो. नव्या पिढीच्या ध्येयशून्य तडजोडीची वेदनाही त्यांच्या कवितातून उमटते."२ असे नम्रता मुळे म्हणतात.

प्रा. केशव मेश्राम यांच्या कवितेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे अधिष्ठान आहे. दलित मुक्ती लढ्याचा आणि मेश्राम यांच्या कवितेचा अतिशय जवळचा संबध आहे. तो संबध सांगतांना मेश्राम म्हणतात

'आज इतक्या शब्दांचे फोडतो आहे तुरुंग,
त्याची स्फोटक दारुही बाबा ! तूच पुरवली आहेस.
दलितांच्या युगदुखण्यावर दवा करणारा, भीमा
तूच आहेस आमची नाडीपरीक्षा करणारा पहिला डॉक्टर"३

असे कवी प्रांजळपणाने सांगतो. या देशात माणसासारख्या माणसाला ज्या तऱ्हेने शतकानुशतके वागणूक मिळाली. तेथे यापेक्षा दुसरी काय प्रतिक्रिया होणार? धर्माच्या नावाखाली माणसांचा छळ होतो. त्या देव धर्माविषयी प्रेम का वाटावे? देववाद, ईश्वरवाद पेरणाऱ्या समाजव्यवस्थेत त्यांनी का राहवे? या सर्व प्रश्नांची उत्तरे डॉ.आंबेडकरांनी शोधले आणि विश्वशांती देणारा भगवान गौतम बुद्धाचा 'बौद्ध धम्म' आचरणात आणला त्याची आठवण कवी मेश्रामांना होते. त्यावेळी त्यांच्या प्रतिभेतून-

" एका भीमाने वृक्षाला हालवले फिरवले गयेच्या आसनस्थ बुद्धाला
स्वातंत्र्याने इतकेच आम्हाला प्रवृत्त केले नव्या धर्म युद्धाला,
धर्म दिला ज्याने वर्म मात्र त्याचे सांगायला तोही थांबलाच नाही.
परिनिर्वाणाची आज्ञा झाली त्याला दोनच महिन्यात केली त्याने घाई."४

असे कवी बाबासाहेबांविषयी सांगतो. ही बाबासाहेबांची आठवण त्यांच्या कवितेची प्रेरणा आहे. तशीच ती गौतम बुद्धाची आहे. त्यांच्यासमोर बुद्ध अवताराचे एक रुप म्हणून उभा राहत नाही. तर तो बुद्धच संर्वकंष क्रांतीच्या महामंत्राद्वारे उभा राहतो.

दलित वस्तीत राहणारा माणूस कधी दैववादाची तर कधी कर्माची फळे म्हणून दुःख भोगत असतो. पण या कवीमनाला हे सारे दुःख अर्थहीन वाटते. म्हणून तो दाहक वास्तवाचे चितंन करता करता पुर्णतः स्वतःच्या विश्वात जातो. आपला विद्रोहाचा स्वर अधिक तीव्र करुन मनातील विद्रोह क्रांतीच्या रुपाने मांडतो. संस्कृती विषयीचा नकार व्यक्त करतांना-

"एक दिवस मी परमेश्वराला आईवरुन शिवी दिलीः
तो लेकाचा फक्कन हसला,....
शिवी दिली, शिव्या दिल्या, साटांसारखे

शब्दांचे फटकारे मारीत मी म्हटले,
साल्या ! तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडशील काय?
चिंधुक नेसल्या आईच्या पटकुराने
घामेजले हाडके शरीर पुसशील काय?
बापाच्या बिडीकाडीसाठी भावाबहिर्णींची हाडके झिजवशील?
त्याच्या दारुच्या घोटासाठी भडवेगिरी करशील?" ५

हा विद्रोहाचा स्वर व परमेश्वराविषयीचा नकार दर्शवितो. ही विद्रोहाची जाणीव आंबेडकरांच्या प्रेरणेतून साकार झाली आहे. "मानवी आयुष्यातील सर्वच व्यथा, वेदनांचे आणि आनंद कल्लोळाचे तरंग जसे त्यांच्या कवितेत सहज स्वाभाविकपणे येतात. तसेच जटील प्रश्नांचे सुरुंगही ते पेरीत जातात. त्यामुळे कलावादी की, जीवनवादी, कविता प्रवाहासी सुसंगत की परंपरेला आव्हान देणारी , आस्तित्ववादी की शून्यवादी, ललित की दलित इत्यादी प्रश्नांच्या पलिकडे जावून त्यांची कविता 'स्व' तंत्राने अभिव्यक्त, होत राहते.” ६ कधीकधी कवितेची समीक्षा करण्यास मराठी समीक्षाही थिटी पडते.

प्रा.केशव मेश्रामसारखा सृजनशील कवी, तर्कशुद्धता,बुद्धीनिष्ठा, अंधश्रद्धा आणि व्यक्तिपूजेस विरोध ही आंबेडकरांची शिकवण साहित्यकृतीतून व्यक्त करतो. ज्या संस्कृतीला आंबेडकरांनी आव्हान दिले. त्यांच्या शिकवणीतून कवी आपल्या वेदना, विद्रोह, नकार, कवितेच्या माध्यमातून मांडत आहेत. "या स्वतंत्र पण समाजनिष्ठ कवितेला कोणत्याही सांकेतिक लेबलाची जरुरी नाही. वेदनेच्या विव्हळ क्षणाजवळ ती थांबत नाही.अंधारात अडखडत असतानां नव्या पहाटेचा वेध घेण्याचा आग्रह धरणाच्या या कवितेच्या ओठांवर जयगीते आहेत."७ डॉ आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित झालेले मेश्राम आपल्या लेखणीतून विद्रोहाचे सूर पेरु लागले. त्यांच्या कवितेतून नवयुगाचा हुंकार ऐकू येतो आहे. विद्रोहाचे सूर बाहेर पडत आहेत. त्यामुळे सूर्यकुलातील एक नामवंत कवी म्हणजे केशव मेश्राम आहेत. हे सत्य नाकारता येत नाही.

**संदर्भ सूची :**

*१) केशव मेश्राम: दलित साहित्याची स्थितीगती, संपादक - केशव मेश्राम व उषा मा. देशमुख अनुभव पब्लिकेशन मुंबई प्र.आ.1997 पृ. क्रमांक.६ (प्रस्तावना)*
*२) नम्रता मुळे: कृतकपुत्र, केशव मेश्राम (मलपृष्ठावरील प्रतिक्रिया)*
*३) केशव मेश्राम : चरित , अम्बेद्कार्प्रबोधिनी मुंबई प्र आ. १९८९ पृ. ४६*
*४) डॉ.सदा कऱ्हाडे : चरित, केशव मेश्राम, (मलपृष्ठावरील प्रतिक्रिया)*

# समकालीन आदिवासी कवितेतील संवेदना

**प्रा. डॉ. प्रकाश पी. वट्टी**
*ने. हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर मो.नं. ७५८८२२९८७८*

**प्रास्ताविक :—** साहित्य हे संस्कृतीवरचे भाष्य आहे. ज्यांच्या वाणीतून असे साहित्य निर्माण होईल ते उद्याच्या जगाचे शिल्पकार होणार आहेत. ज्यांनी साहित्य निर्माण केले ते समाजात आधीच पदप्रतिष्ठा प्राप्त केली. साहित्य हे अशी वस्तू आहे ते जीवनातील अंधार नाहीसा करते. माणसाला वाचा देते सोबतच नव्या युगाची वाट प्राप्त करून देणारी पायवाट असते. तेव्हा आमुलाग्र जीवनातील बदल हे स्वातंत्र्योत्तर कालखंडात झालेल्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे शहरीकरणाबरोबर ग्राम, खेडी, तांडे व गावखेडी ढवळून निघाले. शिक्षण हया प्रक्रियेने एकच मिमया साधली. तरूण शिकू लागले, लिहू लागले व आकलन करू लागले त्यातून साहित्यात रूची बाळगून त्यात आपल्या भावना, संवेदना, आपले प्रश्न समस्येचे जीवन जाणीवांचे चित्रण नसल्याचे त्यांना प्रकर्षाने जाणवले. प्रस्थापित वर्ण व्यवस्थेने ग्रासलेले साहित्य गुढ गुंजणापलिकडे जावू शकले नाही. समाजाच्या संवेदना व जाणीवा त्यांचे सामाजिक प्रश्न कुठेतरी हजारो वर्षाची सांस्कृतिक मूल्यधिष्ठित परंपरा पिचुन होती. या असमाधान वृत्तीतून काही नव नवीन साहित्य प्रवाह, वेदना व विद्रोह नकार घेऊन उदयास आल्या असे नवसाहित्य म्हणजे दलित साहित्य व त्यानंतर आदिमांचे आदिवासी साहित्य आहे. आदिवासी साहित्य हे खऱ्या अर्थाने सर्व साहित्याचे मूळ मानले पाहिजे. परंतू तसे मानत नाही. वेदवाक्य म्हणजेच प्रमाणवाक्य असे मानण्याचा हा प्रघात असल्याने आम्ही ते स्वीकारले. आदिवासी साहित्य सुध्दा असेच आहे. लोककथा, लोकगीते, जनपदगीते, त्यांच्या बोलीभाषा, अनेक भाषा व शब्द हे आमचे आद्य साहित्य हजारो वर्षे या साहित्य संपत्तीवर जगले आहेत, पोसले आहेत. अनादी काळापासून आदिवासींचे साहित्य चालत आलेले आहे. ते त्यांचे अक्षरवाङमय आहे. हे खरे शाश्वत साहित्य विसरून गेले आहेत. ज्या साहित्याला खुप दिर्घ ऐतिहासिक परंपरा लाभली आहे ते आदिवासी साहित्य.

## आदिवासी साहित्य म्हणजे काय ?

आदिवासी साहित्याची संकल्पना स्पष्ट करतांना जेव्हा आदिवासी साहित्य म्हणजे काय? ही संकल्पना समजून घेतांना ज्या साहित्यात वनवैभव प्रकृतीच्या आच्छादनात राहून आपले गतकालीन जीवन घालविले. प्रकृतीच प्रेरणा मानले जाते ते म्हणजे आदिवासी साहित्य होय. आदिवासी साहित्य रानावनात राहणाऱ्या वंचितांचे साहित्य होय. ज्यांचे प्रश्न आजतागायत सुटलेच नाही. अशा उपेक्षित वर्गाचे साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय. आदिवासी

साहित्य म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेने नाकारले जे विकासाच्या प्रक्रियेतून नाडल्या गेले. या व्यवस्थेच्या विरोधात वेदना, विद्रोह, नकार याचबरोबर अन्याय, अत्याचार, शोषण, आक्रोश या विरोधात बंड उभारून निर्माण झालेले साहित्य हे आदिवासी साहित्य. आदिवासी साहित्याच्या अनुषंगाने जुने—नवे संदर्भ व समाज मुक्तीचा झेंडा हाती घेऊन शोषणा विरूध्द उदयास आलेल्या चळवळी हेच उद्याचे स्वप्नबीज असेल या आशेतून एकतेचा आव्हानात्मक मंत्र ठरला ते आदिवासी साहित्य. ज्यांच्या वाट्याला अनेक शतकांचा अंधार चिकटला होता. हा अंधार नाहीसा करून त्यांना उद्याचा उजेड दाखविण्याचे काम केले ते आदिवासी साहित्य. अजून आदिवासी साहित्याला सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व ऐतिहासिक अशी उज्वल परंपरा लाभली. आपण राजवैभवाचे पाईक आहोत ही जाणीव त्यांच्या लोकवाङमयातून स्पष्ट होते. ज्याप्रमाणे गतकालीन गोंडकालीन राजवैभव, राजधान्या हरवुन जे रीठ होवून स्मशान रूपात दिसत आहे जे पडलेल्या किल्ल्याचे शोध घेत रानोवनी भटकत असललेला गर्भगळीत समाजाला दिशा दाखविणारं साहित्य हे आदिवासी साहित्य. तसेच या देशातील आद्य माणूस प्राचीन भारताचा वैभव संपन्न सुसंस्कृत माणूस म्हणजे आजचा लंगोटीधारी व तीरकंमठाधारी गोंड माणूस जो भारतीय जंगलाच्या दऱ्या—खोऱ्यात प्रत्यक्ष पशु होवुन जीवन जगतो आणि तोच माणूस आज सुख वस्तू लोकांच्या प्राणी संग्रहालयातील विषय ठरला. अशा घटकाचे यशापयश सांगणारे साहित्य हे आदिवासी साहित्य होय. आदिवासी साहित्यात स्वाभिमान आहेच परंतू मानसिक बळ देणारे सामुदायिक जीवणसरणी, सामाजिकता, प्रामाणिकपणा, विश्वास, निटनेटकेपणा, नित्यनियम पाळणारा, नैतिकता, सत्याचा शोध घेणारा जीवनवादी दृष्टिकोण हे मूल्य आदिवासी साहित्यात दिसतात. म्हणूनच आंबेडकरवादी विचारसरणीचे सूक्ष्म समीक्षक व साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांनी असे मार्मीक विचार व्यक्त केले. ''आदिवासी साहित्य हजारो वर्षाच्या गुलामीच्या बेड्या गुलामी झुगारून टाकण्यासाठी स्वप्रेरणेतून आकारत आहे. यानंतरचे आदिवासी साहित्य निर्माण होईल ते शब्दांमध्ये मशाली पेटविणारे साहित्य असेल'' असे म्हटले आहे. १(संदर्भ: आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे, संकलन डॉ. गोविंद गारे, सुगावा प्रकाशन, पुणे—३० पृष्ठ क्र.०२) तर डॉ. वासुदेव मुलाटे यांचे आदिवासी साहित्याबद्दलचे यांचे आदिवासी साहित्याबद्दलचे संमेलनाध्यक्षीय भाषणातील विचार ''जीवनातील व्यथा, वेदना, आक्रोश, छळ, अन्याय, अत्याचार, भांडवलदार, जमीनदार, सेठ—सावकार या धनिक वर्गाकडून होणारे शोषण, वेठबिगारी, भूक, दारिद्रिय, विषमता या सर्वामुळे असलेली असाहाय्यता या संचितामध्ये साठविलेली आहे. या संचिताविरूध्दची प्रतिक्रिया म्हणजे आदिवासींचे साहित्य होय.'' २ (संदर्भ: दुसरे आदिवासी उलगुलानवेध साहित्य संमेलन, भंडारा दि. १७ नोव्हेंबर २०१२, पृष्ठ क्र.०७)

**आदिवासी साहित्याची प्रेरणा :** आदिवासी साहित्याची प्रेरणा कोणती असेल तर ती म्हणजे निसर्ग आहे. कारण आदिवासींचे समाजजीवन हे निसर्गाच्या सानिध्यात गेले आहे. निसर्ग हीच प्रेरणा आहे, आदिवासी समाजाची रचना टोटेमवर आधारीत असल्याने टोटेम हेच आदिवासींचे दैवत मानले आहे. झाड, पक्षी व प्राणी हे आपले दैवत आदिवासी मानतो. पहिली पूजा ही आदिवासी ह्यांची करतो. त्यांचे निसर्गप्रेम हे विलक्षण व निसर्गनिष्ठा ही दृढ आहे. म्हणून आदिवासी साहित्यिक व समीक्षक डॉ. विनायक तुमराम यांनी असे म्हटले आहे.

''बामणाच्या जल्माला जाशी त लिखून लिखून मरशी
महारवाडी होशी त तोलून तोलून मरशी
चमार होशी त नाड्या जोती करून मरशी
पण गोंडाच्या जल्माला जाशी त जंगलाचा राजा होशी।''३ (संदर्भ: आदिवासी साहित्ये दिशा आणि दर्शन, डॉ. विनायक तुमराम,स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्र.०३)

अशी आदिवासींची जीवनदृष्टी आहे, जीवनाभूती आहे. आदिवासी समाजाची फार प्राचीनतम व समृध्द संस्कृती आहे. हा सांस्कृतिक वारसा गेल्या हजारो शतकापासून आजतागायत पिढयाना लाभला आहे आणि म्हणून संस्कृती हीच आदिवासी समाजाचे जीवन आधार व प्रेरणा असल्याने प्रेरणास्त्रोत आहे. आदिवासी समाजाची जीवनशैली अनेक कलांनी नटलेली आहे. त्यांच्याकडे असलेली नृत्यकला, वाद्यकला, गायनकला, संगीतकला व चित्रकला खरे तर आजची जननी आहे. यांच्या कलाकृतीत कुठलीच नक्कल नाही तर नैसर्गिक प्रेरणा आहे. त्यांचे जीवन लोकसाहित्याने व उत्तम कलाकृतीने ठासून भरले आहे. लोकगीते, उखाने, म्हणी आणि मौलिक लोकवाङमयाचा अमूल्य ठेवा आजही वारसा त्यांच्या जीवन—जाणीवा ह्या प्रेरणा आहेत. त्यामुळे जीवनामागे जशा नैसर्गिक व सांस्कृतिक प्रेरणा आहेतच यासोबतच ऐतिहासिक, धार्मिक, मार्क्सवादी, फुले—आंबेडकरी प्रेरणा आहेत.

**समकालीन साहित्य म्हणजे काय? :** डॉ. मदन कुलकर्णी म्हणतात की, ''आपल्या आणि आपल्या आसपासच्या बदलत्या कालखंडातील व्यक्ती, घटना, प्रसंग, जीवन, जाणिवा, विचारप्रणाली, भावानुभूती यांचे चित्रण युगभान सांभाळून ज्या साहित्यात केलेले असेल ते समकालीन साहित्य होय.'' ४ (संदर्भ: डॉ. मदन कुलकर्णी, साठोत्तरी मराठी वाङमयातील प्रवाह, संपादक डॉ. शरणकुमार लिंबाळे दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७, पृष्ठ क्र.१७)

**आदिवासी साहित्यिकांच्या साहित्याची वाटचाल :** जिथे माणसाची प्राथमिक गरज पूर्ण झाली नसेल तो काय दुय्यम गरजांकडे कसे काय वळणार. जसा जसा शिक्षणाचा प्रसार झाला साहित्याची ओळख झाली. तसा तो आपले अस्तित्व व अस्मिता शोधू लागला आणि तो साहित्याकडे वळून लिहू लागला. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रभावित होवुन त्यांचे आत्मभान जागृत झाले आणि तो लेखणाकडे वळला. तो आदिवासी साहित्याचा

प्रारंभ काळ १९७५—७६ इ.स. पासून झालेले दिसतो. १९७६ साली भुजंग मेश्राम यांच्या आदिवासी कविता हा पहिला कवितासंग्रह प्रसिध्द झाला. हा गोंडी भाषेतील पहिलाच कवितासंग्रह अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचा ठरला. त्यानंतर १९८२ साली डॉ. उत्तमराव घोंगडे यांचा वनवासी हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. १९८६ साली वाहरू सोनवणे यांचा गोधड तर १९८७ साली प्रा.डॉ. विनायक तुमराम यांचा गोंडवन पेटले आहे हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर प्रा. वामन शेळमाके यांचा जागवा मने पेटवा मशाली १९८९ साली वाचकासाठी उपलब्ध झाला. यानंतर आदिवासी साहित्यात मातृशक्ती रूपात भर पडून कवयित्री उषाकिरण आत्राम यांनी आपली नोकरी सांभाळून आदिवासी समाजाच्या होणाऱ्या अन्याय—अत्याचार, दारिद्रय व दु:ख पाहून त्यांचे मन हेलावून गेले ते कुठेतरी आवाज पोहचावे त्यांची कफियत मांडावी म्हणून लेखनी घेऊन स्त्रियांचे आवाज बुलंद करीत त्यांची प्रतिनिधीक रूपात म्होरकी कवितासंग्रह १९९७ साली वाचकांच्या हाती दिला. १९९८ साली कुसुम अलाम यांची रान आसवांचे तळे हा पहिला कवितासंग्रह आला याच कालावधीत सुनिल कुंभरे यांचा तिरकमठा हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर नाटके, कथा व कादंबरी साहित्यरूपात आले. त्यापूर्वी आदिवासी साहित्य उपलब्ध नव्हते असे नाही तर ते मौखिक लोकवाङमय स्वरूपात विपूल प्रमाणात होते. हजारो शतकातील सामाजिक व सांस्कृतिक कलामूल्य जोपासत आजतागायत कायम ठेवले त्या समाजाचे साहित्य नाही. असे उद्‌गार काढणे म्हणजे आदिवासी सांस्कृतिक मूल्याचा व परंपरेचा अपमान करणे ठरेल. आदिवासी साहित्य लिखित स्वरूपात नसल्यामागचे कारण हजारो वर्षाचा बेडीबंद व रानावनातील जीवन. त्यांच्या जीवनातील वाट्याला आलेले उपेक्षित अंधारलेल्या वाटा. तसेच इतर साहित्याला मिळालेली साहित्यपीठ ते आदिवासी साहित्याला मिळाले नाही हे खरं कारण होय. त्यामुळेच आजही इतर साहित्याच्या तुलनेत आदिवासी साहित्य खुप नगण्य संख्येत आढळते याचे हे कारण होय.

**समकालीन आदिवासी साहित्यिकापुढील आव्हाने :** साहित्य हे समाज जागृतीचे शस्त्र आहे. ते जागविते सजक करते सोबतच दिशा देण्याचे काम साहित्य करते. तेव्हा साहित्यिक हाच खऱ्या अर्थाने समाजाचाही निर्मितीकार असतो. तो दिशादर्शकही असतो. आज खाउजा संस्कृतीने माणसाचे जीवनच बदलविले अनेक जीवघेण्या स्पर्धा वाढल्या. नक्षलवाद जन्माला आला यामुळे आदिवासी समाजाचे जनजीवन विस्कळीत झाले. समाजात दहशतवाद फोफावला जरी देश स्वातंत्र्य झाला परंतू आदिवासी माणूस स्वतंत्र झाला काय? दिवसेंदिवस त्याचे हक्क अधिकार शासन हिसकावुन घेत आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात उदासीनता, नैराश्य, वैफल्याने त्याला ग्रासले आहे. असे मरणयातना व्यतीत करावे लागत आहे. सोबतच जागतिकीकरणाने तर आदिवासी समाजाचे जीवनमूल्य बदलविले परंतू त्यांचे हक्क व अधिकारावर एक प्रकारे

गदाच आली. भाषा, चालिरीती व परंपरा सोडून परकीय विचारांच्या प्रभावाखाली धर्माची घुसखोरी वाढून इतर धर्माचे आश्रय घेऊ लागले. सामाजिक, राजकीय, आर्थिक व धार्मिक आक्रमणाचे आव्हाने उभे आहेत. हे आव्हाने पेलण्यासाठी आदिवासी साहित्याची भूमिका महत्वाची असणार आहे. या सर्व गदारोळात आमचे आम्हाला अस्तित्व शोधणे महत्वाचे आहे. हे प्रश्न आमच्या आदिवासी साहित्यिकाने कितपत दखल घेतली त्यांचा एक सांगोपांग चर्चा होणे महत्वाचे आहे. या अनुषंगाने समकालीन आदिवासी साहित्याची विचार विर्मशकाच्या दृष्टीने मंथन होणे नितांत गरजेचे आहे.

**समकालीन आदिवासी कवितेतील संवेदना :** (१९९५—२०२०) हा कालखंड आदिवासी कवितेचा महत्वाचा टप्पा आहे. या कालखंडाला परिवर्तनाचा काळ म्हटले आहे. तर हयाच काळात आदिवासी साहित्याने चळवळ निर्माण केली. अनेक लहान मोठे वैचारिक मंथन घडून आले त्यामुळे हया काळाला क्रांतीकाव्याचा उगवता काळ असे म्हटल्यास मुळीच व्यर्थ नाही. आदिवासी काव्य खऱ्या अर्थाने याच काळात जन्माला आले व विकास पावले असे समजायला हरकत नाही. स्वात्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार झाला, समाजातील नवतरूण शिक्षित झाले, त्यांना जाणीव होवू लागली. सोबतच त्यांचे आत्मभान जागृत झाले. वैचारिक मंथन होऊन त्यांना नव—नव्या जाणीवेतून कमी अधिक प्रमाणात या कालखंडाचा प्रतिभावंतावर प्रभाव पडला हे साहजिकच आहे. यातून आपला मार्ग कोणता ते शोधू लागले. आपल्या मुक्तिचा मार्ग आपणच शोधावा या प्रयोजनातून ते वाङमय निर्मितीकडे वळले. यातूनच नव साहित्यात भर पडून वैचारिक लेखनाला खरी सुरूवात झाली. याच कालावधीत आदिवासी नवसाहित्यिकाकडून बऱ्याच प्रमाणात लेखन झाले. त्यांच्या लेखनात समाजाचे प्रतिबिंब उमटले जावू लागले. आदिवासींच्या दुःख, वेदनांचे, चिंतनाचे, दारिद्रयता, रानावनातील जगणे, अन्याय—अत्याचार, नक्षलवाद, कुमारीमाता, अंधविश्वास, कुपोषण, धर्मपरिवर्तन, हक्क अधिकाराची हनन, बोगसाचे आक्रमक, माझी संस्कृती माझा धर्म कुपारलिंगो व आपण सभ्य संस्कृतीचे वारसदार आहोत ही भावना प्रत्येक नवसाहित्यिकात जाणीव होवू लागली. हया अनुषंगाने लेखन करून आदिवासी नवसाहित्यिक लिहू लागले. या अनुषंगाने मान्यवर साहित्यिकांचे कवितेच्या संदर्भात अभ्यासाच्या दृष्टिकोणातून कशा प्रकारे संवेदना उमटल्या आहेत ते पाहूया. १९९५ या दुसऱ्या टप्प्यातील लेखन करणारा आदिवासी साहित्यातील महत्वाचा कवी मानला जातो. ज्यांच्या साहित्याने समाजात उलगुलान चळवळ निर्माण केली. महाराष्ट्रातील सर्व प्रमुख नियतकालिकांमधून कविता संशोधनपर लेख प्रकाशित झाले आहे. आदिवासींचे प्रेरणास्थान असलेला बिरसामुंडा यांची नाळ कशी जुळली ते भुजंग मेश्राम यांनी ‘‘उलगुलान’’ १९९५ साली हा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशित केला. यात प्रामुख्याने गोंडी, परधानी व गोरमाटी अशा बोली भाषेतल्या कवितांमुळे ‘‘उलगुलान’’ म्हणजे सर्व पातळयावरून

केलेला सार्वत्रिक उठाव बिरसा मुंडा यांनी आदिवासी चळवळीचे नेतृत्व करतांना केलेली उलगुलान ची घोषणा होय. 'बिरसा मुंडा', भेटलेल्या कविता, भेदिक, गावबांधणी व पांडवाणी यासारख्या कवितांची रचना करून आदिवासी समाजाच्या वेदना, दु:ख, दारिद्रय व शोषण कवितेतून प्रकट केल्या तर त्यांचा तिसरा काव्यसंग्रह ''अभुजमाड'' २००८ साली प्रकाशित झाला. यात प्रामुख्याने सर्व प्रकाशित अप्रकाशित कवितांचे संकलन आहे. अरण्यवस्तीतून आलेल्या, गोंडी मातृभाषा जाणकार व अनुभवी कवी पन्नाशीच्या आत निघून गेल्या. त्यांच्या कविता म्हणजे भूतकाळातील संदर्भ शोधून वर्तमानकाळात घातलेली सांगड होय. त्यांची कविता ही आदिवासींचे लेखाजोखा मांडणारी वर्तमानाचा जाहीरनामा होय. गोंडी, कोकणी, वऱ्हाडी व बंबइया बोलीतील कविता आहेत. गोंडी भाषेवर त्यांचे खुप प्रेम होते. गोंडी, कुडुक व मुंडारी हया भाषेला राज्यरचनेत स्थान नाहीच परंतू जिल्हारचनेतही नाही ही खंत व्यक्त करतो. एवढेच नव्हे तर आदिवासींचे शोषण सेठ—सावकार, पुरोहिताकडून कसे होते तो शोषणाचा पाढाच कवितेतून मांडला आहे. तर आदिवासी कवीच्या पहिल्या पिढीतील द्रष्टे कवी व विचारवंत रामचद्र जंगले यांनी १९९५ मध्ये ''धिक्कार'', ''इखारलेल्या ललना'' २००६ ते २०१० साली ''पाउऊसपाणी'' प्रकाशित केले. त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्ये आम्ही कितीही राबलो तरी आमचे ढूंगण उघळेच अशी खंत व्यक्त केली तर जीवन जगण्यासाठी उन्हातानात जंगल शिवारातील ढिंक, मद व चारोळया गोळा करून त्यावर उपजिविका भगवितांना कसे शोषण करतात ते चित्र कवितेत आले तरीही आदिवासी माणूस हा स्वाभिमानाने जीवन जगतो आहे कधीच भीक मागत नाही. तसेच आदिवासींना वनवासी संबोधणे ते मुळीच मान्य नाही. 'आम्ही या देशाचे मुळनिवासी आहोत राक्षस नाही तर देशाचे राजे आहोत' अशी संवेदना व्यक्त करतात. तर प्रा. माधव सरकुंडे हे आदिवासी साहित्यातील एक विचारशील व प्रतिभवंत कवी म्हणून परिचित आहेत. त्यांचा पहिला कवितासंग्रह ''मनोगत'' १९९७ साली प्रकाशित झाला. त्यानंतर ''रानपाखरांची संसद'' २००५ आणि २००९ साली ''ब्लॅक इज ब्युटीफुल'' हे तीन काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहेत. ते आध जमातीतीतून आहेत. ते इंग्रजी विषयाचे प्राध्यापक आहेत. सेवाकार्य व काव्यसाधना या दोन्ही पातळ्या एकाचवेळी सांभाळणारे ते एक समतोल व्यक्तिमत्वाचे धनी आहेत. त्यांनी आपल्या कवितेत रानावनातले, टोल्या, पाड्यांवरचे अस्पृश्य जीवनानुभव कवितेत मांडले आहे. वेदनेला कलेच्या ठिकाणी कसे मांडता येईल ते काव्यातून मांडून दु:ख व दारिद्रयता हे आमच्या वाटयाला आलेले भोग आहेत अशी संवेदना व्यक्त केली आहे. तर चामुलाल राठवा यांनी ''माझी सनद कुठे आहे?'' २००४ साली प्रकाशित केली आहे. वास्तविकता या काव्यसंग्रहाने सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक मूल्याची रूजवणूक केली आहे. आपल्या शूरवीरांचे कार्यकतृत्व मांडले आहे. तसेच ज्या व्यवस्थेने आदिवासींना नाकारले त्यांचा निषेध केला. एवढेच नव्हे तर 'वाहरे बंधुता

समता!' हा चामुलाल राठवांचा सवाल आधोरेखित करणारा आहे नव्हे वर्तमानाला अस्वस्थ करणारा आहे. आदिवासी साहित्यात महत्वाची भूमिका आहे. त्या आदिवासी साहित्यिकांच्या पहिल्या पिढीतील एक जेष्ठ कवयित्री म्हणून ज्यांच नाव आदिवासी साहित्यातून वगळू शकत नाही अशा नामवंत कवयित्री उषाकिरण आत्राम हया होत. ज्यांच्या नावात उजेडाचा साहित्यातील किरण जोडला आहे त्यांचा पहिला कवितासंग्रह ''म्होरकी'' १९९७ या काव्यसंग्रहाने आदिवासी साहित्यात खळबळ निर्माण केली. आत्राम यांच्या कवितेने अरण्यमय घनदाट जंगलातील दऱ्या खोऱ्यातील राहणाऱ्या स्त्रियांच्या दु:खांना वाचा फोडण्याचे काम आजमीतीस बोटावर मोजणाऱ्या साहित्यिकांनी दखल घेतली त्यापैकी एक आत्राम होत. आत्रामनी यांच्या साहित्याने दखलच घेतली नाही त्यांचे नेतृत्व स्वीकारून त्यांना ''शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा'' हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश देवून वर्तमानाकडे पाहण्याचा दृष्टिकोण डोळस केला आहे. ''जगापासून दूर—दूर'', या कवितेत 'तो भटकतो उन्हापावसातून काट्या झुडपातून दरी गुहेतून जगापासून दूर कोणती दिशा? वलकलाने अब्रु झाकुन अंधार संसार नागडा उघडा. मरण येत नाही, म्हणून जगणे
जगतो म्हणून खाने
जन्मलो म्हणून वाढणे
दु:खाला विसरण्यासाठी
५ (संदर्भ: म्होरकी, उषाकिरण आत्राम गोंडवाना साहित्य परिषद, नागपूर, १९९७)

अशाप्रकारे गंभीर समाजवास्तवाचे भेदक चित्र कवयित्री उषाकिरण आत्राम यांनी केले आहे. हे चित्र पाहुन कवयित्री किती अस्वस्थ होतात यांचा वाचकांना प्रत्यय येतो. ''पयसाची लाल आग व्हय!'' या कवितेत ''राणे! एवढा शिणगार करू नगं. राणे! तुझ्यावर नजर समद्या सुधारलेल्या बाप्पायची
म्हणून म्हणते ''तू रातराणी होवू नगं''!
''व्हशील तं पयसाची लाल तांबडी आग व्हय!''
नायत् बिब्याची फुल व्हय!'' या कवितेत कवयित्री आत्राम यांनी स्त्रियांना उपदेश करतांना तुझे शोषण करणारे काही कमी नाहीत तेव्हा तू रातराणी होण्याऐवजी लाल आग व्हय! कारण आदिवासी स्त्रीचे शोषण याच स्वातंत्र्योत्तर काळात प्रचंड प्रमाणात होतांना कवयित्रीने आपल्या चक्षूनी पाहिले आहे. त्यामुळे आदिवासी स्त्रीला हार गजऱ्यानी सजण्यापेक्षा निवाऱ्याची धगधगती ज्वाला होवून लाल आग होण्याची सूचितार्थ करते. सोबतच शोषणाचे प्रतिकार करायला शिक असा उपदेशही करते. तर ''सूर्याचे वारस होवू या!'' या कवितेत कवयित्री आत्राम यांनी एकाच पणतीने लाखो पणत्या पेटवून होईल पहाट सूर्य उरलेल्या वेळी तरी ''सूर्याचे वारस होवू या'' चला वळू या! असे आपल्या आयुष्यातील अज्ञान दूर करण्यासाठी उजेडाच्या मार्गाने जाणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे. तसेच त्यांच्या म्होरकी या प्रतिनिधीक पहिल्या काव्यसंग्रहात काही कविता जसे ''अत्त दीप भव!'', 'तयारी'', ''कुंकू'', ''तिसरा'',

''शब्द शस्त्र'', ''प्रकाशाचे डोळे'', ''शृगार'', ''मी व कोणाची'', ''म्होरकी'', ''समज'', ''सांग राणे'', ''केवड्याची माळ केसांत बांधीन!'', ''मातृत्व'', ''इशारा'', ''सूर्य नगरीचे कारागिर'', ''मुक वेदनेचा'', ''जाहिरनामा'', ''परिवर्तन'', ''जखम'', ''मायेचा टाहो'', ''मुक्तसूर्या नेल्सन मंडेलास'',''शिका'' व ''विसंगती'' या कवितेत कवयित्री आत्राम यांची कविता आशयाच्या दृष्टिकोणातून आत्यंतिक महत्वपूर्ण व भावपूर्ण आहे. आदिवासी चित्रण यथार्थपणे प्रकट केले आहे. त्यांची कविता ही आदिवासींच्या जीवनाचे वास्तव्य चित्रण करणारी प्रातिनिधीक कविता आहे. आदिवासींच्या हालअपेष्ठा, दारिद्रय, उपासमार, कुपोषण, अन्याय–अत्याचार, त्यांचे दु:ख व वेदना घेऊन आकारास आलेली आत्राम यांची कविता आहे. या शोषणाच्या प्रतिकारार्थ उलगुलानची घोषणा करणारी ही कविता आहे. ''तिसरा डोळा'', मला नाही प्यायचे विष, मला उघडायचा आहे रानाचा तिसरा डोळा या कवितेत रानावनात राहणारा आदिवासी माणाचे अज्ञान दूर करून उजेड निर्माण करण्यासाठी कवयित्री अस्वस्थ होतात. तर ''प्रकाशाचे डोळे'' या कवितेत माझ्या रानाला केव्हा डोळे फ ुटेल! रानाला उजेड देणारे सूर्यनेत्र दे! तुझ्या नजरेत रान नव्याने फुलू दे! अवघे रानच प्रकाशाचे डोळे बनू दे! रानातील माणसांच्या जीवनात उजेडाचे सूर्यकिरण होवू दे हा अज्ञान कायमचा नाहीसा झाला पाहिजे याकरीता आत्राम यांनी नवा आशावाद परिवर्तनाचा मार्ग स्वीकारला आहे. तर त्यांच्या ''लेखणीच्या तलवारी'' २००९ साली उषाकिरण आत्राम यांचा दुसरा कवितासंग्रह आत्राम यांची कविता ही रंजनासाठी आकारास आली नसून त्यांची कविता जीवनानुभवातील वास्तव घेऊन जन्माला आली आहे. आदिवासींचे जगण्या मरण्याचे प्रश्न, प्रस्थापित व्यवस्थेने शतकानुशतके नाकारल्याने मनात चीड निर्माण होणे हे साहजिक आहे. जो समाज प्राचीन सांस्कृतिक मूल्य, परंपरा जतन करणारा एकमेव आहे. परंतू आज हया समाजाचे मूल्य नष्ठ होत आहे. वेदना, शोषण, अत्याचार व दारिद्रयता हे समाजातील वास्तविक खरं रूप कवितेत मांडले आहे. आत्राम यांची कविता ही रानावनात राहणाऱ्या आदिवासी समाजाचे दु:खश्रृना वाचा फोडणारी प्रसंगी कैफियत मांडणारी खरी कविता आहे. ६ (संदर्भ: लेखणीच्या तलवारी कवयित्री उषाकिरण आत्राम, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, प्रथवावृत्ती १४ नोव्हे. २००९). ''ज्यांनी बी लावलीच नाही त्यांना झाड तोडण्याचा काय अधिकार ज्यांनी अंधार गुहेत मशाल पेटवून उजेड केलाच नाही त्यांना ज्यांनी लढाई कधी लढलीच नाही त्यांना शौर्यपदक घेण्याचा काय अधिकार या कवितेत कवयित्री हया देशाती वास्तविकता पाहुन अस्वस्थ झाली आहे. अहो हया मातृभूमीसाठी ज्यांनी आपले बलिदान दिले त्यांचा गौरव होत नाही परंतु खोटयांचे गौरव व सत्कार पाहून मनात संतापाची भावना निर्माण होते. तेच आज आपल्या भूमीतून बेघर झाले आहे. हे वास्तव चित्र कवयित्रीने मांडले आहे. आज आदिवासी समाजात दहशत पसरविली जात आहे. जो समाज निसर्ग हे आमचे दैवत व संरक्षक म्हणून आजही आदिशक्ती रूपात निसर्गाची पूजा करतो असे तत्व पाळणाऱ्या समाजाचे जल, जंगल, जमीन हया पासून बेदखल करून त्यांच्या मूलभूत अधिकारापासून वंचित केले जाते. शासनाने वसाहतवाद, साम्राज्यवाद व औद्योगीकीकरण करून आदिवासींना भूमीहीन करण्याचा एक षडयंत्र निर्माण केला आहे. त्याचे चित्र आत्राम यांच्या कवितेचा विषय

आहे. त्यांच्या काव्यलेखनाचे प्रयोजन हे केवळ आदिवासीच घटकाचे प्रश्न नसून तमाम तळागाळातील वंचितांची आत्राम यांची कविता सनद आहे.

**समारोप :** या काव्य अवलोकनातून आदिवासी समकालीन कवितेचे स्वरूप तिची शक्तीस्थळे आहेत. एकंदरीत आदिवासी कविता ही वेदना, विद्रोहाची नकारात्मक भाषा, शोषण, अत्याचार पाहून कवीचे झालेले विषण्ण मन अस्वस्थता व समता, स्वातंत्र्य व मानवी मूल्यांचा केलेला पुरस्कार तिचे स्वाभिमानी धोरण या तत्वावर ही कविता उभी आहे. तिचे अस्तित्व हे विद्रोहात्मक कणखर मार्गाचे अवलंब करीत एकात्मजीवनाचा व धर्म संस्कृतीचा पुरस्कार करीत आपल्या आत्मसन्मानाची कैफियत मांडली आहे.

**निष्कर्ष :**

१) आदिवासी साहित्य स्वतंत्र व प्राचीन सांस्कृतिक मूल्य जोपासणारे आहे.

२) आदिवासी सहित्य हे कोणत्याही साहित्याची प्रेरणा वा प्रतिकृती नाही. तिच्या जाणीवा हया निसर्गनिर्मित संवेदना आहेत.

३) आदिवासी कविता ही शोषण, अत्याचार, वेदना, विद्रोह, नकार व कुपोषण हया विषयातून आकारास आली असल्याने अस्सल बीजमंत्र ठरली आहे.

४) आदिवासी कविता ही खरी उद्याची प्रकाशवाट ठरणारी आहे.

५) आदिवासी कवितेत सामाजिक व सांस्कृतिक मूल्य जोपासत निसर्ग मूल्य जपले गेले आहे.

६) आदिवासी कविता कोणताही साज शृंगार व गुढगुंजनावर भर देत नसून ती वेदना व शोषणाचा पाढा वाचत असल्याने तीला वर्तमानाशी संवाद साधता आले.

७) आदिवासी कविता ही एकात्मता साधुन संघर्षशीलतेच्या वाटेने परिक्रमा करतांना दिसते.

**संदर्भ :**


१. *(संदर्भः आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे, संकलन डॉ. गोविंद गारे, सुगावा प्रकाशन, पुणे—३० पृष्ठ क्र.०२)*

२. *(संदर्भः दुसरे आदिवासी उलगुलानवेध साहित्य संमेलन, भंडारा दि. १७ नोव्हेंबर २०१२, पृष्ठ क्र.०७)*

३. *(संदर्भः आदिवासी साहित्ये दिशा आणि दर्शन, डॉ. विनायक तुमराम,स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्र.०३)*

४. *(संदर्भः डॉ. मदन कुलकर्णी, साठोत्तरी मराठी वाङमयातील प्रवाह, संपादक डॉ. शरणकुमार लिंबाळे दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७, पृष्ठ क्र.१७)*

५. *(संदर्भः म्होरकी, उषाकिरण आत्राम गोंडवाना साहित्य परिषद, नागपूर, १९९७)*

६. *(संदर्भः लेखणीच्या तलवारी कवयित्री उषाकिरण आत्राम, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, प्रथवावृत्ती १४ नोव्हे. २००९).*

## समकालीन मराठी कादंबरी : निळया डोळयाची मुलगी

**डॉ. अर्चना काटकर-सोनवणे**
*(मराठी विभाग प्रमुख), एकता कला महाविद्यालय बिडकीन, ता.पैठण,जि.औरंगाबाद*
*मो.क्र.9421305911.*

**प्रस्तावना :**

शिल्पा कांबळे यांची 'निळया डोळयाची मुलगी' 2014 ही कादंबरी सामाजिक व काही अंशी कौटुंबिक आहे. उल्काची काहाणी यात मांडतांना लेखिकेने यात मुंबई या महानरातील जीवन मांडले आहे. यात उल्का व तिची आई वैजयंता यांची कौटुंबिक घडी ही अस्ताव्यस्त, विस्कळीत असली तरी त्या पलिकडे जाऊन लेखिकेने फक्त कुटुंबाचे दु:ख,दारिद्रय न मांडता माणसांची कहाणी आहे असेच दिसते.

उल्काला शाळेत मिळणा-या अनुभवाला दलितपणाची किनार आहे. तिला मैत्रिण मैथिलीच्या घरी प्रवेश मिळत नाही. यात (एस.टी., एस.सी.) अनुसूचिजत जाती जमातीला समाजात वावरतांना मिळणारी वागणूक, त्यांच्या भावना नोंदवल्या आहेत. येथे झोपडपट्टीतील जगणे ही अविष्कृत केलेले आहे. उल्क व तिची आई मामाच्या, आजी-आजोबांच्या घरी राहतात तेंव्हा तेथे येणारे बाल उल्काचे अनुभव ही लेखिकेने मनाला चटका लावणारे असेच मांडले आहे. उल्का आपल्या मैत्रिणीला सुबीला पत्रातून लिहिते. "मामा त्यांच्या मुलांचे लाड करतात मला जवळही घेत नाहीत. मी मम्मीला खूप हट्ट केला की, पप्पांकडे चल तर तिने माझ्या थोबाडीत दिली,"1 येथे मांडलेले उल्काचे हे दु:ख हे तिच्या ठिकाणी खूप मोठे आहे, आई-वडिलांच्या भांडणामध्ये लेकरांच्या भावनांचा होणारा चुराडा घुसमट लेखिकेने मांडली आहे. अलिकडे पती-पत्नीच्या वादात मुलं हे आई, वडीलांच्या प्रेमाला मुकतात याचीच जाणीव करुन दिलेली आहे.

उल्काचे वडील बाबूराव चाळके दूसरे लग्न करतात. तरीही व्यसनाधिनतेमुळे ते दुस-या कुटुंबासोबत हीराहू शकत नाही. त्यांचा व्यसनामुळे शेवट होतो. व दूसरे कुटुंबही उध्दवस्त होते. इकडे वैजयंता ही एका भय्या रज्जूच्या प्रेमात पडते तो ही तिच्याशी लग्न करु इच्छितो पंरतु वैजयंता उल्काला प्राधान्य देऊन ही प्रेम कहाणी संपवते येथे नैतिकतेचे सुचन झालेले आहे. वैजयंताचे वडील वारल्यानंतर पेंढी मोकळी व्हावी तसे कुटूंब पांगते आई गावी निघून जाते वैजयंताला उल्काला घेऊन विभक्त व्हावे लागते. भाऊ स्वतंत्र होतात. भावापासून दूरावलेल्या वैजयंताला दूरचा भाऊ काही काळानंतर आश्रय देतो.

मायलेकीचे प्रेम कादंबरीत सुरवातीला असले तरी त्याला प्राधान्य दिले गेलेले नाही. शेवटी वैजयंताचे आजारपण व उल्काचे तारुण्य यातून आईवर होणारी चिडचिड येथे व्यक्त होते. अत्यंत नैसर्गिके आणि वास्तवाची मांडणी यात दिसते.

उल्का व तिची मैत्रिण मिरा यांची कुटूंब पार्श्वभूमी जवळ-पास सारखी आहे. मिराचे वडील पोलिस असले तरी तिच्या आईला व मिराला सतत मारहाण करतात. मिराची आई जाचाला कंटाळून पळून जाते दूसरे लग्न करते पण तेथे ही तिला सुख मिळत नाही. तिचे वडील एका मुक्या मुलीशी लग्न करतात. ते मिराला आवडत

नाही. उल्का ही अभावात्मक जगण्यातून विधायक काही करु इच्छिते त्यामुळे तिची दृष्टी त्या प्रमाणे घडत जाते. तर मिरा कुठलेले ही ध्येय नसलेली वाहत जाणारी भरकटत जाते. तिचे विस्कटलेले प्रेम इथे व्यक्त झालेले आहे. तिचे कोणा बरोबरही फिरणे, ती सलीम बरोबर दिल्ली, फरिदाबाद अशी फिरत राहते. खरे तर कुटूंबातील प्रेमाचा अभाव असल्याने होणारी फरफट मीरातून व्यक्त झालेली आहे. माणसे ओळखण्यातही ती कमी पडते. दोन सख्या मौत्रिणी असतांना ही मिराची वागणूकच तिला सतत अडचणीत आनणारी आहे. दोन मैत्रिणी मध्ये मोठी तफावत असतांनाही त्या एकमेकींना मदत करतात. वास्तवाच्या कसोटीवर हे वाचकाला खटकणारे वाटते. कारण मीरासारखी मुलगी ख-या खोटया या गोष्टीतून बोध न घेता त्याच्यामागे फरपटत का जाते. ? आश्चर्य कारक असेच आहे.

उल्का आणि मीरा या दोन दिशांना जाणा-या दोन व्यक्ती आहेत. आणि उल्काची विधायक, सशक्त, विकासशील, नैतिक बाजू निवेदकाने ढळक केलेली आहे. त्यामुळे उल्का ही 'आक्रोशा' या संस्थेची अध्यक्ष होऊन मिरवणूक, मोर्चा यात सामील होतांना लहान मुलीकडे लक्ष देते तर मीरा फरपटत जाते.

झोपटपट्टयातील गुंड त्यांची दादागिरी, नळाचे पाणी न मिळणे, सार्वजनिक स्वच्छतागृहाची कमतरता तेथील अस्वच्छता तेथील लोकांच्या सामाजिक व आर्थिक स्वरुपाच्या समस्या कादंबरीत ठळक झालेल्या आहेत. उल्का ज्या शाळेत जाते ती बी.एम.सी.ची शाळा आणि पार्ल्यांची टिळक विद्यालय या शाळेतील तफावत मांडली आहे. यात आंबेडकरी विचार स्वीकारला तसाच काही हिंदू रुढी- परंपराही आहे.

वास्तवात दलित राजकारण दिशाहीन असून त्याला फाटाफुटीचे स्वरुप आहे. तरी वास्तव दडपून लेखिकेने त्यातील अपप्रवृत्तीची नोंद करत 'आक्रोश' सारखा ग्रुप निवृत्त प्राध्यापकांच्या अध्यक्षतेखाली तरुण मुलं-मुली वेगवेगळया पार्श्वभूमी असलेले असूनही लहान मोठी कामे करतात. अडचणी असणा-यांना मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. प्रसंगी मोर्चा मिरवणूक काढतात. त्यांना अटकही होते. दलित समाजात जागृती करुन विधायक कार्य करणारा गट येथे उल्काला महत्वाचा वाटतो. आणि उल्कासारखी कोणतीही राजकिय पार्श्वभूमी नसलेली तरुणी त्या ग्रुपची अध्यक्ष होते. यातून लेखिकेने तरुणांना सूचन केलेले आहे असेच दिसते. आंतरजातीय जोडपे त्यांच्यातील बेबनाव, आंबेडकरी विचारांची बांधीलकी हे सांगणारे समाजवास्तव यात आहे. मुक्ता श्रीधर यांचा आंतरजातीय विवाह आहे. तन्मयीची आई दलित तर श्रीधर तथाकथित उच्च वर्गातील आहे. मात्र त्यांच्यातील कर्मकांड गेलेले नाही. मुक्ता पुरोगामी समाजवादी कार्यकर्ती असल्यामुळे तिच्याकडून तन्मयीला या विचारांचा वारसा मिळालेला आहे. श्रीधर मात्र कर्मकांडात गुंतून कुणा दादांचा पट्टशिष्य बनून मठात जातो.

प्रतिक्षाचे वडील कष्टाने पुढे आलेले पण त्यांच्या मोठया मुलाने बाबासाहेबांच्या विचारांना कालिमा फासत होमहवन करुन परधर्मात लग्न केले. प्रतीक्षाच्या बहिणीने आंतरजातीच लग्न केले तिच्या नव-याचा दृष्टीकोन मात्र पारंपारिकच, 'तुम्ही शेडयुल कास्ट हरामखोरच असतात."2 असे म्हणून शिवी देतो त्यामुळे प्रतिक्षाचे वडील दु:खी आहेत. अशा पध्दतीने अवकाशाचा वेध नमुनेदारपणे वास्तव मांडत घेतला गेला आहे.

समाजातील दलित घटक हा कादंबरीचा एक महत्वाचा आविष्कार घटक आहे. उल्का, वैजयंता,तिची आजी, मिरा, सुमन, राणी, तन्मयी, मुक्ता, प्रतिसा या अध:स्तरातील स्त्रिया या जीवनातील महत्वाच्या घटक आहेत त्यांचेच संघर्ष येथे प्रकर्षाने मांडलेले आहे.

कादंबरीमध्ये स्थळांचे वर्णन तपशीला सह आलेले आहे. त्यातून वास्तव अधिक ढळक होतांना दिसते.

"ए मादरचोद नीचे बैठ| सबको मिलेगी, रुक रुका"3 केकच्या भोवती मुंगळया सारख्या घोळणा-या जनतानगरच्या मुलांना हुसकावीत अंकल बोलला. त्याच्या हातात लांब काठी होती बोटात सोन्याच्या चमकदार अंगठया होत्या.

झोपडपट्टयातील गुंडाच्या दादाच्या मुलाचा वाढदिवस त्यातील प्रसंग हा बोलका मांडल्याने डोळयापुढे हुबेहुब उभा राहतो.

भटक्यांच्या घराचे वर्णन 'उल्का लक्ष देऊन बघत होती लहान मुलाने को-या कागदावर काढलेल्या चित्रासारखे ते घर होते. त्याला दगड विटांच्या भिंती नाहीत लाकडाचे दरवाजे नाहीत. डोक्यावर पत्र्याची टोपी नाही. नुसते प्लास्टीकचे मजबूत कागद एकत्र करुन एक कोपरा बनवलेला त्या कोप-याच्या बाहेर चूल मांडलेली. मुंबईत चूला विटांच्या त्या चुलीवर ॲल्युमिनियमचे मोठे पातेले त्याच्यात घराबाहेरच्या अंगणात, रस्त्याच्या मध्यावर सुसाट गाडयांना चुकवत खेळणा-या या नागडया-उघडया पोरांची मध्यावर सुट्टीची खिचडी शिजत आहे. पोरांचा अंगावर मळाचा एक थरच्या थर जमा झालेला. त्यांची पार्वतीमाय एका कोप-यात नव-याशी हुज्जत घालत बसलेली तो वचवच करीत शिव्या देत तिला धरत होता. कधीही तो तिला पोतराजा सारखे सोलून काढणार होता. उल्काला त्या घराची कवि वाटली आणि पुढच्या क्लायमॅक्स सोसनार नाही म्हणून ती आत घरात जाते.

आक्रोशचे कार्यालय 'बी.डी.डी.चाळीची पंधरा बाय पंधरा ची खोली. दोन लाकडी दरवाजाची कडी तुटलेली कपाटे, एक लोखंडी टेबल, त्याच्यावर कॉम्प्युटर ब-याच एकावर एक रचून ठेवलेल्या फाईली, दारामागे गुंडाळी करुन ठेवलेले बॅनर आणि प्लॉस्टिकच्या बास्केट मध्ये ठेवलेला तो पक्षी सुमनच्या गुरुचे घर 'ग्रेनाइटच्या हिरव्या दगडांनी भितींना श्वास गुदमरेपर्यंत जखडून ठेवलेले एसी, टेलीफोन फ्रिज एकमेकांवर नजर रोखून उभे असलेले घर अत्यंत स्वच्छ होते. पण त्या स्वच्छतेत मांगल्य नव्हते. असे वाटत होते की, जेलरने कच्या कैधाकडून जवरी काम करुन घेतले आहे.

कादंबरीत अशा पध्दतीने तपशील सह स्थळांचे प्रसंगाचे वर्णन आलेले आहे यात लेखिकेची भूमिका महत्वपूर्ण ठरते. कादंबरीतील व्यक्तिरेख्यांची निवड ही खूप महत्वाची ठरते. लेखकाच्या जीवनात अनेक व्यक्ती आलेल्या असतात त्याचे चिंतन करुन त्या कादंबरीच्या पृष्ठभूमीवर साकार केल्या जातात. त्यांच्यात भावभावना, राग, प्रेम इच्छा, जगण्याचा पट त्याची कौटुंबिक, सामाजिक पार्श्वभूमी विचार करणे. यशस्वी होते वगैरे गोष्टी येतात. केवळ याच गोष्टींचा लेखकाने विचार केला तर पुनरावृत्ती होऊ शकते. येथे एकूण कथेचा अवकाश पाहता नायिका संयत, संयमी व सत्विक असी आलेली आहे. ती ज्या वातावरणात वाढली. जो परीसर तिच्या अशा वागणूकीस पोषक नसतांनाही तिचे व्यक्तिमत्वाचीघडन वेगळी ठरते. कुठे ही तिचा

भडक, रागीट, आततायी स्वभाव किंवा वागने दिसत नाही. लेखिकेला शेवटी उल्काचे कोणतीही राजकिय प्रबळ कौटुंबिक पार्श्वभूमी नसतांना आक्रोशचे अध्यक्ष होणे मांडण्या मागे काही होतू असावा असे दिसते. एकूण समाज वास्तव स्विकारुन व्यक्तीने आपली मर्यादा स्विकारुन शांतपणे परिस्थितीला सामोरे गेल्यास नक्की एका ध्येया पर्यंत पोहचू शकतो हे मांडले आहे. नायिका ही आपल्या भावना दु:ख हे लिहून पत्राच्या रुपाने मैत्रिणींशी वाटून घेते हा ही एक वेगळा प्रयोग लेखिकेने केला आहे.

कादंबरीचे निवेदन तृतीय पुरुषी असेल तरी ते ब-याच वेळा उल्काचे (नायिकेचे) आत्मनिवेदनच आहे.पत्राच्या स्वरुपात मध्ये मध्ये वेगळा फॉर्म लेखिकेचे वापरुन नायिकेचे निवेदन मांडले आहे. तीच जागा तिला मोकळे होण्यास योग्य असल्याचे वाटते व ती तशा पध्दतीने आलेली आहे.

मुंबई तील झोपडपट्टी तेथील झोपडपट्टीतील टपोरी पोरं त्यांचे जीवन व वागणे त्यांची भाषा, तृतीय पंथीयांचे जग समजावे त्यांचे वास्तव व सूक्ष्म दर्शन घडविण्या करीता लेखिकेने उल्कांची, सूमन व तिच्या गुरु वर ही प्रकाश टाकला आहे. यातून सत्यदर्शन घडते. समकालीन वातावरणात मुंबईचे असे वास्तव जीवन आहे. हे सांगतांना तेथील व्यसनाधीनता झोपडपटयातील जगणे त्या बरोबरच तरुण- तरुणींमधील शारीरिक संबंध, त्यांचे मद्यपान, अंतरजातीय विवाह, अंधश्रध्दा इत्यादी अनेक वास्तव गोष्टींवर प्रकाश टाकत उल्काचा या सर्व परिस्थिती व वातावरणातही कोणतीही पार्श्वभूमी नसतांना आक्रोशाची अध्यक्ष होते. हा उल्काचा संयतपणे होणारा उत्कर्ष तरुणांना संदेश देणाराच ठरतो आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. *कांबळे शिल्पा : निळया डोळयांची मुलगी*
2. *गोदा प्रकाशन, औरंगाबाद -2014, पृ.क्र.18.*
3. *तत्रैव : प्र.क्र.17*
4. *तत्रैव : प्र.क्र.53.*

## जागतिकीकरणात समकालीन मराठी कवितेचे स्वरूप

**डॉ. नरेंद्र तुकडोजी आरेकर**

*श्री. गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय, कुरखेडा, जिल्हा— गडचिरोली, भ्रमणभाष— ९४२१७३१०८३*

साहित्य हे काळाशी सुसंगत असते. त्या त्या काळाची वृत्ती—प्रवृत्ती, विचार, मन मानसिकता आणि लेखकाचा दृष्टिकोन हा साहित्यातून प्रतिबिंबित होत असतो. माणसाच्या वाटचालीत त्याचे साहित्यही त्याबरोबर चालत असल्याचे दिसून येते. साहित्याची निर्मिती करणारा संवेदनशील मनाचा लेखक, कवी त्या—त्या काळातील घडणा—या घटनांचा साक्षीदार असतो आणि त्या काळात जगत असताना त्याला आलेले प्रत्यक्ष अनुभव तो आपल्या साहित्यात मांडत असतो. त्यामुळेच समकालीन परिप्रेक्ष्यात समाजात घडलेली विविध स्थित्यंतरे मराठी साहित्यानेही टिपल्याचे दिसून येते. जागतिकीकरण ही भिन्न भिन्न आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रवाहांना सामावून घेणारी संज्ञा आहे. जागतिकीकरण ही अवस्था आहे, आणि सिध्दांतही आहे. परंतु वर्तमान काळात जागतिकीकरण या शब्दाचे अर्थ म्हणून आर्थिक उदारमतवाद, मुक्त बाजारपेठ, पश्चिमीकरण किंवा अमेरिकीकरण, इंटरनेट क्रांती, जागतिक एकात्मता हे प्रतिशब्द वापरले जातात.

जागतिकीकरण हे शेतात वापरल्या जाणाऱ्या दंताळयासारखे आहे असे म्हटले जाते. त्याला अनेक दांते आहेत. सामाजिक क्षेत्राच्या आर्थिक, राजकीय, सांस्क्तिक विभागांना त्याने व्यापले आहे. त्यामुळे वेगवेगळया भूमिकांतून, भिन्न भिन्न विद्याशाखांच्या माध्यमातून त्याचा विचार केला जातो. अर्थशास्त्र, औद्योगिक, वित्तव्यावसायिक, राजकीय, माहितीविषयक, भाषा, स्पर्धा, सांस्कृतिक, पर्यावरणीय, सामाजिक अशा विविध क्षेत्रांचे निरीक्षण केल्यास सर्वांचा जागतिकीकरणाशी संबंध आलेला दिसतो. त्यामध्ये भाषा आणि सांस्कृतिक क्षेत्राचा विचार केल्यास जागतिकीकरणात इंग्रजी भाषेला आत्यंतिक महत्व आलेले आहे, त्यामुळे इतर भाषांचे भवितव्य काय? असा प्रश उपस्थित झालेला आहे. जगातील एकतृतीयांश लोकांना इंग्रजी भाषा समजते. २०५० पर्यंत अर्धे जग ही भाषा बोलू लागेल असे म्हटले जाते.

भिन्न भिन्न संस्कृतींचा परस्परांशी संबंध येत असल्यामुळे सांस्कृतिक अभिसरण घडते आहे. आपले जीवनमान वाढवणे, परदेशी वस्तूंचा आणि कल्पनाप्रणालींचा स्वीकार करणे, नवे तंत्रज्ञान आत्मसात करणे आणि जागतिक संस्कृतीत सहभागी होण्याला चालना मिळालेली आहे. यातूनच उपभोक्तावादाची वा चंगळवादाची निर्मिती होण्याची शक्यता असते.

माणसाबरोबर त्याचे साहित्यही जागतिकीकरणात पोहोचले आहे. कागदावरुन ते आता ई कागदावर, मोठमोठया दुकाणांतून संगणकाच्या ब्लॉगवर पोहचले आहे. ई कादंबऱ्या, ई कथा, ई कविता येत आहेत. याचाच अर्थ जागतिकीकरणातून आलेले तंत्रज्ञान आपले साहित्यही वापरतांना दिसते. केवळ ते हे तंत्रज्ञानच वापरते असे नव्हे तर या तंत्रज्ञााच्या, माहिती संप्रषणाच्या काळात बदललेल्या माावी जीवनाला, गतीमान झालेल्या समग्र जिवाप्रणालीला आपल्या कवेत घेउन अवतरते. कविता हा लोकप्रिय साहित्यप्रकार मानल्या जातो. समाजातील बदलांचे

आद्य प्रतिबिंब काव्यात पडते असे म्हणतात. नवकाव्यातून प्रकटणाऱ्या प्रतिके आणि प्रतिमांसारखे स्वतंत्र असे प्रतिक व प्रतिमांचे विश्व उभे करते. कलावंत शब्दांमधून आणि प्रतिमांमधून शब्दांच्या आणि प्रतिमांच्या पलिकडचं असं काही व्यक्त करु पाहतात. कलाकृतीमध्ये प्रत्यक्षनिरपेक्ष, स्वतंत्रपणे अस्तित्वात असलेल्या वस्तूंचं जग असतं, शब्द आणि शब्दांमधल्या परस्पर संबंधातून निर्माण होणारं एक प्रत्यक्षनिरपेक्ष वास्तव हे कलेचं आशयद्रव्य असतं.

जागतिकीकरणाच्या संकल्पनेचा विचार प्रामुख्याने आर्थिक संदर्भात केला जात असला तरी हया संकल्पोचा संबंध साहित्य, कला, विज्ञान, संस्कृती, धर्म यांच्यासोबतही जोडला गेला आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचा प्रभाव समग्र मानवी जीवनावर पडतांना दिसतो. भारतामध्ये १९९० मध्ये जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आणि २१व्या शतकाच्या प्रारंभी ती गतीमान झाली. मराठीमध्ये उत्तम क ांबळे यांचा 'जागतिकीकरणात माझी कविता' हा २००६ मध्ये आलेला कवितासंग्रह जागतिकीकरणाचा कवितेवरील प्रत्यक्ष प्रभाव प्रकट करणारा ठरला व त्याशिवाय इतर कविंच्या कवितांमध्येही जागतिकीकरणाचे संदर्भ गडद होत गेलेले दिसतात. जागतिकीकरणाच्या नावानं सुरु झालेल्या स्पर्धेचं हत्यार वापरुन एकीकडे कंपनी फार्मिंग, मोठमोठी सेझ, रद्दीच्या भावात जमिनीची विक्री, मेटाकुटीला आलेला सहकार, माणसांची मुंग्यांप्रमाणं झालेली गर्दी, भाषा, प्रांत, गरीब—श्रीमंत अशी होणारी विभागणी, ओस पडणारी खेडी, अस्वस्थ होत चाललेली शहरं आणि त्यातही काही मंडळीचा वौश्विक खेडयाचा शोध घेण्याचा प्रयत्न पाहून उत्तम कांबळे म्हणतात,

''पण हे वौश्विक खेडंही सालं
भाकरीतल्या चंद्रासारखं
ते असून दिसत नाही
आणि दिसत नसूनही असतं
या अदृश्य खेडयात जाण्यासाठी
धनवंतांची, बुध्दीवंतांची काय गर्दी ?
संगणक, क्रेडीट कार्ड, पासपोर्ट
फॉरेन करन्सी, एक्सपोर्ट, इम्पोर्ट
पासवर्ड, कोडवर्ड, माउस, साईट
मोबाईल, ई—मेल
चार्टीग आणि चिटिंगही'' —

या साऱ्या गतिमान प्रक्रियेत माणसाचे माणूसपण हरवत असल्याचेही कवी व्यक्त करतात.

''सारं जग जवळ आलंय म्हणतात
पण माणसं माणसापासून
दूर धावताहेत
रोबोटच्या गळयात गळा घालताहेत
कॅरिबँगांमधून

प्रश्न वाहून नेताहेत
इथले लोक
दुधाच्या पिशव्यांप्रमाणे
अश्रूंच्या पिशव्याही
फ्रिजमध्ये ठेवताहेत लोक
फ्लॅटमध्ये काळीज ठेऊन
रस्त्यावर फिरताहेत इथले लोक''

आजचे सारे जगणेच पासवर्ड आणि कोडवर्डमध्ये परिवर्तीत होत असल्याचे कविला वाटते. माणसानेच जन्माला घातलेली यंत्रे माणसावरच तुटून पडतील की काय असे किती तरी प्रश्न त्यांना पडतात. यंत्र आणि माणूस यांच्या लढाईचे भयग्रस्त चित्र कांबळे यांनी आपल्या कवितेत निर्माण केले आहे. ते म्हणतात, —

''कुणी सांगावं
नव्या शतकातला माणूस
कदाचित
संगणकाच्या खांद्यावर मान ठेऊन
शेवटचा श्वास घेईल
छयाळू संगणक
अंतराळात
माणसाच्या थडग्याशेजारी
शोक सभा घेतील.''

अरुण काळे यांच्या कवितेनेही जागतिकीकरणात माणसाच्या अस्तित्वाचेच प्रश उपस्थित केले आहेत. माणसाच्या मेंदूतूनच बाहेर पडलेला संगणक महत्वाकांक्षी होतो आहे. तो माणसाचा रोबो करण्याच्या प्रयत्नात आहे. माणूस आणि संगणक यांच्यातील एका भयावह युध्दाची चाहूल आणि —युध्दातील संभाव्य निकाल शोधण्याचा प्रयत्न त्यांची कविता करते. वस्तू आणि मूल्यांच्या लढाईत माणूस जिंकावा असा आग्रह कवी धरतो. जागतिकीकरणात माणसाच्या वसाहतीऐवजी साईटला महत्व आलं आहे. जागतिकीकरणात जगायचं म्हणजे एका अर्थाने साईटवरच जगायचं. तेथून सारे व्यवहार करायचे. या साऱ्या महाजालामध्ये गरिबांना जागा नाही. साईटवाले श्रीमंत, साईट शोधणारे चतुर मग बिसाईटवाल्यांनी जायचं कुठं ? काल—परवापर्यंत भाकरीचा तुकडा मागणारे भिकारी उद्या साईटची भीक मागतील अशी कल्पना करत www. हे विश्वची माझा कटोरा .com या कवितेत ते म्हणतात—

''हरेक किस्म का पुण्य है बाबा
स्टोरीची मांग है बाबा
एक वेबसाईट हमारा भी डालो बाबा
www. हे विश्वची माझा कटोरा.com''

त्यांच्या 'सायरनचे शहर' या संग्रहातील बहुसंख्य कविता जागतिकीकरण आणि त्यातून होणारी सर्वसामाण्यांची मल्टीलुटालुट व्यक्त करतात. ग्लोबलचं गावकूस, सायकल ते रॉकेट, पाटा—वरवंटा ते किचनमशीन पोळपाट—लाटणे ते रोटीमेकर, धोबीघाट ते वॉशिंग मशीन, प्रेमाचं होऊ द्या ना जागतिकीकरण या अनेक कविता उदाहरणादाखल पुरेशा आहेत.

प्रवीण दशरथ बांदेकर यांच्या ' खेळखंडोबाच्या नावानं' या दीर्घकवितेत जागतिकीकरणाच्या काळात आपल्या वाटयाला आलेल्या करंटया वर्तमानाचं विश्लेषण आहे. जग त्या वर्तमानावर बागूलबोवाची पावलं वाजताहेत पण ती कवीशिवाय कुणाला ऐकू येत नाहीत म्हणून कवी म्हणतात,

''कळू लागेल तेव्हा कदाचित
खाजगी संवादासाठीही आपल्यातल्या
धुंडाळावं लागेल तुला मला
एखादं इ—मेल, इंटरनेट वेबसाइटः डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू
पिता—पुत्र संवाद डॉट कॉम
किंवा तसलंच एखादं यंत्र
ज्यात फक्त शब्दच असतील कोरडे
कानामात्रा हरवलेले
नि थुंकल्या जातील भावना
टेक्निकली आऊटडेटेड म्हणून (खेळखंडोबाच्या नावानं ...)''

हेमंत दिवटे यांच्या 'थांबताच येत नाही' या कवितासंग्रहातील कवितांमध्ये कार्टून नेटवर्क, हार्ड डिस्क, डाऊनलोड, मेगामॉल,चॅनल्स, लॉगऑडअ, चॅट, सेलेबल स्पेस, ब्रॅण्ड, जिंगल, लोगो, पासवर्ड असे वर्तमान जीवनात वापरात आलेले अनेक शब्द आहेत.

''कुठल्या भाषेत व्यक्त करायचं ?
व्यक्त करायचं म्हणजे काय व्यक्त करायचं ?
ग्लोबलायझेशन चांगलं की वाईट ?
स्वत:चा विचार करायचा की जगाचा करायचा ?
आपण एकटे आहोत की गर्दीतले आहोत ?
भाषा टिकेल की नाही, मुलांना कुठल्या मीडियममध्ये घालू ?" (थांबताच येत नाही)

जागतिकीकरणाच्या पर्वात बडया राष्ट्राच्या हस्तक्षेपाने चाललेल्या आंतरराष्ट्रीय राजकारणाने शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न निर्माण केले आहेत याचा प्रत्यय मराठी ग्रामीण कवितेत प्रकटते. गावखेडी व शेतकरी यांच्यापुढे निर्माण झालेल्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम 'टाहो' या कवितासंग्रहातून इंद्रजीत भालेराव यांनी केले आहे. ते म्हणतात,

‘जागतिकीकरणाच्या एंड्रीनचा डब्बा
कुणी धुतला माझ्या निर्मळ गंगेत
निरागस विहार करणाऱ्या नौकांत
कुणी आणून कोंबला अचानक आकांत’

जागतिकीकरणामुळे गावाची होत असलेली अवकळा सदानंद देशमुख यांनी त्यांच्या ‘गावकळा’ या काव्यसंग्रहातून जिवंतपणे मांडली आहे.जागतिकीकरण म्हणजे काय? हे माहीत नसलेल्या सोनबाने, गाईड फाडून पास झालेल्या आपल्या राजा नावाच्या मुलाला विचारलेला प्रश्नही महत्वाचा ठरतो.

‘हा गॅट करार म्हणजे काय आस्ते बाबा ?
अन् जागतिकीकरणणाचं वारं कसं आस्त ?
कसा वास येते त्या वाऱ्याले?
बल्डाखालच्या पांदीसारखा
का कणगयात बुडी लागल्या आंबूस गव्हासारखा ?’

प्रफुल्ल शिलेदार यांनी ‘महापूर’ नावाच्या कवितेतून ग्लोबल पाऊस सर्वदूर पडत असून सगळया पृथ्वीला घेरुन टाकणारं वारं वाहत आहे. महापूर आलेला आहे. आपापल्या संस्कृतींच्या संकरित भिंतींवर घातलेलं इतिहासाचं मजबूत काँक्रिट छप्पर वादळात उडून गेलेलं आहे. –

‘‘गळयापर्यंत आलेल्या पाण्यात
सगळंच वाहून जातंय
भाषेचे गळ टाकून काय काय वाचवणार
या महापुरात घातलेयत ट्रॉलर्स महाकोळयांनी
त्यांच्या ऑप्टीकल महाजालात
गवतायत त्यांना
लहानमोठया संस्कृतींचे बक्कळ मासे
महाकोळी घेतायत मत्स्यशेतीत महापीक
सातही समुद्रात सुरू झालेली साठमारी महाकोळयांची
सगळी जमीन पाण्याखाली आणून
राज्य करण्याची ईर्षा महाकोळयांना
इतके दिवस सांभाळलेले भाषेचे भोपळे
फुटत आहेत एक एक करुन (जगण्या पसाऱ्यात).’’

या ओळींमधले महाकोळी, ऑप्टीकल, महाजाल, लहाामोठया संस्कृतींचे मासे हे शब्द लक्षात घेण्यासारखे आहेत. नंतरच्या भागात त्यांनी संवादांचं, अभिव्यक्तीचं, जगण्याचं टिंबीकरण कसं झालेलं आहे हे सांगू शेवटच्या भागात भाषेविषयी चिंता व्यक्त झाली आहे.

‘‘लिपींच्या आडोशानं नांदणारं
भाषेचं नॉस्टॅल्जिक शेवाळ
नक्कीच होईल अश्मीभूत’’

जागतिकीकरणाच्या या नव्या पर्यावरणात माणसाची भावना, संवेदना, विचार करण्याची शैली, जीव-नाविषयीची दृष्टी, रक्ताच्या नाती, मीत्र, कुटुंबीय त्यांच्याबाबतची दृष्टी आणि एकूणच बदलत असलेला दृष्टिकोण, संस्कृतीचे बाजारीकरण व जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत बदलून गेलेले मानवाचे भावविश्व सुनील अभिमान यांची कविता बारकाव्याने रेखाटते.

‘‘या ग्लोबल वर्तमानात
भावना झाली आहे जाहिरात
आणि
मेंदूचे झाले आहे कम्प्युटर
तत्वज्ञान झाले आहे यूज अँड थ्रो
संस्कृती झाली आहे रखेल
किंवा
एड्स इथल्या रक्तातून चालला आहे मुरत
गालीब विस्की/कोक/ सिग्निचर पीत आहे’’ (ग्लोबल वर्तमानाच्या कविता)

जागतिकीकरणात संस्कारक्षम असणाऱ्या पिढयांनाही आपला आयडॉल कोण असावा, हे ठरविता येत ााही. कारण आज ठरविलेला आयडॉल उद्या आऊटडेटेड होण्याची भीतीच मनात सारखी घर करुन राहते. पूर्वी आदर्श ठरलेली व्यक्ती असत त्यांचा आदर्श समोर ठेऊन मुले प्रेरित होत असत. आता असे दिवस उरले नसल्याची खंत ‘ब्रँड अँम्बेसिडर’ या कवितेतू व्यक्त होते. कवी म्हणतो– ‘‘तुमचा ‘आयडॉल’ कोण? अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन की अंतराळवीर सुनीता विल्यम्स...’’ पहिल्या रांगेतला मुलगा उठला आणि म्हणाला, ‘मला व्हायचंय ब्रँड अँम्बेसिडर कोकाकोलाचा!’’ दुसरा : त्याच्याच कॉलनीतला म्हणाला, ‘‘ मला वोडाफोनचा !’’ नंतर मुलगी म्हणाली, ‘‘मला व्हायचे आहे लक्स गर्ल.’’ (ग्लोबल वर्तमानाच्या कविता)

जागतिकीकरणात मिडिया अतिशय प्रभावी होत असतांनाही तिच्या केंद्रस्थानी कॉमन मॅन नाही. तिथेही त्याच्या श्रमाला, त्याच्या मूलभूत प्रश्नाला डिलीट बॉक्समध्ये हलक्या हाताने फेकले जाते. तिथेही तो उपेक्षितच राहतो. ‘बीपीएलचा गहू : देत नाही जगू अन् देत नाही मरु’, ‘गार्निका /Guernic –२०५०, रूल ऑफ आर्मी या कवितेतूनही समकालीन समाजवास्तव कवी उत्कटतेने मांडतात.

अशोक इंगळे यांनी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या उपभोग्य जीवनाचा समग्र परिणाम आणि बदलते वास्तव ‘तुझ्या स्वागतासाठी’ या कवितेतून टिपले आहे.

‘‘ पॉलिथीनच्या पिशवीत मी काळीज घेऊन फिरतोय
जागतिकीकरणाची हवा लागलेल्या या शहरात

जिथे माणसाचा स्वभाव बदलतोय
शेअर बाजारातील निर्देशांकावर
आणि माणसे विकल्या जातात
जनरल स्टोअर्समधील वस्तूसारखी
दहशतवादी कारनाम्यांसाठी''

श्रीकृष्ण राऊत यांनी जागतिकीकरणात अतिशय गतिमाा झालेल्या समाजजीवाात जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला गतिमान व्हावे लागेल असे सांगतांना 'एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर जन्म घेणाऱ्या तान्हया मुला' या कवितासंग्रहातून मानवी जीवनातील धावपळ व्यक्त केली आहे.

''शहरात
पोटामागे पळपळ पळणारांना
कॅलेंडरची पान उलटायलाही
नसते फुरसत
वाढणारे
अंगावरचे केस
अन् बोटांची नखेच
काळ पुढे सरकल्याचे सांगतात.''

आपल्या देशात पाणीही विकल्या जाईल असे कोणी भविष्यवेत्त्याने सागिंतले असते तर विश्वास बसला नसता. परंतु जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत पाण्याला दुधाची किंमत मिळू लागली व शहरांपासून खेडयांपर्यंत बिस्लेरी पाण्याच्या बॉटल आणि पाऊच सर्रास विकले जाऊ लागले. बिस्लेरीचे पाणी पिणे ही प्रतिष्ठा बनू लागली. एकोणिसाव्या शतकात पाण्यावरुन झालेली भांडणे, दलितांचे महाडच्या चवदार तळयाच्या संघर्षाचे वास्तव आणि एकविसाव्या शतकातील पाण्याची विक्री यात भूषण रामटेके या कविला महापुरुषांचे सामाजिक लढे जागतिकीकरणात फोल ठरविण्याचा प्रयत्न होत असल्याचे जाणवते. 'महाडचं पाणी अन् बिस्लेरीचं पाणी' या कवितेत त्यांनी हेच वास्तव मांडले आहे.

''महाडचं पाणी चवदार
बिस्लेरीच्या पाण्याला
मोजावे लागतात कलदार
अजूनही महाडच्या चवदार पाण्याचा प्रश्न
सुटलाय असे जाणवत नाही
अन् बिस्लेरीचं पाणी
कलदार मोजून पिऊ शकत नाही''

धर्मसत्तेच्या हाती असलेल्या अनेक गोष्टी आता अर्थसत्तेने काबीज केल्या असून पुहा एकदा नवे शोषण उभे झाले आहे. जागतिकीकरणात पाण्यावर कोकाकोला, पेप्सी यासारख्या मल्टीनॅशनल कंपन्यांनी ताबा मिळविला व उर्वरित पाणी बिस्लेरीच्या बाटलीत बंद झाले.

एकनाथ पाटील यांच्या 'खुंटयावर टांगलेली दु:खं' या संग्रहातून माणसाची तुटत चाललेली नाती, राजकारणाचे अराजक, दुभंगलेली मनं, भंगलेली संस्कृती, वाढलेला स्वार्थ, गरिबांचे शोषण आदि प्रश्नांचे चित्रण आलेले आहे. गावात शहरातील चित्रविचित्र कल्पना शिरल्या म्हणून पूर्वीचे स्वयंभू, शातंताप्रिय, स्वायत्त, भक्तिप्रिय गाव चांगल्या गोष्टी हरवून उद्ध्वस्त व उजाड झाले. परिणामी गावात ओक प्रश्न निर्माण झाले. हे प्रश्न जागतिकीकरणाचे द्योतक असल्याचे सांगतांना कवी म्हणतो,

'आता गाव अनेक झेंडे, राजकीय पक्ष, गटागटात विभागलेला
माणूस माणुसकीसह स्वत:पासून तुटलेला
साचताहेत गावावर जागतिकीकरणाचे नवे ढग
आणि शहरातून येणाऱ्या वाऱ्याची गावाला सोसत नाही धग'

प्रा. शंकरराव दिघे यांनी 'या शतकाचा सात–बाराच होईल कोरा' या कवितासंग्रहातून मात्र जागतिकीकरणातील ओक गोष्टी भारतीय संस्कृतीत आधीपासून अस्तित्वात असल्याचे व्यक्त केले आहे. अलिकडे चालणारे अफवांच्या बातम्यांचे नेटवर्क पुरातन आहे, हे 'बातमीच्या गर्भार न्हाव्याला'– अशा अफलातून ओळीने केला आणि नंतर

''..तर इन्फार्मेशन टेक्नालॉजी भारतात पुरातन आहे
गणपतीने जगभर दूध पिणे, ही खबर तर कालची आहे
आमच्या चावडयांवरचे अदृश्य टॉवर्स
शतकापासूनच फुल्ली चार्ज्ड आहेत !''

प्रा. अशोक इंगळे यांनी 'शहरी संवेदनेशी जुळवून घेतांना' या कवितेत बदललेले जीवनसंदर्भ चित्रित केले आहे. ते म्हणतात,

''ई – चौकश्या करणाऱ्या या शहराला
मी कुठली आयडेंटिटी देऊ ?
फेसबुकावरील मित्रांची की
संपर्क न ठेवणाऱ्या नातलगांची की
'ये भागदौड भरी जिंदगी
यहाँ थकना मना है' म्हणत
श्री जी वर संवाद साधणाऱ्या मित्रांची–''

चंद्रपूर येथील कवी प्रा. डॉं. इसादास भडके यांच्या 'डेकोला' या संग्रहातील अनेक कवितांमध्ये जागतिकीकरणाचे संदर्भ आढळतात. या प्रक्रियेत मरत चाललेल्या लोककला, स्थानिक कलावतांची होणारी यातायात त्यांनी 'शिवकुमार पेंटर' या कवितेतून मांडली आहे.

''या डिजिटलच्या जमान्यात
काम मिळेनासं झालं आहे
हातातला ब्रश खाली ठेवून
शिवकुमार पेंटर गि—हाइकाची वाट बघतो
कॅनव्हासकडे बघत उद्याच्या चिंतेत..''

जागतिकीकरणाने संपूर्ण जगाला आपल्या कवेत घेतले आहे. या प्रक्रियेत डोंगर दऱ्यांत कडयाकपारी निसर्गजीवन जगणारा, भौतिक विकासापासून कोसो दूर असलेला, झाडीप्रदेश गडचिरोली जिल्हाही मुक्त राहू शकला नाही. जागतिकीकरणाने इथे विकासाची गंगा अवतरली नाही पण सांस्कृतिक बदलांना मात्र गतिमानता आल्याची खंत गडचिरोली येथील कवी विनोद मोरांडे यांनी 'जगणे बेगडी' या कवितेतून व्यक्त केली आहे.

'नवे तेच हवे'
पालुपद आता
'मम्मी' झाली माता
घरोघरी !
ओवी—अभंगाला
'रिमिक्स' ची बाधा
कृष्णासवे राधा
'पॉंप' गाई !

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील मराठी कविता आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने समकालीन संदर्भ घेऊन प्रकटते. ग्रामीण, दलित, महानगरीय जाणीवांनाही जागतिकीकरणाची दाट छाया टाळता आलेली नााही याचा प्रत्यय येतो. जागतिकीकरणाकडे बघण्याची मराठी प्रतिभावंतांची दृष्टी आणि त्यांच्या दृ टीलाही सांस्कृतिक,राजकीय, आर्थिक क्षेत्रांवरील अतिक्रमणकारी व्यवस्था कशी वाटते. याचेच दर्शन निबंधात समावि ट कविंच्या कवितांतून होते. विशेषत: अनेक कविंच्या कवितांच्या केंद्रस्थानी संगणक आणि संज्ञापण क्रांती व तिचे परिणाम चित्रित होतांना दिसतात. बहुसंख्य मराठी कवींनी जागतिकरणाने बेरोजगारी व सांस्कृतिक अवमूल्यनाची चिंता वाहिलेली आहे. जागतिकीकरणातील समकालीन मराठी कवितांमध्ये येणाऱ्या प्रतिमा व प्रतिके ही प्रामुख्याने तत्रज्ञानातील असल्याचे निदर्शणास येते.

एकूणच सामाजिक पर्यावरणाशी आपले नाते अधिक घट्ट असणारे साहित्य हे समकालीन असते याचाच प्रत्यय निबंधात समाविष्ट कवींच्या कवितांमधूा प्रामुख्याने येतो.

**संदर्भ :–**


*साहित्याचा अन्वयार्थ, साहित्याचा अवकाश – डॉ. नागनाथ कोतापल्ले*
*अक्षरगाथा (ऑक्टो. २०१० आणि ऑक्टो.२०११)– संपा. डॉ. मा. मा. जाधव*
*अक्षरवैदर्भी ( फेब्रुवारी २०१२ आणि एप्रिल २०१२) संपा. डॉ. सुभाष सावरकर*
*अ ते ज्ञ (मराठी भाषा विशेषांक) संपा. पी. विठ्ठल*
*कविता आणि प्रतिमा:– डॉ. सुधीर रसाळ*
*जागतिकीकरण – मराठी भाषा व साहित्य : सद्य:स्थिती आणि भवितव्य – आमची श्रीवाणी ( जाने. ०९)*

# 'कोरकोंडा' कादंबरी — कायद्याच्या वाटेवरून होणारा संघर्ष

**प्रा. डॉ. अरुण लाडे**

*मराठी विभाग प्रमुख, राजे धर्मराव महाविद्यालय, मुलचेरा जि. गडचिरोली*

संघर्ष हा जीवनाचा अविभाज्य घटक. त्याच्याशिवाय जीवनात मजा नाही. 'कोरकोंडा' कादंबरी असाच संघर्ष घेऊन साहित्यक्षेत्रात अवतरली आहे. बौद्ध समाजातील एका कुटुंबातील ही कथा कादंबरीला वेगळ्या उंचीवर नेते. वाचताना आपल्या डोळ्यापुढे चित्रपट उभे राहते. वाचकांची येथील पात्रांशी नाळ जुळते, ही कोरकोंडाची मोठी ताकद आहे. प्रत्येक पात्र स्वाभिमानी व निश्चित विचारांचा आहे. कादंबरी लेखनाला एक वैचारिक बैठक लागते, ही या पात्रांतून दिसते. लेखक विद्याधर बन्सोड यांच्या लेखनीने या कादंबरीच्या माध्यमातून एक वेगळीच उंची गाठली आहे.

अन्यायग्रस्त हा कोणीही असो जोपर्यंत त्याला अन्यायाची, स्वाभीमानाची जाणीव होत नाही तोपर्यंत तो सारे काही सहन करत राहतो. कोरकोंडा कादंबरीच्या निमित्ताने अन्यायाविरुध्दचा आवाज उठवणे होणे किती आवश्यक आहे, याची जाणीव होते. सुंदर आणि सोनाबाई ह्या दोघी कोणाच्याही खिजगीणतीत नसलेल्या अतिसामान्य स्त्रिया. पण त्यांच्या मनात अन्यायाची चिड तर आहेच सोबतच स्वाभिमानाचा जळता अंगारही ह्यांच्या हृद्यात वास करतो. ह्या दोघींचे राठी प्रिन्सिपलला मारायला जाणे, हे अन्यायाविरूध्दचा आवाज बुलंद करणारे आहे. या आवाजाला समतेच्या विचारांची किनार आहे. छोटीशी वाटणाऱ्या या घटनेतून ही किनार अधिक घट्ट झाली आहे.

**सामान्यातली असामान्य माणसं**

कादंबरीचा नायक 'अवी' हा सर्वसामान्यातील असामान्य व्यक्तीमत्व. त्याच्या सोबतीला असलेले अनेक पात्र कादंबरीतील आपली जागा भक्कमपणे तयार करतात. आवशी हे छोटेसे गाव. कुणाच्या खिजगणतीत नसलेले येथील माणसं, जेव्हा अन्यायाविरूध्द एक होतात तेव्हा हा लढा वैश्विक होतो. सोनाबाई, सुंदर, केगाबाई ह्या स्त्रियांच्या शक्तीला अधिक धार देणाऱ्या नायिकाच आहेत. या सर्वांमुळे नायक आणि कादंबरी सशक्त होते.

कवी, विशाखा, मिलिंद, तानबा, जानबा, देवा, देशमुख मॅडम इ. पात्रे कादंबरीत आपले एक स्वतंत्र स्थान आहे.

**कुटुंबाची शक्ती**

सोनाबाई एकदा अवीला सांगते, "तुजी लळाई, गावाची लळाई या फक्त धनलालसेटसंगं नसे.असे अनेक धनलालसेट घळीघळी अळवतीन ! तयायचे राजकारनी नेते,सरकारी आफीसर

भाऊबंद रायतीन. पन आपन आपली चूल पेटवतच ठेवाचा. चाहा बनवत रावाचा. तो पाय उजीळ होऊन रायला !" न्यायासाठी संघर्ष कसा आवश्यक आहे, हे सोनाबाईच्या या उद्‌गारातून सिध्द होते. कुठल्याही व्यक्तिची आंतरिक ताकद घरातील व्यक्तींमुळे वाढते. अवीच्या घरचे ही शक्ती वाढवणारे सुजाण कौटुंबिक सदस्य होते. त्यांचे आपसातील संबंध कादंबरीला दिशादर्शक ठरतात.

सोनाबाई आणि कवीत बोलणे सुरू असताना कवी म्हणतो त्यातून संघर्षाचे दुसरे रूपही दिसते. तो म्हणतो, "नाही. ती जागा ते कुजवतील ! कुठे कुठे लढाई .... आई ? आपली लढाई संपत नाही.आपल्याला मायेनं कुशीत घ्यावं एवढा मोठा हा देश झालेला नाही.लढता लढता आपली शक्ती संपून जाते आणि तडजोड करत, आपलं मन मारून जगत राहतो!"

कथा जसजशी पुढे जाते उत्कंठा वाढत जाते. अवीसह गावकऱ्यांचा लढा, साधना — देवानंदचे लग्न, धनलालशेठचे पुढे काय होईल, असे अनेक प्रश्न पडत वाचक कथेत गुंतून जातो.

**कोरकोंडा — प्रतिकात्मक शिर्षक**

मील ज्या जागेवर आहे ती जागा म्हणजे गरीबांची, कष्टकऱ्यांची. सत्ताधिश, उच्चवर्णीय लोक त्या जागेवर आपले श्रीमंतीचे इमले रचलेत. 'कोरकोंडा' कादंबरी अशा अनेक प्रतिकांसह अवतरली आहे. नायकाच्या वडलाने जमीन गहाण ठेवलेल्या जागेवर धनलाल शेठने मील बांधली. आपल्या मुजोर श्रीमंतीच्या बळावर त्याने अनेक वर्ष नायकाच्या घरावर कोंडा टाकत राहिला. मुलीच्या एडमीशन प्रकरणाने सहनशीलतेचा अंत होऊन कथानायक अविनाश न्यायासाठी लोकांमध्ये एकता निर्माण करतो. अवी संयमीपणाने लोकांना धनलालशेठच्या विरूद्ध उभे करतो. कोंडा घेऊन जाणाऱ्या ट्रकच्या मागे जर आपण काही दूरवर गेलो तर या कोंड्याचा अनुभव आपणास येईल. येथे तर कित्येक वर्षांपासून घरावरच कोंडा रिचवला जात आहे. यावरून कथेची दाहकता आपणास लक्षात येईल.

या कथेतील कोंडा म्हणजे राईस मिल मधून निघणारा धानाचा फक्त फोल नाही, तर हजारो वर्षांपासून अन्याय करण्याची प्रवृत्ती आहे. म्हणून या कादंबरीचे कथानक जागतिक शोषणाशी नाते सांगणारे आहे. धनलालसेठ, डॉ. मुंदडा, प्रिन्सीपल राठींसारख्या चमडीचोरांच्यामध्ये राजश्री मुंदडासारखी समंजस, अन्यायाची जाणीव असणारी स्त्रीसुध्दा आहे. ही सकारात्मक बाब अधोरेखीत करण्यासारखी आहे.

अन्याय करणारा हा पुढचा व्यक्ती जोपर्यंत प्रत्यूत्तर देत नाही तोपर्यंत अन्याय करीतच असतो. कोरकोंडा या कादंबरीत याची प्रकर्षाने जाणीव होते. येथे नायकाच्या मनात अन्यायाबद्दलची चीड आहेच, पण त्याविरूध्द लढण्याची धमकही आहे.

लेखकाची झाडीपट्टी बोलीवरील पकड अफलातून आहे. पानोपानी या बोलीचा गोडवा चाखायला मिळतो. झाडीपट्टीतील माणसं व त्यांची बोली या दोन्हींचा संगम लेखकाने केला आहे, तो या कादंबरीचा प्लस पाईंट आहे. कादंबरी कुठेही संथ होत नाही. आपली एक लय व वेग कायम ठेवत ती शेवटाकडे प्रवास करते. वाचक या सामान्य माणसांच्या संघर्षात गुंतून जातो. विद्याधर बन्सोड हे झाडीपट्टी आणि या भागातील सामाजिक जीवनाशी समरस झालेले लेखक आहेत. त्यामुळे त्यांच्या लिखाणात वास्तवाशी जोडणाऱ्या कथा असतात. त्या म्हणूनच आपल्या वाटतात. 'कोरकोंडा' ही कादंबरी रसिक वाचकांनी वाचायलाच हवी.

**वाळवंटातील ओएसीस**

वनविभाग हा राज्य शासनाचा एक महत्वाचा विभाग. अनेक कुप्रथांनी, कृत्यांनी बदनाम झालेल्या विभागात एखादा चांगला अधिकारीही पहायला मिळतो. कोरकोंडा कादंबरीत असा व्यक्ती भेटतो तेव्हा न्यायाप्रतीचा विश्वास अधिक दृढ होतो. भ्रष्ट झालेल्या व्यवस्थेत एखादा सज्जन भेटावा आणि आशेचे दिवे पेटावे, तसे आरएफओ यांच्या कृतीतून वाटते. वाळवंटात भटकणाऱ्यास पाण्याचा कुंड सापडावा तसे हे पात्र आहे. आरएफओ हे एका पानापुरतेच पात्र आहे, पण एक आवाजरूपी ठिणगी अन्यायाला जाळून खाक करू शकते, तसे छोटीशी न्यायाची कृती अनेक न्याय घटनांच्या मालिकेला जन्म देऊ शकते. म्हणून अशा छोट्या पात्रामुळेही कथेला एक आयाम मिळतो. 'आवशी' या गावातील वन जमीनीवर धनलालशेठने अतिक्रमण केले आहे. हे माहित असुन व गावातील काहिंनी तशी तक्रार करूनही वनविभागाने काहीच कारवाई केलेली नाही. आरएफओ यांनी आवशी गावातील वनजमीनीच्या प्रकरणात कारवाईसाठी पाऊल उचलतात तेव्हा त्यांच्या वरच्या अधिकाऱ्यांचा फोन येतो. यावरून आरएफओ हे डॉ. विशाखा हिला यासंदर्भात कसे लढायचे, याबद्दल सांगतात. न्याय मिळवताना येणाऱ्या अडचणींसंदर्भात येथे फार चांगले वाक्य आहे. आरएफओ म्हणतात, "रितसर लढलात तर जिंकाल जरूर!पण जंगल दुरून दिसतं तसं हिरवंच राहात नाही. जंगलात भाराटीचे काटेही असतात." संघर्षाच्या मार्गावर चालणाऱ्यांसाठी हे बोल सावध करणारे आहे.

**एकीचे महत्व सांगणारी कथा**

पुढे हा संघर्ष धनलालसेटच्या मील मधून अवीच्या घरावर पडणाऱ्या कोंड्यपुरता किंवा त्याने अतिक्रमण केलेल्या वनजमीनीपुरता उरत नाही. धनलालसेठने अनेकांच्या गरीबीचा व अडाणीपणाचा गैरफायदा घेऊन त्यांच्या शेत जमीनी आपल्याकडे गहाण ठेवल्या आहेत. कसल्याही हिशोबावीना या जमीनी कित्येक वर्षापासून धनलालसेटकडेच आहेत. अवी या गहाण ठेवणाऱ्यांनाही मदत करायचे ठरवतो. या संघर्षाची खास बाब म्हणजे अवीला अनेकांची

मिळणारी साथ. आपला प्रतिस्पर्धी कितीही बलवान असला, तो मग शरीराने असो वा पैशाने एकीच्या वज्रमुठीपुढे तो हतबलच ठरतो. एकी नसल्यानेच अनेकांवरील अन्यायाची मालिका सुरू आहे, हे अवी जाणून आहे. त्यामुळे तो आपल्या शांत व प्रेमळ स्वभावाने अनेकांना आपल्यासोबत जोडतो. महत्वाचे म्हणजे त्याला लाभणारी त्याच्या कुटुंबातील लोकांची भक्कम साथ.

**कायदेशीर मार्गाने जाणारा संघर्ष**

कोंड्याच्या समस्येबद्दल आरएफओ यांना तक्रार केल्यानंतर त्यांनी कारवाई केली. जंगलात पसरलेला कोंडा उचलून नेण्यात आला. संपूर्ण गावाला होणारा हा त्रास बंद होणार म्हणून गावकरी खूश झाले. गावकऱ्यांनी याचे श्रेय अवीला दिले, पण आवशी वासीयांमुळेच हे शक्य झाले असे अवी म्हणतो. याप्रसंगी अवी हा, यापुढील लढाई कायद्यानेच लढायची आहे हे स्पष्ट करतो. अवी म्हणतो, "आमी आरेफो सायबाचा फोन नंबर घेतला आहे. याची अरेरावी वाटस्अपवर टाकून. अनं एक विडीओ याच्या सायबाले पाटवून. मंग हा पँटात कसा मुत्ते तं पाहा. बेट्य कापगत्या, गाव करे तं राव नाई करे. संजय त्याची मान सोळून दे. त्या धनलालसेटनं वीस पंचवीस लोकायची जमीन निस्त्या व्याज्यात पचवलंन. त्याचा हिसाब घेयाचा आये. गोवाऱ्याईच्या, बुध्दाईच्या, धोब्याच्या, कुनब्याईच्या जमिनी त्यानं पचवलंन. त्याची जिरवायाची आये. पन कायद्यानं. जिंदाबाद जिंदाबाद ! आवशीवाले जिंदाबाद!" कायद्यावरचा हा विश्वास पुढील लढाईची दिशा ठरवतो. साहित्यात लेखकाच्या निष्ठा प्रतिबिंबित होतच असतात. कोरकोंडा कादंबरीच्या लेखकाची निष्ठा कायद्यावर आहे. कादंबरीत तीप्रकर्षाने जाणवते. कांदबरीतून ठळकपणे निदर्शनास येते ते कायद्याचे महत्व. अनेक प्रसंगी हातघाईच्या वेळी अवी संयम ठेवून शांतीचा मार्ग पत्करतो. त्याला कायदा हाती न घेता आपला संघर्ष करायचा आहे.

**कौटुंबिक समस्येवर बोट**

कादंबरीत एक अतरंगी पात्र आहे, तानबा. हा तानबा अनेक गावी पाहायला मिळतो. लेखकाने आपल्या सामाजिक निरीक्षणातून हे पात्र रंगवलेले दिसते. सतत आपल्या मोठेपणाची मिजास करणारा, इतरांना कवडीचीही किंमत न देणारा, मुलाला नोकरी लावल्यामुळे त्याला आपल्या मुठीत ठेवणारा व आपल्या सुनेचा सतत अपमान करणारा, असा हा तानबा. तानबाची पत्नीही मुलाला नोकरी लागल्यानंतर पार बदलली. सगळे काम सुनेवर सोपवून ती सतत खाटेवर पडलेली असते. अशा या घरची सून सुधा, जी या दोघांच्या स्वभावाने त्रस्त आहे. सुधा चा पती शिक्षक आहे. तो नोकरीनिमित्त रोज येणे जाणे करतो. आपल्या पत्नीच्या त्रासाबद्दल तो जाणून आहे, पण आई वडीलांच्या कर्तव्यापुढे तो त्याकडे डोळेझाक करतो. सुधाही मुकाटपणे सगळी कामे पार पाडत असते. पण एका घटनेने तिच्या सहनशीलतेच्या

सर्व मर्यादा अंत पावतात. घरची सगळी कामे झाल्यानंतर सुधा कपडे धुवायला हातपंपावर जाते. कपडे धुता धुता तिला तिच्या मुलाच्या रडण्याचा आवाज येतो. राहूल धावता धावता पडतो. त्याचे ओठ फाटते, डोक्यालाही मार लागते. सगळे धावून येतात. सुधा रडायला लागते. तेवढ्यत तानबा येतो. म्हणतो, "एक लेकरू रंगारून नाई हो. दे इकळे!" सासूही येते. तिही राहुल ला 'माझ्याकडे दे' म्हणते. तेव्हा मात्र सुधा आपला अवतार बदलते. तिच्या साचलेल्या रागाचे प्रगटीकरण लेखकाने मस्त केले आहे. ती म्हणते, "अय...अकबर बाश्श्याचे जोधाबाई. ..माझ्या पोराला हित लावशील तं तुझा फलकवून ठेवते. मी कामं करताना मुलगा माझ्या मागे रडत फिरतो. हे असे टकंटकं बघतात फुकटे! मुलगा माझ्या मागंमागं धावतो, रडतो पण धरत नाहीत आणि तो मास्तर महापुरुष या राजाराणीची सेवा करतो. अरे थुंकते तुमच्यावर. तुमच्या दहा एकराच्या अवकातीवर ! शंभर एकरवाल्यांना एवढा माज नाही राहात. दूर राहा. ..!! माझ्या मुलाला हात लावले तर मी तुमचा थोबाड शेकल्याशिवाय राहणार नाही. दोन वर्ष झाले, नवऱ्याच्या इज्जतीसाठी यांची गुलामी करते, दासी आहे मी यांची. दासीपणा करते म्हणून माजलेत!" "ये तोफखान...! आपल्या पोराला दुसरी बायको करून दे. माझ्या पोराला घेऊन चालली मी. तुझे आणि तुझ्या बायकोचे कपडे धूत होती
अकबरबाश्श्या ! धू आपले कपडे ! हागून भरवते हा चड्डया तरी धुते! माझ्या पोराला इतकं लागलं रे ! घरोघरचे आजी आजे नातवांना घेऊन फिरतात आणि हा तुझ्या पोराला धरून का म्हणतो...? हा पन्नाशीचा जवान माणूस आहे आणि ही असेल पंचेचाळीशीची. पण फुकट्यंनी म्हातारपण अंगावर घेतलं !!फुकटे साले!! अरे, आता तुझी आणि कशाचीच पर्वा करत नाही मी! माझ्या सहनशक्तीच्या पलीकडे गेलं सगळं. एक पोस्टग्रज्यूएट मोलकरीण भेटली यांना ! दहा एकराची धमकी देतो. अरे कुत्रं नाही पुसणार तुम्हाला. सोडचिठ्ठीसाठी पाठवून दे तुझ्या पोराला. तो माझ्यासारख्या दहा मोलकरणी आणेल तुमच्यासाठी. डिवटीवर लावलो म्हणतो. स्वतः का नाही शिकला रे तोफखान ?" सुधाच्या या बाँबगोळ्यामुळे सारेच दणाणतात. विद्याधर बन्सोड म्हणजे झाडीपट्टी बोलीवर हुकूमत असणारे लेखक आहेत. वरील संवादावरून वाचकांच्या लक्षात येईलही. ज्याप्रकारे सुधाच्या तोंडी हे संवाद येतात, वाचताना आपणही तिच्या भांडणाचे प्रत्यक्षदर्शी होऊन जातो. एवढे हे संवाद (प्रसंगही) जीवंत आहेत. तानबा व त्याच्या पत्नीसारखे सारखे अतरंगी माणसं अनेक कुटुंबात पहायला मिळतात. त्यांच्या स्वभावअवगुणांमुळे कुटुंबाची वाताहत होते. लेखकाने फार कौशल्याने या कौटुंबिक समस्येवर बोट ठेवले आहे.

**निष्कर्ष**

मराठी साहित्यात अनेक बोली भाषांमध्ये कादंबरी लेखन झाले आहे. विशिष्ट भागातील एखादी बोली ही त्या भागातील लोकांच्या जीवनाचा भाग बनली असते. एखादा लेखक

कादंबरीच्या माध्यमातून आपल्या कथेला विशिष्ट भौगोलिक परीसराची निवड करतो तेव्हा त्या परीसरासह बोलीभाषेलाही न्याय देण्याचा प्रयत्न करतो. विद्याधर बन्सोड यांनी ते उत्तमरीत्या पार पाडले आहे. बन्सोड यांच्या या कादंबरीचे वैशिष्ट्यही ही भाषाच आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. झाडीपट्टी बोली आपल्या सौंदर्यसह अवतरते तेव्हा वाचकांना हिचा गोडवा जाणवल्याशिवाय राहत नाही. लेखकाने कथेची संयतपणे मांडणी केली आहे. तिच्या प्रवासात कुठेही आक्रस्ताळेपणा नाही. एक निश्चित विचार जे माणुसकीचे व कायद्याचे समर्थन करणारे, ते या कादंबरीला नव्या उंचीवर नेऊन ठेवणारे आहे.

कादंबरीच्या नायकाची ताकद ही मातीशी असलेल्या घट्ट नात्याची आहे. त्याचे आपल्या आईवरील प्रेम निरालस आहे. तो मायबोली भाषेत लोकांशी थेट नाळ जोडतो. स्थानिकांच्या प्रश्नांची जाण त्याला आहे. कोंडा हा फक्त धान्याचा नाही. तो एक प्रतिक आहे, अन्यायाचा, विषमतेचा, जो अवीच्या घरावर बेमूर्वतपणे बरसत असतो. कादंबरीचे नाव समर्पक आहे.

## 'पोटमारा' या कादंबरीतील समकालीन जाणिवा

**प्रा. प्रदिप केशव चापले**
*वनश्री कला महाविद्यालय कोरची, Email ID - pradeepchapale@gmail.com*
*मो. ९४२१८५६६७४*

### प्रस्तावना :

रवींद्र पांढरे यांची 'पोटमारा' ही कादंबरी म्हणजे शेतीसंस्कृतीच्या दृष्टचक्राचे विदारक ग्रामवास्तव मांडणारी कलाकृती आहे. ग्रामीण साहित्य प्रवाहात आपले स्वतंत्र स्थान निर्माण करणारी अशी ही कादंबरी आहे. शेतकरी, त्याचे विविध सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय स्वरूपाचे प्रश्न, त्याच्या सभोवताल असलेले विदारक समकालीन ग्रामवास्तव, त्यात माणूस म्हणून जगतांना प्रत्येक पातळीवर त्याला करावा लागणारा संघर्ष, पदोपदी होणारा अपमान आणि जागोजागी केली जाणारी त्याची लुबाडणूक हे सर्व अतिशय प्रखरपणे आजच्या ग्रामीण साहित्यातून मांडले जात आहे. मराठीतील ग्रामीण साहित्यप्रवाहाने शेतकऱ्यांच्या या वेदनादायी जीवनाचे चित्रण विविध प्रकारे केले आहे. लहरी निसर्ग, त्यामुळे सततच पडणारा ओला नाही तर सुका दुष्काळ, वाढलेला उत्पादन खर्च आणि मिळणारे माफक उत्पन्न, त्यातही पिकले तर विकत नाही असा बेभरवशाचा बाजारभाव, यातून शीरावर वाढत जाणारा कर्जाचा बोजा, मुजोर आणि भ्रष्ट नोकरशाही, गावा गावातील स्वार्थी राजकारण अशा अनेक प्रश्नांच्या आधारे शेतकऱ्यांच्या जीवनातील दु:ख आणि दैन्य साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात होत आहे. रवींद्र पांढरे यांची 'पोटमारा' ही कादंबरीही अशा सभोवतालातील समकालीन जाणिवा अभिव्यक्त करणारी एक सुंदर कलाकृती आहे. यातील समकालीन जाणिवा समजून घेण्यासाठी खालील प्रमाणे उद्दिष्ट्ये पुढे ठेवून सदर संशोधन करण्यात आले आहे.

### संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. 'पोटमारा' या कादंबरीतून अभिव्यक्त झालेल्या व्यामिश्र समकालीन जाणिवांचा शोध घेणे.

२. 'पोटमारा' या कादंबरीतून अभिव्यक्त झालेली 'समकालीनता' आणि 'कलात्मकता' यांच्यातील संबंधाची वीण लक्षात घेणे.

३. 'पोटमारा' या कादंबरीतील आशय व अभिव्यक्ती वैशिष्ट्यांचा वेध घेणे.

### 'पोटमारा' कादंबरीचे कलारूप

रवींद्र पांढरे यांची ' पोटमारा' ही कादंबरी ग्रामीण जीवनातील कोसळती पडझड मांडते. ती मांडत असतांना ग्रामीण वास्तवाची खोलवरची परिमाणे या कादंबरीने शोधली आहेत. या छोटेखानी कादंबरीत विविधस्वरूपी जीवनानुभव मांडले आहेत. प्रकाश सुकदेव पानघरे मु. पो. पांगरी या दुर्दैवी नायकाची ही

कहाणी आहे. अगदी लहान असतानाच वडील मरण पावतात. आजूबाजूंच्या लोकांच्या धीराने उभारी घेऊन आई लीलाबाई महत्कष्टाने दोन मुलांना सांभाळत संसाराचा गाडा हाकते. मोठा पोरगा विकास आठव्या वर्गात जाताच शेतीतला पसारा सांभाळणे अवघड झाल्याने त्याला शेतीकामात गुंतवते. पोराचा आधार मिळाल्याने लीलाबाईला धीर येतो. अवघे ७ बिघे असलेल्या शेतीच्या भरोश्यावर भागत नाही म्हणून दुसऱ्यांच्या शेतावर मजुरीलाही जाते. लहान मुलगा प्रकाश एस. एस. सी. होतो तेव्हा लीलाबाई त्यालाही शिक्षण सोडून शेतीकामात मदत करण्याचा आग्रह धरते. मोठा मुलगा शेतीत राबावा आणि लहान मुलाने शिक्षण घ्यावे हे लीलाबाईला मानवत नाही. कारण पुढे जाऊन भावा- भावांमध्ये, जावा-जावांमध्ये भांडणं होऊ नयेत, अशी तिची इच्छा असते. मात्र प्रकाशाला पुढे शिकायचे असते. एवढ्याशा जमिनीवर दोन भावांचे संसार कसे चालतील हा प्रश्न तर असतोच, शिवाय आपण शिकलो आणि नोकरी मिळाली तर येणाऱ्या पगारातून आपणाला कोरडवाहू वावरात विहीर खणता येईल, त्यातून आपले हिरव्या मळ्याचे स्वप्न साकारता येईल, अशी आशाही असते. कुटुंबातील एक व्यक्ती नोकरीवर असली तरी त्या कुटुंबाचे राहणीमान आणि जीवन कसे बदलून जाते, हे प्रकाशने पहिले होते. 'नवकरी व्यवसायाची जोड देल्ह्याबिगर कष्टकरी शेतकऱ्याच्या आयुष्यात बदल घडून येणार नाही', हे आंबेकर सरांचे विधान त्याच्या मनावर ठसले होती. विकासही प्रकाशाच्या कल्पनेला पूर्ण समर्थन देतो. प्रकाश अतिशय जिद्दीने तालुक्याच्या गावी जावून, सुट्टीच्या दिवशी काम करीत करीत आपले शिक्षण पूर्ण करतो, एम. ए., बी. एड. होतो. एम. ए., बी. एड. झाल्यानंतर नोकरी मिळेल या आशेने तो अनेक संस्थाचालकांचे उंबरठे झिजवतो. मात्र त्याला नोकरी मिळत नाही, कारण संस्थाचालकांना डोनेशन म्हणून देण्यासाठी आवश्यक ते चार-पाच लाख रुपये त्याच्याकडे नसतात. अनेक ठिकाणी जाऊन निराश पदरी पडलेल्या प्रकाशला मुलाखतींचा प्रवासखर्चही झेपावत नाही. त्यामुळे नोकरीचा नाद सोडून तो शेतात राबू लागतो. एवढे शिक्षण घेऊनही प्रकाशला शेतात राबताना पाहून लीलाबाई तुटत जाते. प्रकाशच्या चिंतेपायी लवकरच लीलाबाई आजारी पडते. डॉक्टर साने यांच्या सांगण्यावरून प्रकाश पांगरी पासून दहाबारा किलोमीटर अंतरावर असलेल्या करंजी गावच्या आबा पाटलांची भेट घेतो. डॉक्टर साने यांच्या शिफारशीमुळे आबा पाटील त्याला करंजीच्या शाळेवर मास्तर म्हणून घ्यायचे कबूल तर करतात परंतु शाळा विनाअनुदानित असल्याने अनुदान मिळेपर्यंत बिनपगारी काम करावं लागेल असे सांगतात. शिवाय शाळा चालविण्यासाठी येणारा खर्च म्हणून नाही जास्त तर ऐंशी हजार तरी डोनेशन भरायची अट ठेवतात. ते भरण्यासाठी भाऊ विकास आपले वावर ताबेगहाण ठेवण्याचा मार्ग काढतो. मात्र यामुळे आपली मुलं उपाशी मरतील या शंकेने विकासची पत्नी उषा नाराजी दर्शविते. डोनेशन ची तजवीज होणे शक्य नाही याची जाणीव असल्यामुळे प्रकाश नोकरीचा नाद सोडून परत वावरात कामाला जाऊ लागतो.

अशातच सुशिक्षित परंतु डोनेशन अभावी नोकरी मिळत नसलेल्या प्रकाशची माहिती नात्यागोत्यातील लोकांमार्फत जवळ दूरच्या गावात पोचते. पांगरीच्या बाळा शिंदे पाटलाची बहीण टेंभुर्णीची कस्तुराबाई हिच्यापर्यंतही ही माहिती पोचते. तिची बी.ए. प्रथम वर्षाला असलेली मुलगी पुष्पा एका पायाने थोडी अधू असल्यामुळे थोडी लंगडत चालते. त्यामुळे आपल्या मुलीला नोकरीवाला मुलगा लग्नासाठी पसंत करणार

नाही, याची तिला जाणीव आहे. त्यामुळे पांगरीच्या प्रकाशच्या नोकरीसाठी आपण डोनेशन भरून नोकरी लावून दिली आणि तिचे प्रकाशसोबत लग्न लावून दिले तर आपल्या मुलीचे आयुष्य सुखात जाईल, असे तिला वाटते. आपला भाऊ बाळा शिंदे पाटील पांगरीच्या हायस्कूलचा चेअरमन झाला आहे, त्याचा फायदा घेवून गावातच हायस्कुलावर प्रकाशाला नोकरी लावून देऊ असे ठरवून ती सर्वांना तयार करते. मात्र गावातील शाळेत सध्या जागा रिकामी नसल्यामुळे बाजिंदे पाटील जागा रिकामी होईपर्यंत विनाअनुदानित वर्गावर प्रकाशला बिनपगारी काम करायला सांगतो. एखादा शिक्षक निवृत्त झाल्यानंतर प्रकाशला नोकरीत कायम करण्याचे आश्वासन देवून प्रकाशचे पुष्पासोबत लग्न होते. डोनेशनचे दोन लाख रुपये कस्तुराबाई भावाला आगाऊ देवून ठेवते. नोकरीच्या आशेने प्रकाश पायाने थोड्या अधू असलेल्या पुष्पासोबत लग्न करून गावच्या शाळेत दीड वर्ष बिनपगारी नोकरी करतो. मात्र शेवटी जागा रिकामी झाल्यावर दिगंबर वना टेकाळे उर्फ दिवटे अण्णा यांच्या राजकारणी खेळीमुळे आमदार नागरेच्या साळूचा पोरगा निमगावचा के. टी. बंधारे तिथे रुजू होतो आणि आता सर्वार्थाने नागवलेला प्रकाश नोकरीचा नाद सोडून टिकाव, कुदळ, फावडे घेऊन परत शेतात राबायला लागतो. हा धक्का सहन न झाल्याने आधीच आजारी असलेली प्रकाशची आई लीलाबाई खंगत जाऊन लवकरच जगाचा निरोप घेते. त्यामुळे प्रकाश अधिकच उदास होतो. शेवटी सासऱ्याने नोकरीसाठी दिलेल्या पैशातून विहीर खोदावी आणि आपले हिरव्या शेतमळ्याचे स्वप्न पूर्ण करावे, व शेतीतच करिअर घडवावे या उद्देशाने तो कामाला लागतो. मात्र विहीर तयार झाली तरी मोटार बसविण्यासाठी त्याला बँकेकडून कर्ज काढावे लागते. विहीर सातबाऱ्यावर चढविण्यापासून, बँकेचे कर्ज, इलेक्ट्रिक जोडणी मिळण्यासाठी डिमांड नोट मिळविण्यासाठी प्रत्येक ठिकाणी त्याला लाच द्यावी लागते आणि शेवटी त्यासाठी सावकाराकडून कर्ज घ्यावेच लागते. असे तसे करून मोटार सुरू होऊन हिरवा मळा फुलतो खरा. मात्र त्यातून हाती येणाऱ्या शेतमालापासून मिळणाऱ्या पैशातून शेतमाल काढणाऱ्या शेतमजुरांची मजुरीही निघत नाही हे हळूहळू लक्षात येत गेल्याने प्रकाश निराश होत जातो. तशातच हाती पिक येणार असे वाटत असतांनाच लोड शेडींग सुरु होते, आणि शेवटी डीपी जळून गेल्याने व वेळेत वीज न मिळाल्याने शेवटी उभे पीक वावरात जळून जाते. शेवटी हताश होऊन शेतातील विहिरीच्या खोल पाण्यात हरवून पाहणाऱ्या प्रकाशचा विहिरीत तोल जाऊन करून अंत होतो.

**'पोटमारा' कादंबरीतील व्यामिश्र समकालीनता**

पोटमारा या कादंबरीतील व्यामिश्र समकालीनता लक्षात घेण्यासाठी शेतकऱ्यांच्या तत्कालीन जीवनाचा वेध घेणे आवश्यक ठरते. ही कादंबरी जरी २०१६ मध्ये प्रकाशित झालेली असली तरी त्यातील घटीत काळ हा बराच आधीचा म्हणजे सन २००० पूर्वीचा आहे हे लक्षात येते. यातील घटीत काळ हा कायम विनानुदानित शाळांची व्यवस्था येण्यापूर्वीचा आहे. या कालखंडातील समाजजीवनाचा वेध घेतला असते असे जाणवते की, ग्रामीण जीवनाचा प्रमुख आधार शेती असून सततचा दुष्काळ आणि नापिकीने शेतकरी हैराण झालेला आहे. अस्मानी संकटांचा सामना करून कसे बसे उत्पन्न काढणाऱ्या शेतकऱ्याला योग्य भाजारभाव देखील मिळत नाही. मिळणाऱ्या उत्पन्नातून उत्पादन खर्च वजा केला तर शिल्लक शून्य अशीच बरेचदा शेतकऱ्याची अवस्था असते. भारतातील शेतमालाच्या किंमती निश्चित करण्यासाठी इ.स. १९६५ मध्ये शेतमाल किंमत

आयोग स्थापन केला. पुढे इ.स. १९८५ मध्ये त्याचे नाव बदलून 'शेतमाल खर्च आणि किंमत आयोग' असे झाले. शेतमालाच्या भावातील वारंवार होणारे चढ-उतार थांबवून त्यात स्थिरता ठेवणे आणि लोकांचे राहणीमान खर्चिक बनू नये यासाठी शेतमालाच्या भावावर नियंत्रण ठेवून महागाईवर नियंत्र ठेवणे या उद्देशातून या आयोगाची स्थापना झाली. मात्र हे करतांना मिळणारे प्रत्यक्ष उत्पन्न, उत्पादन खर्च आणि शेतकऱ्याचा नफा याचा मेळ घालण्यात हा आयोग अयशस्वी ठरला आहे, असे म्हणावे लागते. दरवर्षी वाढत जाणाऱ्या शेतकरी आत्महत्यांचे आकडे पहिले की याची खात्री पटते. १ जानेवारी २००१ ते ५ डिसेंबर २००६ पर्यंत महाराष्ट्रात एकूण २२०५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली (दै. देशोन्नती, दि. ६ डिसेंबर २००६). २००४ ते २००७ या तीन वर्षात सात हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती सरकारी आकडेवारीच्या हवाल्याने एशियन एज दैनिकाने प्रकाशित केली होती (दै. देशोन्नती, दि. २१ फेब्रुवारी २००७). पोटमारा कादंबरीचा प्रकाशन काळ लक्षात घेऊन याचा विचार केला तर राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या आकडेवारी नुसार २०१६ या वर्षात देशभरात एकूण ११३७९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. २०१७ या वर्षात देशभरात एकूण १०६५५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. यात ५९५५ शेतकरी तर ४७०० शेतमजूर होते. यामधील सर्वाधिक ३७०१ आत्महत्या या महाराष्ट्रातील होत्या. २०१८ या वर्षात देशभरात एकूण १०३४९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. यात ५७६३ शेतकरी तर ४५८६ शेतमजूर होते. यामधील सर्वाधिक ३५९४ आत्महत्या या महाराष्ट्रातील होत्या. तर २०१९ या वर्षात देशभरात एकूण १०२८१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. यामधील सर्वाधिक ३९२७ आत्महत्या या महाराष्ट्रातील होत्या. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या या आर्थिक घसरणीमुळेच होत असल्याचा निष्कर्ष २००६ मध्ये पार पडलेल्या अर्थ-वाणिज्य प्राध्यापकांच्या अधिवेशनातील चर्चासत्रात काढण्यात आला होता. जेव्हा शेतीत पीक येत नाही तेव्हा शेतकऱ्याचे नुकसान होते आणि जेव्हा भरघोस पीक हातात येते तेव्हा शेतमालाचे भाव पडलेले असतात त्यामुळे तेव्हाही त्याला नुकसानच सहन करावे लागते. शासकीय धोरणेही शेतकऱ्याला मारकच ठरतात. थोडासा भाव वाढला की, महागाईवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने सरकारच शेतकऱ्यांच्या शेतमालाचे भाव कसे पाडते ते 'सरकारच पाडते शेतमालाचे बाजारभाव' या लेखात प्रा. मिलिंद मुसगावकर यांनी स्पष्ट केले आहे. एकीकडे इतर उत्पादकांना खुली बाजारपेठ उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना मात्र त्यापासून दूर ठेवण्याचा अन्याय सरकार कसा करते याचे विश्लेषण करून सरकारची याबाबतीतली अगतिकता त्यांनी स्पष्ट केली आहे. शेतमालाची निर्यात बंदी करणे किंवा बाहेरील देशातून महाग दरात धान्य खरेदी करून येथे स्वस्तात विकणे या दोन्ही मार्गांचा आलटून पालटून वापर करून सरकार गरीब ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी अन्नधान्याचे भाव पाडते असे त्यांनी विशद केले आहे. (ॲग्रोवन दिवाळी अंक २००९) अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे अध्यक्ष राजाभाऊ पोफळी यांची दिनांक २६ नोव्हेंबर २००७ ला दैनिक लोकमत मध्ये एक मुलाखत प्रकाशित झाली होती. त्यात आर्थिक समरसता का हवी? या प्रश्नाचे उत्तर देतांना आर्थिक विषमता हेच शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांचे कारण असल्याचे त्यांनी नमूद केले होते. ही आर्थिक विषमता कशी वाढत गेली हे स्पष्ट करतांना ते म्हणतात, "१९७५ ते २००५ या दरम्यान ही विषमता सतत वाढत गेली आहे. शेतमालाचे भाव ३ ते ४ पटीने, औद्योगिक भाग १५ ते २० पटीने, कर्मचारी पगार ४० ते ४५ पटीने व सोने १३

पटीने वाढले. शेतकऱ्याला आपल्या मुलासाठी मोटारसायकल खरेदी करायची असेल तर १९७५ मध्ये क्विन्टल कापूस विकावा लागला होता, तर २००५ मध्ये त्यासाठी १८ क्विन्टल कापूस विकावा लागला होता." यावरून ही वाढती विषमता प्रकर्षाने जाणवते.

'पोटमारा' ही कादंबरीही शेतकऱ्यांच्या या समस्या अतिशय पोटतिडकीने मांडते. प्रकाशची ही शोकांतिका मांडताना शेतकऱ्यांच्या जीवनाला वेढून असलेल्या अनेक प्रश्नाचा वेध लेखक रवींद्र पांढरे यांनी घेतला आहे. प्रकाश हा सुशिक्षित असलेला शेतकरी आहे. त्याला कुठलेही वाईट व्यसन नाही. शेतीमध्ये काम करीत करीतच तो आपले शिक्षण पूर्ण करतो. नोकरीसाठी पुरेसे शिक्षण प्राप्त करूनही नोकरी न मिळाल्यामुळे तो शेतीकडे वळतो. या नायकाच्या माध्यमातून लेखकाने शेती आणि निसर्ग, शेतकरी आणि नोकरदार वर्ग, शेतकरी आणि राजकारण, शेतीतून मिळणारे उत्पन्न आणि उत्पादन खर्च, शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना ठरविता न येणे, विविध ठिकाणी होणारी शेतकऱ्याची लुबाडणूक, शेतकरी आणि शिक्षण अशा अनेक प्रश्नांची मांडणी याठिकाणी केली आहे. 'पोटाला पोटभर जेवण न मिळणं म्हणजे पोटमारा. तसेच अधिकार असूनही न्याय हक्कांपासून वंचित राहावं लागणं म्हणजेही एक प्रकारचा पोटमाराच, अशी लेखकाची भूमिका आहे. सामान्य शेतकऱ्याला आज सर्व बाजूंनी अशा पोटमाऱ्याला सामोरं जावं लागत आहे. शेतकऱ्याच्या आयुष्याच्या परवडीचा वास्तवदर्शी समकाल या कादंबरीतून उलगडत जातो. कादंबरीची सुरुवात अल्पभूधारक व कोरडवाहू शेतकऱ्यांची दयनीय अवस्था व्यक्त करण्यापासून होते. सुरुवातीला प्रकाशला असे वाटते असते की, कोरडवाहू ऐवजी बागाईतदार शेतकरी हे सुखी असतात. त्यांना पावसाच्या लहरीपणावर अवलंबून राहावं लागत नाही. त्यामुळे त्यांना हवे ते पीक काढता येऊ शकते, हवे तेव्हा पिकाला पाणी देता येते, प्रगती करता येऊ शकते. त्यामुळेच नोकरीची संधी गेल्यावर डोनेशनच्या दोन लाख रुपयातून शेतात विहीर खणतो. कर्ज काढून मोटारपंप घेतो आणि कोरडवाहू शेतीला बागायती करतो. मिरची, मका व इतर पिकांची लागवड करतो. पीकही भरघोस येते मात्र प्रत्यक्ष बाजारात विक्रीला घेऊन गेल्यावर मिळालेल्या पैशांतून मिरची तोडणाऱ्या मजुरांची मजुरीही निघत नाही, हा अनुभव येतो. मग असेच चित्र राहिले तर आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते आपण भरणार कसे? ही चिंता त्याची झोप उडवते. शेतकरी कोरडवाहूवाला अल्पभूधारक असो की बागाईतदार शेवटी या व्यवस्थेच्या जात्यात तो सारखाच भरडला जातो, ही विकसित होत जाणारी जाणीव हा या कादंबरीचा मुलभूत धागा आहे.

ग्रामीण भागात वाढत चाललेली सुशिक्षितांची बेरोजगारी हा सुद्धा या कादंबरीतील महत्वाचा प्रश्न आहे. हिरीरीने उच्च शिक्षण घेऊन नोकरी प्राप्त करून दैन्य-दारिद्र्यातून बाहेर पडण्यासाठी आतूर असलेली शेतकऱ्यांची मुले, व त्यांच्या या स्वप्नपूर्तीसाठी वेळप्रसंगी अर्धपोटी उपाशी राहून कष्ट उपसणारे त्याचे कुटुंबीय याचे हृदयद्रावक चित्रण हे आजच्या ग्रामीण साहित्य प्रवाहात मोठ्या प्रमाणात केले जात आहे. या उच्च शिक्षित तरुणांना क्षमता असूनही डोनेशन अभावी नोकरी मिळत नाही आणि शेवटी शेतीमध्येच कष्ट उपसण्याची पाळी त्यांच्यावर येते. वाढती बेरोजगारी हा अतिशय कळीचा मुद्दा म्हणून पुढे येत आहे. २०१७-१८ या वर्षात बेरोजगारीचा दर ६.१ टक्क्यांवर होता आणि हा आकडा गेल्या ४५ वर्षातला सर्वाधिक बेरोजगारी दर आहे असा एक अहवाल राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाने (NSSO) तयार केला होता व

त्याला सरकारच्या भारतीय सांख्यिकी आयोगाने (NSC) मंजुरीही दिली होती. हा अहवाल सरकारने प्रसिद्ध करण्याआधीच बिझनेस स्टँडर्ड प्रसिद्ध झाला. मात्र त्यात वापरलेल्या आकड्यांची सत्यता पडताळण्यात आली नाही असे स्पष्टीकरण नीती आयोगाचे उपाध्यक्ष राजीव कुमार यांनी दिले. या अहवालानुसार ग्रामीण भागातील बेरोजगारीचा दर ५.३ टक्के होता तर शहरी भागात तो ७.८ टक्के एवढा होता. मागील वीस-तीस वर्षात देशाची आर्थिक प्रगती ज्या वेगाने झाली त्या तुलनेत देशातील नोकऱ्यांचे प्रमाण मात्र वाढले नाही, अशी माहिती अझीम प्रेमजी विद्यापीठातील Center for Sustainable Employment ने प्रसिद्ध केलेल्या पहिल्या State of Working India – 2018 (SWI) या अहवालातून देण्यात आली आहे. हा अहवाल राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय (NSSO), श्रम मंत्रालयाच्या नोकरी बेरोजगारीचे सर्वेक्षण (EUS) आणि Center for Monitoring Indian Economy (CIME) या खासगी संस्थेच्या आकडेवारीवर आहे. १९७०-८० GDP वृद्धीदर ३ ते ४ टक्के असतांना रोजगार निर्मिती दर २ टक्के होता. पण १९९० नंतर GDP वृद्धीदर १० टक्क्यांपर्यंत गेला तरी रोजगार निर्मितीचा दर घसरून १ टक्क्यावर आला आहे, असे निरीक्षण यात नोंदविण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर यामागची कारणे स्पष्ट करतांना देशाची आर्थिक प्रगती फक्त फक्त काही विशिष्ट क्षेत्रांपुरती मर्यादित राहिल्याने पाहिजे त्या प्रमाणात नोकऱ्या निर्माण झाल्या नाहीत. आणि ज्या क्षेत्रात नोकरीच्या जास्त संधी उपलब्ध होत्या त्या क्षेत्रांची वाढच झाली नाही. एकूण रोजगारात वाढ न होणे व पदवीधरांची वाढती संख्या ही वाढत्या बेरोजगारीची दोन प्रमुख कारणे यात नमूद करण्यात आली आहेत. ग्रामीण भागातून पुढे येणारा हा सुशिक्षित तरुणांचा लोंढा खूप मोठ्या अपेक्षा ठेवून आहे असे नाही. त्यांच्या फक्त काही माफक अपेक्षा आहेत. आजवर जे दैन्य आपण अनुभवलं, जे कष्टमय जीवन आपण जगलो त्यातून बाहेर पडण्यासाठी व कुटुंबाला या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी हा सुशिक्षित तरुण धडपडत आहे. व्यवस्थेकडून मात्र त्याच्या स्वप्नांची, अपेक्षांची राखच होत आहे. श्रीमंतांच्या मुलांना मिळणाऱ्या उच्च शैक्षणिक सुविधा त्यांना मिळत नसल्या तरी आहे त्या परिस्थितीवर मात करून ते श्रीमंतांच्या मुलांपेक्षा सरस कामगिरी करीत आहेत. त्यांना आपल्या जन्मदात्यांच्या कष्टांची जाण आहे. शिक्षणातील मूल्यसंस्काराचे ते खरे वाहक आहेत. उलट श्रीमंतांची मुले शिकत असतांनाच वाईट व्यसनांच्या आहारी जाऊन आई-वडिलांना ब्लॅकमेल करून पैसे उकळून ढाब्यावर पार्ट्या झोडत आहेत. मात्र असे असले तरी नोकरी देतांना गुणवत्तेला डावलून डोनेशनच्या आधारावर श्रीमंतांच्याच मुलांची वर्दी लागत आहे. शिक्षण क्षेत्रात विनाअनुदान तत्त्वावर चालविण्यात येणाऱ्या शाळा हे तर ग्रामीण तरुणांच्या शोषणाचे केंद्र बनले आहे. अनुदान येई पर्यंत अशा शाळांमध्ये गरीब तरुण बिनपगारी शिकवितात, कारण अनुदानित जागेवर देण्यासाठी पुरेसे डोनेशन त्यांच्याकडे नसते. शिक्षण संस्थाचालक त्यांच्या या असहाय्यतेचा चांगलाच फायदा करून घेतात. अनुदान येईपर्यंत त्यांना फुकटात राबवून घेतात आणि अनुदान मिळाल्यानंतर डोनेशन घेऊन दुसऱ्या उमेदवाराची त्या जागेवर नेमणूक करतात. त्यामुळे ग्रामीण सुशिक्षित तरुण हतबल आणि हवालदिल बनत जातो. समाजात मुलगा कितीही शिकला असो त्याला नोकरी नसेल आणि तो शेतीचे काम करीत असेल तर त्याला लग्नासाठी मुलगी मिळणे सुद्धा कठीण, अशी स्थिती आहे. म्हणून या व्यवस्थेच्या विरुद्ध त्यांच्या मनात असंतोष आहे. मात्र या असंतोषाला अजून तरी वाट सापडलेली नाही. कादंबरीचा

नायक प्रकाशही या गर्तेत सापडतो. उदास हतबल झालेल्या प्रकाशच्या मनाला हिरव्या मळ्याचे स्वप्न खुणावत असल्याने तो यातून बाहेर पडतो. मात्र गजानन टेंभूचा सुरेश उर्फ देशप्रेमी मात्र दहा पंधरा ठिकाणी मुलाखती देऊनही डोनेशन शिवाय नोकरी मिळणार नाही याची खात्री पटल्याने दारूच्या आहारी जातो. प्रकाश आणि सुरेश या दोन व्यक्तिरेखांच्या माध्यमातून लेखकाने हा प्रश्न अतिशय समर्थपणे कादंबरीत मांडला आहे.

वाढता भ्रष्टाचार ही सुद्धा ग्रामीण विकासाला लागलेली कीड आहे. ट्रान्स्परेन्सी इंटरनॅशनल सर्वेक्षणानुसार भ्रष्टाचार प्रकरणात भारताची स्थिती आशिया खंडात सर्वात वाईट आहे. या सर्वेक्षणानुसार भारतात लाच घेण्याचे प्रमाण ३९ टक्के इतके आहे. एन.सी.आर.बी. ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भ्रष्टाचारांच्या गुन्ह्यांबाबत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. २०१९ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात ८९१ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. २०१८ मध्ये ही संख्या ९३६, २०१७ मध्ये ९२५, २०१६ मध्ये १०१६, २०१५ मध्ये १२७९, २०१४ मध्ये १३१६, २०१३ मध्ये ६०४, २०१२ मध्ये ५२४, २०११ मध्ये ४६३ एवढी या नोंद झालेल्या गुन्ह्यांची संख्या आहे. प्रत्यक्षात घडणाऱ्या भ्रष्टाचाराच्या गुन्ह्यांची संख्या याहून कितीतरी अधिक आहे. ग्रामीण भागातील भ्रष्टाचाराचे प्रमाणही बरेच जास्त असले तरी ग्रामीण व्यक्ती तक्रार करण्यास घाबरत असल्याने त्यांची नोंद होत नाही. ग्रामीण भागात बोकाळलेल्या या भ्रष्टाचाराचे अतिशय हिडीस दर्शन या कादंबरीतून घडते. दोन लाख रुपये खर्चून वावरात विहीर खणल्यानंतर ती सातबाऱ्यावर चढविण्यासाठी आप्पातलाठी अडीच - तीन हजार रुपये लाच मागतो. विहिरीवर मोटार बसविण्यासाठी कर्ज काढायला बँकेतसुद्धा पाच ते दहा टक्के कमिशन बँकेचे अधिकारी मागतात. शेवटी प्रकाश १५०० रुपये लाच देऊन आपले कर्ज मंजूर करून घेतांना दिसतो. मोटारीसाठी कर्ज मंजूर झाल्यानंतर वीज मंडळाकडे डिमांडनोट भरण्यासाठी गेलेल्या प्रकाशला डीपीवर अतिरिक्त लोड येत असल्याने तुम्हाला कनेक्शन देता येणार नाही असे सांगितल्याने प्रकाशाला तर धसकाच बसतो. कात्रीत सापडलेला प्रकाश शेवटी सेटलमेंट करून वीज मंडळाच्या अधिकाऱ्याला पाच हजार रुपये लाच देतो. सेटलमेंट करून देणाऱ्या सुदाम लाईनमनलाही ५० रु. देतो. यासाठी आपणाला आता सावकाराचे कर्ज घेतल्याशिवाय पर्याय नाही याची प्रकाशला जाणीव होते. इतके करूनही जेव्हा परिसरातील डीपीवर भार येऊन ती जळते तेव्हाही आपले पीक वाचविण्यासाठी परिसरातील सर्व शेतकरी प्रत्येकी हजार-पाचशे रुपये वर्गणी गोळा करतांना दिसतात. लाच दिली नाही तर ही नोकरशाही एकेक कागदासाठी कशाप्रकारे सामान्य माणसांना त्रास देतात याचे अतिशय वास्तव चित्रण या कादंबरीत येते. यासोबतच राजकीय पुढाऱ्यांचा शासकीय कार्यालयांतील हस्तक्षेप या भ्रष्टाचाराचा नमुनाही कादंबरीत येतो. सिसोदे सर जीवनधारा योजनेतील विहिरीसाठी अनुदान प्राप्त करण्यासाठी आमदार नागरे यांचा वशिला लावतो. तेव्हा आमदार नागरेंच्या बोलण्यातून शासकीय कार्यालयांतील कोणते टेबल कोणाला द्यायचे याबाबत राजकीय पुढाऱ्यांचा हस्तक्षेप कसा असतो, याचे दर्शन घडते. लोकशाहीची भिस्त ज्या सार्वत्रिक निवडणुकांवर आहे त्या निवडणुकांमध्ये कशाप्रकारचा भ्रष्टाचार घडतो. पैशाच्या बळावर निवडणुकीचे चित्र एका रात्रीतून कशाप्रकारे पालटले जाते याचे अतिशय भेदक चित्रण या कादंबरीत येते.

याशिवाय प्रसंगानुरूप लेखकाने अनेक समकालीन प्रश्नांना हात घातला आहे. शेतकरी आणि नोकरदार यांच्या जीवनमानात असलेला फरक, कोरडवाहू आणि बागायतदार शेतकरी यांच्यात तुलना, आरक्षित आणि अनारक्षित यांच्या मनात निर्माण होणारे प्रश्न, नोकरीवाला आणि शेतकरी मुलगा, रासायनिक खत आणि कीटकनाशकांचे वाढलेले भाव असे अनेक प्रश्न प्रसंगोपात येत जातात.

**'पोटमारा' या कादंबरीची आशय व अभिव्यक्ती वैशिष्ट्ये :**

या कादंबरीतील व्यक्तिचित्रे अतिशय जिवंत उतरली आहेत. लीलाबाई, प्रकाश, विकास, पुष्पा, दिनू, देशप्रेमी आणि इतरही व्यक्तिचित्रे अतिशय सजीव उतरली आहेत. कथानक अतिशय शीघ्रगतीने पुढे पुढे जाताना बरेच प्रश्न केवळ प्रश्न म्हणून कादंबरीत येतात, परंतु त्या प्रश्नाच्या खोलात जाऊन त्यांची मांडणी करण्याचा प्रयत्न लेखक करीत नाही, असे जाणवत राहते. कादंबरीचे लघुरूप लक्षात घेऊन कदाचित शेतीबाह्य प्रश्नांची मांडणी या कादंबरीत केली जात नाही. प्रकाश व लीलाबाई, प्रकाश व विकास, दिनू व प्रकाश यांच्या भावविश्वाचे चित्रण चांगले उतरले असले तरी शेतकरी व त्याचे स्वतंत्र भावविश्व किंवा शेतकरी व त्याचे सांस्कृतिक विश्व याच्याबाबत फार काही चिंतन या कादंबरीत आढळत नाही. प्रत्यक्ष कादंबरीचा नायक असलेला प्रकाश व एका पायाने थोड्या अधू असलेल्या पुष्पाशी लग्नसंबंध जोडतांना किवा लग्न झाल्यानंतरही त्यांच्या स्वतंत्र भावविश्वाचे वर्णन करणे लेखकाला गरजेचे वाटत नाही. त्यामुळे ही कादंबरी कधी कधी शेतकरी जीवनातील समस्या कथानकाच्या माध्यमातून मांडणारे एक दस्तावेज वाटायला लागते. मुलासाठी तीळ तीळ तुटणाऱ्या लीलाबाईच्या भावविश्वाचे चित्रण मात्र हृदयाला भिडणारे आहे. विविध प्रसंगाचे चित्रण करीत असतांना कोणालाही वाईट किंवा चांगले ठरविण्याचा प्रयत्न लेखक करीत नाही. त्याचा निर्णय वाचकाच्या विवेकबुद्धीवर सोडण्याची लेखकाची भूमिका अतिशय प्रशंसनीय वाटते. भ्रष्टाचारात बरबटलेली नोकरशाही, आपला स्वार्थ साधून घेण्यासाठी काहीही करावयाला मागें पुढे न पाहणारे सिसोदे सर, दिवटे अण्णा, बाळा शिंदे पाटील आदी मंडळी ढासळत चाललेल्या मूल्य व्यवस्थेचे प्रतिनिधी म्हणून कादंबरीत आली आहेत.

कादंबरीत तृतीय पुरुषी निवेदन असले तरी इतर कादंबऱ्यामध्ये जसे निवेदन प्रमाण भाषेत आणि संवाद बोलीत अशी योजना असते, तसे यात नाही. यातील निवेदनही बोलीत करण्याचे तंत्र कादंबरीत वापरले आहे. कादंबरीची प्रकरणवार विभागणी नाटकांतील प्रवेश विभागणी सारखी आल्यासारखी वाटते. काही संवादातील नाट्यात्मकता कादंबरी आणि नाटकाचा एकत्रित अनुभव देतात. अस्सल बोलीभाषेतील निवेदन कादंबरीला अधिक जिवंत करते. जामनेरी बोलीतील विविध म्हणी आणि वाक्प्रचार अस्सल ग्रामीण जीवन डोळ्यांपुढे उभे करण्यात यशस्वी होतात. 'फळाचे नाव एरंडी होणे', 'घरच्या भाकऱ्या खा अन मामाच्या बकऱ्या चारा', 'आर्धी सोडा अन् बंधीच्या मांघी धावत सुटा', 'येळ ना वारी अन् गधडं दारी', 'घुगऱ्या चावणे ', 'सासू तव्हा पवाडा', 'वाऱ्याचे भारे बांधणे', 'पायात चाळ बांधलं म्हनल्यावर नाचनंच पडतं', 'अवघड जागी दुखनं अन् जवाई डाक्टर', 'म्हातारी मेल्याचं दु:ख नाही पण काळ सोकावतो तेच काय?' अशी विविध म्हणी आणि वाक्प्रचार कादंबरीचे भाषा सौंदर्य वाढवितात. निवेदन कमी आणि संवाद जास्त असे कादंबरीचे

लेखन असल्याने संपूर्ण प्रसंग जणू आपल्यापुढेच घडते आहे की काय अशी प्रचीती येत राहते. कादंबरीतील भाषेत प्रामुख्याने मुख्यार्थावर जास्त भर आहे.

एकंदरीत 'पोटमारा' या कादंबरीतून ग्रामीण भागातील शेतकरी आणि त्याच्या सभोतालातील अनेक समकालीन जाणिवा अभिव्यक्त झालेल्या आहेत.

**संदर्भ :**


*१. पांढरे रवींद्र, 'पोटमारा', लोकवाङ्‌मय गृह, पहिली आवृत्ती, २०१६*

*२. मुसगावकर प्रा. मिलिंद, 'सरकारच पाडते शेतमालाचे बाजारभाव', अॅग्रोवन दिवाळी अंक २००९*

*३. शिंदे रणधीर, 'ग्रामवास्तवाच्या दुष्टचक्राची शोकान्त कहाणी', 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये दिनांक ०६ नोव्हेंबर २०१६ ला ऑनलाईन स्वरुपात प्रकाशित लेख.*

*४. मासिक, अंतर्नाद, एप्रिल २००५*

*५. 'बेरोजगारी गेल्या ४५ वर्षात सर्वाधिक', बीबीसी न्यूज मराठी ऑनलाईन, १ फेब्रुवारी २०१९*

*६. पोळ गणेश, 'सुशिक्षित तरुण-तरुणींना नोकरी का मिळत नाही?', बीबीसी न्यूज मराठी ऑनलाईन, ९ ऑक्टोबर २०१८*

*७. 'शेतकरी आत्महत्येचे लपवलेले सरकारी आकडे अखेर जाहीर', एबीपी लाईव्ह ऑनलाईन, दिनांक १० जानेवारी २०२०.*

*८. 'बळी'राजा! देशात सर्वाधिक शेतकरी महाराष्ट्रात', लोकसत्ता ऑनलाईन, दिनांक ११ ऑक्टोबर २०२०.*

*९. 'एनसीआरबी- 201९ आकडेवारी', सकाळ ऑनलाईन, दिनांक ०३ ऑक्टोबर २०२०.*

*१०. 'महाराष्ट्रातील सरकारी विभागातील भ्रष्टाचाराची आकडेवारी', हेलो महाराष्ट्र ऑनलाईन, दिनांक २८ डिसेंबर २०१९ .*

*११. 'लाच घेण्यात भारत पहिल्या क्रमांकावर', न्यूज १८ लोकमत ऑनलाईन, दिनांक २६ नोव्हेंबर २०२०.*

*१२. 'भारतातील शेतमाल खर्च आणि किंमत आयोग', विकासपिडिया ऑनलाईन, दिनांक ०३ ऑक्टोबर २०२०.*

*१३. दैनिक लोकमत, दैनिक देशोन्नती, साप्ताहिक सकाळ.*

**"समकालीन मराठी नव कवींची ग्रामीण कविता"**

**प्रा. डॉ. अतुल नारायन चौरे**
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंध, पुणे.*
*मो.नं.- ८१६९४२४५१७/८६९२०८०२१० ई-मेल :choureatul.paru@gmail.com*

ग्रामीण साहित्याला पुन्हा एकदा नवे बळ देण्याचे कार्य संपादक प्रा.बाळासाहेब घोंगडे हे 'अक्षरपेरणी' या मासिकाच्या माध्यमातून करीत आहेत. त्यांनी दिवाळीच्या मुहर्तावर सप्टेंबर २०१५ साली 'कविता विशेषांक' प्रकाशित केला. त्यामधून जवळपास ६७ कवींच्या कविता प्रकाशित केल्या आहेत. हा 'कविता विशेषांक' म्हणजे ग्रामीण कवितेचा दस्तऐवज आहे. ह्या कविता विशेषांकामधील सर्वच कवी नवकवी आहेत. नवकवींचे साहित्य एकत्रितपणे प्रकाशित करता येणे ही आजच्या काळातील मोठी समस्या आहे. काही नवकवींच्या कविता साप्ताहिक, मासिके, त्रैमासिके आणि दिवाळी अंकामधून प्रकाशित होतात. आणि काहींच्या कवितांना प्रकाशनाची संधीच मिळत नाही. परंतू ग्रामीण साहित्याचे अभ्यासक, संशोधक आणि संपादक प्रा.बाळासाहेब घोंगडे यांचे मला विशेष कौतुक करावेशे वाटते की, त्यांनी ग्रामीण साहित्याची पुन्हा पायाभरणी केली. संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण कवी लेखकांना एकत्रित आणण्याचे कार्य अक्षरपेरणी मासिकाच्या माध्यमातून केल्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याला उभारी मिळाली आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अक्षरपेरणी मासिकाच्या 'कविता विशेषांकामधील' निवडक कवींच्या कवितांचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे.

अक्षरपेरणी मासिकातील कविता विशेषांकाचा विचार करता असे दिसते की, १९९० नंतर आलेल्या जागतिकीकरणाचा शहरीकरणाबरोबरच ग्रामाजीवानावरसुद्धा परिणाम झाला आहे. अनेक नवकवींच्या कवितेमधून याचे चित्रण आलेले आहे. ह्या अंकामधील कविता महानगर, ग्रामजीवन आणि स्त्रीजीवन व्यक्त करताना दिसतात. चंद्रकांत पोतदार म्हणतात की, 'कविता ही आतली सल असते' आपल्या कवितेमधून गावाचे, शेतीचे –मातीचे चित्रण करताना म्हणतात की, मातीची मुळच बोलू पाहातायत'

" बांधामेढीवरली करपलेली घर
आणि लगीनघाईसारखे सुगीचे दिवस
अवजारान आणि बैलांच्या संगतीने
शिवार फुलवाव, गाळावा घाम
भाकरी सुगंधावी कष्टान"१

शेतीचे वर्णन करताना चंद्रकांत पोतदार म्हणतात की, सुगीच्या दिवसांत शेतकऱ्याच्या घरामध्ये लगीन घाई असते. सुगीच्या दिवसात शेतामधील पीक घरामध्ये आनेपर्यंत शेतकऱ्याला चैन नसते.

कारण दिवसात अवकाळी वादळ-वारा येण्याची दाट शक्यता असते. अशावेळी हाता तोंडाशी आलेला घास जाण्याची शक्यता असते. त्यामुळे अवकाळी पावसाच्या अगोदर शेतातील पीक घरात आणण्याची लगीनघाई असते. शेतकरीराजा बैलांच्या सहायाने आपली शेती फुलवतो. ती फुलवताना वर्षभर शेतात घाम गाळतो आणि कष्टाने कमावलेली भाकरी खातो.एकंदरीतच चंद्रकांत पोतदार यांची कविता शेतकऱ्याच्या मनातील आतली सल व्यक्त करताना दिसते.शेतीमातीत जन्माला आलेले कवी जनार्धन देवरे म्हणता की, ‘व्यक्त होण्यासाठी कविता मला गरजेची वाटू लागली’. आपल्या आई –वडिलांचा, आजी आजोबांचा शेतीशी चाललेला झगडा लेखकाणे बालपणापासून पाहिलेला आहे. त्यामुळे आपल्या कवितेमधून ही सल व्यक्त करताना ते ‘संचिताचे भांडवल’ या कवितेत म्हणतात की,

“रुसलेल्या पावसानं औंदा जाळलं स्वप्नांना
दुष्काळाची साडेसाती इथ संपता संपेना
आद्रपुनर्वसू पुष्प गेले कोरडे ठणान
आषाढातच अंकुर मेले टाकुनिया मान
शेतामधी पेरलेला गेला गाभडून दाणा”२

कवी जनार्धन देवरे आपल्या कवितेमधून दुष्काळाच्या परिस्थितीचे चित्रण करताना दिसतात. पावसाअभावी शेतीची झालेली विदारक अवस्था चित्रित केली आहे.शेतकरी आपल्या मानाशी असंख्य स्वप्न घेऊन जगत असतो.बऱ्याचदा निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्याची असंख्य स्वप्न भंग पावतात. पावसाच्या पाण्याअभावी मातीमधून उगवलेल्या अंकुराणे माना टाकल्या आहेत. एवढेच नव्हे तर नुकताच शेतामध्ये पेरलेला दाणा पाण्याअभावी गाभाडून गेला आहे.गुरे ढोरे परागंदा झाली आहेत.शेती व्यावसाय हा जुगाराप्रमाने झाला आहे. कुटुंबाला आणि संपूर्ण समाजाला जगवण्यासाठी हा जुगार प्रत्येक शेकरी दरवर्षी खेळत आहे. त्यामुळे नाती गोती, देणे घेणे कसे टाळावे हे शेतकऱ्याला कळत नाही. त्यामुळे ह्या कवितेमधून कवीने शेतकऱ्याने उराशी बाळगलेली असंख्य स्वप्न धुळीला मिळाल्याची खंत व्यक्त केली आहे. फुगा बागुल म्हणतात की, ‘बळ बुद्धी वेचूनिया शक्ती ! उदक चालवावे युक्ती’ संत तुकारामांनी सांगितलेल्या पर्यावरणाबाबतच्या संदेशाची आठवण करून देतात.पाश्चात्यांकडून आपण ओरबाडण्याची वृत्ती आत्मसात केली आहे. त्यामुळे आपल्या स्वार्थासाठी आपण निसर्गातील प्रत्येक गोष्ट ओरबाडून घेतली. जागतिकीकरणाच्या रेट्यात माणूस स्वतःच्या भावविश्वात हरवत चालला आहे. माणसाने चंगळवादी जीवनैलीचा पुरस्कार केल्यामुळे स्वतःच्या स्वार्थासाठीमागेपुढे न पहाता निसर्गातील प्रत्येक गोष्ट ओरबडून घेतली.त्यामुळे निसर्गसुद्धा लहरीपणे वागायला लागला आहे. फुगा बागुल यांची कविता मानवाचा स्वार्थीपणा आणि निसर्गाचा लहरीपणा व्यक्त करताना दिसते.

‘दर्यावर्दी कोलंबसान गर्विष्ठ सागरपाण्यावर
हुकुमत गाजवीत किनारा दाखवीत

अनंत धेयशक्ती दाखवली हे खर !
वास्को द गामान सागरपाण्यावरून
चालत येत भूखंडाचे शोध लावले हे हि खरं !
तेव्हापासून रे पाण्या ! तू
जागतिकीकरणाचा विषय झालास”३

फुगा बागुल म्हणतात की, भारतामध्ये जागतिकीकरण आल्यावर त्याने पाण्यावर माणसाने स्वतःची हुकुमत गाजवायला सुरुवात केली. तेव्हापासून पाणी हा जागतीकीकरणाचा विषय झाला. समुद्राचे नामकरण करण्यात आले.समुद्राची वाटणी करण्यात आली. वेगवेगळ्या कारखाण्यांसाठी वॉटर प्लान्ट, वॉटर पार्क ह्यासाठी पाण्याचे वाटप करण्यात आले. माणसाने चंगळवादी जीवनशैलीचा पुरस्कार केल्यामुळे निसर्गसुद्धा लहरी वागायला लागला.जागतीकीकरणात कारखान्यांसाठी, वॉटर प्लान्ट, वॉटर पार्कसाठी पाणी उपलब्ध होते. पण जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतीला पाणी उपलब्ध होत नाही.अशी खंत फुगा बागुल व्यक्त करतात. शेतकरीराजा पावसाची आतुरतेने वाट पहात बसतो. पण वेळेवर पाऊस पडत नाही.यांची खंत ते पुढील कवितेमधून व्यक्त करतात.

“वरचा बाबा कवा मुतल याचा भरवसा नाही.
पूर्वी खोदेल तेथे झरे असायचे
अशी लाथ मारून पाणी काढायची मानस !
अन आता
कर्जाच्या पैशाने बोर करून पाण्याचा थेंबही
दाद देत नाही म्हंटल्यावर
तांब्याभर पाण्यात ‘ठायमेट’ कालवून
पितात मानस !”४

फुगा बागुल आपल्या कवितेमधून पाण्याचे भीषण वास्तव मांडताना दिसतात. पूर्वीच्या काळी धो-धो पाऊस पडत असे त्यामुळे कोणत्याही ठिकाणी खोदले की पाणी लागायचे एवढेच नव्हे तर लाथ मारेल तिथे पाणी काढण्याची ताकद होती. परंतु जागतिकीकरणाच्या युगात माणसाने स्वाताच्या फायद्यासाठी निसर्गातील प्रत्येक गोष्ट ओरबाडून घेतली आहे.कारखान्यांसाठी पाणी, वॉटर प्लान्ट आणि वॉटर पार्कसाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर केल्यामुळे आता जमिनीत पाणीच राहिले नाही. गावाकडील विहिरी भर पावसाळ्यात कोरड्या पडल्या आहेत.म्हणून अनेक शेतकऱ्यांनी सावकाराकडून कर्ज काढून आपल्या जमिनीत बोर मारले आहे.पण पाण्याचा एक थेंबही लागला नाही. अशावेळी घेतलेले कर्ज कसे फेडायचे असा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा राहतो. त्यामुळे तांब्याभर पाण्यात थायमेट कालउन तो स्वतःला संपवण्याचा प्रयत्न करताना दिसतो.मानवाने निसर्गाला ओरबाडल्यामुळे निसर्गाने मानवाकडे पाठ फिरवलेली दिसते.पूर्वी रस्त्यावर जागो-जागी पाणपोया होत्या. आता मात्र गावोगाव टॅन्करणे पाणी पुरवावे

लागते. अशाप्रकारचे दाहक वास्तव फुगा बागुल मांडताना दिसतात. "कविता हा माझ्या जगण्याचा श्वास आहे." असे स्वाती शिंदे-पवार म्हणतात. स्वतःला मोकळे करण्यासाठी मी कविता लिहिते. मी मातीशी इमान राखते, स्वतःच गाऱ्हान,रडगान गात बसण्यापेक्षा अखंड मानवजातीची मी प्रेरणाश्रोत, मार्गदर्शक होते. अशाप्रकारचा आशावाद त्या व्यक्त करताना दिसतात. 'लेक भुईची' या कवितेमधे त्या म्हणतात की,

"पोर कुणब्याची
लिंबू वेचायची
शेती भांगलन
ओचा खोचायची
मोट धरताना
बांध काटायचा
पळ पळताना
घाम सांडायचा"५

ग्रामजीवनाचे नेमक्या शब्दात वर्णन केले आहे. शेतकऱ्याच्या मुलीला शेतात काम करावेच लागते.लिंबू वेचन्यापासून शेतात खुरपण्यापर्यंत काम करावेच लागते.पूर्वी विहिरीमधील पाणी काढण्यासाठी मोटेचा वापर केला जात असे. तेव्हा घामाच्या धारा सांडायच्या शेतातील कामे करताना अनेकांना बैलांची गरज लागत असे. अनेक शेतकऱ्यानकडे बैल घेण्याइतपतसुद्धा पैसे नसायचे. अशावेळी शेतकरी स्वतःच बैल व्हायचा. एकंदरीतच शेतकऱ्याच्या कस्टमय जीवनाचा आलेख व्यक्त करणारी त्याची कविता आहे. 'गावगाड्यातल दुखः मांडून व्यवस्थेला जाग आणण' ही भूमिका घेऊन रावसाहेब कुवर लेखन करताना दिसतात. लहानपनापासून शेती-माती, गुरे-ढोरे,उन-वारा, शेतीपासून रोजगार हमीच्या कामापर्येंत राबलेला हा कवी आहे. त्यामुळे सहाजिकच त्यांच्या कवितेमधून ग्रामजीवनाचे आणि कृषी जीवनाचे दाहक वास्तव मांडताना दिसतात. 'पुन्हा एक शेतकरी संपला' ह्या कवितेच्या माध्यमातून रावसाहेब कुवर म्हणता की,

"सततच्या दुष्काळाला वैतागून
धरला त्याने सुरतेचा रस्ता
आणि जाऊन बसला
दूरच्या नातेवाईकांच्या आसऱ्याला
घरदार नसलेल्या डोंबाऱ्याने
करावा रात्रीपुरता मुक्काम
ग्रामपंचायतीच्या ओट्यावर तसा"६

महाराष्ट्रातील अनेक भागात सातत्याने पडणाऱ्या दुष्काळाचे दाहक वास्तव कवीने व्यक्त केले आहे. सततच्या दुष्काळाला कंटाळून शेतकरी कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी घर-दार सोडून

शहरात नोकरीसाठी जातो. त्यामुळे गावाकडील शेती-वाडी घर-दार उध्वस्त होते. शहरातीत कारखान्यात स्वतःला आठ-आठ तास आडकाउन घेतो.चार-चार तास ओव्हरटाईम करतो. गावाकडील घर-दार, शेती-वाडी विकून शहरात जाऊन रहातो. बायकोच्या डोळ्यात झगमगनारे शहर बसलेले असते, मुलांना रेल्वेच्या डब्यात बसल्याचा मनोमन आनंद होतो. परंतु गाव सोडलेल्या शेतकऱ्याच्या मनात वेगळ्याच वादळ-लाटा उठलेल्या असतात. सुटत चाललेली भाऊबंदकी, घरदार,बैलघोटा, शेतशिवार ह्यामुळे तो मनातून अस्वस्त आहे. त्यामुळे लेखक म्हणतो की, त्या दिवशी पुन्हा एक शेतकरी संपला. तो शेतकरी अस्वस्थतेमुळे संपला की, आपल्या व्यवस्थेमुळे संपला असा प्रश्न समाजव्यवस्थेला विचारला आहे. शेतकऱ्याच्या दाहक वास्तवाबरोबर, शेतकऱ्याच्या मुलांचा प्रश्नालाही वाचा फोडली आहे. 'खेड्यातील पोर बसली आहेत येड्यासारखी' ह्या कवितेमधून कवी सांगतो की,

"डीएड, बीएड होऊन<br>
सरकारी जावई होण्याच्या नादात<br>
निघून गेल त्याच्या अंगातून शेतीकाम<br>
आणि लागेलच नोकरी खात्रीनं<br>
असंही कुणी सांगत नाही ठाम"७

फुले-शाहू- आंबेडकरांच्या प्रेरणेने १९६० नंतर ग्रामीण भागापर्यंत शिक्षण पोहचल्यामुळे शेतकऱ्याची मुले-मुली शिकली. परंतू १९९० नंतरच्या जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे समाजात प्रचंड स्पर्धा निर्माण झाल्यामुळे नोकऱ्याच शिल्लक राहिल्या नाहीत. तरीसुद्धा खेड्यातील शेतकऱ्याची मुले शिक्षण घेत आहेत. परंतु त्यांचे अर्धे अधिक आयुष्य शिक्षण घेण्यातच जात आहे. परिणामी शेतीकाम करण्याची सवय अंगातून निघून जाते. शिक्षण घेतल्यामुळे नोकरी मिळेलच असे खात्रीने सांगता येत नाही. नोकरी न मिळाल्यामुळे काळ्या-काळ्या नकट्या-नुकट्या पोरींचा बापसुद्धा आपली मुलगी लग्नासाठी देत नाही. आपल्या दारावरून एखाद्या कुत्र्याला हाकलउन लावावे त्याप्रमाणे नवऱ्यामुलाला दारावरून हाकलऊन लावले जाते. वयाची तिशी उलटली तरी लग्न जमत नाही. बापाच्या नावावरील सात-बारासुद्धा मुलाच्या नावावर होत नाही. अशावेळी खेड्यातील मुले येड्यासारखी शाळेच्या ओट्यावर निरर्थक गप्पा मारत बसली आहेत. रमेश पवार यांनी बापावरती अनेक कविता लिहिल्या आहेत. त्यांनी आपल घर-दार, आसपासची माणसे, त्यांची सुखः-दुखः त्यांचा जगण्याचा संघर्ष, मानापमान, यशापयश,आशा-आकांक्षा सार्व काही पाहिलेले, अनुभवलेलं आणि अनुभवातून कळालेलं कवितेच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. रमेश पवार म्हणतात की,

"वावराच्या बांधावरून फेरफटका मारताना<br>
बाप सांगत राहायचा<br>
गोष्टी गावाकडल्या...<br>
पंचायतिचं राजकारण मंदिरात

मारुतीच्या व्हरांड्यावर जुगाराचा डाव
जि.प.ची बंद पडत जाणारी शाळा
मास्तर विचारतात मडक्याचा भाव"८

जागतिकीकरणाचा परिणाम शहराबरोबरच गावावरसुद्धा झाला आहे. खेड्यातील मुले शिकली आणि नोकरीनिमित्त शहरात गेली. सुट्टीच्यावेळी गावाकडे आल्यावर बाप गावाकडील गोष्टी सांगताना म्हणायचा की, एकेकाळी ज्या मंदिरात कीर्तन सुरु असायचे तेथे पंचायतीच्या राजकारणाच्या गप्पा व्हायला लागल्या आहेत. मंदिराच्या व्हरांड्यात पत्त्यांचा डाव सुरु असतो. विद्यार्थ्यांच्या अभावी बंद पडत चाललेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांबद्दल बाप सांगत रहातो. याबरोबरच बाप गावातील वास्तव सांगतो की,

"लग्न समारंभात गावठीचा मारून ग्लास
भगवान बाप्पाचा वेडा मुरल्या
कपाशीवर पडलेल्या लाल्या
ऐन पेरणीत डोंगर धनगराचा
मारून पडलेला बैल
नि एका पावसासाठी वाया गेलेला हंगाम
अस काहीबाही
नि संपत जायची सुट्टी..."९

आजच्या समकालीन जीवनातील गावाचे विदारक वास्तव बाप मुलाला सांगत आहे. एकेकाळी सुजलाम सुफलाम असणारा गाव आता पहिल्यासारखा राहिलेला नाही. व्यसनाधीन झालेल्या तरुण पिढीचे वास्तव चित्रण कवीने रेखाटलेले आहे. सुगीच्या दिवसात शेतकऱ्याची लगीनघाई असते. अशावेळीच डोंगर धनगराचा बैल मरून पडला आहे. त्यामुळे शेतीमधील कामे ठप्प झाली आहेत.पावसाअभावी पिकांचा हंगाम वाया गेला आहे. नांगरणी, कोळपणी, आणि बी बियाणांसाठी केलेला खर्च वाया गेला आहे.त्यामुळे सावकाराकडून घेतलेल्या कर्जाचा बोजा वाढला आहे. अशा अनेक गोष्टी बाप सांगायचा... अशातच सुट्टी संपत यायची तेव्हा गावाबाहेरील बस थांब्यापर्यंत बाप निरोपासाठी यायचा. अशावेळी बापाने निरोपासाठी उंचावलेला फाटक्या बाहीचा हात पाहून मुलगा मनातून तळमळत रहातो. बापसुद्धा पुढच्या सुट्टीची वाट पहात तळमळत घराकडे जातो. बापाने गरिबी पहिली, पण बाप कधी खचला नाही. बापाचा कष्टाच्या भाकरीवर दृढ विश्वास असल्याने बापाने कधी बेईमानी केली नाही. मनाने हळवा असणारा बाप गावाबद्दल, शेतीबद्दल, नात्यांबद्दल आत्मियतीने आणि तळमळीने बोलत रहातो. कैलास दौंड नावाचे कवी म्हणतात की, 'कविता ठरउन नव्हे तर आतून यायला पाहिजे'. ते गावबीव नावाच्या कवितेत म्हणतात की,

"शेतीच अनुदान बॅंकेत जमा झाल्याची
मानस होत राहतात गावजमा
दगडा-दगडांवर बसतात टेकउन बूड
त्याच्याशीही आदिम नात सांगत
अंधार वाढत जातो खोल-खोल
मानस जातात अंधारात झोपी-बिपी
उद्याच्या मृगजळी पुराची स्वप्ने पहात"१०

समकालीन जीवनात आज महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी दुष्काळ पडला आहे. दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कर्जमाफी योजना जाहीर केली. काहिंना कर्जमाफी मिळाली, तर काहिंना फक्त आश्वासने, काहींच्या बँक खात्यात शेतीचे अनुदान तर काहींची खाती अनुदानाची वाट पहात आहेत. अशावेळी सगळा गाव एकत्र जमतो. शेतीच्या अनुदानावर तासन-तास चर्चा केली जाते. उद्याची भावी स्वप्ने मनाशी घेऊन माणसे अंधारात झोपी जातात. कमरे इतक्या मृगजळाने बनली आहेत इथली शेती आणि बागाईते. अशा स्वरूपाचे विदारक वास्तव कवी मांडताना दिसतो. रावसाहेब जाधव आपल्या कवितेबद्दल म्हणातात की, 'केंद्रापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करणारी माझी कविता आहे.' ज्या परिसरात रंगलो, रमलो, तरंगलो, जगलो, वाढलो ती माती, शिवार, शिवार, माणसे, जनावरे, जीवजंतू, ऋतू, आकाळ-अवकाश,आशा-निराशेचा सगळा परीघ पेलताना त्याच्या केंद्रापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करणारी कविता रावसाहेब जाधवांची आहे. 'जगवा राव' नावाच्या कवितेत कवी म्हणतो की,

"स्मार्ट सिटी बनवताना स्मार्ट शेती बी बनवा राव
उगवण्यापुरती जागा अन पेर्ता माणूस
जगवा राव
वाफस्याला वाप्यावाप्यात वाय-फाय पेरू आम्ही
दबला दाणा कोंबाळण्याला थोडे खत
पुरवा राव"११

आजच्या समकालीन जीवनात स्मार्ट सिटी बनवली जात आहे. त्याच धर्तीवर स्मार्ट शेती बनवा राव. असे म्हणून कवीने समाजाचे लक्ष वेधले आहे. संपूर्ण जगाचा पोशिंदा बळीराजाला जगवण्याचा संदेश प्रस्तुत कविता देताना दिसते. शेती पिकवण्याचे धडे शिकउन झाले आहेत. आता तरी शेतीतील माल विकण्याची अक्कल शिकवा राव, नको तिथे बरसणाऱ्या पावसाला अडउन जिथे गरज आहे तिथे बरसावा राव. असा अंतरीचा कळवला व्यक्त केला आहे. अशाप्रकारे समकालीन मराठी नव कवींच्या ग्रामीण कवितेमधून वास्तव अनुभव प्रकटला आहे.

## संदर्भग्रंथ

*१) घोंगडे बाळासाहेब, (संपा.) 'अक्षरपेरणी कविता विशेषांक' (दिवाळी) प्रकाशन- अक्षरवाङ्मय,पुणे. प्र.आ.सप्टेंबर-ऑक्टोंबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१, वर्ष दुसरे अंक-५, पृ.क्र.०९.*
*२) तत्रैव, पृ.क्र.१७.*
*३) तत्रैव, पृ.क्र. २१.*
*४) तत्रैव, पृ.क्र. २३.*
*५) तत्रैव, पृ.क्र. ३६.*
*६) तत्रैव, पृ.क्र. ३९.*
*७) तत्रैव, पृ.क्र. ४१.*
*८) तत्रैव, पृ.क्र. ४३.*
*९) तत्रैव, पृ.क्र. ४३.*
*१०) तत्रैव, पृ.क्र. ४७.*
*११) तत्रैव, पृ.क्र. ५०.*

# रेखा बैजल आणि माधुरी शानभाग यांची विज्ञानकथा

**प्रा. रंजिता वीरकर**

*बोरीवली (प.) ९९२०४ ३७६९२*

मराठी साहित्यात विज्ञानकथा हा वाङ्मयप्रकार त्याच्या स्वयंतेजाने आपले अस्तित्व साकारण्यासाठी १९७५ हे साल उजाडावे लागले. सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ आणि पुढील काळात विज्ञानकथालेखक म्हणून आपली ओळख बनविणारे श्री. जयंत नारळीकर यांची 'कृष्णविवर' ही कथा मराठी विज्ञान परिषद आयोजित विज्ञानकथा स्पर्धेत पहिली आली. त्यांनीच विज्ञानकथेला स्वतंत्र स्थान दिले आणि मराठी वाचकांचे लक्ष आकर्षून घेतले. मराठी वाचकांचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोण स्वागतशील बनला. याचा आणखीन एक परिणाम म्हणजे दिवाळी अंकामध्ये विज्ञानकथांना मानाचे पान मिळू लागले. 'सृष्टिज्ञान', 'विज्ञानयुग' यांसारख्या मासिकांनी तसेच मराठी विज्ञान परिषद आयोजित 'विज्ञान रंजक कथा स्पर्धां'नी विज्ञान कथा लेखनाला लेखन बळ पुरविले.

आज मराठी विज्ञानसाहित्यात विज्ञान कथा हा साहित्यप्रकार बऱ्यापैकी स्थिरावला आहे. त्याला वाचकांचा उत्साही प्रतिसाद मिळत आहे. मराठी भाषेत विज्ञान कथांचा जेवढा जोमदार व कसदार प्रवाह दिसून येतो तसा प्रवाह इतर भाषांमध्ये दिसून येत नाही. ह्या कथा समृद्धतेत मोजक्याच पण दर्जेदार लिखाण करणाऱ्या लेखिकांचाही तेवढाच हातभार लागला आहे. त्या लेखिकांपैकी रेखा बैजल आणि माधुरी शानभाग या महत्त्वाच्या विज्ञानकथालेखिका होय. रेखा बैजल यांनी 'विज्ञान कथा', 'क्लोन', 'किडनॅपिंग', 'अंतरिक्षातील शेजारी' हे विज्ञानकथासंग्रह लिहिले आहेत. माधुरी शानभाग यांनी 'पुनर्जन्म', 'इंद्रधनुष्य', 'सॅप', 'मुंगी उडाली आकाशी' हे विज्ञान कथासंग्रह लिहिले आहेत.

या लेखामध्ये रेखा बैजल यांच्या 'किडनॅपिंग' व माधुरी शानभाग यांच्या 'पुनर्जन्म' या कथासंग्रहातील कथांचा विचार केला जाणार आहे. यामागे या दोन्ही लेखकांच्या भाषा सामर्थ्याचा, विषय वैविध्याचा आणि विज्ञानकथेतील विज्ञानतत्त्व कौशल्यपूर्वक वापराचे निरीक्षण नोंदवणे एवढाच हेतू आहे. विज्ञानकथेतील विज्ञानतत्त्वांचा कौशल्यपूर्वक वापर म्हणजे सशक्त विज्ञानकथेतील विज्ञान हे संभवनीय विज्ञानतत्त्वावर अवलंबून असते. जर ती कथा म्हणून हिणकस ठरत असेल तर विज्ञानाचा परिसस्पर्श लाभला म्हणून तिचे सोने होणार नाही. एवढेच नव्हे तर विज्ञान हिणकस, चुकीचे, अपुरे असल्यामुळे ती विज्ञानकथा म्हणून दर्जेदार गणली जाणार नाही, केवळ कथा म्हणून वरचढ ठरण्याची शक्यता नाकारता येणार नाही यासाठी तर्कसंगत विज्ञानाच्या सहाय्याने लेखकाची प्रतिभाशक्ती त्याचे संभाव्य परिणाम सांगण्यासाठी मुक्त संचार करते. अशाप्रकारे सशक्त विज्ञानकथा विज्ञानतत्त्वाच्या, वास्तवतेच्या पायावर संभाव्य परिणामांची कल्पना करत भविष्यातील मानवी जीवनाचे सफाईदार रेखाटन करते.

विज्ञानकथेचा हा वेगळेपणा रेखा बैजल यांच्या 'किडनॅपिंग' कथासंग्रहातील एकूण दहा कथांनी कसा अंगीकारला, माधुरी शानभाग यांच्या 'पुनर्जन्म' या कथासंग्रहातील एकूण अकरा कथांनी विज्ञानकथा म्हणून हे संभवनीय भविष्य, विज्ञानतत्त्वाच्या आधारे कसे चितारले त्याविषयीची पुढील निरीक्षणे नोंदवायची आहेत.

रेखा बैजल यांच्या 'किडनॅपिंग' या कथासंग्रहात समाविष्ट दहा कथांपैकी 'मृदगान', 'किडनॅपिंग', 'अरण्यरुदन' या कथा 'परग्रहवासीयांचे आगमन' यांवर आाधारित आहेत. मानवाने जेव्हा अवकाशसंशोधनात भरारी मारली तेव्हा आपल्या आकाशमालेसारख्या इतरही आकाशमाला त्याला अंतरिक्षात दिसून आल्या. इतर आकाशमालेमधील ग्रहांवर पृथ्वीवरील प्रगत मानवी सजीवसृष्टीप्रमाणे सजीवसृष्टी असू शकते असा विचार शास्त्रज्ञांच्या मनात डोकावला त्यासाठी त्यांनी आपल्या अस्तित्वाबद्दलचे, मानवी संस्कृतीबद्दलचे, मैत्रभावनेचे संदेश प्रसारीत करण्यास सुरुवात केली. यातूनच परग्रहवासीयांचे पृथ्वीवरील आगमन या संभवनीय शक्यतेचा विचार अनेक विज्ञानकथांमधून केला गेला. रेखा बैजल यांनी 'मृदगान' या कथेतून पृथ्वीवरील सजीवसृष्टीसाठी येथील माती, तिची सुपीकता, महत्त्वपूर्ण आहे हे लक्षात आणून दिले. या कथेत परग्रहवासी चक्क पृथ्वीवरील माती चोरून नेत आहे अशी कल्पना केली आहे. मात्र माला व विश्वास या जोडप्यांचा 'दीप' या हुशार मुलामुळे, त्याच्या प्रकाशकिरणाशी तल्लीन होऊन खेळण्याने, माती चोरण्याचा परग्रहवासीयांचा प्रयत्न पृथ्वीवासीयांना कळतो. ते या परग्रहवासीयांचा यशस्वी अटकाव करतात आणि पृथ्वीमोलाच्या मातीची चोरी थांबवली जाते, पर्यायाने पृथ्वीवरील सजीवसृष्टी वाचते. 'किडनॅपिंग' कथेत ऑब्जर्व्हेटरीच्या प्रांगणात अंतरिक्षातून एक यान वेगाने येते आणि खगोलशास्त्रज्ञ डॉ. शुक्ल यांच्या मुलाचे 'उर्मिल'चे अपहरण करते. पुढे दोन दिवसांनी ते यान पुन्हा येते तेव्हा उर्मिलसारखी दिसणारी आठ मुले त्यात असतात. खऱ्या उर्मिलसारखेच हुबेहूब दिसणारे इतर सात त्याचे इमिटेटर्स असतात हे डॉ. शुक्ल व सहकाऱ्यांच्या लक्षात येते. यातूनच खऱ्या उर्मिलला शोधून इतरांचा नायनाट करणे आणि पृथ्वीवरचे संकट टाळणे मोठ्या कौशल्याचे असते. 'अरण्यरुदन' मध्ये चक्क एक परग्रहवासी एसिकिस्ट डॉ. चंद्रभान मोठा शास्त्रज्ञ बनून या पृथ्वीवासीयांमध्ये वावरत असतो. तो आपल्या अस्तित्वाचा शोध पृथ्वीवासीयांना लागू नये म्हणून आपल्या मुलाला ईशान फडके या अर्धएसिकिस्ट असणाऱ्याला संमोहित करून आत्महत्या करायला भाग पाडतो. त्या डॉ. चंद्रभान एसिकिस्टच्या भावनाकल्लोळाची ही कथा ठरते.

मानवाने आपल्या बुद्धीसामर्थ्याच्या जोरावर यंत्रांची निर्मिती केली. या यंत्रांनी मानवाचे भौतिक आयुष्य सुखी झाले. त्याचे कष्ट कमी होऊन, वेगवान निर्मिती साध्य झाली. या यंत्राचा एक आविष्कार म्हणजे यंत्रमानव. हा यंत्रमानव 'देवदूत' अथवा 'सैतान' नसतो. त्याचे लॉजिकल युनिट माणसांपेक्षाही चांगले निर्णय घेते कारण ते भावनेच्या आहारी जात नाहीत. 'युगधर्म' या कथेतील चार यंत्रमानवांना मानवातील 'देवदूत' आणि 'सैतान' या परस्परविरोधी प्रवृत्ती समजतात. देवदूत हे संख्येने कमी असून मानवाच्या कल्याणार्थ काम करतात त्यांना सैतानी माणसांपासून दूर ठेवले पाहिजे हे त्यांच्या लक्षात येते. त्याचा परिणाम एका कंपनीतील कामावर कसा होतो याचे चित्रण आले आहे.

आज वंशशास्त्र अर्थात जेनेटिक्स हे अत्यंत प्रगत असे शास्त्र ठरत आहे. मानवी शारीर वैशिष्ट्ये, वैगुण्ये, विविध शारीरिक रोग या सर्वांसाठी गुणसूत्रांचे कार्य महत्त्वाचे ठरते. या विज्ञानतत्त्वावर आधारित रेखा बैजल यांनी ‘दिव्य’, ‘निर्माण’, ‘शुद्ध बीजापोटी’ या विज्ञानकथा लिहिल्या. ‘दिव्य’ या कथेत आपल्या जुळ्या भावाला जीवदान देण्यासाठी त्याच्यापासूनचा गर्भ आपल्या उदरात चार महिन्यांसाठी ठेवण्याचे ‘दिव्य’ करण्याचे वैदेहीवर येते. ती आता नेमका काय निर्णय घेणार या भावनिक कल्लोळाचे चित्रण कथेतून साकारले आहे.

‘निर्माण’ या कथेत डॉ. खुराना हिमोफेलियाचा रूग्ण जीवापाड मेहनत घेऊनही दगावल्यानंतर ‘सुपर मॅनच्या’ निर्मितीसाठी संशोधनाला वाहून घेतात. ते व त्यांचे सहकारी अत्यंत विचारपूर्वकतेने ‘देवदत्त’ या सुपरमॅनची निर्मिती प्रयोगशाळेत करतात. वीस वर्षानंतर या देवदत्ताच्या जीवनात भावनेला कसलेच स्थान नाही. तो सर्वार्थाने हुशार आहे पण भावनेच्या बाबतीत रूक्ष आहे हे सर्वांच्या लक्षात येते. भावना जेथून उंचबळून येतात ते मन, त्याच्या विविध संवेदना, मूल्य, पावित्र्याच्या कल्पना, प्रेम, ओलावा ह्या सगळ्यांमुळे मानव इतर प्राण्यांपासून वेगळा ठरला. पण देवदत्ताच्या आायुष्यात मूल्यांना, भावनांना काहीच स्थान नाही. तो स्थिर, तर्कनिष्ठ विचारांचा आहे. जणू त्याच्या रूपाने एक हाडामांसाचा, अत्यंत देखणा, सुदृढ कॉम्प्युटर उभा आहे. डॉ. खुराना सर्वांसमोर त्यांना गुणसूत्रांमध्ये ’मन’ कोठे असते हे अद्यापी समजले नसल्याचे कबूल करतात. यामुळे एका तऱ्हेने या सूक्ष्मतम मनाची निर्मिती परमेश्वरीय कल्पना असे स्विकारताना त्यांचा ‘देवदत्त’ हा प्रयोग अपूर्णच राहतो. मात्र या देवदत्तावर पुत्रवत प्रेम करणाऱ्या डॉ. खुराना यांना ‘तो’ हे भावनाहीन आयुष्य कसे जगणार यासाठी वाटणारी काळजी, चिंता, दु:ख या भावनेने घेरलेल्या आपल्या मनाला कसे आवरावे हे कळत नव्हते.

‘शुद्ध बीजापोटी’ या कथेत पुन्हा हिमोफेलिया या अनुवंशिक रोगाशी निगडीत कथानक येते. सर्वसाधारणपणे स्त्री ही हिमोफेलियामध्ये वाहक असते तर पुरुष हा या रोगाला बळी पडणारा असतो. आज मात्र संशोधनाने हा दोष दूर करता येतो. हे वास्तव या कथानकात संभवनीय सत्य म्हणून गृहीत धरले गेले आहे.

झाडांना संवेदना असतात हे डॉ. जगदिशचंद्र बोस यांनी विसाव्या शतकातच सिद्ध केले होते. यानुसार ‘साक्ष’ या कथेत अरूणावर झालेल्या शारीर अत्याचारासाठी तिच्या प्रिय झाडाची ‘साक्ष’ कशी गृहीत धरण्यात आली आहे याचे चित्रण या कथानकात आले आहे. मात्र त्यासाठी ‘सिस्मोग्राफ’ या यंत्राचा उल्लेख योग्य नसून ‘क्रेस्कोग्राफ’ असा उल्लेख शास्त्रीयदृष्ट्या योग्य ठरेल.

‘वलयांकित’ ही थोडी वेगळ्या विषयावरची कथा आढळते. डॉ. शुक्ल या संशोधकाने प्रत्येक व्यक्तीभोवती वलय, शास्त्रीय भाषेत ‘ऑरा’ असते असे म्हटले आहे. ही वलयं प्रत्येकाच्या शरीरातून उत्सर्जित होतात, असे त्यांनी लक्षात घेतले. अल्फा, बीटा, गॅमा याप्रकारे या किरणांचे वर्गीकरण त्यांनी केले. त्यानुसार त्यांनी ही वलयं मिळवण्यासाठी विशिष्ट यंत्र निर्माण करून त्यातून व्यक्तीचे फोटोग्राफ्स काढले. डॉ. शुक्ल हे सर्व ज्यांना मनमोकळेपणाने सांगत असतात ते श्री. देशपांडे एक उद्योजक असतात. या देशपांड्यांची ऑरा प्रखर असते म्हणूनच त्यांच्या सहवासात आलेली व्यक्ती उत्साही, चैतन्यदायिनी बनते. देशपांड्यांच्या मदतीने डॉ. शुक्ल मानसिक रोगाने

पिडित प्रमोदवर सकारात्मक प्रयोग करतात, आणि आपल्या विचाररूपी शोधाला प्रत्यक्ष उपाय योजनेत रूपांतरीत करतात.

'अज्ञात' या कथेला खगोलशास्त्रातील कल्पनेचा आधार आहे. यामध्ये मंगळाचे पृथ्वीच्या जवळून भ्रमण करताना आपल्या कक्षेपासून ढळल्याने पृथ्वीवर त्या क्षणासाठी, त्याच्या आकर्षण पट्ट्यात निर्वात, वजनरहित पट्टा तयार होतो. योगायोगाने अंतरिक्षातील मंगळाचे हे ढळणे डॉ. शुक्ल या शास्त्रज्ञाच्या स्क्रीनसमोर घडते. डॉ. शुक्ल व डॉ. दास हे या अंतरिक्षातील स्थित्यंतराचे साक्षीदार असतात. अर्थातच त्यावर उपग्रहाची योजना करून पृथ्वीवासीयांना संरक्षण दिले जाते, त्यासाठी डॉ. शुक्ल हे नोबेल पुरस्काराचे मानकरी ठरतात.

रेखा बैजल यांच्या समकालीन असलेल्या माधुरी शानभाग यांनीही बहुविध वाङ्मयनिर्मिती केली आहे. त्यांच्या 'पुनर्जन्म' या कथासंग्रहात एकूण अकरा कथांचा समावेश आहे. यामध्ये 'जेनेटिक इंजिनियरींग' या विषयाशी निगडित चार कथा आढळतात. मानवी सजीव निर्मिती जर नैसर्गिकरित्या शक्य नसेल तर आय. व्ही. एफ. तंत्राने ही गर्भधारणा शक्य असते, या तंत्राचा आधार घेऊन 'विधिलिखित' ही कथा लिहिली आहे. या कथेमध्ये देवदत्त आणि वृंदा यांच्या पाडून टाकलेल्या दहा आठवड्याच्या स्त्री गर्भातून अपरिपक्व स्त्री बीजे काढून घेण्यात आली आणि पुरंदरे या व्यक्तीच्या वीर्याशी त्यांचा संयोग घडवण्यात आला. त्यातूनच वृंदासारखीच दिसणारी पण मानेवर देवदत्त कर्वे यांच्या घराण्याची जन्मजात खूण बाळगणारी विशाखा जन्माला आली. देवदत्त व तिच्या वयात सुमारे वीस वर्षांचा फरक असूनही मृत वृंदासारख्या दिसणाऱ्या विशाखाकडे देवदत्त आकर्षिले गेले. तिच्याशी लग्न करण्याआधी त्यांनी तिचे जन्मरहस्य शोधून काढले. तेव्हा ती त्यांच्या व वृंदाच्या न जन्मलेल्या मुलीची मुलगी म्हणजे त्यांची नात असल्याचे लक्षात आले. शेवटच्या क्षणापर्यंत यातील नाट्य खेळवत ठेवत उत्सुकता वाढवणारी, भावनिक मूल्यांचा गुंता वाढवणारी विज्ञानकथा ठरते.

'निर्णय' या कथेतील डॉ. एम्. विद्यागौरी यांचे दोन विद्यार्थी आपले संशोधन यशस्वीरित्या राबवण्यासाठी संशोधनाचा आराखडा त्यांच्यासमोर ठेवतात. त्या दोहोंपैकी एकाची निवड होऊन पुढील संशोधनासाठी अमेरिकेला जाणे व तेथून आल्यावर विद्यागौरी यांची गादी चालवणे असा विचार असतो. या दोहोंपैकी विशाल सेनगुप्ता याच्या संशोधनानुसार प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्ट मानव हाताच्या बोटांवर मोजता येण्याजोगे आहेत, त्यांची संख्या वाढवली तर त्या क्षेत्राचा कल्पनातीत विकास होईल असे त्याला वाटत होते. दुसरा विद्यार्थी डॉ. सेतूरामन याचाही जीन्सरोपणाचाच विचार आहे. परंतु जिवाचे गुणधर्म बदलण्याऐवजी ते श्रेष्ठत्वाकडे नेण्याऐवजी त्याला होणाऱ्या मानसिक, शारीरिक त्रासाचा विनाश करण्यासाठी जीन्सरोपण हे हत्यार वापरावे असा त्याचा आग्रह होता. अर्थातच डॉ. विद्यागौरींनी सेतूरामनचा प्रोजेक्ट पुढे पाठवायचा निर्णय घेतला.

'अश्वत्थामा' या कथेत मानवाची आयुमर्यादा वाढविण्याचे संशोधन आले आहे. मात्र सृष्टीचे उत्पत्ती-वर्धन-लय हे सृष्टीचक्र अव्याहत चालू राहण्यासाठी मानवाचा मृत्यू अटळ आहे, हीच जाणीव या कायाकल्प प्रयोगातून स्पष्ट केली आहे.

'कैफियत' मध्ये स्त्रीगर्भ पाडून टाकणाऱ्या समाजाच्या डोळ्यांवरची झापडे फाडून टाकण्याचे काम मातेच्या उदरातील पुरुषगर्भाने केले आहे.

'पुनर्जन्म' या कथेतून सजीवाचे 'हायबरनेशन' आणि ऋषीमुनींची 'समाधीवस्था' एकच असू शकते का याचा प्रत्यक्ष अनुभव घेणाऱ्या स्त्री च्या जीवनातील नाट्य चितारले आहे.

भौतिकशास्त्रातील स्वनातीत लहरी या वैज्ञानिक तत्त्वावर आधारित 'बूमरँग', 'दधिची', 'अग् अग् म्हशी', 'सुखसागर' या कथांचा समावेश आहे. 'बूमरँग' या कथेत मानवाचे अर्धे–अधिक आयुष्य ज्ञान मिळवण्यात खर्ची पडते. त्यानंतरच त्याचे उपयोजन, भरीव संशोधन शक्य होते. मात्र त्यावेळेस शरीराची व मनाची कार्यक्षमता हळूहळू उतरणीला लागते. म्हणून एखाद्या ज्ञानशाखेचे ज्ञान वयाच्या दहाव्या–बाराव्या वर्षीच उपलब्ध झाले तर संशोधन क्षेत्रात अपूर्व क्रांती निर्माण होईल. या वैज्ञानिक संकल्पनेसोबत मानवी बुद्धिमत्ता 'स्मृतिमंजुषा', 'आकलनशक्ती', 'विवेक', आणि 'स्वतंत्र प्रज्ञा' या चार भागांत विभागलेली असते, त्यांचे नेमके कार्य कसे चालते याचेही स्पष्टीकरण दिले आहे. या वैज्ञानिक माहितीच्या आधारे मानवी आयुष्यात असे घडले तर काय होईल हा संभवनीय कल्पनाविलास कथेतून रंगवला आहे.

'दधिची' या कथेतील काळ २०६० असा आहे. या कथेत पृथ्वीवासीयांसाठी भयप्रद घटना घडणार आहेत कारण 'स्विफ्ट टटल' नावाचे अस्मानी संकट पृथ्वीवर आदळणार आहे आणि सर्व सजीवसृष्टी बेचिराख होईल अशी शक्यता वर्तवली आहे. तेव्हा अखिल पृथ्वीवासीयांचे प्राण वाचवण्यासाठी 'गॅन महाजन' ह्या स्पेस डिझाईन इंजिनियरने आपल्या लहानग्या मुलासोबत ('बालमोहन') त्या संकटाच्या दिशेने कूच केले. या प्रकल्पाचे नाव 'ऑपरेशन दधिची' असे डॉ. गॅन यानेच ठेवलेले असते. यामागे दधिची ऋषींबद्दलच्या पौराणिक कथेचा संदर्भ त्याच्या मनात असतो.

'अग् अग् म्हशी' ही विश्वनाथ ह्या खगोल भौतिकिय संशोधक आणि सुमित्रा या समाजशास्त्रज्ञाची कथा आहे. विश्वनाथवर प्रेम असल्यामुळे लग्न न करताच सुमित्रा त्याच्यासोबत राहते मात्र किडक्या, गलथान, भ्रष्टाचारी, प्रदूषणकारी
समाजव्यवस्थेमुळे ती आपल्याला मूल होऊ न देण्याचा निर्णय घेते. विश्वनाथही खगोलशास्त्रातील तज्ज्ञ संशोधक आहे. तो 'वेळ' या नव्या संकल्पनेचा नव्याने विचार करतो आणि भविष्यात घडणारी घटना यावर गणितीय प्रमेयाच्या आधारे ताबा मिळवून त्याचे चित्रीकरण करतो. यातूनच पुढे त्यांच्या आयुष्यात घटना घडत जातात.

'सुखसागर' ही कथा मेंदूमध्ये निर्माण होणाऱ्या सुखसंवेदनेवर आधारित आहे. ह्याविषयीचे संशोधन यशस्वी करणाऱ्या डॉ. मालतीबाई यांनी व्यावहारिक पातळीवरही त्याचे उपयोजन केले. हाच तो लोकांच्या सुखासाठीचा 'सुखसागर' नावाचा प्रकल्प. मात्र त्यांची मुलगी प्रज्ञा डॉ. मालतींना आभासी सुख व खरे सुख यातील फरक समजवण्याचा प्रयत्न करते. ती खऱ्या सुखासाठी या आभासी सुखाकडे पाठ फिरवते. ती त्यांना खऱ्या सुखासाठी मनाचा असणारा संदर्भ स्पष्ट करते.

आज संगणकाने आपले जीवन पूर्णपणे व्यापून टाकले आहे. त्या संगणकाच्या कार्यावर आधारित माधुरी शानभाग यांच्या 'हिरो' आणि 'शेवटचा दिस' या कथा आहेत. 'हिरो' या कथेत अजय हा संगणक तज्ज्ञ संगणकाला न्यूरल नेटवर्क जोडून त्याला भावनेची साथ देतो त्यामुळे तो अजयचा अगदी जवळचा मित्र बनतो. इतकेच नाही तर हा हिरो अजयचे 'ऊर्जा' वरील अबोल प्रेम ही तिच्याजवळ स्पष्ट करतो आणि त्या दोघांना एकत्र आणतो.

'शेवटचा दिस' यामध्ये संगणकीय ग्राफिक्स तंत्राच्या सहाय्याने विनया आपला नवरा व नणंद अपघातात दगावले असूनही ते दु:ख बाजूला ठेवून आपल्या कॅन्सरपिडित सासूला त्यांच्या कन्येचे लग्न लागले असे त्या सोहळ्याचे चलत्चित्रण दाखवते. त्या कन्येचे लग्न झाले या आंतरिक समाधानाने त्या थोड्याच वेळात आपल्या अंतिम प्रवासाला निघून जातात. आज जरी हे ग्राफिक्स तंत्र सहजपणे हाताळले जात असले तरी वीस पंचवीस वर्षांपूर्वी ते अजून गर्भावस्थेतील तंत्र होते.

अशाप्रकारे दोन्ही लेखकांनी समर्थपणे विषयवैविध्य राखत आपल्या विज्ञानकथा लिहिल्या आहेत. भाषेच्या दृष्टीने विचार करतां 'रेखा बैजल' यांच्या कथेत अधिकांश प्रमुख पात्राचे चित्रण शास्त्रज्ञ रूपात येते, डॉ. शुक्ल हे पात्र त्यांच्या 'किडनॅपिंग', 'वलयाकिंत', 'निर्माण', 'अज्ञात' या कथांमध्ये आले आहे. तसेच डॉ. दास हे पात्रही 'किडनॅपिंग', 'साक्ष', 'अज्ञात' या कथांमधून दिसून येते. 'युगधर्म'मधील रोबो 'देवदूत' आणि 'सैतान' या मानवी प्रवृत्ती लक्षात घेऊन देवदूताला सांभाळायला जातात त्याचे परिणाम नाट्य कंपनीच्या ऑफिसमध्ये कसे घडते, किंवा प्रत्येक कथेतील पात्राची मानसिक अवस्था समजून घेणारे वर्णन कथाशयाला बळकट करते. परंतु अनेकदा रेखा बैजल यांची ही शास्त्रीय भाषा अखेरीस तत्त्वज्ञानाच्या पातळीवर जाते. 'विज्ञान' हे जर ज्ञानाचे विशेष रूप असेल तर 'तत्त्वज्ञान' म्हणजे अस्तित्व, ज्ञान, मूल्ये, विवेकशक्ती, मन आणि भाषा यांच्या संबंधातील सर्वसाधारण आणि मूलभूत प्रश्नांची चिकित्सा असे समजले जाते. डॉ. शुक्ल हे शास्त्रज्ञ जरी असले तरी त्यांच्या तोंडी तत्त्वज्ञाची भाषा आली आहे. मानव अनेकदा विज्ञानाच्या मदतीने सृष्टीतील रहस्ये समजून घेतो. आणि तो स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजू लागतो मात्र ही सजीवसृष्टी कुणी निर्माण केली, विश्वाला मिळालेली अखंड गती कुणी दिली? ग्रहताऱ्यांमध्ये ही सुरक्षित अंतरं कशी राखली गेलीत? पहिल्या एकपेशीय प्राण्यात चैतन्याची ठिणगी कोणी टाकली? हे प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरीत आहेत. यामुळेच मंगळाचा तोल किंचितसा ढळला तर पृथ्वी वर काय नाट्य घडू शकते याचे प्रत्यंतर 'अज्ञात' कथेतून मिळते. मानवी बुद्धीला जर भावनेची साथ नसेल तर सुपरमानवाची निर्मिती अपूर्णच राहिल हे 'निर्माण' कथेतून चित्रित झाले. 'वलयांकित' कथेत एका माणसाने दुसऱ्या माणसाला दिलेले प्रेम दोघांनाही एका देहातील पातळीवर आणून सोडते. म्हणूनच भावनांना नियंत्रणात ठेवणं आवश्यक आहे. अशी तत्त्वज्ञाची भाषा डॉ. शुक्ल देशपांडे यांच्या जवळ बोलू लागतात.

'साक्ष' या कथेत अरुणावरील शारीर अत्याचार करणाऱ्या नराधमाला योग्य ती शिक्षा करण्यासाठी वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. दास आपणहून न्यायालयाला मदत करतात. झाडाची साक्ष घेतानाचे चित्रण न्यायालयीन भाषेच्या जवळ

जाणारे ठरते. प्रसंग निर्मिती, संवाद यातून कथेचे प्रवाहीपण टिकवले आहे आणि विज्ञानतत्त्वाचे स्पष्टीकरण दिले गेले आहे.

माधुरी शानभाग यांच्या कथांमध्येही भाषेचा वापर कुशलतेने झाला आहे. 'अश्वत्थामा' या कथेत शास्त्रज्ञ उमाची आपला कायाकल्प विषयकचा यशाच्या अगदी जवळ असणारा प्रयोग थांबवण्यासाठी सतराव्या शतकातील वैद्य या तेजपुंज व्यक्तीशी भेट होते. या भेटीत त्या तेजपुंज व्यक्तीच्या तोंडी असणारी भाषा आपले 'सुहृद, पुत्रपौत्र, प्रपौत्र चिरविश्रांती घेत असताना आपण मात्र चिवटपणे वर्षानुवर्षे उलटत रहाणं ही दु:खदायी बाब आहे' हा भाषेतील कालिक फरक अधोरेखित होतो. 'हिरो', 'शेवटचा दिस' कथेत संगणकीय क्षेत्रातील अनेक शब्द कथाशयाला पूरक ठरतात. समाजशास्त्रज्ञ सुमित्रा खगोलशास्त्रज्ञ विश्वनाथ यांच्या एकत्र सहजीवनासाठी 'सुमित्रेच्या विषयातील मानव, त्याची उत्क्रांती संस्कृतीच्या दिशेने चाललेला अथक प्रवास, वेगवेगळे मानव समूह आणि त्यांची संस्कृती, त्यांचे प्रश्न यासोबत विश्वनाथाचे खगोलशास्त्राचे अफाट विश्व, सूर्यमाला, त्यातील पृथ्वी, एक ठिपका आणि त्यावरील मानव एक नगण्य प्राणी असे दोन टोकाचे अभ्यासविषय एकत्र आले' असे वर्णन येते. 'कैफियत'मध्ये पुरुषगर्भाचे प्रथमपुरुषी निवेदन भविष्यातील दारुण परिस्थिती वर्णिताना स्वप्नरंजन पर भविष्यकालीन भाषेतून समाजातील अहितकारी गोष्टींकडे लक्ष वेधते. येथे 'बाळकडू' या शब्दाऐवजी 'गर्भकडू' हा नवीन शब्द विषयाशी तादाम्य पावलेल्या शब्दाचे उपयोजन लक्षवेधक ठरते. 'बूमरँग' कथेत मानवी बुद्धीचे शास्त्रीय स्पष्टीकरण आढळते व बुद्धिमत्तारोपण कार्याविषयी अनेक शास्त्रीय संकल्पना येतात. वाचकासाठी ही शास्त्रीय भाषा कोठेही बोजड व तर्ककठोर न करता कथानकाच्या ओघात अतिशय सुगमपद्धतीने वाचक सन्मुख होते आणि त्याला त्याचा अर्थ आपोआप कळू लागतो. एकूणच विज्ञान कथेत रेखा बैजल व माधुरी शानभाग या आपल्या लेखनाने वाचकांचे लक्ष वेधून घेण्यात यशस्वी ठरल्या आहेत.

**संदर्भ**

*माधुरी शानभाग, पुनर्जन्म, मेनका प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, मार्च १९९९, ISBN : ८१-८६१४९-२३-६*

*रेखा बैजल, किडनॅपिंग, पुष्प प्रकाशन लिमिटेड, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी १९९४*

*डॉ. बाळ फोंडके, विज्ञानकथा : एक नवे परिमाण, ललित, जुलै १९८८, पृष्ठ ५९-६४*

*र. बा. मंचरकर, मराठी विज्ञानकथा, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, विज्ञानकथा विशेषांक,*
*ऑक्टोबर २००६ ते डिसेंबर २००६, अंक क्रमांक ३१९*

*प्रा. डॉ. सु. म. तडकोडकर, आधुनिक मराठीतील विज्ञानसाहित्य : समीक्षाविषयक काही प्रश्न,*
*पाण्यातील पावले साहित्यविचार व साहित्यिक, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, जुलै २०१३,*
*ISBN : ९७८-९३-८०६१७-३७-४*

# 'आलोक' समकालीन दीर्घकथेचा यशस्वी अविष्कार

**प्रा. विकास शंकर पाटील**
*श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल, ता. राजापूर, जि. रत्नागिरी.*

आलोक हा आसाराम लोमटे यांचा शब्द प्रकाशनाने २५ मार्च २०१० रोजी प्रकाशित केलेला कथासंग्रह आहे. मराठी कथेतील या कालखंडातील एक सशक्त व दर्जेदार लेखक म्हणून आसाराम लोमटे यांना ओळखले जाते. आसाराम लोमटे यांचे अतिशय खडतर परिस्थितीत शिक्षण झाले. इंद्रजित भालेराव यांच्या कवितेचा व त्यांच्या सानिध्याचा, विचारांचा प्रभाव त्यांच्यावर राहिला.लहानपणापासूनच खडतर ग्रामीण जीवनाचा अनुभव आसाराम लोमटे यांनी घेतला होता. त्याचबरोबर लोकसत्तामध्ये वार्ताहर म्हणून काम करत असताना ग्रामीण भागातील समस्या आणि ग्रामीण जीवन वास्तवाचे निरीक्षण त्यांनी केले. आपणा भोवतालचे रखरखीत वास्तव घेऊन त्यांच्या कथांतून हीच आशयसूत्रे त्यांनी मांडली आहेत. मराठी कथेमध्ये दीर्घकथा लेखन त्यांनी केलेले आहे. त्यांचा पहिला कथासंग्रह 'इडा पिडा टळो' हा समीक्षकांच्या पसंतीस उतरला. त्यातील सहा ही दीर्घकथा वाचकांनाही अस्वस्थ करून गेल्या. 'इडा पिडा टळो' या कथासंग्रहने आसाराम लोमटे यांना दर्जेदार आणि वास्तवदर्शी लेखन करणाऱ्या, ग्रामीण वास्तवाशी एकरूप झालेल्या लेखकाच्या पंक्तीत स्थान मिळवून दिले. त्यामुळेच त्यांच्या पुढील कथासंग्रहाची उत्सुकता वाचकांना ही लागली होती आणि ही उत्सुकता आसाराम लोमटे यांच्या सकस लेखणीचातून 'अलोक' च्या रुपाने प्रकटली त्या कथा संग्रहाने आपले असामान्यत्व सिद्ध करत साहित्य अकादमी पुरस्कारावर्ती आपले नाव कोरले. यातूनच आसाराम लोमटे यांच्या या कथासंग्रहातील सकस कथांचे महत्त्व अधोरेखित होते.

या कथासंग्रहाच्या मुखपृष्ठावर लेखकाने खोडाच्या मुळाशी बसलेला शेतकरी दाखविला आहे. या मुखपृष्ठावरील चित्रातून लेखकाला खूप काही सांगावयाचे असल्याचे अधोरेखित होते. या खोडावर ती कोणतीही पाने दिसत नाहीत आणि शेतकरी त्याच्या मुळाशी बसलेला आहे. झाड ज्या पद्धतीने पाण्याचा शोध घेत राहते. त्याच्या मुळ्या या पाण्याच्या दिशेने जात राहतात, त्याचप्रमाणे मानवी जीवन ही सुखाच्या शोधार्थ भटकत राहते. शेतकऱ्याच्या पाचवीला पुजलेला दुष्काळ आणि त्या दुष्काळाने हिरावून नेलेले त्याचे सुख, वटलेले झाड आणि पाण्याच्या शोधार्थ झाडाला इकडेतिकडे फुटणार्‍या मुळ्या याचा संदर्भ कदाचित लेखक जोडू पाहतो. लेखकाने या कथासंग्रहाच्या प्रारंभीच अर्पण पत्रामध्ये असे म्हटले आहे की 'अशांना ज्यांची मुळे अजूनही मातीत आहेत' यावरुनच एक गोष्ट प्रकर्षाने आपल्या लक्षात येते की जी माणसे ग्रामीण संस्कृती, कृषीजीवन, कृषी संस्कृतीशी निगडित असलेली सर्व व्यवस्था यामध्ये गुंतून पडलेली आहेत अशा लोकांना हे पुस्तक अर्पण केलेले आहे. जी माणसं मातीशी जुळलेली आहेत, जी माणसं आजही गावच्या मातीपासून दूर झालेली नाहीत अशा माणसांना हा कथासंग्रह लेखकाने अर्पण केलेला आहे.

या कथासंग्रहाच्या मलपृष्ठावर भा. ल. भोळे यांनी पत्रातून आसाराम लोमटे यांना पाठवलेला मजकूर आला आहे. यामध्ये त्यांनी "आसाराम लोमटे यांची कथा आज आणि आता साक्षात भिडते" असे म्हटले आहे.

त्याचबरोबर "कारण ज्या जीवनाविषयी त्यांना तुम्ही लिहिता त्याबद्दल तुम्हाला जिवंत आस्था आहे" असेही म्हटले आहे. १६३ पानाच्या या कथा संग्रहामध्ये सहा कथा आलेल्या असून या कथासंग्रहाचे मुखपृष्ठ आणि रेखाटने बाळ ठाकूर यांनी रेखाटलेली आहेत.

**चिरेबंद** - या कथेत गावाकडे एकटीच राहणारी आजी व तिचा शासकीय पातळीवर सत्कार आहे म्हणून तिला सोबत करण्यासाठी शहरातून गावी आलेला तिचा नातू यांच्यातील संवादतून हे कथानक पुढे सरकत राहते. त्यांच्या आजोबांनी रजाकारांशी लढा दिला म्हणून स्वातंत्र्य सैनिकांच्या वीर पत्नीचा सत्कार शासनाने आयोजित केला आहे. त्यासाठी गावी आलेला नातू अनेक नवनवीन सत्य आजोबांविषयी जाणतो आणि हादरून जातो. गावातील गोरगरिबांच्या जमिनी आजोबांनी लाटल्या. त्यातूनच त्यांचा खून झाला हे नवे सत्य त्याला कळते.रजाकार लढ्याशी त्यांचा काही संबंध नसल्याचे कळते. आपला चिरेबंदी वाडा असाच अनेक सत्य गिळून बसला आहे. या चिरेबंदी वाड्यातून एकही सत्य पाजरणार नाही हे निवेदकाला समजते. आजीच्या सत्कारानंतर तो शहरात जायला निघतो त्या वेळी त्याचे पाय वाड्यात अडखळत नाहीत. अनेक लहानसान प्रसंगातून त्याला आपल्या आजोबांविषयी माहिती मिळते व अस्वस्थ करणारे वास्तव त्याच्यासमोर येते. या वाड्यात राहण्यापेक्षा या वाड्याचा वारस म्हणून राहण्यापेक्षा त्याला शहरात राहणे बरे वाटते. आजोबांनी अनेक लोकांना छळून या जमिनीचा ताबा मिळवलेला असतो. जमीन मिळवूनही त्या पडून आहेत हे वास्तवही दुर्लक्षित करता येत नाही. ही कथा ग्रामीण भागातील वास्तवावर प्रकाश टाकताना दिसते. ग्रामीण भागात जमिनी परस्पर नावावर करून घेणे, ताब्यात घेतलेल्या जमीनीवर आपलाच अधिकार सांगणे अशा अनेक घटना घडताना आपल्याला दिसून येतात. या जमिनीच्या वादातून होणारे खून, त्यानंतर या जमिनीच्या वादातून होणारे न्यायालयीन लढे, या जमिनी वादामुळे पडल्याने त्यांचे होणारे आर्थिक नुकसान, शहरात गेलेला मुलगा आणि गावाविषयी असणारी त्याचीअनास्था, गावाशी नाळ तुटल्याने त्याला आपल्या घराविषयी कुटुंबाविषयी वाटणारी अनास्था, स्वातंत्र्यलढ्यात सहभाग न घेताही स्वातंत्र्यसैनिक म्हणून काहींची झालेली नोंदणी असे अनेक प्रश्न या कथेतून चित्रित झाल्याचे दिसते. सासू-सुनेच्या नात्यातील रुंदावत चाललेली दरी, सासूचे एकटेपण, तिची असणारी गावाविषयीची अस्मिता, सासूने गावच्या शेतीतून मिळालेले उत्पन्न लपून ठेवले आहे अशी शहरी सुनेची असणारी मानसिकता अशा अनेक नवीन गोष्टींवर ही कथा प्रकाश टाकताना आपल्याला दिसते.

**ओझं** - ही कथा तर वाचकांना अस्वस्थ करून टाकते मराठवाड्यातील शेतकऱ्याच्या पाचवीला पुजलेला दुष्काळाचे दुःख आणि या दुष्काळाच्या झाडात होरपळनारा शेतकरी या कथेत चित्रित झाला आहे. आपल्या भोवतालचे जगण्याच्या आशेचे अंकुर होरपळून जातात आणि नात्यातील ममतेचे पाझर असतात त्या वेळी शेतकरी आत्महत्येच्या पर्यायाकडे वळतो यावर या कथेतून लेखकाने प्रकाश टाकला आहे. त्याचबरोबर एका नव्या प्रश्नाची मांडणी ही लेखकाने कल्पकतेने केलेली आहे. दोन भावांमध्ये लहान भाऊ शिकून शिक्षक होतो तर मोठा भाऊ त्याच्या शिक्षणासाठी हाडाची काडं करून त्याचं शिक्षण पूर्ण करण्याची काळजी घेतो. लग्नानंतर या लहान भावाची पत्नी शहरातील सुखवस्तू जगणे पसंत करते तर पत्ती ने गावाकडे केलेली मदत तिला खूपत राहते. याउलट मोठा भाऊ शेतीत संघर्ष करत शेती पिकवण्याचा प्रयास करताना

दिसतो. आई-वडील, पत्नी आणि एकच मुलगी चतुरा असा कुटुंब काबिला सांभाळतो. निसर्गाशी दोन हात करण्याचा प्रयत्न करतो, पण प्रत्येक वेळी येणारे अपयश आणि मुलीच्या भवितव्याची चिंता त्याला अस्वस्थ करून सोडते. प्राध्यापक असणाऱ्या भावालाही आपल्या घराविषयी, घरच्यांच्याविषयी अस्था वाटते.अधीमधी घरी जाऊन भावाला समजवण्याचा प्रयत्न ही तो करत असतो. आपली मुलगी चतुरा हिला शहरात शिकण्यासाठी आपला प्राध्यापक भाऊ ठेवू शकत नाही ही वेदना त्याला अस्वस्थ करून सोडते. आपल्या पाठीमागे असणारे निसर्ग आणि दुष्काळाचे दुःख, सातत्यानं जीवनात करावा लागणारा संघर्ष आणि मुलीचेही मनासारखे शिक्षण करू शकत नसल्याच्या दुःखातून शेवटी विष प्राशन करून हा शेतकरी आत्महत्या करताना दिसून येतो. त्याच वेळी या घराचा बोजा किंवा या घरच्यांची जबाबदारी हा प्राध्यापक भाऊ सांभाळताना दिसतो. हा आशावादी दृष्टीकोणही ही लेखकाने चित्रित केला आहे.एकूणच ग्रामीण भागातील शेती आणि शेतकरी आणि तेथील शेतकरी मुलांच्या जीवनाची समस्या लेखकाने या कथेच्या मुळाशी ठेवलेली आहे. नोकरदार व्यवस्थेमध्ये घरात राहणारी मंडळी गावापासून तुटत जातात सत्य या कथेच्या मुळाशी लेखकाने ठेवले आहे.

**खुदळण** - ही कथाही वाचकाला अस्वस्थ करणारा अनुभव देणारी आहे राजकीय जीवनात एका पक्षातील नेते दुसऱ्या पक्षात सहजगत्या जात असतात पण ग्रामपातळीवर या कार्यकर्त्यांच्या मनामध्ये होणारी खळबळ लेखकांने मार्मिकपणे टिपली आहे. कम्युनिस्ट पार्टीचे काम करणारा दताराव ज्यावेळी ही पार्टी सोडून सत्ताधारी पार्टीकडे जातो त्यावेळी त्याच्या मनात चाललेली खळबळ आणि लोकांच्या कडून त्याला मिळणारे टोमणे, यामुळे तो अस्वस्थ होऊन जातो.आपण आपल्या मूळ प्रवाहापासून तुटत चाललेलो आहोत, आपण संघर्ष करण्यापेक्षा सत्तेशी तडजोड करत आहोत ही भूमिका त्याला अस्वस्थ करत राहते. संघर्ष करत राहणे हीच जिवंतपणाची निशाणी आहे, तत्वानशी तडजोड करत जगणे, सत्तेशी तडजोड करत जगणे म्हणजेच आपल्यातले स्वत्व गमावण्यासारखे आहे असे त्याला वाटते. मुलीच्या लग्नाची असणारी चिंता आणि त्या लग्नासाठी विरोधी आमदाराकडून घेतलेले ५०,००० यामुळे आपण ही स्वार्थी झालो की काय ही भावना त्याला छळत राहते. ज्या आप्पानचे नेतृत्व मानून काम केले त्या अप्पापासून दूर जाणे त्याच्या मनाला पटत नाही. अप्पाच्या भेटीत अप्पानी सांगितलेले तत्वनिष्ठ जीवन हेच खरे जीवन आहे.याचा साक्षात्कार त्याला होतो. ग्रामीण स्तरावरील छोठ्या-मोठ्या तडजोडी करत असताना त्या कार्यकर्त्याच्या अंतर्मनात चाललेला संघर्ष लेखकांने मोठ्या कल्पकतेने चित्रित केला आहे. त्याच वेळी या संघर्षातूनच ही व्यक्तिमत्त्व घडत असतात हे वास्तवही त्यांनी अधोरेखित केल्याचे दिसून येते.

**कुभांड** - ही कथा ही वाचकाला अस्वस्थ करणारी आहे. दलित वाड्यातील गवळण आणि सवर्ण समाजातील व्यक्ती यांच्या संघर्षातून ही कथा फुलत राहते.ग्रामीण भागात असणारे राजकारण आणि त्यातून उद्ध्वस्त होणारे संसार, त्याचबरोबर दलित आणि सवर्ण संघर्ष हा या कथेच्या मुळाशी आहे. शेतात गवळण व अंकुश यांचा मुलगा सुरेश याने मोसंबी चोरल्या म्हणून त्याला माली पाटलाने मार दिला. माली पाटलाला विचारायला गेल्यावर त्याने गवळण व अंकुशचाच पानउतारा केला. त्यामुळे चिडलेल्या या दोघांना आनंद त्याच्यावरच ॲट्रॉसिटी गुन्हा करण्यास प्रवृत्त करतो. चिडलेला मालीपाटील गावातील उनाड पोरांना गवळणची नोकरी

जावी असे उद्योग करावयाला सांगतात. त्यातून गवळणला त्रास दिला जातो. ती नोकरी वाचविण्यासाठी मालीपाटलाचा दरवाजा ठोठाविते पण मालीपाटीलही त्यांना माफ करत नाही. ही कथा आजच्या सवर्ण आणि दलित समाजाच्या संघर्षावर प्रकाश टाकताना दिसते. दलितांना दिलेले अधिकार, त्यांना मिळालेले कायद्याचे कवच कसे कुचकामी ठरते याचे वास्तवदर्शी चित्रण या कथेच्या मुळाशी आहे

**जीत** - ही कथा तर ग्रामीण भागातल्या राजकारणावर्ती प्रकाश टाकते. ग्रामीण भागातील राजकारण हे आज किती टोकाचे बनले आहे यावरती ही कथा बेतली आहे.या कथेतील राजकारणी सभापती धर्माजी भोसले सरपंच विलास शिंदे याला कशी धोबीपछाड देतो याची ही कथा. दोघेही आपल्या महत्वकांशेपोटी राजकारणाशी कांहीही संबध नसणाऱ्या माणसांना यात ओढतात. सभापती मयत हारी भोसल्याच्या बायकोला कौसालाबाई तर सरपंच पंढरी कदमाला उभे करून आपली पोळी कशी भाजेल हे पहातात. महिन्याभरापूर्वीच पतीचे निधन होऊनही सभापतीच्या हट्टासाठी त्या स्त्रीला निवडणुकीला उभे राहावे लागते . निवडणुकीला उभे राहिल्यानंतर निवडणुकीचे जे काही ग्रामीण फंडे आहेत ते वापरून त्या ठिकाणी विजयाकडे आगेकूच करावी लागते.हे सारं मन मारून ही मंडळी करताना आपल्याला दिसून येतात. या वास्तवावर ती लेखकाने प्रकाश टाकल्याचे दिसते. ग्रामीण राजकारणाची घसरत चाललेली पातळी लेखकाने रेखाटली आहे.

**वळण** - ही कथा तर वाचकाला खूपच अस्वस्थ करून सोडते. ग्रामीण भागात असणारी पायपीट करून शाळेत जात असते दोन किलोमीटरची शाळेसाठी करावी लागणारी पायपीट, ही पायापीठ करूनही प्रयागच्या वाट्याला येणारे दुःख लेखकाने चित्रित केले आहे. शाळेत जात असताना ती एक दिवस गावातील भांडण दुरून पाहते. एका व्यक्तीचा खून होतो आणि यासाठी तिने साक्ष देऊ नये म्हणून दोन्ही बाजूंनी तिच्यावरती दडपण येते. कोणाचे नाव न घेता ही कुसुम चा शैक्षणिक प्रवाह थांबवण्याचा प्रयत्न होतो. शिक्षकाच्या मनात असूनही शिक्षकाला याविरुद्ध काहीच करता येत नाही पण त्याने सुचवलेल्या मार्गाने प्रयागचे शिक्षण सुरू राहते. राजकारणाचा बळी कुसुम ठरताना दिसते. एक हुशार आणि शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी असणारी मुलगी आपलं भविष्य घडवू पाहत असते. पण आयुष्यातलं एक वळण तिच्या जीवनाचं सार वळणच बदलून टाकते यावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. या कथेच्या माध्यमातून लेखकाने ग्रामीण भागातील राजकारणाने उद्ध्वस्त होणारे शैक्षणिक जीवन वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रयागचे शिक्षण सुरू ठेऊन आशावादी दृष्टीकोण व्यक्त केला आहे.

**निष्कर्ष** -

१) आसाराम लोमटे यांची कथा मराठी कथेची कक्षा रुंदाविते.

२) आसाराम लोमटे यांची कथा ग्रामजीवनाशी एकरूप झाली आहे.

३) आसाराम लोमटे यांची कथा मराठी कथेला समृद्ध करते.

४) आसाराम लोमटे यांची कथा बहु आशयकेंद्री आहे. दीर्घकथेचा वापर कौशल्याने केला आहे.

५) आसाराम लोमटे यांची कथा कृषिजन्य व्यवस्थेतून प्रकट होते.

६) आलोक कथासंग्राहातील स्त्री पात्रे संघर्ष करतांना दिसतात. ग्रामीण स्त्रीयांचा मानसिक, सामाजिक व कौटुंबिक असा सर्वच पातळीवर संघर्ष सुरू असल्याचे दिसते.

७) कथेतील खलप्रवृतिकडेही आसाराम लोमटे यांचा माणुस म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन कथेला वेगळ्या उंचीवर नेतो.

८) ग्रामजीवनातील रसरसित वास्तवाचा अस्सल अनुभव आसाराम लोमटे यांच्या कथेतून वाचकाला मिळतो.

९) खेड्यातील ढासळत चालेल्या समूह भावनेचे चित्रण ही कथा करतांना दिसते.

१०) लोमटेंची मोजक्या शब्दात मोठा आशय व्यकत करण्याची शैली कथा आशयाला अधिक समृद्ध करते.

**संदर्भ -**

*व्यावहारिक मराठी- ल. रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन*
*पुस्तक परीक्षण- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्रीविद्या प्रकाशन पुणे.*
*व्यावहारिक मराठी-स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन.*

# समकालीन मराठी साहित्याचे स्वरूप आणि संकल्पना

**प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत**
*सहाय्यक प्राध्यापक, ( मराठी विभाग) श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी.*
*ता. बार्शी, जि. सोलापूर, महाराष्ट्र. ४१३४०१, मो. नंबर- ७५८८०२०२९०*
*ई-मेल - vishallingayat28@gmail.com*

**प्रस्तावना :-**

मराठी साहित्यात साधारणपणे १९६० नंतरच्या साहित्याला 'समकालीन' ही संज्ञा रुढ आहे. तत्पूर्वी अकराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतच्या कालखंडातील साहित्याला 'प्राचीन साहित्य' असे म्हटले जाते. इ. स. १८१८ मध्ये मराठी राज्याचा अस्त झाला व पुढे इंग्रजी राजवट सुरू झाली. तिथपासून १८८५ पर्यंतच्या काळाला 'अव्वल इंग्रजी कालखंड' असे म्हटले गेले ; तर १८८५ ते १९२० या कालखंडातील साहित्याला 'अर्वाचीन' किंवा 'आधुनिक साहित्य' असे म्हटले गेले. परंतु इ. स. १९२० पासून १९४५ पर्यंतचा कालखंड हा खऱ्या अर्थाने 'आधुनिक साहित्याचा काळ' म्हणून ओळखला जातो. कारण याच कालखंडात 'रविकिरण मंडळाचा उदय' झालेला दिसतो. त्यामुळे १८८५ ते १९२० आणि १९२० ते १९४५ हे दोनही कालखंड 'अर्वाचीन' अथवा 'आधुनिक साहित्याचे कालखंड' म्हणून ओळखले जातात. १९४५ पासून पुढच्या काळातल्या साहित्याला 'समकालीन साहित्य' असे म्हटले जाते. तसेच या काळातल्या साहित्याला 'नवसाहित्य' असेही संबोधले जाते. त्यामुळे १९४५ ते १९६० या कालखंडातल्या साहित्याचा 'नवसाहित्य' आणि १९६० नंतरच्या साहित्याचा 'साठोत्तरी कालखंड' म्हणजेच 'नवसाहित्योत्तर कालखंड' म्हणूनही हा काळ ओळखला जातो. म्हणजेच 'समकालीन साहित्य' असे या कालखंडाला म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

'समकालीन साहित्य' म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे, ज्या काळात ते निर्माण झाले त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे ; त्या काळातील विचार, जाणिवा, भावना, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य. हे साहित्य आपल्या काळाशी आणि त्या काळातील परिस्थितीशी जवळचे नाते सांगते. या काळात घडलेल्या घटनांचे पडसाद या साहित्यातून उमटतात. "स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण साहित्य धारेने सांस्कृतिक जे-जे परिवर्तन आहे, त्याचे जिवंत दर्शन मराठी समाजाला घडविले." १. मानवी कृती, मानवी स्वभाव, मानसिकता आणि मानवी वर्तन यातून ही संस्कृती घडली आहे. त्यातूनच वेगळ्या जाणिवा निर्माण होतात. वेगळ्या जाणिवांमधून वेगळे संवेदन आणि वेगळ्या संवेदनेतून वेगळे साहित्य निर्माण झाले आहे. जीवनाचे परिमाण वेगळे असल्याने साहित्यातून व्यक्त होणारे जीवनही वेगळेच आहे. 'समकालीन' हा कालवाचक शब्द आहे. सम म्हणजे समान, समांतर, आपल्यासोबत जे साहित्य असते, आपल्या काळासोबत असते, ज्या काळात ते निर्माण होत असते. त्या काळातील समाजाचे प्रतिबिंब त्यात पडलेले असते. त्या काळात ज्या घटना घडत असतात, ज्या विचारप्रणाली प्रभावी असतात, त्या काळातील

समाजाच्या लोकांची मानसिकता, जाणिवा, विचार, मते तयार झालेली असतात. त्यांचे चित्रण ज्या साहित्यातून घडते, त्याला 'समकालीन साहित्य' असे म्हटले जाते. एखाद्या विशिष्ट कालखंडामध्ये काही एक प्रमाणात समान जाणिवा, समान अनुभव, समान प्रेरणास्रोत, समांतर विचार, समान भाषाशैली, भाषा वैशिष्ट्ये, समान मूल्यांचा पुरस्कार करणारे, समान जीवनदृष्टी असलेले साहित्य निर्माण होऊ लागते. अनेक प्रकारचे लेखक, विचारवंत, साहित्यिक त्यात संख्यात्मकदृष्ट्या भर घालतात, तेव्हा त्या साहित्याचा प्रवाह निर्माण होतो. १९६० नंतरच्या कालखंडामध्ये दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, नवसाहित्य, नवसाहित्योत्तर साहित्य, असे साहित्याचे वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले. १९६० नंतरच्या दशकात स्त्रीवादी साहित्यही मोठ्या प्रमाणात जोमाने लिहिले गेले, जाणीवपूर्वक लिहिले जाऊ लागले. "स्त्रियांच्या म्हणून पुरुषांपासून वेगळ्या असलेल्या जाणिवा व्यक्त होण्यासाठी नवीन भाषा व नवीन वाङ्मयीन बंधाची, स्त्रीवादी साहित्याला गरज वाटते." २.

१९६० नंतरचे साहित्य हे खऱ्या अर्थाने 'समकालीन साहित्य' मानले जाते. साठोत्तरी कालखंडात जे दलित, स्त्रीवादी, आदिवासी, ग्रामीण साहित्य प्रवाह निर्माण झाले, ते आपल्या काळाशी आणि त्या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीशी जवळचे नाते सांगतात. १९६० ते १९८५ या कालखंडातील साहित्य हे 'समकालीन साहित्य' ठरते. कारण या साहित्यात १९६० नंतरच्या मानवी स्थित्यंतराचे पडसाद उमटलेले आढळतात. त्याचा प्रत्यय काही महत्त्वाच्या कादंबऱ्यांमधून आपल्याला येतो. या कादंबऱ्या १९६० नंतर लिहिल्या गेल्या म्हणून या कादंबऱ्यांना 'समकालीन कादंबरी' असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. जसे "उद्धव शेळके यांची 'धग'- १९६०, मनोहर तल्हार यांची 'माणूस' - १९६३, भाऊपाध्ये यांची 'डोंबाऱ्याचा खेळ' - १९६०, मनोहर शहाणे यांची 'देवाचा शब्द' - १९६८, ए. वि. जोशी यांची 'काळोखाचे अंग' - १९६६, प्रभाकर पेंढारकर यांची 'अरे संसार' - १९७१, किरण नगरकर यांची 'सात सक्कं त्रेचाळीस' - १९७४, अनंत कदम यांची 'किडे' - १९७१, दिनानाथ मनोहर यांची 'रोबो' - १९७६" ३.

१९६० ते १९८५ या काळातील सगळेच लेखन समकालीन आणि आधुनिक नाही, काही समकालीन आहे ; पण आधुनिक नाही, तर काही समकालीन देखील नाही. ते केवळ तात्कालिक स्वरूपाचे आणि मनोरंजनपर असे आहे. १९४५ ते १९६० आणि १९६० ते १९८५ या कालखंडात नवकथा, नवकविता, नवनाटक, नवकादंबरी, नव समीक्षा, लघु नियतकालिकांची चळवळ, दलित साहित्याची चळवळ, जन साहित्याची चळवळ, ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे साहित्य, मार्क्सवादी साहित्य, जनवादी साहित्य, देशी साहित्य या साहित्यप्रकारांविषयीचे नवे भान व नवे सामाजिक संदर्भ या कालखंडात आढळतात. म्हणून "आजची कादंबरी अधिकाधिक शहरी निसर्गापासून शक्यतो दूर होतांना दिसते." ४. ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या संदर्भात ज्या कथा, कविता, कादंबऱ्या लिहिल्या गेलेल्या आहेत, त्यामध्ये आपल्याला साठोत्तरी कालखंडातील ग्रामीण साहित्यातील शेतकरी, बारा बलुतेदार यांचे दारिद्य, त्यांच्यातील सामाजिक, आर्थिक पातळीवरील परस्परावलंबित्व, कृषी व्यवस्थेत काळानुसार होत गेलेले बदल, राजकारण, सहकार, शिक्षण यामुळे ग्रामीण भागात झालेले परिवर्तन इत्यादींचे वास्तव चित्रण या समकालीन साहित्य प्रवाहात आलेले दिसते. "ग्रामीण साहित्य म्हणून या साहित्याला जे वेगळेपण प्राप्त झाले, ते कसे, का व कोणत्या कारणांनी,

स्वरूपांनी प्राप्त झाले हेही समजून घेणे आवश्यक वाटते." ५. एकोणविसशे सत्तर ते ऐंशीच्या दशकानंतर स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह कथा, कविता, कादंबरी आणि आत्मचरित्र स्वरूपात जोमाने पुढे आला, विकसित होऊ लागला. "मलिका अमरशेख यांच्या काव्यातील प्रतिमासृष्टी तर स्त्रियांच्या कवितेला वेगळ्या वळणावर घेऊन आली आहे. त्यांनी मराठी कवयित्रींच्या कवितेतील भाषा नुसती बदलली नाही, तर त्यात प्रचंड उलथापालथ घडवून आणली आहे." ६. त्यामुळे मराठी साहित्याचे वर्गीकरण 'प्राचीन साहित्य' 'अर्वाचीन' किंवा 'आधुनिक साहित्य' आणि 'समकालीन साहित्य' असे तीन प्रकारात केले जाते. ज्ञानेश्वरांपासून ते केशवसुतांपर्यंतच्या काळाला 'प्राचीन साहित्य', केशवसुतांपासून ते मर्ढेकरांपर्यंतच्या काळाला 'अर्वाचीन' किंवा 'आधुनिक कालखंड' आणि मर्ढेकरांच्या नंतर आजपर्यंतच्या काळाला 'समकालीन साहित्याचा कालखंड' असे वर्गीकरण केल्यास ते चुकीचे ठरणार नाही. 'समकालीन' म्हणजे ज्या काळात साहित्य लिहिले जाते, त्या काळाचे वास्तव चित्रण असलेल्या साहित्याचा समावेश समकालीन साहित्यात करण्यात येतो. "कवयित्री नीरजा हिने द्रौपदी, पांचालीच्या दुःखातून स्वतःच्या शरीरालाच प्रश्नांकित करणारी भाषा वापरली आहे." ७.

१९६० च्या आसपासचा कालखंड हा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक दृष्टीने परिवर्तनाचा काळ आहे. कारण याच काळात इ. स. १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले धम्मचक्रप्रवर्तन, इ. स. १९६० मध्ये झालेली महाराष्ट्र राज्याची स्थापना, चीनमधील युवकांनी माओ-त्से-तुंग यांच्या नेतृत्वाखाली केलेली 'लालक्रांती' डॉ. आंबेडकरांच्या धम्मचक्रप्रवर्तनामुळे हजारो वर्ष मूक असलेल्या, उपेक्षितांचे जिणे जगत असलेल्या जातिप्रथेच्या आणि अस्पृश्यतेच्या, गुलामीच्या बेड्यांनी जखडलेल्या समाजात चेतना निर्माण झाली. सार्वत्रिक शिक्षणामुळे ग्रामीण आणि समाजाच्या खालच्या स्तरावरचा समजला जाणारा वर्ग लिहू लागला, वाचू लागला. सामाजिक स्तरावरील कोंडमारा साहित्यातून व्यक्त होऊ लागला. दलित साहित्याच्या चळवळीचा उगमही याच कालखंडात झालेला दिसतो. "आमच्या आयुष्याच्या नाक्यानाक्यावर, वासूगिरी करणारे तुमचे लंपट शब्द, इथल्या प्रत्येक आईचा पदर, असंख्य जळवांनी भरलेला." ८. दुसऱ्या महायुद्धानंतर जो प्रचंड नरसंहार झाला, त्याने सगळे जगच हादरून गेले. मानवी जीवन आणि माणसाची प्रगती धोक्यात आली. दुसऱ्या महायुद्धानंतर मूल्यांची जी पडझड झाली ; त्यामुळे लेखक, साहित्यिक, विचारवंत अस्वस्थ झाले होते. सगळेच जीवनसंदर्भ बदलले होते ; म्हणून या कालखंडातील संवेदनशील लेखकाला, साहित्यिकाला नवे आत्मभान प्राप्त झाले. या कालखंडातील काही लेखकांचा संदर्भ घेतल्यास त्याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. मर्ढेकरांनी अर्थशून्य, आशयहीन जीवनाचे चित्र तर रेखाटले ; पण काव्य भाषेचे रूपही बदलून टाकले. काव्याचे विषय, काव्याची रचना, काव्यातील प्रतिमा आणि काव्याची भाषा याविषयीचे रूढ संकेत बदलून टाकले. नवकाव्याचे हे स्वरूप अनेक कवींना पुढे प्रेरक ठरले. शरदचंद्र मुक्तिबोध यांनी तर मार्क्सवादी विचारधारेतील आशयात आपल्या कवितेचे द्रव्य शोधले. "भांडवलशाहीतून परिणत झालेला वर्गलढा आणि लैंगिक श्रम विभागणीतून झालेली स्त्री-पुरुष विषमतेची परिणती यांची सांगड यातून मार्क्सवादी स्त्रीवादाची मांडणी केली जाते." ९.

मर्ढेकर, मुक्तिबोधांप्रमाणेच कथेच्या क्षेत्रात आधुनिकवादाचा पाया गंगाधर गाडगीळ यांनी घातला. त्यांनी नव्या जाणिवेची, नव्या आशावादाची कथा तर लिहिलीच ; पण नव्या कथेची भूमिका ठामपणे मांडली. माणसाचे क्षुद्रत्व ते जसे रंगवतात ; तसेच अशाश्वती, अस्थिरता, धास्ती भयाकुलता इत्यादी विकारांनी ग्रस्त झालेल्या जीवनाचा अन्वयार्थही लावतात. गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे, गोखले, माडगूळकर यांनी जोपासलेल्या नव्या कथेची विविध रूपे वाचकांना जाणवली. या नवकथेच्या रूपापेक्षा वेगळे रूप जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेचे होते. त्यांच्या कथेचा आशय मानवी जीवनाचे शोकात्म भान व्यक्त करणारा आहे, त्यामुळे मराठी कथेचा कायापालट झाला आणि जीवनाच्या विविध स्तरांचे, अंगांचे चित्रण यासारख्या कथांमधून पुढे आले. "मानवी कृती, मानवी स्वभाव, मानसिकता आणि मानवी वर्तन यातून ही संस्कृती घडली आहे. त्यातूनच वेगळ्या जाणिवा निर्माण होतात वेगळ्या जाणिवांमधून वेगळ्या संवेदना आणि वेगळ्या संवेदनेतून वेगळे साहित्य निर्माण झाले आहे. जीवनाचे परिमाण वेगळे असल्याने साहित्यातून व्यक्त होणारे जीवनही वेगळेच आहे." १०.

ग्रामीण जीवन वास्तव खऱ्या अर्थाने वाङमयीन पातळीवर आणण्याचे काम काही मोजक्याच लेखकांनी केलेले दिसते. त्यात प्रामुख्याने वि. स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, रामतनय यांच्या कथा, सुखटणकर यांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या कथासंग्रहातील आठ कथा, लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या 'कल्पवृक्षाच्या छायेत', 'सागराच्या लाटा', 'वादळातील नौका', 'ढासळलेले बुरुज' इत्यादी कथासंग्रह खऱ्या अर्थाने ग्रामीण - प्रादेशिक जीवन वास्तवाचा प्रथम अविष्कार मांडतात. वरील काही मोजक्या लेखकांचे साहित्य हे ग्रामजीवनाचे, प्रदेश-विशेषांचे, तेथील रूढी परंपरांचे, निसर्गनिष्ठ जीवनाचे दर्शन घडविणारे अशा प्रामाणिक हेतूने लिहिलेले दिसते. सुखटणकर यांच्या कथेतील देवदासींच्या चाळीचे चित्रण, त्यांची कुचंबणा, गावागावातील हेवेदावे, वैर, वाद-विवाद, तंटे सामान्य गावकरी, श्रीमंत शेतकरी, सावकार, पुजारी, वतनदार यांच्यातील भांडणे त्यातून गावाच्या समृद्धीची, शेतीची होणारी नासाडी धार्मिकतेचे प्रभावी खूळ, अंधश्रद्धा, खेड्याची विस्कटलेली अवस्था, लाचारी, संस्कारांपासून दूर जाणारे तरुण इ. विशेषांचे वास्तव चित्रण प्रभावी व सविस्तरपणे आलेले दिसते. इतक्या बारकाव्यांसह ग्रामीण जीवन विश्वातील समाजाचे चित्रण यापूर्वी मराठी साहित्यात आलेले दिसत नाही. "कृषी जीवन हे मूलतःच कृषीशी, भूमीशी घट्ट बांधलेले असल्याने दलितां प्रमाणे किंवा ब्राह्मणांप्रमाणे शेतकऱ्यांना खेड्यातून बाहेर पडणे शक्य नव्हते." ११ याचा अर्थ असा की ग्रामीण या संज्ञेने ध्वनित होणारा अर्थ आता वेगळ्याच अंगाने विचारात घेतला जातो आहे. ग्रामीण साहित्य म्हणजे केवळ ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणे येथे अभिप्रेत नाही ; तर या 'वास्तवामागचे वास्तव' चित्रित करणे हे आता महत्त्वाचे झाले आहे. म्हणूनच ग्रामीण चळवळीनंतर येणारे लेखन साहित्य हे अनेक अर्थाने वेगळे झालेले पाहावयास मिळते. ग्रामीण साहित्याच्या चळवळीनंतर एक मोठी लेखकांची पिढी आकाराला आलेली दिसते. आज लिहिणारे ग्रामीण लेखक हे ग्रामीण जीवनाचे वेगवेगळ्या अंगांनी चित्रण करतांना दिसतात. त्यात प्रामुख्याने नाव घेता येण्यासारखे जे काही महत्त्वाचे लेखक आहेत, त्यात वासुदेव मुलाटे, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, भास्कर चंदनशिव, श्रीराम गुंदेकर, श्रीकांत देशमुख, विठ्ठल वाघ, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे, रवींद्र शोभणे, मोहन पाटील, शेषराव मोहिते, तानाजीराव पाटील इ. असे

कितीतरी ग्रामीण लेखक, कवी आज लिहीत आहेत. या लेखकांचे लेखन एकूण परंपरांचा आणि समाजव्यवस्थेचा अर्थ शोधू पाहत आहे. १९७५ नंतरच्या लेखकांमध्ये भास्कर चंदनशिव हे एक महत्त्वाचे लेखक आहेत. शेतीचे दहा दिशांनी होणारे शोषण ते एक जीवनदृष्टी घेऊन प्रकट करतात. म्हणूनच त्यांच्या कथांमधून ग्राम विद्रोहाची जाणीव दिसते. तसेच ग्रामीण भागातील दलित - दलितेतर ताणतणावांचे चित्रणही येते. यादृष्टीने त्यांची 'पाणी' ही कथा अतिशय अर्थवाही स्वरूपाची झाली आहे. तसेच त्यांची 'लाल चिखल' सारखी कथा यासंदर्भात पाहता येईल. 'अंगार माती', 'बिरडं', 'नवी वारूळं' हे त्यांचे कथासंग्रह जीवनाचा एक नवा वेगळाच अर्थ उलगडून दाखवतात. त्यामुळे या सर्व साहित्याच्या नवीन प्रवाहाला 'समकालीन साहित्य' असे म्हटले गेले तर ते चुकीचे ठरत नाही.

**संदर्भ टीपा :-**


1) *प्रा. रा. ग. जाधव, 'मराठी वाङ्मय : स्वातंत्र्योत्तर संदर्भ', प्रतिमा प्रकाशन - पुणे १९९८, प्र. आ., पृ.- २६*
2) *प्रा. लिंबाळे शरणकुमार, 'साठोत्तरी मराठी साहित्यातील प्रवाह', दिलीपराज प्रकाशन- पुणे, २००७, प्र.आ., पृ.- १५२*
3) *प्रा. गो. मा. पवार / म. द. हातकणंगलेकर, 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप', (१९५०- १९७५), पॉप्युलर प्रकाशन - मुंबई, १९०७, प्र.आ. पृ.- ४४*
4) *प्रा. सु. श्री. पांढरीपाडे, 'साहित्य : स्वरूप संदर्भ आणि सौंदर्य', प्रतिमा प्रकाशन- पुणे, १९८५, प्र.आ., पृ.- २९*
5) *डॉ. यशवंते राजीव, 'ग्रामीण साहित्य चळवळ : प्रेरणा व स्वरूप', स्वरूप प्रकाशन - औरंगाबाद, प्र.आ., पृ.-१२*
6) *सरकटे सदाशिव, '१९८० नंतरची स्त्रीवादी कविता', चिन्मय प्रकाशन - औरंगाबाद, २०११, प्र.आ., पृ.- १०६*
7) *प्रा. लिंबाळे शरणकुमार, उ. नि. -२, पृ.-१७०*
8) *प्रा. रा. ग. जाधव (संपा), 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड सातवा, भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद - पुणे, २००९, प्र.आ., पृ.-२६८*
9) *जाधव मनोहर (संपा), 'समीक्षेतील नव्या संकल्पना', स्वरूप प्रकाशन - औरंगाबाद, २००१, प्र.आ., पृ.- १२९*
10) *डॉ. लुलेकर प्रल्हाद, 'साहित्याचे वर्तन आणि वर्तमान', साकेत प्रकाशन - औरंगाबाद, २००८, प्र.आ., पृ.- ८*
11) *प्रा. रा. ग. जाधव, उ. नि. १, पृ. – २७*

# आदिवासी आत्मकथने स्वरूप व आकलन

**डॉ. विठ्ठल केदारी**

*मराठी विभाग सहायक प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड-431517*

*ई-मेल: kedarivitthal@gmail.com मो.नं. 9604670208*

मराठी साहित्यात 1960 पासून विविध साहित्यप्रवाह निर्माण झाले. या साहित्य प्रवाहामुळे समाजातील वेगवेगळे स्तर बोलायला लागले. अभिव्यक्ती करण्याचे उत्तम साधन 'साहित्य' आहे. साहित्यातून माणसाने आपापले जीवनानुभव सांगायला सुरूवात केली. प्रत्येकाला जीवनात जगताना विविध स्वरूपाचे अनुभव येत असतात. यातूनच प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्व घडत असते. आपल्या समाज व्यवस्थेत समाजाची रचना उतरंडीच्या स्वरूपाची आहे. उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य अशा स्वरूपाची आपली समाजव्यवस्था आहे. माणसाचा संबंध समाजातील सर्व स्तरांतील आपली समाजव्यवस्था आहे. माणसाचा संबंध समाजातील सर्व स्तरांतील लोकांशी येत असतो. त्याकडून विविध प्रकारचे अनुभवही माणसाला येतात. ते अनुभव बहुतांशी चांगले असतात. परंतु ज्या ज्या वेळी माणसाला वाईट स्वरूपाचे अनुभवही येतात त्यावेळी तेथे आपल्याला व्यक्तीची मानसिक विकृती पाहायला मिळते. समाजातील या विविध स्तरांतील लोकांशी संपर्क आल्यानेच लेखकाची, स्वभावप्रकृती बनलेली असते.

मराठी साहित्यविश्वात आदिवासी साहित्याची निर्मिती आपणाला कविता, कादंबरी, कथा, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन इ. साहित्य प्रकारात झालेली दिसते. परंतु या सर्व साहित्यप्रकारांतील रचना वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. आदिवासी साहित्यात आत्मकथन स्वरूपात नजुबाई गावित यांचे 'आदोर' (1995) हे पुस्तक आले. आदिवासी आत्मकथन म्हणून 'आदोर' या पुस्तकास प्रथम आत्मकथनाचा मान दिला जातो. आज आदिवासी साहित्यामध्ये बाबाराव मडावी यांचे 'आकांत' व किसन दामोदर डगळे यांचे 'ठिगळ' (2008) ही आत्मकथने निर्माण झालेली दिसून येतात. श्रीमती नजुबाई गावित यांनी आपल्या समाजासाठी कार्य केले व शरद पाटील यांच्यासोबत विविध आंदोलनांमध्ये सहभाग घेतला होता. त्या वेळचा त्यांचा अनुभव त्यांनी नोंदविला आहे. बाबाराव मडावी यांनी 'आकांत'मधून आपल्या शिक्षणासाठी समाजातल्या विविध व्यक्तींचे सहकार्य कसे लाभले, तसेच प्रस्थापित समाजाचा आदिवासी समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे. याबद्दल जे विविध अनुभव आले त्या अनुभवांना मडावी यांनी मुखर केले आहे. 'ठिगळ' या आत्मकथनातून श्री. किसन दामोदर डगळे यांनी नाशिक जिल्ह्यातील महादेव कोळी समाजाची स्थिती वर्णन केली आहे. पोटासाठी संघर्ष, शिक्षणासाठी संघर्ष, अशा परिस्थितीतून शिक्षण घेऊन किसन डगळे या तरूणाने रेल्वेत 'खलाशी' ते 'विक्रीकर अधिकार गट-अ' प्रवासाचे खडतर वर्णन केले आहे.

## 1. आदोर

नजुबाई गावित यांचे 'आदोर' हे आत्मकथन (1995) मध्ये प्रकाशित झाले. 'आदोर' बरोबरच त्यांची विशेष वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली 'तृष्णा' ही कादंबरी होय. नजुबाई गावित या धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील बोढरीपाडा या पाड्यावरील होय. या पाड्यावरील आदिवासी समाजाच्या स्थितीचे वर्णन करताना लेखिका म्हणतात की, अशा हे पात्र माझं प्रतिनिधित्व करते. 'मावची' व 'भिल्ल' या आदिवासी जमातींच्या समाजस्थितीचे चित्रण गावित यांनी 'आदोर'मध्ये केले आहे. परंपरेने जंगलाची जपणूक करणारा, राखण करणारा हा समाज आहे. त्या बदल्यात या माणसाला काहीही दिले जात नाही. येथील लोकांची उदरनिर्वाहाची साधनेही जंगलावरच अवलंबून असतात. त्यातूनच त्यांच्या गरजा भागविल्या जातात. सरकारने दारूबंदीचा कायदा केला आणि दारूबंदीच्या नावाखाली आदिवासींकडून महुची व टोळंबी या वृक्षांची तोड करवून घेतली. यांवर या लोकांचे व्यवसाय अवलंबून होते. उदा. महुची फुले गोळा करणे व टोळंबी या झाडापासून टोळंबीचे तेल काढणे हे या लोकांचे प्रमुख व्यवसाय होते, ते बुडाले. यामुळे या लोकांवर पोटाची खळगी भरण्यासाठी वणवण भटकायची वेळ आली.

गावित यांनी 'आदोर' हे आपले आत्मकथन लिहीत असताना तत्कालीन परिस्थितीचे चित्रण केले आहे. त्यामुळे स्थळ, काल व परिस्थिती या घटकांची त्रिमिती साधली आहे. पहिल्या महायुध्दानंतर जी प्लेगची साथ आली होती, त्यामध्ये माणसे पटापट मरत होती, असे आत्मकथनात गावित यांनी म्हटले आहे. शेतींची अवजारे, बैल, बी-बियाणे इ. चे वर्णनही येते. दारिद्रयावस्थेत जीवन जगणा-या या समाजातील कुटुंबव्यवस्था, चालीरीती, प्रथा, परंपरा, समाज याविषयी लेखिका आत्मकथनातून प्रकाश टाकताना दिसतात.

आदिवासी समाजजीवनाचा विचार करता ते खडतर स्वरूपाचे आहे. या आदिवासींना सतत अन्याय, अत्याचार, शोषण, पिवळणूक, फसवणूक, छळ यांना सामोरे जावे लागते. प्रशासन व्यवस्था ही तर आदिवासींचे आर्थिक, राजकीय व सामाजिक या प्रकारे शोषण करताना दिसते. दारिद्रयावस्थेत जीवन जगणा-या माणसाच्या उन्नतीकडे कोणीही फारसे लक्ष देत नाही. आदिवासींना शिक्षण मिळावे यासाठी आदिवासी भागात नेमलेले शिक्षकही थोड्याच दिवसांत बदली करवून घेऊन कसे पळून जातात याचे चित्रण वैशिष्ट्यपूर्ण केले आहे. आदिवासी समाजाबद्दलची सुशिक्षित समूहांमध्ये असलेली न्यूनगंडताही येथे पाहायला मिळते.

एकंदरीतच परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून नजुबाई गावित यांनी कार्य करण्यास सुरूवात केली. त्या आदिवासी समाजातून पुढे आलेल्या पहिल्या महिला कार्यकर्त्या आहेत. परिवर्तनवादी विचारसरणी, शोषणविरोधी बोलण्याची भाषा असलेले नजुबाई गावित यांचे व्यक्तिमत्व आदोरमध्ये पाहायला मिळते.

## 2. आकांत

'परधान' या आदिवासी जमातीत जन्मलेल्या बाबाराव मडावी यांनी 'आकांत' हे आत्मकथन लिहिले आहे. चळवळीत केलेले कार्य आणि गरिबीचे व दारिद्रयाचे चटके सहन करत जगणा-या समाजाचे जीवनचित्रण बाबाराव मडावी यांनी केले आहे. 'आकांत' या आत्मकथनाविषयी डॉ. यशवंत मनोहर यांनी आंबेडकरवादी मराठी साहित्य या ग्रंथात म्हटले आहे, मूळ निवाशांच्या यातनांचे अंतर्मुख करणारे ज्वलंत चित्रण यात असून आदिवासी जीवनाची घुसमट यातून दिसते. बाबाराव मडावी यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेतांना त्यांना विविध प्रकारचे मित्र भेटले. त्यांत काही गरीब होते. काही श्रीमंत होते. त्यांच्यातील परस्पर सहकार्याच्या भावनेमुळेच लेखकाला आपले शिक्षण पूर्ण करता आले. आई सतत आजारी असल्याने घरातील सर्व कामे लेखक व त्याचा भाऊ माधव यांना करावी लागत होती. याबरोबरच दोन पैसे मिळविण्यासाठी लेखक खंतीच्या कामावर जात असे. याविषयी गावातील लोकांच्या विविध प्रतिक्रिया येत होत्या. लोक म्हणत, ''बाबा, तू एवढा अन् खंती खोदतं का रं?'' लेखक म्हणतो की, ''आपली शिक्षणव्यवस्था माणसाला बेकार आणि बरबाद करणारी आहे. सुशिक्षिताला कामधंदा मिळण्याइतपत ती सक्षम नाही.'' लेखकाचे ज्या वेळी कॉलेज सुरू होते त्या वेळी एक मुलगी लेखकावर प्रेम करत होती. तिने लेखकाला चिठ्ठीही दिली होती. लेखक म्हणतात की, ''दारिद्रयाचे चटके सहन करताना मुलीवर प्रेम करणं मला जमलेच नाही.'' जीवनात भौतिक सुखांत न रमणारा किंबहुना त्याला महत्व न देणारे लेखक पाहायला मिळतात. लेखक कॉलेज जीवनापासून चळवळीत काम करत होते. चळवळीत काम करत असल्याने त्यांना जवळजवळ सर्व महाराष्ट्राचा परिचय झाला होता. ज्यावेळी लेखक महाराष्ट्रभर फिरत होते. त्यावेळी लेखकाला असे दिसले की, खूप माणसे ही अडाणी, अज्ञानी, अंधश्रध्दाळू व दारिद्रयात जीवन जगणारी आहेत. आपल्या शेतात विहिरीला पाणी लागावे म्हणून माणसाचाच बळी देणारे लोक व बळी माणसाच्या रक्ताचे खिळे शेतात टोचावे. त्यामुळे पाणी येते असा समज चंद्रपूर जिल्हयातील भामरागड येथील आदिवासींमध्ये आहे.

आदिवासी समाजाची वस्ती जंगलाच्या आश्रयानेच असलेली आढळून येते. त्यामुळे आदिवासी आणि जंगल यांचा अतूट असा संबंध असल्याचे दिसते. त्यांची उदरनिर्वाहाची साधने ही जंगलावरच अवलंबून असतात. वनखात्याने वनांविषयी कडक भूमिका घेऊन, विविध कायदे करून जंगलाच्या राजाला जंगलाचा मेवा खायला शासनातर्फे बंदी घातली आहे. तरीही आदिवासी समाज दुःखातही सण साजरे करतात, नाचतात. आपली तहान-भूक विसरून आदिवासी आनंद साजरा करतात. लेखक म्हणतो, जी भूक घेऊन मी जन्माला आलो तीच भूक व दारिद्रय मला माझ्या समाजात पाहायला मिळते. त्यामुळे आकांमध्ये लेखकाने जी व्यथा मांडली आहे ती व्यथा केवळ लेखकाचीच राहात नाही तर ती संपूर्ण आदिवासी समाजाची व्यथा बनते. आकांतच्या मनोगतात लेखकाने म्हटले आहे. ''माझं हे पुस्तक नसून कष्ट करणा-या जीवनाचं पान आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने मला खूप खूप रडता आलं. रडतानाच त्यांच्यासाठी आक्रोश करता आला.'' भूमिका लेखक आकांतमध्ये मांडत आहेत.

मडावी यांनी आत्मकथनाबरोबरच 'स्वप्नभंग', 'दुःखी' ही, दोन नाटके लिहिली आहेत. आदिवासी समाजाच्या व्यथा-वेदना समजण्यासाठी आपल्या समाजात स्वतःच्या भाषेतून, मनोरंजनाच्या साधनांतून सांगितले तर ते अधिक चांगल्या प्रकारे समजेल म्हणून त्यांनी नाटकासारखा वाङ्मयप्रकारही हाताळला आहे. अन्याय, अत्याचार, शोषण, पिळवणूक यांची जाणीव करून देण्यासाठी लेखकाने विविध प्रकारे लेखन केलेले आहे.

**3. ठिगळ**

नाशिक जिल्हयातील आदिवासी समाजाची जीवन जगण्याची शैली, आदिवासींच्या परंपरा, सण, उत्सव यांची माहिती लेखकाने 'ठिगळ'मधून चित्रित केलेली आहे. श्री. किसन दामोदर डगळे यांनी अनुभव कथनासाठी वापरलेली सहज, साधी व सोपी भाषा वाचकाला खिळवून ठेवते आहे. लेखकाने अनुभवांची मांडणी प्रांजळपणे केलेली आहे. आपले कटू-गोड अनुभव लेखक चिमटीत पकडून त्यांना वाचकाच्या समोर ठेवतो आहे. आपल्या आयुष्यातील महत्वाच्या टप्प्यावर लेखकाला विविध स्वभावाच्या व्यक्ती भेटत गेल्या. त्यांच्याकडून लेखकाला मिळालेली प्रेरणा जीवनात भरारी घेण्यासाठी कारणीभूत ठरली. म्हणूनच लेखक विक्रीकर अधिकारी गट-अ या पदावर असलेला दिसतो.

श्री. किसन दामोदर डगळे या आदिवासी समाजातील तरूणाने आपल्या कुटुंबातील ज्या ज्या व्यक्तींचे सहकार्य लाभले त्या सर्वांवर लेखकाने आत्मकथनातून प्रकाश टाकला आहे. नाशिक जिल्हयातील विविध देव-देवतांचे उत्सव, त्या उत्सवासाठी जाण्याची विविध साधने व प्रवासात येणा-या गमतीजमती लेखक मनमोकळेपणाने मांडतो आहे. लेखक शिक्षण घेऊन नोकरीला लागले. परंतू ते आपल्या कुटुंब, शेती, समाज, जाती यापासून जराही दरावत नाहीत. 'ठिगळ' आत्मकथनाविषयी पत्रकार व लेखक अशोक बेंडकुळे म्हणतात, ''सिन्नर तालुक्यातील सोनांबेगावच्या किसन दामोदर डगळे या महादेव कोळी समाजातील तरूणाचे हे रोचक आत्मकथन, पंचेचाळिशीपर्यंतचे आलेले जीवनानुभव 'ठिगळ'मध्ये मांडले आहेत. या वाटचालीत सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक या दृष्टीने लेखकाने बरेच कार्य करून आपल्या समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे.'' नवशिक्षित आदिवासी समाजातील तरूणांना प्रेरणा देण्यासाठी लेखकाने कार्यकत्र्यांच्या मदतीने विविध परिषदा, मेळावे, व्याख्याने व सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. आपल्या समाजाच्या विकासासाठी, उद्बोधनासाठी लेखक पुढाकार घेतना दिसतो आहे. आधुनिक काळात शिक्षण घेणा-या आदिवासी युवकांना प्रेरणादायी असे 'ठिगळ' हे आत्मकथन महत्वाची भूमिका निभावते आहे.

एकूणच आदिवासी साहित्यामध्ये आत्मकथन हा वाङ्मयप्रकार फारसा हाताळलेला दिसत नाही. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून खूप दूर असलेला, अक्षर ओळख नसलेला, आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगाचा परिचय नसलेला आदिवासी समाज आहे. तो नवशिक्षित आदिवासी तरूणांच्या रूपाने या प्रवाहाकडे येण्याचा प्रयत्न करतो आहे. जंगलात, द-या-खो-या, कड्या-कपा-यात राहणा-या या समाजाची मूळ प्रवाहात

येण्याची ही धडपड आहे. या प्रक्रियेच्या वेगाची गती मंद स्वरूपाची आहे. परंतु प्रस्थापित साहित्यविश्वामध्ये आलेला हा साहित्यप्रवाह वाङ्मय व्यवहारात रूढ झाला आहे.

ज्या आदिवासी तरूणांनी शिक्षण घेतले त्यांनी आपल्या स्वतःच्या परिस्थितीविषयी, आपल्या समाजाच्या अवस्थेविषयी विचार करायला सुरूवात केली. आपल्या समाजाच्या व्यथा, वेदना मांडण्यासाठी साहित्य हे माध्यम त्यांनी वापरले आहे. आजपर्यंत साहित्यात आदिवासी जीवन आले नव्हते. जे आले होते ते बिगर आदिवासींनी लिहिलेले साहित्य होते. आदिवासींनी म्हणून जे भोगले, जगले, अनुभवले ते साहित्यात उतरताना आंतरिक तळमळीतून उतरलेले असते. ज्या जीवन विश्वाची प्रस्थापित साहित्य व्यवहाराला माहिती नव्हती. त्या जीवनचित्रणाने नवीन जीवनाचे परिचितीकरण करून देण्याचे कार्य केले आहे. आदिवासी युवकांनी पुन्हा एकदा आपल्या भूतकाळाला साहित्याच्या रूपाने समाजासमोर ठेवले आहे.

**संदर्भः-**


1. *गावित नजुबाई, आदोर, आदिवासी दुनियेतलं जीवननाट्य, पृष्ठ क्र. 04*
2. *मडावी बाबाराव, आकांत, प्रियंका प्रकाशन, यवतमाळ, पृष्ठ क्र. 09*
3. *तत्रैव, पृष्ठ क्र. 32*

# समकालीन मराठी दलित कविता

**डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे**
*सहायक प्राध्यापक, मशिसे–गट अ, महाराष्ट्र शासनाचे इस्माईल युसूफ महाविदयालय*
*मुंबई – ४०००६०. ७७९८१७७४७३.*

‘दलित साहित्य’ हा मराठी साहित्यातील महत्वाचा प्रवाह आहे. दलित साहित्यामध्ये कविता, कथा, आत्मकथन, कादंबरी आणि नाटक हे सर्वच रचनाप्रकार रूजले गेले असले तरी कविता आणि आत्मकथन या दोन साहित्यप्रकारातून दलित साहित्य व्यापकरित्या आविष्कृत झाले आहे. दलित साहित्य अलीकडे विपुल प्रमाणात लिहिले जात नाही ते आवर्तात सापडले आहे. असा एक मत प्रवाह पुढे आला.तद्वतच ‘दलित साहित्य’ या संकल्पनेच्या संदर्भात मतमतांतरे मांडली गेली. दलित लेखक–कवींची मुख्य प्रेरणा ही आंबेडकरांचे विचारच आहे, असे काही अभ्यासक हिरारीने मते मांडू लागली. याच विधानाचा आधार घेऊन दलित साहित्याला आंबेडकरवादी साहित्य असे म्हणावे असे यशवंत मनोहरांसारखे समीक्षक ठाम भूमिका मांडू लागले तर राजा ढाले, वामन नंबाळकर यांनी फुले–आंबेडकरी साहित्य ही संकल्पना स्वीकारली. टेक्सास गायकवाड (प्रबुध्द साहित्य) गंगाधर पानतावणे (दलित साहित्य) इ. साक्षेपी समीक्षक बाळकृष्ण कवठेकर यांनी मात्र रोखठोक भूमिका मांडली ते म्हणतात, ‘‘दलित साहित्याने आंबेडकरवादी असावे की मार्क्सवादी असावे याबाबत अलीकडेच दलित साहित्यिकांनी वाद निर्माण केला आहे. साहित्याने कोणत्याही वादाशी बांधिलकी पत्करणे योग्य नव्हे; कारण त्यामुळे साचेबंद, वास्तवविन्मुख, झापडबंद आणि आडाखेवजा साहित्याचे उत्पादन होऊ लागते असा अनुभव आहे[१] प्रस्तुत भूमिका ही बाळकृष्ण कवठेकरांची आहे. मात्र आजमितीला समकालीन मराठी साहित्यप्रवाहात ‘आंबेडकरी साहित्य’ अशी संकल्पना ‘दलित’ साहित्याच्या अनुषंगाने रूजत आहे किंबहुना ‘दलित साहित्य’ या संकल्पनेचा पर्याय म्हणून पुढे येत आहे.

दलित कवितेच्या रुपाने दलित साहित्य किंबहूना मराठी साहित्याचा एकूणच परीघ विस्तारला गेला. दलित कवितेचा एक नवा कालखंड सुरु झाला. या संदर्भात नारायण सुर्वे लिहितात ‘‘दलित साहित्यातील प्रमुख व प्रभावी अभिव्यक्ती दलित कविताच आहे व तिचीच अधिक चर्चा होत राहिलेली आहे, होत राहणार आहे. मराठी कवितेला एक मौल्यवान लेणेच लाभलेले आहे. हया कवितेचा मूलस्त्रोत, तिची भाषा व आशय, तिची अंगभूत लय आणि शब्दकळा, एकूण मराठी काव्यातील तिचे स्थान व भवितव्य आदि सर्वच संभवनीयतेचा विचार होतच राहणार आहे[२]’’

साधारणपणे 'दलित' या संकल्पनेचा १९५६ नंतर सर्रासपणे वापर होऊ लागला. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी दलित संकल्पनेविषयी ''दलित हा मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला आणि मागे रेटलेला सामाजिक वर्ग आहे[३]'' असे म्हटले आहे. याला ऐतिहासिक संदर्भ आहेत. दलित साहित्याचे अभ्यासक भालचंद्र फडके म्हणतात '' दलित या पदाची मीमांसा जो जो आपल्या परीने करीत असला तरी 'दलित' शब्द जातीवाचक नाही किंवा तो मूल्यवाचक नाही. अनेक शतकानंतर ज्यांना आपले स्वत्व गवसले, बाबासाहेबांच्या मुक्तीच्या लढयातून ज्यांना अस्मिता लाभली त्या स्तरातील लेखनाचा वेगळेपणा दलित पदातून व्यक्त होतो[४]'' तुर्तास प्रस्तुत लेखात 'दलित कविता' हाच शब्दप्रयोग केला आहे.

दलित कवितेचे प्रवर्तक असलेले बाबुराव बागूल यांची 'वेदा आधी तू होतास' मधून ही कविता संग्रहरुपात २००४ प्रसिद्ध झाली. परंतु तत्पूर्वी १९६८ ला 'फक्त' नावाच्या नियतकालिकामधून 'विद्रोहाची कविता' म्हणून त्यांच्या पंधरा कविता प्रकाशित झाल्या होत्या. 'आकार' या नियतकालिकामध्येही काही कविता प्रकाशित झाल्या होत्या, त्यांच्या कवितेतून मानसाचे श्रेष्ठत्व व्यक्त झाले आहे. डॉ. यशवंत मनोहर हे बाबुराव बागूल यांना आंबेडकरवादी कवितेचे प्रवर्तक मानतात ते म्हणतात. ''बाबुराव बागूल हे आंबेडकरवादी कवितेचे प्रवर्तक आहेत. आंबेडकरवादी कवितेचे महाव्दार प्रकाशाच्या दिशेने आणि सूर्याच्या ध्येयाने त्यांनी उघडून दिले. मित्र कोण ? शत्रू कोण ? काय नाकारायचे, काय स्वीकारायचे आपले तत्वज्ञान कोणते आणि आपल्याला शोषणाच्या हवाली करणारी तत्वज्ञाने कोणती ? या सर्वच प्रश्नांच्या संदर्भात बाबुराव बागूल हे आंबेडकरी दर्शनसूत्रांचा एकनिष्ठपणे पाठपुरावा करतात[५]'' खरी दलित कविता व्यापकपणे अविष्कृत झाली ती नामदेव ढसाळांच्या रुपाने. 'आंबेडकरवादी' साहित्यामध्ये भरपूर लिहिला गेलेला साहित्यप्रकार म्हणजे 'कविता' हा होय. आंबेडकरवादी कवितेचा विचार मुख्यत्वे नामदेव ढसाळ यांच्या कवितेपासून करावा लागतो. नामदेव ढसाळ हे आंबेडकरी कवितेच्या बीजस्थानी जसे आहेत, तसेच ते अगदी निर्विवादपणे शीर्षस्थानी देखील आहेत. केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळे, यशवंत मनोहर, दया पवार, अर्जुन डांगळे, वामन निंबाळकर, प्रल्हाद चेंदवणकर, ज.वि.पवार, माधव कोंडविलकर, भीमसेन देठे, नरेशकुमार इंगळे, हिरा बनसोडे, अरुण काळे इत्यादी कवी कवयित्रींनी दलित कवितेचे दालन समृध्द केले. दलित कविता ही स्वातंज्र्य, समता, बंधुता व न्याय हया जीवनमूल्यांचा हिरारीने पुरस्कार करते. प्रस्तुत मूल्य स्वीकारत वर्षानुवर्षे निद्रित अवस्थेत असलेल्या दलित समाजाला या कवितेने नवचैतन्य दिले आहे; जागृत केले आहे.

नामदेव ढसाळांचा 'गोलपीठा' हा काव्यसंग्रह १९७२ मध्ये प्रकाशित झाला. आणि त्यातुन ख—या अर्थाने दलित समाजाचे वास्तव जगासमोर आले. नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील जीवन हे दैन्य, दास्य, दारिद्रय, अस्पृश्यता, वेठबिगारी, विषमता, यांना सर्वांगाने

कवेत घेते. बा.सी.मर्ढेकर आणि नारायण सुर्वे या दोन कवींनंतर बकाल अशा मुंबई महानगरीचे वास्तव चित्रण नामदेव ढसाळ आपल्या कवितेतून करतात. या संदर्भात प्रज्ञा लोखंडे म्हणतात ''प्रियदर्शनी नंतरच्या आणि या सत्तेत...... आधीच्या तुही इयत्ता कंची (१९८९) खेळ (१९८३) गांडू बगीचा (१९८६) या तीन संग्रहात नामदेव ढसाळांची कविता संपन्न होत गेली खरी परंतु 'गोलपीठा', 'मुर्ख म्हाता—याने डोंगर हलविले' आणि 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र: प्रियदर्शनी' मधून व्यक्त होणारी लढक्य कवीची प्रतिमा कालांतराने धुसर होत गेली[६]'' असे असले तरी 'एका नव्या रुपात या सत्तेत जीव रमत नाही' (१९९५) या काव्यसंग्रहात त्यांची कविता अविष्कृत झाली. 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' (२००५) 'निर्वाणा अगोदरची पीडा' (२०१०) हे काव्यसंग्रह प्रसिध्द झाले. गतकाळातील वास्तव आणि खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण अनुक्रमे हया दोन्ही काव्यसंग्रहाचे विषय राहिले.

दया पवार यांनी 'कोंडवाडा' या काव्यसंग्रहामधून दलितांच्या वाटयाला आलेले जीवन चित्रीत केले आहे. दलित समाजाला वाटयाला आलेल्या व्यथा—वेदना, दारिद्रय जातीय विषमता यांना वाचा फोडली. समाजातील किंबहुना समाजव्यवस्थेतील जातीयता, आर्थिक विषमता यांमुळे दलितांची कोंडी फोडून दलित समाजातील दु:खाला दया पवार यांनी वाचा फोडली. कवी केशव मेश्राम यांनी 'उत्खनन', 'जुगलबंदी', 'अकस्मता', 'चरित' यांमधून कविता लिहिली. दलितांच्या, पीडितांच्या एकूणच मानवी संवेदनांनी त्यांच्या शब्दांना सजीवत्व आलं. एवढच नाही तर मानवी व्यथा, वेदनांच्या उत्खननाला नवा अर्थ उलगडून आला असे गंगाधर पानतावणे[७] म्हणतात ते योग्यच आहे. 'छावणी हलते आहे' या कवितासंग्रहातून अर्जून डांगळे यांची कविता प्रकाशित झाली. दलितांना भोगाव्या लागणा—या दारिद्रयाचे चित्रण ही कविता करते, दलितांची अस्मिता जागवते, समाजातील भयान वास्तव सांगते ही कविता माणुसकीच्या हक्कासाठी जन्मलेली आहे. कवी वामन निंबाळकर यांचा 'गावकुसा बाहेरील कविता' हा कवितासंग्रह दलित समाजांच्या दु:ख, दैन्य, दारिद्रय, सामाजिक विषमता याचा पर्दाफाश करते. कवीला गावकुसाबाहेर वस्तीत दलित समाजाला राहावे लागते याचे दु:ख आहे दलित स्त्री—पुरुषांवर होणारे अन्याय अत्याचार याविरुध्द वामन निंबाळकरांची कविता आवाज उठविते. कवी यशवंत मनोहर यांचे 'उत्थानगुंफा' (१९७७), 'डॉ. आंबेडकर एक चिंतनकाव्य' (१९८२) , 'मूर्तिभंजन' (१९८५), 'जीवनायन' (२००१) , 'प्रतिक्षायन' (२००६) हे कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. नामदेव ढसाळांच्या कवितेतील वेदना, विद्रोह व नकार यशवंत मनोहरांच्या कवितेत व्यक्त झाला आहे. आजही यशवंत मनोहर यांचे कवितालेखन, समीक्षालेखन अव्याहतपणे चालू आहे.

'पायाखाली सुरुंग आणि माथ्यावर आगीचा ढग ओथंबून आहे;

जपून रे माझ्या फिनिक्स पक्ष्यांनो, खूपदा इथे आपला वध झाले आहे''

त्र्यंबक सपकाळे यांनी 'सुरुंग' या कवितासंग्रहामधून दलितांवर होणा—या अन्याय, अत्याचाराविरुध्द संताप व्यक्त केला आहे. त्यांना समाजातील परिवर्तनाची अपेक्षा आहे; तर नरेशकुमार इंगळे हे 'अंगारा' मधून स्व चा शोध घेतात मानवता हे मूल्य पायदळी तुडवून समाजात विकृत शक्ती कशा फोफावत आहेत याचा वेध त्यांची कविता घेते.

ज. वि. पवार यांच्या 'नाकेबंदी' संग्रहातील कविता मानवाच्या क्रांतीचा संदेश देते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कृतज्ञता वेळोवेळी कवितेत प्रत्ययास येते. समूहाची व्यथा, चीड ही उपरोधाच्या भाषेमधून त्यांच्या कवितेत व्यक्त झाली आहे. 'ऑडीट' मधून प्रल्हाद चेंदवणकर यांची कविता अर्जुन डांगळे प्रमाणेच 'दलित पॅंथर' चळवळीमधून उदयास आलेली आहे. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्पष्टपणे प्रभाव त्यांच्या कवितेवर आहे. तंत्र—मंत्र, काव्य, कलात्मकता आदि गोष्टींना ही कविता नाकारते. कवी लोकनाथ यशवंत यांच्या 'आता होऊन जाऊ द्या' हे शीर्षकच बरेच काही सांगून जाते. लोकनाथ यशवंताची कविता विद्रोहाची भाषा करते.

''आता तुम्ही आमच्या सोबत सांभाळून वागल पाहिजे
झाल ते फार झालं
तुमच्या इमारतीचा पाया आमचा आहे
आम्ही तो कधीही हलवू शकतो'' (आता होऊन जाऊ द्या!)

राम दोतोंडे यांचा 'रापी जेव्हा लेखणी बनते' हा कवितासंग्रह तत्कालीन समाजाची झोप उडविणारा आहे. त्यांचा कवितेत विद्रोह आहे पण तो 'सयंत' आहे नव्वद नंतरच्या काळात अत्यंत ताकदीने ज्या कवीची कविता उदयास आली त्यांमध्ये अरूण काळे यांचे नाव दलित कवितेमध्ये अग्रकमाने घ्यावे लागेल. या कवितेवर जागतिककरणाचा जसा प्रभाव आहे तसाच आंबेडकरांच्या विचारांचा ही प्रभाव आहे. तसेच त्यांची कविता 'तू मदर बोर्ड माझ्या संगणकाचा' असेही आंबेडकरांविषयी म्हणते.

''स्वत:च्या स्वातंज्र्यासाठी दुस—याचं
स्वातंज्र्य खतम करणारे
साले हे लोकशाही जननीवाले दुलांगे
आपलं त्यांच्यावर फार प्रेम
पण आपल्या कल्याणाचं राज्य
निघालेत ते मोडीत काढायला
अन् हे माहिती तंत्रज्ञानाच कोलीत
सापडलंय माकडांच्या हातात.'' (नंतर आलेले लोक—अरूण काळे)

ज्या समाजाने एका विशिष्ट समूह समाजावर हजारो वर्ष अन्याय केला त्यामधील भांडवलशाही व्यवस्था आणि त्यातील शोषकांना धम्मपाल रत्नाकर आपल्या लेखणीतून शिव्या देतात. या समाजामुळे किंबहुना विशिष्ट वर्गामुळे दलित समाजावर अन्याय होतो, हे समाजवास्तव आपण नाकारू शकत नाही.

मी भांडवलदारांना शिव्या देतो
त्यांनी वर्गवारी रूजवली म्हणून
मी वर्गवारीला शिव्या देतो
तिने माणूस विभागला म्हणून (हॉटेल माझा देश—धम्मपाल रत्नाकर)

भांडवलदार असणारा शोषक वर्ग हा स्वार्थी मतलबी, संस्कार व मूल्यहीन झाला आहे; हा आर्थिक, शारीरिक शोषणांबरोबर सांस्कृतिक शोषणही करीत आहे. माणूस भौतिक सुख—सुविधांच्या अधीन होऊन मौजमस्तीत मस्तवाल झाला आहे. तसेच त्याला मनुष्यत्व आणि नैतिक मूल्यांचा पूर्णत: विसर पडलेला आहे. एकुणच भ्रष्ट व्यवस्थेमुळे माणूस अगतिक झाला. त्याचे जीवन किडामुंगीप्रमाणे झाले.

समाजिक विषमता फक्त भारतातच नाही तर सर्व जगात कमी—जास्त प्रमाणात आहे, अगदी विकसित आणि पुढारलेले देशही त्यापासून अलिप्त नाहीत. त्याचेच एक द्योतक किंबहुना परिणाम म्हणून धनदांडग्या लोकांनी मॉल्स संस्कृती निर्माण केली.

प्रकाश जाधव 'माणूस नामका धरम्' या कवितेत 'मानवता' माणूस नावाचा धर्म कसा लोप पावला आहे, याचे वर्णन करतो. विद्रोही कवितेच्या दुस—या दशकातील कवी बा.स. हाटे यांनी देखील कवितालेखन केले आहे. 'रक्तखुणा' हा त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित आहे. महेंद्र भवरे यांनी 'महासत्तेचे पीडादान' या कवितासंग्रहामधून जागतिकीकरणाचा बेगडी मुखवटा फाडून काढला आहे. सरकारी योजना, करार, खाऊजा धोरण हे मुठभर लोकांच्या स्वार्थासाठी आहे अशी त्यांची भूमिका आहे दलित साहित्यात किंबहुना कवितेत अविनाश गायकवाड यांचा 'अजूनही अस्वस्थ रोहिणी' हा कवितासंग्रह महत्वाचा आहे. अविनाश गायकवाड हे जागतिकीकरणाच्या परिणामाचा प्रस्तुत कवितासंग्रहातून अचूक वेध होतात. जागतिकीकरणाचे जगण्याच्या सर्व क्षेत्रांवर कमी अधिक प्रमाणात परिणाम झाले. उत्तम कांबळे यांनी 'जागतिकीकरणात माझी कविता' या दीर्घ कवितेच्या प्रारंभी शेती, शेतकरी, आत्महत्या, आत्महत्येचे केलेले राजकरण, सबसिडीचा बाजार, शेतक—यांची पावलोपावली होणारी अडवणूक, एकूणच शेतक—यांचे दु:ख उत्तम कांबळे आपल्या कवितेतून व्यक्त करतात.

बळीराजाला कधी कुणी
पावलाखाली गाडलं
कुणी बाजारात मारलं

तर कुणी त्याला
बाजारात जाण्यापूर्वीच मारल''

केतन पिंपळापुरे यांचे 'सूर्यकंकण', 'मार्शल रेस', 'डेमोफोन', 'मकाबी' असे चार कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. प्रस्तुत कवीने आंबेडकरी किंवा दलित कवी म्हणून स्वत:ची प्रतिमा उभी केलेली नाही मात्र त्यांच्या कवितेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे तात्विक अधिष्ठान आहे. सुनील अवचार यांची कविता संस्कृतीचे बाजारीकरण होऊन मानवी संवेदना रोबोट सारख्या बदलत आहेत, याचे वास्तव चित्रीण करते. 'या ग्लोबल वर्तमानात, भावना झाली आहे जाहिरात आणि मेंदूचे झाले आहे कॉम्पुटर, तत्वज्ञान झाले आहे 'युज आणि थ्रो', संस्कृती झाली आहे रखेल' अशी अगतिकता त्यांच्या कवितेतून प्रभावीपणे अविष्कृत झाली आहे. मधुकर जाधव यांनी जुने संस्थानिक जाऊन स्वातंत्र्योत्तर काळात टाटा, बिर्ला, अंबानी, मित्तल, अदानी असे नवे संस्थनिक येऊ लागले आहेत असे म्हटले आहे. खाउजा धोरणातील हे नवे संस्थानिक आपली हुकुमत गाजवतील शोषित व वंचितांचे नव्याने शोषण करतील आणि पर्यायाने शासन व्यवस्थेचे ही त्यांच्यावर नियंत्रण राहणार नाही.

'यापुढे सारे दिसतील
अंबानी फार्म रिलायन्स फार्म एअरटेल इस्टेट
टाटाफार्म सारे नवे संस्थानिक'

दलित स्त्रियांच्या कवितेच्या संदर्भात विचार केला तर त्यांचे दुहेरी दु:ख त्यांच्या कवितेतून आलेले आहे; व्यक्तिगत आणि सामाजिक अशा दोन्ही पातळीवरील व्यथा— वेदना स्त्रियांच्या वाटयाला आलेल्या असतात. व्यक्तीगत स्तरावर स्त्रीचे प्रथमत: पुरुषी मानसिकतेतून शोषण होते तर सामाजिक पातळीवर स्त्रीकडे एक भोगवस्तू म्हणून पाहिले जाते. या देशात स्त्रियांच्या व्यथा — वेदनांना प्रथम वाचा फोडणारे दांम्पत्य म्हणजे सावित्रीबाई फुले व महात्मा फुले होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानामध्ये स्त्रीला हक्क व अधिकार हे पुरुषांच्या बरोबरीने दिले. आणि मग हिरा बनसोडे सारख्या कवयित्री 'फिर्याद' मांडू लागल्या वास्तविक पाहता ताराबाई शिंदे यांनी १८८२ मध्ये 'स्त्री — पुरुष तुलना' नावाचा ग्रंथ लिहिला आणि पुरुषी वर्चस्वाला, अन्याय — अत्याचाराला वाचा फोडली. मात्र प्रस्थापितांकडून या ग्रंथाकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष केले गेले. 'स्त्रीवाद' ही संकल्पना १९७५ च्या स्त्रीमुक्ती चळवळीनंतर उदयास आली. १९७५ हे संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. ही देखील जागतिक स्तरावर स्त्रियांच्या प्रश्नांच्या बाबतीतील महत्वाची घटना मानावी लागेल.

दलित कवयित्रीमध्ये हिरा बनसोडे यांचे 'पौर्णिमा' 'फिर्याद' हे कवितासंग्रह महत्वाचे आहेत. या संग्रहातून त्यांनी दलित स्त्रीवर होणारा अन्याय, तिची परवड,

तिचा सोशिकपणा व संयम या सर्व भावनांचे तरल व प्रत्ययकारी अविष्करण कवितेमधून केले आहे. मल्लिका अमरशेख यांनी 'वाळूचा प्रियकर' या कवितासंग्रहातून स्वत:च्या प्रतिक्रिया कुणाचाही मुलाहिजा न ठेवता अगदी प्रखरपणे मांडल्या आहेत.

'' या वारुळ त्या शहरात रक्ताळलेला गुलमोहर,
आणि गटाराच्या खिडकीत
वेश्या होऊन पडलेली पौर्णिमेची रात्र........
मला हे पहायचं नाहीय्
आणि मला हे संपवायचंय् सगळ ........
असं डोळे मिटून काही होणाराय् का''?

(संभावित सूर्यासारखे – मल्लिका अमरशेख)

अशा प्रकारे मराठी स्त्रीवादी कविता नेमका आशय व्यक्त करते. स्त्रीमुक्ती आणि स्त्रीवादी विचारसरणीला नेमकी जाऊन भिडते. बदलत्या स्त्री जाणीवा ती अभिव्यक्त करते. 'पुरुषी' अधिसत्तेला आव्हान देते. स्त्रीयांचे प्रश्न हे केवळ दलित स्त्रियांचे प्रश्न नाहीत ते तमाम स्त्री जातीचे प्रश्न आहेत. परंतु दलित स्त्रियांना 'दलितत्व' आणि स्त्री म्हणून मिळणारी वागणूक यांच्या पकडीत स्त्री दबल्या जाते. आणि समाजात परत दुययम स्थान. यामुळे तिची कायम मनाची मुस्कटदाबी होते. तेव्हा प्रज्ञा लोखंडे म्हणतात,

''तिने फाडून टाकल
पुरुषी अधिसत्तेंन फडफडणांर
शब्दकोषाचं एकेक पान
तिने नाकारली उतरंडीची जन्मजात मिरासदारी''

प्रज्ञा लोखंडे यांची कविता व्यापक आशय घेऊन जन्माला येते. हा व्यापक आशय अनुभवाच्या, चिंतनाच्या स्तरावर काव्यात्मकरितीने अविष्कृत होतो. या संदर्भात रा.ग.जाधव म्हणतात ''नव्या स्त्री प्रतिमांचा पेय दुहेरी आहे. व तो खूप गुंतागुंतीचा आहे. एक व्यक्ती म्हणून व एक स्त्री म्हणून जटिल झालेला हा पेच स्त्रीच्या व्यक्तिमूल्यांचा, व्यक्तिवादाचा आहे. स्त्री हे निसर्गात: दुहेरी एकक (युनिट) आहे, असे म्हणता येईल. केवळ एक व्यक्ती म्हणून स्त्रीला स्वतंत्रता व स्वतंत्र ओळख नसते; तर एक स्त्री व्यक्ती या जोड अर्थाने त्यांना अस्तित्व असते[८]''. आतापर्यंत स्त्रीयांची प्रतिमा पुरुषी मानसिकतेतून साकारलेली आहे. मात्र दलित कवयित्री मा्त्र याला अपवाद आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेने स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व नाकारले होते एक 'भोग' वस्तू म्हणून समाजात प्रतिमा निर्माण केली गेली. उमा गवई या म्हणतात.

''बाई रानात,वनात पुरुषाच्या मनात,भोगाच्या बनात
बाई दु:खाचं अग्निकुंड, वेदनांचं कोठार, जळवांच्या तनात
बाई जगते, झिजते, तिचा देहचंदनी क्षणोक्षणी
सारे देऊन असते, शेवटी डोळा भरुनिया पाणी''(पाचवी भिंत)

प्रस्तुत प़दयपंक्तीमधून उमा गवई हया समस्त स्त्री जाती वेदनेच्या हुंकाराला मोकळी वाट करुन देतात. उपरोक्त कवयित्रींशिवाय प्रतिभा अहिरे, संध्या रंगारी, धम्मज्योती कांबळे, उषा हिंगोणेकर, उषा अंभोरे, प्रज्ञा पवार इत्यादी कवयित्री ही मोठया ताकदीने कवितालेखन करीत आहेत. आज फुले – आंबेडकरी विचारधारा प्रमाण मानून कवितालेखन करणां—यांची संख्या वाढत आहे.

प्रस्तुत दलित कवितेच्या विषयाला अनुसरुन संक्षिप्त स्वरुपात चर्चा केल्यानंतर 'दलित कविता' आणि त्यातून अभिव्यक्त होणारी सामाजिक विषमता, विद्रोह, स्व ची जाणीव या अनुषंगाने काही ठळक निरीक्षणे नोंदवणे संयुक्तिक वाटते.

- पहिल्या पिढीनंतर दलित कवितेत काही काळ होईना साचलेपण आलेले आपणास दिसते
- दलित कविता एकूण कविंच्या कवितांच्या 'सूर' जर पाहिला तर फक्त आंबेडकरांचीच प्रेरणा किंवा त्यांच्याच विचारांचे अधिष्ठान या कवितेला होते असे म्हणता येणार नाही डॉ. आंबेडकरांबरोबर महात्मा फुलें सारख्या काही विचारवंताचे तात्विक अधिष्ठान या कवितेला आहे.
- समकालीन इतर कवितांच्या प्रवाहांपेक्षा आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने दलित कवितेत वैशिष्टयपूर्णता व वेगळेपणा आहे.
- दलित कविता बदलती जातीय मानसिकता, सामाजिक विषमता यातून उदयाला आलेली असली तरी आजचे कवी जागतिकीकरणातील नफेखोर भांडवलशाही शोषण व्यवस्थेविरद्ध आहे.
- दलित कविता ही सामाजिक जाणीव, बांधिलकी, हा तिचा आत्मा आहे. म्हणून ही कविता एक प्रकारे चिंतनशील किंबहुना चिंतनगर्भ ठरते.
- समकालीन दलित कवितेत गौतम बुध्द, संतकबीर, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वगर्भ चिंतनाचे अधिष्ठान आहे.
- एकोणीशे नव्व्दपूर्वीची दलित कविता अस्पृश्यता,दारिद्रय, अंधश्रध्दा, आणि विषम समाजरचना यातून जन्माला आलेली आहे म्हणून प्रकर्षाने विद्रोह, नकार या अंगाने साकारते.
- नव्व्दनंतरची कविता नव्या सामाजिक स्थित्यंतरे, आर्थिक बदल, भांडवलशाही, व चंगळवादी अर्थव्यवस्था यातून होत जाणा—या शोषणाविरुद्ध आवाज उठविते.

- दलित कवितेमध्ये स्त्री मुक्ती व स्त्रीवादी विचार याही पलीकडे जाऊन स्त्रीचा 'मानूस' म्हणून विचार करायला प्रवृत्त करते. स्त्री पुरुषा बरोबरीची हक्कदार आहे. याची जाणीव निर्माण करते.

**संदर्भ सूची**

*नंदपुरे ईश्वर (संपा), साहित्य : ग्रामीण आणि दलित, विजय प्रकाशन,नागपूर पहिली आवृत्ती २००२ पृ.२४१.*

*सुर्वे नारायण (संपा), दलित काव्यदर्शन, लोकवाङ्.मय गृह प्रकाशन, पहिली आवृत्ती ऑगस्ट १९९२. प्रस्तावना पृ. १.*

*आमची श्रीवाणी, विशेषांक, नव्वदोत्तारी मराठी साहित्य, वर्ष. २४: अंक ३ जून— सप्टेंबर २०१७. पृ.२७.*

*तत्रैव पृ . २७.*

*मनोहर यशवंत, आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीम्रात्र प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९९ पृ. १७६ — १७७.*

*इंगळे अशोक, नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती मार्च २०१८, पृ.२३*

*पानतावणे गंगाधर, लेणी, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती सप्टेंबर १९९६ पृ. ३५*

*जाधव रा.ग. वाङ्.मयीन परिप्रेक्ष्य, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती,२००४ पृ.८२.*

# समकालीन आदिवासी साहित्य

**अंकुश माणिक सोनुने**
*एम.फिल प्रथम वर्षे, रिसर्च स्कॉलर, मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद sonuneankush14@gmail.com*

**प्रस्तावना :-**

समकालीन या शब्दाचा अर्थ घ्यायचाच झालं तर समकालीन हा शब्द काळाचा निर्देश करणारा आहे. त्या त्या काळातील सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्या त्यांच्यातील ताण आणि त्या त्या काळातील पडलेला पेच प्रसंग झालेले अन्यायकारक अघात घटना या साहित्यात लिहिल्या गेलेल्या असतात. त्यामुळे त्यांचा उल्लेख हा प्राचीन, अर्वाचीन आणि समकालीन साहित्यात पाहायला मिळतो. 1990 नंतरच्या साहित्य अभ्यासाच्या साहित्याला समकालीन साहित्य म्हणून ओळखले जाते. आदिवासी साहित्याचा इतिहास पाहता असे लक्षात येते की, एकलव्य हा श्रेष्ठ धणुधारी असुनही द्रोनाच्यार्याने त्याला श्रेष्ठ धणुधारी बनु दिले नाही. त्याने गुरू दक्षिणारूपी एकलव्याचा उजवा हाताचा अंगठा मागुन त्याला श्रेष्ठ धणुधारी बनण्यापासून त्याला वंचीत ठेवले गेले. हा त्या काळातील आदिवासी समाजातील व्यक्तीवर झालेला अन्यायच म्हणता येईल. त्यावर आधारित काही कथने, कथा या साहित्यात पहायला मिळतात. आदिवासी समाज हा अती प्राचीन असून निसर्गाप्रती अतिशय प्रेम पशु, पक्षी आणि जंगलाचे संरक्षण व त्यांची कला संस्कृती, विशिष्ट अशा प्रकारची जीवन पध्दती देवदेवतांच्या विषयी त्यांच्या मनात असलेली श्रध्दा भाव, समज सामुदायिक पध्दतीने जीवन जगण्याचा त्यांचा कलागुण हा वेग वेगळ्या पद्धतीने साहित्यात पहायला मिळतो. आदिवासी समाजात त्यांच्या सन उत्सवात आदिवासी नृत्य करत असताना समुह नृत्य करत असताना विविध प्रकारची गाणी गायली जातात ते गाणे देखील साहित्याचाच एक भाग असल्याचे दिसून येते. लग्न विधी पार पाडत असताना हळदीपासुन ते लग्न समारंभापर्यंतची सामुदायिक पध्दतीने म्हटल्या गेलेले गीत ह्याचा देखील आदिवासी समाजातील साहित्य परंपरा आहे. मृत्यू विधी करत असताना सांगायची दंतकथा आदिवासी हे वनांत त्यांचं वास्तव्य असल्यामुळे पशु पक्षांच्या कथा अद्‌भुत कथा त्याचबरोबर पारंपरिक सांस्कृतिक पध्दती वर अवलंबून असणाऱ्या कथा ह्या सर्व आदिवासी साहित्याचा भाग असल्याचे आपल्याला समजते. आदिवासींचे जमीन हस्तांतरण असो वा त्यांच्या जीवनपद्धतीमध्ये आलेले अन्यायकारक प्रसंग ह्या सुध्दा साहित्यात आहे. आदिवासी साहित्य प्रकारामध्ये दु:ख, वेदना आणि विद्रोह आहे. आदिवासी साहित्यात आदिवासींमधील अनेक जमाती आहे. गोंड, भिल्ल, कोलाम, आंध, महादेव कोळी, मल्हार कोळी, वारली, कोरकु इत्यादी जमाती.

आदिवासींची जीवन पध्दती ही पूर्णता नैसर्गिक स्वरुपावरच आधारलेली आहे. त्यांचे व्यवहारीक संबंध हे नैसर्गिक सानिध्यात नद्या, तलाव इत्यादी गोष्टींवर आधारल्यामुळे त्यांची परस्तीतीवर आधारलेली प्रासंगिक छाप सोडुन गेलेले पाहावयास मिळतात. आदिवासी संस्कृती ही त्यांच्या जगण्याला ओळख करून

देणारी खरी संपत्ती आहे. संस्कृती ही पारंपरिक पद्धतींवर आधारलेली असुन ती जोपासणारे व आपली संस्कृती टिकवून जगासमोर एक आदर्श, प्रामाणिक, साधेपणाने जीवन जगणारी जमात म्हणून विशेष आदिवासींची ओळख आहे. आदिवासींचा कोणताही धर्म नाही त्यामुळे त्यांची साहित्यात धर्म ही प्रेरणा असेलच असे ठामपणे मांडता येत नाही. आदिवासी जीवन पध्दती ही विविध कलांत पारंगत भासणारी जमात म्हणून ओळख आहे. चित्रकला, संगीतकला, विणकामकला, नृत्यकला, गायणकला इत्यादी कलाकृती ही त्यांची पारंपरिक पद्धतीने चालत आलेल्या कलाप्रकार आहे. त्यामुळे त्याचे समृद्ध असे लोकसाहीत्य आहे. लोकगीते, लोककथा, म्हणी ही त्यांची स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण आणि विशेष साहित्य ओळख असणारी आदिवासी जमात आहे. आदिवासींमध्ये जशा नैसर्गिक जीवनावर व सांस्कृतिक पध्दतीवर आधारलेल्या अनेक प्रेरणा आहे त्याचप्रमाणे ऐतिहासिक प्रेरणाना आहे. आदिवासींच्या अनेक चळवळींना संघर्षाच्या विविध प्रकारच्या छटा आहे. अनेक जमातींनी आपल्या धर्मसंस्कृतीवर होणारे परकीय आक्रमण व त्यांचे होणारे शोषन यासाठी काही लढे दिले त्यांचीही ऐतिहासिक दखल ही घेतल्या गेलेली आहे. साहित्य महणजे सर्जनशीलता नवनिर्माण, काल्पनातील वास्तव कुठल्याही प्रकारचा आविष्कार किंवा घडवून येतो, तेव्हा त्याच्या मुळाशी काहीतरी प्रेरणा असतात. आदिवासी साहित्याचा विचार करायचा झाल्यास आपल्या असे लक्षात येते की १९६० च्या दशकानंतर मराठी साहित्यात आदिवासींचे जीवन अंगाचे दर्शन घडुन येते. आदिवासी व्यक्तीचे मन हे माणुसकीला जीवापाड जपणारे आहे. आदिवासी संस्कृती ही मातृसत्ताक आहे , परंतु बदलत्या काळानुसार अलीकडच्या काळात पितृसत्ताक कडे वळण्याचे दिसून येते. आदिवासींवर सतत होणारे शोषन शेठ सावकाराकडून होणारे लुबाडणूक, आदिवासी, मुलींवर होणारी पाशवी बलात्कार हे देखील साहित्यिक अंगाचे आहे. आदिवासींचे हस्तलिखान सर्व प्रथम गंगाराम जानु आवारी यांची आदिवासी लोकगीते आहे.

**आदिवासी कवितेचा धावता आढावा:-**

1990 नंतर सर्व स्तरांवर ज्या सामाजिक, सांस्कृतिक उलथापालथी झाल्या, त्यातून आदिवासी साहित्याच्या संदर्भात अनेक नव्या समस्या व जाणिवा पुढे आल्या. आदिवासींच्या अन्यायाच्या निमीत्ताने दुर्गम प्रदेशात नक्षलवादी चळवळी सक्रिय झाल्या. मोठ्या धरणांच्या प्रकल्पग्रस्त भागात आदिवासींचे स्थलांतर होत असल्याने त्यांच्या विस्थापनेतुन निर्माण झालेल्या प्रश्नांची मानवाधिकाराच्या संदर्भात राष्ट्रीय पातळीवर चर्चा सुरु झाली. आदिवासींनी त्यांच्या जन्मभूमीत रुतलेली मुळे, विस्थापनेमुळे येणारी सांस्कृतिक उपरेपणाची भावना, नागरी जीवनाशी विविध पातळ्यांवरील संघर्ष, बदललेल्या जीवनशैलीत अस्तित्वाचा प्रश्न अशा अनेक वर्तमान जाणिवांनी मराठी साहित्य प्रभावीत झाल्याचे लक्षात येते. अशा प्रकारे समकालीन जीवनाला वास्तवाच्या कठोर भुमिकेतुन मांडले गेले. वनसूर्य(१९९१) हा कवितासंग्रह पुरूषोत्तम शेळमाळके यांचा आहे, म्होरकी १९९७ हा कवितासंग्रह उषाकिरण आत्राम यांचा आहे. सायरणचे शहर १९९७ हा कवितासंग्रह अरूण काळे यांचा आहे, सायरण शहर मध्ये माणसाच्या दंगलखोर, युद्धखोर मन:स्थितीच्या कवितांचा जमाव आहे. पसुता १९९९ हा कवितासंग्रह कृष्णकुमार चांदेकर यांचा आहे. सुक्का सुकम २००२ हा कवितासंग्रह वसंत कनाके यांचा आहे, जगण्याचे संदर्भ २००३गणेश परदेशी, रानपाखरांची

संसद २००५ हा काव्यसंग्रह माधव सरकुंडे यांचा आहे. सामाजिक जाणिवा करून देणारा काव्यसंग्रह आहे. पाळीव २००७ तुकाराम धांडे यांच्या काव्यसंग्रहात मानवी जीवनाचे वास्तव चित्रण करून देणारा काव्यसंग्रह आहे.

**आदिवासींचं नाट्य लेखन:-**

विठ्ठलराव कन्नाके ह्यांनी सन २००६ मध्ये जय बुळहालपेन हे नाटक त्यांनी गोंडी बोलीत लिहिले आहे. भगवान शंकराला जी काही विविध नावांची उपमा देण्यात आली ती जय बुळहालपेन हे नाव येथे सार्थ करण्यासाठी वापरण्यात आले. आली रंगात राणी १९९९, आक्रोश २००३ आणि कथा इंद्रापुरीची २००५ ही तीनही नाटके पुण्यातील कुंडलीक केदारी यांची आहे. आदिवासींची नाट्यलेखन जरी अत्यल्प असले तरी एकाकीकामात्र विविध नियतकालिके आणि ग्रंथाच्या रुपाने प्रकाशित झाल्या आहे. आदिवासींच्या कादंबरी या त्यांच्या वास्तवीक जीवनाचा एक भाग आहे.आदिवासी समाजातील व्यक्तींनी कठीण, संकट काळात काढलेले दिवस व हाल अपेष्टा सहन करुन हालाखीच्या परिस्थितीवर केलेली मात यांचा परिचय करून देणारे साहित्यिक हे साहित्य नावारुपाला आलेले आहे. आदिवासी जीवनपद्धती ही शेतीवर देखील खुप मेहनत घेतात, मजुरी ही त्यांच्या नावारुपाला आलेली सामाजिक दृष्टीने अती मागासलेली जमात म्हणून ओळखली जाते. खेड्याकडे चला हा संदेश देणारे महात्मा गांधी यांनी बुध्दीवंतांनी आपली दृष्टी वळवली पाहिजे. हे गांधीजींचे बोल नवशिक्षतांच्या पचनी पडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांना शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा उपदेश दिला. यांच्या हळूहळू याचा प्रभाव खंडोपाडी व ग्रामीण भागात होत गेल्यामुळे शिक्षणात लेकांचा कल वाढत गेला,आणि ग्रामीण भागातील आदिवासींवर झालेल्या अन्यायाची चीड तयार होऊन आपल्या चाली, रिती आणि आपली संस्कृती याविषयी हाव वाढत गेली आणि यातुन आदिवासी जीवन आणि जाणिवा आपल्या लेखणात कथा कादंबरी या स्वरूपात नावारुपाला आल्या. तृष्णा, १९९५ नजुबाई गावीत यांची ही कादंबरी आहे. वाडा १९९६ माधव सरकुंडे यांची आंध जमाती वरील आदिवासी दैनंदिन जीवनातील व्यवहार, गावच्या पाटीलकीने लेखककांचे कशा प्रकारे शोषण केले त्याचा विमर्श दाखवलेला आहे. कोनवाडा, २००४ ही कादंबरी महादेव कोळी या जमातीचे वर्णन करणारी आहे.

**आदिवासी आत्मकथांची वाटचाल:-**

मराठी साहित्यात 1990 पासून विविध साहित्य प्रवाह निर्माण झाले. या साहित्य प्रवाहामुळे समाजातील वेगवेगळे स्तर बोलायला लागले. अभिव्यक्ती करण्याचे उत्तम साधन म्हणजे साहित्य होय. साहित्यातून माणसाने आपले जीवन अनुभव मांडण्यास सुरवात केली. आपल्या समाज व्यवस्थेत समाजाची रचना उच्च निच स्वरुपाची आहे. त्यात माणसाचा अनेक स्तरातील लोकांचा संबंध हा समाजातील सर्व स्तरांतील लोकांशी येत असतो. आदिवासी साहित्यात आत्मकथन म्हणून नजुमाबाई गावीत यांचे आदोर (१९१५) हे पुस्तक आले. आदिवासी आत्मकथन म्हणून आदोर या पुस्तकास प्रथम आत्मकथनाचा मान मिळाला. आज आदिवासी साहित्यात बाबाराव मडावी यांचे आकांत व किसन दामोदर डगळे यांचे ठिगळ २००८ ही आत्मकथने निर्माण झालेली दिसून येतात.

**आदिवासी कथासंग्रह:-**

विमुक्त १९९७ (गावकुसाबाहेरील कथा) हा कथासंग्रह शरणकुमार लिंबाचे यांनी संपादित केला आहे. विमुक्त ही दादासाहेब मोरे यांची कथा आहे. सर्वा,२००० माधव सरकुंडे यांचा कथासंग्रह असुन या कथासंग्रहामध्ये ग्रामीण भागातील जीवन, दारिद्य, अडीअडचणी, निरक्षरता यांची जाणीव करून देणारा हा कथासंग्रह आहे. अस्वस्थ मि,२००७ कुंडलीक केदारी यांचा हा कथासंग्रह आदिवासी जीवनावर प्रकाश टाकणारा आहे. लोकसाहीत्याचा सर्वात मोठा भाग हा लोकगीताने मांडला आहे. आदिवासींच्या लिखित साहित्यापेक्षा त्यांच्या मौखिक साहित्यात गीतांचे मोठे प्रमाण आहे. आदिवासींच्या दैनंदिन जीवनात व्यापक प्रमाणात चाली रितीने त्यांचे लोकगीतांचे साहित्य हे पूर्वीप्रमाणे एकाकडून दुसऱ्याकडे या प्रमाणात चालत आले आहे. आदिवासी साहित्यात स्त्रीयांचा मोठ्या प्रमाणात सहभाग हा लाभलेला आपल्याला पहावयास मिळतो. ज्या प्रमाणे स्त्रिया दळन दळत असताना त्यांनी जात्यावर म्हणावयाची लोकगीते हे त्यांची त्या संस्कृतीशी जपलेली बांधीलकी आहे.

**संदर्भ:-**

*१) आदिवासी साहित्य आणि साहित्यीक. प्रा. डॉ. कृष्णा भवारी- चेतक बुक्स, पुणे*
*२) महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहीत्य - डॉ. शैलजा देवगावकर*
*३) महाराष्ट्रातील आदिवासी जमाती: डॉ. गोविंद गारे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे*
*४) आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या-प्रमोद मुनघाटे, प्रतिमा प्रकाशन, पुणे*

# नव्वदोत्तरी दलित—आंबेडकरी कथा

**अमित वासुदेव गजभिये**
*पीएच. डी. संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, डॉ. म. वा. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नागपूर, भ्र.क्र. ९६७३४५६४८४ ईमेल amitwgajbhiye@gmail.com*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले दलित साहित्य आज भारतीय साहित्य म्हणून ओळखले जाते. मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी, पंजाबी, कन्नड, मल्याळम इत्यादी विविध भाषातून दलित—आंबेडकरी साहित्याची निर्मिती होत आहे. आज दलित साहित्य संमेलने भरवून साहित्याच्या क्षेत्रात दलित—आंबेडकरवादी साहित्य संस्कृती जन्मास आली आहे. मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात दलित साहित्याने सुरु केलेली ही साहित्य चळवळ भारतीय साहित्यशास्त्रात एक स्वतंत्र साहित्यविचार म्हणून रुजू पाहत आहे. या साहित्य चळवळीने मराठी साहित्याचा चेहरामोहराच बदलून टाकला आहे. त्यामुळे दलित साहित्य चळवळ ही राष्ट्रीय पातळीवर गतिमान होत आहे.दलित—आंबेडकरवादी साहित्यामध्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक, निबंध, समीक्षा, स्वकथन (आत्मचरित्र) इत्यादी विविध वाङ्मय प्रकारांचा समावेश होतो. हे विविध वाङ्मयप्रकार विविध प्रतिभावंतांनी आपल्या सृजनशील निर्मितीद्वारे समृद्ध केले आहेत. साधारणत: १९३३ पासून हे वाङ्मय प्रकार विकसित होताना आढळतात. परंतु १९६७ नंतरच्या काळात अधिक गतीने हे वाङ्मय प्रकार समद्ध झाले. या वाङ्मयप्रकारांनी दलित साहित्याला आणि एकूणच मराठी साहित्याला मोठे योगदान दिले आहे.

१९२० पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या दलित मुक्तिच्या विश्वव्यापी लढ्याने दलित साहित्याला प्रेरणा दिली. या प्रेरणेतून त्यांनी ‘जनता’, ‘प्रबुद्ध भारत’ अशी साप्ताहिके सुरु केली. या साप्ताहिकांच्या माध्यमातून त्यांनी वैचारिक चळवळीचे बिजारोपन केले आणि यातून दलित साहित्य चळवळीचा उगम झाला. खऱ्या अर्थाने १९६७ नंतर ‘अस्मिताच्या’ पीठावरुन निखळ दलित साहित्य चळवळीला गती आली. ‘जनता’, ‘प्रबुद्ध भारत’ यासारख्या साप्ताहिकातून कथा, कविता, लोकांपुढे आली. अनेक वर्षापासून अन्याय, अत्याचार सहन करणाऱ्या समाजाला वाचा फोडणारे लेखन निर्माण करण्याचे एक साधन मिळाले. लेखनाची अपूर्व उर्मी दलित जगाला फुटली. हजारो वर्षापासून मुके असलेले लोक लेखनास प्रवृत्त झाले. या साप्ताहिकांनी प्रथम दलित कथा मराठी भाषेत जन्मास घातली. १९३३ ते १९५८ या काळात ‘जनता’, ‘प्रबुद्ध भारत’, या साप्ताहिकात अनेक कथा मिळतात. याचा अर्थ दलित कथेचा उगम ‘जनता’, ‘प्रबुद्ध भारत’ या साप्ताहिकातील कथेतून झालेला दृष्टिक्षेपास पडतो. दलित—आंबेडकरवादी साहित्यातील “दलित कथा ही श्रेष्ठ जाणिवेची कथा

आहे. मानसाच्या विशाल संवेदना घेऊन ती जन्मास आली आहे. आंबेडकरवादाचे जीवनमूल्य तिने आपल्या शब्दात तोलून धरले आहे." असे दलित कथेसंबंधी डॉ. प्रकाश खरात यांनी विधान केले आहे ते यथार्थ आहे, कारण मराठी कथाकाराने पहिली आधुनिक मराठी कथा ही मांजरावर लिहिली. नवकथाकारांची पहिली नवकथा कुत्रीवर व मांजरावर आहे, तर दलित कथाकरांनी जनता,'प्रबुद्ध भारता'तून लिहिलेली पहिली कथा ही माणसावर लिहिली आहे. म्हणजेच दलित कथेच्या आणि आशयाच्या केंद्रस्थानी माणूस आहे.

दलित—आंबेडकरी साहित्यात कविता आणि आत्मकथन हे साहित्यप्रकार संख्यात्मकदृष्ट्या आणि गुणात्मकदृष्ट्या समृद्ध असून त्यानंतर कथा, कादंबरी आणि नाटक असा क्रम लागतो. दलित—आंबेडकरी कथेची मूळ सुरूवात इ. स. १९३३ ते १९५८ या कालखंडात डॉ. आंबेडकरांच्या 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' ह्या साप्ताहिकाच्या माध्यमातून झालेली असून त्यानंतरचे कथाकार म्हणून अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल ना. रा. शेंडे, बंधुमाधव मोडक इत्यादींचा उल्लेख केला जातो. ना. रा. शेंडे यांचे 'सावली' (१९५६) आणि 'डोंगरमाथ्यावरील दिवे' (१९६०) हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कथांचे स्वरूप पारंपरिक आणि अनुकरणात्मक असले तरी त्यातून साकार होणारे दु:ख अस्सल आहे. बंधुमाधव मोडक यांचे 'आम्ही माणसं आहोत' (१९८१) आणि 'पेटलेले आकाश' हे दोन कथासंग्रह प्रसिद्ध असून या कथासंग्रहातील कथातून त्यांनी दलितांच्या व्यथा, वेदनांचे हुबेहुब चित्रण साकार करून या व्यथा, वेदनांचे उपायही सुचविचले आहे. ''दलित कथेतील विद्रोह आणि नकाराच्या जाणिवा बंधुमाधवांच्या कथेतून प्रकट झाल्या आहेत.''[१] हे गंगाधर पानतावणे आणि चंद्रकुमार नलगे ह्यांचे मत महत्त्वपूर्ण आहे.

दलित—आंबेडकरी कथा लिहिणारे प्रमुख कथाकार म्हणून अणाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, दया पवार, वामन होवाळ, योगिराज वाघमारे, माधव कोंडविलकर, अर्जुन डांगळे, अविनाश डोळस, केशव मेश्राम, योगेंद्र मेश्राम, अभिताभ, भीमसेन देठे, चंद्रकांत वानखेडे, इत्यादी कथाकारांचा उल्लेख करावा लागेल. अणाभाऊ साठे, शंकरराव खरात आणि बाबुराव बागूल यांचा उल्लेख दलित—आंबेडकरी कथेचे शिल्पकार म्हणून केला जातो. यांच्या पूर्वी दलितेतर लेखकांनी मानवतेच्या पातळीवरून दलित जीवनाचे चित्रण मराठी कथासृष्टीत केले असल्याचे दिसून येते. त्यात प्रामुख्याने प्रा. श्री. म. माटे यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांचा 'उपेक्षितांचे अंतरंग' (१९३९) हा कथासंग्रह या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या कथासंग्रहातील बन्सीधरा, तू कुठ रे जाशील या कथा दलित चित्रणाच्या दृष्टीने प्रातिनिधिक कथा आहेत असे म्हणता येईल. दलित—आंबेडकरी कथेची परंपरा मोठी नसली तरी ती अल्प आहे असे म्हणता येत नाही. या परंपरेची सुरुवात बंधुमाधव मोडक यांच्या कथांपासून होते. त्याकाळी त्यांच्यावर रंजनवादी कथांची छाया होती. दलित जीवनाचे वास्तव आणि

आंबेडकरवादाचे तत्त्वज्ञान यांनी ते प्रेरित होते. त्यानंतरच्या काळात अण्णाभाऊ साठे यांनी आपले नाव कोरले. ते साम्यवादी विचारसरणीचे होते. पण दलित वास्तवाचे अग्रगण्य भाष्यकार बाबुराव बागूल हेच होत.

१९९० नंतरच्या काळात म्हणजे गेल्या दोन दशकात जगभर झालेला माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट लेखकाची जीवनदृष्टी बदलायला मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरला. इंटरनेट, मोबाईल ही अभिव्यक्तिची नवी साधने निर्माण झाली. त्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रवाहात आपले वाङ्मय एका वेगळ्या वळणावर येऊन पुढच्या दिशा शोधू लागले. जागतिकीकरणात वस्तूचे, सेवाचे, जीवनपद्धतीचे, सांस्कृतिक जीवनसंचितांचे बाजारीकरण होऊ लागले. वैद्यकीय सुविधांच्या जाहिराती येऊ लागल्या. विकणे, खपणे, जाहिरात करणे, सौदा करणे ही व्यापार व्यवसायातली क्रियापदे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात मुक्तपणे संचार करु लागली. जागतिकीकरण हा काळाच्या ओघात माणसाच्या प्रगतीने गाठलेला एक टप्पा आहे. त्यामुळे जागतिकीकरणाच्या युगात आचारविचाराचे आदानप्रदान जागतिक पातळीवर होऊ लागले. संस्कृती, भाषा, वेशभूषा, खानपान यांचे सुद्धा आदानप्रदान झपाट्याने होऊ लागले. जग जवळ येऊ लागले आणि माणूस मानसापासून दुरावू लागला. मूळ संस्कृतीवर आघात होऊ लागला. समाजातील मानवी मूल्य पायदळी तुडवली जाऊ लागली. त्यामुळे आजचा माणूस सभ्रमावस्थेत जीवन जगत आहे तर संवेदनशील माणूस या प्रक्रियेत भांबावून जात आहे. अशा भाबांवलेल्या स्थितीत नव्वदोत्तरी मराठी दलित लेखकांनी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक दृष्टिकोनातून केलेले लेखन जागतिकीकरणाचे पडसाद घेऊन आले आहे. प्रामुख्याने या काळातील दलित कथाकार म्हणून योगिराज वाघमारे, प्रकाश मोगले, जयराज खुणे, गौतमीपुत्र कांबळे, अनिता वाघमारे, आत्माराम गोडबोले, राजेश्वरी कांबळे, दीपध्वज कोसादे, उर्मिला पवार, प्रतिमा जोशी, प्रेमानंद गज्वी, उत्तम कांबळे, किशोर घोरपडे, आनंद राऊत, प्रेमानंद दामोधर, विकास सिंदगीकर, विलास अंभोरे, सुदाम सोनुले, संजय डोंगरे, रामराव झुंझारे, शिल्पा कांबळे, सतीश म्हस्के, उशा अंभोरे, जी. ए. ऐनापुरे, महेंद्र गायकवाड, शीला पाटील, राहूल गोविंद निकम, देवेंद्र उबाळे, दिवाकर सदाशिव, गजानन बनसोड, आनंद गायकवाड, रमेश पाटील, जयंत पवार डॉ. प्रकाश खरात आणि डॉ. पद्मामाकर तामगाडगे इत्यादी लेखकांनी बदलत्या काळाचा संदर्भ लक्षात घेऊन मराठी दलित—आंबेडकरी कथेचे वैभव समृद्ध केले आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून त्यातील काही निवडक कथाकारांच्या संदर्भात नव्वदोत्तरी मराठी दलित—आंबेडकरी कथेचा आढावा घेतलेला आहे.

**जयंत पवार**

जयंत पवार हे मराठी साहित्यक्षेत्रात नाटककार व नाट्यसमीक्षक म्हणून सुपरिचित आहेत. जयंत पवार यांना त्यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहाला २०१२

सालचा साहित्य अकादमी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांचे आतापर्यंत 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' आणि 'वरण भात लोन्चा नि कोण नाही कोन्या' असे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. यापैकी त्यांचा 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' हा पहिला कथासंग्रह आहे. हा कथासंग्रह नव्वदोत्तरी असून कथा माध्यमाच्या नव्या शक्यता तपासणारा गंभीर कथासंग्रह आहे.

जयंत पवार यांचे वास्तव्य मुंबईतील गिरणगाव येथील आहे. त्यांच्या या कथासंग्रहातून मुंबईतला गिरण्यांचा संप, बाबरीकांड, धार्मिक पुनरुज्जीवनवाद, जातीय दंगे आणि जागतिकीकरणाचे भलेबुरे आघात या सगळ्याचा परिणाम अभिव्यक्त होताना दिसतो. त्यांचा हा कथासंग्रह २०१० मध्ये प्रकाशित झाला असून त्यामध्ये सात कथा अंतर्भूत केल्या आहेत. या सातही कथा अनुक्रमे २००२ ते २००९ या कालखंडात लिहिल्या गेल्या आहेत. या कथासंग्रहाचा विचार करता असे लक्षात येते की एकविसाव्या शतकातील जागतिकीकरणाने सत्तेच्या होकायंत्राची दिशा फिरवली. भारत आणि भारतीय सत्तेचे एक सूत्र आहे. या देशातील मूल्यसंघर्षाचा इतिहास हा सत्तेच्या सूत्राचा संघर्ष आहे. प्रचलित समाजव्यवस्था नियंत्रनाचे आणि नियमनाचे साधन हे दमन असू शकते. या साधनाद्वारे होणारे नियमन श्रेष्ठ कनिष्ठ अशा स्तरीकरनाने होत असते. अशा समूहाच्या क्रमवत दुसरा समूह आरामदायी जीवन सत्तेच्या माध्यमातून उपभोगत असतो. अशी एक सूत्रबद्धता जयंत पवार यांच्या लेखनात आहे. देशाच्या जीवनासोबतच महानगरीय संवेदना, मुक्त अर्थव्यवस्था, चंगळवाद, मध्यम वर्गाची ससेहोलपट आणि गरजूंचे विस्थापन इत्यादी आशय त्यांच्या कथेतून आले आहेत. २००१ ते २०१० या कालावधीत निर्माण झालेल्या विविध क्षेत्रातील विविधांगी प्रश्नावर त्यांची कथा आधारलेली आहे. 'टेंगषेंच्या स्वप्नात ट्रेन.......' या कथेमधून स्वप्न आणि वास्तव याचे प्रत्ययकारी दर्शन घडविले आहे. स्वप्न हेच सत्य असावे हा त्याच्या आभास महत्त्वपूर्ण आहे. यामध्ये सामाजिक वास्तवाचे भान आहे. जीवनार्थ शोधण्याची धडपड आहे. स्वत:ला मोकळे करण्याची उर्मी आहे. सामाजिक वास्तवाला आपण लढा देऊ शकत नाही म्हणून स्वप्नामध्येच सामाजिक वास्तव किती भयंकर आहे, हे प्रकट करण्याची उर्मी त्यांच्या या कथेमधून दिसून येते. 'साशे भात्तर रुपयांचा सवाल अर्थात युद्ध आमचे सुरु!' या कथेतून राजकीय आणि सामाजिक जीवनातील विपरीतता मांडली आहे. उच्चवर्ग आणि कनिष्ठ वर्ग यांच्या जगण्यातील परस्परावलंबन यांचे मार्मिक चित्रण या कथेत आले आहे. उच्चवर्गातील पैसा आणि कनिष्ठ वर्गाचे श्रम यांच्यातील घटनाप्रधानता कलात्मकरितीने मांडली आहे. त्यांच्या या कथेतून मानवी मनाचा आणि मानवी मनाच्या अवतीभोवती असलेल्या जगाचा वेध घेता येतो. या कथेतून जागतिकीकरणात प्रगत झालेला समाज व स्वत:चे स्वतंत्र अस्तित्त्व टिकवू पाहणारा समाज आणि त्यांच्या या संघर्षात कुचकामी ठरलेले प्रशासन यांचे वर्णन पवारांनी केले आहे. मानवी

मनातील आणि जीवनातील विसंगती पवारांच्या कथांमधून व्यक्त होते. स्वत:ची प्रतिष्ठा जपणारे, एषोआरामात जगणारे केवळ स्वत:चाच विचार करतात. अशा परिस्थितीत ज्या समाजावर अन्याय होतो. तो समाज अंतिमत: संघर्षाच्या चौकटीत डांबल्या जातो. अशाही परिस्थितीत जागतिकीकरणाच्या काळात संस्कृतीची जी देवाण—घेवाण होत आहे हे पावर तन्मयतेने मांडतात. पुढे या कथेच्या शेवटी उच्च वर्ग आणि कनिष्ठ वर्ग यांच्यात घडून आलेले मिलन मार्मिक आहे. उच्चकुलीन घरातील मुलगी (चिन्मयी भालचंद्र आवळस्कर) आणि कनिष्ठ वर्गातील मुलगा (राजेश बळी जंगम) यांनी केलेला प्रेमविवाह हे या कथेचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.

जयंत पवार यांची 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' ही कथा कामगार लढ्याची शोकांतिका आणि त्याचा जागतिकीकरणाशी असलेला संबंध यांच्या संपूर्ण व्यामिश्रतेसह व्यक्त होणारी कथा आहे. पवारांच्या कथालेखनाचा केंद्रबिंदू म्हणून या कथेकडे पाहता येईल. आजचा लेखक हा असंख्य दृश्य प्रतिमांनी गजबजलेल्या तंत्राधिष्ठित जगाचा रहिवासी आहे. या जगाची व्यामिश्र प्रतिकृती तयार करण्यासाठी कथेचे माध्यम अपुरे वाटणे साहजिक आहे. त्यांच्या या कथेचे वैशिष्ट्य म्हणजे गेल्या वीस वर्षात मोबाईल, इंटरनेट, डी.टी.एच. या सुखलोलुप वस्तूचे आकर्षण हे घराघरात पोहचले. उच्चवर्गापासून ते कामगार वर्गापर्यंत त्यांचे लोण पसरले. काम करुन पैसे मिळविणे आणि पैसा मिळवून सुख शोधणे, सुखसाठी पैसा खर्च करणे अशी चंगळवादी वृत्ती समाजात फोफावली. व्यक्ती गरीब असो की श्रीमंत एखाद्या वस्तूची उपयोगिता लक्षात न घेता ती वस्तू खरेदी करण्याची वृत्ती येथील जनमानसात रुजली. त्यामुळे सामान्यांचे होत असले हाल किंवा सामान्याला इच्छा असूनही एखादी गोष्ट करता येऊ नये आणि शेवटी इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांना प्राणही गमवावे लागते. घरी प्रेत असूनही कामावर जावे लागते. हा जीवनसंघर्ष त्यांनी या कथेतून मांडला आहे. सातत्याने होत असलेल्या अविरत, अखंड अन्यायामुळे दलित जीवनात पसरलेले वेदनापूर्ण काळे आवरण टरकावून दु:खाचे व्यापक दर्शन त्यांची कथा घडविते. विद्रोहाचा आवाज सौम्यपणे उठविते. त्यामुळे पवारांच्या कथा बंडखोर प्रवृत्तीच्या वाटत नाहीत. परंतु कामगार वर्गाची शोकांतिका आणि त्याचा जागतिकीकरणाशी असलेला संबंध नाकारता येत नाही. त्यांच्या या कथेतून गिरणी कामगारांची विस्थापित कुटुंबे आणि त्यांचा जीवनसंघर्ष चित्रित केला आहे. या चित्रणात संघर्ष, विद्रोह, आत्मभान, मानवी हक्काची सर्वंकष जाणीव आणि मानवी हक्काच्या मर्यादा या मूळ घटकांवर विश्वास ठेवून प्रकट होणारी ही कथा आहे. त्यांच्या या कथासंग्रहाबद्दल निखिलेश चित्रे प्रस्तावनेत म्हणतात, "पवारांच्या कथा वाचताना त्यांची संवेदनशीलता, भाषिक अभिव्यक्ती आणि पात्राची सामाजिक पार्श्वभूमी हे सगळं भाऊ पाध्यांच्या जवळचं असल्याचं जाणवतं. स्वत: जगलेलं आणि अनुभवलेलं, बेचैन करणारं वास्तव समूहमानसाद्वारे कथेत व्यक्त करणं

हे या दोघांचंही ठळक वैशिष्ट्य. मात्र पवार यांच्या कथांमधून उभं राहणारं भाषिक व्यक्तिमत्त्व हे अत्यंत मौलिक आणि त्याचं स्वत:चं आहे. त्यांच्या कथांमधलं वास्तव 'घडवलेलं' किंवा कृत्रिम नाही, त्यामुळे त्यांची भाषाही तशी नाही. आधी फॉर्म निश्चित करुन ते कथा लिहीत नसल्यामुळे त्यांच्या कथांचा आशय स्वत:चा आकार घेऊनच व्यक्त होतो."[२] त्यामुळे पवारांच्या कथा वाचकांना खिळवून ठेवतात. कारण सामाजिक जाणीव आणि सामाजिक अन्याय यांचे एकत्रित चित्रण त्यांच्या कथांमधून घडते. दु:ख व संघर्ष यांच्या सीमारेषेवर त्यांची कथा आघात करते. त्यामुळे त्यांची कथा सामाजिक कथा ठरते. सामाजिक कथेत जसे समाजाने केलेल्या अन्यायाचे चित्रण आहे. तसेच दलित समाजाचे आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टीने पिळल्या गेलेल्या मनाचेही चित्रण आहे. त्यांच्या कथालेखनाच्या निवदेनाच्या शैलीत काळात मागे पुढे सरकणारा निवदेन प्रवाह आहे. "सुंदरीने आपले चेतक बाहू फैलावून आवाहन करावं किंवा एका मोहक प्राण्याने आपला जबडा इतका वासावा की, त्याचा वरचा ओठ आकाशाला भिडावा आणि खालचा ओठ भूपृष्ठावर उतरत लांब पसरलेल्या जिभेखाली दडून जावा किंवा गेट वे ऑफ ग्लोबल इंडिया तसा हायस्ट्रीक फिनिक्सच्या महादरवाजा सताड ऐसपैस उघडा आहे."[३] हे दीर्घ लयीचे वाक्य त्यांच्या अनुभवविश्वातील प्रकटीकरण असावे हे स्पष्ट करते. त्यांनी आपल्या कथासंग्रहात वापरलेल्या प्रतीक आणि प्रतिमा चित्र उभ्या करणाऱ्या आहेत. जसे "घनश्याम हडकर. वय वर्ष एकवीस किंवा बावीस. विजोड हळकुळा. न धुतलेला टी शर्ट, इस्त्री मोडलेली पॅट, पायात स्लीपर. पिंजारलेल्या केसांनी, न सरावलेल्या नजरेने घनश्याम उर्फ श्याम हडकर वाघाच्या गुहेत शिरावं तसा आत चाललाहे. त्यावेळी घड्याळात वाजले आहेत साडेआठ."[४] पवार हे मुळात नाटककार असल्यामुळे नाटकातील पात्राचा संवाद ज्या प्रकारचा असतो त्या प्रकारचे वास्तववादी चित्रण त्यांनी आपल्या कथातून केले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष दृश्यात्मकता वरील वर्णनावरुन लक्षात येते. पवारांनी प्रत्येक कथेत वेगळी निवदेनशैली वापरली आहे. त्यांच्या कथातून कधी बेभरवशाचा निवदेक वाचकांशी संवाद साधतो. तर कधी हादरलेला नायक निवेदक दिसतो तर कधी अदृश्य निवदेकही त्यांच्या कथांमधून उलगडतो तर कधी त्रयस्त निवदेक कथेच्या आतुन वाचकाशी संवाद साधतो. एकंदरीत पवारांची कथा ही नव्या जीवन जाणिवेने पछाडलेली आहे. जन्म, मृत्यू, दु:ख, कौर्य आणि हिंसा त्यांच्या दलित जाणिवेतील चिंतनातून साकारलेल्या आहेत.

माणूस आणि माणूसकीचे मूळ तत्त्व हे पवारांच्या कथांचे सूत्र आहे. प्रस्थापित व्यवस्थेत माणूसकीचे कमी होत असलेले मूल्य परत मिळविण्यासाठी त्यांची कथा आकारास आली आहे. नव्या कालसंगत जीवन जाणिवांचा आणि विज्ञाननिष्ठ व्यापक दृष्टिकोनाचा पवार स्वीकार करताना दिसतात. आपल्या आयुष्यातील संबंधित अनुभवाना कथाच्या माध्यमातून विशद

करण्याची आणि जागतिकीकरणातील दलित जाणिवांना अभिव्यक्त करण्याची त्यांची हातोटी परिवर्तनीय आहे.

**प्रकाश खरात**

दलित कथेतील एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे डॉ. प्रकाश खरात होय. डॉ. प्रकाश खरात यांचे ‘अंधाराचा अस्त’ (१९९३) ‘अक्षरांची पहाट’ (२००३) आणि ‘प्रवर्तनाचा युगस्पर्श’ (२००९) असे तीन कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. खरातांच्या ‘प्रवर्तनाचा युगस्पर्श’ या कथासंग्रहातील जीवनदर्शन प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून साकारलेल्या नवसंस्कृतीचे आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाने भारतीयांच्या प्राचीन बौद्ध संस्कृतीचा जो शोध घेतला त्यावर आधारलेल्या काही कथा या कथासंग्रहात आहेत. बौद्ध संस्कृतीतील काही सुप्त झरे आजच्या हिंदू संस्कृतीतून व मौखिक साहित्यातून वाहत आहेत. त्या विचारभावनांची कथात्म रुपे या कथा संग्रहात आहेत. खरात यांची वाङ्मयविषयक आणि जीवनविषयक दृष्टी बहुजननिष्ठ लोकशाही मूल्याची आहे. ती वर्णव्यवस्थेला विरोध करणारी, स्वातंत्र, समता, बंधुभाव आणि न्याय या मूल्याचे प्रतिपादन करणारी आहे. खरातांच्या कथेचे केंद्रस्थान हे माणूस आहे. त्यामुळे त्यांच्या कथा देश, प्रदेश, जात, धर्म, प्रांत आणि भाषा अशा कोणत्याच बंधनात अडकत नाहीत. त्यांच्या ‘अक्षरांची पहाट’ या कथासंग्रहातील ‘माझी शाळा’ या कथेतून त्यांचे शाळेतील जीवनानुभव आले असून भौतिक सुविधांचा अभाव असताना आणि शाळेची प्रशस्त इमारत नसतानाही त्यांची शिक्षणाची जिद्द दिसते. याचा अर्थ तत्कालीन काळात दलित समाजाला शिक्षणासाठी करावी लागणारी तडजोड या कथेतून व्यक्त होते. ‘कुस्ती’ या कथेतून जातीय संघर्ष श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या पातळीवर रेखाटला आहे. श्रेष्ठ कोण व कनिष्ठ कोण आणि खेळात त्यांचे स्थान काय? हा संदर्भ घेऊन प्रकाश खरात अस्पृष्यतेची मांडणी करतात. यासंदर्भात ते म्हणतात, “गावगाड्यतील जाती–पातीची व अस्पृश्यतेची भावना जशी माणसांना अपमानित करत आली होती, तशीच कुस्तीच्या रिंगणातही प्रकटली होती. ब्राम्हणी वर्णव्यवस्थेनं माणसांच्या मनात तुडुंब भरलेल्या श्रेष्ठ–कनिष्ठतेचा संस्कार सामुदायिक उत्सवातही उफाळला होता.”[५]

खरातांची ही कथा खऱ्या अर्थाने भारतीय जातीव्यवस्थेचे यथार्थ चित्रण करताना दिसते. कारण जागतिकीकरणानंतर संपूर्ण जागतिक संस्कृतीची सरमिसळ झाली असली तरी भारतीय समाजव्यवस्थेत जातीवादाचे पडसाद मात्र कायम आहेत. भारतीय राज्यघटनेने दिलेले अधिकार केवळ प्रशासकीय कामकाजासाठीच आहेत. त्याचा प्रत्यय आजच्या समाजव्यवस्थेत दिसून येतो. कायद्याने जरी अस्पृश्यता पालनास बंदी असली तरी भारतीय मानसिकतेत ती कायम आहे. हे खरातांच्या ‘कुस्ती’ या कथेतून लक्षात येते. ‘पहिली भाकर’ या कथेत गावगाड्यातील अस्पृश्यांना शेती करत असताना अस्पृश्य म्हणून अन्याय, अत्याचार सहन

करावा लागतो आणि शेवटी शेती सोडून द्यावी लागते. परंतु अशाही परिस्थितीत या कथेतील नायक नागोजी संघर्ष करण्यास प्रवृत्त होतो. पिकाची नासधुस, पडीक जमिन आणि पडीक जमिनीवर गावतील उच्चवर्णीयांचे असलेले पंचायती नियम अस्पृश्यांना न्याय देऊ शकत नाही. त्यामुळे गावातील अस्पृश्य समाज 'जशास तसे' या वृत्तीने संघर्ष करुन विजय होतो. ही कथा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श जपणारी आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर 'मी सुद्धा माणूस आहे' हे सिद्ध करणारी आहे. 'शेंदराची खोळ' या कथेत अंधश्रद्धा, अज्ञान आणि त्यातून सामान्याची होणारी आर्थिक पिळवणूक याचे वर्णन केले आहे. भारतातील मूर्तीपूजा करणारा समाज हा इतर समाजावर अंधश्रद्धेची छाप पाडून त्यांना बुवाबाजीच्या सवयी लावून पुजाऱ्याच्या माध्यमातून त्याचे पिढ्यान्पिढ्या शोषण करतो याचे चित्रण खरातांनी बुद्धाच्या मूर्तीला शेंदराची खोळ फासून नवसाला पावणाऱ्या गणपतीचे पितळ उघडे केले आहे. स्वातंत्र्याच्या सात दशकानंतरही भारतीय समाजव्यवस्थेत अंधश्रद्धा कायम राहावी ही शोकांतिका ते आपल्या 'शेंदराची खोळ' या कथेतून माडू पाहतात. 'बाजार' या कथेतून कामगारांचे होत असलेले शोषण कथित केले आहे तर 'गावाकडची वाट' या कथेतून खरातांनी कोरडवाहू शेतीवर उपजीविका न करु शकणारा समाज स्थलांतरीत होऊन स्वत:च्या पोटाची खळगी भरण्यासाठी अनेकांगी मेहनतीची कामे करीत असतो. गावाबाहेर राहून स्वत:चे कुटुंब चालवत असताना त्यांना विविध समस्यांना सामोर जावे लागते याचे चित्रण या कथेतून केले आहे. या कथेत आतापर्यत गाई वासरांना रानात जन्म देताना आपण पाहिले आणि ऐकले आहे. परंतु खरातांच्या कथेत मात्र माणसेसुद्धा स्थलांतरामुळे गावाबाहेर राहून प्राण्यांच्या वैशिष्ट्यांना पाळत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये हे प्रश्न महत्त्वपूर्ण होते पण जागतिकीकरणानंतरही असे प्रश्न आजही दलित समाजात कायम आहेत याची जाणीव ते करुन देतात. 'अक्षरांची वाट' ही कथा झोपटपट्टीतील अशिक्षितांना शिक्षणाची दारे खुली करुन देण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या दुर्दम्य आशावादातून लिहिली गेली आहे.

एकंदरीत खरातांच्या कथेतील विश्व हे उपेक्षित, शेतकरी, कामगार, भूमिहीन शेतमजूर समाजाचे प्रतिनिधित्व करणारे आहे. स्वभोवतालच्या जीवनातील, सामाजिक वास्तवातील कथाबीजे घेऊन खरांतांची कथा आकारास आली आहे. त्यांच्या सामाजिक जाणिवेतून मानवतावादी, विषमताविरहित समाजनिर्मितीची दृष्टी दिसते. शोषणातून मुक्त होणारी जाणीव माणसाच्या ठिकाणी निर्माण करणे हे खरातांच्या लेखनाचे प्रयोजन आहे. दलित साहित्यातील १९९० नंतरच्या लेखनात दलित जाणिवेने आकारास आलेला 'अक्षरांची पहाट' हा कथासंग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराची प्रेरणा घेऊन जन्मास आलेला धगधगता आविष्कार आहे. प्रकाश खरातांच्या कथेविषयी डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, ''खरातांच्या कथेत वेदनांचा आकांत जसा आहे तसा विद्रोहाचा गडगडातही आहे. वर्तमानातील सामाजिक संघर्षाची

लेणी खेदणारी ही कथा इतिहासातील घटितांनाही नव्या प्रतीकांच्या रूपात उभी करते. इतिहासातील घटनांचे आजच्या संदर्भात नवे अन्वर्थन सादर करण्याचे लक्षणीय कौशल्य ही कथा प्रकट करते. वैदिक—बौद्ध, नाग आणि वैदिक, क्रांती आणि प्रतिक्रांती यांच्या संघर्षाची मोठी प्रभावी चित्रे खरात साकार करतात. खरातांची कथाप्रतिभा मुख्यत्वे विचारशील आहे. पण ती भावकल्लोळांचेही तेवढेच समर्थ प्रत्यंतर घडविते. त्यांची भाषा ही बाबुरावांप्रमाणे अनेकदा विश्लेषक होते आणि काव्यमयही होते. आपली स्वतंत्र मुद्रा घडविण्यात या कथेला यश आले आहे.[६]

**जयराज खुणे**

जयराज खुणे हे १९९० नंतरच्या काळातील दलित जाणिवेने कथालेखन करणारे कथाकार म्हणून परिचित आहेत. त्यांचे 'आगडोंब' आणि 'विध्वंस' हे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्याच्या परिसरातील ग्रामीण दलितांच्या जीवनसंघर्षाचा, ताणतणावांचा, नवजाणिवांचा, उद्रेकी उठावांचा आणि प्रस्थापित व्यवस्था विध्वंसाचा ते शिलालेख कोरताना दिसतात. त्यांच्या 'विध्वंस' या कथासंग्रहातील बहुतांश कथाविशय हे 'दलित पॅन्थर' या सामाजिक संघटनेच्या भरभराटीच्या काळातील असल्यामुळे त्यांच्या कथेमधून अभिव्यक्त झालेले समाजजीवन, व्यक्तिरेखा, प्रसंग, वातावरण, भाषा, दुःख आणि वेदना तत्कालीन वास्तवातून प्रकट झाली आहे. त्यांच्या कथेचे मूल्य आणि प्रयोजन शोधताना त्याचा विचार होणे आवश्यक आहे.

जयराज खुणे यांच्या 'विध्वंस' या कथासंग्रहातील 'बेघर' या पहिल्याच कथेत वामनाच्या शेतात काम करणारा बगऱ्या पारधी भेटतो. बगऱ्या पारधी हा या कथेचा नायक आहे. या कथेत गावातील सोमा जाधवाच्या मुलाला लकवा होतो. त्यामुळे सोमा जाधवाच्या मुलाच्या उपचारासाठी बगऱ्या त्याला जंगलातील पारवा पकडून देतो. बगऱ्याने दिलेल्या पारव्यामुळे सोमा जाधवाचा मुलगा लकव्याच्या आजाराजून बरा होतो. पण पारव्याचे पैसे देण्यास सोमा जाधव टाळाटाळ करतो. पुढे बाजारात पैसे देतो असे आश्वासन सोमा जाधव बगऱ्याला देतो. त्यामुळे बगऱ्या त्याची बाजारात वाट पाहत असतो. पण त्यावेळी सुद्धा त्याच्या पदरी निराशाच येते. त्यामुळे गावाकडे परत येत असताना तो सोमा जाधवाच्या शेतातील मक्याची कणस तोडतो. त्यामुळे सोमा जाधव चोरीचा आळ घेऊन बगऱ्याला खूप मारझोड करतो. बगऱ्याने वामनाकडून कर्ज घेतले असते. त्या कर्जाच्या वसुलीसाठी वामन बगऱ्याकडे तगादा लावतो. कर्जाची परतफेड म्हणून बगऱ्या आपल्या घरची म्हैस वामनाला देतो आणि पुढे नाईलाजाने गाव सोडून जातो व बेघर होतो. भटक्या विमुक्त जातीच्या वाट्याला आलेला भोगवटा स्वातंत्र्याच्या सात दशकानंतर ही संपला नाही हेच जयराज खुणे यांनी या कथेतून स्पष्ट केले आहे.

बाणू, माया, विध्वंस, वसुली यासारख्या कथाही या कथासंग्रहामध्ये नव्या प्रभावी परिवर्तनशील विचाराला उन्नत करताना आढळतात. त्यांच्या कथेंच्या संदर्भात डॉ. केशव देशमुख यांनी, "सत्ताकारण, अंधश्रद्धा, विषमता आणि भ्रष्टता याच्या पुढे वर्तमान आणि काळ एका तगमगीच्याच बिंदूवर आला. त्या बिंदूला छेदून पुढे जाणारी आणि समाताधिष्ठित लोकशाहीचा स्वत:चा स्वर समाजात पेरणारी महत्त्वाची कथा या कथाकाराने मराठीला दिली"[७] असे मार्मिक विधान केले आहे ते यथार्थ आहे.

अशाप्रकारे दलित–ग्रामीण समाजाची व्यक्तिचित्रे त्यांच्या कथातून साकार होतात. व्यवहारवादी आणि भौतिकवादी नव्या मानसिकतेचा शोध हा खुणे यांच्या कथेचा गाभा असून दलित समाजातील अनेक प्रश्न आत्मप्रकटीकरणाच्या स्वरुपात त्यांच्या कथेतून साकार होताना दिसून येतात. माणूस कसा बदलतो. त्यांच्यात बदल कसा होतो. यांचे चित्रण करता करता आजच्या जागतिकीकरणाच्या युगात माणसात होत असलेले शारीरिक, मानसिक बदल प्रामुख्याने माणसापासून माणूस तोडण्याचे कार्य करत आहे असे सांगून वास्तवातील अंधश्रद्धा, रुढी, परंपरा आणि विषमता याचे पडसाद सामान्यांना कसे झेलावे लागतात हे जसराज खुणे यांच्या कथांमधून दिसून येते.

**दीपध्वज कोसादे**

दीपध्वज कोसादे यांचा 'पंचनामा' हा कथासंग्रह २०१० मध्ये प्रकाशित झाला. दीपध्वज कोसादे यांची कथा नव्वदोत्तर कालखंडातील स्वतंत्र प्रतिभेची व पूर्णपणे नवा बदलता आशयविश्व अभिव्यक्त करणारी कथा आहे. लेखक स्वत: प्रशासकीय क्षेत्रातील अनुभव संपन्न व्यक्ती असल्यामुळे त्यांच्या कथांनी बदलत्या काळातील विविध घटनांचा वेध घेतला आहे. त्यांच्या 'पंचनामा' या कथासंग्रहातून ग्रामीण–दलित समाजजीवनाचे वास्तव प्रतित होते. ग्रामीण–दलित समाजावर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराचे वर्णन त्यांनी आपल्या कथांमधून केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेने सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित असलेल्या घटकांच्या विकासासाठी अनेक कल्याणकारी योजना सुरु केल्या, पण त्या योजनांची प्रशासकीय यंत्रनेकडून योग्य अंमलबजावणी होऊ शकली नाही. त्यामुळे त्या योजना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकापर्यत पोहचल्या नाहीत. याचा पाढा 'पंचनामा'तील कथातून कोसादे यांनी वाचला आहे.

'सरला' या कथेतील सरला ही ग्रामीण व अज्ञानी स्त्री असली तरी भारतीय राज्यघटनेने दिलेल्या हक्क आणि अधिकाराप्रती ती जागरुक आहे. त्यासाठी संघर्ष करण्यास ती तत्पर आहे. म्हणजेच पारंपारिक दलित कथेतील नायिकेने सोसलेल्या उपेक्षिततेत बदल घडवून आणणारी नायिका आहे. स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर समाजात बदल घडून येत असल्याचे चित्र त्यांच्या कथेतून साकार होते.

'माहितीचा अधिकार' ही कथा नव्वदोत्तरी काळाचे प्रतिनिधित्त्व करताना दिसते. भारतीय राज्यघटनेने दिलेल्या हक्क आणि मूल्यासंबंधीची जागरुकता देण्याचे काम ही कथा करते. या कथेत सुभाष सोनवणे आणि सरपंच जयराम पाटील यांच्यातील संघर्ष कथालेखकाने न्यायिक पातळीवर रेखाटला आहे. या कथेचा नायक सुभाष सोनवणे असून तो कायद्याचा पुरेपुर वापर करुन शोषक प्रवृत्तीला आणि प्रशासकीय यंत्रनेला वठणीवर आणण्याचे काम करतो. हे प्रभावी शस्त्र त्याला आंबेडकरी विचारातून मिळाले असले तरी नियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यास समाजातील प्रत्येक दुर्बल आणि वंचित घटकापर्यत विकास पोहचू शकतो हे कथालेखकाने या कथेच्या माध्यमातून सूचित केले आहे. सर्वसामान्य माणसांच्या न्याय आणि हक्कासाठी अपेक्षित असलेला न्यायिक दृष्टिकोन कोसादे यांच्या 'पंचनामा' या कथासंग्रहात दिसून येतो. त्यांच्या कथांच्या संदर्भात कथा समीक्षक अरविंद सुरवाडे यांनी जे मत नोंदविले ते मार्मिक आहे. "पंचनामातील कथांना एका विशिष्ट प्रकारच्या भाषाशैलीचा साज आहे. विदर्भ—मराठवाडा आणि मध्यप्रदेशाच्या सीमेलगतच्या मुक्ताईनगर, बोदवड, जामनेर, ह्या तालुक्यातील वऱ्हाडी—मराठवाडी आणि हिंदीच्या मिश्रणातून तयार झालेल्या प्रादेषिक भाषेचा कौशल्यपूर्ण वापर कथालेखकाने आपल्या पात्रांच्या तोंडी केलेला आहे. जागतिकीकरणानंतरचे ग्रामजीवन, त्यातलं जगणं, जगण्यातले डावपेच याचं मनोहारी तलम वस्त्र कोसादे यांनी कुशलतेने कथेच्या माध्यमातून विणले आहे."[८]

दीपध्वज कोसादे यांच्या 'पंचनामा' या कथासंग्रहातील कथांवरुन असे लक्षात येते की, जागतिकीकरणाच्या काळातील बदलते ग्रामजीवन, बदलते जीवन जगण्याची शैली, मूलभूत हक्क आणि कायद्याची जाणीव आणि स्वत:चे जीवन जगण्याचे अनेकांगी मार्ग वाचकांना प्रेरणा देऊन जातात. दलित—आंबेडकरी कथांमधील ही परिवर्तनीय वाटचाल मानवी कल्याणाच्या दृष्टीने हितकारक ठरले अशी आहे.

**गौतमीपुत्र कांबळे**

नव्वदोत्तरी दलित कथेतील वेगळेपणा मांडणारे कथालेखक म्हणून गौतमीपुत्र कांबळे ओळखले जातात. पारंपरिक दलित—आंबेडकरी कथांपेक्षा वेगळ्या पद्धतीची कथा त्यांच्या 'परिव्राजक' या कथासंग्रहातून अभिव्यक्त झाली असून आंबेडकरी कथाविश्वाविषयी घट्ट नाते जोडणारा आशय त्यांच्या कथांच्या माध्यमातून व्यक्त झाला आहे. या कथासंग्रहात कथा, परिव्राजक, शिल्पासन, विरुपीनगरी आणि शोध सहाव्या इंद्रियाचा अशा एकूण पाच कथा आहेत. "प्रगल्भ भाषा, चिंतनाच्या पातळीवर घेऊन जाणारा आशय, मानवी जीवनाचे चिंतन मांडणारा त्याला नवे भान देणारा विषय या कथांमधून प्रकट झाला आहे. सामान्य वाचकांच्या ज्ञानकक्षेला आव्हान देणारे कथाबीज या कथासंग्रहातून अवतरले असले तरी, आंबेडकरी कथेमध्ये एक मैलाचा दगड ठरणारा संग्रह म्हणून त्याकडे बघावे लागेल. यातील प्रत्येक कथा,

त्यातून साकारलेले भावविश्व यात वाचक इतका रममान होतो की पुढे नेमके काय घडणार हे याची उत्सुकता ताणण्याचे अप्रतिम कौशल्य आणि निवदेन पद्धती लेखकाने प्रसवली आहे. ”[९] त्याच्या ‘परिव्राजक’ या कथासंग्रहातील ‘परिव्राजक’ ही कथा बुद्धसंस्कृतीशी नाते जोडणारी आहे. ती वाचकांना एक चांगला विचार प्रदान करताना दिसते. या कथेतील अनिशा आणि नैसर यांच्यातील संवाद वाचकांना विचार करण्यास भाग पाडतात. दंडगिरीच्या वाटेने जाणारा नैसर जेव्हा अनिशाजवळचे पाणी पितो आणि तिच्याबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा अनिशा त्याला म्हणते ‘मी माणसाच्या जंगलातून फिरत आहे, शोध घेत आहे मनुष्याचाच की ज्याला दोन पाय आणि हात आहेत.’ अनिशाच्या या उत्तरातून नाना तऱ्हेचे प्रश्न कथालेखकाने वाचकांच्या समोर निर्माण केले आहेत. त्यांच्या कथेतील पात्राच्या तोंडी असणारे संवाद वैचारिकतेचे दर्शन घडवितात. प्रसंगपरत्वे कथालेखक प्रश्नोत्तर रुपाने सामाजिक वास्तवातील प्रश्न मांडतो. त्यामुळे यांची कथा जागतिकीकरणाच्या युगात माणसांचे हरवलेपण शोधताना दिसते. त्यांच्या कथेच्या संदर्भात राजा ढाले यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. “ ‘गौतमीपुत्रांची कथा’ म्हणजे गळलेल्या वाटेने जायचं हे मुळातच नाकारणारी, स्वत:चा मार्ग स्वत:च शोधत पुढे जाणारी आणि इतरांसाठी आपल्या अमिट पाऊलखुणा, आपला वेगळा ठसा भान ठेवणारी आणि आपल्या नव्या जीवनानुभूतीने इतरांच भावविश्व अनुभवविश्व व विचारविश्व संपन्न करणारी कथा आहे.”[१०] नव्वदोत्तरी साहित्याच्या कालखंडात गौतमीपुत्र कांबळे यांची कथा बदलत्या कालिक परिणामाचा सर्वंकष शोध घेताना दिसते. त्यांनी आपल्या कथांमधून बुद्धापासून ते जागतिकीकरणाच्या युद्धापर्यंतचा आशय अभिव्यक्त केला असून मानवी जीवनातील माणूसपणाचा शोध घेतला आहे.

केशव मेश्राम यांनी ‘कोळिष्टके’ (१९९०), ‘खांडवन’ (१९९७), ‘आसूडवळ’ (२००५), ‘धुळवावटळ’ (२००५) या कथासंग्रहातून दलित जीवनाच्या शोषनाचा व्यापक शोध घेतला आहे. अभिताभ यांचे ‘लवटा’ (१९९०), ‘अंधारयात्री’ (२००१) हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. उर्मिला पवार यांचे ‘चौथी भिंत’ (१९९०) आणि ‘हातचा एक’ (२००४) हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. या कथासंग्रहातून सवर्णाकडून आणि पुरुषप्रधान संस्कृतीकडून दलित स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचे चित्रण साकार झाले आहे. स्त्रियांचे दुहेरी पातळीवर होणारे शोषण उर्मिला पवार यांनी आपल्या कथासृष्टीतून रेखाटले आहे. या कथातून त्यांनी आई, बहीण आणि बायको अशी स्त्रीची नानाविविध रूपे शब्दबद्ध केली आहेत. धर्मराज निमसरकर हे १९८० पासून सातत्याने कथालेखन करत असून त्यांच्या ‘वेदनास्पर्श’, ‘आंदोलन’ ‘संकेतबंड’ आणि ‘ठसठसणाऱ्या जखमा’ इत्यादी कथासंग्रहातील कथा पारंपरिक दलित कथेपेक्षा आशयाभिव्यक्तीच्या अंगाने काहीशा वेगळ्या वाटेने जाणाऱ्या आहेत.

जालंदर सोनुने यांचे 'हिमोड' (१९९२) आणि 'संवेदना' (१९९९) हे दोन कथासंग्रह प्रसिद्ध असून या कथासंग्रहातील कथा व्यक्तिचित्रणपर आहेत. किरायाने घर शोधणाऱ्या दलित अधिकाऱ्यालाही जात विचारली जाते. त्याला घर मिळत नाही. अशी समाजाची अधोगती आणि सामाजिक विकृती त्यांनी आपल्या कथासृष्टीतून चव्हाट्यावर मांडली आहे. काळ्या आणि पांढऱ्या मानवी प्रवृत्तीचा शोध जालंदर सोनुने यांची कथा घेते.

प्रकाश मोगले यांचा 'कासव' (१९९९) हा कथासंग्रह प्रसिद्ध आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वानानंतर आंबेडकरी चळवळीतील नेत्यांनी चळवळीचे जहाज बुडविले. त्यामुळे आंबेडकरी समाज अपंग झाला. डॉ. आंबेडकरांची चळवळ विकून खाणाऱ्या सर्वच खलपात्रांना प्रकाश मोगले यांनी 'कासव' या कथासंग्रहातून धारेवर धरले आहे. संजय लांडगे यांनी 'मातृभूमी' या कथासंग्रहातील कथातून बहिष्कृतांच्या दु:खाचा वेध घेतला आहे.

सुदाम सोनुले हे समता सैनिक दलाचे एकनिष्ठ कार्यकर्ते आणि आंबेडकरी चळवळीत स्वत:ला निष्ठेने झोकून देणारे कवी म्हणून परिचित आहेत. त्यांनी 'डंख' (२०१६) या कथासंग्रहातून बदलत्या कालमानाचा शोध घेतला आहे. अत्यंत निष्ठेने आंबेडकरवाद जगणाऱ्या आणि जागवणाऱ्यांचा गौरव त्यांच्या कथेतून होतो. त्यांच्या 'डंख' या कथासंग्रहातील कथा चिंतनशील आणि प्रबोधनपर आहेत. नव्वदोत्तरी काळात बदललेल्या आंबेडकरी विचारांना कसे व्यवहारी बनवले गेले आणि आपलीच माणसे निष्ठावंत कार्यकर्त्यांचा कसा छळ करतात याचे चित्रण त्यांच्या कथातून साकार झाले आहे. डॉ. पद्माकर तामगाडगे यांचा 'पारकथा' (२०१३) हा कथासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांच्या कथांचा बाज हा ग्रामीण असून त्यांच्या कथा वाचकांना खिळवून ठेवून मानवी समाजात संस्कारमूल्य रूजविण्याचे काम करतात. मानवी स्वभावाचे विविध पदर त्यांची कथा उलगडून दाखवते.

नव्वदोत्तरी दलित–आंबेडकरी कथेत योगिराज वाघमारे 'पिपंळपान' (२००३), 'बहिष्कार' (२००८) आणि 'भीमयुग', प्रेमानंद गज्वी 'ढीवर डोंगा' (२००९), प्रज्ञा पवार 'अफवा खरी ठरावी म्हणून....' (२०१०), किशोर घोरपडे 'दलदल' आणि 'धुसमटणी', प्रकाश मोगले 'धम्मद्रोही' आत्माराम गोडबोले 'संगर' आणि 'सुर्यस्तूप', संजय डोंगरे 'वप्रमंगल', रमेश बनसोड 'सावलीची बहिण' इत्यादी कथा लेखक दलित–आंबेडकरी कथाकार कथा लेखन करून या कथा प्रवाहाला समृद्ध करीत आहेत.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले दलित साहित्य आज भारतीय साहित्य म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. साधातरणत: १९३३ पासून दलित आंबेडकरी साहित्य विकसित होताना आढळत असले तरी १९६७ नंतर अस्मिताच्या पीठावरुन निखळ दलित–आंबेडकरी साहित्य चळवळीचा उगम झाला.

नव्वदोत्तरी दलित—आंबेडकरी कथा प्रवाहातील बहुतांश कथाकारांनी आंबेडकरी विचारांशी नाळ जोडूनच आपला कथाविष्कार केला आहे. दलित—आंबेडकरी कथेतील चित्रण हे समता मानणाऱ्या व समता निर्माण करु पाहणाऱ्या माणसांचे आहे. त्यामुळे या कथेने निर्माण केलेला संघर्ष हा समताविरोधी असा आहे. या कथासृष्टीने उपेक्षितांच्या मनातील भावभावनांचे चित्रण रेखाटले आहे. या कथेतून प्रकट झालेले समाजजीवन हे मराठी कथेतील समाजजीवनाहून वेगळे आहे. पारंपरिक रंजनवादी कथेतून व्यक्त झालेल्या जीवनदृष्टीहून या कथेतील जीवनदृष्टी वेगळी आहे. शोषितांच्या आयुष्याचे चित्रण करणे हा या कथेचा मुख्य गाभा आहे. त्यामुळे अस्पृश्य, दलित, बहुजन व भटक्या जमातीचे व बहिष्कृत माणसांचे जगच दलित—आंबेडकरी कथेत आविष्कृत झाले आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही भारतीय समाजातील बहुतांश माणसे दुःख भोगत असून या दुःखाचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण होत आहे. परंतु याचा कोणीही विचार केला नाही. त्यांच्या भावना साहित्याचा विषय झाला नाही. या माणसांचा भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळातील अंतः प्रवाहाचा स्पर्श मराठी कथेला झाला नाही. परंतु दलित—आंबेडकरी कथेने त्यांच्या समग्र जीवनाचे दर्शन घडविण्याचा खूप मोठा प्रयत्न केला असे दिसून येते. स्वातंत्र्योत्तर काळात आणि त्यानंतर जागतिकीकरणाच्या काळातही शोषित मानसाच्या प्राथमिक गरजा पूर्ण झालेल्या नाहीत. त्यांच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या प्रश्नाची सोडवणूकही प्रशासकीय यंत्रनेला सोडविता आलेली नाही. त्यामुळे खेड्यात आणि डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या उपेक्षित भारतीयांना आधुनिक जगाचा स्पर्श झाला नाही. ही खंत दलित—आंबेडकरी कथालेखकांचा मनाला बोचत राहिली आणि त्यातून अनेक कथालेखकांच्या कथांची निर्मिती झाली.

दलित—आंबेडकरी कथेतून जो संघर्ष आला तो अन्यायाविरुद्धच्या जाणिवेतून आला आणि त्याला वाचा फोडण्याचे कार्य अनेक कथा लेखकांनी आपल्या कथांच्या माध्यामातून केले आहे. दलित—आंबेडकरी कथेने मराठी कथासृष्टीला नवे जीवनमूल्य दिले. शोषितांच्या आयुष्याला परिवर्तनवादी विचाराची दिशा दिली. पारंपरिक जगण्याला महत्त्व न देता नव्या जगण्याचा स्वीकार केला. गजानन बनसोड आणि दिवाकर सदाशिव यासारखे कथालेखक वाढती धर्मांधता, ग्रामीण समाज आणि तेथील उतरंडी, ओ.बी.सी. बांधवांच्या शिक्षणाचे प्रश्न, अंधश्रद्धेला दिलेले बळकटीकरण, भटक्या जातीवरील अन्याय, अत्याचार असे अनेक विदारक समकालीन प्रश्न आपल्या कथांतून मांडत आहेत. वरील विवेचनावरुन आपणाला या कथेची काही निष्कर्ष नोंदविता येतील ती खालीलप्रमाणे.

१. दलित—आंबेडकरी कथेच्या निर्मितीचे प्रमुख प्रयोजन दलित आत्मभान आहे आणि हे आत्मभान दलित चळवळीतून उदयास आले असल्यामुळे दलित—आंबेडकरी कथेचा आणि दलित चळवळीचा संबंध परस्परपुरक आहे.

२. स्वभोवतालचे वास्तव, समाजातील दलितांची स्थिती आणि त्यांना दलितेतर समाजाकडून मिळणारी उपेक्षित वागणूक यासंदर्भात दलित—आंबेडकरी कथालेखक स्वत:ला न्याहाळतो.

३. वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था आणि धर्मव्यवस्था इत्यादी ज्या ज्या गोष्टी मानवी स्वातंत्र्याच्या आड येतात. त्यांना दलित—आंबेडकरी कथेने आणि एकूणच या साहित्यप्रवाहाने नाकारले आहे आणि त्यासंबंधी विद्रोह केला आहे. ह्या विद्रोहाच्या मुळाशी मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार आहे. माणूस मानसाशी न्याय आणि समानतेने वागेल असा अशावाद दलित—आंबेडकरी कथेतून प्रकट झालेला आहे.

**संदर्भसूची**


*१. डॉ. अविनाश सांगोलेकर : दलित साहित्य: उगम आणि विकास, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१० पृ. क्र. ७६*

*२. जयंत पवार : फिनिक्सच्या राखेतून उठला मोर, लोकवाङ्मय गृह मुंबई, तृतियावृत्ती २०१३, पृ. क्र. १८*

*३. जयंत पवार : फिनिक्सच्या राखेतून उठला मोर, पृ. क्र. ५५*

*४. जयंत पवार : फिनिक्सच्या राखेतून उठला मोर, पृ. क्र. ५६—५७*

*५. डॉ. प्रकाश खरात : अक्षरांची पहाट, प्रबोधन प्रकाशन नागपूर, पृ. क्र. ३३*

*६. डॉ. यशवंत मनोहर : आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, द्वितीयावृत्ती २०१२, पृ. क्र. २६०*

*७. डॉ. भास्कर पाटील : सर्वधारा नव्वदोत्तरी मराठी कथा विषेशांक, सर्वधारा प्रकाशन अमरावती, एप्रिल—मे—जून २०१७, पृ. क्र. ८४*

*८. डॉ. भास्कर पाटील : सर्वधारा नव्वदोत्तरी मराठी कथा विषेशांक, एप्रिल—मे—जून २०१७, पृ. क्र. ८८*

*९. डॉ. भास्कर पाटील : सर्वधारा नव्वदोत्तरी मराठी कथा विषेशांक, एप्रिल—मे—जून २०१७, पृ. क्र. ८०*

*१०. डॉ. भास्कर पाटील : सर्वधारा नव्वदोत्तरी मराठी कथा विषेशांक, एप्रिल—मे—जून २०१७, पृ. क्र. ८०*

# समकालीन मराठी कादंबरी

**सहा. प्रा. उषा सिताराम पाटील**
*(मराठी विभाग), आर.एन.चांडक आर्ट्स,जे.डी.बिटको कॉमर्स,एन.एस.चांडक सायन्स कॉलेज, नाशिक रोड, नाशिक भ्रमणध्वनी – ८९२८३१२०३२/८६०५४१४१६३*
*चलभाषा – ushapatil2020@gmail.com*

## प्रास्ताविक :-

समकालीन हा शब्द काळाचा निर्देश करणारा आहे. त्या त्या विशिष्ट काळातील सामाजिक,राजकीय,आर्थिक आणि अन्य प्रकारचे समस्या,त्यातील ताण,त्या काळातील विचार यांचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. त्यामुळे प्राचीन,अर्वाचीन आणि समकालीन अशा परंपरा साहित्यात मानल्या गेल्या. सन १८८५ ते १९२० या काळात अर्वाचीन किंवा आधुनिक साहित्य असे म्हंटले जाते.सन १९२० ते १९४५ पर्यंतचा काळ हा आधुनिक साहित्याचा काळ म्हणून ओळखला जातो. सन १९४५ पासून पुढच्या साहित्याला समकालीन साहित्य ही संज्ञा आहे. त्याला नवसाहित्य किंवा अत्याधुनिक साहित्य असेही म्हणतात. सन १९४५ ते सन १९६० पर्यंतच्या साहित्याला नवकथा,नवकविता, नवकादंबरी असे म्हणतात. सन १९६० नंतरच्या साहित्याला समकालीन संज्ञा आहे.

## समकालीन साहित्य,संकल्पना व स्वरूप :-

समकालीन म्हणजे काळाबरोबर असणे,एकाच काळात अस्तित्वात असणे. समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे. ज्या काळात ते निर्माण होत असते त्या काळातील प्रतिबिंब त्या काळात आहे. त्या काळातील मते,जाणीवा,विचार ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य. समकालीन साहित्य हे आपल्या काळातील परिस्थि तीशी जवळचे नाते सांगते. या काळात घडलेल्या घटनांचे पडसाद या साहित्यातून उमटतात. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक परिस्थिति झालेल्या बदलांचे इष्टानिष्ट परिणाम भारतीय समाज जीवनावरही झालेले दिसून येऊ लागले. औद्योगीकरण वाढले. यंत्रयुगाचा परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर जाणून लागला ते आपणास आनंद यादव यांच्या 'गोतावळा' या कादंबरी तून दिसून येते. एकूणच स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यावर दुसरे महायुद्ध,गांधीवाद,मार्क्सवाद इत्यादी विचार प्रणाली सार्वत्रिक शिक्षण प्रसार, पाश्चात्य वाङमयीन प्रवाहांचा वाढता परिचय, बदलते समाज जीवन इत्यादी अनेक घटकांचा प्रभाव पडला आहे. या काळात मध्यम वर्गाच्या चित्रणाबरोबरच ग्रामीण,प्रादेशिक, वन्य जीवनातील विविध सुख-दुःखांचे चित्रण होऊ लागले . माणसाच्या अथांग मनाच्या तळाचा,तिथल्या भावना,विचार कल्पनाचा वेध घेण्याचा प्रयत्न झाला.व्यापक जागतिक किंवा राष्ट्रीय घटनांच्या पार्श्वभूमीवर मानवी जीवनातील उलथा पालथीचे चित्रण करण्याचा प्रयत्न झाला.पेंडशांच्या कादंबरीतून कोकणचे लोक जीवन त्यांच्या संस्कृतीसह साकार झाले . समकालीन कादंबऱ्यातून मनुष्य व त्याचे अंतर्विश्व यांच्यातील संघर्षाचे चित्रण करण्याचा प्रयत्न होऊ लागला .

उद्धव शेळके,भाऊ पाध्ये,मनोहर शहाणे,भालचंद्र नेमाडे,चि.त्र्यं . खानोलकर,हमीद दलवाई,मनोहर तल्हार,वामन इंगळे,चंद्रकात खोत,बाबुराव बागूल,सुभाष भेंडे,अनंत कदम,ह.मो.मराठे असे नवीन कादंबरीकार या काळात उदयाला आले. समाजाच्या विविध स्तरातील जीवन या कादंबऱ्यातून मूर्त झाले.सन १९६० नंतर रंजन प्रधान कादंबऱ्याचे युग संपुष्टात येऊन वास्तववादी कादंबऱ्यानचा काळ सुरू झाला. ग्रामीण-प्रादेशिक, दलित, राजकीय,ऐतिहासिक,पौराणिक अशा अनेक दिशांनी लेखन होऊ लागले. व्यक्ति व समाज यातील दुवा या कादंबरीने साधला. सन १९७५ च्या आंतरराष्ट्रीय स्त्री वर्षानंतर स्त्रीवादी जाणीव मुळ धरू लागला.सार्वत्रिक शिक्षण प्रसारामुळे अनेक उपेक्षित समाजस्तर जागृत होऊ लागले आणि साहित्याच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्याचा प्रयत्न करू लागला. या नवकादंबरीचे वेगळेपण नोंदविताना विनाश सप्रे म्हणतात, "नवकादंबरी ही नायक,नायिका,वातावरण,शैली अशा पद्धतीने रचल्या जाणाऱ्या पारंपरिक कादंबरी पेक्षा वेगळी होती माणसांचे स्वतःशी,इतरांशी आणि निसर्गाशी असलेले संबंध अधिक नेटकेपनाणे या कादंबरीत आढळतात. जीवनात घडणाऱ्या बऱ्या वाईट गोष्टीची दखल नवकादंबरी घेतांना दिसते. नवकादंबरी अनेक स्तरावरील अनुभव विश्व साकारते", हे मत विचारात घेता स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी याही पुढे अनेक अंगानी विकसित झालेली दिसते.

**समकालीन मराठी कादंबरीतील ग्रामीण जीवनाची स्वरूप :**

ग्रामीण साहित्याची केंद्रवर्ती जाणीव म्हणजे शेतकऱ्यांचे दु:ख, त्यांचे शोषण व शोषक व्यवस्थेचे रूप उघड करणे. गेल्या अनेक वर्षापासून ग्रामीण कृषी व्यवस्थेची पडझड होत आहे. ग्रामीण माणसाचे शोषण चहूबाजूनी होत आहे. शेतीवरील अनेक संकटे,शेतीमालाचे घसरणारे भाव,वाढता उत्पादन खर्च,बँकाची वित्त पुरवठयाबाबत अनास्था,सरकारी नोकरशाही लाचखोरवृत्ती, सावकारीचा पाश, भयानक दारिद्रय,शेतकऱ्यांचे शिक्षित पिढीच्या वाटयास आलेली तीव्र बेकारी,राज्यकर्त्यांची शेतीविषयी उदासीनता व एकूणच शेतकऱ्यांचा संपूर्ण व्यवस्थेवरील उडालेला विश्वास,भ्रमनिरास,व वैफल्यग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या अशा बहुविध आशयसूत्र व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्या या कालखंडात लक्षणीय ठरतात यात बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दूध दे' (१९८५), 'वारूळ' (२००४), शेषराव मोहिते यांची "धुळपेरणी" (२००१) आनंद पाटील 'कागूद आणि सावली',माधव कोंडविलकर "डाळ" (१९९६) इत्यादी कादंबऱ्यांचा उल्लेख करावा लागतो.

बाबाराव मुसळे यांनी "हाल्या हाल्या दुधू दे" मधून शेतकऱ्यांच्या अडचणी, समस्या,सावकारी कर्ज इत्यादी संदर्भात कृषी अर्थकारणाचा विचार मंडला आहे. 'बारोमास ' ही या कालखंडातील लक्षणीय कादंबरी ठरते.समकालीन वास्तवाला अधोरेखीत करत, कृषी व्यवस्थेची पडझड, अलीकडच्या काळातील महत्वपूर्ण बदल आणि सुशिक्षित बेकार एकनाथची व्यथा, घुसमट मांडणारी कादंबरी ठरते. "ज्याच्या घरात बारोमास अन्नधान्यानं भरलेल्या कणग्या असायच्या,बारोमास दुधाची गंगा वाहायची,बारोमास शेतीच वैभव घरात नांदायच आणि बारोमास घरात पैसा खुळखुळायचा ती सर्वच सधन घराणी आता कृषी रत्न पुरस्कार घेणाऱ्या रावसाहेब नरूभाऊ सारखी आणि सुभाष तणपुरे सारखी कमालीची दरिद्री आणि कर्जबाजारी

झालेली आहेत.भारतीय शेती आणि शेतकरी पुरेपूर कंगाल झालेले आहे . नव्या पिढीस शेतीविषयी तिटकारा निर्माण होत आहे. खुल्या आर्थिक धोरणाचे,जागतिकीकरणाचे शेतीवर परिणाम होत आहे. यासह बारोमास शेतकऱ्यांची वेदना प्रकट करते.

उद्धव शेळके यांच्या ‘धग ‘ या कादंबरीत वऱ्हाडीतील ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण केलेले आहे. धग या कादंबरीत माणसाला असह्य करणारे दारिद्र्य,अज्ञान,अंधश्रद्धा,माणसाची हतबलता, रूढी परंपरा जपणारे मानवी मन यांचे चित्रण केलेले आहे. या कादंबरीतून वऱ्हाडचा प्रदेश त्यांनी बोलीसह साकार केला आहे. या कादंबरीतील कौतिक व तिच्या कुटुंबाचे उद्ध्वस्त होणे हे एखाद्या प्रदेशापुरते मर्यादीत नाही. मानव जिद्दीने संघर्ष करतो आणि त्यात पराभूत होतो. आधुनिक काळात महानगरांचे यांत्रिकीकरण होऊ लागलेले आहे आणि खेड्यातही या यांत्रिकीकरणाची सुरुवात होऊ लागली आहे. याची जाणीव आनंद यादव यांच्या ‘गोतावळा’ या कादंबरीतून होते.गोतावळा या कादंबरीत शेतात राबणारा नारबा आणि त्याचा गोतावळा म्हणजे बैल,म्हैस,रेडे,घोडा,कोंबडा,कासव,शेरडी,कुत्री,कोंबडीची पिल्ले या सर्वांशी असलेले नारबाचे जवळचे नाते व यांच्यासोबत रात्रंदिवस राहणारा नारबा यांचे चित्रण यात आहे. नंतर याच शेतात ट्रॅक्टर येते व यामुळे नारबाचे जीवन उद्ध्वस्त होते.बदलते ग्रामजीवन,बदलती मूल्ये,मनुष्याच्या बदलत्या वृत्ती,मनुष्याची व्यापारीकरणाकडे चाललेली वाटचाल यांचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत आलेले आहे .

या काळात ऐतिहासिक व पौराणिक कादंबऱ्याच लोकप्रिय झाल्या.शिवाजी सावंत यांच्या मृत्युंजय या कादंबरीत कर्णाची जीवनकथा आहे. सूतपुत्र म्हणून अवहेलना झालेल्या कर्णाच्या कथेला आजच्या काळातील बहिष्कृत आणि उपेक्षितांच्या जीवनाचा संदर्भ या कादंबरीत दिलेला आहे.सन १९६३ ‘धाकटे आकाश ‘(मनोहर शहाणे),माणूस या कादंबऱ्यामध्ये ग्रामीण व शहरी वातावरणाच्या दरम्यान तालुक्याच्या,जिल्ह्याच्या गावाचे वातावरण आढळते. मुंबई,पुणे या शहरातील मध्यम वर्गीयांच्या जीवनावर केंद्रित झालेली कादंबरी अशा छोट्या शहरातील मध्यमवर्गीय जीवनांचे चित्रण करते. ‘माणूस’ (मनोहर तल्हार) मध्ये त्यांच्या भोवतालच्या मोठ्या माणसांचे हिंदू व मुसलमान अशा दोन रिक्षावाल्या दोस्तानची कहाणी आहे. या कादंबरीची भाषा हिंदी व मराठी अशी संमिश्र स्वरूपाची आहे. या कादंबरीत मध्यम वर्गाच्या पलीकडे आर्थिकदृष्ट्या खालच्या स्तरावर असलेल्या जीवनाचे शोकात्म चित्रण केलेले आहे. ‘चक्र’ जयवंत दळवी यांची ही कादंबरी मुंबई सारख्या महानगरातील झोपडपट्टीतील मानवी आहे.मुंबई सारख्या महानगरात उदंडपणे वाढलेली मोडक्या तोडक्या खोपटांची वस्ती आणि त्या राहणाऱ्या दलितांची व गुन्हेगारी वृत्ती असलेल्या माणसांची नियती,सामाजिक,आर्थिक स्थिति यांनी चालवलेली ससेहोलपट काही प्रमाणात या कादंबरीत व्यक्त झालेली आहे. प्रभाकर पेंढारकर यांच्या ‘अरे संसार संसार’ या सन १९७१ या कादंबरीत मुंबईसारख्या महानगरातल्या जागेच्या टंचाईचा प्रश्न त्यांनी अतिशय समर्पकपणे मांडला आहे.या कादंबरीत एक मध्यमवर्गीय सामान्य कारकुनाचे काम करणारा,विचारपूर्वक निर्णय घेऊन संसार थाटणारा कर्जाच्या हपत्यावर मुंबईत चिमुकल्या घराचे स्वप्न बघणारा एक संवेदनशील तरुण व त्याच्या इतके विचारी व भावनाप्रधान अशी त्याची पत्नी यांची ही कथा आहे. महानगरात राहणाऱ्या सामान्य माणसाला

माणसासारखे जगता येत नाही,घरासारखी सामान्य वाटणारी समस्या सोडवता येत नाही ही त्याची शोककथा पेंढारकरांनी त्यांच्या कादंबरीतून मांडली आहे.

**समकालीन मराठी कादंबरीतील दलितांच्या जाणिवांचे स्वरूप :**

समकालीन कालखंडातील कादंबऱ्या वास्तव चित्रणाच्या बाबतीत उजव्या आहेत.दलित जीवनातील विविधांगी वास्तव त्यांनी स्वीकारले आहे.दलित कादंबरीतून मोठ्या प्रमाणात सामाजिक भान उजागर झालेले दिसते. स्त्रियांच्या समस्या,वैज्ञानिक दृष्टीकोन, समाजातील विविध समकालीन समस्या भूक,दारिद्रय,दुःख,उपासमार,दलित जातीतील श्रेष्ठ कनिष्ठ भाव यांना मोठ्या प्रमाणात समकालीन दलित कादंबरी अभिव्यक्त करते.अशोक व्हटकर यांच 'मेलेल पाणी', नामदेव ढसाळ यांचे 'हाडकी हाडवळा', नामदेव कांबळेंचे 'राघववेळ',प्रेमानंद गज्वी यांचे 'जागर' इ.या कालखंडातील महत्त्वाच्या कादंबऱ्या ठरतात . यातील काही कादंबऱ्यांचा विचार करता भीमसेन देठेंच्या 'इस्कोट' मधून खेड्यातून शहरात आलेल्या दलित तरुणाला शहरी संस्कृतीशी जुळवून घेताना कोणकोणत्या समस्यांमधून जावे लागते याचे चित्रण येते. माधव कसबेंच्या 'नकुल'मधून मराठा जाती विरुद्ध दलितानी दिलेला संघर्ष येतो.नामदेव ढसाळांच्या 'हाडकी हाडावळा'तून प्राप्त परिस्थितीत बलुत्याची काठी स्वीकारून स्वाभिमानाने जगू पाहणाऱ्या कथा स्त्रीची रेखाटतात. स्वाभिमान जागृत दलित माणसांचे मानसिक परिवर्तन हेच उपरोक्त बहुसंख्य कादंबऱ्यांचे सूत्र आहे. नामदेव कांबळेंच्या 'राघववेळ' मधून एक अलक्षित,अस्पर्शीत ,मातंग समाजाची कथा-व्यथा ते साकारतात. राघववेळ ही वालबी नावाच्या मातंग जातीतील मातेची जीवनकथा आहे. ही मातंग जात गावगाड्यातील एक भाग असते.म्हणून ती मातंगाच्या जातीबरोबर गावगाड्याची स्थितिगती सांगते. हा गावगाडा एकूण समाज व्यवस्थेचा भाग असतो म्हणून त्यातील जातीचे कटू वास्तव आणि श्रमजीवीच्या शोषणाची कटू करून कहाणी सांगत.

**समारोप :**

मराठी कादंबरीत पूर्वापार चालत आलेले मध्यम वर्गीय जीवनचित्रण क्षीण होत जाऊन या काळातील कादंबरी ग्रामीण समाज,दलित समाज,आदिवासी समाज,नक्षत्र वादी, मुस्लिम समाज,स्त्री समूहाचे दुःख इ. घटकाना मोठ्या प्रमाणात अविष्कृत करताना दिसते . महानगरीय,ग्रामीण,दलित,आदिवासी कादंबरी या कालखंडात शोषणाच्या परंपराचा शोध घेताना आढळते. समाजात झालेल्या विविध चळवळी, राजकीय, सामाजिक स्थित्यंतरे, शहरीकरण, औद्योगिकीकरण, सहकार चळवळ ,दलिताचा, स्त्रियांचा राजकीय प्रक्रियेत वाढणारा सहभाग,त्यातून निर्माण झालेल्या पेच,जागतिकीकरणाने निर्माण केलेले असंख्य प्रश्न या वातावरणात वंचित समूहाची होणारी घुसमट अलीकडच्या कादंबऱ्या प्रामुख्याने व्यक्त करीत आहेत.

**संदर्भसूची :**


*१) डॉ. रवींद्र ठाकूर : 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा' दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्र.आ.१५ मे २००७*

*२) डॉ. नंदा मेश्राम : दलित कादंबरी : स्वरूप व समीक्षा, डिंपल प्रकाशन, ठाणे, प्र. आ. १६ डिसेंबर २००६*

*३) समकालीन साहित्य : य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक*

*४) सप्रे अविनाश : स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरी*

# समकालीन आदिवासी कादंबरी

**श्री. हर्षल गेडाम**
*संशोधक विद्यार्थी*
**डॉ. कोमल ठाकरे**
*मार्गदर्शक*

१९९० नंतरचा कालखंड हा भारतीय समाज जीवनाच्या स्थित्यंतराचा कालखंड आहे.तसाच हा कालखंड समकालीन साहित्याच्या अनुषंगाने सुद्धा महत्वाचा आहे. या कालखंडात अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक स्थित्यंतरे घडुन आली. आणि संपूर्ण समाजजीवनाचा चेहरा - मोहराच बदलून गेला. सन १९९० नंतर खाउजा धोरणाचे जसे समाजजीवनावर अनुकुल - प्रतिकूल परिणाम झाले. तसेच साहित्यविश्वावर सुध्दा अनेक परिणाम झाल्याचे आपणास दिसून येते. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या लाटेत वाड्मयप्रकारांची वैशिष्ट्ये काहीशी बदललेली दिसतात. या त्रयीमुळे सामान्य माणसांची जीवनशैली बदलली. विचारांच्या दिशा आणि भाषा बदलल्या, समुहहितापेक्षा स्वहिताला अधिक महत्व आले. आणि मानवी समाजमनाची संवेदनशीलतेकडून असंवेदनशीलतेकडील वाटचाल याच कालखंडात झाल्याची आपणास दिसते. या त्रयीचा परिणाम शहरी, निमशहरी, ग्रामीण, दलित आणि आदिवासी या सर्वच समाजसमुहावर कमी अधिक प्रमाणात झाला आहे. खाउजा नंतर बदललेली अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, कृषीव्यवस्था, कामगारांच्या समस्या, दलितांच्या समस्या, शेतकरी आत्महत्या, दहशतवाद, नक्षलवाद या सार्‍यांचे प्रतिबिंब समकालीन मराठी साहित्यात मोठया प्रमाणात उमटलेले दिसते. या स्थित्यंतराचा सर्वाधिक परिणाम कादंबरी या वाङ्मय प्रकारावर झाला आहे. या कालखंडात मराठी कांदबरीने पारंपरिक मराठी कांदबरीची रुढ चौकट मोडून स्वतःहाची वास्तववादी, जीवनवादी आणि बदलत्या कालचक्राशी सुसंगत अशी एक नवी ओळख निर्माण केली आहे. या कालखंडातील भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे, आनंद यादव, विश्वास पाटील,राजन गवस,त्र्यं. वि. सरदेशमुख, सदानंद देशमुख, श्याम मनोहर या कादंबरीकारांनी नवदोत्तरी कादंबरीला विशेष लोकप्रियता मिळवून दिली आहे. या सर्वच कादंबरीकारांच्या कादंबर्‍यांना साहित्य अकादमी पुरस्कारांने गौरविण्यात आले आहे. नवदोत्तरी कालखंडातील समाजाचे चित्रण या कादंबरीकारांनी आपल्या कादंबर्‍या मधून समर्थपणे रेखाटले आहे.

प्रस्तुत लेखामधुन नवदोत्तर कालखंडातील समकालीन आदिवासी कादंबरी लेखनाचा आढावा घेतला जाणार आहे. समकालीन आदिवासी कादंबरी या विषयाला प्रारंभ करण्यापूर्वी ‘आदिवासी कांदबरी ’ ची संकल्पना स्पष्ट करणे उचित ठरेल असे मला वाटते. ‘मराठी आदिवासी कादंबरी’ ही संकल्पना जेव्हा आपण उच्चारतो तेव्हा आदिवासींना केंद्रस्थानी ठेवून व आदिवासींच्या जीवनावर लिहिण्यात आलेली कादंबरी असे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. ‘आदिवासी समाजाच्या जीवनदर्शनाचे यथार्थ चित्रण घडविणारी व आदिवासी समाज या केंद्रबिंदू भोवती फिरणारी कादंबरी म्हणजे आदिवासी कादंबरी होय’

अशी आदिवासी कादंबरीची साधारण व्याख्या करता येईल. आदिवासी साहित्याच्या बहुतांश अभ्यासकांनी जवळपास याच प्रकारची भूमिका घेतल्याचे दिसून येते.

मराठी आदिवासी कादंबरीचे प्रामुख्याने दोन भाग पडतात. पहिला भाग म्हणजे आदिवासीएत्तर कादंबरीकारांची कादंबरी, या कादंबऱ्याचे लेखन सुरुवातीच्या पहिल्या भागात अधिक प्रमाणात झाले आहे. त्यात आदिवासींच्या जीवनाबद्दल सहानुभूती असणाऱ्या आदिवासीएत्तर कांदबरीकाराकडून लिहिलेल्या कादंबऱ्यांचा समावेश केला जातो. यात विलास मनोहर, दीनानाथ मनोहर, एकनाथ साळवे, अनिल सहस्त्रबुध्दे, बाबा भांड यांचा समावेश करता येईल. तर दुसरा भाग म्हणजे आदिवासी कांदबरीकारांची कादंबरी हा होय. यात अगदी अलीकडच्या काळातील आदिवासी समाजातील कादंबरी लेखनाचा प्रयत्न करु पाहणाऱ्या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांचा समावेश करता येईल. यात नजुबाई गावीत, माधव सरकुंडे, बाबाराव मडावी, रामराजे आत्राम यांचा समावेश करता येईल. या दोन्ही प्रकारच्या कादंबरीकारांच्या कादंबरी लेखनाचा समावेश व्यापक अर्थाने मराठी आदिवासी कादंबरी या संज्ञेत केला जातो.

प्रस्तुत लेखामधून नवदोत्तरी कालखंडातील आदिवासी कादंबरी वाड्.मयाचा आढावा घेतला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने 'एका नक्षलवादयाचा जन्म', 'एनकांऊटर', तृष्णा, ' आणि 'वाडा' या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने आदिवासी कादंबऱ्यांचा विचार केला जाणार आहे.

**एका नक्षलवाद्याचा जन्म:-**

ही श्री. विलास मनोहर यांची माडिया जमाती चे जीवनवास्तव मांडणारी कादंबरी सन १९९२ मध्ये प्रकाशित झाली. विलास मनोहर हे सन १९७५ पासून सुप्रसिध्द समाजसेवक बाबा आमटे यांनी सुरु केलेल्या भामरागड तालुक्यातील हेमलकसा येथील लोकबिरादरी प्रकल्पात सामाजिक कार्यकर्ते म्हणून काम करित आहेत. साधरणःता सन १९८० च्या दशकात महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावरील अतिपुर्वेकडील भामरागड, सिरोंचा या जंगलव्याप्त प्रदेशात सन १९८३ पासून नक्षलवादी चळवळीने आपले पाय रोवले आहेत. मनोहरांच्या या कादंबरीत 'जुरु' सारख्या सामान्य आदिवासीला नायक म्हणून पुढे आणून नक्षलवादी चळवळीची कारणमिमांसा करण्याचा प्रयत्न या कादंबरीतून केला आहे.

मनोहरांची ही कादंबरी आदिवासींच्या शोषणाचा व नक्षलवादयांच्या उगमाचा पट दर्शविणारी कादंबरी आहे. सामान्य आदिवासी ते नक्षलवादी असा आदिवासीचा प्रवास या कादंबरीतून दाखविला आहे. या कादंबरीचे कथानक 'कुटेर' या लहानशा माडिया आदिवासींच्या खेडयातून सुरु झाले आहे. या कादंबरीत 'जुरू' सारखा माडिया गृहस्थ आयुष्याच्या उत्तरार्धात नक्षलवादी कसा बनतो व का बनतो? याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीतून विलास मनोहर यांनी समर्थपणे मांडले आहे. भामरागडच्या जंगलात अनेक दशकापासून माडिया आदिवासींचे वास्तव्य आहे. माडिया जमातीची उपजीविका प्रामुख्याने जंगलांवर आधारित होती. स्वातंत्र्योत्तर कालखंडात या भागातील आदिवासी च्या मुक्त जंगल प्रवेशावर वनअधिकारी व शासकीय यंत्रणे कडून अनेक बंधने लादली गेली. त्यामुळे आदिवासीच्या उपजीविकेच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. त्यात आदिवासीच्या अज्ञानाचा व भोळेपणाचा फायदा घेऊन फॉरेस्ट गार्ड, पोलीस, तेंदुपत्ता

ठेकेदार, तहसिलदार असे शासकीय नौकरदार त्यांचे शोषण करु लागले. त्यामुळे आदिवासी समाज या शासकीय यंत्रणेकडून होणाऱ्या आदिवासी समाज या शासकीय यंत्रणेकडून होणाऱ्या अन्यायाला कंटाळला होता. या शोषणाला व आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला विरोध करण्याची ताकद, या निरक्षर आदिवासी मध्ये कधीच नव्हती. पंरतु या भागातील नक्षलवादयाच्या प्रवेशामुळे आदिवासी च्या शोषणाचे प्रमाण काही अंशी कमी झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे या कादंबरीचा नायक जुरु सारख्या सरळमार्गी गृहस्थाच्या मनात नक्षलवादी चळवळीचा विषयी सहानुभुती निर्माण होते. कुटेर परिसरात नक्षलवादयांनी बस्तान बसविल्यावर जुरु प्रत्येक बैठकांना हजर राहतो. नक्षवाद्याचे निरोप पोहचविणे, जखमी राजण्णला मदत करणे, गावातील संघम चा पंच म्हणून न्यायनिवाडा करणे. इत्यादी कामे जुरु करु लागतो. पंरतु ही कामे करतांना पोलिसी यंत्रणे करवी जुरु वर नक्षलसमर्थक असल्याचा ठपका ठेवला जातो. व जुरुला शेख दरोग्याकडून पहिल्यांदा अटक होते व पोलिसांकडून जबरदस्तीने नक्षलसमर्थक असल्याचे कबूल करवून घेतल्या जाते. जामिनावर सुटल्यावर देखील रोज सुरागड पोलिस ठाण्यात रोज हजेरी देण्यासाठी जुरुला जावे लागते. त्यावेळेस तेथील जमादार जुरुला दारुची मागणी करतात. इथे देखील गरीब माडिया नागविल्या जातो. दुसऱ्यांदा आकनपल्ली गावात पोलिसांवर झालेल्या दगडफेकीत जुरुचा कुठलाही संबंध नसतांना जुरुला पोलिसाकडून अटक केल्या जाते व जबरीने पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून थेट जहाल नक्षली नेता असल्याचे जाहीर केल्या जाते व स्वतःचा देश माहिती नसणाऱ्या जुरु सारख्या अज्ञानी माडिया आदिवासीवर देशद्रोहाचा खटला भरला जातो. मराठी भाषा न बोलता येणाऱ्या, लिहिता - वाचता न येणाऱ्या गरीब आदिवासी कडे नक्षली नेत्यांचे पत्ते व नावे असणारी डायरी व शस्त्रे सापडल्याचे पोलिसांकडुन सांगण्यात येते. व जुरुची दुसऱ्यांदा तुरुंगात रवाणगी केली जाते. जामिनावर सुटल्यावर देखील जुरुच्या मागे रोज सुरागड ठाण्यात हजेरी देण्याचा ससेमिरा लावला जातो. आजारी जुरु ठाण्यात न गेल्यामुळे पोलिस घरी येऊन शंभर रुपये दारु व कोंबडा घेऊन जातात. व दरोगा सुट्टीवरुन परत आल्यावर जुरु हजेरीला येत नसल्यामुळे तो गावात येऊन जुरुची बायको व मुलीला अटक करु पाहतो व घरी दोन बंदुका व सहा बॉम्ब सापडल्याचा खोटा पंचनामा तयार करतो आणि जुरुला दिसता क्षणी गोळी घालण्याचा आदेश मिळवितो. अशा प्रकारे जुरु ते नक्षलवादी केशण्णा हा जुरुचा प्रवास या कादंबरीतुन विलास मनोहर यांनी मांडला आहे.

या देशाचे मुळनिवासी असणारे आदिवासी शतकानुशतके जंगलात राहत आहेत. ब्रिटीश राजवटीत सुध्दा आदिवासीचे जंगलावरील पारंपारिक हक्क काही अंशी ब्रिटीशांनी सुध्दा मान्य केले होते. पंरतु स्वातंत्र्यानंतर वनकायद्याच्या नावाखाली सरकारने आदिवासीचे जंगलावरील हक्क नाकारले. जंगलाचे राजे असणाऱ्या आदिवासींच्या उपजीविका ही सर्वस्वी जंगलावर आधारित होती. कायदयाने आदिवासींच्या जंगल प्रवेशावर निर्बंध बालण्यात आले. त्यामुळे गार्ड, रेंजर यांच्याकडून आदिवासींना त्रास देण्यात येऊ लागला. जंगलातुन मध गोळा करणे व वनउपज गोळा करणाऱ्या आदिवासींना गार्ड कडून मारहाण करणे व पैसे उकळणे, खोटे वनगुन्हे लावणे हे प्रकार या भागात सर्रास होत असत. तेंदुपत्ता ठेकेदार या आदिवासी कडून कवडीमोल दराने तेंदुपत्ता खरेदी करुन त्यापासून कोटयावधी रुपये कमवितात. यातुन आदिवासीचे प्रचंड शोषण झाले आहे. म्हणून नक्षलवादी जुरु सारख्या सामान्य आदिवासींना जवळचे वाटु लागतात.

त्यामुळेच जुरु, कोपा, पेका, लमडी, नुस्से, गोंगलु या सारखे आदिवासी नक्षली चळवळीत सहभागी झाले. तर दुसरीकडे लालसु व शंकर सारखे सुशिक्षित आदिवासी तरुण आपल्या बांधवांचे शासकीय यंत्रणेकडून होणारे शोषण उघड्या डोळयांनी पाहून देखील नक्षलवादी विचारसरणीला विरोध करतांना आढळतात. तसेच नक्षलवादी चळवळ चालविण्यासाठी पेपरमिल च्या काटरे साहेबा सोबत संधान बांधून पैसे घेणाऱ्या राजण्णदादासारखे नक्षली नेते देखील आपल्या ध्येयापासून भरकणारे व लमडी सारखे लबाडी करणारे बदमाष ही मनोहरांनी प्रस्तुत कादंबरीतून अतिशय निर्भिडपणे रेखाटल्याचे आपणास दिसते.

‘एका नक्षलवादयाचा जन्म’ ही कादंबरी केवळ एकटया जुरुची करुण कथा नसुन ती समस्त माडिया जमातीच्या जीवनवास्तवाचे प्रतिबिंब आहे. या कादंबरीतून श्री विलास मनोहर यांनी पात्रांची नावे बदलुन का होईना पंरतु भामरागड परिसरातील आदिवासीचे भीषण जीवनवास्तव जगासमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे ही कादंबरी नवदोत्तरी मराठी कादंबरी मध्ये निश्चितच एक मैलाचा दगड ठरली आहे.

**तृष्णा:-**

तृष्णा ही कॉ. नजुबाई गावित यांची सन १९९५ मध्ये प्रकाशित झालेली आत्मवृत्तपर कादंबरी होय. नजुबाई गावित या आदिवासी समाजातील पहिल्या महिला कादंबरीकार होत. या कादबरीतून धुळे - नंदूरबार पट्टयातील मावची आणि भिल्ल या आदिवासी जमातीच्या जीवनवास्तवाचे चित्रण या कादंबरीत आलेले आहे. तृष्णा ही कादंबरी आदोर, रोप, रोपणी आणि पारोळी अशा चार भागात विभागली आहे. नजूबाईनी आपल्या जीवनातील अनुभव चार भागात मांडले आहेत. या कादंबरीतील ‘आशा’ ची आई ‘इसरी ’ ही प्रमुख नायिका आहे. तृष्णा ही कादंबरी शेवटपर्यंत ‘इसरी’ या व्यक्तिरेखेभोवती केंद्रित झालेली आहे. ‘इसरी’ ही नजुबाई गावीत यांची आई असावी. त्यामुळेच तृष्णा ही कादंबरी नजूबाई गावीत यांनी इसरीला अर्पण केली आहे.

‘तृष्णा’ या कादंबरीतून नजुबाई गावीत यांनी तीन पिढयांचा जीवनपट रेखाटला आहे. या कादंबरीचे कथानक आटया देसाई यांच्या बोढरीपाडा या गावातून सुरु होते. पहिल्या भागात आटयाचे वडील पांडया देसाई व आई बीजू यांचा जीवनवृत्तांत आला आहे. कथानकाच्या सुरुवातीलाच बोढरीपाडयात लागवन म्हणजे मानमोडीची साथ सुरु झाली आहे. यात एकामागून एक माणंस मरण्याचा सपाटा सुरु झाला. या साथीत पांडया व बीजू देसाई मरण पावतात आणि इथे पहिली पिढी संपते व दुसरी आटया देसाईची पिढी सुरु होते. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर आटया देसाई काही काळ आटया मामाच्या आश्रयाला जातो व इसरीशी लग्न करतो. या भागात इसरी च्या दोन अपत्यांचा मृत्यू आणि तिच्या आई-वडिलांचा देखील मृत्यू होतो. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर आपल्या तीन भावडांच्या पालन पोषणाची जबाबदारी सुध्दा इसरी उचलते. पुर्वेजांचे खांब न बसविल्यामुळे इसरी व आटयाला प्रापंचिक अडचणी येतात. इसरी व आटया कधी अर्धपोटी तर कधी उपाशी पोटी जीवन जगत होते. इसरी व तिची तिन भावंडे व स्वतःची दहा मुले अशा बारा मुलांचे संगोपन आटया गणपतकडे मजुरी करुन करीत होता. त्यातच आदिवासी जमातीच्या बहुसंख्य लोकांप्रमाणे

आटयाला दारुचे व्यसन होते व जुरा भिल्लाणीशी आटयाचे अनैतिक संबंध असल्यामुळे इसरी आयुष्यात आणखीच समस्यांची भर पडली होती. तिसऱ्या भागात आशा ही इसरीची सर्वात लहान मुलगी दारिद्रयात जीवन जगत शिक्षण घेण्याचा प्रयत्न करणारी, चौथी पर्यंत शिकलेली गावातील शाळेत जाणारी आणि पुढे शिक्षण घेण्याची प्रबळ इच्छा असणारी परंतु शाळेतील नराधम शाहू मास्तर तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ती मास्तर चा प्रतिकार करते व आपली अब्रु वाचविते. मास्तर पोसल्या जवळ शाळेत येण्याचा निरोप पाठवितो तेव्हा आशा फणकाऱ्याने म्हणते ''फुकून दे त्या मास्तरला! पसू मी आता शेतीकाम करीन''१ असे म्हणून शिक्षणाला कायमचा रामराम ठोकते आणि शेतीकामात स्वतःला गुंतवून घेते. शाहू मास्तर सारख्या स्त्रीलपंट प्रवृत्तीच्या माणसामुळे कित्येक आदिवासी मुली शिक्षणापासून वंचित राहिल्या आहेत.

कादंबरीच्या चौथ्या भागात 'पारोळी' मध्ये शिक्षण बंद झाल्यावर आशाला इच्छा नसतांनाही पूर्वीच विवाहीत असणाऱ्या संशयखोर अडाणी फुल्याशी आपल्या भावांच्या मर्जीखातर लग्न करावे लागते. इसरीचे संपूर्ण आयुष्य हालअपेष्टा सहन करत जाते व शेवटी दारिद्रयातच मरण पावते. परंतु आशाचा विवाह गणू सारख्या संपन्न शेतकरी असलेल्या सासरी होतो. परंतु फुल्या सारख्या संशयी व दुसऱ्याच्या शिकवणी ने वागणारा नवरा असल्यामुळे आशाचे आयुष्य त्याची मारहाण सहन करण्यात जाते. फुल्याचा जाच, छळ, संशयी सासू, वाईट नजर ठेवणारा पाटील या साऱ्यांचा सामना करत आशा आपले आयुष्य रेटत राहते. फुल्याशिवाय वेगळे घर बांधण्याची आशाची इच्छा असते. अशा अवस्थेत आशाचा सासर-माहेर असा प्रवास सुरु असतो. या छळातून मरणापर्यंत आपली सुटका नाही हे आशाला कळून चुकते. आशा अनेकदा आत्महत्या करण्याचा विचार करते परंतु आपल्या मुलांकडे पाहुन ती आपला विचार बदलते. अशी परिस्थितीला शरण गेलेली गंभीर नायिका आशाच्या रुपातून या कादंबरीत साकारली आहे.

तृष्णा या चार खंडात विभागलेल्या कादंबरीत असख्ंय पात्रे येतात आणि जातात. मात्र या कादंबरीचा केंद्रबिंदु इसरी आणि आशाच आहेत. आदिवासी जमाती मधील अंतर्गत जमातवाद अतिशय सुक्ष्मपणे या कादंबरीत रेखाटला आहे. वनअधिकारी व महसुल अधिकाऱ्यांकडून आदिवासीचे शोषण, आरोग्याच्या सोई अभावी होणारी आदिवासी परवड, दुष्काळ व नापिकी यामुळे भेडसावणारे उपजीविकेचे प्रश्न, व्यसनाधीनता व त्यामुळे दारु गाळून विकणारे आदिवासी व त्यांचे शोषण करणारे पोलिस तसेच आदिवासी च्या अज्ञानाचा फायदा घेऊन लुटणारे वाणी, दुकानदार यासोबतच जमाती मधील पंचायत व्यवस्था असे अनेक विषय नजुबाई गावीत यांनी आपल्या कादंबरीतुन अतिशय ताकदीने मांडण्याचा प्रयत्न या कादंबरीतुन केला आहे. तृष्णा मधील आशा ही नायिका आदिवासी मधील शिक्षण विषयक चळवळीची प्रतिनिधी आहे. शेठ - सावकार यांच्याकडुन होणारी आदिवासीची आर्थिक लूट थांबावी या उद्देशाने इसरी कुवत नसतांना देखील शिकविण्याचा प्रयत्न करते. परंतु शाहू मास्तर सारख्या स्त्रीलंपटामुळे आशाचे शिक्षण अर्ध्यावरच बंद पडते. यातुन अप्रत्यक्षपणे आदिवासी मुलींच्या शिक्षणाच्या होणाऱ्या परवडीचे संसुचन झाले आहे. भिल्ल व मावची आदिवासी समाजीवनाचे अनेक पैलू आपणास या कादंबरीतुन पहायला मिळतात.

**एनकाऊंटर:-**

एनकाऊंटर ही कादंबरी सन १९९८ मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीचे लेखक ॲड. एकनाथ साळवे हे चंद्रपूरातील एक ख्यातनाम विधिज्ञ होते. तसेच सन १९६७ ते १९७८ या काळात ते चंद्रपूर विधानसभा मतदार संघातुन आमदार देखील होते. ॲड. साळवे यांनी अनेक खटल्यामध्ये त्यांनी नक्षलवादाच्या नावाखाली पोलिसी अत्याचारग्रस्त व वनकायदयाने पिडीत आदिवासीची कायदेशीर बाजू देखील मांडली आहे आणि विदर्भातील बहुजन चळवळीतील एक जेष्ठ मार्गदर्शक म्हणून देखील कार्यरत होते. त्यामुळे त्यांचा गडचिरोली जिल्हयातील आदिवासी समाजजीवनाशी अतिशय जवळून संबंध आला आहे.

एनकाऊंटर या कादंबरीतून गडचिरोली जिल्हयातील भामरागड पोलिस ठाण्यात पोलिसी छळाचा बळी ठरलेल्या निरपराध 'बा' म्हणजेच एडका मासा आत्राम, त्याचा मुलगा विजू, मुलगी हरका, वेडा मुलगा ऋषीदा, आणि पत्नी यांची व्यथा या कादंबरीतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. भामरागड पोलिस ठाण्यात एडका आत्राम याला त्याच्या शेतातील ओढ्याशेजारी झालेल्या खुना वरुन पोलिस चौकशी साठी ठाण्यात बोलावून मारहाण करतात व सोडुन देतात परत कुणाच्या तरी खोटया तक्रारीवरुन त्याला मारहाण करीत ठाण्यात घेऊन जातात व टाडा चे प्रकरण असल्याचे पोलिस सांगतात. खुना सारख्या प्रकरणात पोलिसांकडुन एडका आत्रामला टाडा सारख्या दहशतवादी कायदयात पोलिसांकडून गुंतविण्याचा नाहक प्रयत्न केला जातो. एडकाचा मुलगा विजू कॉलेजमध्ये मध्ये शिकतांना वृत्तपत्रातुन आदिवासी शोषणा विरोधात लेख लिहितो,त्यामुळे त्या विषयी पोलिसांच्या मनात गैरसमज निर्माण होतो व विजू ला कॉलेजमधून काढुन टाकले जाते. पोलिस विजूला समज देतात. व भामरागड च्या ठाणेदाराला भेटायला सांगतात आणि ठाणेदार त्याला पोलिसात भरती होण्याचा सल्ला देतात. परंतु विजू पोलिसात भरती होण्याचे नाकारतो. यावरुन त्याचे नक्षलवाद्याशी संबंध असावेत असा अंदाज पोलिसांकडून केला जातो.

''कहा है साला आत्राम एडका? कहता है, उसके बच्चो को किसीने हाथ लगाया तो सर फोडुंगा उसका''२ आणि ''ठाणेदारांना 'बा' ने एका गरीब माडिया गोंडाने आव्हानित करावे ही बाब पोलिस ठाण्याला अपमानजनक वाटली या गुस्ताखीविरुध्द धडा शिकवण्याच्या हेतूने ठाणेदार साहेबांनी सुमेरसिंग जमादाराच्या नेतृत्वात पोलीस ताफा पाठविला होता. नक्षलवाद विरोधी बंदोबस्ताच्या नावाने पोलिस खाते असे बेगुमान वागु शकते याची शहरी लोकांना कल्पनाही नसावी ते काहीही असले तरी प्राप्त परिस्थितीला तोंड देणे भाग होते''३.

या दोनच संवादावरुन 'बा' च्या अटकेचे खरे कारण स्पष्ट होते. अटकेनंतर एडका आत्रामला पोलिस कोठडीत अमानुष मारहाण केली जाते व त्यातच त्याचा मृत्यू होतो. एडका मृत्यूनंतर भामरागड ठाण्यावर प्रचंड जनसमुदाय उसळतो व त्याच्या दबावामुळे आणि वृत्तपत्रांच्या प्रतिनिधी हे प्रकरण उचलुन धरल्यामुळे दोषी पोलिसांवर खुनाचा गुन्हा दाखल केला जातो व एडकाच्या कुंटूबाला दोन लाखाची मदत जाहीर केल्या जाते. कायदा सुव्यवस्थेचे कारण पुढे करीत पोलिस अधिक्षक एडकाच्या कुंटूबाला त्यांच्या

देहाचे दर्शन न घेऊ देताच त्याचा अत्यंविधी उरकून टाकतात. कादंबरीतील या प्रसंगातून आदिवासींच्या हतबलतेचा चा प्रत्यय वाचकांना आल्यावाचून राहत नाही.

एडकाच्या मृत्यू नंतर शेतात जागलीला गेलेल्या विजयच्या सांत्वनासाठी नक्षलवादी तरुण येतो व त्याच्या सोबत नक्षली चळवळी विषयी चर्चा करतो. त्यानंतर सरोज अक्का नावाची नक्षल तरुणी विजयला चर्चेसाठी आमंत्रित करायला येते आणि आपली वैचारिक भुमिका मांडण्यासाठी विनंती करते या चर्चेतुन नक्षलवादी कृतीचे समर्थन वादग्रस्त आहे. पण अन्यायाचा सामना करतांना संघर्ष अटळ आहे. हे सुत्र विजयच्या लक्षात येते. तर दुसरीकडे बहीण हरका वर नथ्थूशेठ किरोडीमल पैशाचे आमिष दाखवून अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा हरका बाजूला पडलेला दगड उचलून नथ्थूशेठ च्या तोंडावर हाणून तेथून पळ काढते. आणि नथ्थूशेठ खोटी तक्रार देऊन आपल्या कुंटूबाला त्रास देईल या भीतीने ती जंगलाचा रस्ता पकडते आणि नक्षलवादी चळवळीतील राहुल आणि सरोज अक्का सोबत सामील होते. पांढरपेशा समाजातील नथ्थुशेठ सारख्या कुप्रवृत्तीमुळे हरका सारख्या मुलींना नक्षलवादाचा मार्ग पत्करावा लागला याचे वास्तविक चित्रण या कादंबरीत आलेले आहे.

या संपूर्ण कादंबरीचे कथानक केवळ ‘बा’ म्हणजेच एडका आत्राम कुंटूबापूरते मर्यादित नसून ते एकंदर शासकीय दमनव्यवस्थेचे बळी करणाऱ्या समस्त आदिवासी जमातीचे आहे. या कादंबरीत बिरसा मुंडाचा उलगुलानाचा मंत्र म्हणून एडका च्या तोंडी घातलेल्या ‘उलगुलानाला अंत नाही, भगवानाला मरण नाही’ या महाश्वेतादेवी यांच्या कवितेच्या दोन ओळी संपूर्ण कादंबरीत अनेक ठिकाण आढळतात. हा बिरसाचा संदेश एडका सारख्या सामान्य, निरक्षर आदिवासीच्या क्रांतीकारी विचारसरणीचा परिचय देणारा वाटतो. सन १९९२ मध्ये घडलेली घटना आजही या परिसरातील आदिवासी विसरु शकले नाहीत. या भागातील आजही चित्र काही फारसे बदलेले दिसत नाही. विजय आत्राम व सरपंच आबा यांनी आयोजित केलेली आदिवासी हक्क परिषद देखील विनाकारण पोलिसांकडुन उधळली जाते. पोलिस-नक्षली संघर्षात सुध्दा शेकडो निरपराध पोलिसांना कर्तव्य बजावतांना विरमरण आलेले आहे. नक्षलवाद आणि पोलिस यांच्यातील संघर्षात भरडल्या जाणारे आदिवासी याचे अतिशय वास्तवदर्शी चित्रण या कादंबरीतून पुरेपूर प्रत्ययास येते. या दोन्ही बाजुने लढणारे हे बहुतांश आदिवासी आहेत. हे या व्यवस्थेचे दुर्देव आहे की आदिवासीचे ? हा एक अनुत्तरीत प्रश्न या कादंबरीतून वाचकांपुढे निर्माण होतो.

**वाडा:-**

‘वाडा’ ही माधव सरकुंडे यांची सन १९९६ मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी आहे, ‘आंध’ या आदिवासी जमातीचे जीवनदर्शन घडविणारी ही कादंबरी आहे. ‘वाडा’ म्हटले की आपल्या डोळयासमोर पिढयान-पिढया पासून गावातील पाटलांच्या चिरेबंदी वाडयाचे चित्र उभे राहते. गावातील हे वाडे पाटलांच्या वैभवाची, विलासाची व रंगेलपणाची साक्ष देत आजही उभे आहेत. बहुतांश वाडा संस्कृती ही प्राचीन काळापासून सामान्यांच्या शोषणाचे केंद्र म्हणूनच ओळखली जाते. वाडा ही कादंबरी आंधवाडीतल्या

ग्यानबा पाटलाच्या वाडयाची आणि त्याच्या अन्याय, अत्याचार सहन करणाऱ्या गरीब आंध जमातीची करुण कथाच आहे.

आंध ही महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडयाच्या सीमेवरील पुसद, उमरखेड, किनवट, माहुर या भागात वास्तव्य करणारी आदिवासी जमात, इतर आदिवासी प्रमाणे रानावनात वास्तव्य करणारी डिंक, चारं, रानफळे गोळा करणारी, शिकार करुन उपजीविका करणारी जमात आहे. बदलत्या काळानुसार ही जमात स्थिर झाली व थोडयाफार प्रमाणात शेती करु लागली. वाडा या कादंबरीत आंध जमातीतील माणसांना माणूस म्हणून जगण्यासाठी व माणुसपण मिळविण्यासाठी करावा लागणारा संघर्ष माधव सरकुंडे यांनी चित्रित केला आहे. या कादंबरीचे कथानक ग्यानबा पाटील, नायक बाज्या व आंधवाडीतल आंध समाज या तीन घटका भोवती फिरते. या कादंबरीची सुरुवात ग्यानबा पाटलाच्या वाडयापासुन होते. ग्यानबा पाटील हा या पट्टयातला मोठा जमीनदार आजूबाजूच्या दहा-पंधरा गांवाना कर्ज पुरविणारा त्यामुळे या भागात त्याचा दरारा होता. आंधाची आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्यामुळे त्यांना पाटलाकडुन कर्ज घेण्याशिवाय दुसरा पर्याय राहत नसे. आंधाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन पाटील त्यांच्या कडून कैकपटीने व्याज वसुल करत असे. आपल्या दहशतीच्या बळावर त्याने राघोबा आणि बाज्या च्या बायकांवर अत्याचार देखील केले. आणि त्याला विरोध करणाऱ्यांना प्रसंगी आपला जीव ही गमवावा लागत होता. पाटलाच्या दहशतीला आपल्या गरीबीमुळे गावातील सारेच आंध पाटलाला घाबरत व स्वतःहा आपण मागास जातीतील असल्यामुळे आपण पाटलाला विरोध करु नये. असा त्याचा समज बनला होता. गोमाजी तायडे बाज्याला पाटलाबद्दल सावध करतांना म्हणतो की, ''पाटलाचा वाडा मनजे इस्त्याच घर व्हये. दुसर कायीबी कर पण वाडयाच्या वाटयाला जावू नको''४ या विधानावरुन पाटलाच्या दहशतीचा प्रत्यक्ष येतो.

बाज्या हा कादंबरीचा नायक मुळातच पाटलाच्या खुनाचे मनसुबे आखणारा, सारी आंधवाडी पाटलाच्या दहशतीपुढे नतमस्तक असतांना बाज्या मात्र पाटलाच्या अन्यायाला विरोध करणारा आहे. परंतु बाज्याच्या या कृतीमुळे आंध समाज नाराज होतो आणि आंधाला म्होरक्या साखऱ्या बाज्याच्या कुंटूबाला वाळीत टाकतो. बाज्याचे लग्न ठरल्यावही बाज्याचे समाज बांधव बाज्याला मदत करण्याचे नाकारतात. त्यामुळे बाज्याला सासऱ्याच्या गावी लग्न उरकावे लागते. लग्नानंतर बाज्याच्या बाायकोवर अत्याचार करतो व विरोध करणाऱ्या बाज्याला मरेपर्यंत मारहाण करतो. तेव्हा सुध्दा आंधवाडीतील कुणाही बाज्याला मदत करीत नाही. या प्रसंगातून आंधवाडीतील पाटलाची जुलमी राजवट आणि आधांची अन्याय सहन करण्याची वृत्ती दिसून येते. सर्वस्व गमावल्यावर बाज्या रानावनातच फिरत राहतो व शिकारीला गेलेल्या पाटलाचा खून करतो. आणि आंधवाडीची शोषणातून मुक्तात करतो. परंतु पाटलाच्या मृत्यूनंतर काही दिवसातच आंधवाडीतील लोक दुष्काळामुळे कंटाळुन गाव सोडून दुसरीकडे जाऊन गाव बसवितात ही घटना आदिवासीच्या जीवनपध्दतीच्या चौकटीत बसणारी वाटत नाही. कारण आदिवासी समाज हा अनेक अनुकूल प्रतिकूल परिस्थितीतुन शतकानुशतके आपले अस्तित्व टिकवून आहे.

वाडा या कादंबरीचे महत्व स्पष्ट करतांना डॉ. तुकाराम रोंगटे म्हणतात की, ''आधांच्या बोलीभाषेतून कादंबरीचे लेखन झाल्यामुळे प्रसंग अधिक उठावदार व जिवंत झाले आहे. आंधाचे

रीतिरिवाज, चालीरीती, जातीतील भेद, वाळीत टाकणे यासारख्या कुप्रथा, अंधश्रध्दा, प्रचलित व्यवस्था यांचेही दर्शन सरकुंडे यांनी घडविले आहे. एकूणच विषमतावादी व्यवस्था उलथून लावण्यासाठीचा संघर्ष कादंबरीमध्ये दिसून येतो. तो आदिवासी चळवळीला निश्चित बळ देणारा आहे. आदिवासी कादंबरीच्या इतिहासात एक समताधिष्ठित व्यवस्था प्रस्थापित करण्याची संघर्षमय जाणीव देणारी कादंबरी म्हणून 'वाडा ' ची नोंद करावी लागेल'' ५ असे मत रोंगटे यांनी नोंदविले आहे. ते निश्चितच या कादंबरीच्या बाबतीत यथार्थ ठरणारे आहे. वाडा या कादंबरीचा नायक बाज्या हा सरंजामी व्यवस्थेच्या विरोधात पेटू उठणारा आहे. आपल्या गरीब समाजबांधवाना अन्यायाविरुध्द लढा देण्यासाठी प्रवृत्त करणारा आहे आणि वाडा संस्कृतीचे पतन करु पाहणारा आहे तो. शोषणाच्या व सरंजामी व्यवस्थेच्या विरोधात युध्द पुकारणारा आहे. बाज्या हा आंध जमातीच्या मुक्तीदात्याच्या भूमिकेतुन पुढे येणारा नायक आहे. आंधाच्या जीवन-जाणिवांचा परिचय मराठी साहित्य सृष्टीला करुन देणारी ही पहिली - वहिली कादंबरी आहे.

'एका नक्षलवाद्याचा जन्म', 'तृष्णा', 'एनकाऊंटर', 'वाडा' या चारही आदिवासी कादंबऱ्या वेगवेगळ्याा आदिवासी जमाती समुहाच्या प्रतिनिधीत्व करणाऱ्या आहेत. या कादंबऱ्या मधून आदिवासीच्या शोषणाची कारणमिमांसा केलेली आहे. तसेच मराठी साहित्यविश्वाला अपरिचित असणाऱ्या विविध जमातीच्या जीवन वास्तवाचा पहिल्यांदा परिचय या कादंबऱ्यामुळे झाला आहे. 'एका नक्षलवाद्यांचा जन्म' आणि 'एनकाऊंटर' या दोन्ही कादंबऱ्यामधून माडिया गोंड समाजावर होणाऱ्या अन्यायाची व नक्षलवादी चळवळीच्या उदयाची कारणे पहिल्यांदा मराठी वाचकांपुढे आली आहेत. आदिवासी समाज आणि नक्षलवाद यांचे यथार्थ चित्रण या दोनही कादंबऱ्यामधून कादंबरीकारांनी केले आहे. तसेच 'तृष्णा' या कादंबरीमधून आदिवासी समाजातील पहिल्या महिला कादंबरीकार कॉ. नजूबाई गावीत यांनी आदिवासी मावची जमातीतील 'इसरी' या नायिकेला केंद्रवर्ती ठेवून समस्त आदिवासी स्त्री जिवण-जाणीवांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'वाडा' या कादंबरीमधून माधव सरकुंडे यांनी 'आंध' या महाराष्ट्राला अल्पपरिचित असणाऱ्या जमातीच्या जीवनाचा व त्यांच्या समस्यांचा पहिल्यांदा महाराष्ट्रीय समाजाला परिचय करून दिला आहे.. आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीकोणातून आदिवासी कादंबऱ्या या पारंपरिक मराठी कादंबरीपेक्षा भिन्न आहेत.

'एका नक्षलवाद्याचा जन्म', 'तृष्णा', 'एनकाऊंटर', 'वाडा' चार नवदोत्तर कालखंडातील समकालीन आदिवासी कादंबऱ्याचा आढावा घेतल्यावर असे लक्षात येते की, मराठी आदिवासी कादंबरी ही नवदोत्तर कालखंडातील समकालीन मराठी कादंबरीपेक्षा भिन्न आहे. नवदोत्तर मराठी कादंबरीची परिमाणे ही मराठी आदिवासी कादंबरीच्या बाबतीत लागू पडत नाहीत असे ठामपणे म्हणता येते. खाऊजा धोरणाचा स्पर्श अद्यापही आदिवासी कादंबऱ्यांना झाला नसल्याचे स्पष्टपणे जाणवते. आदिवासी कादंबरी आजही विकसनशील अवस्थेत असल्याचे जाणवते. आदिवासीचे शोषण , समस्या आणि जीवनजाणिवा याच घटकांभोवती प्रामुख्याने आदिवासी कादंबरीचे कथानक फिरतांना दिसते. समकालीन मराठी कादंबरीचे

कथानक, जीवनदर्शन, समस्यासूत्रण, आकृतीबंध या घटकांच्या अनुषंगाने विचार करता समकालीन आदिवासी कांदबरी पूर्णपणे वेगळी आहे. नवदोत्तर कालखंडातील समकालीन आदिवासी कादंबऱ्यामधील सर्वच कादंबऱ्यांना समकालीन स्थिती गतीचा फारस स्पर्श झालेला नाही.या कादंबऱ्या खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या पासून अजूनही कोसो दूर आहेत. या कादंबऱ्याचे लेखन हे आदिवासीचे जीवनवास्तव प्रकट करण्याचा व त्यांच्यावरील अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचा उद्देशाने झाले आहे असे ठामपणे म्हणता येते.

एकंदरीत प्रस्तुत लेखामधून ज्या समकालीन मराठी आदिवासी कादंबऱ्यांचा आढावा घेतला आहे. त्या सर्वच कादंबऱ्या मराठी आदिवासी साहित्यात अतिशय महत्वाच्या कादंबऱ्या म्हणून मान्यता पावल्या आहेत. या सर्वच कादंबऱ्यांनी मराठी आदिवासी कादंबरीच्या प्रवाहाला समृद्ध करण्याचे कार्य केले आहे. लेखन विषयक मर्यादामुळे या कादंबऱ्यांचा विस्तृत आढावा घेणे शक्य होत नाही. तरी सुद्धा कादंबरीकारांच्या लेखनाला यथोचित न्याय देण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखातून केला आहे.

**संदर्भ टीपा:**


1. *गावीत नजुबाई, 'तृष्णा', 'सत्यशोधक मार्क्सवादी प्रकाशन', धुळे, प्र. आ. १९९९, पृ. क्रं. २१५*
2. *साळवे एकनाथ, 'एनकाऊंटर' 'विजय प्रकाशन' नागपूर, प्र. आ. सन १९९२, पृ. क्रं. ६८*
3. *तत्रैव पृ. क्रं. ६९*
4. *सरकुंडे माधव, 'वाडा' 'देवयानी प्रकाशन' यवतमाळ, प्र. आ. १९९९, पृ. क्रं. १२*
5. *रोंगटे तुकाराम, 'आदिवासी साहित्य: चिंतन आणि चिकित्सा' दिलीपराज ,प्रकाशन पुणे. प्र. आ. जानेवारी २०१४, पृ. क्रं. ९१*

# समकालीन कवितेच्या प्रवाहात नवदोत्तरीतील स्त्री कवयित्रीच्या स्त्रीवादी कविता

**डॉ. अमृता डोर्लीकर**

*डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू .एस. महाविद्यालय, नागपूर*

इ.स. १९५० ते १९७५ हा कालखंड म्हणजे नवकाव्याचा आरंभ मानला जातो. स्त्री मुक्तीच्या चळवळीचा आरंभ ही या काळात झालेला आहे. या काळात स्त्री जाणीवा अधिक प्रगल्भ झालेल्या दिसतात. स्त्रीने बाईपणाची कात टाकत प्रतिमा, प्रतिके,रुपके.इ.रुपातून जाणिवांचे अनेकविध पदर याकाळातील कवितेतून व्यक्त होतात. या कालखंडातील महत्वाच्या कवयित्री म्हणजे इंदिरा संत, पद्मा गोळे, शांता शेळके, संजीवनी मराठे, शिरीष पै इ. होत. त्यांच्या कविता मुख्यतः सौदर्यवादी जाणिवा व्यक्त करणाऱ्या आहेत शिवाय त्यात शहरी, मध्यमवर्गीय स्त्री जाणिवांच्या परंपरागत चौकटीत राहूनच स्त्रीची जुळलेली नाळ या कवितेतून प्रगट झालेली दिसते. १९७५ नंतर प्रभा गणोरकर, अनुराधा पाटील, अरुणा ढेरे, रजनी परुळेकर, अश्विनी धोंगडे, हिरा बनसोडे, मल्लिका अमरशेख, नीरजा, आसावरी काकडे, अंजली कुळकर्णी इ. कवयित्री या कालखंडात मोठ्या प्रमाणात काव्य लेखन करुन स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कवितेत संवेदना आणि जाणिवा यामध्ये वेगळेपण आढळते. या कालखंडातील कविता अधिक डोळस होताना दिसते १९९०नंतरही यातील बऱ्याच कवयित्री सातत्याने कविता लेखन करीत आहे. प्रस्तूत शोधनिबंधात नवदोत्तरी कालखंडातील स्त्री कवयित्रींच्या कवितेतील 'स्त्री जाणीवां' चा परामर्श घेतलेला आहे.

नवदोत्तरी कविता प्रवाहामध्ये रजनी परुळेकर यांच्या कवितांमध्ये स्त्री जीवनातील आजचे प्रखर वास्तव व्यक्त होतांना दिसते. त्यांच्या कवितांमध्ये 'मी' चे अस्तित्व आणि या अस्तित्वाभोवती असणारी विविध माणसे कवितेतून प्रकट होताना दिसतात. स्त्रियांच्या भावविश्वावर भरपूर कविता लिहिल्या आहेत त्यांच्या कवितांपैकी 'पुन्हा दीर्घ कवितामधील' मिलाड, स्नेहसंमेलन, रिसेप्शन आणि स्वागत, फेर, एका विद्यार्थिनीस, 'स्विकार', 'मधील', 'शोध', 'सोबत', 'भिंती', 'बी', 'निरोप', 'वाळूवर दोघीजणी', 'राणी', 'समेवर नग्न सत्य', 'वेश्यांच्या वस्तीजवळ', 'तुझ्या कानातली झुंबरं', 'तिचा चेहरा', 'डायरीतल्या शिरगणतीत', 'आणि पहाट होईल', 'माझी कुरूप मनोस्वप्न', 'येते गं', अशा अनेक कवितांमधून रजनी परुळेकर यांनी स्रियांच्या भावना, दु:ख, वेदना पुरुषांचे अत्याचार, समाजाने त्यांना आखून दिलेल्या चौकटी, स्त्रीला दुसऱ्या स्त्री विषयी वाटणारी मैत्री, आपुलकी, स्नेह, सहानुभूती अशा अनेक छटा त्यांनी काव्यातून व्यक्त केलेल्या दिसतात.रजनी परुळेकर यांच्या कवितेसंदर्भात

प्रभा गणोरकर म्हणतात, 'मी' चे अस्तित्व आणि या अस्तित्वाभोवती असणारी विविध माणसे यांच्यातल्या क्रिया प्रति क्रिया यांचे गुंतागुंतीचे आकार गुंफलेले असतात''[१]

याच समकालीन कविता प्रवाहातील दुसऱ्या महत्वाच्या कवयित्री म्हणजे मलिका अमरशेख यांचा (२०००) मध्ये प्रसिद्ध झालेला 'महानगर' हा काव्यसंग्रह आणि (२००६) मध्ये 'माणूसपणाचं भिंग बदलल्यावर' या दोन्ही कविता संग्रहातील प्रत्येक कविता संवेदना, भावना आणि विचार या तिन्हीचा स्फोट घडवणाऱ्या कविता आहेत.मलिका अमरशेख यांच्या कवितेसंदर्भात प्रभा गणोरकर म्हणतात, 'मलिका अमरशेख' सारख्या विलक्षण प्रखर संवेदनक्षमतेने कविता लिहिणारी 'स्त्री' च्या नजरेने 'स्त्री' च्या संवेदनक्षमतेने अतिशय भेदकपणे भोवतीच्या वास्तवाचा आणि स्वत:च्या आंतर विश्वाचा वेध घेते.[२]

'रस्त्याला डाव्या हातानं बाजूला करून
उजव्या हातानं चूल पेटवणारी बाई ...........
न् भिरीभिरी फिरणारी अनाथ पोरं — — — '

(महानगर : पृ. ७)

स्त्रीत्वाच्या दुर्दशेचे वर्णन करताना कवयित्री मल्लिका अमरशेख म्हणतात —

'जगातल्या कुठल्याही बाईसारखीच
अवघड, दुर्गम,
जी जगते,
पणाला लावून अवघे आयुष्य
दु:खाला दावणीला बांधून
ती पेलते कृष्णाइतक्याच सहजतेनं
हा आधिभौतिक डोलारा —— — — —

(माणूसपणांचं भिंग बदलल्यावर : पृ. ८८)

पुरुषी प्रधान समाज बाईचे सामर्थ्य समजून न घेता तिची उपेक्षाच करीत आला आहे. तिचे शरीर म्हणजे एक वस्तू आहे. एवढेच तिला महत्व आहे.

साध्या जवळच्या बायका
न् त्यांची मनं पाहू शकत नाही तुम्ही? — — —

(महानगर : पृ. ३८)

याशब्दात कवयित्री आपल्या भावना व्यक्त करतात याच काळातील महत्वाची कवयित्री म्हणजे अरुणा ढेरे यांचे 'प्रारंभ' (१९८७), यक्षराज (१९८७), हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. १९९० नंतर 'मंत्राक्षर' (१९९०), 'निरंजन' (१९९४), 'जावे जन्माकडे' (१९९८), हे कवितासंग्रह प्रकाशित झाले या संग्रहातून त्यांच्या जाणिवांच्या विकासाच्या वाटा स्पष्ट होतात अरुणा ढेरे

यांच्या कवितेसंदर्भात प्रभा गणोरकर म्हणतात, 'त्यांच्या कवितेमध्ये लोकगीते आणि आधुनिक काळातील सौर्यवादी जाणीवा व्यक्त होतात. त्यांच्या कवितेने स्त्रीच्या आदिम दु:खाशी स्वत:ची नाळ जोडून घेत स्त्री पुरुष नात्यांच्या नव्या दृष्टीने शोध घेत स्त्रीवादी जाणिवेच्या काही छटा त्यांच्या काव्यात आढळून येतात आत्मलक्ष्यी कवितेकडून स्रीलक्ष्यी कवितेकडे त्यांचा काव्यप्रवास सरकत जातो'[३]. अरुणा ढेरे यांच्या बहुतांश कविता स्त्री पुरुष नात्यांच्या वेगवेगळ्या छटा दाखवणाऱ्या आहेत

'सरली वो रात, बाई दळण घालते
ओवी काजळ झोपेची, जात्या ईश्वरा सांगते
गरगरा हात, सरसरा गळे पीठ
मुके दु:ख मांडीवर, शांत चोखताही मूठ
जे जे वाटे हवे, केर त्यांचाच लोटते
बाई घराघरासाठी मन मोकळे करते'

(मंत्राक्षर : पृ.६)

किंवा

'भर माध्यान्ही
नदीवर खळबळून जातात
चुबकून निघतात, धुव्यागत बायका
ओल्या दु:खाचे पिळे घेऊन घराकडी परतून
येतात — — — — —
चुलीतल्या जाळाबरोबर
मग धगधगून उठतात बायका — — — —'

(निरंजन: पृ.१०)

अरुणा ढेरे यांच्या कवितांवर लोकगीतांचा संस्कार झालेला दिसतो. जीवनातील सुख दु:खावर प्रेम करणारी, नात्यांचा शोध घेणारी, चिंतनशीलतेकडे झुकणारी अशी ही कवयित्री आहे. देशीपरंपरा आणि संस्कृती यामुळे त्यांची कविता समकालीन कवितेहून वेगळे अस्तित्व प्रस्थापित करते.

'स्त्री' असण्याचे स्वतंत्र भान घेऊन जगत असताना स्वत:च्या आणि इतर स्रियांच्या जीवनासंबंधी त्यांच्या सुखदु:खासंबंधीचे चिंतन कवितेतून करणारी कवयित्री म्हणजे उषा मेहता त्यांचा 'आभास' (१९८३) मध्ये प्रकाशित झालेला पहिला कवितासंग्रह. त्यानंतर 'अप्रूप'हा कविता संग्रह (१९९८) मध्ये प्रकाशित झाला. त्यांच्या कवितेमध्ये

'मैत्री, प्रेम वगैरे वगैरे ओलांडून
आघात, प्रत्याघात, विश्वासघात आणि घातही
अधूनमधून
असं तर किती तरी — — — — उंबरठ्यबाहेर
आत आणखी काही जीवघेण्या ठेचा — — — —
(अप्रूप : पृ.५३)

किंवा

'सोसून देखील सारं सारं मुक्या जुनावरा सारखं
पाहू या की आता जरा जगून माणसासारखं'

असे म्हणणारी कणखर स्त्री आहे घुसमट सहन करणारी स्त्री ही आहे. कोणत्याही परिस्थितीत जगत असताना स्वत:च्या मुलांचा विचार करीत राहणारी स्त्री ची रूपे त्यांनी अनेक कवितांमधून रंगविलेली आहे.

१९९०नंतरच्या कवितेमध्ये नव्या पिढीने अत्यंत मोकळेपणाने आणि विविध तऱ्हांनी आपले जीवनानुभव आविष्कृत केले आहेत. जगण्यातील प्रत्येक क्षण या कवयित्रीने कवितेतून व्यक्त केलेला दिसतो. कवयित्रींच्या या नव्यापिढीने स्त्री पुरुष नात्यातले सुक्ष्म ताण आणि धागे समजून घेतलेले आहेत. स्त्री पुरुष नात्याची गरज या नव्या पिढीने नि:संकोचपणे स्विकारलेली दिसते.

याच कालखंडातील कवयित्री हेमा लेले यांचा' क्षण अस्तित्वाचे' (२०००) मध्ये प्रकाशित झालेल्या कविता संग्रहात त्यांनी स्वत:च्या 'बाईमाणूस' असण्याचे आणि त्या जाणिवेसह जगताना मिळणाऱ्या नैसर्गिक बळाचे, सौदर्यांचे, भावनेचे आणि आसक्तीचे भाव व्यक्त करणारा संग्रह आहे. 'स्त्री' त्वाचे आवरण झुगारून आयुष्याची आसक्ती या संग्रहात व्यक्त झालेली दिसते.

'एकाच जन्मात मी किती वेळा जन्मले'
याचा प्रत्यय घेऊन
'ईश्वराचे दशावतार स्वत:त मीच सामावून घेतले
मीच ती — — — — आदिशक्ती' आदिमाया 'आद्यस्वरूपिनी'
(क्षण अस्तित्वाचे)

हा विलक्षण प्रत्यय व्यक्त करणाऱ्या स्त्री जीवनाच्या सर्व शारिरीक, मानसिक, आत्मिक अवस्था प्रस्तूत संग्रहात हेमा लेले यांनी व्यक्त केल्या आहेत. 'स्त्री' म्हणून जगताना येणाऱ्या सर्व भूमिका मनापासून आवडीने आणि आनंदाने पार पाडण्यात धन्यता मानणारी ही स्त्री आहे.

याउलट जीवन जगताना जाणिवांचे विस्तृत होत गेलेले प्रदेश आसावरी काकडे यांच्या कवितांतून आढळतात. त्यांचे १९९० नंतर एकूण सहा कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत 'आरसा' (१९९०), 'आकाश' (१९९१), 'लाहो' (१९९५), 'मी एक दर्शनबिंदू' (१९९९), 'रहाटाला पुन्हा गती दिलीय मी' (२००५), 'स्त्री असण्याचा अर्थ' (२००६) या सहा संग्रहातून त्यांनी जीवन जगत असताना मनात भावना, विचार, चिंतन यांची अनेकविध स्पंदने कवितेत आविष्कृत झालेली आहेत. त्यांच्यामते ''कोणत्याही रुपातली प्रत्येक प्रामाणिक कविता अभिव्यक्ती असते 'एकेका आकलनाची, ते आकलन असतं, स्वत: विषयीचं, नात्याविषयीचं समाजस्थितीचं, निसर्गाचे किंवा या सगळयांच्या मुळाशी असू शकेल अशा एखाद्या तत्वाचं — — —— —'' (मनोगत: रहाटाला पुन्हा गती दिलीय मी)

कवयित्री आसावरी काकडे यांच्या कवितांमधून जीवनविषयक आकलन आणि जीवनातल्या विविध अनुभवाविषयीचे चिंतन व्यक्त झालेले आहे.

परीघ नसलेल्या वर्तुळाच्या
केंद्रबिंदूशी मी,
सर्वांगाला जाणिवेचे डोळे
भोवती असंख्य अस्थिर वाटा — — —

(आरसा: पृ. २१)

किंवा

'जुनी होतातच नाती — — — जुनी झाली की विरतात — —
कितीही काळजीपूर्वक विणलेली असली तरी
— — — — यात दोस कुणाचाच नाही !
आपण समजूनच घ्यायला हवं
की नात्यांनाही आयुष्य असतं !'

(लाहो: पृ. ४२—४३)

या कवितेतून नात्यांचा सुक्ष्म शोध, त्या नात्यांविषयीच्या सत्याची जाणीव व्यक्त होताना दिसते.

एक प्रकारचा शांत समंजस सूर आसावरी काकडे यांच्या कवितेत दिसुन येतो.

'केव्हा संपेल' —या कवितेत,
तू तिथे कंबरे इतक्या पाण्यात उभी राहून
रोखू पाहते आहेस — — — — — —

(रहाटाला पृ. ७७)

असा मेधा पाटकर यांचा संदर्भ येतो. याच व्यापक संवेदनशीलतेने आसावरी काकडे स्त्री जीवनातील दु:खाकडे पाहतात. स्त्रियांचे जीवन, त्यांचे प्रश्न, त्यांच्या समस्या यांच्या संबंधीच्या उद्गारांनी समाजजीवन ढवळून निघते. 'स्त्रीचे', 'स्त्री' म्हणून असलेले सामर्थ्य विपरीत स्थितीत ही उभी राहते. त्यांच्या कवितेतल्या स्त्रिया आई प्रमाणेच निमूटपणे सहन करणाऱ्या जगण्याचा वारसा जपणाऱ्या आहेत.प्रस्तूत संग्रहात वेगवेगळी संकटे, आव्हाने, समस्या यांना तोंड देत, स्वत:चा शोध घेत स्वत:चे सामर्थ्यपणाला लावून जगणाऱ्या अनेक स्त्रियांच्या कहान्या कवितेच्या रुपात आलेल्या आहेत.

१९९० नंतरच्या काळात स्त्रियांच्या दु:खांच्या, पुरुषांनी त्यांच्यावर लादलेल्या अत्याचारावर अनेक कविता लिहिलेल्या आहेत 'स्त्री' म्हणून भोवतीच्या सामाजिक परिवेशात पुरुषप्रधान व्यवस्थेत जगताना येणारी अस्वस्थता अंजली कुलकर्णी यांच्या कवितेत व्यक्त होते . आजच्या नव्या जाणिवासह जगणारी, परंपरेने दिलेल्या गोष्टी नाकारणारी ही स्त्री पुरातन संस्कृतीलाही नकार देते.

'पापपुण्याच्या भित्र्या संकेतांनी
अधोरेखित केलेली
इथल्या संस्कृतीची संचित पावले
तू या संस्कृतीकडून काय मागते आहेस ?
सारं काही पाचवीलाच पूजल्याप्रमाणे
इथल्या प्रत्येकीचं जगणं मरणं' — — — —

(मी: एक स्त्री जातीय अस्वस्थ आत्मा: पृ. २८)

कवयित्री अंजली कुलकर्णी बंडाची भाषा उच्चारतानाच
'मी करणार नाही अग्निप्रवेश
देणार नाही कसलीही परिक्षा — — —
मी वसवणार आहे नवा गाव — — — —
आज बागडणाऱ्या रानपऱ्यांच्या
मुक्त उद्यासाठी — — — —

(संबद्ध : पृ.२३)

कवयित्री अत्यंत संवेदनशीलतेने सभोवतालच्या गोष्टीकडे पाहताना दिसतात.

नवदोत्तरी साहित्यात स्वत:च्या कवितेचा स्पष्ट असा ठसा उमटवणाऱ्या कवयित्री म्हणजे नीरजा, प्रज्ञा लोखंडे आणि कविता महाजन, नीरजा यांनी आपल्या तीन कवितासंग्रहातून प्रामुख्याने स्त्रीकेंद्री आणि स्त्रीवादी जाणिवेची प्रखर कविता लिहिली. त्यांच्या 'निरन्वय'

(१९८५) या संग्रहात त्यांच्या कवितेचा समकालीन कवयित्रीपेक्षा वेगळया कविता लिहिल्या आहेत. संस्कृतीच्या जुन्या संकेतांना त्यांच्या कवितेतील स्त्री जुमानत नाही. नीरजा यांच्या कविता उपरोधिक, उपहासात्मक शब्दांची तीक्ष्ण धार असणाऱ्या आहेत. आजची स्त्री नवीन बळ, ताकद घेऊन कवयित्री नीरजा यांच्या कवितेत येते संस्कृती विरुद्ध केलेल्या बंडाचे परिणामही कवयित्री नीरजा यांनी व्यक्त केले आहे.

'मी मोकळे केले शब्दांना सोनेरी पिंजऱ्यातून
तर रुसून बसले पैंजण दाराआड किणकिणणारे
शब्दांच्या भाले बर्च्या जेव्हा उगारल्या,
तथाकथित पुरुषार्थावर
तर चुलीतली ओली लाकडेही पेटून उठली — —
(वेणा : पृ.६७)

स्त्रीची पत्नी, माता या भूमिकांचे परंपरेने, संस्कृतीने केलेले उदात्तीकरण नीरजा यांनी तीक्ष्ण शब्दात खोडून काढलेले आहे. कवयित्री नीरजा यांनी स्त्री जातीचे दु:ख कवितेतून मांडले आहे.

'ती थिरकते आहे, अनादी काळापासून त्याच्या नजरेच्या तालावर — — —
— — — — — त्याच्या मनात उमटणाऱ्या चित्राप्रमाणं — — —
(स्त्रीगणेशा : पृ.४२—४३)

नीरजा यांची कविता स्त्रीकेंद्री नाही तर स्त्रीवादी आहे कवयित्री नीरजा यांच्या कवितेसंदर्भात प्रभा गणोरकर म्हणतात, ''स्त्रीचे शरीर तिचे अस्तित्व, तिचे कुटूंबातील स्थान, कर्तव्ये यावर असलेली पुरुषांची मक्तेदारी लैगिक शोषणाची, असहायतेची, वेदनेची अन्यायाची भावना नीरजा आपल्या कवितेतून व्यक्त करतात. स्त्रीनेही हे कसे स्वीकारले आहे ते दाखवून त्याविरुद्ध त्यांनी घेतली भूमिका स्पष्ट शब्दात कवितेतून त्या व्यक्त करतात. दीर्घत्वाकडे झुकणारी मुक्तछंदातील रचना हे त्यांच्या कवितेचे रूप आहे.''[४] या स्त्रीवादी वैचारिक भूमिकेमुळे नीरजांची कविता लक्ष वेधून घेते. प्रज्ञा लोखंडे यांचे तीन काव्यसंग्रह 'अंत:स्थ' (१९९३), 'उत्कट जीवघेण्या धगी वर' (२००२), 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' (२००७) प्रकाशित झाले पहिल्या संग्रहातच कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी स्त्री स्वातंत्र्याचा उघडपणे स्विकार केला आहे.

'तुझ्यातला अहं जागवला
न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति म्हणणाऱ्या मनूने
आणि तू ही स्वत:भोवती घातलेस व्यवस्थेच्या साक्षीनं — —
(अंतस्थ : पृ. ३)

स्त्री म्हणून स्वत:कडे समाजाकडे पाहताना भावना, संवेदना विचारांची वलये कवयित्रीने आपल्या कवितेत उत्कटपणे व्यक्त केली आहेत. स्त्री — पुरुष नात्याचा शोधही त्यांच्या कवितेत दिसून येतो. 'उत्कट जीवघेण्या धगी वर' या कवितासंग्रहात स्वत:च्या दु:खाचे संदर्भ, अर्थ समजून घेतानाच ते दु:ख एकटीचे न राहता स्त्री जातीच्या सनातन दु:खाचा अन्वयार्थ शोधू पाहताना दिसतात.'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' या संग्रहात स्त्री पुरुष संबंधातली वेदना व्यक्त होते.

'प्रेम' या भावनेचा, जाणिवेचाही अर्थ नेमका कळत नाही.
नेमकं काय हवं असतं प्रेमाला
इच्छांचा टोकदार दरवळ , की त्याहुनही अधिक काही?
(मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा: पृ.३०)

या तीनही संग्रहात प्रज्ञा लोखंडे यांनी स्वत:च्या अस्तित्वाशी निगडित दु:खाचे नाते सर्व स्त्री जातीच्या दु:खाशी जोडून घेतलेले दिसते. त्यांच्या कविता आत्यंतिक दु:ख, त्यातून निर्माण झालेला संताप, उद्रेक, विद्रोह, नकार उत्कटपणे व्यक्त होतो स्त्रीवादी विचारप्रणालीची परिभाषा स्वतंत्र व्यक्तिमत्व धारण करताना दिसते.

१९९० नंतरच्या काळातील कवयित्रीमध्ये स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटवणारी कवयित्री म्हणजे कविता महाजन. त्यांचे 'तत्पुरुष' (२००५) आणि 'धुळीचा आवाज' (२००६) हे दोन संग्रह प्रकाशित आहेत. कविता महाजन यांची कविता आजच्या कठोर वास्तवात जगण्याची धडपड करू पाहणाऱ्या स्त्री ची कविता आहे. 'तत्पुरूष' या संग्रहात पुरुषाची 'मालक' म्हणून जी सत्ता असते, तिचे स्त्रीच्या दृष्टिकोनातून चित्रण केलेले आहे या संग्रहातील कविता स्त्री — पुरुषातील विषम नातेसंबंधावर ताशेरे ओढणाऱ्या आहेत. विवाहसंस्था स्त्रीला बहाल करीत असलेल्या तथाकथित सुर्रक्षततेचे वर्णन कविता महाजन 'पिंजरा' हे रूपक वापरून करताना दिसतात. विवाहसंस्थेमुळे वहिवाटीचे समाजातील स्त्री पुरुषाच्या नात्यातील विषमतेचे सुक्ष्म सत्तास्पर्धेचे आणि बाईने आपणहून स्विकारलेल्या तर कधी नाइलाजाने पत्करलेल्या गुलामगिरीचे, लाचारीचे, भयाचे समाजव्यवस्थेचे स्त्री — पुरुषांकडे सोपविलेल्या भूमिकांचे निरीक्षण या कवितांमध्ये आढळते. स्त्री जाणिवेच्या वेगळया अनुभवाच्या कविता असे त्यांच्या कवितेच्या संदर्भात म्हणता येते.

'बाई नाकारते आता, रोजच्या रोज पहाटे आंघोळीनंतर
स्वच्छ मोकळ्या कपाळावर कुंकू लावणं
आणि दिवसाची सुरुवातच लालभडक पूर्णविरामानं करणं' —
— — —
(तत्पुरुष : पृ . ५२)

किंवा,

‘भीती वाटतेय : घराबाहेर पडण्याची
आणि घरात थांबण्याची देखील
येत नाहीये अंदाज, की त्याच्या हातातल्या बाटलीत
माझ्यासाठी अत्तर असेल ॲसिड !’
(तत्रैव : पृ. ६५ )

ही भयानक दहशत, प्रखर वास्तव रोजच्या कुठ्यतरी स्त्रीला अनुभवावे लागणारे वास्तव ‘तत्पूरुष’ मधील कविता संग्रहातून प्रकट होते.

कविता महाजन यांची कविता अतिशय तरल, सूक्ष्म आणि स्त्रीवादी आहे. साध्या दैनंदिन तपशिलांच्या वर्णनातुन भोवती घुसमटणारे वास्तव, बाईपणाच्या अस्तित्वाशी निगडीत एकटेपण सुक्ष्मपणे त्यांच्या कवितेतून शब्दांकित होताना दिसते. कविता महाजन यांच्या कवितेतून प्रेमाची सहजीवनाची उब, स्त्री म्हणून जगताना अपेक्षाभंग, मानहानी कुंठितता, भय, दहशत, असुरक्षितता या विविध जीवनरूपांचे चित्रे प्रकटताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या कवितेत ‘मी’ विरुद्ध इतर हे व्दंव्दं असून इतरांनी घेरलेल्या विश्वात तरल, संवेदनक्षम मन घेऊन जगू पाहणाऱ्या ‘मी’ ची भिती, दहशत आहे त्यामुळे त्यांची कविता अस्तित्ववादी कविता असल्याचे भासते.

‘एकदा न्हाणीघरात फरशी कोरून
लाल मुंग्यांनी खोलवर घर केलं
ते सिमेंट ने बुजवल्यावर
मुंग्यांनी रात्रीतून कोरली नवी वाट
तेव्हापासून — — — अचानक बदलून गेली बाई’ — —
(धुळीचा आवाज : पृ .७२)

स्त्रीचे मन, संवेदनशीलता, संकोच, स्वभावधर्म घेऊन कवितेच्या आजच्या प्रवाहात त्यांच्या कविता दाखल झाल्या आहेत.

स्त्रीवादाचा एक तत्वप्रणाली म्हणून स्वीकार करून स्त्रीवादी कविता लिहिणाऱ्या कवयित्री म्हणजे अश्विनी धोंगडे यांचा ‘अपौरुषेय’ (१९९८). शैला लोहिया यांचा ‘कविता गजाआडच्या’ हा कवितासंग्रह, सुजाता शिरवळकर यांचा ‘स्वत:तल्या परस्त्री बद्दल सात कविता’, नीलिमा गुंडी यांचा ‘स्पर्शरेषा’ हा कवितासंग्रह इ. कवितासंग्रह स्त्रीवादी जाणीवा व्यक्त करतो. स्त्रीवादी आत्मभानातून दु:खाला नकार देण्याची भाषा येते तसाच आत्मशोधही येतो.

एकंदरीत 'स्त्रीवादी' जाणिवातून कविता लिहिणाऱ्या आणि मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय संस्कृतीच्या मर्यादित वर्तुळातून कवितेला बाहेर काढणाऱ्या इतर कवयित्रीच्या कवितेत तळागाळातील स्त्रीही आलेली आहे.

दलित कवितासंग्रहातही समकालीन दलित कवयित्रींच्या कवितांमध्ये सुगंधा शेंडे, कुमुद पावडे, आशा थोरात, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, सुरेखा भगत, निर्मला लेढें, प्रतिमा अहिरे, राजानंद, माया वासनिक, उषा हिंगोणेकर, जोत्स्ना चांदगुडे, संध्या रंगारी, नीलांबरी शिर्के, धम्मजोती शेगोकार कांबळे, मीना गजभिये, उसा आंभोरे, प्रज्ञा बडोले, या कवयित्रींचा समावेश आहे. यातल्या कित्येक कवयित्रींचे कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. दलितांचे असहय दारिद्रय, शोषण, दलित स्त्रीचे दु:ख, सवर्णांनी केलेले अत्याचार, विद्रोहाची गरज व हाक, स्त्रीचे नवे आत्मभान ही या कवयित्रींच्या कवितांमधली प्रमुख आशयसुत्रे आहेत.

दलित ग्रामीण कवितेत लक्ष्मीकमल गेडाम, देवका देशमुख, अभंग रचना करणाऱ्या मयूरा देशमुख, सामाजिक प्रबोधन करणाऱ्या उर्मिला ठाकरे, संघजा मेश्राम, अरुणा पवार, इंदुमती लहाने, विजय एंबडवार, विमल गाडेकर अशा अनेक कवयित्रींना भर घातली आहे.

ग्रामीण भागातही स्त्रीवादी जाणिवेचे नवे भान काही कवयित्रींच्या कवितेत दिसते. प्रतिमा इंगोले, पद्मिनी कराड यांच्या कवितेत मुलात आणि मुलीत बाप भेदभाव करतो हे जाणवणारी आई दिसते.

आदिवासी कवितेत उषाकिरण आत्राम 'म्होरकी' (१९९७) आणि कुसुम अलाम 'रान आसवांचे तळे' (२०००) इ. सर्व आदिवासींचे आणि आदिवासी स्त्रीचे प्रतिनिधित्व करीत आदिवासींच्या दु:खाचे संदर्भ तपासणारी आणि जीवनसंघर्षाला सामोरी जाणारी कविता या कवयित्रींनी लिहिली आहे. 'स्व' त्वाची जाणीव या कवितांमधून व्यक्त होते.

'आपल्या अंत:स्थ अहंवर' (इनर सेल्फ) या कवयित्रींनी जवळजवळ अंध म्हणावी इतकी श्रद्धा आहे. या अंत:स्थ अंधश्रध्देतून एक अफाट आंतरविश्व अविर्भुत झाल्याचा वा त्या आंतरविश्वाचा परोपरीने शोध घेण्याचा प्रेरक विश्वासही या कवयित्रींनी बाळगलेला आहे. ''[५]

समकालीन साहित्यात कविता प्रवाहात कवयित्रींनी स्त्रीच्या दु:खाचे अनेक पदर उघडलेले आहेत. स्त्री या दु:खातून, शोषणातून अनेक तऱ्हेच्या आघातातूनही कशी स्वत:ला उभी करते ते सांगत जीवनाला कवितेच्या माध्यमातून वेगळे बळ पुरविले आहे असे म्हणता येते.

स्वत:च्या जीवनातले प्रेमभंगाचे, वंचनेचे, नैराश्याचे स्वप्न विरून गेल्याचे असहायतेचे, एकाकी असण्याचे दु:ख हा बहुसंख्य स्त्रियांच्या कवितेचा मुख्य आशय दिसतो. बहुसंख्य कवयित्रीची कविता व्यक्तिगत दु:खाचा आविष्कार करणारीच आहे. त्यामुळे या कवयित्रींच्या

काव्यसंग्रहातून प्रगल्भता जीवनाकडे काहीशा तत्वज्ञ वृत्तीने समाधानीपणाने पाहणारी दृष्टी आणि आशावादी सूर हा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरतो.

स्त्रियांची कविता हा स्त्रियांच्या जाणिवांच्या, आत्मिक व बौद्धिक विकासाचा प्रवास दाखवणारा आलेखच आहे. आधुनिक काळातल्या स्त्रीच्या व्यक्तिमत्वाला लाभत गेलेली विविध परिमाणे गेल्या शतकातील स्त्रियांच्या कवितांमधून प्रकटताना दिसतात. स्त्री जीवनाचा आणि मानवी जीवनाचा तत्वचिंतक वृतीने घेतलेला वेध या कवयित्रीच्या कवितामधून व्यक्त केला आहे. तो अनुभवताना 'स्त्री' च्या प्रगल्भ, आशाप्रेरित वृत्तीचा आणि मुक्त पक्षाप्रमाणे गगन भरारी घेणाऱ्या व्यक्तीमत्वाचा प्रत्यय येत राहतो.

**संदर्भ ग्रंथ :**

*१) प्रभा गणोरकर – ''मराठीतील स्त्रियांची कविता''– लोकवाङ्:मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती–२०१५ पृ. १४९*
*२) तत्रैव – पृ. १६०*
*३) तत्रैव – पृ. १६६*
*४) तत्रैव – पृ. १८८*
*५) रा.ग. जाधव – ''आधुनिक मराठी कवयित्रीच्या कविता'' –प्रतिमा प्रकाशन १९९६,पूणे, पृ.६४*

# समकालीन मराठी साहित्य:चिंतन आणि चिकित्सा

**भूषण प्रदीपकुमार देशमुख**
*(संशोधक), जगदीशप्रसाद जाबरमल टिब्रेवाला विद्यापीठ, झुनझुनु राजस्थान*
**डॉ. प्रा. वंदना भोयर**
*मार्गदर्शक, मराठी विभाग इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती*

## मराठीतील समकालीन दलित साहित्य :

### प्रस्तावना -:

आधुनिक मराठीतील एक महत्त्वाचा साहित्यप्रवाह. सामाजिक व वाङ्मयीन अशा दुहेरी विचारमंथनातून स्वातंत्र्योत्तर काळात ही संज्ञा पुढे आली. विशेषत्वाने १९६० नंतर ती विशेष चर्चाविषय ठरली. दलित शब्दाचा पतित किंवा पडलेला वा दीनदुबळा हा अर्थ येथे मुळीच अभिप्रेत नाही. ह्या देशातील समाजव्यवस्थेतून हा शब्द निर्माण झाला. वर्णाश्रमव्यवस्थेने एका मोठ्या समूहाला विविध कारणपरंपरांनी अस्पृश्य घोषित केले. साधेसुधे मानवी जीवन जगणेही त्यांना अशक्य करून सोडले. ज्ञान, मान, सत्ता, संपत्ती, संस्कृती आणि सर्वस्व यांच्यापासून त्याला अलग काढले. दलितत्वाचा शिक्का ठोकून पुरते नगण्य करून टाकले. समाजाच्या अनेक पदरी जीवनानुभूतीचे चित्रण प्रतिभावंतांच्या आविष्कारातून शब्दबद्ध केले जात असते पण भारतीय साहित्यात दलित वर्गाच्या लौकिक आयुष्यातील फरफट आणि भावजीवनाची वास्तपुस्त कधी ग्रंथबद्ध झालीच नाही.

### दलित साहित्याची निर्मिती -:

विचारांध बनविणारी धर्माधिष्ठित परंपरा दलित साहित्याने निग्रहाने नाकारली. ह्या अंधत्वाला त्याने ठामपणे नकार दिला, तर मानव म्हणून नव्याने उभारी धरताना मानवी परंपरेशी, ते व्यापकपणे दृढबद्ध झाले. वैचारिक व मानसिक दास्यातून मुक्तीचा उमटणारा हुंकार म्हणून ते आकारू लागले. आपल्या सांस्कृतिक साध्याकडे वाटचाल करू लागले.मानवी हक्क नाकारणाऱ्या चातुर्वर्ण्याकडे, त्याला पोसणाऱ्या धर्मबंधनाकडे आणि त्याचा मूलाधार असलेल्या, माणसाला अगतिक ठरवणाऱ्या ईश्वराच्या अस्तित्वाकडे संपूर्ण वैज्ञानिक, स्वाभाविक व मानवीय दृष्टिकोणातून पाहण्याची गरज निर्माण झाली. उदियमान होऊ पाहणाऱ्या मनांवर संस्कार घडविण्याची क्षमता असलेले दलित साहित्य बाळसे धरू लागले. साहित्याने जीवनाशी, जीवनातून प्रतीत होणाऱ्या पण तरीही शब्दात न बांधता येणाऱ्या तरल भावस्पंदनांशी, मूल्यगर्भ वैचारिकतेने समांतर असलेच पाहिजे, ही निष्ठा बांधीलकी यातूनच उद्भवली. दलित आणि दलितेतर हे एकाच समाजाचे जरी घटक असले, तरी त्यांची जगे मूलतः भिन्नच आहेत. १९५६ साली हे गृहीत धरूनच डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराचे पाऊल उचलले. दलितेतरांच्या वैचारिक गुलामगिरीवर हा प्रत्यक्ष प्रहार होता पण लवकरच डॉ. आंबेडकरांचे महानिर्वाण झाल्याने दलित समाजावरही मोठाच आघात झाला. अशा दुहेरी आघात प्रक्रियेतून दलित साहित्य उसळी घेऊन उभे राहिले. नाकारलेल्या समूहमनाची संघशक्ती डॉ.

आंबेडकरांच्या रूपाने प्रकट झाली होती. त्यांच्या अष्टपैलू नेतृत्वाची धग अनेक क्षेत्रांत दलितेतरांनी अनुभवली. ‘आपली सुखदुःखे आपल्या भाषेत बोलणारे लेखन झाले पाहिजे’, असे विचार ते त्यांच्या वक्तव्यांत मांडत. ‘ग्रंथांची भाषा जिवंत व नारळीपाण्याइतकी मधुर अशी असावयास हवी. या ग्रंथांच्या वाचनाने माणसांची झोप उडून जाऊन त्यांची विचारशक्ती जागृत झाली पाहिजे’ असे ते म्हणत. हाच दलित साहित्याचा उगमस्राेत म्हणावा लागेल. प्रचलित व्यवस्थेच्या दावणीला बांधले गेलेले पारंपारिक निकष या साहित्याने नाकारले. ग्रंथप्रामाण्य, ईश्वर, स्नानसंध्या, जातीवाद आणि देहदंडन ही ध्वस्तप्रज्ञाची लक्षणे धर्मकीर्ती या बुद्ध विचारवंताने सांगितली आहेतच. ते ओळखून हे लेखन अधिक संयतपणाने होऊ लागले. ‘भक्तीच्या मुलाम्याने माणुसकीला किंमत येते असे नाही’ हे सूत्र स्मरणात ठेवून आरंभी ज्यांनी लेखन केले त्यांत किसन फागू बनसोडे ह्या नावाचा खास उल्लेख करावा लागेल. हरिहरराव सोनुले, ना. रा. शेंडे, शंकरराव सुराडकर, चां. भ. खैरमोडे, नामदेव व्हटकर, दा. ता. रूपवते, घनःश्याम तळवटकर इ. अनेक लेखकांनी ठामपणे हा विचार सर्वत्र रुजविला. या काळात महाराष्ट्रभर लोकजागृतीचे कार्य वेगाने घडले. शाहीर केरू अर्जुन घेगडे, केरूबुवा गायकवाड, पतीतपावनदास, दीनबंधू, राजानंद गडपायले, वामन कर्डक, श्रावण यशवंते यांनी सर्व समाजमन आपल्या रसपूर्ण आवाहक गीतांनी घुसळून लखलखीत केले. सुख, समृद्धी, सभ्यता, समानता यांची स्वप्ने पाहात व महाराष्ट्राचे नंदनवन व्हावे ही अपेक्षा करीत अण्णाभाऊ साठे यांनी आपली लेखणी सरसावली. ‘त्यांची ती शाहिरी त्यांच्या जिभेवर साणेवर घासलेल्या तलवारीप्रमाणे लखलखत होती’ हे अण्णाभाऊंनी केलेले शाहिरांवरील भाष्य त्यांच्याच लेखनाला चपखल बसते. १९५९ साली अवतरलेली फकिरा ही त्यांची सर्वोत्तम कलाकृती. बरबाद्या कंजारी (१९६०), आबी (१९६१), माकडीचा माळ (१९६३), वारणेचा वाघ (१९६८) असे विपुल लेखन अण्णाभाऊंनी केले पण पुढे त्यांच्या लेखनाला केवळ संख्यात्मक मूल्य उरले. त्यांच्या लेखन प्रपंचाचा ‘मराठी कादंबरी’ च्या आढाव्यात नामोल्लेखही येऊ नये, ही गोष्ट रूढ साहित्यविचार उघडा पाडणारीच होती.

**दलित साहित्याची सद्यस्थिती :**

दलित साहित्यात वास्तव जीवनाचे जळते चित्रण फार मोठ्या प्रमाणातून प्रकट होण्याचा काळ म्हणजे १९६० नंतरचे लेखन. उपलब्ध साहित्यात शब्दांच्या खोडाबेडीत अडकलेली क्षीण रेखाटने आणि स्वानुभवाच्या खोलीने अथांग बनलेली वेगवान शब्दांकने यांच्यात तीव्र स्पर्धा जाणवू लागली. शंकरराव खरात, हरिभाऊ पगारे, बंधुमाधव, बाबुराव बागूल, सुखराम हिवराळे, केशव मेश्राम, वामन होवाळ, नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, राजा ढाले, चोखा कांबळे, हिरा बनसोडे, भीमराव शिरवाळे, सुरेखा भगत, योगीराज वाघमारे, त्र्यंबक सपकाळे, दया पवार, दत्ता भगत, वामन निंबाळकर, प्रल्हाद चेंदवणकर, नरेंद्र शेलार, माधव कोंडविलकर, उमाकांत रणधीर, अरुण कांबळे, अर्जुन डांगळे असे खूप लेखक या काळात लेखक म्हणून गुणवैशिष्ट्याने पुढे आले. सैद्धांतिक व ललित आणि विविध वाङ्मयप्रकारांनी दलित साहित्यात १९६० नंतरच्या काळात मोठीच भर पडली. मराठी वाङ्मयविवेचकांना त्याची गंभीर नोंद घेऊन त्याचे मूल्यांकन व्यासंगीपणे करण्याची अपरिहार्यता निर्माण झाली. म. भि. चिटणीस, म. ना. वानखडे, डी. टी. माने, ताराचंद्र खांडेकर,

गंगाधर पानतावणे, राजा ढाले यांनी दलित साहित्याच्या भविष्याची वेळोवेळी विवेचक चर्चा करून त्यास मौलिकता प्राप्त करून दिली. शंकरराव खरात यांचे साहित्य लक्षणीय असेच आहे. उपेक्षित समूहमनाची व व्यक्तिमनांची वेदना, त्यांच्यातील माणुसकी, सोशीकता आणि उद्रेक यांचे प्रत्ययकारक चित्रण खरात सामर्थ्याने करतात. माणुसकीची हाक (१९५८), बारा बलुतेदार (१९५९), तडीपार (१९६१), सांगावा (१९६२), टिटवीचा फेरा (१९६३), दौंडी (१९६५), गावशिव (१९७०) या त्यांच्या कथासंग्रहांतून त्यांनी निर्माण केलेल्या माणसांचे अनेक स्तरांवरील जीवन खिळवून ठेवते. वैचारिक लेखन आणि कांदबरीलेखनही खरातांनी केले आहे पण त्यांची वैशिष्ट्ये प्रामुख्याने कथालेखनातूनच जाणवतात. उद्दाम आणि झंझावती भाषेचा आणि विचारप्रवण करणाऱ्या विद्रोहाचा लाव्हा श्री. बाबुराव बागूल यांच्या लेखनातून उसळतो. जेव्हा मी जात चोरली होती (१९६२), मरण स्वस्त होत आहे (१९६९) आणि सूड (१९७०) अशा पुस्तकांतून बागूलांचे आत्मवेध घेणारे व समाजचिंतनात सतत बुडालेले मन प्रकर्षाने ध्यानात भरते.

दलितांची वृत्तपत्रसृष्टी हा एक वेगळा अभ्यासाचा विषय आहे. त्यांच्या वृत्तपत्रातून व्यक्त होणारी त्यांची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक दृष्टी अभ्यसनीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्वी गोपाळबाबा वलंगकर यांचे विटाळविध्वंसक (१८८८), किसन फागू बनसोडे यांची विटाळविध्वंसक (१९०२), निराश्रित हिंद नागरिक (१९१३), मजूर पत्रिका (१९१८), चोखामेळा (१९३१) ही नियतकालिके, शिवराम जानबा कांबळे यांचे सोमवंशीय मित्र (१९०९), गणेश आक्काजी गवई यांचे बहिष्कृत भारत (१९२०) ही नियतकालिके, पाक्षिके, साप्ताहिक या स्वरूपांत होती. निराश्रित हिंद नागरिकच्या निवेदनात संपादकाने म्हटले होते, 'अस्पृश्य मानलेल्या समाजाच्या सुधारणेला ज्या ज्या प्रयत्नांची आवश्यकता आहे, त्यां वर्तमानपत्र चालविणे हाही एक अत्यंत आवश्यक व महत्त्वाचा प्रयत्न होय. चळवळीचा प्रसार करण्याचे व लोकजागृती करण्याचे हे एक मुख्य साधन आहे'. यावरून उपरोक्त दलित पत्रकारांच्या पुढे कोणते ध्येय होते हे स्पष्ट दिसते. त्या अनुषंगाने त्यांनी केलेले लेखन मोलाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० साली मूकनायक, १९२७ साली बहिष्कृत भारत, १९२९ साली जनता आणि १९५५ साली प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रे जन्माला घातली. बहिष्कृत भारतातील त्यांचे अग्रलेख म्हणजे त्यांच्या वृत्तपत्रसृष्टीतील तेजस्वितेचाच प्रत्यय आणून देतात. चिंतन, अभ्यासपूर्णता, तर्ककठोरता आणि सामाजिक दृष्टिकोण यांचे दर्शन त्यांच्या सर्वच लेखनातून घडते. मराठी वृत्तपत्रसृष्टीने या महान पत्रपंडितांकडे दुर्लक्ष करून मराठी सारस्वताचे फार मोठे नुकसान केले आहे. बहिष्कृत भारतातील निवडक लेख रत्नाकर गणवीर ह्यांनी बहिष्कृत भारत (१९७६) साली ह्या नावाने संपादिले आहेत.

दलित साहित्य स्वानुभवाच्या आचेतून, अस्मितेच्या शोधात, उपलब्ध वाङ्मय व समाजमूल्यांच्या विरोधात भक्कमपणाने उभे राहिले आहे. प्रत्यक्षानुभवाचे चित्रण करताना ते स्वतःचे आदर्शही शोधीत चालले आहे. चालत राहिल्यावर रस्ता तुटावा आणि ठिकाणही जवळ यावे अशा तऱ्हेची ही वाटचाल आहे. या आत्मशोधाचे निष्कर्ष, नवदर्शनाची विलसिते, विराट जीवनाचे मूल्यगर्भ चिंतन आणि समाजाच्या प्रवाहीपणावर टिकून राहणारी वाङ्मयीन महात्मता, या दृष्टीनेच दलित साहित्याकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले पाहिजे.

**दलित म्हणजे कोण?**

भारतीय समाजव्यवस्थेत दलित या शब्दाला एक विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे ज्याला माणसांसारखे जपणे नाकारले आहे तो दलित. जातींचा समूह या अर्थाने हा शब्द वापरला जात असला तरी त्यामध्ये सामाजिक, आर्थिक , धार्मिक अशा अर्थाचा ही समावेश असतो. कारण हा समाज जसा सामाजिक दृष्ट्या दलित असतो तसाच आर्थिकदृष्ट्याही समाजाने नाकारलेल्या असतो. दळलेल्या गेलेले भरडल्या गेलेले शोषण झालेल्या अशा व्यक्तींच्या अनुभवांना दलित साहित्य व्यक्त करत असते. यातूनच समूह मनाची वेदना अभिव्यक्त होत असते.

एखादी व्यक्ती दलित समाजात जन्माला आली म्हणून तिचे साहित्य दलित साहित्य ठरत नाही. ज्या व्यक्तीचे अनुभव दलितांच्या वाट्याला आलेल्या जीवन पद्धतीतून व्यक्त झाले असतील त्यांचे साहित्य दलित ठरू शकते.

**दलित साहित्य म्हणजे काय?**

"दलितांची दुःखे कुचंबना गुलामगिरी कौटुंबिक अधःपात विपन्नावस्था विटंबना ह्या बरोबरच दारिद्रयातही तळपणारे सामर्थ्य शौर्य माणुसकी इत्यादी सर्वांगीण जीवनाचे कलात्मक शैलीचे साहित्य म्हणजे दलित साहित्य." तसेच नवसाहित्य चळवळी सकट मराठीतील कोणत्याही साहित्य चळवळीने उडाली नसेल इतकी वादाची खळबळ दलित साहित्याने उडाली आणि नवसाहित्याच्या चळवळीची धार लवकरच नमली आणि ती स्थिरावून गेली. परंतु आरंभीच्या काळात दलित साहित्यामुळे उडणारी तीव्र आक्रमक प्रतिक्रिया आता उठत नसली तरी त्याला अजूनही व्यापक प्रमाणात मान्यता मिळालेली दिसत नाही.

मात्र त्या साहित्याची गंभीर चर्चा चिकित्सा करणारे प्रवक्ते आता पुष्कळ आहेत आणि चळवळीच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट म्हणजे त्यांच्यापैकी कितीतरी जण स्वतः दलित नाहीत वाद विषय झालेल्या दलित साहित्याच्या मुळाशी दलितांची सामाजिक - आर्थिक परिस्थिती असल्याचे दिसून येते . आणि त्यालाच राजकीय परिणाम प्राप्त घेणे अपेक्षित होते पिढ्यानपिढ्या किंबहुना शतकानुशतके पशु सारखे लाजिरवाणे जीवन जगावे लागल्या बद्दलच्या साचलेल्या क्रोधाचा उद्रेक म्हणजे हे साहित्य हा क्रोध कधी कधी बेभान असतो , अविवेकी असतो. पण तो खरा उस्फुर्त असतो त्या विद्रोहा ने द्वेशाने कविता , कादंबरी आणि आत्मकथन या साहित्य प्रकारातील काही उत्कृष्ट कलाकृतींना जन्म दिला आहे. तेव्हाच नावीन्यपूर्ण दलित साहित्याची निर्मिती झाली.

**दलित साहित्याची चळवळ**

महाराष्ट्रातल्या दलित तरुणांनी 1972 साली दलित पँथर नावाची विद्रोही संघटना स्थापन केली. आणि तसे पाहता हाच दलित साहित्य च्या उदयाचा कालखंड आहे. दलित पँथरने दलितांच्या अन्यायाविरुद्ध आंदोलने केली. त्याचे प्रतिध्वनी देशभर दिसून आले आणि इतर राज्यातही दलित तरुण संघटित होऊ लागले. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे म्हणून दलितांनी हा नामांतराचा लढा 15 वर्ष पर्यंत चालविला. त्याचेही साद-पडसाद देशभर दिसून आले. नामांतराच्या लढ्याने देशातल्या दलितांना भावनिक पातळीवर एकत्र बांधण्याचा फार मोठं कार्य केलं . याच काळात महाराष्ट्र व केंद्र शासनाने

बाबासाहेब आंबेडकरांचे असलेले अप्रकाशित साहित्य प्रकाशित करणे सुरू केले . शासकीय यंत्रणेमुळे आंबेडकरी साहित्याचा झपाट्याने प्रसार झाला . भारतातल्या अनेक राज्यात बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्याची मागणी वाढली . भारतीय स्तरावर आंबेडकरी विचारांचा जसजसा प्रचार होऊ लागला त्या त्या प्रमाणात भारतीय दलितांच्या मनात पेट घेणे सुरू केले . तसेच भारतीय दलितांनी आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आपली नियतकालिके मासिके साहित्यिक संस्था प्रकाशन संस्था संमेलने आणि ग्रंथ वितरण व्यवस्था सुरू केली. याचा परिणाम म्हणून राष्ट्रीय स्तरावर दलित साहित्याच्या उदयाची, प्रवाहाची हालचाल सुरू झाली.

# स्त्रीचे वस्तूकरण म्हणजे हरण

**डॉ. जयदेवी पवार**

*कै. व्यंकटराव देशमुख महाविदयालय, बाभळगाव, ता.जि.लातूर*

*भ्रमणध्वनी :94031 00987 ईमेल : jaydevik123@gmail.com*

स्वातंत्र्यानंतर लोकशाही मूल्यांची अंमलबजावणी सुरु झाली. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाल्यामुळे वेगवेगळ्या भाषांमधून साहित्य निर्मितीलाही चालना मिळाली. प्रारंभी मराठी साहित्यामध्ये प्रस्थापितांचे असलेले वर्चस्व कमी होऊन 1960 नंतर येथे अनेक साहित्य प्रवाह निर्माण झाले. यात ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी साहित्यांचा समावेश झाला.

या कालखंडात स्वातंत्र्यानंतर पहिली पिढी शिक्षण घेऊन लिहिती झाली. स्त्री शिक्षणाच्या दृष्टीकोनातून मराठी कादंबरीची वाटचाल सुरू झाली. मानवी मूल्ये, व्यवस्था या साहित्यातून व्यक्त होऊ लागली. खऱ्या अर्थाने स्त्रीवादी साहित्य निर्मितीला स्वातंत्र्यानंतरच चालना मिळाली. महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज, सयाजीराव गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारामुळे स्त्री सुधारणेसाठी वैचारिक क्रांती आली. चुल आणि मूल यापुरते मर्यादीत असलेले स्त्रियांचे कार्यक्षेत्र विस्तारित झाले. तत्कालिन पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना काही प्रमाणात का असेना शिक्षण मिळू लागले. त्यातून अनेक स्त्रिया लिहित्या झाल्या. याचवेळी अनेक पुरुष लेखकांनीही स्त्रीयांवर कथा कादंबरीतून लेखन करण्यास सुरुवात केली. यातून मराठी साहित्यातून आलेली स्त्री, तिची वेगवेगळी रूपे आविष्कृत होऊ लागली.

मराठी ग्रामीण कादंबरीतून स्त्रीयांच्या दुःखाचे, व्यथा-वेदनांचे, अन्याय-अत्याचाराचे, पुरुषप्रधान संस्कृतीचे असे विविधांगी चित्रण येऊ लागली. त्यात 'धग', उघड्या जगात, म.भा. भोसले, श्यामची आई, व्यंकटेश माडगूळकरांची - पुढच पाऊल सारख्या कथा-कादंबऱ्यांतून चांगल्या प्रकारे वास्तव स्त्री जीवनाचे चित्रण शब्दबद्ध झाले आहे. या कथा-कादंबऱ्यातील स्त्रियांचे चित्रण लक्षात घेता ग्रामीण स्त्री जीवनाची वाट खडतर आहे हे जाणवते आहे. स्त्री शिक्षीत झाली, ती अनेक आघाड्यावर नेतृत्व करते आहे हे जरी खरे असले तरी आजही वास्तवातील स्त्री जीवन खुप मागासलेले आहे. या अनुषंगाने गीता साने म्हणतात "स्त्री जीवनात एवढे बदल झाले खरे, पण ते वरवरच आहेत. त्या जीवनाचा गाभा अजून जुनाच आहे. स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन अजूनही बदललेला नाही." 1

अनेक कथा-कादंबऱ्यामधून येणाऱ्या स्त्री जीवनाचा अभ्यास केला असता स्थळ आणि काळानुरुप स्त्री जीवनात फरक असल्याचे स्पष्ट जाणवते आहे. या अनुषंगाने हरण या एका कादंबरीतील स्त्री जीवनाचा विचार करता नागर संस्कृती व ग्राम संस्कृती या दोन संस्काराच्या माध्यमावर 'हरण' ही रंगनाथ पठारे यांची कादंबरी उभी असल्याचे दिसून येते. रंगनाथ पठारे यांच्या दुःखाचे श्वापद, हरण, ताम्रपट, सावलीचे वर्तमान, नामुष्कीचे स्वागत, चक्रव्युह, रथ, टोकदार, कुंठेचा लोलक, भर चौकातील अरण्यरुदन या कादंबऱ्या प्रकाशित आहेत. खेड्यातून येऊन शहरात स्थायिक झालेल्या व मध्यमवर्गीय बनलेला समाज, या समाजातील लोकांचे वर्तन, त्यांची संस्कृती याचे चित्रण पठारे यांच्या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या हरण

या कांदबरीत पुरुषप्रधान संस्कृतीचे चित्रण आले असून येथे स्त्रीयांच्या शोकांतिकेची मांडणी झाली आहे. पठारे आपल्या कादंबरीतून साहीत्य प्रकाराच्या नवनव्या वाटा धुंडाळताना दिसतात. त्यांच्या लिखाणात आशयाची व्यापकता आहे. त्यांना कादंबरीच्या रूपबंधाचे भान आहे. यासंदर्भाने महेंद्र कदम म्हणतात, "प्रयोगशील परंपरेशी नाते सांगणारे कादंबरीकार म्हणून रंगनाथ पठारे यांचा उल्लेख करावा लागतो." 2
रंगनाथ पठारे हे लिखाण करताना वास्तवाच्या विविध शक्यता धुंडाळताना दिसतात. हरण या कादंबरीतून स्त्रीला समाजामध्ये आपले चारित्र्य, शील जपत असताना कुचंबणा सहन करावी लागते याची जाणीव त्यांनी करुन दिलेली आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रीचं माणूसपण नाकारले आहे. तिचे व्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे. त्यामुळे स्त्रीला पुरुषाविना जीवन जगताना सर्वच पातळीवर माघार घेऊन जीवन जगावे लागते. ही स्त्रीची व्यथा त्यांनी आपल्या हरण या कादंबरीतून मांडली आहे. कादंबरीतील हरण ही नायिका निसर्गाने तिला दिलेल्या सौंदर्याचीच ती शिकार ठरते. पुरुषी प्रवृत्तीचा ती वेळोवेळी बळी ठरताना दिसून येते हे समाजवास्तव पठारेंनी रंगविले आहे.

कांदबरीतील मुख्य पात्र असलेली हरण ही व्यक्तीरेखा अण्णापूर सारख्या ग्रामीण भागातील धनगर जातीतील जन्माला आलेली स्त्री आहे. हरणचे आई-वडील ऊन, वारा, पाऊस, थंडी यांचा मारा सहन करीत कष्ट करतात. कुटुंबात अठराविश्व दारिद्य असल्यामुळे या कष्टकरी कुटुंबाचा जगण्यासाठी दररोजचा संघर्ष सुरु असतो. वडील हिरामण खाडे हा वाट्याला आलेल्या दारिद्यमय जीवनामुळे कमालीचा व्यवहारी आणि लोभी वृत्तीचा बनत जातो. आपल्या पोटच्या मुलीचा म्हणजे हरणचा विवाह भरपूर पैसा देणाऱ्या नारायण खेमण सारख्या कुरूप, भुक्कड मुलाशी लावून देतो. पण हे दांपत्य मनाने आणि शरीराने वाट्याला आलेल्या वैवाहिक जीवनात एकत्र येऊ शकत नाहीत. ही शोकात्म जाणीव कादंबरीतून समोर येते. स्त्रीच्या आयुष्यात जर सधन पुरुष पतीच्या रूपाने मिळाला नाही तर तिच्या जीवनाची घडी बसणे अवघड होते. शंकाकुशंकांना वाव मिळून आयुष्य उध्वस्त होते. इथे नैतिक मूल्याची धूळधाण होते. याचेच वास्तवातील दर्शन कादंबरीतून येते. नारायण सारख्या न शोभणाऱ्या पुरुषाचा स्वीकार हरण आपल्या कुटुंबाच्या इज्जतीसाठी करते. त्यात तो कंजुष वृत्तीचा माणूस, ऐतखाऊ प्रवृत्तीचा त्यामुळे हरणला संसारात ओढाताण सहन करावी लागते. यावरुन पुरुषी वृत्ती-प्रवृत्ती कादंबरीतून पदोपदी प्रत्ययास येतात. हरण ही नारायणाची धर्मपत्नी असतानाही तिला आपल्या संसारात स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा आणि जगण्याचा अधिकार नारायण मध्ये असलेल्या पुरुषी अहंकारामुळे मिळत नाही हे वास्तव चित्र कादंबरीतून साकार होते आहे. नारायणच्या काटकसरी वृत्तीमुळे कुटुंबाला दोन वेळचे जेवण घेणेही त्रासदायक ठरते. असे असले तरी हरण मात्र पतीच्या सुरात सुर मिसळुन प्रामाणिकपणे जगण्याचा सतत प्रयत्न करते.

याविषयी रंगनाथ पठारे म्हणतात, "डाळीची आमटी, बेसन, हुलग्याची शेंगुळी असे साधारणत: जेवणात असे. हुलग्यामुळे थोडे जास्तीचे हाल होत. पोटाला गुबारा धरल्यासारखे वाटे. पण वस्तू स्वस्त त्यामुळे सोयीस्कर. नारायणाची मोजमापी साक्षेपी नजर सतत सगळ्यावर असे. एकदा त्याला न विचारता हरण थोडी बोंबील घेऊन आली होती तर नारायण केवढा भडकला होता. त्यानंतर तिने पुन्हा कधीही ती चूक केली नाही. 3

कादंबरीतील या वर्णनावरुन पुरुषी मानसिकता स्त्रीच्या अस्तित्वाला कशी बेडरपणे चिरडण्याचे काम करते याची कल्पना येते. पतिच्या इशार्यावर स्त्रीला आपल्या जीवनाची वाटचाल करावी लागते, याचे दर्शन हरण मध्ये घडते. हरण सालस आणि सुंदर स्त्री असूनही ती गरिबीतील पती नारायण सोबत सुखाचा संसार

करीत राहते. पुढे समिंद्रा ही मुलगी त्यांना होते. कुटुंब वाढल्यानंतर नारायणच्या एकट्याच्या कमाईतून संसार चालवणे कठीण होते. त्यामुळे हरण रोजंदारीला जाऊन संसाराला हातभार लावते. गरीब घरची सुंदर मुलगी हरणला पत्नी म्हणून जीवन जगत असताना सहन कराव्या लागणाऱ्या मरणप्राय यातना कादंबरीत चित्रीत करण्यात आल्या आहेत. नारायणाचा व्यवहारी स्वभावाचा फायदा घेऊन वाईट नजर ठेवणाऱ्या मधुकर खेमकरची खलनायक व्यक्तिरेखा या कादंबरीतून चित्रीत करण्यात आलेली आहे.

मधुकर खेमकर सारखे इतर आहारी गेलेले वासनांध आंबटशौकीन हरणला त्रास देतात. पण हरण स्वतःचा तोल जाऊ देत नाही. आपला संसार पती-मुलगी याभोवती ती एकनिष्ठपणे राहते. हरणच्या रूपाने एका सुंदर स्त्रीच्या जीवनाची पडझड कादंबरीत रेखाटण्यात आली आहे. हरण आपल्या आयुष्यात एकनिष्ठतेला महत्त्व देते. समाजातील पुरुषी अहंकार, पुरुषी विखारी नजरा तिच्या या वृत्तीस तडा जाऊ देत नाहीत. एका स्त्रीला समाजातील पुरुष वर्ग माणूस म्हणून समाधानाने जगू देत नाही. ही वेदना हरणच्या बाबतीतली लेखकांनी रेखाटली आहे. हे सामाजिक वास्तव आहे. तिच्या वाट्याला आलेले स्त्रीत्व तिला त्रासदायक वाटायला लागते. या कादंबरीविषयी राजन खान म्हणतात, "हरण ही खरं तर एक अगदी कुग्रामात एका रूढीप्रिय धनगराच्या पोटी जन्माला आलेली स्त्री. तिच्या आयुष्यातील बदलाची कथा म्हणजे हरण हे पुस्तक. पण ही कथा फक्त धनगर जमातीच्या स्त्रीची नाही. हा काही या कादंबरीत ठळक संदर्भ नाही किंवा कादंबरीचे ठळक वैशिष्ट्यही नाही. कथानकाचे काही लहान लहान संदर्भ भरण्यासाठी कादंबरीत जात हा प्रकार येत राहतो. तरीही कथा कुणा एका जातीची होत नाही तर ती अशा तमाम स्त्रियांची होते, त्या वाडी, खेडे, निमशहर, शहर अशा गोष्टी टप्पे अनुभवत जातात. या स्त्रिया मग कोणत्याही जातीच्या असू शकतात."

यावरून स्त्री सुद्धा एक माणूस आहे, तिलाही जीव आहे, भावना आहेत याचा विचार समाजाकडून केला जात नाही. आजही पुरुषप्रधान संस्कृती स्त्रीकडे एक वस्तू म्हणूनच पाहत असल्याचे चित्र कादंबरीतून उभे राहते. पुरुषांच्या विखारी नजरा हरणला परीचयाच्या झालेल्या असतात. ती त्यापासून स्वत:ला वाचवण्याचा प्रयत्न करते. हरणचा नवरा उद्योगी व्यवहारी असल्याने नफ्याचा विचार करीत राहतो. त्याच्या उद्योगातील साथीदार मधुकर हरणची छेड काढतो. पण त्या प्रसंगाचे गांभीर्य नारायण घेत नाही. यावरून पतीच्या लोभी वृत्ती, प्रवृत्तीची कल्पना हरणला येते.

हरण सारख्या विवाहित स्त्रीकडे इतर पुरुष मंडळी वासनांध नजरेने कसे पाहतात याचे चित्रण कादंबरीतून साकार होते. यातून समाजातील हरवत चाललेली मानवता पाहायला मिळते. मानवी मूल्यांचा ऱ्हास होताना पावलोपावली लेखकाला जाणवायला लागतो. याठिकाणी लोभी असलेला पती पत्नीचे संरक्षण करण्यात दुबळा ठरतो. पतीच्या स्वभावातील दुबळेपणामुळेच हरिभाऊ सोदले हा गुत्तेदार हरणच्या आयुष्यात येतो. त्यामुळे कादंबरीला वेगळे वळण लागते. हरणच्या एकनिष्ठपणाला तडा जातो. सोदलेंचे दररोजचे येणे-जाणे समाजात संशय भरतो. याला जबाबदार नारायण असतानाही तो सर्व खापर हरणवर फोडतो स्त्रीला जीवन जगण्यासाठी पुरुषाचा आधार लागतो या न्यायापोटी हरण हरिभाऊ सोदले मध्ये स्वतःचा आधार शोधते. पण नियतीला तेही मान्य होत नाही. मधूच्या विषारी नजरेतून हरणाला वाचवताना मधुचा खुन हरिभाऊ करतात. त्यातूनच ही कादंबरी वाचकांची उत्सुकता वाढवते. नंतर हरिभाऊचा खून मधूचा भाऊ बरसू दादा

करतो. या सर्व प्रकाराला पुरुषातील वासनांध वृत्ती कारणीभूत ठरते. वासनांध वत्तीमुळे अनेक कुटुंबे कशी उद्धस्त होतात याचे चित्रण लेखकाने या कादंबरीच्या माध्यमातून केले आहे.

कादंबरीतील नायिका हरण ग्रामीण भागातील असली तरी आयुष्याचा नवा मार्ग शोधत मुंबई गाठते. पण तिथेही पुरुषाच्या विखारी नजरा तिला समाधानाने जगू देत नाहीत. याचे वास्तव चित्रणही पठारे यांनी या कादंबरीत केले आहे. हरण पुढे भावाच्या आधाराने झोपडीत राहून इतर ठिकाणी मोलकरणीचे काम करते. येथेही घरमालकाचा वासनांध विचार तिच्या वाट्याला येतो. नंतर दिगंबर फडणीस हा तिचा पत्नी म्हणून स्वीकार करतो, पण त्याचेही अकाली निधन होते. अशा प्रकारे हरणच्या जीवनात संकटाच्या एकानंतर एक मालिका येतात. तिच्या सौंदर्याला पुरुषी नजरांनी माणूस म्हणून पाहिले नाही, हेच खरे. मुलाच्या वयाच्या जावायाने ही वासनांध होऊन हरणवर केलेला बलात्कार काळीज चिरून जातो. एकंदरीत हरणच्या वाट्याला कमालीची उद्विग्नता येते. शेवटी सृष्टीनेच आपल्यात सामील करून घ्यावे, अशी आंतरिची इच्छा ती प्रगट करते.

या कादंबरीत हरणचा शोकात्म शेवट चित्रीत करण्यात आला आहे. स्त्रीच्या जीवनात पावलोपावली दुःख, उद्विग्नता आहे. तिच्यावर सातत्याने अन्याय होत राहतो आणि प्रसंगी तिचा शेवटही शोकात्म होतो हे लेखकाने या कादंबरीतून चित्रित केले आहे. आजही स्त्री ही पुरुषाच्या नजरेत एक वस्तूच आहे याची वास्तवदर्शी मांडणी येथे त्यांनी केली आहे. स्त्री एक माणुस आहे., तिलाही मन, भावना आहेत, याची जाणीव पुरुषप्रधान संस्कृतीला आजही नाही हे रंगनाथ पठारे यांनी या कादंबरी लेखनातून दाखवून दिले आहे. त्यांनी ग्रामीण स्त्री जीवनाची व्यथा प्रभावीपणे मांडली आहे.

**निष्कर्ष :**

1. स्त्री पुरुष समानता आजही आभासी आहे.
2. शिक्षण घेतलेल्या स्त्रीला प्रत्येक पातळीवर माघार घ्यावी लागते.
3. स्त्री एक माणूस आहे हे समाजातील काही प्रवृत्तींना मान्य नाही.
4. स्त्रीमधील स्त्रीत्व हेच तिच्या दुय्यमत्वाला, दु:खाला कारणीभुत आहे.
5. ग्रामीण स्त्री आजही अन्याय-अत्याचार जीवन जगते आहे.
6. स्त्रीचे वर्चस्व पुरुषप्रधान समाजाला मान्य होत नाही.

**संदर्भ ग्रंथ :**

*1. साने गिता : भारतीय स्त्री जीवन– मौज प्रकाशन, मुंबई-4 द्वितीय आवृत्ती 1997 पृ.क्र.11.*
*2. जाधव जयद्रथ : मराठी साहित्य स्वरुप आणि समिक्षा समकालिन मराठी कादंबरी, महेंद्र कदम अरुणा प्रकाशन, लातूर*
*3. पठारे रंगनाथ : हरण– मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई प्र.आ. 1990 पृ.क्र. 5*
*4. खान राजन : संपादक निरक सपनातील सरलता - राजन गवस*
*शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर पहिली आवृत्ती जानेवारी 1995 प्र.क्र.80*

# समकालीन समाजजीवनाचे आकलन मांडणारे कादंबरीकार रंगनाथ पठारे

**श्री.मनोजकुमार कोसारे**
*संशोधक विद्यार्थी*
**डॉ. कोमल ठाकरे**
*मार्गदर्शक*

स्वातंत्र्योत्तर कालखंड मराठी साहित्याच्या विकसनाचा कालखंड होता. या कालखंडात ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, मार्क्सवादी साहित्य असे नव-नवीन साहित्यप्रवाह उदयास आले. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारतीय समाजात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात वेगाने परिवर्तन झाले. समाजातल्या सर्वच स्तरांमध्ये परिवर्तनाचे व्यापक परिणाम दिसून आले. या कालखंडात निर्माण झालेल्या बऱ्याच कादंबऱ्यावर तत्कालीन सामाजिक, राजकिय, आर्थिक परिस्थितीचा फार मोठा प्रभाव मराठी कादंबरी लेखनावर झालेला आहे. १९६० नंतर कलावाद आणि रंजकप्रधानता या नावाखाली होत असणारे लेखन संपुष्टात आले आणि प्रयोगशील, वास्तववादी कादंबरी लेखनाचा काळ सुरू झाला. १९६० नंतरच्या मराठी कादंबरीच्या क्षेत्रात अनेक स्थित्यंतरे, घडून आली आणि ती अधिकाधिक समाजाभिमुख, प्रायोगिक झाली. या काळात शरच्चंद्र मुक्तिबोध, पु. शि. रेगे, भाऊ पाध्ये, ह.मो.मराठे, चि. त्र्यं. खानोलकर, दिलीप चित्रे, आनंद यादव, अरुण साधू, भालचंद्र नेमाडे यांचे कादंबरी लेखन अनन्यसाधारण आहे. यांच्या लेखनाने जीवनदर्शनाची परमोच्च उंची गाठली. या काळातील मराठी कादंबरी लेखन वेगवेगळ्या अंगाने जीवनदर्शन घडवू लागले. शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी माणसाचा जीवनप्रवास अखंडपणे सुख दुःखातून चालत असतो हे दाखवून दिले. त्यांच्या 'जन हे ओळतु जेथे' सरहद्द, क्षिप्रा या कादंबऱ्या महत्वपूर्ण ठरल्या. तसेच अरुण साधू यांनी महानगरातील भीषणता, भयावह तांडवनृत्य कादंबरीतून साकार केले. या कालखंडात मराठी कादंबरी वेगवेगळ्या अंगाने जीवन दर्शन घडवू लागली. आजवरच्या मराठी कादंबरीला बदलून रोमँटिक आकलनाला फाटा देत अनुभवाचे निवेदन आपल्या कादंबरीतून मांडून भालचंद्र नेमाडे यांनी मराठी साहित्य विश्वात खळबळ उडवून दिली. 'कोसला' , 'बिढार', 'जरीला' भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्या उल्लेखनीय आहे. १९८० नंतर सामाजिक वास्तवाच्या दाहकतेवर व त्यातून निर्माण झालेल्या बधिरता आणि भ्रमनिरासतेवर अनेक कादंबरीकरांनी लेखन केलेले आहे. वर्तमान काळातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक आर्थिक घडामोडींचे व त्यामागील व्यक्तींचे चित्रण या कालखंडातील कादंबरी लेखनातून पुढे आले.या काळातील कादंबरी लेखनावर भारतीय स्वातंत्र्य चळवळ, कामगार संघटना आणि त्यांच्या चळवळी, सहकार क्षेत्र, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, शेतकऱ्यांचे प्रश्न, स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न, अस्पृश्यता, गरीबी, देशातील दारिद्य, अशा विविध घटनांचा आलेख तत्कालीन कादंबरी लेखनातून दिसून येतो.

१९८० च्या कालखंडात कादंबरी लेखनाला सुरुवात करणारे रंगनाथ पठारे हे मराठी मधील एक अतिशय महत्वाचे कादंबरीकार आहेत. मुळात रंगनाथ पठारे हे व्यवसायाने भौतिकशास्त्राचे प्राध्यापक

आहेत. संगमनेर महाविद्यालयात ३७ वर्षे भौतिकशास्त्र विषयाचे अध्यापन केले आहे. असे असले तरी मराठीतील प्रख्यात, सिद्धहस्त कादंबरीकार म्हणूनच त्यांचा सर्वाधिक लौकिक आहे. १९८० नंतर महाराष्ट्राच्या समाजजीवनातील स्थितीगतीचा वेध सूक्ष्मातिसूक्ष्म बारकाव्यांसह रंगनाथ पठारे यांनी आपल्या लेखनातून मांडलेला आहे. महाराष्ट्राच्या बदलत्या समाजजीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनातून प्रकर्षाने जाणवते. एकंदरीत असे लक्षात येते की पठारे यांचे लेखन कालक्रमानुसार विकसित होत गेले आहे. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनाचा अचूक वेध घेतलेला आहे. पठारे यांच्या प्रयोगशील लेखनाने मराठी कादंबरीला एक नवी दृष्टी प्राप्त करून दिली आहे. या दृष्टीने 'ताम्रपट' (१९९४), 'दुःखाचे श्वापद'(१९९५), 'नामुष्कीचे स्वगत'(१९९९), 'त्रिधा'(२००४) या त्यांच्या कादंबऱ्याचा प्रस्तुत लेखात विचार केला जाणार आहे.

ताम्रपट

रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट' ही ८६२ पृष्ठांची बृहत कादंबरी १९९४ साली प्रकाशित झाली. या कादंबरीला १९९९ साली साहित्य अकादेमी चा पुरस्कार प्राप्त झाला आहे. 'ताम्रपट' कादंबरी मधून १९४२ ते १९७९ हा ३७ वर्षाचा बृहद कालपट पठारे यांनी साकार केला आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंड आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील बदलते राजकारण, समाजकारण यांचे भेदक चित्रण पठारे यांनी आपल्या कादंबरी लेखनातून साकार केलेले आहे. भारतातील असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग, चले जाव, स्वातंत्र्य चळवळ याचे चित्रण त्यांनी अतिशय प्रभावीपणे केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात झालेला राजकीय क्षेत्रातील मूल्यऱ्हास, स्वार्थी राजकारणी आणि राजकारणाकडे व्यवसाय म्हणून पाहणारे स्वार्थी राजकीय नेते. स्वातंत्र्यलढ्यासाठी तुरुंगात जाणारे तरूण, अशा अनेक घटकांचे चित्रण देखील या कादंबरीत आले आहे. 'ताम्रपट' या कादंबरीला बृहद राजकीय पट लाभला आहे. किंबहुना या कादंबरीला राजकीय कादंबरी देखील म्हणता येईल. या संदर्भात चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात की, " ताम्रपट ही राजकीय कादंबरी आहे असे म्हणण्यापेक्षा राजकीय पार्श्वभूमी चा उपयोग करून राजकीय क्षेत्रातल्या विविध स्वभावांच्या माणसांचा सखोल शोध घेण्याचा प्रयत्न ठरणारी कृती आहे. या कादंबरीत मुख्य भूमिकेतील नाना सिरूर म्हणजेच लेखकाचा स्वतःचा आवाज आहे."१ असे मत जेष्ठ समीक्षक चंद्रकांत बांदिवडेकर यांनी मांडले आहे. ते अगदी तंतोतंत लागू पडणारे आहे.

'ताम्रपट' या कादंबरीतील नायक नाना सिरूर वकील हे स्वातंत्र्यचळवळी मध्ये सक्रिय सहभाग घेतात.स्वातंत्र्य चळवळी मध्ये त्यांना कारावास देखील भोगावा लागतो.स्वातंत्र्य प्राप्ती नंतर वकिलीचे अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करून वकिली आणि सामाजिक चळवळीत सक्रिय होतात.विधानसभा निवडणुकीत राजकिय पक्षा कडून विचारणा झाल्यावर नाना लोकाग्रहावरून निवडणुकीत उभे राहतात, परंतु नानांवर सत्ताधारी पक्षातील जेष्ठ नेत्यांचा रोष असतो. कारण नानांचा लोकसंग्रह फार मोठा असतो, आणि म्हणून राजकीय षडयंत्र रचून नानांचे निवडणुकीतील तिकीट कापल्या जाते. फार मोठा जनसमुदाय या निर्णयाने

नाराज होतो. पण नाना अतिशय सुस्वभावी व शांत असून संयमाने हा प्रसंग हाताळतात. लोकांना समजावून सांगण्याचे आणि शांत राहण्याचे आवाहन करतात. तर निवडणुकीत विजयी झालेल्या विरोधी पक्षातील उमेदवाराच्या घरी जाऊन अभिनंदन करण्याचे औदार्यही दाखवणारे नाना या कादंबरीत दिसतात. पठारे यांच्या कादंबरी लेखनात सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या माणसांच्या विविध वृत्ती-प्रवृत्ती चा प्रत्यय पदोपदी येतो. स्वतःच्या स्वार्थासाठी माणसे कशी वागतात या दाहक वास्तवाचा वेध पठारे यांच्या कादंबरी लेखनातून प्रकर्षाने जाणवते. देशाला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात फार मोठा बदल होतो. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण होतात. देशामध्ये आणीबाणी लागते, आणीबाणीमुळे देशातील जनतेवर अनेक बंधने येतात. त्यामुळे अनेकांवर अन्याय होतो. पोलीस लोकांना बळजबरीने कारागृहात टाकतात. जनतेला वेठीस धरतात. नानां सहकाऱ्यांना सोबत घेऊन या दडपशाही आणीबाणीचा तीव्र निषेध नोंदविणारे नाना, तर स्वतःच्या मुलाला जयप्रकाशला अभियांत्रिकी प्रवेशासाठी एक टक्का गुण कमी पडतो. त्यावेळी स्वातंत्र्य संग्रामसैनिकाच्या प्रमाणपत्रावर पाल्य म्हणून त्याला प्रवेश मिळू शकताना तो नाकारणारे नाना सुद्धा आपल्याला दिसतात. अशा प्रकारे मानवी स्वभावाचे विविध पैलू पठारे यांनी उलगडून दाखविले आहे. त्याचबरोबर प्राचार्य चिटणीस यांच्यासारखे अनेक उच्चशिक्षित मंडळी खेड्यापाड्यात जाऊन गरीब पारधी, रामोशी या लोकांमध्ये जाऊन सामाजिक व शैक्षणिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तिरेखा सुद्धा या कादंबरीत दिसतात.

'ताम्रपट' कादंबरी ही केवळ महाराष्ट्रातील स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील केवळ राजकीय बखर नसून १९४२ नंतर राज्यातील राजकारण, सहकार, शिक्षण, कामगार चळवळ, जातीय समीकरणे कशाप्रकारे बदलत गेली आणि त्यामध्ये कशाप्रकारची नवीन वळणे आली हे या कादंबरीतुन प्रभावीपणे दाखविले आहे. तसेच या कादंबरीत ३७ वर्षांच्या कालखंडातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक बदलांचा विस्तृत कालखंड जरी आला असला तरी पठारे यांच्या लेखनशैलीने कादंबरीला कंटाळवाणे होऊ दिले नाही. 'ताम्रपट' या कादंबरीत नाना सिरूर, दादासाहेब भोईटे, बापूसाहेब देशमुख, बुवासाहेब जाधव, दशरथ पवार, दौलतराव शिंदे, इंदिराराजे देशमुख, सरदार भुजंगराव निकम, भुजाडी मामा, पांडुरंग तिकोने, गोविंदभाई तामसरे, गुलबा नाईक, राधकिसन, आवडाबाई, निस्सार मोमीन, प्राचार्य चिटणीस, अशी असंख्य पात्रे या कादंबरीत आलेली आहेत. त्याच बरोबर स्वातंत्र्यानंतरच्या मूल्यऱ्हासाच्या कालखंडात ज्या वेळी मूल्यांचा पराभव झाला असताना अशा कालखंडात निस्पृह वृत्तीने व्रतस्थ जीवन जगणारा नाना सिरूरांसारखा एक प्रभावी नायक पठारे यांनी वाचकांना 'ताम्रपट' या कादंबरी मधून दिला आहे.

**दुःखाचे श्वापद'**

रंगनाथ पठारे यांची 'दुःखाचे श्वापद' ही कादंबरी १९९५ मध्ये प्रकाशित झाली आहे. गावाकडून शहराकडे वाटचाल करणाऱ्या अर्धनागरी पर्यावरणात या कादंबरीची जडणघडण झाली आहे. शहराकडे झेप घेताना

बदलणाऱ्या वातावरणात या कादंबरीचे कथानक आकारास आले आहे. 'दुःखाचे श्वापद' ही छोटीशी परंतु व्यापक आशय मांडणारी कादंबरी आहे. सत्याला वाचवा म्हणू पाहणारा मराठीचा प्राध्यापक वालझाडे हा स्वतः या कादंबरीचा नायक आहे. त्याची पत्नी, मुलगी व मुलगा धनु आणि उल्हासबाई चित्तर, पुरोगामी नारी मंच ची संस्थापिका श्रीमती गोपाळे, गोपाळे चे वकील पती, शिक्षण सम्राट दादासाहेब नरसाळे आणि फौजदार या मुख्य व्यक्तिरेखा या कादंबरीत आलेल्या आहेत.

प्रा.वालझाडे हे दादासाहेब नरसाळे पाटील यांच्या शिक्षण संस्थेमध्ये मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून काम करतात. याच संस्थेच्या प्राथमिक शाळेत काम करणारी उल्हासबाई चित्तर नावाची घटस्फोटित शिक्षिका या कादंबरीची नायिका आहे किंवा मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. उल्हासबाई सोबत नायकाची ओळख श्रीमती गोपाळेच्या नारी मंचच्या माध्यमातून होते. उल्हासबाई नवऱ्याशी न पटल्याने घटस्फोट घेऊन विभक्त होतात. बालपणी झालेल्या अत्याचारामुळे त्यांनी आपले स्त्रीत्व गमावलेले असते. त्यामुळे तिच्या चेहऱ्यावर सतत एका अनामिक दुःखाची सूक्ष्म छटा प्रतिबिंबित होत असते. उल्हासबाईवर शिक्षणसम्राट नरसाळे अत्याचाराचा प्रयत्न करतात. परंतु अत्याचाराचा प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर तिची हत्या करून तिच्या आत्महत्येचा बनाव करतात.

उल्हासबाईच्या आत्महत्येचा छडा लावण्यासाठी प्रा. वालझाडे पोलिसांच्या मदतीने स्वतःदेखील तपास करण्याचा प्रयत्न करतात. सुरुवातीला श्रीमती गोपाळेबाई सुद्धा या प्रकरणाकडे हत्येचे प्रकरण म्हणून पाहतात. परंतु नंतरच्या काळात या प्रकरणात त्या सोयीस्करपणे दुर्लक्ष करतात. प्राध्यापक वालझाडे यांनी या प्रकरणातून बाजूला व्हावे म्हणून त्यांच्या मागे कुभांड रचून त्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न होतो आणि हा प्रयत्न दादासाहेबांकडून केला जातो. परंतु याची कल्पना देखील त्यांना अगदी शेवटपर्यंत नसते. त्यांची दादासाहेबांवर नितांत श्रद्धा असते. प्राध्यापकांना अडचणीत आणण्यासाठी दादासाहेब त्यांच्या धनु नावाच्या मुलाला स्वतः व्हिडिओ हॉल सुरु करायला मदत करतात आणि त्यामध्ये अश्लील चित्रपट व मटका जुगाराचा अड्डा असे अनेक बेकायदेशीर व्यवहार चालवण्यास प्रोत्साहन देतात आणि शेवटी स्त्री अत्याचाराच्या प्रयत्नांमध्ये त्याला देखील अटक अटकवितात. परंतु या गोष्टींची जरासुद्धा कल्पना प्रा. वालझाडे यांना कल्पना नसते.

उल्हासबाईच्या हत्येचे प्रकरण दडपण्यासाठी तपास करणाऱ्या फौजदाराची बदली देखील करण्यात येते. तर दादासाहेब या प्रकरणातून गोपाळेबाईंना दूर करण्यासाठी त्यांना जिल्हा परिषदेच्या राजकारणात आणतात. तरी शेवटपर्यंत प्रा. वालझाडे या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी निग्रहाने प्रयत्न करतात. तेव्हा गोपाळेबाईकडून त्यांच्यावर बळजबरी केल्याचा आरोप लावण्यात येतो आणि या प्रकरणाच्या चौकशीसाठी जेव्हा फौजदार प्रा.वालझाडे यांना पोलीस स्टेशन मध्ये बोलवितात. तेव्हा बदली झालेले फौजदार प्रा. वालझाडे यांच्या समोर उल्हासबाईच्या प्रकरणाचा उलगडा करतात. अशा प्रकारचे भीषण कथानक पठारे यांनी या कादंबरीतून साकार केले आहे. या कादंबरीच्या संदर्भात प्रसिद्ध समीक्षक म.द. हातकणंगलेकर म्हणतात की " कशाचे तरी भक्ष्य ही ज्याची अंतिम नियती असावी अशांचे ते डोळे होते. तिच्या डोळ्यातले हे दुःखाचे श्वापद किती लोकांना जाणवले ? कुठून आले असेल ते ? जन्मापासून की त्यानंतरच्या अनुभवातून

? या प्रश्नांची उत्तरे वाचकांना शोधायची आहेत. या कादंबरी लेखनानंतर एक स्वतंत्र विचाराने लेखन करणारे सामर्थ्य असलेले कादंबरीकार म्हणून रंगनाथ पठारे यांना ओळख मिळाली"२ हे हातकणंगलेकरांचे मत या कादंबरीच्या बाबतीत अगदी तंतोतंत लागू पडणारे आहे.

एकंदरीत 'दुःखाचे श्वापद' या कादंबरीमध्ये आशयाची घनता आहे आणि समकालीन जीवनानुभवाशी एकरूप होण्याची क्षमता देखील आहे. या कादंबरीचा नायक निवेदक प्रा. वालझाडे संवेदनशील असला तरी त्याच्या अवतीभवतीच्या वातावरणामुळे शेवटच्या टप्प्यात त्याची संवेदना बोथट झालेली दिसते. आणि तो परिस्थितीला शरण जातो. तरीही हा निवेदक सांकेतिक शैलीने उपरोधाने बरंच काही सांगतो. दादासाहेबांच्या कुकर्माचा भांडाफोड देखील करतो. पठारे यांनी या कादंबरी मधून शिक्षण क्षेत्रातील दुराचार यावर प्रकाश टाकला आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये राजकारणाचा शिरकाव झाल्यानंतर या क्षेत्राची फरफट कशी होते. यावर देखील त्यांनी प्रकाश टाकला आहे. त्याच बरोबर पुरोगामी नारी मंचाच्या माध्यमातून स्त्रियांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या बहाण्याने व आपल्या नवऱ्याच्या वकिलीच्या व्यवसायाला हातभार लावणाऱ्या गोपाळेबाई सारख्या बेगडी समाजसेविका, शिक्षण संस्था सारख्या पवित्र क्षेत्राचे संचालन करणारे दादासाहेब सारखे भ्रष्ट समाजसेवक आणि निरपराध शिक्षिकेच्या हत्येचा छडा लावू पाहणारा वालझाडे सारखा प्राध्यापक अशा अनेक पात्रांच्या माध्यमातून पठारे यांनी या कादंबरीतून समकालीन समाजभान, मूल्यभान हे अतिशय संयमी पणे चित्रित केले आहे. त्यांनी या कादंबरीतून समकालीन राजकारण, सत्ताकारण, कायदा, शिक्षण या सर्व क्षेत्राचा प्रभावीपणे वेध घेतला आहे.

**'नामुष्कीचे स्वगत'**

'नामुष्कीचे स्वगत' ही पठारे यांची १९९९ मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी आहे. २११ पृष्ठांची असलेली ही कादंबरी निवेदनशैली, आशय, भाषाशैली, रचनाबंध, पात्रनिवेदन इत्यादी अंगांनी अतिशय वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची आहे. या कादंबरीला १९९० नंतरच्या खाउजा धोरणाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. देशात जागतिकीकरणाच्या प्रारंभाबरोबरच नव्या मूल्यांचा, नवविचारांचा संक्रमणाच्या अवस्थेतून वाटचाल करतांना पारंपारिक भारतीय मनाची, संस्कृतीची होणारी मोडतोड हा या कादंबरीचा मुख्य विषय आहे.

या कादंबरीमध्ये प्रथमपुरुषी निवेदन आहे. 'मी' ला केंद्रवर्ती मानून सर्वसामान्य माणसाची, मानवी मनाची घुसमट या कादंबरीतून व्यक्त झाली आहे. या कादंबरीतील आशय हा रूढ मराठी कादंबरीच्या पठडीतील नाही. या कादंबरीत एकंदरीत विविध बारा शीर्षकाखाली प्रकरणे आली आहेत. यातील बहुतांश प्रकरणांची शीर्षके ही निबंधाच्या धाटणीची आहेत. 'कार्पोरेट कुणबीक', 'प्रेमभाव', 'एकाकी माणुसकी', 'शोषण', 'स्त्रीमुक्ती' यासारखी प्रकरणांची शीर्षके आहेत. अशा प्रकारच्या शिर्षकांच्या अनुषंगाने संपूर्ण कादंबरीमध्ये निवेदक स्वतःचे अनुभव चिंतन, निरीक्षण मांडताना दिसतो. ही कादंबरी प्रारंभापासून तर शेवटपर्यंत एकच सलग कथानक मांडत नाही. शीर्षकानुरूप वेगवेगळ्या प्रसंगानुरूप या कादंबरीत शिंपी, प्राचार्य, आजीबाई, आत्मचरित्र लेखक, गब्दुल, काळी पोरगी, नेल्सन मंडेला, एडवर्ड, रॉबर्ट मुगाबे, वि.म.दांडेकर, अण्णासाहेब

शिंदे, ड्रायव्हर अशा कल्पित पात्रांचा, माणसांचा उल्लेख या प्रकरणांमध्ये येतो. तसेच अगदी शुल्लक गोष्टी ही कादंबरी सांगते. या गोष्टींमध्ये ग्रामीण, नागरी ,परकीय, बुद्धिवंत, वृद्ध, तरुण, प्राचार्य, लेखक, उच्चपदस्थ सरकारी नोकरशहा, राजकारणी, कुणबी, बारा बलुतेदार अशा कितीतरी स्तरातील लोक आहेत. त्यांचे तुकड्या-तुकड्याने चित्रण यात केलेले आहे.

या कादंबरीची भाषा ही खूपच वेधक आहे. ग्रांथिक वळणाच्या भाषेची प्रचिती या कादंबरीमध्ये येते. प्रचंड लांब पल्लेदार वाक्ये देखील या कादंबरीमध्ये वापरण्यात आलेली आहेत. जागतिकीकरणाच्या काळात मानवी जीवन प्रचंड धावपळीचे झाले आहे. कुणालाही क्षणभराची उसंत नाही. याचे संसूचन पठारे यांच्या कादंबरीतील भाषिक प्रयोगातून होते. समकालीन समाजाच्या वास्तवाला कलात्मक शैलीत पकडण्याची पठारेंची ही शैली वैशिष्ट्यपूर्ण म्हणावी लागेल.

**त्रिधा**

'त्रिधा' ही रंगनाथ पठारे यांची सन २००४ मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी आहे. या कादंबरी मधून पठारे यांनी कलावंताच्या आकलना पलिकडच्या या निर्मिती प्रक्रियेचा शोध घेतलेला दिसून येतो. कादंबरी लेखनामध्ये सतत प्रयोग करू पाहणाऱ्या पठारे यांच्या सर्जनशीलतेचे, प्रतिभाशक्तीचे नाविन्यपूर्ण दर्शन या कादंबरीमधून आपणास प्रत्ययास येते. स्त्री-पुरुष संबंधांचे आकलन आणि त्यातील मानसिक विकृती असे वैविध्यपूर्ण आशयसूत्र या कादंबरीमध्ये आलेले आहे. जवळपास ४५ लहान मोठ्या भागातील या कादंबरीच्या सुरुवातीलाच लेखक आपली भूमिका स्पष्ट करतात. परंतु त्यांच्या मनात बरीच साशंकता दिसते.

'त्रिधा' या कादंबरीचे कथानक हे प्रत्यक्ष माहीत आहे किंवा काय घडले हे त्यांनी कुणाकडून तरी ऐकले आहे. कदाचित लेखकाने आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर कल्पिलेले असावे " तीन कुटुंबे होती म्हणजे अजूनही आहेतच. तीन कुटुंब म्हणजे तीन जोडपी त्यांची एकमेकांशी अत्यंत सुसंस्कृत मैत्री होती. त्यांनी मोठ्या समंजसपणे एकमेकांसोबत आपआपले जोडीदार - त्यात जोडीदारनीही आल्या शेअर केले. अगदी मोकळी देवघेवीचे खुशीचे शरीरसंबंध. एका शहरवजा गावात एकमेकांच्या संमतीने आणि खुशीने यांचे असे प्रपंच किमान पाच-सात वर्षे तरी सुरळीत चालले. ही सुरुवात एक तर उशिरा झाली. पुरुष चाळिशीत अन बाया पस्तिशीत किंवा दोन्ही चार-दोन वर्ष मागे पुढे शक्यतो पुढेच समजा. नंतर सहाजणातलं कोणीतरी एक वारल्याचं निमित्त झालं कोणीतरी स्त्री किंवा पुरुष त्यामुळे हे थांबलं"३ अशा प्रकारचं वर्णन लेखकाने ऐकले आहे. हे ऐकल्यानंतर लेखकांच्या मनात अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण झाले असतील ? आणि कुतूहलापोटी या कादंबरीच्या लेखनाकडे कल गेला असावा.

भारतीय संस्कृतीच्या पारंपरिक,सांस्कृतिक चौकट मोडून. तथाकथित नव्या संस्कृतीच्या प्रस्थापित संकेतव्यूहानां भेदून आदिम वासनेची इच्छापूर्ती अनुभवल्यानंतर सनातन संस्कृतीचे अंतर मनावर दडपण आल्याने मनाची उडालेली त्रेधातिरपीट म्हणजे 'त्रिधा' ही कादंबरी होय. एका कुसंगतीचा एखाद्या मानवी

मनावर इतका परिणाम होतो. की प्रस्थापित सांकेतिक विचारांची चौकट विस्कटून जाते. याचे प्रत्यंतर या कादंबरीतून आपल्याला येते.

या कादंबरीतील पात्रांमध्ये डॉक्टर आणि त्यांची पत्नी, वकील आणि त्यांची पत्नी, प्रोफेसर आणि त्यांची प्रोफेसर असणारी पत्नी ह्या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. तसेच या मुख्य व्यक्तिरेखांच्या व्यतिरिक्त निगडित असणाऱ्या अनेक व्यक्तिरेखा आहेत. त्यामध्ये वकिलाची मुलगी, महिला अध्यक्ष, उमेदवार महिलेचे पती, उमेदवार महिला, प्रोफेसरच्या घरी जाऊन पूजा करणारा माणूस, राजकारणी दादा पाटील इत्यादी गौण व्यक्तिरेखा देखील या कादंबरीमध्ये आलेल्या आहेत. रंगनाथ पठारे यांच्या 'त्रिधा' या कादंबरीमध्ये आजच्या वर्तमानात स्त्री ही कुटुंब व्यवस्थेचा मुख्य आधार आहे, जीवन जगत असताना अनेक भूमिका ती पार पाडत असते. पठारे यांच्या कादंबरीतील अनेक स्त्रिया या स्वतःचे अस्तित्व उभे करणाऱ्या आहेत. या कादंबरीतील स्त्रिया वरच्या पठडीत जगण्याचा प्रयत्न करतात. शारीरिक, मानसिक संभ्रमात त्या जगत असतात. डॉक्टर, प्राध्यापक आणि वकील यांच्या बायका म्हणून मिरवणाऱ्या स्त्रिया, समाजातील नैतिकता भ्रष्ट करण्याच्या मार्गाने जातात. भौतिकतेच्या आहारी जाऊन चंगळवाद आणि भोगवादात गुरफटून जातात. सुसंस्कृत कुटुंबात वावरलेल्या स्त्रिया आणि त्यांचे पुरुष मंडळी एकमेकांमध्ये इतके गुंततात की, त्यांना वास्तवाचं भान राहत नाही. तब्बल ६-७ वर्ष त्यांचा अनैतिकव्यापार सुरू असतो. जागतिकीकरणाच्या आणि भौतिकवादाच्या आहारी जाऊन अनाचारा कडे लोटल्या जातात .

डॉक्टर, वकील आणि प्रोफेसर हे तिन्ही कुटुंब उच्चविद्याविभूषित आणि सांपत्तिक स्थिती उत्तम असलेली कुटुंब व उच्च मध्यमवर्गीय कुटुंब आहेत. त्यांच्या सर्व भौतिक गरजा पूर्ण झालेल्या असल्याने सुखासीन अलिशान जीवन जगण्याची त्यांना हौस आहे. या तिन्ही कुटुंबाचा सांपत्तिक आणि शैक्षणिक दर्जा एकच असल्याने त्यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण संबंध आहेत. या तीनही कुटुंबातील मुले शाळेत जाणारी आहे. यातील तिन्ही कुटुंबांना, कला, साहित्य, संस्कृती, इतिहास इत्यादी विषयावर चर्चा करण्याची आवड आहे. ही कुटुंब बहुतेकदा आठवड्यातून एकदा बाहेर जातात आणि त्यांच्या विविध विषयावर चर्चा, मद्याची मैफिल देखील चालत असते. सुरुवातीला फक्त पुरुषांपुरती मर्यादित असणाऱ्या मैफिली नंतर स्त्रिया देखील यामध्ये सहभागी होतात आणि मद्यपान करतात. या गप्पांच्या मैफिलीचे सूत्रधार डॉक्टर असतात. डॉक्टरांचे अफाट वाचन असते. मानवी जीवन आणि मानवी जीवनातील वर्तन सुप्त इच्छा आकांक्षा, जीवन-जाणीवा, जीवन नेणिवेचा मानवी वर्तनावर होणारा परिणाम अशा अनेक विषयांवर चर्चा होत असतात.

अशाच एका मैफलीत ही तिन्ही कुटुंब गावाबाहेरच्या गेस्टहाऊसवर एकत्र येतात. त्या दिवशी त्यांची रात्री बैठक सुरू असते. मानवी संबंध, लैंगिकता, स्त्रीची आई होण्याची इच्छा यासाठी तिची कुठल्याही पातळीपर्यंत जाण्याची तयारी होणे इथपर्यंत ही चर्चा होते. येथे डॉक्टर त्यांच्या मित्राची एक सत्य घटना सांगतात आणि यातून सर्वांच्या इच्छा जागृत होतात आणि सारे या क्रियांशी एकरूप होतात. मद्याच्या धुंदीत स्त्री आणि पुरुष या दोन्ही गटांवर भारी होतात आणि मध्यरात्री ही बैठक संपते. मद्याची धुंदी आणि बैठकीत झालेल्या चर्चेमुळे नैतिक-अनैतिकतेचे भान विसरलेल्या स्त्री-पुरुषांच्या वकील-प्रोफेसरीन, डॉक्टर-

वकीलीन, प्रोफेसर- डॉक्टरीन अशा जोड्या होऊन ते एकत्र रात्र घालवून सारे एकमेकांना शेअर करतात.हा या कादंबरीचा परमोच्च बिंदू आहे.

या घटनेचा तिन्ही कुटुंबातील स्त्री पुरुषांवर खोलवर परिणाम होतो आणि या घटनेपासून तिन्ही कुटुंबातील मैत्रीपूर्ण संबंध लोप पावतात. सारेच एकमेकांपासून अपराधीपणाच्या भावनेतून पळ काढतात. . डॉक्टर वकील आणि प्रोफेसर या तीनही कुटुंबातील जोडप्यांचे परस्परातील अंतर देखील वाढत जाते आणि पती-पत्नीचे संबंध कोलमडून जातात. प्रोफेसरांसारखी विद्वान व्यक्ती मानसिक विकृतीने घेरल्या जाते आणि वेश्यालयच्या उंबरठ्यापर्यंत जाऊन पोहोचते. अशाप्रकारे पठारे यांनी या कादंबरीतून प्रत्येक पात्रांचे जगणे अत्यंत वेगळ्या पद्धतीने चित्रित केले आहे. स्त्री-पुरुष संबंधाचे, इच्छा-आकांक्षांचे सूक्ष्म निरीक्षण त्यांनी या कादंबरीतून मांडले आहे.

एकंदरीत रंगनाथ पठारे यांनी आपल्या सर्वच कादंबऱ्यांमधून माणसांच्या जीवघेण्या वेदना, आयुष्यात आलेले विविध दुःख, भीषण समाजवास्तव, स्त्रियांचे दुःख, स्त्रियांचे लैंगिक शोषण, चंगळवादी जीवनप्रणाली, ग्रामीण भागातील माणसांचे दुःख,दुष्प्रवृत्ती, भ्रष्ट शिक्षण व्यवस्था, भ्रष्ट संस्थाचालक, सहकार क्षेत्र, इत्यादी बाबींचा घटनाक्रम कादंबरी लेखनात मांडण्यात पठारे यशस्वी झाले आहेत. पठारे यांच्या कादंबरी लेखनाची त्यांनी स्वतःची पठारी शैली विकसीत केली आहे.त्यांनी आपल्या कादंबऱ्या मध्ये अनेक ठिकाणी उपहास,उपरोध आणि विनोद यांचा देखील वापर मुक्तहस्ताने केला आहे.पठारे यांनी भाषेचे सामर्थ्य जाणले आहे.त्यामुळेच ते भाषेचा वापर जबाबदारी ने करतांना दिसतात. एकंदरीत रंगनाथ पठारे यांचे कादंबरी लेखन, त्यांची वाङ्मयीनदृष्टी आणि वाङ्मयीन कार्य मराठी साहित्यविश्वामध्ये वैविध्यपूर्ण ठरले आहे.

रंगनाथ पठारे यांनी आपल्या कादंबरी लेखनात आणीबाणी चे परिणाम, समकालीन साहित्य विश्व, विद्यापीठ क्षेत्रातील राजकारण, स्त्री जीवनाची व्यथा, राजकीय, सामाजिक आणि शिक्षण व्यवस्थेतील मूल्यऱ्हासाचे चित्रण, खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, आणि त्याचे मानवी जीवनावरील परिणाम, सहकार क्षेत्र, जातीयता तसेच माणसाच्या मूलभूत लैंगिकप्रेरणा, श्रेयासाची ओढ असे अनेक आशयसुत्रे कवेत घेणारे कादंबरी लेखन पठारे यांनी केले आहे.एकंदरीत पठारे यांच्या कादंबऱ्यांमधून व्यक्त होणारा आशय हा व्यापक स्वरूपाचा आहे.विस्तारभयास्तव हा लेख इथेच आटोपता घ्यावा लागत आहे.

**संदर्भ :-**


१) *बांदिवडेकर चंद्रकांत, 'देशी वाण', अक्षर प्रकाशन, मुंबई, २००२, पृ.४६*

२) *पठारे रंगनाथ, त्रिधा, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर, पहिली आवृत्ती २००४, पृष्ठ २७.*

३) *हातकंगलेकर म.द., 'साहित्यविवेक', श्रीविद्या प्रकाशन, पुणे पृ.१५०.*

# दलित कांदबरीतून प्रकट होणारा आंबेडकरी विचार :मिमांसा

**विकास गवई**
*संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद*
*Anupamagawai1991@gmail.com मो ९४०४८८८३१४*

**प्रस्तावना :**

१९६० च्या दशकानंतर मराठी साहित्यात दलित ही संकल्पना प्रकर्षाने रुढ झाली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने दलित, कथा, कांदब�या, कविता या त्याच अनुषंगाने लिहिल्या गेल्याचे दिसून येते.

दलित: या शब्दाची शब्दशहा अर्थ न लावता ही संकल्पना म्हणजे काय? दलित कोणाला म्हणावे, दलितामध्ये कोणत्या जाती जमाती येतात, या बाबी तपासून पाहणे महत्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र लेखनात दलित हा शब्द प्रयोग हा पहावयास मिळत नाही. परंतु मराठी साहित्यात मोठया प्रमाणात दलित साहित्य हे १९६०च्या नंतर उदयास आलेले दिसते. ज्यांना इथल्या धर्मग्रंथानी त्या अस्पृश्य व दलित म्हणून यावे हे फारसं संयुक्तिक वाटत नाही. मी ही त्याला वैयक्तिकरित्या त्याला सहमत नाही आहे. का स्वत:ला दलित अस्पृश्य समजायचे आपण ही माणसे आहोत?

परंतु उपलब्ध माहिती अनुसार दलित (अस्पृश्य) यांच्या अनुषंगाने मांडणी करतांना उपलब्ध साधने, माहितीच्या आधारे सदर शोध निबंध हा तयार करत आहे.

**दलित म्हणजे कोण?**

बाबुराव बागुल यांच्या शब्दात सांगायचे झाले तर ‘‘दलित म्हणजे वर्ण व्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारकि व्यवस्थेला उध्दवस्त करु बघणारा दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडू बघणारा दलित म्हणजे प्रामुख्याने ज्याचें हात प्रज्ञावंत प्रलयकारी केलेले आहेत आणि ज्याच्यासाठी आधुनिक शस्त्रे आणि शास्त्र, उपलब्ध करुन दिलेली आहेत तो, अशी मांडणी करतांना दिसतात.

तर दलित म्हणजे अस्पृश्य ठेवला गेलेला नाडला—पिडला गेलेला, कमजोर, दुर्बल, शोषित, कष्टकरी, मजूर, म्हणजे दलित, जो दैन्य, लाचारी अज्ञान अन्याय, अत्याचार इत्यादीचाजो वाटेकरी तो दलित होय. या साहित्यात नकार, स्वीकार प्रक्षोभ, संघर्ष, प्रेरणा, प्रवृत्ती, भूमिका व स्वरुप हे प्रकर्षाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या सामाजिक, आर्थिक राजकीय, शैक्षणिक तत्वज्ञान हे पायाभूत ठरते.

याच आधारावर सदर साहित्य आले आहे. हे विसरता येणार नाही. ''दलित साहित्य'' हे या समाज जीवनाचे मूल्य व जीवनमूल्ये पहिल्यांदा समाजापूढे मांडण्याचा प्रयत्न केला गेल्याने खऱ्या अर्थाने साहित्य माणसाचे साहित्य आहे.

दलित साहित्यातून माणसाच्या व त्यांच्या जीवनातील विविध पैलुंचा शोध घेण्याचा प्रयत्न झाल्याने मानवाच्या विविध समस्या या साहित्य रुपाने प्रकट होऊ लागल्या आणि त्यातून प्रकर्षाने आंबेडकरी विचार प्रकट होऊ लागला.

**शब्दकोशः**

दलित हा शब्द सामाजिक दृष्टया मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करतो ''हिंदू समाजाने बहिष्कृत आणि तिरस्कृत ठेवलेल्या जातीना दलित म्हटले जाते.

सुरुवातीला या दलितांना अस्पृश्य म्हटले जात होते.

ब्रिटिशांच्या काळातील जी जनगणना झाली त्या जनगणनेपूर्वीही 'दलित' या शब्दाचा वापर होत असे. परंतू ख□या अर्थाने याच दलतांना अस्पृश्य म्हटले जात असे व अस्पृश्य समजले जाई.

**दलित संकल्पने विषयी काही निवडक व्याख्याः**

**शंकरराव खरातः**

''सामाजिक जाणिवाचे दृष्टिकोनातून दलित या शब्दप्रयोगात हिंदूधर्माने व संस□ृतीने अस्पृश्यता या जातीचा अदिवासी, विमुक्त जमाती व भटक्या जमातीत जन्माने जातीने, धद्याने तसेच परंपरागत रुढीने दुर बहिष□त अस्पृश्य म्हणून ठेवले. त्यांना रानटी, भटके गुन्हेगार म्हणून ठेवले त्यांना माणसाप्रमाणे मानले नाही. त्यांचा सामाजिक दर्जा खालच्या कमी प्रतीचा ठरविला तसा मानला, या सर्व जाती–जमाती–दलितांतच येतात.''

**नमदेव ढसाळ :**

''दलित म्हणले अनुसूचित जाती–जमाती शेतमजूर, गरीब शेतकरी भटक्या जमाती अदिवासी ही संकल्पना दलितासंबधी मांडली.

परंपारिक मराठी साहित्यात आंबेडकरी विचार प्रकट होतांना फारसा मला ही आठवत नाही. इथल्या मानवनिर्मित समाज व्यवस्थेमध्ये दलितांना बंदिस्त वर्गात जखडून ठेवले होते. त्यामुळे हा वर्ग सुधारणेपासून कोसोदूर राहिला. परंतू १९६० च्या नव तरुणांनी शिक्षणाचा अंगिकार केल्यामुळे नवीन शिक्षित दलित तरुण समाज बदलायची भाषा करु लागला आणि त्यांच्या साहित्यातून आंबेडकरी बाणा प्रकर्षाने कथा, कांदब□या भाषणे या माध्यमातून प्रकट होऊ लागला दलित साहित्यामध्ये दलित कथा, कविता कांदबरी नाटके, आत्मकथने वैचारिक निबंध या बाबीचा समावेश हा प्रामुख्याने दिसून येतो. सदर साहित्यातून त्यांच्या वेदना आक्रोश, अर्त टाहो, प्रतिकार, व्यवस्था बदलण्याची भाषा

आंबेडकरी विचार या विविध बाबीचे हुबेहुब चित्रण सदर साहित्यातून प्रकट झालेले आपणास दिसून येते.

१९९० च्या दशकानंतर ही मोठया प्रमाणात दलित साहित्याचा लेखनात ही भर पडलेली आहे. आज ही सातत्यांने लेखन हे होतांना दिसते.

दलित संकल्पना ही आजघडिला आपणास बहुतांशपणे बदलेली दिसते. कालचा दलित आज पुढारलेला आहे. तो बंडाची भाषा करत आहे. याचे सर्व श्रेय हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचाराला जाते. त्यांचे विचार लागला आहे हे परिवर्तन साहित्यापासून आणि वास्तव जीवनात ही बघायला मिळते.

**संशोधनाची उदिष्टे:**

१) आंबेडकरी विचारधारेचा दलित साहित्यातून शोध घेणे.

२) आंबेडकरी विचार अंगिकारल्याने मिळणारी नवचेतना, प्रचंड आत्मविश्वास कमालीचा उत्साह या बाबींचा कथा, कांदबरी यामधून शोध घेणे.

३) कांदबरी, यातील नायक, नायिका, यांना केंद्रस्थानी ठेऊन कांदबरीतून प्रकट होणारा आंबेडकरी विचाराचे मूळ हे शिक्षणात आहे याचा शोध घेणे.

**संशोधनाची गृहितके:**

१)दलित कथा, कांदबरी, वैचारिक लेख कविता, आत्मकथने यामधून आंबेडकरी विचार प्रकर्षाने जाणवतो.

२) दलित साहित्यातून प्रकट होणारे विचार त्यातील पागे, नायक—नायिका ही आंबेडकरी विचारधारेणे प्रेरित झाालेली प्रस्थापति व्यवस्थेला शह देण्याचा प्रयत्न करते. मराठी दलित जाहिरातून आंबेडकरी विचार स्पष्टपणे जाणवतो.

**संशोधन पध्दती :**

वर्णानात्मक, विश्लेषणात्मक, पध्दतीचा वापर हा प्रामुख्याने केला जाईल.

**सारांश :**

सदर शोध निबंधाच्या अनुषंगाने १९६०ला दलित साहित्य हे प्रामुख्याने रुढ झाले. आपले तरी १९९० नंतरच्या निवडक कथा, कांदबरी यांचा प्रामुख्याने चिकित्सक अभ्यास करुन त्यामधून प्रकट होतात. आंबेडकरी विचारांची मीमांसा करणे हा मुख्य हेतू आहे म्हणून दलित कांदबरीतून प्रकट होणारा आंबेडकरी विचार मीमांसा हा प्रामुख्याने निवडला आहे.

**संदर्भ सूची:**


१. *कोतापल्ले नागनाथ, साहित्याचा अवकाश: प्रकाशक अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन,१३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णू मंदिर चौक,पुणे—४११०३०, प्रथमावृत्ती: १५ ऑगस्ट २००३, मूल्य २००रुपये.*

२. *१९३३ ते १९५८ व जनता व प्रबुध्द भारताचे निवडक अंक*

३. पाटील मनोहर, फुले—आंबेडकरी चळवळीचे क्रांतीशास्त्र, प्रकाशक व मुद्रक, उषा वाघ, सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ, पुणे—४११०३०, प्रथमावृत्ती: जून २०१०, मूल्य ३५० रुपये.
४. कटारे मोतीराम, फुले—आंबेडकरी साहित्य: आकलन आणि आस्वाद, प्रकाशन, श्री.के.एस.अतकरे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती—२००६,किंमत १७५ रुपये.
५. दलित कवितेतील अस्मिता, प्रकाशिका, सौ. उषा मुलाटे, स्वरुप प्रकाशन, 'अक्षर' ८५७, सहयाद्रीनगर, एन—५ (दक्षिण)सिडको, औरंगाबाद—४३१००३.
६. अस्मितादर्शक निवडक अंक (संपा), निंबाळकर वामन, अस्मितादर्शनी, ९ वर्ष १९७८.
७. निंबाळकर, वामन, दलित साहित्य: एक वाङ्.मयीन चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रकाशन, प्रबोधन प्रकाशन, १/१०, एम.आय .जी., कॉलनी, ८४, रामबाग, नागपूर—४४०००३, पहिली आवृत्ती: १४ ऑक्टोबर २००६, धम्मचक्रप्रवर्तन सुवर्ण महोत्सव, मूल्य २०० रुपये.
८. पानतावणे गंगाधर, प्रबोधनाच्या दिशा, नंदिता प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९८७.
9- *Dr. Babasaheb Ambedkar Writing Speeches' Vol. 1,3,9, Dangalle Arjun (Edited) Poisoned Bread Orient Longman, Bombay.*
१०. भोळे, भास्कर लक्ष्मण, संदर्भ दलित चळवळीचा, बजाज पब्लिकेशन, प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २०१४.
११. पानतावणे, गंगाधर, लेणी, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१२.
१२. पानतावणे,गंगाधर, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती.

**समकालीन आदिवासी कादंबरीतील जीवनदर्शन**

**प्रा. चिन्नना मेंगाजी चालुरकर**

*राजे विश्वेश्वरराव कला वाणिज्य महा. भामरागड, मोबा. ८२७५१८६५६९*

१९६० पासून जे अनेक वैविध्यपूर्ण प्रवाह निर्माण झाले त्यामध्ये रानावंनातून प्रकटणारा महत्वाचा आणि तितकाच प्रभावी प्रवाह आदिवाासी साहित्याचा आहे. या साहित्याची सूरूवात १० व ११ नोव्हेंबर १९७९ ला झाले. यात कविताच्या सोबतच कथा, कादंबरी, नाटक, व आत्मकथन इ. साहित्य लिखाण करू लागले. आदिवासींच्या संदर्भातील भौगोलिक, सामाजिक, वांशिक व धार्मिक पृथकतेची जाणिव व्यक्त करणाऱ्या मराठी साहित्यास 'आदिवासी साहित्य' असे म्हणता येइल. स्वत:ची अस्मिता जपण्यासाठी आदिवासी साहित्य परिषदेची स्थापना झाली. आदिवासी जीवन प्रत्यक्ष जगलेले काही सुशिक्षित आदिवासी तरूण आपले स्वत:चे साहित्य लिहू लागले आहेत. डॉ. विनायक तुमराम यांना 'आदिवासी साहित्य' हा मराठी साहित्याचा प्रवाह आहे हे मान्य नाही. त्यांच्या मते आदिवासी साहित्य ही कोणत्याही साहित्याची प्रतिकृती नाही. कारण ते स्वतंत्र, स्वयंभू व स्वयसिध्द् असून त्याच्या प्रेरणा आदिम आहेत. आदिवासी साहित्य हे या देशातीलच नव्हे तर अखिल विश्वातील मूळ मानवसमूहांचे आहे असे मत मांडतात. आदिवासी साहित्याची सूरूवात कवितेने झाली त्या पाठोपाठ कथा, कादंबरी, नाटक, व आत्मकथन इ साहित्य लिहू लागले. गेल्या शंभर वर्षात ग्रामीण , प्रादेशिक, प्रवाही, दलित, वास्तववादी, ऐतिहासिक, पौराणिक आणि अद्‌भुतरम्य अशा अनेक अंगानी व प्रकारांनी मराठी कादंबरीचा विकास व विस्तार होत आला आहे. स्वातंत्रोत्तर मराठी कादंबरीमध्ये रोमॅटिक, वास्तववादी आणि व्यस्ततावादी प्रेरणाचां बरा वाईट दिसून येतात. या प्रेरणा एकमेंकात मिसळलेल्या दिसून येतात. तिच्या लेखनामागच्या प्रेरणाही बदलत गेल्या. तिचे कुतूहल क्षेत्र ही बदलेले. मराठी कादंबरी विश्वात स्वांतत्रोत्तर काळात ना. सी. फडके व वि. स. खांडेकरांच्या कादंबरीपेक्षा वेगळया रूपाची कादबंरी जन्माल येउ लागला. मधु मंगंश कर्णिक यांची 'वाडगीळ ' र.वा.दिघे यांची 'पाणकळा' व 'सराई' या कांदबऱ्या आदिवासीच्या जीवनांचे अपरिचित असलेल्या विश्वाचे दर्शन घडवितात. आदिवासीएतर कादंबरीकार आदिवासींच्या अपरिचित विश्वाकडे कुतूहलतेने पाहतात. गो.नी. दांडेकर, अनिल सहस्त्रबुध्दे, दिनानाथ मनोहर, सुरेश व्दादशीवार, मधुकर वाकाडे, जगदीश गोडबोले आदी. आदिवासीएतर साहित्यीकांनी आदिवासी जीवनावर कादंबरी लेखन केले. आदिवासीएतर साहित्यीकांनी आदिवासी वर लिहीलेल्या साहित्यात कादंबरी या साहित्याप्रकारातून मोठया प्रमाणावर लेखन झालेले दिसते. या पार्श्वभूमीवर प्रा. माधव सरकुंडे

यांची 'वाडा' आणि बाबाराव मडावी याची 'टाहो' या आदिवासी साहित्यांकानी निर्माण केलेल्या कादंबऱ्या महत्वाच्या ठरतात. त्याचबरोबर जाने.२००४ मधे प्रसिद्ध झालेली गोपाळ गवार यांची 'कोळवाडा' हे आत्मवृत्तामत्क कादंबरी ही या पार्श्वभूमीवर महत्वाचे ठरते. १८८५ ते द्वित्तीय महायुध्दापुर्वीच्या संपूर्ण कालंखडातील साहित्यात आदिवासी जीवन म्हणजे केवळ एक स्वप्न आहे. या कालखंडात अनेक मान्यवर व सिध्द्हस्त कादबंरीकार होऊन गेले. मात्र आदिवासी त्यांच्या दृष्टीतुन कां व कसा हद्धपार झाला. स्वांतत्रोत्तर ते आजपर्यंत मात्र आदिवासी जमातीवर काही कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यातील चित्रण वास्तव व स्वप्नाच्या किती जवळ किती दुर आहेत. असा प्रश्न विनायक तुमरामांना पडला. म्हणुन ते त्यांच्या 'आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन' या पुस्तकात मत व्यक्त करतांना म्हणतात की, याचा शोध घेण्याची किंबहुना त्या कांदबऱ्यांचा संशोधन होणे आवश्यक आहे.या दृष्टीने काही अभ्यासक प्रयत्नशील आहेत. ही आदिवासी साहित्याच्या दृष्टीने स्वतंत्र अभ्यास होण्याचे सूरूवात आहे. ही स्वागतार्ह बाब आहे. अभ्यासकांचा प्रवास व प्रयास 'मराठी कादंबरी' ला निश्चितच भरीव असे काही तरी देवून जाईल. आदिवासींच्या जीवनातील गुंतागुंत,त्यांच्या मनातील व्दंद, समाजव्यवस्थेचा आदिवासींना जाच त्यात होणारा त्यांचा भावनिक कोंडमारा, वस्तुस्थितीशी होणारा कोंडमारा, आदिवासींची झुंज आणि तडजोड, संघर्षातुनही मार्ग काढण्याचे धडपड, आपल्या पांरपारिक रूढी, प्रथा, परपंराच्या मर्यादांचे पालन करणारा त्यांचा स्वयंभाव, त्यांचे आनंदमय जीवनशैली आणि कराल दारिद्रयांचा सामना करीत सरकणारा त्यांचा संसार हे सर्व कादंबऱ्याचे विषय आहेत. गैरआदिवासी लेखंकानी आदिवासी जमातीच्या जीवनावर लिहिलेल्या कादबंऱ्याचे संख्या फार कमी असले तरी आदिवासींच्या अनेक समस्या व प्रश्नांना वाचा फोडण्याचे मौलिक कार्य कादबंरीकाऱ्यांनी केल्याचे अभ्यासकांना आढळून आले. कटकारस्थानाचे मनसुबेही त्यातुन डोकावतांना दिसतात. पण तेवढयाच धिटपणाने हाणून पाडणारे त्याचे स्वाभिमानी कसब आणि व्यवहारीकता यांचाही वेध कादंबऱ्यामध्ये घेतलेला दिसुन येते. काही कादबंऱ्याचा परिचयात्मक आढावा पुढे घेतलेला आहे.

डॉ. बाबासाहेब शैक्षणिक चळवळ जंगल दयाखोऱ्यामधेही हळूहळू पसरू लागले. शासन पातळीवर आदिवासींच्या उध्द्‌ारासाठी विविध योजनांची आखणी केली गेली. आदिवासी नवशिक्षिताची फळी निर्माण होत गेली. त्यातुनच त्यांच्या अभ्यासाच्या कक्षा वृदावत गेल्याने त्यांच्यात आत्मानाभुतीची जाणिव निर्माण होत गेली. आपल्या समाजावर होणारे अन्याय, अत्याचार,फसवणूक याविषयी चीड निर्माण होत गेली. आपली संस्कृती, परपंरा, प्रथा, चालीरिती याविषयी आकर्षण निर्माण होत गेल्याने आदिवासी साहित्याची निर्मिती होत गेली. त्याचबरोबर आदिवासींचे आदिम जीवन, त्यांची जीवन जगण्याची विशिष्ट पध्द्त,त्यांच्या संस्कृतीतील वेगळेपण, निसर्गाशी एकरूप झालेले जीवन, समाजातील श्रीमंत वर्गाकडून

आदिवासींचे होणारे शोषण हया सर्व आदिवासींच्या जीवन वैशिष्टामूळे समाजसेवेचे व्रत घेतलेल्या व आदिवासींच्या जीवन शैलीच्या आकर्षणातून लेखकांनी आदिवासी जीवन व जाणिवा आपल्या कादबंरी लेखनीच्या माध्यमातून समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला.

आदिवासी जीवन संस्कृती आणि आदिवासी कादबंरी यांचा अधिक घनिष्ट संबध आहे. आदिवासी संस्कृतीचा विचार केल्याशिवाय आदिवासी कादंबरी पूढे जावू शकत नाही. कारण आदिवासींची संस्कृती ही जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. आदिवासी संस्कृतीमूळेच आदिवासींच्या जीवनात चैतन्य, आनंद, सुख आणि शांती येत असते त्यामूळेच आदिवासीच्या कादंबरीतून आदिवासी संस्कृतींचा विचार हा मुख्य गाभा ठरतो. त्यामूळे आदिवासींच्या संस्कृतीच्या कादंबरीतील विचाराने कादंबरीला वेगळे असे मूल्य प्राप्त होते.

आदिवासी जीवनावर प्रसिध्द झालेले काही कादंबऱ्यांचा उलगडा येथे संक्षेपाने घेवू या.

**'झेलझपाटा' — प्रा. मधुकर वाकोडे**

झेलझपाटा ही कादंबरी देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा.लि. पुणे या संस्थेने १९८८ साली प्रसिध्द् केली. महाराष्ट्रा साहित्य परिषद पुणेव्दारा पूरस्कृत ही कादंबरी आहे. ख्यातकीर्त , समीक्षक, विचारवंत व अष्टपैलू लेखक मधुकर वाकोडे यांची ही कादंबरी अमरावती जिल्हातील मेळघाट तालुक्याचा परिसर हे कोरकू आदिवासींचे निवासस्थान. कोरकूचे जीवन, त्यांचे शोषण, समज —गैरसमज, त्यांच्या श्रध्दा, समजूती, धारणा, रूढी, परंपरा, प्रश्न —समस्या, व्यापारी शेठ सावकार, धर्म प्रसारक व सरकारी अधिकारी त्यांच्याप्रती असलेली वागणुक धुर्त आणि कपटी रवैया, राजकारण्यांचा त्यांच्याप्रती दृष्टीकोन आणि शासकिय योजनांचा देखावा यासर्व वास्तव झेलझपाटा या कादंबरीत लेखक वाकोडेनी चित्रित केले आहे. यांच्या कादंबरीतील नायक केरू आणि नायिका फुलय या दोघांचेही त्यांच्या कोरकू माणसांवर प्रेम आहे. या नायकांची समाजाकडे पाहण्याची दृष्टी निकोप आहे. स्वार्थी, उच्चभ्रु समाजाकडून लुबाडल्या जाणाऱ्या आदिवासी समाजाप्रती केरू फुलयला मनस्वी दु:ख होते. त्यांची आदिवासीच्या संदर्भातील धारणा, एक नवा विचार मांडून जाते. या संपूर्ण नीतीभ्रष्ट समाजव्यवस्थेचा खऱ्या चेहरा चव्हाटयावर मांडतात. केरू फुलयची भावकथा नुसते प्रेमच नाही तर अजून खूप काही विचार करण्यासारखे सांगुन जाते. केरू फुलय, मोपा, खंडेलवार व्यापारी, कासम मण्यारीवाला, सहीम सेठ, वुईके, डॉ. टिकेकर, विठू, उत्तम, संपत, काळे ड्रॉयव्हर, गजा गवडी, नाता बलई, रयोती, बाळू, जोसा,अगंणवाडीवालीबाई, सरपंच,बीडीओ अशी पात्रे याकादंबरीत आढळतात. केरू हा कोरकूमधील थोडा फार शिकलेला हरहुन्नरी व धाडसी तरूण आहे. 'तारूवांदा या गावातील कोरकू ढान्यावर तो राहतो.फुलय ही त्याच ढयान्यावर राहणारी थोडीफार देखणी कोरकू तरूणी या कादंबरीची नायिका आहे. मोथा हा दारूड्या बाब असतो. कासब हा मण्यारीवाला घोडयावर फिरून विकणारा किरकोड व्यापारी असतो. तो केरूला दारू

पाजतो. परंतु फुलयवर कामुक नजर असते.  होळीच्या सणानिमित्याने धान्यावर उत्सव असतो. त्यात झेलवाल्या व्यापारी लोकाची दुकान थाटली जातात. टिणटपरी दारूच्या दुकानात मोंसबी,नारगीचा वास असते. ती पोटात गेल्यावर बाईमाणंसामधे झिंग चढलेली असते. त्यात आदिवासींची लुट होते. कासमला केरूचा काटा काढण्याचा मनाशी निश्चय करतो. केरूला लालपरी विकत असल्याचा पोलिस आळ घेऊन पोलिस चौकीत घेउन जातो. पण खरे तर कासम पोलिसवाल्याला पैसे देवून फितविले असते. फुलय त्याला सोडवण्याची विनंती करते. तेव्हा कासम त्याला सोडवुन आणते. आता केरूच्या मनात कासमबद्दल संशय निर्माण होऊन तो फुलयपासून दुर राहु लागतो. सिपना नदीत मासोळया पकडण्यासाठी देवीच्या कुडांत हॅडबॉबचा् विस्फोट करतो. व डोहात उडी मारतो. पण तो बाहेर येत नाही व तेथेच मरतो. ही बातमी काशीराम गवळी ढाण्यावर पोहचवतो. फुलयवर तर दु:खाचे डोगर कोसळते. आपण केरूच घर घुसायला हवं होत. आपलंच चुकल; पण वेळ निघुन गेलेली असते उरतो फक्त पश्चाताप अन् गडद दु:ख त्यादु:खाने ती दारू पोटात टाकते. नागप्रतिमेवर उरलेली शिडू ओतून तुंबा तिथेच टाकून देवीच्या कुडांत उडी घेऊन आत्महत्या करते. केरू फुलयचे प्रेम फुलत नाही पण त्यांच्या प्रेमाचा दु:खत अंत होतो हे द:ुख लेखक

‘‘लाहोरी फसी गयी राम SS

शिकारीने फंदा डाले SS’’अश्या ओळीने कादंबरीचा शेवट होतो.

**‘एकलव्य’— शरद दळवी**

मेहता पब्लिाशर्ष ,पुणे या प्रकाशन संस्थेद्वारे १९८८ साली प्रसिध्द् झाली ही कांदबरी एक पौराणिक आहे. एकलव्य कादंबरीचा नायक आहे. एका गुरूने गुरूदक्षिणेच्या नावाखाली क्रुंर वध यात आहे. महाभारतातील घडलेल्या अनेक प्रसंगाचं वर्णन यात आलेले आहे. विषय जुनाच पण दळवीने भान नवे सुचविलयाने कादंबरीला वेगळे वळण लागले आहे. गुरूदक्षिणेचा प्रसंग अत्यंत हद्‌यद्रावक असुन द्रोणाच्या कपटीपणाची ओळख पटते. द्रोणाचार्यानी मागणी करताच अगंठा कापुन देतो. द्रोणाचार्याला एकलव्याच्या गुरूभक्तिची अथवा आदिवासी संस्कृतीची ओळख न होता अर्जुनाला हरवणारा शत्रू नष्ट झाल्याचा आनंद होतो. युध्दात अर्जुन एकलव्य समोरासमोर असताना एकलव्यच श्रेष्ठ ठरतो. हे जाणुन कृष्णाने प्रतिज्ञेचा भंग करून सुदर्शन चक्राने एकलव्याला ठार मारतो. त्यांच्या मत्युने कृष्ण दुखावतो व अश्रु ढाळतो. यातुनच आदिवासी संस्कृतीचा मोठेपणा आहे हे दिसून येते. याच्या कापलेल्या अंगठ्यातुन गडणाऱ्या रक्ताच्या कणाकंणातून अनेक एकलव्य युगानुयुगे निर्माण होत राहतील म्हणजेच ही संस्कृती अनेक काळ टिकेल असे दळवीचे मत आहे. आदिवासी निर्मळ हद्‌याचे, निस्वार्थ प्रेमाचे आणि सळसळत्या राष्ट्रभक्तीचे प्रतिक आहे. असे दर्शन दळवीने रेखाटले आहे.

**‘हाकुमी’— सुरेश व्दादशीवार**

प्रा सुरेश व्दादशीवार यांची ही कादंबरी आहे. श्रीविद्या प्रकाशन, पुणे या संस्थेने १९८९ मध्ये प्रकाशित केली. ‘हाकुमी’ हे माडियांचे एक भुंकून वाजवायचे एक वाद्य आहे. विदर्भातील विचारवंत, सिद्धहस्त, लेंखक सुरेश द्वादशीवार ‘हाकुमी’ हे नृाव कादंबरीला दिले आहे. या कादंबरीत कन्ना मडावी, राजेय, सुभाष, सारंग, अनिता, रूपी, कवडी,ढोगीं, पेरमा ही यातील पात्रे आहेत. कन्ना हे नायक आहे. पुण्यातील शिक्षण घेतलेला विचारवादी तरूण आहे. नक्षलवादी व्याप्तपरिसरात माडिया आपली अनादी सांस्कतिक मुल्ये, निसर्गनिष्ठा, जीवननिष्ठा, प्रश्न व समस्या घेवुन ही कादंबरी वावरतांना दिसते. यात माडियाचा उध्द्‌ारासाठी कन्ना मडावीने सोसलेली झीज आहे. पाण्याच्या आणि किर्रर रानाच्या आश्रयाने राहणरी रोही, हरीण, डुकरे, ससे, वाघ, मोर अशा पशुपक्षांची नावे आणि त्यांच्या शिकारीसाठी लागणारी तिरकमठा, भाले, गोफण, गुलेल व सापडे ई. नावाचा उल्लेख येतो. बांडिया, पर्लकोठा , पामुलागौतम, आणि इंद्रावती चे दर्शन ही यात येते. यात सर्वच आदिवासींचे जीवनचित्रण आलेले आहे.

**‘एनकांऊटर’— ॲड एकनाथ साळवे**

‘एनकांऊटर’ ही कादंबरी फुले —आंबेडकर स्टडी ग्रॅप ,चंद्रपुरद्वारा १९८८ साली प्रसिध्द् झाली. चद्रंपुर गडचिरोली भाग नक्षलवाद्यांनी अशांत करून सोडला. आदिवासी बंदुक घेतल्यामुळे पोलिस त्यांच्यावर जे अत्याचार केले त्याचे दर्शन यात लेखकाने केले आहे. नक्षलवादी आगमणामूळे त्यांच्या जीवनसंस्कृतीत बदल झाला जो आदिवासी मुकाट्याने अन्याय सहन करत होता तो आता अत्याचाराविरूध्द् विद्रोह करू लागला. लेखकांनी जे अनुभवले, भोगले ते कादंबरीत आले आहे.त्यामूळे ती कादंबरी अधिक वास्तववादी असल्याचे दिसते.

आदिवासींचे जीवन हे एकरूप झाल्याने त्याच्या संस्कृतीतही नैसर्गिकता आलेली दिसते. आदिवासी समाजातील विविध प्रथा,परंपरा,त्याच्या लग्नपध्द्ती,रूढी, सणउत्सव साजरे करण्याची रीत, मर्तिकविधीतील वेगळेपण यासारख्या सांस्कृतिक घटकांतून ही नैसर्गिकता पाहावयास मिळते. गो. नि. दांडेकरांची ‘जैत रे जैत’, अनिल सहस्त्रबुध्दे यांचे ‘अहिनकुल’, दुर्गा भागवत यांच्या ‘महानदीच्या तीरावर’, वासुदेव कर्णिक यांचे ‘वाडगिण’,गोदावरी परूडेकर यांचे‘जेव्हा माणूस जागा होतो’, गो. ना. मुगघाटे यांची ‘माझी काटेमुढंरीची शाळा’ शंकर भिसे यांची ‘जंगलातील छाया’, नजुबाई गावित यांची ‘भिवा फरारी’, बाबा भांड यांची ‘तटया’ व दिनानाथ मनोहर यांची ‘आंदोलन’ अश्या अनेक कादंबरीचा विचार केला असता प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र संस्कृती असल्याची पाहावयास मिळते. अश्या प्रकारे जीवन चित्रण कादंबरीतुन घडते.

**निष्कर्ष**

- कादंबऱ्यातुन जीवन आदिवासी जीवन संस्कृतीचे दर्शन घडते.
- निसर्गाचा वापर करूण वास्तवादी कादंबऱ्यातुन मराठी साहित्याला समृध्द्ता प्राप्त करूण दिली.
- समकालीन कादंबरीला नवा दृष्टीकोन दिला.
- कादंबऱ्यातुन नुसते मनोरंजन करणे हा हेतू नसून मानवी आदिवासी जीवनाचे तात्विक दर्शन घडते.
- वाचकाला समीक्षकाला बौध्दिक पीळ देणाऱ्या कादंबऱ्या आहेत.
- कादंबऱ्याला नवीन वाङ्मयीन मुल्य जाणीव दिली.
- या कादंबऱ्याने जीवनाचा अचूक वेध घेतला.
- या कादंबऱ्याने स्वत:हाचे असे वेगळे रूप धारण केले

**संदर्भटिपा**

*मधुकर वाकोडे 'झेलझपाटा',देशमुख आणि कंपनी प्रा. लि. पाचवी आ. २००४*
*प्रा. सुरेश द्वादशीवार, 'हाकुमी' श्री विद्या प्रकाशन, पुणे १९८९*
*डॉ. विनायक तुमराम ,'आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा' विजय प्रकाशन, नागपुर*
*डॉ. माहेश्वरी गावीत,'महाराष्ट्रातील आदिवासी साहित्य एक शोध', दास्ताने आणि कं., पुणे २००८*
*डॉ. कृष्णा भवारी (संपा.), 'आदिवासी साहित्य आणि साहित्यिक' कुणाल मदन हजेरी प्रकाशन, पुणे,२०१३*
*डॉ. प्रमोद मुनघाटे,'आदिवासी कादंबरी आणि इतर' तनुजा प्रकाशन,नागपुर,२००५*

# शेतकरी जीवनाचा सर्वांगीण वेध घेणारी कादंबरी : बारोमास

**डॉ. संभाजी शिवाजी जाधव**
*मराठी विभाग, कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविदयालय उमरी, ता. उमरी जि. नांदेड*
*पि न : ४३१८०७ मो. ९४२३६०८८४८ ईमेल: sambhajijadhav76@gmail.com*

भारतीय शेतीची दयनीय अवस्था सनातन आहे. सतत निसर्गावर अवलंबून राहणा-या शेतक-यांच्या जीवनात सुखाची शाश्वत नाही. नापीक, शेतमालाला योग्य भाव न मिळणे, भारतातील कृषि क्षेत्रातील संशोधन जागतिक स्तराच्या तुलनेत सुमार असणे या मूलभूत समस्या अनेक दशकापासून जशाच्या तश्या शिल्लक आहेत. यामुळे या पुढील काळातही शेतक-यांना आणि भारतीय शेतीला चांगले दिवस येतील असे दिसत नाही. शिवाय शेतीची प्रतिष्ठा ही आज शिल्लक राहिली नाही. व्यापारी आणि नोकरशाही यांच्या तुलनेत शेतीचा दर्जा कन ष्ठ झाला आहे. त्यामुळे शेतकरी आणि त्यांच्या मुलांना आपले जगणे कितीतरी मागास आणि लाजिरवाणे झाले आहे याची जाणीव झाली. त्यामुळे त्यांच्या मनात उदासिसनता निर्माण झाली आहे.

ग्रामीण साहित्यात शेती आणि शेतकरी यांच्या जगण्यावर विविध समस्यावर आजपर्यंत भरपूर लेखन झाले आहे. इस.२००० नंतर भारतीय बाजारपेठेत अमुलाग्र बदल झाला. नवे तंत्रज्ञान, इंटरनेट यांच्यामुळे जागतिक बाजारपेठा माहित झाल्या खुल्या आर्थिक धोरणाने त्या अधिक जवळ आल्या त्यामुळे शेतक-यांच्या समस्याही बदलल्या पण त्यांचे दारिद्रय कायम राहिले. या कालखंडात सदानंद देशमुखयांचे लेखन पारंपरिक ग्रामीण लेखका पेक्षा निश्चितच वेगळे ठरते आहे. शेतक-यांच्या दु:खाच्या मुळाशी जाण्याबरोबरच शेतक-यांची मूलं उत्तम गुणवत्तेने शिक्षण घेतल्यानंतर ही त्यांचे काही मोल झाले नाही. जसा शेतमालाला भाव नाही तसेच दर्जेदार गुणवत्ता असणा-या शेतक-यांच्या मुलांनाही किंमत नाही हे वास्तव अत्यंत चपखलपणे बारोमास या कादंबरीतून सदानंद सदेशमुख यांनी मांडले आहे. शेतक-यांची शिकलेले पिढी आधुनिक शेती करु पाहते आहे पण " आरे, अशी कश्री ही आधुनिक शेती? तुमच्या घरात काईच माल नाई हे तर घ्र खंदून आंगण भरणं चाललं"१ या नानूआजाच्या वाक्यान सा-या आधुनि क शेतीवरच प्रश्न नि र्माण होतो. शेतीची अवजार बी-बि याण्यात आधुनि कता आली पण शेतक-यांच्या जीवनात आधुनि कता आली नाही. उलट घरी असलेले बीयाणे बाद ठरवून या आधुनिकतेने शेतक-यायंना बीयाणे विकत घ्यायला भाग पाडले. त्यामुळे रासायनिक खते व बी-बियाणे यामुळे शेती आणि शेतकरी अधिकच अडचणीत आल्याचे नानूआजाच्या विधानातून सदानंद देशमुख यांनी अत्यंत समर्थ पणे चित्रीत केले आहे.

एकनाथ या कादंबरीत मध्यवर्ती नायक आहे. त्याच्या भोवती ही कादंबरी सतत फिरत राहते. एकनाथ् हा उच्चशिक्षित शेतकरी मुलांच प्रति नि धीत्व करणारा नायक आहे. असे प्रामाणि कणे कष्ट करुन हुशार बुध्दीमान, सृजनता असलेले अनेक शेतक-यांच्या मुलांचा शेवट अतयंत सदयनीय होता. तर दुस-या बाजुला

सुमार बुध्दीमत्ता असलेले पैसेवाल्यांची मुले अनेक मोक्याच्या पदावर जावून बसतात. यातून शेतक-यांच्या वाताहतीची दुसरी बाजू दि सून येते. जी शेतमालाची अवस्था तीच बुध्दीमत्तेची ही होते.

एकनाथ बुध्दीमान, कष्टी असुनही त्याला आपल्या जीवनातील मुलभूत गरजांची सुध्दा पुर्तता करता येत नाही. एकनाथ आणि त्याची पत्नी अलका यांच्यात जे भावनिक नात असायला पाहिजे होत ते सुध्दा दारिद्र्यामुंळे निर्माण होऊ शकत नाही. एकनाथ होतकरु आणि उच्चशिक्षित आहे म्हणून अलकाने त्याच्याशी लग्न केल होत पण त्याला या व्यवस्थेमुळे नौकरी मिळूशकली नाही. त्यामुळे ति चा भ्रमनि रास होतो. एकनाथ आणि त्याच कुटुंब बारोमास शेतात राबुन ही त्याच्या खिशातील कडकी अन पोटातील धडकी काही थांबत नव्हती. त्यांना सुखाचा घास कधी भेटत नव्हता हे शेतकरी जीवनाच प्रातिनिधीक चित्रण आहे. एकनाथ शेतात काम करीत होता. पण अलकाला हे मान्य नव्हत, “कधी कधी आपण तु त्या अन् जुपणे खांद्यावर टाकून शेतात नि घायचो. डवरे-वखरं हाणायला तर अलका घट्ट आपल्याला धरुन ठेवायची डोळयांतून आसवं गाळत म्हणायची, हे करु नका हो. अनपडाची कामं ही. तुम्ही सुशिक्षित! आणि रडायची आसवं गोळत म्हणायची, काही करा कि राणा दुकान टाका. वह्या, पुस्तकाचं सदुकान टाका पानपट्टी चालवा...............पण हे भयानक कम नको.”२ अलकाच्या या मानसि कतेतून शहरी मध्यमवर्गाचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा आहे ते वाचकाच्या लक्षात येते आणि मन सुन्न होते. शेती पेक्षा इतर सर्व व्यवसाय श्रेष्ठ आहेत हा दृष्टीकोन शेतीस आणि शेतक-यास हीन लेखनारा आणि आजच्या शेतीची दुर्दशा सांगणारा आहे. शेतीपेक्षा पानपट्टी चालवण आज फायद्याच झाल आहे. त्यातून उपजीवीका भागेल एवढे उत्पन्न मि ळवण्याची खात्री आहे. पण शेतीतून उपजीवीका भागवसणे आहज अशक्य झालं आहे. म्हणून तर अलका शेती सोडूण कोणताही व्यवसाय करण्याचा आग्रह करते आहे. शेती हा तोट्याचा व्यवसाय झाला आहे. घरात आहे तेवढं शेतात घालायच आणि निसर्ग व व्यापारी यांच्याकडे डोळे लावून बघत बसायच एवढच शेतक-यांच्या हातात शिल्लक राहिले आहे. त्यामुळे जगाचा पोशिंदा असूनही शेतक-यांना आपली उपजीवीका भागवण्यासाठी अन्य मार्गाचा अवलंब करावा लागतो आहे. “ज्यांच्या दारी झांडं होती त्यांयनी आर्थिक अडचणीलार बळी पडून विकली. आधी शेतातली मग दारातली खरं म्हणजे झाडांची खरी गरज शि वारालाच ति थल्या मातीची धूप होऊ नये म्हणून. मि नीची पोत टि कून राहावी म्हणून झाडं हवीच मोडीतल्या बंगल्याची कुठे धूप जाणार आहे? पण इथं झाडं आहेत. ति थं झाडं नाहीत. इथं भूक भागल्याच्या ढेकरावर ढेकरा अन् ति थं भू भागवण्यासाठी कडाल जांभयावर जांभया!”3 अशी अवस्था शेतीची अन् शेतक-यांची झाली आहे. ही अवस्था शहरी मध्यमवर्गीय माणूस ओळखुण आहे म्हणून तर तो शेतीशिवाय इतर कोणताही व्यवसाय करण्याचा आग्रह धरतो आहे. हा आग्रह म्हणजे भारतीय शेती आणि शेतक-यांची शोकात्मिका आहे असे शेकात्म प्रसंग बारोमास मध्ये अनेक ठिकाणी आले आहेत. सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आर्थिक या अंगाने ग्रामीण जीवनातील शोकात्मीका सदानंद देशमख यांनी उत्तम पणे रेखाटली आहे त्याला ग्रामीण भाषेचा पोत याची सांगड घातल्यामुळे ही कादंबरी अधिक प्रभावीपणे ग्रामीण जीवनातील गुंता वाचकासमोर उलगडून दाखविण्यात यशस्वी झाली आहे. डॉ चंद्रकांत वांदिवडेकर म्हणतात “ बारोमास ही कादंबरी एक महान शोकांतिका आहे नाटकाचा उत्कट होत जाणारा शोकानुभव

ही कादंबरी देते. भारतीय कृषि समाज, भारतीय कुटुंबव्यवस्था, स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय मूल्यहीन राजकीय व्यवस्था, भारतीय शासनतंत्र, भारतीय सांस्कृतिक मूल्यव्यवस्था, न्यायव्यवस्था या सर्वांच्या पडझडीची दारुण शोकात्म अनुभव देणारी ही महाकाव्यीय अभिव्यक्ती आहे."4 या विधानावरुन आपल्या असे लक्षात येते की, बारोमास या कादंबरीत शेतकरी यांच्या समस्यांना मध्यवर्ती ठेवून त्याविषयी निरीक्षण, अभ्यास आणि चिंतन करुन एका समग्र अनुभवाची मांडणी सदानंद देशमुख यांनी केली आहे. शेतीची घसरती प्रतिष्ठा घटते उत्पादन, कुटुंबाचा पडणारा बोझा, सावकारी व नोकरशाहीची निष्ठुरता, मिनीचे भाऊहिस्से, कब्जेदलाली, फसवणूक अशा कितीतरी समस्यामुळे त्रस्त झालेला शेतकरी व त्याची भ्रमिष्टावस्था याचे उत्तम चित्रण या कादंबरीत आले आहे. म्हणून बारोमास ही समकालीन कादंबरी वाङ्मयात वेगळा ठसा उमटविताना दिसते.

बारोमास मध्ये चित्रीत प्रत्येक पात्र ग्रामीण मातीशी घट्ट नाळ जोडुण असलेले आहे. त्यापैकी मधुकर ही व्यक्ति रेखा एकनाथच्या स्वभावाच्या एकदम विरुध्द वर्तन करणी आहे. मधुकर हा क्त आहे. पण केवळ उत्तम शि क्षण घेतल्याने नौकरी मि ळवता येत नाही. तर साठे हा जसे वर्तन करतो त्या शिवाय जगता येत नाही. याची पक्की खात्री त्याला झाली आहे. त्यामुळे तो नैराश्याच्या गर्तेत सापडला जातो आणि हुशार असून ही धन शोधणारी टोळी बनवतो. सदानंद देशमुख यांच कमालीच निरीक्षण दि सून येते ते असे की, ही टोळी अनेक दिवस धन शोधते पण धन काही सापडत नाही. कोणत्याही मार्गाने नौकरीमिळवि ण्याचा प्रयत्न करतात पण नौकरीमि ळत सनाही. उलट शेती गहाण ठेवून डोनेशन भरुन फसले जातात. तेव्हा त्यांना कमालीचे नैराश्य येते. या नैराश्याचा शेवट म्हणजे हायवे वर गाडया लुटण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात येते. परिस्थितीने या व्यवस्थेने त्यांना या मार्गावर आणुन ठेले आहे. याचे सूक्ष्म निरीक्षण सदानंद देशमुख यांनी केले आहे. त्यामंळे ते काल्पनिक वाटत नाही तर वास्तवाच्या अधिक जवळ जाणरे प्रसंग या कादंबरीत आहेत. म्हणून ही कादंबरी समकालीन कादंबरी वाङ् मयात अधि प्रभावी पणे ग्रामीण जीवनाचे व शेतकरी समस्यांचे भाष्य करते असे मला वाटते.

**निष्कर्ष**

सरकी अधिकारी, राजकीय नेते यांच्याकडून शेतक-यांची वारंवार फसवणुक होते. त्यामुळे व दारिद्रयामुळे शेतकरी नैराश्याच्या गर्तेत सापडला आहे. कृषि समाजाकडे शहरी मध्यमवर्गाचा पाहण्याचा दृष्टिकोण तुछतावादी आहे. शेतक-यांना आणि समाजातील इतर घटकांना शेती करणे हे कमी पणाचे वाटत आहे. त्यामुळे शेती व्यवसायास आज प्रतिष्ठा राहिली नाही.

**संदर्भ सुची**


1. *देशमुख सदानंद, बारोमास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृष्ठ- 09.*
2. *उपरोक्त- पृष्ठ 111.*
3. *उपरोक्त- पृष्ठ 122.*
4. *उपरोक्त- पृष्ठ 403.*

## समकालीन वैदर्भीय समिक्षक आणि समीक्षा

**प्रा. डॉ. बंडु चौधरी**
*मराठी विभागप्रमुख, समर्थ महाविद्यालय, लाखनी*
*मो. नं. ९७६५१९२८७८ Email :- chaudharibandoo87@gmail.com*

मराठी समिक्षेचा विचार करता १९ व्या शतकात निर्माण झालेला समिक्षा प्रवाह आजमितीला विविध प्रवाहात आणि प्रकारात आकारास आल्याचे आपल्या निदर्शनास येते. एवढेच नाही तर या समिक्षा प्रवाहाने सर्वसामाण्य वाचकांचा साहित्यकृतीकडे बघण्याचा दृष्टीकोणच बदलवून टाकल्याचे नजरेस भरते. परंतु हा समिक्षा प्रवाह का निर्माण झाला ? त्याची आवश्यकता का भासली ? आजमितीला विविध साहित्य प्रकारांवर समिक्षा प्रवाह आधारलेला असल्याने तो पवरपोशी असल्याचे भालचंद्र नेमाडे सारखे साहित्यीक बोलून जातात. तरीही एखादी साहित्यकृती समजून घेत असताना अनेकदा अभ्यासक आणि वाचकांना त्या साहित्यकृतीच्या समिक्षेचाच आधार घ्यावा लागतो. यासंदर्भात गो. म. कुलकर्णी प्रदक्षिणा खंड या पुस्तकत समिक्षेच्या संदर्भात म्हणतात की, '' साहित्य समीक्षा हा साहित्याचे 'साहित्यपण' हरवू न देता ते स्पष्ट करणारा, साहित्याच्या मर्मबंधाला स्पर्श करणारा, साहित्याच्या आकलन — आस्वादनाला, मुल्यमापणाला, योग्य ती दिशा, दृष्टी व चौकट पुरविणारा, तत्संबंधीची स्वत:ची व इतर जिज्ञासूंची अभिजातता वाढीस लावणारा, साहित्याच्या रहस्याचा बुध्दिपुरस्पर वेध घेणारा, एक पृथककरण, संकलनकुशल, संस्कृतीसंबध्द असा ज्ञान व्यवहार आहे.''[१] आणि त्यामुळे मराठी साहित्यात समिक्षेने स्वत:चा असा एक वाचकवर्ग तयार केल्याचे दिसते. एवढेच नाही तर आता मराठी समीक्षा ही अंर्तमग्न होवून कलावादापासूण तर रूपवादापर्यंत विविध विचारातून मराठी समीक्षा सक्षम झाल्याचे दिसते.

मराठी समीक्षा ही आजमितीला केवळ मराठीचीच न राहता ती विविध प्रवाहानुसार प्रमाणभाषेपासूण तर विविध बोली भाषेपर्यंत पोहचली त्याच बरोबर ती विविध प्रदेशानुसार सुध्दा तिचा आजमितीला वावर होताना दिसतो. त्यात मराठवाडयातील समीक्षा प्रवाह, कोकणी समीक्षा प्रवाह, खानदेशी समीक्षा प्रवाह, वैदर्भिय समीक्षा प्रवाह असाही भौगोलीक परिसिमेनुसार मराठी समीक्षेचा प्रवाह मानण्यास वाव दिसतो. परंतु ज्या प्रमाणे विविध परिसरानुसार साहित्यप्रवाह निर्माण झाले त्याप्रमाणे समीक्षा मात्र पुढे गेल्याचे दिसत नाही. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधात समकालीन वैदर्भिय मराठी समीक्षेची वाटचाल व सध्याची वास्तविकता यावर प्रकाश टाकण्याचा छोटासा प्रयत्न.

विदर्भातील मराठी समीक्षेचा विचार करता ज्या प्रमाणे संपुर्ण मराठी साहित्याला विदर्भातील साहित्यीकाने मोठे योगदान दिले त्याचप्रमाणे समीक्षेच्या क्षेत्रात सुध्दा विदर्भातील समीक्षकांनी मोलाची भर टाकल्याचे दिसते. वैदर्भिय समीक्षेचा विचार करता आधुनिक काळात मराठी साहित्याच्या उत्कर्षाच्या काळात विदर्भातील वि. भि. कोलते यांनी समीक्षेच्या प्रांतात आपला स्वत:चा ठसा निर्माण करून विविध ग्रंथांची निर्मिती केलनी. त्यांनी महानुभव पंथीय साहित्यावर समीक्षा करून महानुभव साहित्याकडे बघण्याचा वाचकाचा दृष्टिकोण बदलविला. वि. भि. कोलते यांचा जन्म विदर्भातीलच. 'उध्दवगीता'१९३५, 'रूक्मीणी स्वयंवर'१९४०, 'वच्छहरण'१९५३, 'शिशुपाल वध'१९६०, 'श्री गोविंद प्रभू' १९९४, यासारखे जवळपास १५ ग्रंथ लिहून त्यातून समीक्षा विचाराला सुरूवात केली. आणि प्राचीन साहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोण विदर्भातील वाचकांना दिला. या समीक्षकापासूणच विदर्भात समीक्षा विचाराला सुरूवात झाली.

आधुनिक समीक्षा विचार प्रवाह हा खऱ्या अर्थाने मराठीत बा. सी. मर्ढेकर यांच्या समीक्षा विचाराने झाला. असे असले तरी '' नवसमिक्षेने केलेल्या आकृतीबंधावर, जडणघडणीवर, त्यातील आशय—अभिव्यक्तीच्या अदैतावर, तदनुषंगीक शैलीविशेषावर भर देत कलामाध्यमविषयक नवे विचार मांडून वाङ्मयीन महात्मता साधली''[२] याच काळात त्यांनी 'आर्टस ॲण्ड मॅन', वाङ्मयीन महात्मता, 'साहित्य आणि सौदर्य' यासरख्या ग्रंथातून साहित्यातील सौदंर्य मांडण्याचा प्रयत्न झाला. आणि त्याचे पडसाद विदर्भात उमटून द. भि. कुलकर्णी यांनी १९८२ मध्ये लिहिलेल्या मर्ढेकरांचे 'सौदर्यशास्त्र : पुनस्थापणा' या ग्रंथातून मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रीय विचारांचे खंडणमंडण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. द. भि. कुलकर्णी या विदर्भातील समीक्षकाने 'दुसरी परंपरा', महाकाव्य: स्वरूप आणि समीक्षा', ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद','पहिली परंपरा','तिसऱ्यांदा रणांगण', 'चार शोधनिबंध', पार्थिवतेचे उदयास्त', 'नाटयवेध', 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र', 'प्रतितीविश्रांती', 'युगास्त्र', 'ब्दिदल', 'पहिल्यांदा रणांगण', 'अपार्थिवाचे चांदणे', 'समीक्षेची सरहद्द', 'समीक्षेची वल्कले', 'मर्ढेकरांचीर अनन्यता यासारख्या समीक्षापर ग्रंथातून एकुणच मराठी समिक्षेला नवा आयाम देण्याचे काम द. भि. कुलकर्णने केले. यासंदर्भात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस म्हणतात की,'' द. भी. कुलकर्णी यांनी मराठी साहित्यातील एकुणच समीक्षेला नवा आयाम दिला. केवळ समीक्षाच नव्हे तर त्यांचे ग्रंथ अभ्यासकांना सदैव मार्गदर्शक ठरतील''[३] यावरूनच द. थी. कुलकर्णीच्या समीक्षेच्या क्षेत्राची महती पटते.

मराठी समीक्षेचा विचार करताना विदर्भातील शरच्चंद्र मुक्तीबोधांचेही नाव घ्यावे लागते. १९२१ मध्ये जन्मलेल्या मुक्तीबोधांनी 'मुक्तीबोण :साहित्य आणि समीक्षा भाग १ ते ३' या समीक्षापर ग्रंथातून निखळ मार्क्सवादी विचारांचा सातत्याने पुरस्कार करणारी समीक्षा केली.

यासंदर्भात डॉ. श्रीपाद भलचंद्र जोशी म्हणतात की, '' शरच्चंद्र मुक्तीबोधांच्या काळात मर्ढेकर आणि मुक्तिबोध ही साहित्य विश्वातील उत्तुंग शिखरे होती. आर्थिक पायावरच्या पारंपारीक मार्क्सवादाला समष्टीवादी सांस्कृतीक पायावर उभ्या करणाऱ्या नवमाकर्सवादाने ते एका अर्थाने कलात्मक उपयोजन होते. मराठी साहित्यात हे कतुत्व एकटया मुक्तीबोधांचे आहे.''[४] महत्वाचे मानावे लागते.

भारतीय स्वातंत्र्याच्या काळात जी नवी सांस्कृतीक घटीते अस्तित्वात आली त्यात दलित साहित्याला महत्वाचे स्थान द्यावे लागते. यातुनच या साहित्याचे निर्मति कोण, यांच्या आंतरिक प्रेरणा कोणत्या या साहित्यविश्वाचा मराठी साहित्यावर काय परिणाम झाला यांच्या चर्चेतून एक समीक्षा विचार पुढे आला त्याला सुध्दा विदर्भतील समीक्षकाने चालना दिली. त्यात अग्रेसर म्हणून आजमितीला यशवंत मनोहर यांचे नाव घ्यावे लागते. यशवंत मनोहरांनी 'दलित कविता'१९८१, 'नवे साहित्यशास्त्र' यासारखे ग्रंथ लिहून दलित समीक्षा विचाराला पुढे आणले.

आजमितीच्या विदर्भातील समीक्षकांचा विचार करता आशा सावदेकर यांनी 'मला आवडलेली कविता', 'काही शोधनिबंध', 'विदर्भाचा वाङ्मयीन वारसा', 'काव्यगंगेच्या तठावर', 'मुसाफिरी', 'भारतीय साहित्याचे शिल्पकार : ना. सि. फडके' यासारख्या ग्रंथातून मुलगामी समीक्षा विचार मांडला. अक्षयकुमार काळे यांनी 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', 'सुक्तसंदर्भ', 'गोविंदाग्रज समीक्षा', 'कविता कुसुमाग्रजाची', 'मर्ढेकरांची कविता', ग्रेसविषयी', 'प्रतितीविभ्रम', 'मिर्झा गालीब' यासरख्या समीक्षा ग्रंथातून साहित्यविषयक समीक्षा मांडून समीक्षक सुध्दा अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाचे अध्यक्ष बनून विदर्भाला समीक्षेच्या प्रांतात पुढे आणून विदर्भातील समीक्षकांना प्रेरणा दिली. यातूनच प्रमोद मुनघाटे, शैलेंद्र लेंढे, राजेंद्र नाईकवाडे यासारखे नवपीढीतील समीक्षक पुढे आले. आणि मराठी समीक्षेला विदर्भातील समीक्षकांनी मोलाचे स्थान प्राप्त करून दिले.

एकुणच मराठी समीक्षेचा विचार करता, ज्या प्रमाणात साहित्याच्या विकरसात विदर्भातील समकालीन साहित्यीकांनी महत्वाचा वाटा उचलला. त्याच प्रमाणे समीक्षेच्या क्षेत्रात सुध्दा विदर्भातील समकालीन समीक्षकांनी मोलाची भर घालून विदर्भ प्रांताचे योगदान साहित्याबरोबर समीक्षेच्या क्षेत्रात महत्वपुर्ण स्थान निर्माण केले. परंतु असे जरी असले तरी इरत प्रांतातील समीक्षकाप्रमाणे विदर्भातील समीक्षकांनी मात्र वैदर्भिय साहित्याकडे दुर्लक्ष केले. विदर्भात समीक्षकाची मोठी पिढी जरी निर्माण झाली असली तरी या समीक्षकांनी मात्र विदर्भातील साहित्याला फारसा न्याय दिल्याचे दिसत नाही. विदर्भाचा विकास करायचा असेल तर विदर्भातील साहित्यात आलेल्या समाजवास्तवाला, समस्यांना समीक्षेच्या माध्यमातून तावून सुलाखून काढणे गरजेचे आहे. विदर्भात मोठया प्रमाणत झाडी बोलीतील साहित्य आहेत.

त्याच बरोबर ग्रामीण साहित्य व दलित साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य आहे. परंतु या साहित्यांना विदर्भातील समीक्षकांनी न्शय न दिल्याने विदर्भाच्या विकासाच्या वाटा आजही गुलदस्तयात आहे. म्हणूनच आजच्या पिढीतील समीक्षकांनी विदर्भातील साहित्य तपासूण त्यातील मुल्यगर्भ शोधणे गरजेचे वाटते.

**संदर्भ ग्रंथ :—**

*१. 'प्रदक्षिणा खंड १', 'कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ', प्र. आ.*

*२. लोकसत्ता २७ जाने २०१६*

# दलित कविता आणि समकालिन वास्तव

**डॉ. जगदिश्वर मेश्राम**
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर*
*मो नं. ९४०५५३३९७९ Email : jagdishm.17@gmail.com*

**प्रस्तावना :—**

समकालीन हा कालवाचक शब्द आहे. 'सम म्हणजे समान' त्या काळा सोबत. ज्या साहित्यामध्ये तत्कालीन सामाजाचे प्रतिबिंब पडलेले असते. ज्या काळात साहित्य लेखन केले जाते काळातील घटनाचा प्रभाव लेखकावर पडलेला असतो.त्यातूनच तत्कालीन समाजाचे जीवन दर्शन वाचकापुढे उभे राहते. तत्कालीन घटनांचा, विचारांचा सामाजिक व्यवस्थेचा प्रभाव त्या साहित्यावर पडलेला असतो.त्यालाच समकालीन साहित्य असे म्हणता येईल. साठोत्तरी साहित्यचा प्रवाहांचा विचार केल्यास अतिसय प्रभवशाली ठरलेला आणि महत्वाचा साहित्य प्रवाह म्हणून ज्या साहित्यचा विचार केला जातो त्या दलित साहित्यतील समकालीन वास्तवतेचा विचार करतांना दलित साहित्याच्या पार्श्वभूमिचा विचार करणे महत्वाचे ठरते.

दलित साहित्याचा उदय भारतीय वाङ्मय क्षेत्रातील एक नवे अनुभव विश्व व मूल्यात्मक संवेदना देणारी घटना आहे. या साहित्यातील जीवनदर्शनाने व तत्त्वज्ञानाने सामान्य माणसाचे जीवन बदलवून टाकले. एका मानवतावादाच्या उज्ज्वल भावनेने त्याला गतिमान केले. सामान्य माणसाला त्याच्या शोषणाचा शोध घेण्याची प्रेरणा मिळाली हे साहित्य म्हणजे चळवळ होती. या वाङमयीन चळवळीची पार्श्वभूमी लक्षात घेता शतकानुशतके मुका असलेला अस्पृश्य समाज मानवी हक्कासांठी लेखन करू लागला. त्यामध्ये कितीतरी समकालीन नव्या जाणिवा नवे जीवनदर्शन प्रकट होवू लागले. त्यामुळे मराठी वाचकाला नवे अनुभवविश्व नवे संवेदनविश्व अनुभवता आले. कथा, कविता, कांबदरी, नाटक, स्वकथने, वैचारिक निबंध या वाङमय प्रकारातून दलित लेखक नवे आशय—विषय घेवून समाज जीवनाचे चित्रण करू लागले व नव्या जाणिवा नवे तत्त्वज्ञान मांडू लागले.

या सर्व वाङ्मय प्रकारातून भूक, दुःख, वेदना, दारिद्रय, नकार, विद्रोह यांचा आविष्कार होवू लागला. त्यामुळे विशिष्ट प्रांतातील, गटांतील, जातीतील वर्चस्व संपुष्टात आलेत. उच्चवर्गीयापासून तर दलित, आदिवासी माणसांचे भाषानुभव, संस्कृती त्यात प्रतिबिंबित होवू लागली. शेकडोवर्षे साहित्यापासून दूर असलेला माणूस साहित्याचा नायक बनला व मराठी वाङ्मयाचा इतिहास एका वेगळ्या दिशेने विकसित झाला.

युगानुयुगे येथील अस्पृश्य समाज सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या जोखडात अडकलेला होता. त्यांना माणवी हक्कापासून वंचित ठेवले गेले. पशूपेक्षाही हीन दर्जा भारतीय समाजव्यवस्थेने अस्पृश्यांना बहाल केला होता. एकटेच नव्हे तर रूढी परंपरेच्या विरूध्द कुणी जाणार नाही, यासाठी त्यांना धर्माच्या दैवाच्या नावाखाली मानसिक गुलाम केले होते. त्याचा परिणाम असा झाला की, अस्पृश्य समाज साहित्य, कला यापासून दूर लोटला गेला. वर्णव्यवस्थेच्या प्रभावामुळे त्याला निरनिराळी हलकी कामे करावी लागली. आणि उच्चवर्णीयांनी दिलेल्या शिळ्या भाकरी—तुकड्यांवर जीवन जगावे लाभले. अशा या गावकुसाबाहेर राहणाऱ्या समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचा युगपुरूष लाभला. त्यांच्या तत्वनिष्ठ व चिंतनपर विचाराने अस्पृश्यच नव्हे तर पीडीत, आदीवासी व बहुजन समाजाचे चित्र बदलू लागले.अनेक सुक्षिक्षित तरूणाच्या मनात लेखन करण्याची पेरणा डॉ. बाबासाहेबा आंबेडकरामुळे निर्माण झाली. त्याप्रेरणेतूनच अनेक सुक्षिक्षित तरूण लेखण करू लागले त्या लेखनातील जाणिवा बरोबर समकालिन समाज जिवनाचे प्रतिबिंबही उमटले.

दलित साहित्य प्रवाह आपल्या अनेक गुणवैशिष्ट्यांनी विकसित झाले. या साहित्याची निळीपहाट उगंवली तीच मुळात अपूर्व आहे. ही पहाट पक्ष्यांच्या किलबिलाटाने उगवत नाही, तर दलित जीवनाच्या वेदना दु:ख घेवून प्रकासू लागली. त्यामुळे त्यामध्ये समाधानाचे थंड सुस्कारे न दिसता परिवर्तनाच्या लहरी दिसतात. दलित कथा, कविता, कांदबरी, नाटक, आत्मकथन व वैचारकि लेखन इ. वाङ्मयप्रकाराच्या अंगाने विकसित झाले आहे. अनेक प्रतिभासंपन्न लेखकांनी आपल्या सर्जनशील कलाकृतीतून या वाङ्मयप्रकारांना विकसित केले. त्यामध्ये अतिशय प्रभावशाली ठरलेला साहित्य प्रकार म्हणजे कविता होय. या प्रकाराणे दलित साहित्याला, मराठीतील महत्वाचा साहित्यप्रवाह म्हणून दर्जा मिळाला व मराठी वाङ्मयाच्या कक्षा रूंदावल्या गेल्या.

दलित साहित्यातील विद्रोही जाणिवेचा प्रथमाविष्कार हा कवितामधून झाला. स्फोटक आशय घेवून विविध भावरूपे कवितेद्वारे अभिव्यक्त झाली. आपल्या भावना अविष्कृत करण्यासाठी लघुत्तम आकाराचा लेखन प्रकार म्हणून कविता हे माध्यम दलित लेखकांना अधिक सहजोपयोगी पडले. भोगलेल्या अन्याय अत्याचाराच्या वेदना, दु:ख अत्यंत संतप्तपणे आपल्या काव्यलेखनातून ते मांडू लागले.

१९६० च्या पूर्वी दलित कविता 'जनता', 'प्रबुध्दभारत' या साप्ताहिकातून व इतर नियतकालिकातून पुढे आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वाङ्मयीन वणवा घेवून आलेली ही कविता प्रचंडप्रमाणात प्रक्षोभक बनली. दलित मुक्तिसंग्रामाचे साधन बनलेल्या या कवितेने जगाला माणूसकीचे तत्त्वज्ञान शिकविले. या कवितेचा उगम दलितांच्या वेदनामय काळजातून झाला. त्यामुळे ''ही कविता म्हणजे रोमॅटिक भावमंथर विश्वास दीर्घकाळ मश्गूल

असलेल्या मध्यवर्ती मराठी कवितेला मिळालेला एक जमालगोटा आहे.''१ हे विचार म्हणजे दलित कवितेचे सामर्थ्य पटवून देणारे आहे. बहुसंख्य दलित कवींनी दलित कविता लिहून तिला जागतिक दर्जा मिळवून दिला. त्यामध्ये नामदेव ढसाळ हे अतिशल महत्वाचे कवी होत. ते आपल्या जिवना विषयक भावना व्यक्त करतांना तत्कालीन समाजाचेही दर्शन घडवितात. जसे,

''अवसेपुनवेला चमत्कार घडावा तसा
एका दिवशी फेकला गेलो महानगरात
आणि त्याच क्षणी सहजसुलभ जगणेच हरवून बसलो
क्रूर दळणवळणाच्या आणि घडपडणाऱ्या यंत्रांच्या
गजबजाटात अपंग झालो
इलेक्ट्रीक टॉवर्स आणि नंतरच्या गल्याबोळातल्या
विजेचा झगझगाट यात हरवून गेलो
कोंडवाड्या मागून कोंडवाडे
तुरूंगामगून तुरूंग.''२

या सत्तेत जीव रमत नाही, पृ. ५०'

ग्रमीन भागातून शहरात गेलेल्या एका तरूणमनाची व्यथा कवीने रेखाटतांना तत्कालीन शहरीकरनात एका तरूणाचे भावजिवन रेखटले आहे. देवाच्या नावाखली नागविणारया व्यवस्थविशयी विद्रोहात्मक विचार मांडतांना ढसाळ म्हणतात की,

'या ईश्वरी नरकात मला अडकून पडायचं नाही
प्रत्येक दिवस मला सोनियाचाच असतो
अमृताचा धनु वर्षी न वर्षो
या समाधीन मला कोडून घ्यायचं नाही
मी तर अजूनही
उदयाच्या भाकरीची चिंता करतो आहे.''३

(चिंता, या सत्तेत जीव रमत नाही, पृ. ४२)

दलित कवितेतील अतिशय महत्वाचे कवी वामन निंबाळकर यांचा गावकुसाबाहेरील कविता हा काव्यसंग्रह दलितांच्या जाणिवा घेवून पुढे आला व वेदना व्यक्त करतांना त्याबरोबर समकालीन वास्तव रेखाअतांना.म्हणतात की,

'' मी जपून ठेवलित गावकुसाबाहेरील डोळयात न मावणारी
ʼफाटलेली अनंत हदय
कानाचे पडदे ʼफाडणारे मायबहिणीचे आक्रोस

मी जपून ठेवलेत आणि त्या चिमण्या बाळाच्या किंकाळया
चिरत गेलेले बापाचे चेहरे''४

गावकुसाबाहेरील कविता

दलित साहित्या ऐवजी आंबेडकरवादी साहित्य असे आग्रह पूर्वकविचार मांडणारे डॉ यशवंत मनोहर यांनीही आपल्या वेदना मांडतांना त्यांच्या कवितेतून समकालीन जिवनाचे दर्शन घडते.

''सुनसान झाले आहे, माणसे दिसत नाहीत;
कासावीस प्राणांसारखा वर्तमान भोवती,
शिरच्छेद केलेले सर्वत्र तडफडते प्रहर;
माणुसकीचे उगम कापीत फिरवाहेत नंग्या करवती;''५

जीवनायन,

ही जाणिव कवी व्यक्त करतात.त्या नंतरचा महत्वाचा कवी म्हनजे दया पवार होय. दया पवार यांनी कोंडवाडा या काव्यसंग्राहामघून समकालीन समाजजिवन व्यक्त केले आहे. कवी म्हणतात की

'' गावगाडयातून सुटलेले ब्रोकनमेन
तोंडापुढे मडकी परठीला बोराटी काठी
विसरला गेलेला इतिहासाचा आरसा
क्षणाक्षणाला त्याच्यापुढे मिरवा
गुलामाना म्हणावं आपल्या पायरीनं वागा''६

कोंडवाडा

त्याकाळातही गुलामीत आणि पायरीने वागण्याची जाणिवकरूण देणारी वर्णांध ब्राम्हणी प्रवत्ती येथे प्रकट झाली आहे .या बरोबरच केशव मेश्राम (उत्खनन)' अर्जुंन डांगळे (छावणी हालते आहे) ज.वि. पवार (नाकेबंदी) ज्योती लांजेवार '(दिशा', 'अजुन वादळ उठले नाही)' प्रज्ञा लोखंडे '(अंतस्थ)' त्र्यंबक सपकाळे '(सुरूंग)' भाऊ पंचभाई '(हुंकार वादळाचे', 'निखाऱ्यांच्या रांगोळ्या)' उषाकिरण आत्राम '(म्होरकी)' लोकनाथ यशवंत '(आता होउन जाउ द्या)' 'भुजंग मेश्राम' '(उलमुलान)' 'केतन पिपळापुरे' (सूर्यकंकण, 'मार्शल रेस') इ. अनेक दलित कवीनी समकालीन वास्तव कवितेमध्ये व्यक्त केले आहे.

भारतीय समाजव्यवस्थेमधील स्थिर चौकटी निर्माण करणारी वर्णव्यवस्था आणि त्या वर्णव्यवस्थेमुळे झालेल्या समाजाचे विषमतापूर्ण विघटन, त्या विघटनामुळे खालच्या जातीच्या लोकांनवर लादलेली गुलामगिरी, याचा परिणाम हजारो वर्षापासून येथील बहुजन स्त्री, अस्पृश्य यांना मूका बनविणारी व्यवस्था, धर्माच्या नावाखाली निर्माण करण्यात आली. त्यांचे

जगनेच मूल्यहिन करण्यात आले. त्यांची प्रतिष्ठा, इज्जत, आकांक्षा विचार इत्यादी बाबींनी धर्म व संस्कृतिच्या दैववादात बंदिस्त केले गेले. अशा मुक्या माणसाच्या मनात युगायुगांची वेदना धुमसत राहीली. ती वेदना त्या त्या काळात कवीनी कवितेतून व्यक्त केली. ती व्यक्त करतांना समकालीन समाजाचे,जीवनाचे, चित्रण आलेले आहे.

## संदर्भ सूची

*१. गो. म. कुलकर्णी, विद्याधर पुंडलिक, दलित साहित्य : सामाजिक सांस्कृतिक*
*२ ढसाळ नामदेव, 'या सत्तेत जीव रमत नाही', अभिजात काम्युनिकेशन्स, अॅन्ड पब्लिकेशन्स, मुंबई, १९९५*
*३. ढसाळ नामदेव, 'या सत्तेत जीव रमत नाही', अभिजात काम्युनिकेशन्स, अॅन्ड पब्लिकेशन्स, मुंबई, १९९५*
*४ मनोहर यशवंत, 'जीवनायन', मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००१*
*५ निंबाळकर वामन :गावकुसाबाहेरील कविता,प्रबोधन प्रकाशन नागपूर,प्र.आ. १९७३*
*६ पवार दया : कोंडवाडा,मेहता पब्लिशिंग हाउस पुण,प्र.आ.१९७४*

***संदर्भग्रंथ***

*१. योगेंद्र मेश्राम, 'दलित साहित्य : उद्गम आणि विकास' योगेंद्र मेश्राम,*
*२. भालचंद्र फडके, 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह*
*३. डॉ. प्रभाकर मांढे, दलित साहित्याचे निराळेपण,*
*४. यशवंत मनोहर ,'समाज आणि साहित्य समीक्षा*

# समकालीन स्त्रीवादी साहित्य प्रवाह

**कु. वैशाली रामचंद्र धापोडकर**
*(एम. ए, (मराठी, इंग्रजी)), बी. एड., (सहयोगी प्राध्यापक) मराठी विभाग*
*सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर, मोबा. क्र. ९०७५९९०३९९*
*Email : dharmikvashali39@gmail.com*

**प्रस्तावना :**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय समाज आणि माणसाच्या मनात राजकीय आकांक्षा वाढल्या. शिक्षण आणि लोकशाहीचा विचार अनेक घटकांपर्यंत पोहोचला, निरनिराळ्या प्रदेशातील लोक खेडी, खेड्यातील दलित, भटके विमुक्त आणि आदिवासी शिक्षणाच्या प्रसारामुळे जागे होऊ लागले. शेतकरी, स्त्रिया आणि कामगार वर्गातही शिक्षणाचे लोन पसरले. शिक्षणाचे लोकशाहीकरण सुरु झाले. 'एक माणूस एक मूल्य' हा विचार सर्वत्र फैलावला पण सामाजिक परिस्थिती मात्र विषम होती. 'समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता आणि स्वाभिमान' हया मानवी मूल्यांची जाण आल्यामुळे राष्ट्र, समाज आणि व्यक्ती यांच्या जीवनात क्रांतिकारक बदल घडू लागला. 'विषम व्यवस्था आणि त्या विरुध्दचे असमाधान' ह्यामुळे समाजमानात वेदना आणि विद्रोहाने पेट घेतला. याचेच वाड:मयीन रुप म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळातील 'वाड:मयप्रवाह' हे होत. या प्रवाहामध्ये 'स्त्रीवादी साहित्य' हा एक महत्वाचा वाड:मय प्रवाह आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय स्त्रीला अनेक घटना प्रसंगातून, संस्था संघटननातून, चळवळी – सत्याग्रहातून आपल्या नव्या रुपाची जाणीव होऊ लागली. प्रसारमाध्यमांनी स्त्रीच्या पारंपारिक रुपाची मोडतोड केली. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला ठळक प्रसिध्दी मिळू लागली. स्त्रियांच्या हक्क संरक्षणासाठी अनेक कायदे निर्माण झाले. यामुळे स्त्रियांच्या मानसिकतेत बदल होऊ लागला. एकतर्फी प्रेमातुन होणाऱ्या हत्या पाहून समाजमन हादरुन गेले. विवाहीत स्त्रियांना जाळून मारणाऱ्या घटना, सामूहिक बलात्काराची प्रकरणे, स्त्रियांची वेश्या व्यवसायासाठी होणारी विक्री, स्त्रियांच्या वाढत्या आत्महत्या यामुळे स्त्रियांचे प्रश्न ऐरणीवर आले. अनेक स्त्री संघटनांनी स्त्रियांच्या प्रश्नावर आंदोलन करुन लोकमत जागृत केले. यातुनच आपल्या देशातील 'स्त्रीवाद' जन्मास आला.

**स्त्रीवाद म्हणजे काय?**

'स्त्रीवाद' हा इ. स. १९६० नंतरच्या दशकांत वेगाने पुढे आलेली विचार प्रणाली आहे. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रियांना मिळालेल्या दुयम स्थानाचा प्रतिवाद करणे आणि सामाजिक, राजकिय व आर्थिक सत्तास्थानात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त होण्यासाठी डावपेच आखणे हे स्त्रीवादी चळवळीचे स्वरुप आहे. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेने स्त्रीला कधी देवता बनवून तिचे मनुष्यत्व नाकारले; तर कधी तिला शोभची बाहुली म्हणून किंवा मदनाची पुतळी म्हणून, तर कधी एक भोगवस्तू म्हणून पाहिले. कधी तिला दासी, कुल्टा, व्यभिचारिणी म्हणून हीन लेखले किंवा एक डोके नसलेली विचारहीन गृहिणी एवढेच तिला मर्यादित स्थान दिले. स्त्रीची ही गतानुगतिक अशी सनातन प्रतिमा पुसून टाकणे ह स्त्रीवादी चळवळीपुढील एक मोठे आव्हान राहिले. पुरुषाला समाज रचनेत जसे एक अर्थपूर्ण स्थान आहे, तसे स्त्रीलाही प्राप्त व्हावे यासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रात संघर्षशील राहणारी 'स्त्रीवाद' ही एक विचारप्रणाली आहे.

स्त्रीवाद म्हणजे काय? याविषयी नागनाथ कोतापल्ले लिहितात, "स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे. तिला आपल्या व्यक्तिमत्वाचा अर्थ कळणे. तिला तिच्या अस्मितेचा सार्थ अभिमान वाटणे. तिला तिच्या माणूसपणाबद्दल आत्मियता वाटणे. तिला तिचे हक्क, अधिकार कळणे, तिला तिच्या अवमूल्यनाची आणि शोषणाची जाणीव होणे. तिने आपल्या दडपल्या जाणाऱ्या स्वत्वासाठी संघर्षप्रवण होणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीने 'बाईपणाची' कात टाकून 'माणूसपणाचे' नवे रुप धारण करणे म्हणजेच स्त्रीवाद होय.

मंगला वरखेडे लिहितात, "The Female is female by virtue of a certain lack of qualities" या ॲरिस्टॉटल पासून चालत आलेल्या अभावमूलक, विचारसणीला नकार देणे, स्त्री ही 'अपूर्ण मानव' असल्याची समजूत नष्ट करणे आणि स्त्रीविषयक नवीन मानदंड निर्माण करण्यासाठी व्यूह रचणे ही स्त्रीवादी चळवळीची थोडक्यात भूमिका सांगता येईल. समाजकारण, अर्थकारण, राजकारण, कला व वाङ:मय प्रकार या सर्व क्षेत्रात स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुय्यम स्थान नाकारुन माणूसपणाचा क्षमताधिष्ठित हक्क प्राप्त करण्यासाठी केलेली राजकीय चळवळ हे 'स्त्रीवादी' चे सर्वसाधारण स्वरुप आहे. वरील विवेचनातून आपल्याला असे म्हणता येते की, स्त्रीवादी विचाराला 'स्त्री' ची अपूर्ण मानव ही प्रतिमा पुसून टाकायची आहे. समानतेच्या तत्वाने स्त्रीविषयक नवीन मानदंड विकसित करण्यासाठी स्त्रीवादी विचार निर्माण झाला आहे. मंगला वरखडे स्त्रीवादाला एक राजकीय चळवळीचे अपत्य मानतात.

अश्विनी धोंगडे, स्त्रीवादाविषयी आपली भूमिका मांडतांना म्हणतात. "स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून फारकत घेऊन स्वत:चा सवतासुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारुन तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करुन दिली,

त्यातुन बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करुन घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे. ज्यावेळी स्त्री ही खुलेपणाने श्वास घेऊन पुरुषांइतकेच स्वतंत्र जीवन जगू शकेल, त्यावेळी स्त्री वादाची गरज भासणार नाही, परंपरेची पुटे स्त्री पुरुषावर इतकी घट्ट बसली आहेत, की हा लढा जिंकण्यासाठी हजारो वर्षे जावी लागतील आणि कदाचित त्यावेळी स्त्री पुरुष दोघांनाही मानवतावादासाठी लढावे लागेल."

**स्त्रीवादी मराठी साहित्य :**

मराठी साहित्यात साधारणत: १९६० नंतरच्या दशकांत स्त्रीवादी साहित्य जाणीपूर्वक लिहिले जाऊ लागले. आणि सत्तर—ऐंशीच्या व नंतरच्या दशकांतही स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह काव्य, कथा, कादंबरी, आत्मकथा अशा प्रकारांत जोमाने विकसित होऊ लागला. मात्र तत्पूर्वीही स्त्रीकेंद्री साहित्याची निर्मिती अगदी प्राचीन काळापासून मौखिक व लिखित स्वरुपात होत होती. असे दिसून येते.

महाराष्ट्रातील महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई इत्यादींनी तसेच एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक इ. लेखिकांनी ललित व वैचारिक पातळीवर स्त्री पुरुष विषमतेचे, पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेचे तसेच स्त्रियांवरील अन्याय, जुलूम, शोषण व त्यातून स्त्रियांना भोगावी लागणारी दु:खे, वेदना यांचे प्रभावी चित्रण केले.

एकोणविसाव्या शतकाच्या अखेरीस ताराबाई शिंदे यांनी 'स्त्रीपुरुषतुलना' या ग्रंथात पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रियांच्या होत असलेल्या शोषणाविरुध्द लिहून, स्त्रीशोषणाचे विश्लेषण करणारी सैध्दांतिक मांडणी केली. मालतीबाई बेडेकर म्हणजेच विभावरी शिरुरकर यांच्या लिखाणातही (हिंदोळ्यावर, १९३४ कादंबरी) पुरुषाकडून स्त्रीच्या शारीरिक व मानसिक पातळीवर होत असलेल्या शोषणाची जाणीव व्यक्त झाली आहे. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'भरली घागर' कवितेत स्त्री पुरुष भेदावर भाष्य आहे. तर स्मृतिचित्रे मध्ये विनोदाच्या, उपरोधाच्या अंगाने स्त्री पुरुषा विषमतेचे वित्रण आहे. व्हर्जिनिया वुल्फचा सिध्दांत स्त्रियांनी उपरोध, विनोद ही शस्त्रे वापरुन आपल्या व्यथा, शोषण अन्याय यांना वाचा फोडावी इथे मराठीत प्रत्यक्षात आला आहे.

विसाव्या शतकातील आधुनिक स्त्रीवादी साहित्यात कमल देसाई, गौरी देशपांडे, कविता महाजन, प्रिया तेंडूलकर, सानिया (सुनंदा कुलकर्णी), मेघना पेठे, नीरजा यांच्या कथा कादंबऱ्यांनी मोलाची भर घातली आहे. कमल देसाईंच्या 'काळासूर्य आणि हॅट घालणारी बाई' (१९७५) या कादंबरीत प्राचीन मिथ्यकथांना नवे स्त्रीवादी अर्थ दिले आहेत.

साठोत्तरी कालखंडात १९७० — ८० च्या दशकांत व नंतरच्या काळातही काव्यनिर्मिती करणाऱ्या अनेक कवयित्रींनी काव्याचे दालन समृध्द केले आहे. त्यातील प्रमुख कवयित्री अशा : अनुराधा पाटील, रजनी परुळेकर, मलिका अमरशेख, प्रभा गणोरकर, अरुणा ढेरे, नीरजा,

प्रज्ञा लोखंडे, आसावरी काकडे, सिसिलिया कार्व्हालो इत्यादी. स्त्रीत्वाचे, स्त्रीवादी जाणिवेचे स्त्रीच्या विशिष्ट अनुभवविश्वाचे वेगवेगळ्या पातळ्यांवरचे, भिन्न भिन्न स्वरुपाचे चित्रण त्यांच्या कवितांत आढळते. १९८० — ९० च्या दशकांत स्त्रीवादी जाणिवेच्या काव्याचा प्रवाह लक्षणीय होता. स्त्रीकेंद्री काव्यलेखनाचे प्रमाण उत्तरोत्तर वाढतच गेले.

स्त्रियांच्या आत्मकथनांनी स्त्रीवादी साहित्यात मोलाची भर घातली आहे. उदा. सुनीता देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी' (१९९०), कमल पाध्ये यांचे 'बंध अनुबंध' ही आत्मकथने उल्लेखनीय आहेत. दलित स्त्रियांची आत्मकथने ही स्त्रीवादी साहित्यातील एक महत्वाचा दस्तावेज आहे. बेबी कांबळे (जिणं आमुचं), कुमुद पावडे (अंतस्फोट), शांताबई कांबळे (माझ्या जल्माची चित्तरकथा), मुक्ता सर्वगोड (मिटलेली कवाडे), उर्मिला पवार (आयदान), सिंधुताई सपकाळ (मी वनवासी) इत्यादींचे स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भात महत्वाचे योगदान आहे. नीरजा ह्या अलीकडच्या स्त्रीवादी साहित्यप्रवाहातील एक प्रमुख व महत्वाच्या कवयित्री व कथाकार ('ओली हरवलेली माती' — कथासंग्रह) असून, स्त्रीवादी जाणिवांचे विविध पैलू त्यांनी वास्तववादी, चिंतनशील पध्दतीने व्यक्त केले आहेत. भारतीय व समाजशास्त्रीय अशा दुहेरी स्त्रीवादी भूमिकांतून त्यांचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे.

**स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह:**

साहित्य आणि समाजाच्या अन्योन्यसंबंध असतो. कोणत्याही साहित्यावर त्या त्या काळातील समाज व संस्कृतीची छाया पडलेली असते. त्याचबरोबर एखाद्या प्रवाहाच्या निर्मितीला पोषक अशा सांस्कृतिक पर्यावरणाची बैठक असते कोणताही प्रवाह हा प्रारंभी बंडखोर नसतो; परंतु त्याची पाळे मुळे समाजाच्या वैचारिक भूमिकेवर योग्य मार्गाने विरोध करुन नवी मांडणी करणारी असतील तर ती मांडणी समाजपरिवर्तनाला दिशा देणारी ठरते. या भूमिकेतून स्त्रीवादी साहित्यप्रवाहाचा विचार खालील प्रमाणे करता येईल.

साठोत्तर काळात स्त्रीवादी साहित्य प्रवाहाचा उदय झाला. १९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला दिन सगळीकडे महिला वर्ष म्हणून साजरा करण्यात आला, तेव्हा पासून स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन जाणीवपूर्वक निर्माण केला जाऊ लागला. मंगला वरखेडे यांच्या मते, "मानवी संबंध व्यवस्थेचा मुळापासून वेध घेणारी स्त्रीवाद ही एक राजकीय विचारप्रणाली आहे. नव समाजनिर्मितीसाठी शोषणाची कारणे शोधणे आणि स्त्री अस्मितेचा पुरस्कार करणाऱ्या नव्या पर्यायाची मांडणी करणे हे स्त्रीवादाचे स्वरुप आहे. मात्र ही विचारप्रणाली एक—रेषीय नाही. अनेक विचार प्रवाहांना सामावून घेणाऱ्या विविध आंतरवर्तुळाचे ते एक वृहदवर्तुळ आहे. स्पर्धेपेक्षा सहकार्यावर भर देणाऱ्या मवाळ स्त्रीवादापासून (Victim Feminism) पुरुषसत्तेचा पाया उखडून टाकण्याची भाषा करणाऱ्या जहाल स्त्रीशक्तीवादापर्यंत (Power Feminism) अनेक भूमिकांचा या वृहदवर्तुळात समावेश होतो. या स्त्रीवादी चळवळीने वेग घेतल्याने स्त्री प्रश्नांच्या

मंथनाला सुरुवात झाली. पुरुषसत्तेने मुख्यतः शरीरविज्ञान, अनुभव, संभाषिते, अबोधमन, सामाजिक आणि आर्थिक स्थिती या घटकाच्या माध्यमातून स्त्रीला कमकुवत मानले होते. त्यातील असणारी उणीव या प्रवाहाने दाखवून दिली. एवढेच नसून आपली भाषदेखील पुरुष वर्चस्ववादी दृष्टिकोनाचाच परिपाक आहे. याचा मुळापासून पुनरर्विचार करणे गरजेचे आहे, हे या स्त्रीवादी प्रवाहाने व्यक्त केले.

स्त्रीवादी प्रवाहाच्या सत्ता, शरीर, समाजशास्त्रीय व सांस्कृतिक अशा विविध अंगाने विचार करण्याचा प्रयत्न पाश्चात्य स्त्रीवादी प्रवाहाने केला आहे. या पाश्चात्य स्त्रीवादाचा प्रभाव भारतीय स्त्रीवादावर पडला असला; तरी हा स्त्रीवाद आपापल्या राज्यातील विभिन्न प्रश्न घेऊन कार्यरत असल्याने त्याच्या तुलनेत वेगळा आहे. धर्म, संस्कृती—दर्शन, पुरुषसत्ताक समाज व्यवस्था, कुटुंबसंस्था या पातळ्यावर कमी लेखले जात होते. भारतीय समाजवर धर्म आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेचे प्राबल्य असल्याने सर्वसामान्यांना शक्य नव्हते. परंतु महाराष्ट्रातल्या समाजसुधारकांनी हे आव्हान स्वीकारले आहे आणि महाराष्ट्रातील स्त्रीला माणूस म्हणून अधिकार मिळावा यासाठी अविरतपणे प्रयत्न केले जाऊ लागले. त्यात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा अग्रक्रम राहिला आहे. महाराष्ट्रात वेगवेगळे प्रश्न घेऊन अनेक स्त्रीवादी संघटना कार्यरत झाल्या. वेगवेगळ्या नियतकालिक, पाक्षिक, मासिकामधून वैचारिक लेखन होऊ लागले. स्त्रीचळवळीतील काही महत्वाच्या घटना खालील प्रमाणे पाहता येतील. स्त्रीमुक्ती संघर्ष परिषद (१९७५) स्थापन झाली. 'मुलगी झाली हो' या नाटकाचे महाराष्ट्रभर प्रयोग झाले. १९७९ साली 'वायजा' च्या पुढाकाराने 'स्त्रीमुक्ती आंदोलन' समितीची स्थापना झाली.

'महिला आंदोलन पत्रिका', 'वायजा', 'स्त्री उवाच' आणि 'मिळून साऱ्याजणी' इ. नियतकालिकांच्या माध्यमातून स्त्री समस्यांची वैचारिक भूमिका मांडली जाऊ लागली. या मांडणीतून स्त्री पुरुष संवेदनशील पिंडाच्या स्वत्वशील लिखाणातून या प्रश्नांची मांडणी करण्यात आली आहे. या मांडणीत स्त्री पुरुष नात्याचे वेगवेगळे पैलू समोर आले.

दलित साहित्य प्रवाहाप्रमाणे या प्रवाहाने संस्कृतीच्या माध्यमातून होणाऱ्या पिळवणूक व्यवस्थेकडे व संस्कृतीच्या आतील वास्तवाकडे सर्वांचे लक्ष केंद्रित केले. या प्रवाहामुळेच संस्कृतीची फेरमांडणी होण्यास सुरुवात झाली. हे या प्रवाहाचे महत्वाचे योगदान म्हणता येईल. या मांडणीचा विचार प्रत्यक्ष कलाकृतीच्या माध्यमातून पाहता येईल. गौरी देशपांडे यांच्या 'आहे हे असे' ही कथा, 'मध्य लटपटीत', 'एक एक पान गळावया' 'मुक्काम', 'गोफ', या कादंबऱ्या, सानिया यांच्या 'दिशा घराच्या', 'ओळख', 'वलय', 'परिमाण', 'शोध' 'प्रतिती' या कथा व आंवर्तन, 'स्थलांतर' या कादंबऱ्या, छाया दातार यांच्या 'गोष्ट साधी सरळ, सोपी', स्वतःला शोधतांना, वर्तुळाचा अंत, या कथा, प्रिया तेंडूलकर यांच्या 'ज्याच्या त्याचा प्रश्न',

'असंही', 'जन्मलेल्या प्रत्येकाला', 'जावे तिच्या वंशा' या कथा व 'पंचतारांकित' हे आत्मकथन, उर्मिला पवार यांच्या 'चौथी भिंत' 'सहावं बोट' या कथा मेघना पेठे यांच्या 'हंस अकेला', 'आंधळयाच्या गायी' या कथा आशा बगे यांच्या 'झुंबर', 'सेतू', 'त्रिदल' या कादंबऱ्या, अंबिका सरकार यांची 'विवर्त' 'व्यतीत' हा कविता संग्रह, मलिका अमरशेख यांचे 'वाळूचा प्रियकर' 'महानगर', हे कवितासंग्रह व 'मला उद्‌ध्वस्त व्हायचयं' हे आत्मकथन, प्रज्ञा लोखंडे यांचे अंतस्थ, 'उत्कट', 'जीवघेण्या धगीवर' या कथा , अनुराधा पाटील यांचे 'तरीही', 'दिवसेंदिवस' हे कथासंग्रह नीरजा यांची 'वेणा' ही कथा, ज्योती लांजेवार यांची 'दिशा' ही कथा, शैला सायनकर यांच्या 'रक्त कमळाचे रान' हा कथासंग्रह, सुमती लांडे यांची 'कमळकाचा' ही कादंबरी या लेखनाने महाराष्ट्रातील समाजवास्तव ढवळून निघाल्याचे दिसते.

**स्त्रीवादी विचारांची वैशिष्ट्ये :**

१) **पुरुप्रधान समाजव्यवस्थेला विरोध :**

- पुरुषांचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. पुरुषाचे स्त्रियांवरील वर्चस्व, सत्ता नष्ट झाली पाहिजे.
- स्त्रियांच्या श्रमशक्तीवर पुरुषाचा जो ताबा असतो तो नष्ट झाला पाहिजे.
- खाजगी सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रात पुरुषप्रधान संस्कृतीने स्वत:च्या हितसंबंधाचा विचार करुन निर्माण केलेले जे सामाजिक संकेत आहे, ते बदलले पाहिजेत व त्या संकेताची स्त्रीवादी मूल्यानुसार नवी बांधणी करणे.
- पुरुषांमध्ये सहिष्णुता हा गुणधर्म असावा.

२) **लैंगिकतेवर आधारित श्रमविभागणीचे घटक :**

- पुरुषांनी स्वत:च्या स्वार्थाचा विचार करुन जी श्रमविभागणी केली ती नष्ट झाली पाहिजे.
- स्त्री कामगारंना अकुशल कामगार म्हणून कमी वेतन मिळते, पुरुष कामगारांप्रमाणे स्त्री कामगारांना सर्व सुविधा मिळाव्यात, तांत्रिक ठिकाणी स्त्रियांना काम मिळावे.

३) **लिंग आणि लिंगभाव :**

- स्त्री पुरुषांमध्ये लैगिकतेचा आधार घेऊन जी विषमता निर्माण झाली तीच नष्ट झाली पाहिजे, अशाी स्त्रियांची मागणी आहे.

४) **स्त्रीमुक्तीवाद :**

- स्त्री पुरुष भेद घडवून आणणारे संस्कार प्रक्रिया नष्ट होऊन समानता घडविणारे संस्कार मुला मुलींवर व्हावेत ही स्त्रियाची मागणी आहे.
- लैंगिकतेमुळे निर्माण होणारे स्त्रियांचे प्रश्न सोडविले पाहिजे अशी स्त्रीयांची मागणी आहे.

- ❖ स्त्रीविषयक कायद्यामध्ये सुधारणा व्हावी. उदा. गर्भपात, वारसाहक्क, घटस्फोट, स्त्रियाच्या पुनर्वसनाचा कायदा
- ❖ स्त्रियांना मानव म्हणून जीवन जगण्याचा हकक मिळावा.

अशाप्रकारे “स्त्रीवादी विचार हा स्त्रियाच्या मागण्यांशी वरील सर्व वैशिष्ट्याशी निगडीत आहे. असे विद्युत भागवत यानी नोंदविले आहे.”

**संदर्भग्रंथ**


*१) धोंगडे, अश्विनी : 'स्त्रीवादी समिक्षा : स्वरुप आणि उपयोजन' दिलीप राजे प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, १९९३, पृ. ६*

*२) वरखेडे मंगला, 'स्त्रीवादी समीक्षाः संकल्पना व उपयोजन', का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, प्रथमावृत्ती १९९९*

*३) कोतापल्ले नागनाथ आणि इतर, 'ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य,' यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन, २००१*

*४) भागवत, विद्युत, 'स्त्रीजन्माची वाटचाल', पुणे, २००४*

*५) भागवत, वंदना, सपकाळ अनिल, गीताली वि. म. 'संदर्भासंहित स्त्रीवाद' स्त्रीवादाचे समकालीन चर्चाविश्व, शब्द पब्लिकेशन्स*

*६) भागवत विद्युत, 'स्त्री प्रश्नाची वाटचाल', प्रतिमा प्रकाशन, पुणे ८मार्च २००७*

*७) डॉ. घोणसे श्यामा, 'भुमिका' 'मिळून साऱ्या जणी', महिलादिन विशेषांक, मार्च २००३.*

# समकालीन आदिवासी कविता

**प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर**
*(मराठी विभाग), डॉ. सौ. इं. भा.पाठक महिला कला महाविद्यालय औरंगाबाद मो.क्र.9975634944*
*Email ID-premala.mukhedkar@gmail.com.*

**प्रास्ताविक :**

पृथ्वीतलावरील आद्य निवासी म्हणून ज्या मानवी संस्कृतीकडे पाहिले जाते त्या मानवी संस्कृतीला कालांतराने 'आदिम' मुळ निवासी' किंवा आदिवासी असे संबोधण्यात येऊ लागले. हा समाज खऱ्या अर्थाने निसर्गाच्या सान्निध्यात जीवन जगणारा समाज आहे. समूहभावना, समूहप्रेम, समूहनिष्ठा असे अनेक सम्यकतत्व जोपासणारा समाजगट म्हणून ही आदिवासींकडे पाहिले जाते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने जे काही प्रयत्न झाले. त्यापैकी 'शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण' हे एक महत्वाचे प्रयत्न होते. शिक्षणामुळे सर्वसामान्य माणसाला जगण्याचे भान येते. त्याबरोबरच अवतीभोवतीच्या जगाचे नीटपणे आकलन होते. आदिवासी जनसमुदायां पर्यंत शिक्षण थोडया उशिराने पोहचले आदिम काळापासून सर्वार्थाने वंचित राहिलेला माणूस जागा झाला. नवशिक्षित आदिवासी तरुणांची संख्या स्वातंत्र्योत्तर काळात निश्चितच वाढली. दिर्घकाळापासून निमूटपणे सहन केलेल्या पूर्वजांचे संघर्षमय जीवन त्यांना आठवू लागले. आपल्या जिंदगीचे गाणे जमेल तसे आपण गावे. आपल्या जखमांना आपणच हिंमतीने धुऊन काढावे आणि आपल्या मुक्तीचा मार्ग आपणच शोधावा या भावनेने ते बोलू लिहू लागले. त्यातून आदिवासी साहित्याची निर्मिती झाली.

**आदिवासी कविता :**

आदिवासी आणि काव्य यांचा संबंध फार जवळचा आहे. आदिवासी सर्वात प्रथम बोलला तो काव्यातून जीवनात येणाऱ्या विविध प्रसंगांना धैर्याने तोंड देतांनाच त्यांच्या तोंडून काव्यही तेवढयाच सहजतेने बाहेर पडले. प्रसंगानुरुप कार्व्यनिर्मिती करणारा आदिवासी केवळ रचिताच नाही तर तो गायक आणि नर्तकही आहे. गाणे, वाजविणे आणि नाचणे हे तर त्यांच्या रक्तातच भिनले आहे.

साठोत्तर कालखंडात अनेक साहित्यप्रवाह उद्ययाला आले. या परिर्वतनवादी साहित्याला मानवतावादी, वास्तववादी मूल्ये प्राप्त झाली. समाजाला नवा दृष्टीकोन मिळाला. नवसाहित्याकडे आस्थेवाईकपणे पाहिले जाऊ लागले. मानवी जीवन व त्याच्या विविध प्रश्नांच्या संदर्भाने लिहिले जाऊ लागले. समकालीन वास्तवाला केंद्रित ठेवून साहित्यनिर्मिती होऊ लागली. तळागाळातल्या समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उमटू लागले. वंचित समाजासाठी साहित्य हे विकासाचे मार्ग ठरु लागले. बहुजनांच्या उत्थानाचे साहित्य हे शस्त्र ठरु लागले. 21 व्या शतकातही जगभरातील आदिवासींची वाताहत अजूनही थांबली नाही. विकासाच्या नावाखाली त्यांचे विस्थापन केले जात आहे. जल, जमीन आणि जंगलापासून त्यांना दूर लोटले जात आहे. त्यांनी विरोध दर्शविला तर चोर, गुन्हेगार किंवा नक्षलवादी घोषित करुन त्यांना ठार केले जाते. अशा आदिवासींच्या दु:ख वेदनांचे, विद्रोह- चिंतनाचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत उमटू लागले आहे.

आरक्षणाचा मुद्दा आज सगळीकडे चर्चेचा विषय झाला आहे. घटनेने आदिवासींना आरक्षण दिले परंतु संरक्षण काही मिळाले नाही. त्यामुळे काही आरक्षणविरोधी लोकांना कवी कृष्णकुमार चांदेकर म्हणतात.

अजूनही माझी माय घरात नागवी राहून
लेकीला घराबाहेर पाठविते अथवा
लेकीला नागवी ठेवून माय घराबाहेर निघते
आणि त्यांच्या दिवसातून दहा साडया फेडणाऱ्या माय-लेकी
एकाच वेळी सिनेमात जाऊन बरतात.
तरी भडवे म्हणतात, यांना 'आरक्षणा'ची गरज काय ?

देशाला स्वातंत्र्य मिळून आज सात दशक झाली तरी आजही आदिवासी जीवन अतिशय कष्टाचे आणि दारिद्र्याचे आहे. कपडे नसल्यामुळे आदिवासी स्त्रियांना घराबाहेर पडणेही शक्य होत नाही हे वास्तव कवी सांगतो.

आदिवासींकडे पर्यटकांची बघण्याची दृष्टी ही अदभूतरम्यतेची असलेली दिसते. आदिवासींची नग्नता कुतूहलपूर्वक पाहायला जाणारे पर्यटकही आहेत. भारतातील काही आदिवासी जमातीत युवा केंद्रे म्हणजेच 'गोटूल' आढळतात. या युवाकेंद्रात विवाहासाठी जोडीदार निवडण्याचे तसेच लैंगिक शिक्षणाचे वस्तुपाठ देणारी ही संस्कार केंद्रे आहेत. मात्र काही आदिवासी संस्कृतीच्या अभ्यासकांनी या सांस्कृतिक केंद्राला व्यभिचाराने व स्वैराचाराचे केंद्र म्हणून बदनाम केले आहे. त्यामुळे स्वत:ला पुढारले आणि सुसंस्कृत समजणाऱ्यांवर कवयित्री कुसुम आलाम यांनी हल्ला करुन, अशा व्यवस्थेला आपल्या कवितेतून थेट प्रश्न केला आहे.

'तुम्ही भडवेगिरी केली
बलात्कार,छेडछाड केली
कुंठणखाणे चालविले
तरी तुमचे फावते
आम्ही मात्र ..... चांदण्यांना साक्षीला ठेवून

जीवनसाथी निवडण्यास गोटूलमध्ये येतो त्यावेळी तुमही म्हणता गोटूला म्हणजे काय हो ? व्यभिचाराचे, स्वैराचाराचे केंद्र का ? तो भडवेगिरी कधी करणार नाही. हवे तर हजारो वर्षांचा इतिहास उलटून पालटून पहा जरा.'

जेष्ठ साहित्यिक आणि समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस, कवयित्री कुसुम आलामांच्या कवितेबद्दल म्हणतात. " एक सुंदर युगासाठी आलामांची कविता व्यापक आशयसूत्रांना घेऊन येते. अन्याय करणाऱ्या विरुध्द युध्द अटळ असल्याची जाणीवही कविता ठामपणे व्यक्त करते. त्यासाठी गोंड, माडिया, परधान, थोटी हया आदिवासींमधील जमातीच्या उतरंडी मोडण्याची गरजही कविता प्रतिपादन करते. आदिवसींची छाती मर्दानी असूनही त्यावर प्रस्थापितांचे प्रहार चालूच असून त्यांना थांबविण्यासाठी आपले सारे प्रवाह एक झाले

पाहिजे. असा एकात्मभाव व्यक्त होतो. सुंदर युगाच्या स्वप्नांचे डोहाळे लागलेली ही कविता चिंतनात्मक दृष्टया विलोभनीय आहे.

आदिवासी आजही वस्तीपासून आणि सामाजिक विकासापासून खूप दूर आहे. दिवसभर रानावनात हिंडून उपजिविकेसाठी डिंक, मध, मोळी तो गोळा करतो. तो अतिशय कष्टाने जगतो, तरीही दारिद्रय कायम त्यांच्या पाचवीला पुजलेले आहे. अशा आदिवासींबद्दल उषाकिरण आत्राम लिहितात."

तो भटकतो उन्हापावसात
काटया झुडपातून- दरी गुहेतून
जगापासून दूर- जगाच्या कडेला
डोंगराच्या आडोशाला
वल्कलाने अबू झाकून
चिरुटाचा झुरका देत
तीर कामठा गुल्याल घेऊन
झाडीतून पानापानातून –रोखून नजर
शोधित इर्षेनं पाखरं –जगापासून दूर

व्यापक सामाजिक भान आल्यामुळे आदिवासी काहीसा अस्वस्थ झाला आहे. सभोवतालच्या वास्तवाचे उघडेनागडे रुप त्याला राग,उदवेग आणणारे आहे. स्वसमाजावरील अन्याय, अत्याचार यामुळे व्यवस्थेवरील त्याचा विश्वास उडालेला आहे. शोषण, विषमता, जातीयता, धर्मांधता, सांप्रदायिकता यांचा त्याला वीट आलेला आहे. आदिवासींच्या विकट-विक्राळ समस्याबरोबरच, समकालिन समदु:खी समाजाचे वास्तव तो अतिशय प्रखरतेने मांडतो. आदिवासी संस्कृतीवर आरोप करणाऱ्यांना कवयित्री कुसुम अलाम आपल्या 'संस्कृती' या कवितेतून म्हणतात.'

मित्रा ठणकावून सांग त्यांना
जंगलात फिरलो आम्ही अर्धनग्न
कॅमेऱ्यापुढे विवस्त्र झाल्याच नाहीत आमच्या मायबहिणी
आणि कुंठणखाणेही चालविले नाहीत.

स्वातंत्र्याच्या सात दशकानंतरही आदिवासी स्त्रियांचे होणारे शोषण सांगतांना माधव सरकुंडे 'मनोगत' मध्ये म्हणतात'.

भामरगडातल्या अर्धनग्न माडीया बाया बघितल्या
की,स्वातंत्र्य म्हणजे अश्लील चेष्टाच वाटते मला

कुसुम आलाम आपल्या कवितेत सांगतात की, कपटाने एकलव्याचा अंगठाच गुरुदक्षिणा म्हणून घेतला आणि हया पृथ्वीतलावर पहिला भ्रष्टाचार आणि अंगठा कापणीचा फ्रॉड घडवून आणला. आदिवासींचा इतिहास पाहता त्यांच्यावर होणारा अन्याय किती पुरातन आहे हे लक्षात येते.

एकलव्याचा कोणता अपराध होता
की त्याचा अंगठा हिसकावून
भ्रष्टाचाराची सुरुवात करावी गुरुने?

आदिवासींच्या अगणित दु:खांचा दाखला देतांना कवी दशरथ मडावी सांगतात, दमडू आत्राम आपल्या कुटूंबासाठी, पोटासाठी कष्ट करताना, एका रात्री मोहासाठी जागताना त्याला साप चावतो. तोंडाला फेस येऊन दगडू मरतो. त्याला योग्य उपचार मिळत नाही.

जडी-बुटी सारा उपाय केला
पण माझ्या डोळया देखत दगडू तफफडत मेला.

आदिवासी स्त्रियांचे जीवन किती कष्टाचे आहे हे सांगतांना प्रब्रम्हानंद मडावी लिहितात.

माय,सांज-सकाळ रानकुसात
मोह-फुलांचा शोध घेत
जंगलजिव्हाऱ्यांशी नातं सांगत
अनवाणी पायांनी वणवण करत
असंख्य वाटा तुडवतेय

आदिवासींचे आयुष्य जंगलापासून सुरु होते आणि जंगलातच संपते. जीवनात आयुष्याचे वर्तुळ या कवितेत माधन सरकुंडे जंगलाचे असलेले महत्व.

माझा भाता बंद होताच
मला डोंगराच्या अंगणात नेऊन ठेवा
माझ्या आयुष्याचे वर्तुळ तिथेच होणार आहे पूर्ण

मोळी विकून कुटूंब पोसणारा आदिवासी कवडी किंमतीत जीवन वेचतो. अनेक यक्ष प्रश्न उशाला घेऊन झोपतो. तरीही स्वाभिमानी आहे. इमानी आहे. उपाशी राहूनही तो कधी कुणाच्या दारात जाऊन भीक मागत नाही. आपली कला आणि संस्कृती जपत राहतो. अमित गिरडकर यांनी आदिवासी कलावंतांच मन आपल्या कवितेतून मांडलेले आहे.

अचानक विषय निघाला कधी तरी
वारल्यांच्या चौक चित्रांचा
सांगून टाकलं माझं
आदिम संस्कृतीशी नातं
तू स्वत:ला तेंव्हा
पांढरा रंग फासून
या शुभ्र गर्दीत मिसळून गेलीस !

आजच्या राजकारणात सत्ता, ताकद असली की, दिल्लीवर तो राज्य करतो हे वास्तव सांगतांना प्रभू राजगडकर म्हणतात.'

दिल्ली, मला मान्य थोरवी तुझी
तू-यज्ञाचा घोडा जसा
जो आवडेल तो मालक तुझा

आदिवासी कवितेबद्दल बोलतांना डॉ.विनायक तुकाराम म्हणतात. "आदिवासी कविता म्हणजे आदिवासी साहित्याच्या गडाची पहिली पायरी आहे. आदिवासी कविता ही साहित्य सृष्टीचे नक्षीदार, कोरीव व भरभक्कम महाद्वार होय. आदिवासी साहित्याची अस्तित्व नोंदच मुळी कवितेने झालेली आहे.ती कविता म्हणजे अस्तित्व आणि अस्मिता हयांच्या रक्षणार्थ, सुविद्य, सुजाण व सजग आदिवासी मानसिकतेचे उभारलेल्या शब्दांचे शस्त्रागार आहे." यावरुन आदिवासी कविता ही व्यक्त होण्याचे किती प्रभावी माध्यम आहे हे लक्षात येते.

**समारोप :**

एकूणच आदिवासी कविता ही समग्र आदिवासींचे भावजीवन मांडत आहे. क्रांतिकारी कवी भुजंग मेश्राम यांच्या पासून ते आजच्या पिढीतील नवोदित कवीपर्यंत अनेक कवींनी आदिवासींचे दु:ख, दैन्य, दारिद्रय, अन्याय, संस्कृतीचा होत असलेला ऱ्हास, त्यांच्या श्रमाला दिलेला कमीपण, भ्रष्टाचार, राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यामुळे कायम अन्याय सहन करणाऱ्या आदिवासींचे वास्तव चित्रण आदिवासी कवितेतून समर्थपणे मांडले आहे. त्या बरोबरच आदिवासी संस्कृती त्यांची सामाजिक आणि सांस्कृतिक व्यापकता आदिवासी कवितेतून व्यक्त होतांना दिसते.

**संदर्भ ग्रंथ :**


- *तुकाराम विनायक : आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन, स्वरुप प्रकाशन,औरंगाबाद प्र.आ.2012.*
- *रोंगटे तुकाराम : आदिवासी साहित्य चिंतन आणि चिकित्सा, दिलीपराज प्रकाशन पुणे, प्र.आ.2014.*
- *मेश्राम भुजंग, संपा-प्रफुल्ल शिल्लेदार : लोक वाङमय गृह, मुंबई प्र.आ.2014.*
- *जाधव मा. मा. संपा : अक्षर गाथा, त्रैमासिक, जुलै ते सप्टेंबर 2018, नांदेड.*

## मराठीतील समकालीन दलित साहित्य प्रवाह

**संशोधक — तुळशिराम शंकर कांबळे**

*संशोधन केंद्र — श्री शांतारामजी पोटदूखे महा. चंद्रपूर जि. चंद्रपूर*

*मो. क्र. ९४२३६६७२५०, ८३२९२३७७६२*

*Email ID – tulshiram.kamble@gmail.com*

१९६० नंतर दलित साहित्याला मराठी साहित्यात एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले. वर्णव्यवस्थेने निर्मिलेल्या जोखडदंडातुन मुक्त होण्यासाठी डॉ. बाबासाहेबाची प्रेरणा घेऊन अनेक दलित लेखक,कवी पुढे येऊ लागले. त्यामुळे हजारो वर्षाची सामाजिक कोंडी फुटून या कोंडवाडयाची चित्तरकथा समोर येऊ लागली. महामानवाच्या प्रेरणेने जागृत झालेले अनेक कवी,लेखक,सामाजिक कार्यकर्ते व विचारवंतानी मानवमुक्तीच्या लढयाचे रणशिंग फुंकले. या दलित चळवळीने समाजातील अनिष्ठ प्रथा, परंपरा व  अन्याय करण्याऱ्या वर्गाविरूध्द आपली लेखनी झिजवू लागले, बोलू लागले,संघर्ष करू लागले. या चळवळीने चालविलेल्या संघर्षातुन समाज जागृतीसोबत एक नवा प्रवाह समाजात तयार होऊ लागला. या नव्या प्रवाहाने समाजाची दिशा बदलली, अवनतीतुन समाज सावरायला लागला. त्यामुळे हळुहळु समाजपरिवर्तनाला वेग येऊ लागले.

साहजिकच दलित साहित्य निर्मितीचे उद्‌देश ठेऊन समकालीन कवी,लेखक एकत्र येऊ लागले त्यामध्ये दि.पु.चित्रे,भालचंद्र नेमाडे, संतिश काळसेकर, वामण निबाळकर, चंद्रकांत पाटील, अरूण कोल्हटकर, अर्जुन डांगळे, ज.वी.पवार,प्रकाश जाधव,अनुराधा पाटील,फ.मु. शिंदे,बापुराव जपताप, व यशवंत मनोहर इत्यादी कवीनी समाजजागृती करीता क्रांतीकारी काव्य घडवु लागले. त्याशिवाय दलित साहित्य समिक्षक म्हणुन मोठया जबाबदारी काही समिक्षक दलित साहित्याची समिक्षा केली. त्यामध्ये रा.ग.जाधव,डॉ.म.सु.पाटील, भालचंद्र फडके, प्रा.बालकृष्ण कवठेकर, र.वा. धोगंळे,गो.म.कुलकर्णी व यशवंत मनोहर इत्यादी समिक्षक होते.त्यापैकी एक लेखक,कवी,समिक्षक व बुध्दिवादी विचारवंत म्हणुन आपल्या अथांग लालित्याने माणुसकीचा माथा उन्नत करणारे यशवंत मनोहरांच्या काव्यशैलीवर संशोधक या नात्याने मला प्रकाश टाकावेसे वाटते.

कवी यशवंत मनोहर यांनी समाजिक,सांस्कृतिक, व वाङ्.मयीन जीवनातील एकुणच सर्व विसंगतीवर कठोर प्रहार करण्यासाठी व सुसभ्य वास्तव सखलांसमोर मांडण्यासाठी त्यांची ही धडपड उल्लेखनिय आहे. हा प्रहार म्हणजे एक प्रकारचे भारतीय सामाजिक व वाङ्.मयीन जीवनाची बुध्दिवादी व समाजवादी चिकित्साच होय. एकुणच साहित्य व जीवन समृध्द व्हावे

या तळमळीतुनच त्यांनी हे घणाघाती प्रहार केलेले आहे. त्यांनी आजपर्यंत हाताळलेल्या विविध वाड्.मयीन प्रकारातुन हे प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या वेगवेगळया साहित्यातील मांडणीतुन, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातुन विविध पैलुंचा प्रत्ययकारी दर्शन घडते. यावरून त्यांच्या विचारांचे गांभीर्य,त्यांची स्वतंत्र काव्यशैली व नाविन्यता दिसुन येते.

कवी यशवंत मनोहर हे मराठी साहित्यातील विविध प्रतिमा—शैलीनीयुक्त व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या वाड्.मयीन शैलीने केवळ मराठी काव्यालाच नव्हे तर एकूणच मराठी साहित्याला नवे आयाम व नवी वळणे दिली आहे. मराठी काव्यविश्वात परिवर्तनवादी विचार मूल्यांची प्रस्थापना करणारे प्रतिभावंत विचारवंत म्हणून ते सुपरिचीत आहेत. कवी मनोहरांच्या काव्यशैलीविषयी श्री किशोर सानप म्हणतात की, ''मराठी कवितेला आशयाभिव्यक्तीची नवशैली देणारे आणि मराठी कवितेच्या प्रांतात स्वतंत्र काव्यवाट निर्माण करणारे विचारवंत— चिंतनशील — प्रतिभावंत कवी म्हणून यशवंत मनोहरांचा उल्लेख करता येईल. १'' मनोहरांची काव्यशैली ही सर्वसमावेशक अशी आहे. त्यामूळे सर्जनशीलता त्यांची काव्यशैली हिच युगशैली आहे. हि युगशैली वैश्विक शैली ठरावी अशी नाविण्यपूर्णता त्यांच्या शैलीचे गुणविशेष आहे. विश्वातील समस्त उपेक्षीतांना, वंचिताना आपल्या कवेत घेवून मार्गस्थ होणारी हि शैली युगाच्या गतीशी स्पर्धा करणारी आहे. आकृतीवाद, चैतन्यवाद व रूपवाद या सकंल्पना कशा घातक आहेत याची शास्त्रशुध्द मांडणी कवी सातत्याने करीत असतात. त्यांची विचारशैली स्थितीवादाशी दोन हात करणारी प्रगमनशीलतेशी संवाद साधणारी आहे. या घातक संकल्पनाच्या आवर्तात सापडलेल्या मराठी काव्याला विज्ञानवादी, जडवादी व इहवादी दृष्टीकोनाचा नवा चेहरा त्यांनी दिला आहे.

''आम्ही मानतो विष्ठेला विष्ठा.
दगडाला दगड, सडक्याला सडके, पशूला पशू
देवाला दगड. आम्ही घाणीला सौंदर्य मानीत नाही.
हे आग्रही विवेकशास्त्र तू दिलेस''
( डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन काव्य . पृ.क्र. २५)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतातीलच नव्हे तर संपूर्ण विश्वातील बुध्दीवादी विचारवंत होते. त्यांनी आपल्या जीवनातील विविध अनुभव, विचार, दु:ख, दैन्य व वेदना लेखनीतून प्रभावीपणे अभिव्यक्त केले. जीवाच्या आकांताने बुध्दीवाद मांडला आणि याच बुध्दीवादाला आपली जीवनशैली मानली. याच विवेक विचारशैलीवर कवी मनोहर हे मार्गस्थ झाले. डॉ. आंबेडकरांचा हा बुध्दीवादी विचार वारसा समर्थपणे कवीने पूढे रेटला आहे. युगप्रवर्तकांकडून लाभलेला बुध्दीवाद, विज्ञानवाद, ही कवीची सौंदर्यपूर्ण अशी जीवनशैली ठरली आहे. माणसापासून—माणसांपर्यत जाणारी ही जीवनशैली बुध्दीच्या कसोटीवर खरी

उतरणारी आहे. कोणत्याही कालबाहय तकलादू व वाईट गोष्टींशी तडजोड न स्वीकारणारी अशी आहे. अशाप्रकारे कवी मनोहरांनी बुध्दीवादाची अन्वर्थकता रेखाटली आहे.

''क्रांतीमंता !
तुझी माणूसकी आभाळाहून विराट
तुझे. हृदय सागराहून अफाट
आणि हया डबक्यांनी चालवलेला रे तुझा संकोच.
तुला फसवताहेत रे हे जातीच्या चिखलात.''

( डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन काव्य . पृ.क्र. ३२ )

वरील काव्यपंक्तीमधून कवी मनोहरांनी डॉ. आंबेडकरांचे मौलीक तत्वज्ञान विशद केलेले आहे. हे तत्वज्ञान केवळ गट, तट, व राष्ट्रापुरतेच मर्यादित नसून समस्त विश्वाला सामावून घेण्याचे सामर्थ्य या तत्वज्ञानात आहे. सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या समाजाचे नायकत्व घेणारे आहे. परिघाबाहेरील समाजाला वंचित करणाऱ्या मानसिकतेतील शोषन प्रवृत्तीचे निमूर्लन करणारे मौलिक तत्वज्ञान आहे. डॉ. आंबेडकरांचे हृदय सागराहून अफाट व माणूसकी आभाळाहून विराट आहे. कवी मनोहरांनी 'सागर' आणि 'आभाळ' या प्रतिमांमधून सूर्याची महती विशद केलेली आहे. प्रा. बाळकृष्ण कवठेकर म्हणतात ''मनोहरांच्या या व्यक्तिमत्वाने निर्माण केलेली प्रतिमासृष्टी ही अत्यंत अर्थसघन, प्रसरणशील, अनेक संदर्भसूचक आणि म्हणून कवितेला काव्यात्मक बहूपरिमाणात्मकता, प्राप्त करून देणारी आहे. **२** ''कवी मनोहरांची कविता हि विविध विधानांनी ओथंबलेली असून हि वेगवान वाहकता वाचकाना थक्क करायला लावणारी आहे. 'उत्थानगुंफा' व डॉ बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन काव्य' मध्ये अपवाद परिशिष्टातील कविता वगळून एकाहून एक अर्थपूर्ण व वेगवान विधांनाचा वर्षाव झालेला दिसतो. परिशिष्टातील कवितेतून ते तरल व गंभीर संवेदनशील स्वानूभव चितंनशील विचार अभिव्यक्त होतात. येथे उगम पावून पूढे त्यांचा काव्यप्रवाह पूर्णाकार घेवून 'मूर्तीभंजन' व 'जीवनायन' मध्ये विकास पावल्याचे आपणास दिसते. त्यांच्या कडून प्रा. बाळकृष्ण कवठेकरानी बाळगलेली अपेक्षाश्शंब्दाकित करताना ते म्हणतात, '' ——— मनोहरांनी फारशी न चोखाडेलेली वाट ते दलित कवितेची रूध्दगतिकता संपवून तिची क्षितिजे विस्तारणारेही होईल. मनोहर हे करतील काय? **३** ''आज मनोहरांनी निर्मिलेल्या काव्याचा विकसीत वाङ्मयीन रूप बघितले तर त्यावेळेस प्रा. कवठेकरानी बाळगलेली अपेक्षा पूर्णत्वास गेली असे वाटल्याशिवाय राहत नाही. म्हणून कवठेकर म्हणतात ''——— एका मागोमाग येणाऱ्या वेगवान विधानांच्या स्वरूपात बोलणारी हि कविता पाहिली कि ती वैचारिक किंवा विचारचितंनपर कविता आहे. असा समज होणे स्वाभाविक आहे. ४

'' मनोहरांचे वाङ्मयीन गतीमान प्रवाह बघून कवठेकरांचे हे वाक्य खरे ठरले आहे असे मला वाटते.

'' बंधो! राखेत पुन्हा उड्डाणाची रोपे उगवतात
वणव्यात जळालेली झाडे पुन्हा हिरव्या हाका होतात
जगणे अडवणारे बांध फक्त फुटण्यासाठीच असतात. ''
(त्रिपदी, जीवनायन पृ.क्र. ५७ )

प्रस्तूत 'त्रिपदी' या दिर्घकवितेत कवी मनोहर म्हणतात, अग्नी दिव्यातून मार्गस्थ झाल्याखेरीज उड्डाणाची ऊर्जा निर्माण होत नसते. वणव्यात जळाल्याशिवाय हिरवे अंकुर फुलत नसते., आपल्या श्वासाना अर्थ येत नसते त्यासाठी मात्र आपले काळीज आपल्या शब्दात असावे लागते. हे अनुभवाचे बोल कवी मनोहरांनी या दिर्घकवितेतून साकारलेले आहे. संपादक — डॉ. अरूणा देशमुख म्हणतात, ''काव्यातील अतंर्बाहय बदल किंवा आशय आणि अभिव्यक्तीतील नवेपणा म्हणजे रचनाप्रयोग असे म्हणता येते. केशवसुत, सुर्वे व मनोहर यांच्या काव्यातील रचनाप्रयोग सकारात्मक दृष्टीने तपासणे महत्वाचे ठरते, केवळ भाषीक वैशिष्टये म्हणजे शैली नव्हे किंवा निवळ नियमोल्लंघन म्हणजे शैली नव्हे तर डॉ. यशवंत मनोहरांच्या शैलीचे त्यांच्या वैचारिक शिलाची जवळचे सबंध आहेत. ५ ''केवळ नियमोल्लघंन म्हणजे शैली नसून आपल्या काव्याला वैचारिक शिलाचे जोड असले पाहिजे. त्याशिवाय शैली विकसीत होत नसते. त्याची तपासणी देखील सकारात्मकपणे केली गेली पाहीजे. हे डॉ. देशमूखांच्या वरील ओळीतून अधोरेखीत होते. शिल संपादनाबाबत धडपडे यांचे विचार अर्थपुर्ण वाटतात. ते म्हणतात ''(सील) शिल व चरण (आचरण) हे दोन शब्द पालीत येतात. शीलचा ग्रीक पर्याय 'म्जीवे' निद्राशील व्यक्ती (झोपाळु माणुस) 'शील'पासून शैली हा शब्द निपजला ६''.

फॅसिझमच्या व्यूहरचनेत अडकलेल्या लेखणी, वाणी आणि कृतीला बहुजन हिताय व बहुजन सुखाय या तत्वज्ञानाच्या वाटेवर आणण्याची तळमळ निर्मिणारी शैली कवी मनोहंरानी आपल्या उराशी बाळगली आहे. विश्वातील समस्त परिवर्तनवादी कवी, लेखक व विचारवंत विचारवंताच्या विचार कृतीना आपल्या काव्य साहित्यातून अत्यंत प्रभावीपणे मांडणारे कवी आहेत. डॉ. लीला भेले म्हणतात, ''मनोहरांच्या चितंनशील वक्तृत्वामुळे आंबेडकरी विचारशैलीचे ते कोलंबस ठरतात. त्यांच्या वैचारिक जळण घडणीमूळे आंबेडकरवादी चळवळीला प्रथमच तात्विक, वैचारिक, आणी सैध्दातिंक अधिष्ठान लाभले. ७'' कवी मनोहरांनी आपली वैचारिक नाळ आंबेडकरवादी वैचारिक क्रांतीसूत्राशी जोडलेली आहे. त्यांनी आपल्या परिवर्तन शैलीने आंबेडकरी मूल्यांची मशाल धगधगत ठेवलेली आहे. ते म्हणतात,

‘‘ अज्ञानाच्या निर्मितीला मानतो आम्ही
ज्ञानद्रोह
माणसांच्या शोषणाला मानतो आम्ही
मानवद्रोह ! ’’
(ग्लोबल.... पृ.क्र. १५)

प्रस्तूत काव्यपंक्तीतून उपेक्षीताना अज्ञान अधांरात लोटणाऱ्या विरोधी गटाला उद्देशून कवी म्हणतात कि, समाजातील हे प्रस्थापित गट स्वत:च्या स्वार्थासाठी जाणीवपूर्वक अज्ञान पसरवीत आहेत. त्यामूळे समाजात सभ्रंमाचे वातावरण निर्माण झाले आहे. हा अज्ञान, हि मानसिक खच्चीकरण म्हणजे शुध्द फसवणूकच आहे याच फसवणूकीला कवीने ‘ज्ञानद्रोह’ असे म्हटले आहे. केवळ आणि केवळ जातीयता व शोषणाचे काटेरी कुपण समाजाभोवती लावले जात असून हा मानवत्वाचा मानभंग आहे. म्हणून या ‘ज्ञानद्रोह’ व ‘मानवद्रोहापासून’ माणसाला वाचविण्यासाठी सौंदर्याची विचारपेरणी कवी करतात,

‘‘ वन मॅन वन व्हॅल्यूला मानतो आम्ही
भारत !
सॅक्यूलॅरिझमला म्हणतो आम्ही
भारतराष्ट्र
आणि संविधानाला मानतो आम्ही
भारताचे लोक निर्मिणारा
राष्ट्रग्रंथ ! ’’ ( ग्लोबल.... पृ.क्र. १४ )

कवी मनोहरांनी वरील काव्यपंक्तीतून प्रत्येक भारतीयाला आपल्या उज्ज्वल भविष्याची, निर्भीड जीवन जगण्याची हमी देणारे भारतीय सविंधान हे राष्ट्रग्रंथ असून सर्वाना समता, स्वातंत्र्य, बधूंता व न्याय या मानवी मूल्य बहाल केले. समाजवादी, धर्मनिरपेक्षता व विज्ञाननिष्ठेचा आदर्श भारतीय समाजापूढे ठेवलेला आहे. त्यामूळे समस्ताना नायक आणि नायीका म्हणून विद्वतेच्या सर्वोच्च शिखरावर विराजमान होण्याची सुसंधी प्रदान केले आहे.

मराठी काव्यविश्वात संविधानाएवढा महान व गंभीर विचार समर्थपणे मांडणारे कवी नगण्यच आहेत. भारतीयाना एक व्यक्ती, एक मूल्य हि अमुल्य देणगी देणारे संविधान समस्ताची आचारशैली व्हायला हवी. हिच आचारशैली प्रत्येकाची जीवनशैली झाली पाहिजे अशी सौदर्यपूर्ण, विवेकपूर्ण विचार काव्यशैलीतून संविधान सौदंर्य कवीने रेखाटले आहे. शैलीविषयी श्री भालचंद्र नेमाडे यांची खालील ओळ अर्थपूर्ण वाटते. ते म्हणतात,

''मानवी व्यवहाराच्या अनेक क्षेत्रात शैली हि संज्ञा रित, पध्दत, लकब, वळण, ढब, धाटणी, कौशल्य, तंत्र किंवा स्टाईल. ८ '' शैली हे अनेक अर्थाने वापरले जात असून शैलीही विविधार्थ संसूचित करणारे आहे हे सिध्द होते.

कवी यशवंत मनोहरांचे विचार त्यांच्या काव्यशैलीतून, अभिव्यक्तीतून अर्थपूर्ण आशयाचे सेद्रिंयतत्व उस्फूर्तपणे प्रगट होतात. कवी मनोहरानी आपल्या काव्यदृष्टी व जीवनदृष्टीमध्ये कधीच अंतर पडू दिलेले नाही. त्यांची जिवनदृष्टी प्रखर बुध्दीवादी आणि ईहवादी स्वरूपाची असून त्यांच्या काव्यातून देखील ईहवाद जाणीवेणे माणूसकीची प्रस्तापना केली आहे. म्हणून साहित्य अकादमीने ''युनीव्हर्सल पोएट'' म्हणून त्यांच्या काव्यशैलीचे गौरव केले आहे. त्यांच्या कवितेतून त्यांच्या भावविश्वाची आणि काव्यविश्वाची सेद्रिंयता प्रगट झाली आहे. कवीच्या प्रत्यक्ष जीवनात, काव्यात व एकूणच साहित्यात अतार्किक तत्वाना मान्यता नसते. विज्ञानाच्या व तर्काच्या कसोटीवर घासून पूसून तपासून घेण्याची अट त्यांनी स्वीकारलेली आहे. माणूस सतत तनाने किंवा मनाने घडत असतो. म्हणून तन व मनाच्या विस्तारात ईहवाद हे प्रमाणशास्त्र असावे हि त्यांची भूमिका आहे. कवी म्हणतात,

श''शैली म्हणजे साहित्यिकाची जिवनासंबधीची समज होय. साहित्यिकाची जीवनदृष्टी हा शैलीचा भाग आहे. साहित्यकृतीतील आशय आणि तिच्या मागील विचारसुत्र याना वगळून शैलीचा अभ्यास करताच येत नाही. ९'' जिवनासंबधीचे अभिन्न अंग म्हणजे शैली होय. जे जीवनानूभवातून अभिव्यक्त होत असते. हे त्यांच्या उत्थानगुंफातील आक्रमक शैलीतून व त्यांच्या दिर्घकवितेतून प्रतीत होते.त्यातील त्यांचे अनुभवनिष्ठ अर्थपूर्ण विचार आस्वादकांना चकित करणारे आहे. 'डॉ. आंबेडकर : एक चितंनकाव्य' वाचले म्हणजे त्यातून अभिव्यक्त होणारे क्रांतीची बिजे, द्रोह, विद्रोह काय आहे? हे लक्षात येते. हे त्यांच्या वैचारिकतेच्या भक्कम पायावर उभी असून 'मूर्तीभंजन' व 'जीवनायननातील' कविता सग्रहातून अत्यंत विकसीत व लक्षणीय स्वरूप पाहावयास मिळते.

कवी मनोहरांची कविता ही एकूणच क्रांतीचे तत्वज्ञान आहे. लाचारी आणि निष्क्रीयता कोणत्याही पातळीवर माणसाने स्वीकारू नये ही त्यांची काव्यशैली आहे. हाच त्यांच्या काव्यातील माणूसकीचा गौरव करणारा क्रांतीविचार आहे.

जगातील एकूणच फॅसिझमवर आणि हूकूमशाहीवर नांगर फिरविणारी त्यांची कवितासंग्रह जागतिक माणसाचे स्वप्न उराशी बाळगणारे आहे. मानव हा विश्वमानव बनावे, मानवी जिवनाची पूर्नरचनेचे स्वप्न बाळगणारी ऊर्जाशाळा मनोहरांनी आपल्या काव्यशैलीतून साकारलेली आहे. हि ऊर्जाशाळा मानवी जिवनाला निरंतर प्रकाशमान करणारी असून ही ऊर्जा तळागाळातील उपेक्षीत समाजात निर्माण व्हावे यासाठीच कवीची ही धडपड असून हिच मनोहरांची जीवनशैली आणि काव्यशैली आहे.

दलित साहित्याचा प्रवाह निर्माण होणे केवळ तात्कालीक घटना नाही, तर मानवी मूल्यांचा आदर हे सर्वोच्च मूल्य अंगिकारणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानातुन आणि त्यांनी जीवनभर चालविलेल्या मानवी मुक्तीच्या लढयातुन निर्माण झालेली घटना आहे. या घटनेने मानवीमूल्य स्विकारून समाजात असलेल्या अनिष्ठ प्रथा,परंपरा व पध्दतींविरूध्दात आपला नकार,प्रक्षोभ व विद्रोह मांडण्याचा प्रयत्न समकालीन दलित साहित्यिकांनी केल्याचे दिसुन येते असे लेखकांला वाटते.

**संदर्भ ग्रंथ :—**


*१) किशोर सानप — 'कवितारती 'दिवाळी अंक — २०१६, संपादक — प्रा. पुरूषोत्तम पाटील, पृ.क्र. १२७*

*२) प्रा. बाळकृष्ण कवठेकर, दलित साहित्य : एक आकलन , दु.आ. पूणे — १९९६ उनि. पृ.क्र. ३८*

*३) प्रा. बाळकृष्ण कवठेकर, दलित साहित्य एक आकलन, दु.आ. १९९६, पूणे उ.नि. पृ.क्र ३९*

*४) तत्रैव पृ.क्र. ३४*

*५) डॉ. यशवंत मनोहर—एक प्रज्ञाशिल प्रतिभा युगसाक्षी प्रकाशन नागपूर प्र.आ. ५.०७.२००४ पृ.क्र. १८०*

*६) धडपडे मो.गो.:उद्धृत— 'भाषा आणि जीवन', (संपादक) प्र.ना. परांजपे,शैली प्रतिसाद, २, १९, २ उन्हाळा — २०११ पृ. क्र. ७२.*

*७) तत्रैव, पृ.क्र. ९८*

*८) नेमाडे भालचंद्र : '' साहित्याची भाषा ' —साकेत प्रकाशन औरगांबाद , ति. आ. २००५ पृ.क्र. ३८*

*९) यशवंत मनोहर, नवे साहित्यशास्त्र प्र.आ. २००१ पृ.क्र. १७१*

# बाळासाहेब भडकवाड यांच्या 'फिरकी' या कादंबरीतील सामाजिक जाणिवा

**प्रा. डॉ. लालबा दुमटकर**
*गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार, अमरावती*
*मोबाईल नंबर ९८३४१४३७५१*

'फिरकी' ही बाळासाहेब भडकवाड यांची कादंबरी इ. स. 2015 मध्ये प्रतिमा प्रकाशनाने प्रकाशित केली. बाळासाहेब भडकवाड 'फिरकी' या साहित्यकृतीचा कादंबरी म्हणून उल्लेख करत असले तरी, ती वाचल्यानंतर वाचक तिला कादंबरी न म्हणता आत्मचरित्रात्मक कादंबरी म्हणेल यात काही शंका नाही; असे लेखन मराठी साहित्याला नवे नाही. मराठीत आनंद यादव यांची 'झोंबी' अलीकडच्या काळातील रामराव झुंजारे यांचे 'जलमबेडी' या सर्व कादंबऱ्या याच पठडीतील आहेत. बाळासाहेब भडकवाड यांचे या अगोदर परका, सैनिकी स्पर्श, कोंडवाडा आणि काटा हे चार कथासंग्रह प्रकाशित आहेत; या सर्व कथासंग्रहातून भडकवाड यांनी ग्रामीण दलित जीवनाचे अतिशय वास्तव पण लालित्यपूर्ण जीवनदर्शन घडवलेले आहे. भडकवाड यांचे बालपण हे बऱ्याच प्रमाणात ग्रामीण भागात गेल्यामुळे तेथील गावगाडा, गावगाड्याची रचना, निसर्ग, नद्या, शेती, ग्रामजीवन, दलितांचे जगणे, जातीयता, दारिद्र्य, अज्ञान, अत्याचार, शोषण, अपमान, वेदना, टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी करावी लागणारी जीवघेणी धडपड या सर्व गोष्टी जवळून अनुभवायला मिळाले. त्यामुळे त्यांचं जीवनानुभव जीवन जाणिवांनी अतिशय दाहक असे आहे.

मराठी साहित्यात प्रामुख्याने दलित आत्मकथनाने फार मोठा पट व्यापलेला आहे. या आत्मकथेची सुरुवात मराठी साहित्यात प्रथम प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणीचे पक्षी' या पुस्तकाने केलेली आहे. यानंतर आजतागायत अनेक जाती-जमातीतील लेखकांनी आपापल्या भयावह अशा जीवन अनुभवांना आत्मकथनाच्या रुपाने वाट मोकळी करून दिलेली आहे. आज मराठी साहित्यात दलित आत्मकथनांचा वाटा अनन्यसाधारण असा आहे. हे दलित जीवन विश्वच एवढे भयावह जीवन जाणीवानी व्यापक आहे की, ते दलित लेखकांना लिहिण्यास वारंवार भाग पाडते. दलितांचे जीवन जगणे वरवर पाहता सारखे वाटत असले तरी जातिनिष्ठ व्यवसायामुळे त्यांचा आतून होत असलेला कोंडमारा, टीचभर पोटासाठी करावी लागलेली जीवघेणे कामे, अपमानास्पद वागणूक हे खूपच भयंकर आहे. यामुळे त्यांच्या कितीतरी पिढ्या या उद्ध्वस्त झालेले आहेत. बाळासाहेब भडकवाड यांनी दलित समाजातील अशाच एका हजारो वर्षापासून वंचित, शोषित, हिंदूंच्या कृषी जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या अस्पृश्य मांग जातीचे जीवघेणे व्यथा, त्यांचे भयावह असे जगणे 'फिरकी' या कादंबरीत नामू व त्याचे आई वडील यांच्या रूपाने अतिशय वास्तवपणे मांडलेले आहे. मांग समाजाचा परंपरागत व्यवसाय हा वाजंत्री वाजवणे, चराट वळणे, केरसुण्या तयार करणे, नाडा, सौंदर, कासर, कान्या तयार करून शेतकऱ्याला पुरवणे आणि त्याच्या बदल्यात वर्षाच्या शेवटी खळ्यावरील मातेर त्याच्या पदरात टाकले जायचे. या अशा लाजिरवाण्या आणि फुकटया

व्यवसायामुळे मांग समाजाच्या पिढ्यानपिढ्या अक्षरशः उध्वस्त झाल्या याचे प्रत्ययकारी चित्रण सदर कादंबरीत येते.

लेखक आपल्या मनोगतात म्हणतात, "दारिद्य हे मांगाच्या पाचवीलाच पुजलेले या दैन्य, दारिद्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांचे चऱ्हाट ओळणे आणि केरसुण्या तयार करणारा हा परंपरागत व्यवसाय. या व्यवसायातून मिळणारी आर्थिक प्राप्ती मात्र नगण्य. त्यामुळे दोन वेळच्या हातातोंडाची गाठ पडणेही मुश्किल."1 अठरा विश्व दारिद्य घेऊन परिस्थितीला तोंड देत जीवन जगताना लेखकाच्या वडिलांची नाकी जीव यायचा. पावसाळ्याच्या दिवसात गरिबांना राहायला चांगली घरं नव्हती, एखाद्या गवताच्या झोपडीत आपल्या मुलाबाळांसह त्यांना जीव मुठीत धरून जगावे लागायाचे. याचे वर्णन करताना लेखक म्हणतात, "चौफेर पाऊस कोसळायचा गावातल्या मोठमोठ्या भीती बुद्धू बुद्धू पडायच्या, मग आमच्या खोपटाची दशा काय सांगावे. घोडी खूपच या आठवड्यात न आणि घरात पडायचं ज्या वेगानं ते आभाळात न कोसळायचंय त्याच वेगाने ते घरात शिरायचं चारी बाजूच्या भीतीला पाझर फुटून मध्ये पाणी साठायचं आणि मग घरी यायचं माकडासारखे अंग चोरून आम्ही त्या गळ्यातच बसायचं"2 तर यावेळी दुसरे संकट म्हणजे पावसाळ्यात हाताला काम नसल्यामुळे घरात खायला काही नसायचे लहान लहान लेकरं भुकेमुळे चिमणी सारखे तोंड वासून आई-वडिलांच्या तोंडाला पाहत बसायचे; तेव्हा वडील गावातून काहीतरी खायला मागून आणायचे, पण रोज रोज कोण देणार ? नाईलाज असल्यामुळे लोकांपुढे पुन्हा पुन्हा हात पसरायला लागायचे, याबाबतीत नामूच्या आई वडिलांचा संवाद ऐकण्यासारखा आहे,"हुइव बघा की कायतरी, लेकर सकाळधरन उपाशी हायती, आता काय बघू, आता असं म्हणून कसं चालल, कूणी देत नाही बघ, ते मला कळतया की, पण मागायचं तशीच मीटि लावून"3 अशातच एखादे काम मिळाले तर गावातील लोकांनी दलितांच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन त्यांच्याकडून थोड्याशा धान्यासाठी चार चार दिवस काम करून घ्यायचे त्यामुळे बाकीचे दिवस उपाशीतापाशी काढावी लागायचे यासंदर्भात म्हणतात, "शेरभर दाण्यापायी चार दिवस शेतकरी भीत बांधून घ्यायचा मग बाप चार दिवस तिकडं गुंतला की आम्ही इकडं उपाशीच..... काम अन धाम असा हिशोब कधी जमायच नाही"4 अशा या जीवघेण्या दारिद्यामुळे दलितांचे जीवन जगणे अक्षरश: जनावरासारखे झाले होते. त्यांच्यावर अनेक वेळा उपासमारीची वेळ सुद्धा यायची. तर कधी कधी गावकीचे कामे करूनही मोबदला मात्र कधी मिळायचा तर कधी मिळायचा नाही गावात तलाठी ग्रामसेवक आले की दवंडी देण्याचे काम करावे लागायचे. एवढेच काय तर गावात लाईट नव्हते तेव्हा कंदील दलितांनाच लावावी लागायची. यावेळी जे 2/4 रुपये मिळायचे ही सरकारी ग्रामसेवक मंडळी खोट्या कागदावर अंगठा घेऊन स्वतःच पैसे ठेवून घ्यायचे याबाबतीत लेखक म्हणतात,"ग्रामसेवक कागदावर बापाचा अंगठा घ्यायला मात्र विसरायचा नाही"5 दलितांनी इमानदारीने कष्टाची जीवघेनी आणि गलिच्छ काम करूनही त्यांना मोबदला देताना मात्र इतर बलुतेदारप्रमाणे दिल्या जात नसे तर त्यात तफावत केली जायची. ते म्हणजे उरलंसुरलं इटकं अन्न देत असत. हे नामू वडिलांसोबत जाऊन प्रत्यक्ष डोळ्यानं पहायचा. तेव्हा त्याला खूप वाईट वाटायचे. त्याच्या कोमल मनात प्रश्नांचा काहुर उठायचा ते म्हणतात, "येस्कराला बलूत तरी काय मिळायचं म्हणा, सुगीला प्रत्येकाच्या खळ्यावर एकेक पाचुंदा, त्यो पाचुंदा बी कानीकवळीचा

नाहीतर बारक्या लुंग्याचा."6 दुसऱ्या मुलांकडे पाहून शिक्षणाची इच्छा मनात निर्माण होऊन सुद्धा दलितांच्या मुलांना रोज शिक्षण घेता येत नव्हते कारण आई घरच्या दारिद्र्यामुळे मजुरीसाठी दुसऱ्यांच्या शेतावर नामूला घेऊन जायची. याचाच अर्थ शिक्षण घेण्याची मनात तळमळ असूनही शिक्षणाची हेळसांड व्हायचे, तरीपण नामू आपले चौथीपर्यंतचे शिक्षण पहिल्या श्रेणीत पूर्ण करतो. ही मनातील तगमग इथे व्यक्त करताना लेखक म्हणतात,"तरीबी म्या सवड घावली की साळत जात होतो. अंगावर कापड नसायची. पाटी-पेन्सिल नसायची. पिशवी बी नसायची. साळत गेलो तरी पोरं मिसळून घेत नसायची. मांगट्या मांगट्या म्हणून शिऊन घेत नसायची. बारकी बारकीच कार्टी पण शिव्या द्यायची. गावातला असून बी उपऱ्यावानी बसायचं. मास्तर शिकविलेल मनात टीपवायचू"7 असे हे उपर जीवन गावातल्या दलितांच्या वाट्याला आलेलं. हे उपरे जीवन दलितांची छळ करायचं आपणही माणसासारखे माणूस असून सुद्धा आपल्याला तिथे माणसाप्रमाणे वागणूक मिळत नाही याचे फार मोठे दुःख दलितांच्या मनामध्ये घर करून बसलेले होते.

लेखकाचे बालपण ग्रामीण भागात गेल्यामुळे इतर जातीतील मुलाप्रमाणे दलितांच्या मुलाला नाचता बागडताना येत नव्हते. बालसवंगड्यासोबत खेळता येत नव्हते. त्यांच्या कोमल बालमनावर जातीमुळे अनेक आघात झाले. त्यामुळे इच्छा असूनही छंद मात्र जोपासता आले नाहीत; याची खंत मनामध्ये तशीच राहते. याचे अतिशय मर्मभेदक वर्णन लेखकाने इथे केलेले आहे."पोरं चल चल म्हणली तरी त्या विहिरीवर जात नसायचो.... वाटायचं आपण मांगाचं नस्तू तर आपल्याला बी पवायला आलं असतं.... माशावानी इकडून तिकडे पळत असतो.... उड्या मारल्या असत्या"8 ग्रामीण भागातील सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडवताना लेखक गाव गावाची रचना, देव-देवतांची मंदिर, त्यांची दिशा, सण-उत्सव, विशेषता ग्रामीण भागातील पंचमीचा सण हा धुमधडाक्यात साजरा केला जातो: त्यावेळी गावातील लग्न होऊन गेलेल्या मुली माहेरी परत येतात आणि सर्व काही विसरून गाणी गातात. झिंबा, झोका खेळतात तर पुरुष मंडळी पतंग उडवतात. याचे विलोभनीय दर्शन अतिशय जिवंतपणे लेखक दर्शवितो; तर दुसरीकडे श्रीमंताच्या घरून सणानिमित्त मागून आणलेल्या गोड पदार्थाचे आई सगळ्यांना वाटून देतानाचा आनंद आणि आईची गरिबीमुळे लाचारीने जगताना होणारी मनाची घालमेल याचे अतिशय हृदय पिळवटून टाकणारे चित्रण करतात ते म्हणतात, "आणलेल्या तळीवमळीव तुकड्याची आम्हाला किती अप्रूप....कुत्र्याच्या पिलावानी आमची गडबड चालली की आईच्या डोळ्यात आभाळाचं मेघ दाटायचं"9 गावकीची अनेक जीवघेणी कामे करताना दलितांचा जीव कासावीस व्हायचा; पण घरच्या दारिद्र्यामुळे व प्रचलित चातुर्वर्ण व्यवस्थेमुळे ही कामे नाईलाजाने त्यांना करावीच लागायची. अशी ही जीवघेणी व लाजिरवाणे कामे करूनही सवर्णाकडून मात्र कधीही जीव लावून विचारपूस केली जात नसे. तर उलट कमरेखालच्या शिव्या दिल्या जायच्या; व्यवस्था म्हणून हे जनावरासारखे जिने सोबत घेऊन दलितांना जगावे लागायचे. कारण दलिताकडे कुठल्याही प्रकारची स्वतःची उत्पादनाची साधने नव्हती; ते सर्वस्व प्रस्थापित समाजावरच अवलंबून राहायचे तेव्हा त्यांची इच्छा असो वा नसो ही परंपरेने चालत आलेली जातीनिष्ठ कामे करावीच लागायची; अशी ही जीवनाची होरपळ जातीमुळे लेखकाच्या वाट्याला आलेली होती. ही होरपळ, हाल अपेष्टा अतिशय मर्मभेदकपणे चित्रित करतात.

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात उच्चनीचता पाळली जात होती. दलितांना कोणीही स्पर्श करीत नसे. घागरभर पाण्यासाठी कितीही घंटे विहिरीजवळ थांबावे लागत असे. कारण विहिरीला शिवण्याचा दलितांचा अधिकार नव्हता. एवढेच नाहीतर वडिलांची दाढी आणि माझी कटिंग वाढल्यानंतर वारिक आमची दाढी कटिंग करायचा नाही; तेव्हा बापू त्यांच्याकडून वस्तारा आणायचा; तो ही माणसं भादरायचा नाही तर म्हशी भादरायचा. या संदर्भात लेखक म्हणतात,"आम्हाला म्हशी भादरायचा वस्तारा.... म्हशी हुनबी आमची किंमत कमी.... कोणत्या शहाण्यांन ह्या जाती काढल्या असत्याल."10 तसेच गावात उच्चवर्णीय समाज शिवाशिव करायचा; पण बाकी बहुजन समाज जो अनुसूचित जाती, जमाती विमुक्त, भटके, भिकारी यांनीही आपसात उच्चनीचता पाळायचे. याचे नामूला खूप आश्चर्य वाटायचे. पुस्तकात आणि प्रत्यक्ष व्यवहारात किती मोठी तफावत आहे आणि हे बदलले पाहिजे. असे लहानपणीच नामूला वाटायचे. कादंबरीतील नामू हे पात्र अठराविश्व दारिद्य असलेल्या एका दलित कुटुंबात जन्माला आले असले तरी; तो बुद्धीने मात्र अतिशय हुशार आहे. त्याला आपल्या परिस्थितीची, आपल्या आई वडिलांच्या कष्टाची, दुःख दारिद्याची पूर्णता जाणीव होती. ही जाणीव तो जसा जसा मोठा होत होता तसं तसा शिक्षण शिकून मोठा माणूस बनण्याची त्याची धडपडही वाढत होती; म्हणून तर तो वर्गात गणित आणि इंग्रजी सारख्या अवघड विषयात हुशार होता. त्याच्याकडून अनेक मुलं मुली गणिताचे प्रेमय समजून घेत होती. या मुली तर त्याच्या हुशार पणावर भाळून त्याच्यावर जीवापाड प्रेम करू लागतात; पण लेखकाला मात्र आपल्या परिस्थितीमुळे धड प्रेमही करता येत नाही, याची खंतही व्यक्त करतात.

वास्तविक पाहता 'फिरकी' या आत्मकथनपर पुस्तकात लेखकाने आपल्या स्वतःच्या जीवनाची अनेक जीवघेणे पदर अतिशय समर्थपणे नामू या पात्राच्या माध्यमातून उलगडतात; पण काही अनुभव ज्या विद्रोह वेदना नकारात्मक भाषेतून व्यक्त व्हायला पाहिजे होत्या तसे त्या व्यक्त होताना दिसत नाहीत; तर ते अतिशय सौम्य भाषेत व्यक्त करतात. असे असले तरी विषयाची मांडणी, त्यातील सुसंगतपणा, जीवनातील चढ-उतार, शिक्षण घेण्याची तळमळ स्वतःच्या बोलीभाषेसह अतिशय जिवंतपणे मांडलेले आहे. विशेषता पुस्तकातील बोलीभाषा ही वाचकांच्या हृदयाचा ठाव घेताना दिसते. दलित समाजातील बोलीभाषा, त्यातील वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा, प्रतीके, शिव्या यामुळे वाचनात रोचकता येते.

*** संदर्भसूची :**

*1. बाळासाहेब भडकवाड - फिरकी - प्रतिमा पब्लिकेशन्स, पुणे, 2015*
*2. पृष्ठ क्रमांकः लेखकाचे मनोगत*
*3.तत्रेव : पृष्ठक्रमांक 19,*
*3. तत्रेव : 14*
*4. तत्रेव : 25*
*5. तत्रेव : 29*
*6. तत्रेव : 30*
*7. तत्रेव : 24*
*8. तत्रेव : 34*
*9. तत्रेव : 49*
*10. तत्रेव : 58*

# सदानंद देशमुखांच्या ग्रामीण कादंबरीतील समकालीनता : एक दृष्टिक्षेप

**प्रा. डॉ. विजय रूपराव राऊत**

*सहयोगी प्राध्यापक, श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय, नरखेड , जि. नागपूर*

*मो. ९८५०२३६८७९, ईमेल* *parambiraut@gmail.com*

**सारांश (Abstract)**

*साहित्य हे काळाबरोबर प्रवाहित राहाते ,काळाचे बदल टिपते आणि जीवनाशी अधिकाधिक अद्वैत साधत असते त्यामुळेच साहित्य हा जीवनाचा आरसा आहे असे म्हटल्या जाते. खरे तर साहित्य हे संग्रहालयच आहे. ज्याप्रमाणे वस्तूसंग्रहालयात त्या -त्या काळातील विविध वस्तू संग्रहित करून त्या काळाचा इतिहास जतन केल्या जातो. आणि पुढच्या पिढीला भूतकाळाचे आणि आपल्या इतिहासाची नेमकी/ अचूक माहिती मिळते त्याप्रमाणे काळानुसार निर्माण झालेल्या साहित्यात मानवी मन, जीवन ,अशा -अपेक्षा , सुख -दुःख ,धारणा , प्रेरणा ,संघर्ष ,जाणीव,परस्पर संबंध ,प्राणी ,निसर्ग, भूगोल ,इतिहास ,रूढी ,परंपरा ,तंत्रज्ञान ई . घटकांची नोंद आपसूक होत असते. जरी आजचा कलावंत एखादी भूतकाळातील वा काल्पनिक कला सादर करीत असला तरी त्या कलेला समकाळाची अध्याहृत अशी पार्श्वभूमी असतेच असते. ज्याप्रमाणे प्राणी आपले घटकावयव घेऊनच जन्माला येतो त्याप्रमाणे साहित्यही समकाळ कवेत घेऊनच प्रकट होत असते. सदानंद देशमुखांची कादंबरी ही या प्रकारची आहे. त्यांच्या 'तहान' ,'बारोमास' ,'चारीमेरा' या कादंबऱ्यांतून प्रकट होणारे समकालीन संदर्भ त्यांच्यातील संवेदनशील लेखक असण्याचे प्रमाण आहे. ग्रामीण जीवनमूल्ये स्वीकारून केलेले लेखन किती प्रभावी आणि परिणामकारक असू शकते याचा प्रत्यय देशमुखांच्या कादंबऱ्या वाचताना सहज प्रत्ययास येते.*

***बीजशब्द*** *: समकालीनता, ग्रामीण जीवनजाणीव,समाजभान*

## प्रस्तावना

मराठीतील ग्रामीण साहित्याची परंपरा समृद्ध अशी आहे . त्यात कादंबरी हा साहित्यप्रकार विशेषत्वाने बहरलेला दिसतो. श्री .म माटे ,र .वा .दिघे,व्यंकटेश माडगूळकर, रा. रं. बोराडे यांच्यापासून तर पुढे नव्वदोत्तर काळात शंकर पाटील किशोर सानप ,नागनाथ कोत्तापल्ले ,उद्धव शेळके ,आनंद यादव ,प्रतिमा इंगोले , रवींद्र शोभणे ,इंद्रजित भालेराव ,सदानंद देशमुख इ . अनेक साहित्यिकांनी सकस अशी ग्रामीण मराठी कादंबरी निर्माण केलेली आहे. शेतकरी आणि त्याचे पाचवीला पुजलेले दुःख ,शेतीतील नापिकी,कर्जबाजारीपणा, आत्महत्या, गरिबी ,अस्मानी सुलतानी संकट इ. ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या ग्रामीण जीवनाची संवेदनशील रेखाटने या ग्रामीण कादंबरीतून व्रतस्थपणे उमटत गेली. ग्रामीण भागाला औद्योगिकरणाची झळ कशी पोहचली आणि हळूहळू शेती आणि शेतकरी कसा नामशेष होऊ लागला याचेही विदारक चित्रण या कादंबऱ्यांत येऊ लागले. एकविसाव्या शतकातील सुरुवातीला सदानंद देशमुखांची कादंबरी मराठी ग्रामीण कादंबरीचे नवे ,विकसित रूप म्हणून समोर आली. 'तहान' , 'बारोमास', 'चारीमेरा' या कादंबऱ्या ग्रामीण वास्तव जनजीवनाचे प्रगटीकरण करणाऱ्या कादंबऱ्या आहेत.ग्रामीण जीवनाची अस्वस्थता ,दुःख,पिचलेपणा अधिक धारदारपणे या कादंबऱ्यांतून प्रसृत होताना दिसते.

## सदानंद देशमुखांच्या कादंबऱ्यांतील समकालीन संदर्भ : एक दृष्टिक्षेप

समकालीन मराठी ग्रामीण साहित्यक्षेत्रातील सर्जनशील आणि सजग जाणिवेचे लेखक म्हणून सदानंद देशमुख यांचा उल्लेख करावा लागतो. कथा ,कविता ,कादंबरी व ललितलेखनातून त्यांची ग्रामीण मूल्यजाणीव वेळोवेळी प्रस्फुरित झालेली दिसते. ग्रामीण जीवनातील वास्तववादी ,ज्वलंत प्रश्न त्यांनी आपल्या लेखनातून हाताळलेले आहे.एका शेतकरी कुटुंबात जन्म झाल्यामुळे त्यांच्या ग्रामीण जाणीव अधिक परिपक्व आहे .ग्रामीण जीवनातील पदोपदी जाणवलेलं दरिद्री वर्तमान त्यांना अस्वस्थ करत आहे. ती अस्वस्थता 'बारोमास' ',तहान', 'चारीमेरा' या कादंबऱ्यांतून अधिक ठसठशीत होऊन अवतरते.पाण्याचा बिकट प्रश्न,लहरी निसर्ग , सुशिक्षित बेरोजगारी ,शेतीपुढील आव्हाने, शेतकऱ्याची ससेहोलपट ,नैराश्य ,कौटुंबिक ताणतणाव या सर्व समकालीन प्रश्नांना त्यांनी आपल्या कादंबरीलेखनातून अत्यंत कलात्मकतेने आणि तितक्याच वेदनादायी भावनेतून हाताळलेले आहेत.

'तहान' ही सदानंद देशमुखांची ग्रामीण जीवनाचे अनेकांगाने प्रगटीकरण करणारी अशी वास्तववादी कादंबरी आहे. शेतकरी आणि खेड्यातील वास्तवदर्शी असा वेदनादायी पट त्यांनी या कादंबरीतून साकारलेला आहे. गावखेड्यातील पाण्याचे दुर्भिक्ष आणि मानवासमोरील सर्वात मोठे संकट म्हणून पाणीटंचाईचा उल्लेख या कादंबरीत महत्वाचा घटक म्हणून विचारात घ्यावा लागतो. ही फक्त एका गावाची स्थिती नाही तर जागतिक संकट म्हणून आपल्या समोर उभे आहे. पावसाच्या पाण्याअभावी होणारी शेतीची आणि शेतकऱ्यांची दुरावस्था आज सार्वत्रिक झालेली आहे. बबन शेवाळेंसारखा तरुण पाण्याचा व्यवसाय करून पैसे कमावतोय ही वेळ त्याच्यावर का यावी. घरी भरपूर शेती असूनही अस्मानी संकटांमुळे ती पिकात नाही. सर्वत्र दुष्काळ पडलेला आहे.माणूस सैरभैर झालेला आहे तरीपण नेतेमंडळी त्या गावाकडे ढुंकूनही बघत नाही. त्यासाठी गावकऱ्यांनाच घागरमोर्चा काढावा लागतो .अखेर ग्रामीण जनता उपेक्षित जीवन जगते आहे हे लक्षात येते. रामा उमाळेच्या मुलीसारख्या अनेक निष्पाप मुलींचे या पाण्यासाठी बळी जातात हे या कादंबरीतील जळजळीत वास्तव आपल्या आभासी विकासाची /प्रगतीची लक्तरे निश्चितपणे वेशीला टांगताना दिसते. विकसित वा विकसनशील देशाचं हे वास्तव स्वीकारण्यासारखं आणि गुणांकन करण्यासारखं नक्कीच नाही हे सदानंद दशमुख या कादंबरीतून सुचवू पाहताहेत. एकप्रकारे भावी संकटाचे संसूचन ही कादंबरी आपणास करून देते.गावखेड्यातील आपापसातील प्रेमाचे /द्वेषाचे संबंध/पैशाचे महत्त्व इ. मूलभूत घटकांचाही परिचय या कादंबरीतून होत असतो. ग्रामीण जीवनात अनेक महत्वपूर्ण आयाम बघायला मिळतात.ओंजळभर पाण्यासाठी मैलोंमैल भटकणारा माणूस हा या आधुनिक जगाच्या निर्मितीचा साक्षीदार म्हणून कसा उभा राहू शकतो? अशा अनेक प्रश्नांची उपस्थितीही ही कादंबरी करताना दिसते. दुष्काळामुळे बबन शेवाळेंसारख्या असंख्य तरुणांना आज शेती सोडून आडमार्गाने पैसे कामवावेसे वाटणे साहजिकच आहे. सदानंद देशमुखांनी तहान या कलाकृतीतून अनेक ज्वलंत विषय हाताळलेले आहेत.यातून त्यांचे समाजभान किती सजग आहे याचा सहज प्रत्यय येतो.ग्रामीण भागात जगणे किती आव्हानात्मक आहे याचे वेदनादायी चित्रण देशमुखांनी या कादंबरीत केलेले आहे . प्रमोद नवलेंसारखा उच्चशिक्षित तरुण नोकरीसाठी बरीच धडपड करतो पण पदरी अपयश येते. विनाअनुदानित शाळेत दोन

वर्ष त्याला फुकटात नोकरीच्या आशेवर राबवून घेतलं जाते आणि अनुदान आल्यावर त्याच्याजागी दुसरा शिक्षक भरला जातो .हे प्रखर वास्तव कमी अधिक प्रमाणात सर्वत्र निदर्शनात येते.ग्रामीण जनतेला मेंढरं समजून त्यांचा मतापुरता वापर करणारा नेतावर्ग आज सुमार झाला आहे.सत्ता हाती आल्यावर पाच वर्ष भूमिगत होणारा नेता आजच्या सुदृढ लोकशाही समाजव्यवस्थेचा आधार कसा समजावा हा प्रश्न देशमुख आपल्या कादंबरीतून उभा करतात. तहान या कादंबरीच्या मनोगतात देशमुख म्हणतात, " मूल्यहीन समाजव्यवस्थेत आपली जीवनमूल्य जोपासणाऱ्यांना एक अटळ संघर्ष सध्याच्या विघटनकालात करावा लागत आहे. त्यांचा हा संघर्ष जसा भाळी आलेल्या भयावह परिस्थितीशी आहे,तसाच तो भौतिक सुखाच्या मायावी मृगराजालामागे धावून महाकाय शून्य हाती येणाऱ्या सैरभैर मनोवृत्तीच्या तरुण पिढीशी सुद्धा आहे. त्यातून त्यांच्या वाट्याला येणारा ताण त्यांची घुसमट करून गुदमरून टाकणारा आहे.अशा तणावग्रस्त अवस्थेत जगणारी राघोजी शेवाळेंची व्यक्तिरेखा मला अस्वस्थ करून गेली."१ ग्रामीण कृषीसंस्कृतीचा चेहरा ठरावा असा राघोजी दीन शेतकरी म्हणून या कादंबरीत रेखाटला गेला आहे.

'बारोमास' ही तहान च्या तुलनेत थोडी दीर्घ आणि विविधांगी ग्रामीण जीवनानुभवांचे खोलवर दर्शन घडवणारी कादंबरी म्हणून विचारात घ्यावी लागते. बाराही महिने शेतकऱ्यांच्या पदराला दुःख लगडूनच असते याचे वेदनादायी चित्रण अनेक उपकथानकातून देशमुखांनी या कादंबरीत केले आहे. एकनाथ तनपुरे नावाच्या अतिसंवेदनशील सुशिक्षित बेरोजगार शेतकरी तरुणाची संघर्षमय व्यथा या कादंबरीत रेखाटलेली आहे. शिकून स्वतःच्या मेंदूला अधिक शहाणं आणि संवेदनशील बनवून बेकार जीवन जगणं किती आव्हानात्मक असते ते एकनाथ या पात्राच्या माध्यमातून सहज लक्षात येते.डॉ. किशोर सानप म्हणतात , "शेतकऱ्याच्या जीवनाचे आजचे समकालीन वास्तव आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या शोधाची करुण कहाणी बारोमास या कादंबरीतून सदानंद देशमुखांनी मांडली आहे . ग्रामजीवनाशी समरस झाल्याने आणि शेतकऱ्याचा मुलगा असल्याने आपल्या शेतकरी बापाची दुर्दशा पाहून अस्वस्थ झालेल्या लेखकाने आपल्याच लोकांचं आणि मातीचं दुःख बारोमासमधून समर्थपणे मांडलं आहे. या कृतीला लेखकाची खास नैतिक बूज मिळाल्यामुळे ही ऐकून मराठी कादंबरीत लक्षणीय अशी सामाजिक कृती ठरावी."२भारतीय कृषिव्यवस्था किती रसातळाला गेली आहे आणि शेतकरी कुटुंब आत्महत्या करण्यास कशाप्रकारे धजावत आहे याचेही रोमांचकारी वर्णन एकनाथच्या मेहुण्याच्या माध्यमातून केलेले आहे.आज चांगल्या श्रेणीत शिकूनही नोकरीसाठी लाच द्यावी लागते यापेक्षा दुसरं दुर्दैव कोणतं असावं. ही आजच्या काळाची वस्तुस्थिती आहे.कितीही अस्वीकृत वाटत असली तरी स्वीकारावी लागते.विज्ञानाचा प्रसार होऊनही अंधश्रद्धेच्या आहारी जाणारी मंडळी मधू व सोनेरी टोळीच्या चित्रणातून दिसून येते. ग्रामीण जीवनाचा तिटकारा आणि शहरी आकर्षणाचा हव्यास अलका या पात्राच्या चित्रणातून देशमुखांनी कुशलपणे दाखवून दिलेला आहे.ग्रामीण जीवनातील दुःख ,निराशा ,दारिद्रय ,आत्महत्या या सर्व घटकांना शेतकरी बारोमास सामोरा जातो आहे. ग्रामीण माणसांचे सरकारी अधिकाऱ्यांकडून होणारे शोषण लोकशाही व्यवस्थेला लागलेला कलंक असून व्यापाऱ्यांकडून होणारे गरीब शेतकऱ्याचे शोषण हे सरकारच्या डोळेझाकपणाचा अघोरी परिणाम आहे. शेतकऱ्यांच्या हिताच्या म्हणून ज्या- ज्या योजना सरकारकडून राबवल्या जातात त्याच्या

जाहिरातीचा गाजावाजा तेवढा केला जातो पण प्रत्यक्षात मात्र त्या गरीब शेतकऱ्याला त्या योजनेचे नावही माहिती नसणे हे आपल्या सामाजिक कल्याणकारी मूल्यभानचं दुर्दैव ठरते. ही आजची वास्तव परिस्थिती या कादंबरीत रेखाटली गेली आहे. अलका माहेरी गेल्यानंतर एकनाथ शेतकरी संघटनेच्या कार्यात स्वतःला झोकून देतो. सुशिक्षित बेरोजगार अनेक तरुण अशा मार्गाचा अवलंब करताना सर्वत्र दिसतात त्यातून उच्च शिक्षण घेऊनही नोकरीची अनुपलबद्धता ही बाब आजच्या शैक्षणिक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे करते .

'चारीमेरा' ही २०१६ या वर्षीची ग्रामीण जीवनाचे अंतरंग टिपणारी उत्कृष्ट अशी ग्रामीण कादंबरी आहे. तहान आणि बारोमास या कादंबऱ्यांत यांत्रिकीकरणाचा अभाव जाणवतो तो अभाव चारीमेरा या कादंबरीत भरून निघालेला आहे. बोरवेल मशीन , जेसीबी मशीन अशा यंत्रांचा सुकाळ या कादंबरीत जाणवतो. ग्रामीण भागात शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची भीषणता या कादंबरीच्या माध्यमातून स्पष्ट करण्याचा देशमुखांचा हेतू आहे. आधुनिक यंत्राने शेती सुसह्य झाली खरी पण त्याची झळ पर्यावरणाला कशी पोहचली या प्रश्नालाही त्यांनी या कादंबरीतून वाचा फोडलेली आहे. आपल्या वडिलांनी केला म्हणून हा शेतीव्यवसाय परंपरा म्हणून हा तोट्याचा धंदा मन मारून करावा लागतो आहे. उदेभान आणि भावना या कुणबी कुटुंबाचे संघर्षमय, वेदनादायी जगण्याची ही कथा ग्रामीण शेतकरी कुटुंबाचे प्रातिनिधिक स्वरूप आहे. शेतीत कितीहि पैसे गुंतवले तरीही हाती काहीच उरत नाही ही आजच्या शेतीव्यवसायाची सार्वत्रिक शोकांतिका ठरते. वेगवेगळ्या पिकांचा प्रयोगही अयशश्वी होतो आहे. जमिनीची दरवर्षी मशागत करावी ,शेतीची चारी बाजूने शेकारणी करीत राहावी त्याप्रमाणे शेतकरीही आपल्या मनाला शेकारत आजन्म जीवन कंठीत असतो. शेती जगवण्यासाठी बँकांचे कर्ज काढतो पण कर्ज फिटत नाही.त्यासाठी पुन्हा जमीन विकून कंगाल होण्याची पाळी त्याच्यावर येते. अशा विविध समस्या आणि आव्हानांनी विणलेल्या शेतकरी ग्रामीण जीवनाची वीण सदानंद देशमुखांनी या कादंबरीत साधलेली आहे.

**समारोप**

सदानंद देशमुख हे ग्रामीण जाणिवेचे सर्जनशील लेखक आहेत. अनेक समकालीन संदर्भाने त्यांचे लेखन अधिक परिणामकारक ठरते.नुसत्या रंजन करणाऱ्या विषयापेक्षा त्यांना ज्वलंत सामाजिक विषयाशी बांधिलकी महत्त्वाची वाटते म्हणून ग्रामीण जाणीव अधिक तेजांकित होऊन त्यांच्या लेखनातून प्रसृत होत असते. त्यांच्या मते ग्रामीण समाजजीवनातील वेदना ,संघर्ष ,दुःख हे खऱ्या अर्थाने जगण्यातील सौंदर्य ठरते. कलावंत म्हणून कलाभानाबरोबरच समाजभान राखणे हा सदानंद देशमुख यांच्या लेखणीचा विवक्षित गुणधर्म आहे. ग्रामीण मूल्यजाणिवेच्या अनेक कडा त्यांच्या लेखनाला अधिकाधिक समृद्ध करीत असतात.त्यांच्या साहित्यातून शेतकरी जीवनासंबंधीचे अनेक मूलभूत प्रश्न उपस्थित करून जगासमोर मांडण्याचा त्यांचा प्रयास हा एकप्रकारे सामाजिक बांधिलकी स्वीकारणारा आहे.आधुनिकीकरणाच्या नावाखाली शेतीची होत चाललेली नासाडी ही एकप्रकारे कृषिसंस्कृती आणि कृषक समाज नष्ट करून मोठया व्यापाऱ्यांसाठी शोषणाची सुनियोजित अशी रूपरेषा आहे याचे सूक्ष्मातिसूक्ष्म स्तर देशमुखांच्या कादंबऱ्यांत सुस्पष्ट होत जातात. मातीत राहून,मातीशी इमान राखून मातीमधले जीवन किती ऊर्जस्वल असते याची जाणीव त्यांच्या कादंबऱ्या वाचताना होत असते. आज इंग्रजी शिक्षणामुळे आणि

यांत्रिकीकरणामुळे अनेक मराठी बोलीभाषेतील शब्द लोप पावलेले आहेत. यामुळे मराठी भाषेचे समृद्ध वैभव नष्ट होत आहे अशावेळी देशमुखांच्या लेखनातून अनेक ग्रामीण बोलीभाषेतील शब्द पुनर्जीवित झाले ही मराठी भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब ठरते. अनेक वापरात नसलेल्या आणि विस्मृतीस गेलेल्या म्हणी आणि वाक्प्रचार त्यांच्या लेखनातील झळाळणारी अलंकार आहेत .एका अर्थाने माय मराठीची निर्हेतुक सेवा त्यांच्या हातून घडत आहे.देशीयता हे मूल्य त्यातून आपोआप वृद्धिंगत होत जाते. मूळ बोलीभाषेतील शब्द ,संस्कृती,चालीरीती यातून त्यांच्या लेखनातील देशीयता स्पष्ट होत जाते.

**निष्कर्ष**

१) सदानंद देशमुख हे ग्रामीण जाणिवेचे संवेदनशील लेखक आहेत. आपल्या लेखनातून ग्रामीण जीवनातील सूक्ष्मातिसूक्ष्म जीवनजाणिवा अधिक तीव्रतेने मांडणे त्यांच्या लेखनाचा प्रमुख गुणधर्म आहे.

२) कलाभानाबरोबरच सजग समाजभान ठेऊन अनेक समकालीन संदर्भ कवेत घेऊन त्यांची कलाकृती खऱ्या अर्थाने 'नवनवोन्मेषशालिनी' ठरते.

३) सदानंद देशमुख सर्जनशील लेखक म्हणून आपल्या आसपासच्या समकालीन घडामोडी टिपून त्यांना आपल्या लिखाणातून अधिक प्रखरपणे मांडतात.

४) स्वतः देशमुख शेतकरी कुटूंबातील असल्यामुळे त्यांची शेती, शेतकरी आणि निसर्गाविषयीची जाणीव अधिक समृद्ध आहे.

५) त्यांच्या लेखनात अतिरिक्त रंजनप्रधानता दिसून येत नाही.वास्तववादी घटकांना ते आपल्या लेखनात स्थान देतात.

६) जागतिकीकरणाचा ग्रामीण जीवनावर पडलेला विपरीत प्रभाव व त्यातून शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारी निराशा ,आत्महत्या त्यांच्यातील लेखकाला अस्वस्थ करताना दिसते.

७) ग्रामीण बोलीभाषेतील विस्मृतीस गेलेले शब्द ,म्हणी ,वाक्प्रचार त्यांच्या लेखनाला वाङ्मयीन सौन्दर्य बहाल करते. त्याचबरोबर त्यांच्या लेखनातील देशीयता हे मूल्य सहज जाणवते.

**संदर्भग्रंथ टिपा**

*१) सदानंद देशमुख : 'तहान' कादंबरी,( मनोगत) कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे प . आ . १९९८*

*२) डॉ .विजय पाटील : 'बारोमास: एक अन्वयार्थ"कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे प . आ . २०११,पृ.क्र. ३०*

# जगतिकीकरणामुळे समकालीन भाषेचे बदलते स्वरूप

**डॉ. मृदुला निळकंठ रायपुरे**

*सहाय्यक प्राध्यापक, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर*

*मो.नं. ९९७५०३३०२७ ईमेल — mrudulajanglekar@gmail.com*

***सारांश***

*जागतिकीकरण ही संकल्पना मूळची आर्थिक क्षेत्राशी निगडीत असली तरी तिचा प्रभाव मानवी जीवनाच्या प्रत्येकच क्षेत्रावर पडला आहे. विशेषतः भाषेवर व साहित्यावर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. बदलत्या काळातील भाषाबदल अपेक्षित असला तरी त्या बदलाचा क्रम विधायक आणि सकारात्मक असावा. तसा तो नसेल तर भाषेचे व साहित्याचे मौलिकत्व हरवून बसते. कधी कधी तर भाषेच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभा राहतो. अशावेळी भाषेचे व साहित्याचे अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात.*

***बीजसंज्ञा*** *— जागतिकीकरण, समकालीन भाषा, बदलते स्वरूप*

**प्रस्तावना —**

मानवी जीवनाचे अस्तित्व भाषेमुळे आहे. मानवाने आज जी दैदिप्यमान प्रगती केली आहे, ही प्रगती होऊ शकली नसती जर त्याने भाषा अवगत केली नसती ! भाषा हे संवादाचे, संपर्काचे व व्यवहाराचे महत्वाचे माध्यम असले तरी आपल्या प्रतिभेच्या, कल्पनाविलासाच्या बळावर मानवाने साहित्याची निर्मिती केली. साहित्यनिर्मिती हा मानवाचा असा आविष्कार आहे, ज्यामुळे निसर्गातील गूढाशी तो आपले नाते जोडतो. अणूरेणूंचे अनुभव शब्दबध्द करून त्या विश्वनिर्मात्याशी अनुबंध जोडतो. अन्य कलांप्रमाणे साहित्य कलेतही मानव स्वतःचा शोध घेतो, टप्प्याटप्प्याने उन्नत अवस्थेकडे पोचण्याचे कार्य करतो.

उच्च श्रेणीचे मानव्यच साहित्याची निर्मिती करू शकते. चराचरावरील प्रेमाचे झरे या साहित्याने जपून त्याचा महासागर बनविला आहे. शाश्वत असलेले, मनाला भावणारे साहित्य म्हणजे वेदनेचे साहित्य होय. अस्सल जावनानुभवातून जे साहित्य अवतरते तेच उदात्ततेच्या पातळीवर जाऊन वाचकांचे मानसिक आंदोलन घडवून आणते. याचे उदाहरण द्यायचे झाल्यास आंबेडकरी साहित्याचे द्यावे लागेल. या साहित्याने जगाला पटवून दिले की आनंदापेक्षा वेदनेत अधिक ताकद असते. परकियांच्या साहित्याची आयात करून कितीही दर्जेदार साहित्य निर्माण केले तरी वास्तवाच्या पातळीवर ते ओयासिस सारखे असते. हे ओयासिस तहानलेल्या माणसाची तृषा भागवू शकत नाही. स्वतःच्या कष्टाने, अनुभवाने खोदलेल्या विहिरीचे पाणीच मानसिक समाधान देवू शकते.

साहित्य अशा तऱ्हेने मानवी जीवनाला व्यापून आहे. क्षणभंगूर जीवन—अनुभवाला अक्षरत्व मिळते, ते साहित्याने. म्हणून साहित्याचे मानवी जीवनात फारच मोलाचे स्थान आहे.

साहित्याच्या प्रारंभावस्थेपासून ते समकालीन साहित्यापर्यंत पाहू जाता एक समान वैशिष्ट्य आपल्याला आढळून येते ते हे की, बदलत्या काळाचे, नाना विचारसरणीचे, राजकीय सत्तांचे प्रतिबिंबच साहित्यात उमटते. म्हणजे चालू काळात ज्या—ज्या घटना घडतात, त्या घटनांमधूनच साहित्याला वाट मिळते. गेल्या दीड वर्षांपासून पाहिले तर कोविड—१९ आणि कोरोना या संकल्पनांनीच साहित्य व्यापले आहे. म्हणून सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक कांगोरे तपासायचे असतील तर त्या त्या काळात तयार झालेल्या साहित्याकडेच पहावे लागते.

साहित्यिक ही एक सजग, संवेदनशील व चिंतनशील मनाची व्यक्ती असते. आसपास घडत असलेल्या घडामोडींचे तरंग तिच्या मनावर उमटत असतात. तसे ते सर्वांच्याच बाबतीत होते. मात्र साहित्यिकाला ते शब्दांत, कलात्मकतेचा साज लेवून मांडता येते, हे त्यांचे खास कसब असतात. हा साहित्यिक समाजानेच घडविलेला असतो. १९९० नंतर जागतिकीकरणामुळे जो समाज घडला, त्या समाजाचा व त्यातील घटकांचा तसेच या सर्वांचे पडसाद साहित्यावर कसे पडले, याचा विचार करावा लागेल.

**जागतिकीकरण —**

जागतिकीकरण ही संकल्पना मूळची आर्थिक क्षेत्राशी निगडीत असली तरी तिचे पडसाद जनमानसाच्या प्रत्येक क्षेत्रावर पडले. गॅट करार १ जानेवारी १९४८ रोजी अस्तित्वात आला. खरे तर विकसित राष्ट्रांचे हितसंबंध जपण्यासाठी हा करार करण्यात आला होता. या आधारावर १ जानेवारी १९९५ ला जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वाटाघाटींसाठी एक मंच उपलब्ध करणे, आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीसाठी चालना देणे, व्यापार क्षेत्रातील मतभेदांचा निर्वाळा करणे, प्रत्येक राष्ट्रातील व्यापार धोरणांवर लक्ष ठेवणे, विकसनशील व अविकसित देशांसाठी तांत्रिक सहाय्य व प्रशिक्षण देणे, इत्यादी कामे या संघटनेच्या माध्यमातून होतात. आजच्या घडीला भारतासह १६४ देश या संघटनेचे सदस्य आहेत. वरील बाबींकडे लक्ष दिल्यास प्रत्येक देशाच्या व्यापाराच्या अंतर्गत धोरणावरही या संघटनेचे लक्ष आहे. म्हणजे एखाद्या देशातील सत्ताधारी लोकांना हाताशी धरून आपले मनसुबे ही संघटना साध्य करू शकते. (आणि करतही आहे.)

ॲडमिरल विष्णू भागवत यांनी 'जागतिकीकरण नवीन गुलामगिरी' या पुस्तकात जागतिकीकरणामुळे होणाऱ्या अनेक धोक्यांकडे इशारा दिला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांना प्रत्येक देशामध्ये मुक्त व्यापाराची संधी मिळाल्यामुळे ते मनमानी कारभार करतील. देशातल्या अंतर्गत समस्यांशी अशा कंपन्यांना काहीही लेणेदेणे नसते. ''जागतिकीकरणाच्या वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे एकेकाळी एकसंघ असणाऱ्या देशातील घटकराज्यांमध्ये फुटून निघण्याची प्रवत्ती वाढीस लागली आहे', (पृ. १४) असा धोका भागवत यांनी अनेक उदाहरणांवरून व्यक्तविला आहे. अंतर्गत कलहामुळे कुठलाही देश एकसंघ फार काळ तग धरून राहू शकत नाही. दुर्बल

झालेले राष्ट्र गुलामगिरीच्या मार्गावरच जाणार यात शंका नाही. जागतिकीकरणाचे काही सकारात्मक वैशिष्ट्य असले तरी जागतिकीकरणामुळे होणारे समाजातील संघर्ष हे सर्वात घातक वैशिष्ट्य आहे. याचे दूरगामी परिणाम समाजावर, संस्कृतीवर व भाषेवर होत आहेत.

**समकालीन भाषेचे बदलते स्वरूप —**

भाषा हे संपर्काचे, संवादाचे माध्यम आहे. जागतिकीकरणामुळे सामान्य माणसाची जीवनशैली फार बदलून गेली आहे. त्यामुळे त्याची भाषाही बदलली. महाराष्ट्राचा विचार करता संतवाणीची परंपरा या प्रदेशाला लाभली आहे. संतांनी आपल्या ओघवत्या व अनुभवाच्या भाषेतून समाजाचे मार्गदर्शन केले. साहित्यिक सोडा पण सर्वसामान्य माणूसही या संतवचनांचा वापर करत. आपल्या दैनंदिन जीवनामध्ये या संतांच्या विचारांचा अंतर्भाव करून समाजाला संस्कारक्षम बनवत. आज मात्र चित्र बदललेलं आहे. संतवचन तर दूरच पण संतांविषयीही समाजातील लोकांना काहीही सोयरसुतक राहिलेलं नाही. केवळ त्यांच्या नावाचा सोहळा साजरा करणे एवढेच आता उरले आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात ही संस्कृती हळूळळू लोप पावत चाललेली आहे. मराठी माणसाच्या घरातील लहान मुले 'आई' हा शब्दच आता वापरत नाही. त्यांना 'मम्मी', 'मॉम' असे शब्द अधिक चांगले वाटतात. आपली भाषा ज्यावेळी आपल्याला गावंढळ वाटायला लागते तेव्हा समजून जायचे की आपला ऱ्हास सुरू झाला आहे. काही काही शब्द तर त्यांच्या न वापरण्यामुळे भाषेतून बाद झाले आहेत. कुणी जाणुनबुजून वाटे जात असेल तर माझी आई याला एक शब्द वापरायची **'तात्नापुरशी'**. हा शब्द अनोखा वाटतो. हा शब्द नेमक्या कोणत्या भाषेतून आला हे ठाऊक नाही मात्र एका छोट्याशा खेड्यात राहिलेल्या, अशिक्षित असलेल्या माझ्या आईच्या तोंडी हा शब्द नेहमी असायचा. हा शब्द तिच्या समकालीन लोकांच्याही वापरात होता. असे असंख्य ग्रामीण भागातील शब्द आहेत जे आज कुणीही वापरताना दिसत नाही. उलट ग्रामीण बोली आता बोलली की आपल्या ऐपतीला ते शोभत नाही, असे वाटून पांढरपेशा समाज आता हळूहळू आपली बोली त्यागत आहे.

यासोबतच भाषेतील मार्दवता ही सुध्दा लोप पावत चालली आहे. बीभत्स, ओंगळवाणी भाषा आज समाजमाध्यमातून सर्रास वापरली जात आहे. चित्रपटातील संवाद, गीते यांमध्ये अश्लिल शब्दांचा अतिरेकी वापर केला जात आहे. हेच शब्द मग समाजात बिनतक्रार बोलले जातात आणि समाजमन त्याचा नकळत स्वीकारही करते. 'आईचा घो' हा शब्द किती सामान्य झाला आहे. या सर्वांमुळे भाषेतली नजाकत हरवून जाते. बदलत्या जीवनशैलीचा परिणाम भाषेवर आणि संस्कृतीवर होत आहे. या संदर्भात 'मराठी भाषिक आणि वाङ्मयीन संस्कृती' या पुस्तकात कौतिकराव ठाले पाटील यांनी एक उदाहरण दिले आहे ते असे, '' आजी—आजोबाने सांगितलेल्या गोष्टींमधून रंजनाबरोबर नीतिविचार रूजवला जातो, आपल्या

समाजाच्या जगण्याची व जीवनव्यवहाराची अशा कथांमधून कळत नकळत पूर्वपीठिका बिंबवली जाते, तिचा बालमनावर जो खोलवर परिणाम होतो त्याचा ठसा दीर्घकाळ उमटलेला असतो व त्याचा उपयोग पुढे त्यांच्या जगण्यामध्ये नीतिमत्ता व सुसंस्कृतता आणि आपल्या संस्कृतीचे व परंपरांचे भान आणण्यासाठी होत असतो. 'एकव्यक्तीय पालका'च्या कंटुंबातील मुलांना आजी—आजोबांचे हे मौखिक नीतिसाहित्य, संस्कृतीची व परंपरांची पूर्वपीठिका मिळू शकणार नसल्यामुळे आपल्या पूर्वजांच्या सांस्कृतिक वारशापासून ती मुले तुटतील व असंस्कृतिकरणाच्या भोवऱ्यात सापडून भिरभिरत राहतील. मग अशा परिस्थितीत त्यांना आपल्या भाषेचे, आपल्या संस्कृतीचे सोयरसुतक उरणार नाही.''(पृ. ३५) या अवतरणावरून ठळकपणे एक बाब जाणवते की जागतिकीकरणामुळे जी जीवनशैली बदलली त्याचे दूरगामी परिणाम भाषेवर आणि संस्कृतीवर पडले आहेत. आणि हे परिणाम काही चांगले नाहीत. भाषेची अधोगती म्हणजे मानवी जीवनाचा ऱ्हासच आहे.

भाषा भ्रष्ट किंवा प्रदूषित झाली तर मानवाचे अस्तित्वही तसेच भ्रष्ट व प्रदूषित होईल, यात शंका नाही. अशा भाषेतून तयार होणारे साहित्य हे सवंग आणि निम्न दर्जाचे राहील. दर्जेदार साहित्याचा मंच संकुचित असतो. तो संख्येने अधिक असलेल्या बहुजन समाजाला व्यापत नाही. ही एक मोठी अडचण आहे. जागतिकीकरणामुळे जे बदल झाले त्याचा साहित्यावरील परिणाम याबाबात एक लक्षणीय निरीक्षण वसंत आबाजी डहाके यांनी केले आहे, '' कवी, लेखक यांच्या भोवती जे राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, भाषिक पर्यावरण असते त्याचा त्यांच्या दृष्टीकोणांवर आणि लेखनावर परिणाम होत असतो. हे प्रभाव आत्मसात करताना ते वाङ्मयीन संस्कारही स्वीकारत असतात. नव्वदोत्तरी पिढीने साठोत्तरी पिढीचे संस्कार स्वीकारले आणि आपले वेगळ्या प्रकारचे लेखन केले.''(पृ. २७)

जगतिकीकरणामुळे समाजात फुटीरतावादी वृत्ती बळावत चालल्याने त्याचा परिणाम साहित्यावरही पडत आहे. विज्ञाननिष्ठ युगात लोक आणखीनच धर्मश्रध्द झाले आहेत. समाज गटागटात विभागला गेला आहे. एक राष्ट्र होण्यासाठी साहित्याचं योगदान कमी पडत आहे. हरिश्चंद्र थोरात यांनी म्हटल्याप्रमाणे, ''आधुनिकतेने आणि आधुनिकीकरणाने निर्माण केलेले प्रश्न सोडवण्याचा आभास निर्माण करण्यासाठी आता आपण भूतकाळाचे पुनरूज्जीवन करण्यामागे लागलो आहोत. आपण एकप्रकारे भयग्रस्त झालो आहोत. दुर्दैवाची गोष्ट अशी की या भयग्रस्ततेचे प्रामाणिक चित्रणही आपल्याला करता येत नाही. कळीचे प्रश्न टाळले की लिहिणे फार सोपे होते. भोवताली चाललेल्या उलाढालींच्या मुळाशी काय आहे, हे शोधण्याची प्रवृत्ती उणावली की वास्तवाच्या अकर्मक, निष्क्रिय प्रतिरूपणाला महत्त्व येते. तसेच आपले झाले आहे. मराठी साहित्याच्या कक्षा रूंदावल्या, नव्या अनुभवविश्वांनी साहित्यात प्रवेश केला, साहित्यसत्तेचे विकेंद्रीकरण झाले, म्हणून खूष होऊन गाफील

राहण्यासारखी परिस्थिती आज आहे, असे वाटत नाही. आत्मसंतुष्टतेची आवरणे भेदून वस्तुस्थितीचे विच्छेदन करण्याचे आव्हान आज आपल्या साहित्य—संस्कृतीसमोर उभे आहे.'' (पृ. २०४—२०५) हे आता साहित्यिकांना कितपत पेलवते ते बघायचे आहे.

**निष्कर्ष —**

१. जगतिकीकरणाने मनुष्य अधिक व्यक्तीकेंद्री बनला आहे. त्याची जीवनशैली बदलली.
२. बदलत्या जीवनशैलीचा विपरीत परिणाम मानवी भाषेवर, साहित्यावर व संस्कृतीवर झाला आहे.
३. समकालीन भाषेत भाषाप्रदुषणाचा शिरकाव झाल्याने भाषिक सौंदर्यावर त्याचा परिणाम झाला आहे.
४. जागतिकीकरणामुळे ढासळलेल्या सामाजिक नीतिमत्तेला साहित्यच सांभाळू शकते. फक्त ते साहित्य भाषिक, सांस्कृतिक प्रदूषणापासून दूर राहिलेले असावे.

**संदर्भ —**

*अध्यक्षीय भाषण, डहाके वसंत आबाजी, ८५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, चंद्रपूर*
*'जागतिकीकरण नवीन गुलामगिरी', भागवत विष्णू, समता प्रकाशन, नागपूर, तृ.आ. २००७*
*'नव्वदोत्तर मराठी साहित्य', डॉ. सत्यवान मेश्राम गौरवग्रंथ, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ. २०१८*
*'मराठी भाषिक आणि वाङ्मयीन संस्कृती', ठाले पाटील कौतिकराव, शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्र.आ. २०१२*
*'साहित्याचे संदर्भ', थोरात हरिश्चंद्र, मौज प्रकाशन, मुंबई, दु.आ. २०१२*

# समकालीन स्त्रीवादी प्रवाह

**श्री भगत किशोर बाबुराव**

साहित्य हे सामाजिक कला असल्यामुळे ते नेहमी परिवर्तनशील आणि गतिमान असते. मराठी साहित्याचे साधारणत: तीन कालखंड मानले जातात. प्राचीन, आर्वाचीन आणि समकालीन साहित्य. समकालीन साहित्य म्हणजे “ज्या साहित्यामध्ये तत्कालीन परिस्थितीतील जीवन जाणिवा, भावानुभव, विचार व्यक्त होतात त्याच बरोबर तत्कालीन परिस्थितीचे प्रतिबिंब ज्या साहित्यात अविष्कृत होते असे साहित्य होय.”

साधारणत: १९४५ नंतरचा कालखंड समकालीन साहित्याचा समजला जातो. इ.स. १९६० नंतर अमेरिकेमध्ये स्त्रीवादाचा विचार व प्रसार जोमाने झाला. ज्या साहित्यातून प्रस्थापितांविरूध्द बंड करीत आपल्यावर झालेल्या अन्यायाची जाणीव तसेच ही जाणीव करून देत असताना स्वत:च्या सक्षमतेची ओळख करून दिली जाते. अशा साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हटले जाते. प्रारंभी स्त्रियांचे लेखन समाज सुधारणेच्या चळवळीने प्रभावित झालेले दिसते. त्यानंतर स्त्री स्वातंत्र्याचा विचार जोर धरू लागला. स्त्रीला दैनंदिन जीवन जगत असताना अनेक प्रसंगाला (समस्यांना) सामोरे जावे लागते तिला समाजात नेहमीच दुय्यम स्थान दिले गेले आहे. तिचा माणूस म्हणून विचार होत नाही. सिमॉन द बोव्हा म्हणते:— बाई म्हणून कोणी जन्माला येत नाही. नंतर तिला बाई बनवल जात आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर स्त्री जनजागृतीमुळे, शिक्षणामुळे तिला तिच्या हक्काची व अधिकाराची जाणीव झाली आहे. आतरराष्ट्रीय महिला दशक (१९७५ ते १९८५) या कालावधी मध्ये महिला विषयीचे हक्क, तिचे अधिकार याविषयी जनजागृती करण्यात आली. आपल्याला आलेले अनुभव, आपले विचार, जीवन जाणिवा साहित्यातून स्त्रिया व्यक्त करू लागल्या. शारीरिक गरजांपलिकडे आपली काही मानसिक भूक आहे आणि तिचा प्रचंड कोंडमारा आपण निर्माण केलेल्या स्त्रीत्वाच्या सापळयामध्ये होतो. या विचारांच्या जाणीवेने स्त्री आपला मार्ग शोधण्याचा प्रयत्न करताना दिसते. यातूनच आपल्या ‘स्व’ ची ओळख, ‘स्व’ तंत्राची गरज आणि स्वायत्ततेची नैसर्गिक जरूरी याकडे स्त्रियांचा प्रवास सुरू झाला. सामाजिक व राजकीय घडामोडींमध्ये स्त्रीयांच्या क्रियाशील सहभागाची मागणी केली जाऊ लागली. ‘स्त्री’ म्हणून आपल्यावर लादलेल्या भूमिकांना नकार देण्याची ताकद स्त्रीमध्ये येऊ लागली. ‘स्त्री’ म्हणून विवाहसंबंधांना आलेले फाजील महत्व त्यातील स्त्रीची संपूर्ण शरणागतीची भावना आईपणाला मिळणारे नैतिक मूल्य शारीरिक गरज म्हणून स्त्रीकडे पाहण्याची वृत्ती या गोष्टीमधील ढोंगीपणाला स्त्रीयांनीच आव्हान दिले व पुरूषांप्रमाणेच केवळ माणूस म्हणून जगण्याची आपली

आंतरिक ओढ कृतीतून व्यक्त करायला सुरूवात केली. हया माणूसपणाची जाणीव होणे व ते मिळवण्यासाठी लढा देणे ही स्त्रीवादी विचारांची पार्श्र्वभूमी आहे. इतिहासात स्वातंत्र्यासाठी अनेक लढे झाले व त्यात स्त्रीयांनीही आपले योगदान केले पण स्त्रीयांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मात्र फार लढे लढले गेले नाहीत.स्त्रीयांच्या स्वातंत्र्याच्या चळवळीतून स्त्रीवादी साहित्याची बैठक तयार होत गेली.

राजा राममोहन रॉय यांना स्त्री सुधारणेचे आद्य प्रवर्तक मानले जाते. त्यांनी सतीच्या चालीविरूध्द चळवळ उभी केली. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाविरूध्द आवाज उठवला मृत पतीच्या मालमत्तेत मुलांसोबत वाटा मिळाला पाहिजे असा विचार त्यांनी मांडला. महादेव गोविंद रानडे यांना आधुनिक महाराष्ट्राचे जनक मानले जाते. ते स्त्री – पुरूष समान हक्कांचे कट्टर पुरस्कर्ते होते. महात्मा फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. तसेच डॉ. आंबेडकर यांनी हिंदू स्त्रीला हिंदू पुरूषांच्या बरोबरीने हक्क आणि अधिकार मिळावेत म्हणून 'हिंदू कोड बिल' तयार केले होते या चळवळीतून स्त्रीवादी साहित्याची पायाभरणी झालेली दिसते. स्त्रीवादी साहित्याची भूमिका जशी प्रस्थापितांविरूध्द बंड करण्याची आहे. त्याचप्रमाणे 'शोधका' ची देखील आहे. हा शोध स्वत:चा आहे आणि आपल्याला मिळालेल्या दुय्यमत्वाची जाणीव झाल्यानंतरचा आहे.

भारतात १९ व्या शतकात स्त्रियांच्या अधोगतीला पुरूष निर्मित मूल्यव्यवस्थाच कशी जबाबदार आहे याचा सर्वांगीण विचार करणारा 'स्त्री पुरूष तुलना' हा निबंध ताराबाई शिंदे यांनी लिहून स्त्रीवादी लेखनास सुरूवात केली. त्यांनी स्त्री – पुरूष विषमतेचा विचार या निबंधात मांडला आहे. त्या म्हणतात 'जर बायकोचा नवराच देव तर नवऱ्याची वागणूक देखील देवाप्रमाणेच पाहिजे. अशी स्त्री – पुरूष समानतेची भूमिका त्यांनी घेतली आहे. हा निबंध पुरूष सत्तेचा उपमर्द करणारा आहे परंतु त्याच बरोबर स्त्री शक्तीचा मागोवा घेणारी व तिला पुरूष सत्तेचा प्रतिवाद करण्यासाठी नवा मार्ग शोधण्यास प्रवृत्त करणारा आहे. खऱ्या अर्थाने भारतीय स्त्रीवादाची ही वैचारिक चौकट प्रथम ताराबाई शिंदे यांनी पुरविली आहे. पुरूषकेंद्री स्त्री प्रतिमेला पहिला छेद विभावरी शिरूरकर यांनी 'कळयांचे नि:श्वास' मधून दिला त्या म्हणतात 'बाबांचा संसार माझा कसा होणार ? असा प्रश्न विचारून प्रौढ कुमारिकांच्या प्रश्नांची स्त्रीवादी मांडणी केलेली दिसते.

शांताबाई किर्लोस्कर यांनी 'स्त्री' या मासिकातून सिमान द बोव्हा यांच्या 'सेकंड सेक्स' या पुस्तकाचा सार रूपाने अनुवाद केला. त्यामुळे महाराष्ट्रातील स्त्री विचाराला चालना मिळाली. 'बायजा' आणि 'मिळून साऱ्याजणी' अशा नियतकालिकांमधून स्त्रियांच्या प्रखर जाणिवांचा अविष्कार होऊ लागला. गीता साने, तारा भवाळकर आणि आ.ह. साळुंखे यांनी मराठी भाषेत स्त्रियांच्या समानतेसंदर्भात मौलिक लेखन केलेले आढळते.

समकालिनतेची मुळे वर्तमान काळात पसरलेली असतात त्या अगोदर ती भूतकाळात रूजलेली असतात आणि भविष्यकाळाच्या दिशेने त्या मुळांशी वाढ होत असते. ताराबाई शिंदे, विभावरी शिरूरकर इ. स्त्री लेखिकांकडून प्रेरणा घेऊन अनेक स्त्री लेखन करू लागल्या. १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला परंतु स्त्रीयांचे प्रश्न, त्यांच्या समस्या कमी झाल्या नाहीत. त्यांच्या समोर अनेक आव्हाने उभी राहिली. 'स्त्री स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार' अशा प्रकारची प्रतिक्रिया पुरूष वर्गातून व्यक्त झाली. स्त्रीयांनी आपल्याला आलेले चांगले — वाईट अनुभव यासाठी जबाबदार असणारी पुरूषी मानसिकता आपल्या मनातील खदखद साहित्यातून व्यक्त करताना दिसतात. कवयित्री निरजा यांनी पांचालीच्या दु:खातून स्वत:च्या शरीरालाच प्रश्नांकित करणारी भाषा वापरली आहे. अर्थार्जन करणाऱ्या प्रौढ कुमारिकांचे अनुभव विश्व 'रंग' या कथेत कमल देसाई यांनी चित्रीत केले. अनिता काळे यांच्या कथामध्ये लैंगिक अनुभव, कुमारी माता, कुटुंब नियोजन असे विषय आलेले दिसतात. मलिका अमर शेख यांचे 'मला उदध्वस्त व्हायचय' हे आत्मचरित्र आपल्या स्वतंत्र अस्त्विासाठी आणि आकांक्षेसाठी वेदना आणि विद्रोह व्यक्त करताना दिसते. स्त्री — पुरूष मैत्री आणि प्रेमाची विविध रूपं गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यातून प्रकट झालेली दिसतात. समाजामध्ये वावरत असताना एकटया स्त्रीला भोगावा लागणारा वनवास 'मी वनवासी' या आत्मचरित्रातून सिंधूताई सपकाळ यांनी आपल्या समोर मांडला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणामुळे, राजकीय हक्कांमुळे स्त्रीची पारंपारिक प्रतिमा बदलल्याची दिसेल. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय — अत्याचाराविरूध्द स्त्रिया संघटित आवाज उठवत आहेत. स्त्री — पुरूष विषमतेवर हल्ला करत आहे.

स्त्रीची अनेक रूपे आहेत. तिला अदिमाता असेही म्हटले जाते. ती जशी अष्टावधानी आहे. तसेच वात्सल्य, माया, ममता, प्रेम यांची अथांग सागर आहे. आपल्या कामगिरीचा, कार्यकृत्वाचा ठसा तिने उमटवलेला आहे. आजच्या या आधुनिक जगात स्त्रीने प्रत्येक क्षेत्र पादाक्रांत केले आहे. उदा. देशाच्या सर्वोच्च पदावर श्रीमती प्रतिभा पाटील, देशाच्या अर्थमंत्री पदावर विराजमान असणाऱ्या निर्मला सितारामन आणि नुकत्याच पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री पदावर विराजमान झालेल्या ममता बॅनर्जी इ. प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रीने स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. काही विशिष्ट लेखिका सोडल्या तर स्त्रीवादी साहित्य सरसकट लिहिताना दिसत नाहीत लोकप्रिय परंपरेतील साहित्य लिहिण्याची प्रवृत्ती आजही मोठया प्रमाणावर आहे. तथापि साहित्यातून स्त्रीच्या मानसिकतेचा शोध घेण्याचा प्रयत्न आज बऱ्याच लेखिका करताना दिसतात.

स्त्रीयांच्या साहित्यात त्यांना आलेले अनुभव अविष्कृत झालेले आहेत. तसाच भविष्याचा विचार करून वास्तविक पातळीवर आणखी लेखन होणे गरजेचे आहे. कारण काळ बदलला असला तरी काळाबरोबर समस्या सुध्दा बदलल्या आहेत. नवनवीन आव्हाने समोर

उभी आहेत. समाजातील ज्वलंत प्रश्न स्त्रीभ्रुण हत्या, स्त्री – पुरूष असमान प्रमाण, स्त्री – पुरूष विषमता, दिवसेंदिवस स्त्रीयांवर होणारे अत्याचार, त्यांचा होणारा शारिरीक व मानसिक छळ, स्त्रीचे समाजातील स्थान, स्त्रीकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन या समस्या हे आव्हान पेलण्याची क्षमता, हे विषय निर्भिडपणे साहित्यातून अविष्कृत होणे गरजेचे आहेत. यातूनच खऱ्या अर्थाने स्त्रीप्रबोधन होऊन इतर महिलांना प्रेरणा मिळाल्या शिवाय राहणार नाही. म्हणूनच व्हर्जिनिया वूल्फ म्हणतात – 'तुम्ही लिहा तुमच्या देहाचा आवाज इतरांना ऐकू गेला पाहिजे. तरच तुमच्या अबोध मनाचा प्रचंड खजिना खुला होऊन सर्वांना दिपवून टाकेल.

**संशोधन पध्दती :—** समकालीन स्त्रीवादी साहित्य प्रवाह या शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दती निवडण्यात आलेली आहे.

एकूणच समकालीन स्त्रीवादी साहित्य प्रवाह या विषयानुशंगाने खालील निष्कर्ष हाती लागतात :—

**निष्कर्ष :—**

१) स्त्रीवादी साहित्याला स्वत:चे वाङ.मयीन मूल्य आहे.

२) स्त्रीवादी साहित्य अनुभव केंद्रीत आहे.

३) स्त्रीयांची स्वशरीरनिष्ट अनुभवांच्या भाषेमुळे मराठी भाषा समृध्द झाली आहे.

४) समकालीन स्त्रीवादी साहित्याचे महत्व अनन्यसाधारण असून ते निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी आहे.

५) समकालीन स्त्रीवादी साहित्याने मराठी साहित्याचा कक्षा रूंदावल्या असून मराठी साहित्य समृध्द केले आहे.

६) मराठी साहित्यात स्त्रीवादी साहित्य निर्माण होणे काळाची गरज आहे.

७) स्त्रीवादी साहित्यात तत्कालीन वास्तविक परिस्थितीबरोबर भविष्याचा वेध घेणारे लेखन होणे गरजेचे आहे.

**सारांश**:— समकालीन स्त्रीवादी साहित्य हे अनुभव केंद्रीत, वाचनीय व विवेकशील आहे. तसेच ते परिस्थितीशी सुसंगत व परिपोषक आहे.

**संदर्भ:—**


*१) डॉ. लिंबाळे शरणकुमार – साठोत्तरी मराठी वाङ.मयीन प्रवाह, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. २५१ क, शनिवारपेठ, पुणे ४११०३०*

*२) स्वातंत्र्योत्तर वाङ.मयीन प्रवाह – य.च.मु. वि. नाशिक*

*३) साने गीता – भारतीय स्त्रीजीवन, मौज प्रकाशन, मुंबई*

*४) फडके भालचंद्र – मराठी लेखिका चिंता आणि चिंतन, श्री विद्या प्रकाशन, पुणे*

# समकालीन साहित्य प्रवाहात मराठी विज्ञान साहित्याचे योगदान

**रजनीगंधा कंठीराम खिरटकर**
*संशोधक विद्यार्थी, सरदार पटेल महाविद्यालय , चंद्रपूर*
**प्रा. डॉ. सुदर्शन दिवसे**
*मार्गदर्शक, मराठी विभागप्रमुख, कला महाविद्यालय, कोरपना, जि. चंद्रपूर*

**प्रस्तावना:-**

साहित्य हे काळानुसार,युगधर्मानुसार विविध रूप धारण करीत असते ते जीवनाइतकेच नानाविध स्वरूपी असते. माणसाच्या समाजव्यवहाराचे एक अंग म्हणून साहित्याला नेहमीच महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे आणि साहित्याच्या केंद्रस्थानी सुद्धा माणूस असणे अपरिहार्य आहे.साहित्य आणि जीवन कधीच भिन्न राहू शकत नाही. जीवनापासून साहित्याला वेगळे करता येत नाही.साहित्याची निर्मिती प्रक्रिया असो अथवा रसस्वाद यांची प्रक्रिया असो. माणूस त्यांचे जीवन त्यांच्या सभोवतालचे पर्यावरण साहित्याचे प्रधान विषय असतात.जीवनापासून साहित्याला कधीच वेगळे करता येत नाही आणि म्हणूनच,'साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे असे म्हटले जाते.' साहित्याला जन्मास घालणारा लेखकसुद्धा हा समाजाचा सदस्य असतो. त्याने समाजामध्ये राहून तेथील पर्यावरण वातावरण आणि सभोवतालची परिस्थिती याचा सुखात्मक,दु:खात्मक अनुभव घेतलेला असतो, त्यातूनच त्याच्या मनाची जडणघडण होते व ते वास्तव तो आपल्या साहित्यकृतीतून मांडत असतो.साहित्याचा आणि समाजाचा संबंध हा अन्योन्य आहे,हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

परिवर्तन हा समाजाचा स्थायीभाव असतो.समाज हा नेहमी गतिशील असतो. लेखकाची विचारसरणी हीच समाजाशी निगडित असते.सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनाचे पडसाद त्याच्या अविष्कृतीमधून उमटत असतात, हे परिवर्तन वेगवेगळ्या जाणीव प्रवाहांना साकार करीत असते.त्यातील एक स्थिती म्हणजे समकालीन साहित्य होय.साधारणतः विसाव्या शतकामध्ये अभ्यासात समकालीनत्वाचा आग्रह वाढत गेल्याचे पहावयास मिळते.समकालीन साहित्याला स्वातंत्र्योत्तर काळातच मान्यता लाभलेली दिसून येते.साहित्यव्यवहारात नवनवीन प्रवृत्ती आणि प्रवाह निर्माण झालेले आहे.त्यात समकालीन साहित्य,स्वातंत्र्योत्तर साहित्य,स्वातंत्र्यपूर्व साहित्य,नवसाहित्य, साठोत्तरी साहित्य, जनवादी साहित्य,दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, मुस्लिम साहित्य, ख्रिस्ती साहित्य, आदिवासी साहित्य, बालसाहित्य, कामगार साहित्य, जनसाहित्य, अनुवादित साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य,विज्ञान साहित्य इत्यादी साहित्य प्रवाह आणि संकल्पना निर्माण झालेले आहे.यांनी जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे समृद्ध असे साहित्य निर्माण केले आहे.त्यातील समकालीन साहित्य कशाला म्हणतात ते अभ्यासकांच्या मते थोडक्यात पाहूया,

१. मदन कुलकर्णी,"आपल्या आणि आपल्या आसपासच्या बदलत्या कालखंडातील व्यक्ती,घटना, प्रसंग,जीवन-जाणिवा,विचारप्रणाली,भावानुभूती यांचे चित्रण योग्य भान सांभाळून ज्या साहित्यात केले असेल ते साहित्य समकालीन साहित्य ठरेल."१

२. वसंत आबाजी डहाके यांच्या मते,"समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे, ज्या काळात ते निर्माण होत असते. त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे, त्या काळातील विचार,जाणिवा,मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य"२

याचाच अर्थ समकालीन साहित्याची मुळे ही भूतकाळाच्या मातीत रुजूनच ती वर्तमानकाळात पसरतात व भविष्यकाळात त्याची फार मोठ्या प्रमाणात वाढ होत असते.समकालीन साहित्य हे आपल्या काळाशी आणि काळातील परिस्थितीशी जवळचे नाते सांगत असते.समकालीन साहित्याची जडण-घडण त्या काळातील माणसाच्या इच्छा, अपेक्षा, वेदना, विद्रोह, अगतिकता, पराभव यांच्या पायावरच झालेली असते.समकालीन साहित्य त्या काळातील स्थिती आणि प्रवृत्तीचे आकलन करून त्या काळाच्या गाभ्याशी जाऊन भिडण्याचे काम करीत असते. म्हणूनच समकालीन साहित्याची अनेक वैशिष्ट्ये अभ्यासकांनी सांगितलेली आहे.त्यात प्रयोगशीलता, प्रतिभाप्राधान्यता, दुर्बोधता, अश्लीलता यासारखी.

समकालीन साहित्याला स्वातंत्र्योत्तर काळातच खऱ्या अर्थाने मान्यता लाभलेली दिसून येते.तो कालखंड साधारणत: १९४७ च्या पुढील असलेला दिसून येतो.या समकालीन साहित्याचा थोडक्यात धावता आढावा घेतल्यानंतर आपण समकालीन साहित्यात विज्ञान साहित्याचे काय योगदान आहे, ते बघू. या कालखंडात १९९० च्या दशकातील विज्ञान साहित्याचा समावेश आपण त्यात केलेला आहे.मराठी विज्ञान साहित्याला आपल्याकडे अजूनही म्हणावी तितकी प्रतिष्ठा मिळालेली दिसून येत नाही. जरी मराठी विज्ञान साहित्याला शतकाची परंपरा असली तरी मराठी साहित्य विश्वात विज्ञान साहित्य म्हणावे तसे पाय रोवू होऊ शकले नाही. गेल्या शतकभरात अनेक विज्ञान आणि साहित्य क्षेत्रात कार्य करणारे लेखक,संशोधक,वैज्ञानिक मोठ्या कष्टाने अथक परिश्रमाने विज्ञान साहित्याला प्रतिष्ठा मिळवून देण्यास प्रयत्न करत असलेले दिसून येतात.

समकालीन साहित्यात मराठी विज्ञान साहित्याचे योगदान काय आहे? हे पाहण्यापूर्वी विज्ञान साहित्य कशाला म्हणायचे? याचा खुलासा करणे गरजेचे आहे.

**विज्ञान साहित्याचे स्वरूप:-**

मराठी साहित्यात सायन्स फिक्शन या संज्ञेवरून विज्ञान साहित्य ही संकल्पना उदयास आली. मानव आणि निसर्ग यांचा परस्पर संबंध दर्शवून विज्ञान विश्वाचे चित्रण करणाऱ्या कथा,कादंबऱ्या,नाटक, कविता,लघुनिबंध इत्यादी ललित कलाकृतींचा समावेश केला जातो.लोकार्थी विज्ञान आणि ललित विज्ञान हे विज्ञान साहित्याचे दोन प्रकार आहेत. विज्ञान क्षेत्रातील विविध शोध तंत्रज्ञान याची उपयुक्तता या संदर्भातील घटनांचा परिचय लोकार्थी विज्ञान करून देते, तर विज्ञानाचा मानवी जीवनावर होणारा चांगला-वाईट परिणाम व त्यातून निर्माण होणारा मानवी वृत्ती-प्रवृत्तीतील संघर्ष याची परिणामकारकता ललित विज्ञान शाखेतून सूचित होते. विज्ञान साहित्य ही साहित्याची उपशाखा ठरते. विज्ञान साहित्याच्या केंद्रस्थानी माणूस

असतो, परंतु विज्ञान साहित्य हे कल्पनेच्या स्तरावरील नवनिर्मिती असते. शक्यता आणि संभवनीयता यांच्या मर्यादेत तेथे कल्पित वावरत असते. विज्ञान वास्तवाशी संबंधित आहे ,परंतु वास्तवाच्या पार्श्वभूमीत कल्पना असते. त्यामुळे विज्ञान साहित्यात कल्पनेचा व वास्तवतेचा मेळ साधलेला असतो. सुबोध जावडेकर विज्ञान साहित्याची व्याख्या करताना म्हणतात,"आजच्या आणि उद्याच्या विज्ञानाच्या पर्यावरणात घेतलेला मानवी नातेसंबंधाचा आणि अस्तित्वाचा सर्जनात्मक वेध म्हणजे विज्ञान साहित्य"३

विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा माणसांवर होणाऱ्या परिणामांचे चित्रण करणारी शाखा ही विज्ञान साहित्य आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास विज्ञान साहित्य काल्पनिक आणि मनोरंजक असते. लेखकाच्या भाषाशैलीमुळे,कथनशैलीमुळे वाचकाची उत्सुकता ताणली जाते व त्याचे मनोरंजन होते, त्यामुळे हळूहळू का होईना विज्ञान साहित्य लोकप्रिय ठरत आहे.

**विज्ञान साहित्याची वाटचाल:-**

जागतिक साहित्याचा आढावा घेतला तर, विज्ञान साहित्य विशेषत: ललित अंगाने कादंबरी स्वरूपात दोनशे वर्षाहून जुने नाही. सुमारे अठराशे नंतर जगात स्वतंत्र साहित्य म्हणून विज्ञान साहित्याचा अवतार झाला. सर्वप्रथम फ्रेंच लेखक ज्यूल्स व्हर्न त्याने पृथ्वी मध्याच्या दिशेने प्रवास( १८६४) ,बलूनमध्ये पाच आठवडे(१८५१),चंद्रप्रवास(१८६५),समुद्राखाली(१८६३),या विज्ञान कादंबऱ्या साहित्यात समाविष्ट केल्या.

त्यापाठोपाठ इंग्लिश लेखक एच.जी.वेल्स अमेरिकेत डयुगो जर्नस्बॅक, रशियन लेखक त्सिओल्कोत्स्की, फ्रेंच भाषेत ज्युल्स व्हर्नच्या कादंबऱ्यांना युरोपियन विज्ञान साहित्याची गंगोत्री म्हणतात, अशाप्रकारे जगभरात विज्ञान साहित्यावर लेखन होत असताना भारतात आणि महाराष्ट्रातही नवसाहित्यातील विविध प्रवाहांमध्ये विज्ञान साहित्यात मराठी कथा,कादंबरीचे लेखन होऊ लागले.म्हणूनच १९९० हे वर्ष मराठी साहित्याच्या इतिहासात अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

मराठी विज्ञान कथा व कादंबरीचा इतिहास बराच व्यापक आहे त्यातही १८८० ते १९९० हा मराठी साहित्याच्या क्षेत्रातील कादंबरीचा समृद्ध कालखंड समजला जातो.मराठी विज्ञान साहित्याला या कालखंडात खऱ्याअर्थाने भरभराटीचे दिवस आलेले होते.

**समकालीन साहित्य प्रवाहात मराठी विज्ञान साहित्य प्रवाहाचे स्थान:-**

मराठी साहित्यात विज्ञान साहित्य हे इ.स. १९००च्या आसपास अनुवादित रुपाने अवतरले. त्याची सुरुवात ज्यूल्स व्हर्नच्या कादंबरीचा कृष्णाजी आठवले यांनी 'चंद्रलोकाची सफर' या कादंबरीने झाली.या कादंबरीला मराठी विज्ञान कथात्मक साहित्याचा आरंभ बिंदू मानायला हरकत नाही. यानंतर श्रीधर रानडे यांची 'तारेचे हास्य' ही १९१६ मध्ये मासिक मनोरंजन मध्ये प्रकाशित झालेली विज्ञान कथा, 'रेडियम' ही त्यांची दुसरी कथा, यानंतर 'नवपुष्प करंडक' मध्ये 'अप्रकाशित किरणांचा दिव्य प्रकाश' आणि 'वामलोचना ' या वा.म. जोशी यांच्या दोन विज्ञान कथा, शिवाय '२०१८' ही देवगिरीकर यांची कथा, या नंतर भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात फारसे विज्ञान साहित्य लिहिल्या गेले नाही, त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात अनुवादित साहित्याबरोबर विज्ञान साहित्याचे लेखन सुरू झाले.त्यात भा.रा. भागवत,नारायण धारप,भालबा

केळकर,यशवंत रांजनकर,डॉ.बाळ फोंडके,अरुण हेबळेकर, लक्ष्मण लोंढे, शुभदा गोगटे, निरंजन घाटे, सुबोध जावडेकर, गीता नाईक, जयंत नारळीकर, गजानन क्षीरसागर, सुभाष भांडारकर, राजेंद्र प्रभूने, प्रभाकर पेंढारकर, सुधीर थत्ते,अरुण गडकरी,वर्षा गजेंद्रगडकर,वसंतराव कार्डिले यासारखे अनेक मराठी विज्ञान साहित्यिक ज्यांनी आपल्या विपुल अशा लेखनाने या साहित्य प्रकाराची व्यापकता वाढविलेली आहे.

**मराठीतील समकालीन विज्ञान साहित्य :-**

एकोणिसाव्या शतकातला महाराष्ट्राच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्व आहे, कारण ते राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घडामोडींचे शतक आहे, याच शतकात अनेक नवनवीन जाणिवांचा आरंभ देखिल झाला. याच शतकात मराठी विज्ञान कथा लिहिण्यास सुरुवात झाली. १९८०नंतर म्हणजे १९९० च्या दशकात ती जनसामान्यांपुढे आली.१९७५ पर्यंत विज्ञान आणि साहित्य या मध्ये एक प्रकारची दरी होती,परंतु पुढे १९९० च्या कालखंडानंतर अनेक वैज्ञानिक लेखकांनी आपल्या लिखाणाच्या ताकदीने व शैलीने ही दरी भरून काढण्याचे प्रयत्न केले, त्यात महत्वपूर्ण वाटा डॉ. जयंत नारळीकर यांचा आहे. 'कृष्णविवर' या कथेपासून मराठी विज्ञान कथा लिखाणास सुरुवात केली. या पहिल्याच कथेला मराठी विज्ञान परिषदेच्या कथालेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला. त्यांनी या कथा प्रकारास प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्यांची 'यक्षांची देणगी' व 'अंतराळातील भस्मासुर' हे दोन कथासंग्रह नव्वदोत्तर कालखंडापूर्वी लिहिले गेले व 'टाइम मशीनची किमया' हा कथासंग्रह नव्वदच्या दशकात लिहिला. या कथासंग्रहातील कथा वाचकाच्या भावविश्वाला उलगडताना दिसतात. यातील बहुतेक कथा संगणकाशी निगडित आहे. त्यांनी आपल्या कथासंग्रहामध्ये प्राक्कथा, प्रतीके, विविध विचार संकेतांचा वापर करून कथार्थ परिपक्व करण्याचा प्रयत्न केलेला आहे.नारळीकरांच्या कथा या व्यक्तिरेखांना स्वतःमध्ये सामावून घेताना दिसतात. त्यांनी विज्ञान कादंबरीचे लिखाणसुद्धा केलेले आहे. त्यात 'प्रेषित', 'वामन परत न आला', 'अंतराळातील स्फोट' (१९९२),व्हायरस(१९९६) आणि अभयारण्य(२००२) या कादंबऱ्या लिहिल्या. 'अंतराळातील स्फोट' ही कादंबरी तारकास्फोटाचे दृश्यवर्णन, संस्कृती विनाशानंतरचे पुनर्निर्माण आणि स्फोटचे धोके अशा तीनही काळातील खगोलीय घटनांचे दर्शन घडविते.

'व्हायरस' या १९९६मध्ये लिहिलेल्या कादंबरीत नारळीकर पृथ्वीवरील संगणक प्रणाली दूषित करण्याचे कार्य परग्रह सजीव कसे करतात, त्यातून दिसणारी त्यांची साम्राज्यवादी लालसा याचा छडा लावण्याचे काम पृथ्वीवासीय करतात व त्यांना परतवून लावतात असे वर्णन केलेले आहे. त्यांच्या २००२ मध्ये लिहिलेल्या 'अभयारण्य' कादंबरीतून पृथ्वीवरील जीवसृष्टी म्हणजे परग्रही अतीप्रगत सजीवांनी प्रयोगार्थ रक्षिलेले अभयारण्य आहे,अशी आशय रचना केलेली आहे. विज्ञान आणि रहस्य एकत्र होत असल्याचा अनुभव जयंत नारळीकर यांच्या साहित्यातून येतो.

अरुण हेबळेकर या मराठी विज्ञान साहित्य लिहिणाऱ्या लेखकाने नवदोत्तर कालखंडात विपुल लेखन केले आहे. त्यांच्या आतापर्यंत दहा कादंबऱ्या,दोन लघु कादंबऱ्या आणि दोन कथासंग्रह असे

पुस्तकरूपाने प्रसिद्ध आहे. 'आदित्य','मृत्युंजय' १९९८ 'जोनास आर्क' १९९९ या तीन कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. 'आदित्य' या विज्ञान कादंबरीमध्ये त्यांनी फ्युजन रिॲक्टर(अणुभट्टीचा) विषय घेतलेला आहे.त्यांना ही कल्पना अमेरिकेच्या हायड्रोजन बॉम्ब प्रकल्पावर 'ओपेन हायरमन'ने जे काम केले, त्यावरून सुचली. १९९८मध्ये लिहिलेल्या 'मृत्युंजय' या कादंबरीत मानवी शरीरातील स्नायूंचे रूपांतर प्लास्टिक तंतूत करणारा रासायनिक द्रव्य 'थ्री कॅट नाईन्टी नाईन'संशोधन करणाऱ्या संशोधकांनी या द्रव्याचे सेवन केल्यानंतर त्याच्या शरीरात स्नायुंची जागा प्लास्टिक तंतू घेतात आणि कुठल्याही अग्नीने न जळणारा व शस्त्राने न तुटणारा धागा त्याला मृत्युंजय बनवतो, अशी आगळी वेगळी कल्पना वापरलेली आहे.१९९९ मध्ये 'जोनास आर्क' ही कादंबरी अरुण हेबळेकर यांनी लिहिली. त्यात जोनास आर्क हे मंगळावर निघालेल्या अमेरिकन अवकाशयानाचे नाव आहे. यात आठ अवकाशयात्री काही काळ वस्ती करण्यासाठी मंगळावर जातात. त्यांच्यात परेश शिराली या भारतीयाचा पण समावेश असतो. त्याच्या रूपातून हेबळेकरांनी सौजन्य,सहिष्णुता मानणारा भारतीय माणूस दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

समकालीन नव्वदोत्तर कालखंडात मराठी विज्ञान साहित्यात लिखाण करणारे आणखी एक नाव म्हणजे सुबोध जावडेकर यांचे आहे. त्यांनी 'गुगली' हा कथासंग्रह १९९१ मध्ये प्रकाशित केला यात एकूण अकरा कथांचा समावेश आहे. त्यात 'बुद्धिमत्तेची कसोटी','मित्र मानवाचा', 'माणसाची भाषा', 'अंधारयात्रा ','दुसरे अश्मयुग','वासांसि जीर्णानि','झिरो कॅलरी डायट'सारख्या वैज्ञानिक संकल्पनेवरील कथा आहे.'वामनाचे चौथे पाऊल' हा जावडेकरांचा दुसरा विज्ञान कथासंग्रह १९९४ मध्ये प्रकाशित केल्या गेला. यात त्यांनी उद्याच्या माणसाच्या भविष्याचा वेध घेणाऱ्या अनेक कथांचा समावेश केलेला आहे.त्यातून त्यांनी संपूर्ण जगाला व्यापणाऱ्या विज्ञानाचे पुढील पाऊल कोठे असणार? या प्रश्नाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.'संगणकाची सावली' हा १९९७ मध्ये त्यांचा तिसरा कथासंग्रह प्रकाशित झाला,त्यातून त्यांनी जगावर पडलेली संगणकाची सावली हा माणसाच्या प्रगतीचा किरण आहे? की अशुभाची चाहूल आहे? याचा शोध घेणाऱ्या कथा लिहिल्या.'आकाश भाकिते' हा जावडेकरांचा २००३मध्ये प्रकाशित झालेला चौथा विज्ञान कथासंग्रह. याच विज्ञानाने माणसाला यंत्रमानव केल्यामुळे त्याच्या नातेसंबंधावर झालेले परिणाम दाखविणाऱ्या कथा लिहिलेल्या आहेत.कुरुक्षेत्र हा २००६ मध्ये प्रकाशित झालेला पाचवा कथासंग्रह,यातून त्यांनी कार्पोरेट विश्वामध्ये निर्माण झालेली स्पर्धा व स्पर्धेत टिकविण्यासाठी चढाओढ दाखविणाऱ्या कथांचा समावेश केलेला आहे.अनेक विज्ञान कथा संग्रहाप्रमाणे त्यांची भोपाळ वायू दुर्घटना वरील 'आकांत' ही कादंबरीसुद्धा प्रसिद्ध आहे, शिवाय विविध वैज्ञानिक स्तरावरील लिखाणसुद्धा सुबोध जावडेकर यांनी केलेले आहे. त्यांच्या लिखाणातून अचूक वैज्ञानिक माहिती आणि प्रभावी कल्पनाशक्ती यांचा उत्तम मेळ घालण्यात आला आहे.

निरंजन घाटे या लेखकांच्या कथासुद्धा विज्ञानकथा विश्वाला समृद्ध करतात. त्यांनी नव्वदोत्तर काळात 'जीवनदायिनी'(१९९९)'यंत्रलेखक','मृत्यूदूत','यंत्रमानवाची साक्ष' (२०००)'जीवनचक्र'(२००९)'स्वप्नचौर्य' (२००९) इत्यादी कथासंग्रह तसेच 'युगांधर' (१९९८) त्याआधी 'मच्छर','फिनीक्स','साक्षात्कार','रामाचे आगमन' इत्यादी विज्ञान कादंबऱ्यांचे लेखन केले. त्यांनी यंत्रमानवावर अनेक कथा लिहिल्या, तसेच बऱ्याच इंग्रजी कथा-कादंबऱ्यांचे अनुवाद मराठीमध्ये केलेले आहे.

बाळ फोंडके यांनी 'गुडबाय अर्थ', 'यूरेका', 'अमानुष', 'चिरंजीव', 'गोलमाल', 'अखेरचा प्रयोग' यासारख्या कथासंग्रहांचे लेखन केले. विज्ञानाबरोबरच जागतिकीकरणाचा विचारही त्यांच्या कथांमधून दिसून येतो.

अरुण मांडे हे देखील महत्वाचे विज्ञान साहित्यिक आहे. 'अमाणूस'(१९९६) 'रोबो कॉर्नर'(२००१) हे त्यांचे दोन महत्त्वाचे कथासंग्रह. सूक्ष्म तरल विनोदबुद्धीचा वापर आपल्या कथालेखनात ते करतात.

यशवंत देशपांडे यांचेसुद्धा विज्ञान कथासंग्रह प्रसिद्ध आहे.'उत्क्रांतीच्या शिडीवर' हा त्यांचा कथासंग्रह.

माधुरी शानबाग यादेखील महत्त्वाच्या मराठी विज्ञानलेखिका आहे. इंद्रधनुष्य (२००३) 'पुनर्जन्म' (१९९९) 'सॅप' (२००५) असे तीन विज्ञान कथासंग्रह त्यांचे प्रसिद्ध आहे. त्यांच्या बहुतेक कथांमध्ये स्त्री विश्व साकारण्याचा प्रयत्न केलेला आहे. पंडित विद्यासागर यांची 'सुपरक्लोन' १९९८ मध्ये विज्ञान कादंबरी प्रसिद्ध झाली, तसेच रेखा बैजल ह्यासुद्धा स्त्रीप्रधान लेखन करणाऱ्या लेखिका आहे. त्यांचा 'विज्ञानकथा'(१९९२) हा संग्रह प्रसिद्ध झाला तसेच सुधीर थत्ते आणि नंदिनी थत्ते यांचा 'विज्ञानकथा'(२००६) हा विज्ञान कथासंग्रह प्रसिद्ध झाला, त्यांच्या कथा वास्तविकतेचे दाहक प्रगटीकरण करणाऱ्या आहे. विज्ञानाच्या शोधामुळे मानवासमोर कोणकोणती नवनवीन संकटे आ-वासून उभी आहे, त्याचे परिणाम काय होतील, याचे चित्रण उभे केले आहे.

अनिल गोखले 'आम्ही येत आहोत'(१९९४),एल.के.कुलकर्णी 'शोधयात्रा'(१९९८)ही कादंबरी, जगदीश काबरे 'कालयंत्र' (१९९०) व 'मानवाला हवे आहे तरी काय'(१९९४) या विज्ञानकथा.

संजय ढोले ह्या विज्ञानलेखकाच्या 'प्रतिशोध'(१९९८),'अंतराळातील मृत्यु','अश्म जीव', 'प्रेमाचा रेणू', 'संकरित','डिभंक', 'खुजाबा'इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहे. ना.वा.कोगेकरांचा 'विज्ञान विहार' (१९९०) हा कथासंग्रह, द.व्य. जहागीरदार यांचे 'दुसरा कोलंबस'(१९९५), 'विश्वशांती'(१९९१) हे दोन कथासंग्रह, याशिवाय विजय देवधर 'सारंच फार विलक्षण' (१९९३),अ.पा.देशपांडेंचा 'विज्ञानिती' (१९९०),विनोद भट यांचा 'वैज्ञानिक रहस्यकथा' (१९९९) इत्यादी, अनेक विज्ञान लेखक आपल्या विज्ञान

लेखनाने विज्ञान साहित्य समृद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहे. समकालीन नव्वदोत्तर कालखंडातील अनेक मराठी विज्ञान लेखकांचा व त्यांच्या लेखनाचा आढावा घेतला तर असे दिसून येते की, आजपर्यंत मराठी विज्ञान साहित्यात दर्जेदार लिखाण झालेले आहे. विज्ञान आणि साहित्याच्या मेळ घालून वाचकांची जिज्ञासा कल्पनाशक्तीच्या बळावर जागविण्याचे काम विज्ञानसाहित्याने केले आहे, म्हणूनच आज विज्ञान साहित्य वाचकांच्या पसंतीस उतरतांना दिसते.

**विज्ञान साहित्याचे महत्त्व:-**

१) समकालीन मराठी विज्ञान साहित्य प्रवाहात वैज्ञानिक लेखक आणि वैज्ञानिक शास्त्रज्ञ मानवी आचार-विचार, मूल्य धारणा ,भावना, विवेक, नीतिमत्ता आणि वैज्ञानिक दृष्टिकोण यांचा समन्वय साहित्यातून साधण्याचा प्रयत्न करतात.

२) पर्यावरणविषयक जाणीव-जागृती, जनजागृती, भौतिक सोयी-सुविधा यांचे मानवी जीवनावर होणारे परिणाम,निसर्गात होणारे बदल,यांचा अचूक अंदाज घेण्याचे काम समकालीन मराठी विज्ञान साहित्य करते.

३) विज्ञान हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग झालेले आहे.ते काळाची गरज आहे. विज्ञानाचा स्वीकार करणे अपरिहार्य आहे, याविषयी प्रबोधन करण्याचे कार्य विज्ञान साहित्य करते.

४) सामाजिक अंधश्रद्धा,रूढी,परंपरा यांच्याकडे डोळस वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहण्यास विज्ञान साहित्य शिकविते.

५) विज्ञानाच्या जगात माणसाचे माणूसपण हरवले काय? याचा शोध घेण्यास विज्ञान साहित्य सहाय्य करते.

६) विज्ञान साहित्याने मराठी ललित साहित्याला पोषित व समृद्ध केले आहे.

७) कथा व कादंबरी या साहित्य प्रकारातून काल्पनिक व बोध वादाचा शोध घेण्यास विज्ञान साहित्याचे योगदान आहे.

**समारोप:-**

समकालीन साहित्य प्रवाहात मराठी विज्ञान साहित्याचे फार मोलाचे योगदान आहे. १९व्या शतकात या प्रवाहाचे लेखन मराठीत सुरू झाले व आज पर्यंत ते अव्याहतपणे सुरू आहे. नवनवीन विज्ञान लेखक या प्रवाहात येताना दिसत आहे, हेच खरे बळ हा प्रवाह समृद्ध करण्यास सहाय्यभूत ठरणार आहेत, यामुळे निश्चितच मराठी विज्ञान साहित्याची स्थिती बदलली जाऊन हा प्रवाह अधिकाधिक समृद्ध होणार यात दुमत नाही. वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी व जुन्या-नव्याचा मेळ घालण्यासाठी या सर्व मराठी विज्ञान साहित्यिकांची मोलाची मदत होणार आहे.विज्ञान हे मानवी प्रगतीचे प्रवेशद्वार आहे, हे मराठी विज्ञान साहित्य पटवून देण्यास निश्चित मदत करणार आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

*१) नारळीकर जयंत - विज्ञान आणि वैज्ञानिक,श्री विद्या प्रकाशन ,*
*२) पगारे म. सु, (संपादक) मराठी विज्ञान साहित्य, प्रशांत पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती 2004*
*३) बागुल फुला- मराठी विज्ञान साहित्य: समीक्षा व संशोधन, अथर्व पब्लिकेशन, धुळे, प्रथमावृत्ती जून, 2013*
*४) डॉ.शरणकुमार निंबाळे, (संपादक) साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, दिलीप राज प्रकाशन*

५) *डहाके वसंत आबाजी- समकालीन साहित्य,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*

६) *जावडेकर सुबोध - मराठी विज्ञान साहित्य,*

**संदर्भसूची :-**


१) *कुलकर्णी मदन, साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, (संपादक- डॉ.शरणकुमार लिंबाळे) दिलिपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे, प्रकाशन दिनांक- १५ जून २००६ पृष्ठ १६*

२) *डहाके वसंत बाबाजी, समकालीन साहित्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन, नाशिक, पुनर्मुद्रण मार्च- १९९४, पृष्ठ२*

३) *सुबोध जावडेकर- मराठी विज्ञान साहित्य, पृष्ठ क्र.- ६९*

## समकालीन मराठी कविता

**प्रा. डॉ. गजानन आनंता देवकर**
*कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी जि. नांदेड*
*Email. gajanandeokarmarathi@gmail.com Mob.9403004549*

**प्रस्तावना :** कवितेच्या क्षेत्रामध्ये समकालीन कविता ही महत्त्वाची भूमिका बजावणारी कविता आहे. मराठी कवितेने काळानुरूप विविध आयाम घेऊन वाटचाल केलेली आहे त्यातल्यात्यात समकालीन कविता ही विशेष संदर्भ प्रकट करणारी आहे. जशी मानवी मूल्ये बदलत गेली त्याचे प्रतिबिंब समकालीन कवितेतून दिसून येतात. काळासोबत असणे म्हणजे समकालीन होय. सामाजिक सांस्कृतिक परिवर्तन समकालीन कवितेमध्ये व्यक्त झालेली आहेत. ग्रामीण कविता, दलित कविता, स्त्रीवादी कविता, आदिवासी कविता, महानगरी जाणिवांची कविता, जनवादी कविता, बालकविता आदि कवितेचे प्रकार समकालीन कालखंडामध्ये उदयास आलेले आहेत. ही कविता समग्र मानवी जीवनात झालेल्या परिवर्तनाची आणि स्थित्यंतराची नोंद घेणारी आहे. म्हणून समकालीन कविता ही खूप महत्त्वपूर्ण समजली जाते.१९६० नंतरच्या काळात उदयास आलेल्या कवितेला समकालीन कविता असे म्हटले जाते. काळासोबत ही कविता वाहणारी आहे. इ.स. १९८०,१९९०,२०००,२०१०,२०१० नंतर ची कविता हे समकालीन कवितेचे कालखंड होत. या प्रत्येक काळात लिहिणारा कवी हा महत्त्वाचा घटक आहे. या काळामध्ये घडणाऱ्या सर्व घटनांची नोंद कवीने आपल्या कवितेतून केलेली दिसून येते. " समकालीन हा काल वाचक शब्द आहे. सम म्हणजे समांतर, समान, सोबत. जे साहित्य आपल्या काळाबरोबर असते, त्या काळाच्या समांतर असते. ज्या काळात ते निर्माण होत असते त्या काळातील समाजाचे प्रतिबिंब त्यात पडलेले असते. त्या काळात ज्या घटना घडत असतात. ज्या विचारप्रणाल्या प्रभावी असतात, त्या काळातील समाजातील लोकांची मानसिकता, जाणीवा,मते तयार झालेले असतात, त्यांचे चित्रण ज्या साहित्यात घडते त्याला समकालीन साहित्य असे म्हणतात." असे डॉ. राहुल रजनी यांनी म्हटले आहे. " समकालीन मराठी कविता हे आधुनिक मराठी कवितेचे चौथे पर्व आहे." डॉ.प्रकाश देशपांडे केजकर यांनी म्हटले आहे.

समकालीन कवितेने समकालीन समाज जीवनाला जे आत्मभान आणून दिले त्या जाणिवेने प्रेरित होऊन समकालीन कवींनी कविता लिहिल्या. या कवितेमध्ये सामाजिक आणि वाङ्मयीन दृष्टीने व्यवस्था परिवर्तनाचे विद्रोही मूल्य जाणीव अभिव्यक्त झाली. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये समकालीन मराठी कवितेच्या संदर्भात विवेचन करण्यात आलेले आहे. समकालीन कालखंडात अनेक कवींनी काव्यलेखन केलेले आहे. त्यांचे कार्य खूप अ मौलिक स्वरूपाचे आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मी निवडक कवींच्या कवितेचा आधार घेत शोधनिबंध पूर्णत्वास नेलेला आहे. कवी नामदेव ढसाळ, कवी जगदीश कदम, कवी उत्तम कांबळे, कवी विठ्ठल, वाघ , कवी ज्ञानेश वाकुडकर, कवी माधव जाधव, कवी नामदेव ढसाळ, कवी भुजंग मेश्राम, कवी विनायक तुमराम, कवी बाबाराव मडावी, कवी मंगेश बनसोड , कवी वसंत कन्नाके,कवयित्री नीरजा,

कवयित्री प्रज्ञा पवार , कवयित्री उषाकिरण आत्राम कवयित्री स्वाती शिंदे पवार इत्यादी कवींचा आणि कवयित्रींचा शोधनिबंधामध्ये आढावा घेतलेला आहे, ते पुढील प्रमाणे.

कवी जगदीश कदम यांच्या कवितेतून समकालीन शेतकरी व कष्टकरी यांच्या जीवन संघर्षाची गाथा व्यक्त झालेली आहे. शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे निसर्गावर शेतकऱ्यांचे भवितव्य अवलंबून आहे. पिढ्यानपिढ्या शेतकरीवर्ग हा आहे त्याचा वस्तीमध्ये असून सामना त्यांना करावा लागतो.शेतकऱ्यांच्या वाट्याला सुखाच्या अनुभव कमी दुःखाचे अनुभव अधिक याची दाहकता कमी जगदीश कदम यांनी व्यक्त केली आहे. कर्जबाजारीपणा, नापीकी ही शेतकर्यांच्या पदरात पडलेले आहे. सुखी संसाराची स्वप्ने धुळीस मिळतात. नामदेव शेतकरी या कवितासंग्रहात कवी जगदीश कदम यांनी शेतकरी कुटुंबाची व्यथा मांडली आहे.

" नामदेव शेतकरी
देह झालेला कोळसा
मरणाच्या दारालाच
येई घालून वळसा,
नामदेव शेतकरी
आला कुणब्याच्या पोटी
चालताना मातीवर
जागोजागी आडकाठी
पीक पोटरी तरी
काय त्याचा भरवसा
धडधाकट शरीर
मंदी तुटलेल्या नसा "

कवी जगदीश कदम यांनी शेतकरी समूहाचे भयावह वास्तव उभे केले आहे. पोटरीत पीक आले तरी तरी शेतकऱ्यांचा त्याच्यावर भरोसा नसतो. धडधाकट शरीर असूनही शरीर असूनही आतल्या आत टल्यासारखे अवस्था त्यांची होऊन जाते नाही वासरांना चारा मुंग्या चालू ना थकते नातीगोती उरलेली नाव सांग ना पुरती.

शेतकरी हा जगाचा पोशिंदा होणारे जोपर्यंत आहे तोपर्यंत सावरणार नाही अशी खंत कवी उत्तम कांबळे यांनी व्यक्त केलेली आहे. समकालीन परिस्थिती ही कास्तकर यांसाठी जीवघेणी बनलेली आहे. ते पुढील प्रमाणे:

" शेताच्या काळजावरील
असंख्य भेगावर अश्रू गाळत
बांधावरून फिरणारी माझी कविता जागतिकीकरणाच्या लाटेत
हातातून निसटणारे सबसिडी
गच्च पकडण्याचा प्रयत्न करत होत."

कवी केशव सखाराम देशमुख यांनी सोशीक अस्तित्ववादी मानसिकतेचा विचार आपल्या कवितेतून केलेला आहे. शेतकऱ्याला नापिकीला सामोरे जावे लागते, पाऊस वेळेवर पडत नाही, बैलांना कामे लागत नाहीत, घरदार, शेत शिवार पडीत पडल्यासारखे होऊन जाते अशी सुन्न करणारी भावना व्यक्त केलेली आहे. ते पुढील प्रमाणे:

" खेडी नापास, लोक सुन्न
पाऊस गाय बैल रिकामा
गाई गाभूड घर भणंग
शेती पडीक......."

समकालीन कवितेने महत्त्वपूर्ण विषयाला स्पर्श केलेला आहे. शेतकरी वर्गाच्या बद्दल ग्रामीण कवितेने प्रखरपणे चित्रण केलेले आहे. ही कविता शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन निसर्ग कोपला यामुळे जीवन जगण्यास मार्गदर्शन करणारी आहे. शेतकऱ्याने खचून न जाता नव्या नव्या उमेदीने जगावे असा संदेश दिला आहे कवी ज्ञानेश वाकुडकर यांनी आपल्या कवितेतून शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. दुष्काळामुळे कर्जबाजारी मुळे नापिकीमुळे हवालदिल झालेल्या बळीराजाला मौलिक असे विचार दिलेला आहे. ते पुढील प्रमाणे:

" कर्ज घेऊन दिवाळी आली
वर यंदा ही नापिकी झाली,
नवे कपडे घेऊ नका
काही खायला देऊ नका
पाणी पिऊन दिवाळी करु बाबा
जहर खाऊ नका "

समकालीन ग्रामजीवन हे शोषण आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे प्रभावित झालेले आहे. हे खरे असतानाही खोटी प्रतिष्ठा जपण्यासाठी लग्नसमारंभ सण-उत्सव यामध्ये खूप पैसा खर्च होताना आढळतो. सन्मानामुळे खूप पैसा खर्च होऊन ग्रामीण भागातला माणूस आकार यांचा दारिद्र्यात सापडलेला आहे या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी. मानसिक तो आत्मभान माणसांना येणे काळाची गरज आहे. समाजाला प्रगती करायची असेल तर सामूहिक विवाह सोहळे गावोगावी आयोजित केली पाहिजेत असे विचार कवी माधव जाधव यांनी मांडले आहे. सामूहिक विवाह सोहळा मुळे समाजाचा खर्च वाचतो व समाजाला प्रगतीपथावर कडे जाईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे. ते पुढील प्रमाणे:

" सामूहिक लग्न । व्हावे गावो गावा
रंक आणि । रावा सद्गती ।।
एकाचे खर्चात । अनेकांचे लग्न
दारिद्र्याचे विघ्न । थांबे त्याने।।
पैसा आणि वेळ । थांबे अपव्यय

तेणे गाव जाय। पुढे पुढे ।।"

शेती विकल्याशिवाय शेतकऱ्यांच्या मुलीचे लग्न करता येत नाही .हे अनेक शेतकरी कुटुंबाचे खरे सत्य आहे अशा परिस्थिती सामूहिक विवाह सोहळे शेतकऱ्यांना परवडणारे आहेत हे लक्षात घेणे गरजेचे आहे.असे कवी माधव जाधव यांनी सुचित केले आहे.

समकालीन कवितेने शेतकऱ्यांची अवहेलना, विटंबना, कुचंबना या बदलत्या व्यवस्थेने धोरणांनी मांडले आहे. रात्रंदिवस कष्ट करूनही शेतकऱ्यांचे दारिद्य संपत नाही. त्यांच्या प्राथमिक गरजाही पूर्ण होत नाहीत. कापसाचे उत्पादन घेणारा शेतकरी अधिक उत्पन्नाच्या आशेने कापूस पिकवतो पण बाजारभावात मात्र त्याची गार खोदली जाते. लागवड खर्च व मिळणारा बाजारभाव यातील फरकामुळे त्याचे दारिद्य संपत नाही. अधिक नफा कमविण्यासाठी दलाल व्यापारी व शासन शेतकऱ्यांना लुबाडतात ही वस्तुस्थिती आहे. शेतकऱ्याला प्रत्येक ठिकाणी आडवतात, लुटतात गाडतात, मारतात हे समकालीन कवितेतून व्यक्त झालेले आहे. या संदर्भात कवी विठ्ठल वाघ यांच्या कवितेतून समकालीन परिस्थितीचे विदारक दर्शन घडते. " फुलवल्या कापसाले चंद्र चोरू चोरू पाहे

तरी माय माऊलीची मांडी उघळीच राहे " असे विदारक वास्तव कवी विठ्ठल वाघ यांच्या कवितेतून व्यक्त झालेले आहे.

कवयित्री निरजा यांनी आपल्या कवितेतून स्त्री दुःखाचे वास्तव समाजासमोर मांडलेले आहे. स्त्री ही अगदी लहानपणापासूनच कुटुंबाच्या दबावाखाली वावरत असते. स्त्रीला स्वतंत्रा चा आविष्कार साधता येत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. मुलगी वयात आल्याबरोबर तिच्यावर अनेक बंधने लादली जातात तिच्यावर संस्कार बनवले जातात. चारित्र्य आणि पावित्र्यायाबद्दल तिला शिकवले जाते. जसे जसे वय वाढत जाते तसे तसे त्याच्यावर जबाबदाऱ्या लादल्या जातात. समकालीन कवितेत स्त्रियांच्या अंतर्मनाचा वेध घेतलेला दिसून येतो. ते पुढील प्रमाणे:

" मुलगी वयात आल्याबरोबर
ठोका चुकतो
तिच्या काळजाचा.
ठरवून दोन गोष्टी
तिच्या कानावर घालते ती
चारित्र्य आणि पावित्र्याचा
सुरस कहाण्या ऐकवून
ती प्रयत्न करते मुलीला आधीच शहाणी करण्याचा "

प्रज्ञा पवार यांच्या कवितेतून स्त्रीच्या जगण्याची घुसमट गंभीरपणे व्यक्त झालेली आहे शोषणावर विषमतेवर लिंगभेद व त्यांची कविता हल्ला करणारी आहे प्रत्येक स्त्रीमध्ये स्वतःला सिद्ध करण्याची ताकद असते असे सांगून त्यांनी स्त्री सन्मानाचा विचार केलेला आहे. ते पुढील प्रमाणे:

" हे असं क्षणाची पत्नी आणि
अनंत काळी माता वगैरे असण्यापेक्षा
स्त्रीने अनंत काळी माणूसच असावं "

माणूसपणाच्या हक्काचे मागणी त्यांनी आपल्या कवितेतून केलेले आहे.

कवयित्री स्वाती शिंदे पवार यांच्या कवितेतून समाजातील स्त्री-पुरुषांच्या नातेसंबंधांमधील वास्तव चित्रित झालेले आहे. त्यांच्या कवितेची स्त्रियांच्या जगण्यातील दाहकता आणि शोषित विलक्षण संवेदनशीलतेने व्यक्त झालेली आहे. समकालीन कालखंडातील एक आगगाडीच्या कवयित्री म्हणून स्वाती शिंदे पवार यांच्याकडे बघितले जाते, त्यांनी आपल्या कवितेत स्त्री व्यक्तिरेखांचा समृद्ध असा आविष्कार केलेला बघावयास मिळतो. कवयित्री स्वाती शिंदे पवार यांनी सु आणि जातं या प्रतिमांच्या आधारे सनातन प्रवृत्तीमुळे समाजातील स्त्री-पुरुषांच्या नातेसंबंधातील विदारक सत्य व्यक्त केलेले आहे ते खालील प्रमाणे:

" सुख वटीत माझिया
सूप म्हणते जात्याला
फिर खुंट्याच्या भोवती
शोध स्वतःच्या नात्याला
नाते सुपाचे जात्याचे
पती-पत्नीच्या नात्याचे
एक फिरते भरारा
दुज्या नावाचा दरारा "

विद्रोही कवी नामदेव ढसाळ यांनी आपल्या कवितेतून दलित समूहाला परंपरा आणि आज्ञानाने कसे पछाडले आहे त्याचे दाहक वास्तव मांडलेली आहे. दलित समाजातला व्यक्ती हा अज्ञानाला बळी पडतो ही खूप मोठी शोकांतिका होय. प्रेषित असूनही समाजाला सन्मार्ग दाखवत नाहीत. जे स्वतःला समाजवादी समजतात तेच समाजाचे भक्षक होत. समाजवादाच्या नावाखाली समाजाला गिळंकृत करण्यासाठी निघालेले आहेत यांच्या कवितेतून व्यक्त झालेली आहे.

जसे-

" इथे अज्ञान फळू दे,फुलू दे
दलितांना मात्र काही न कळू दे
ह्या प्रेषितांच्या टाळूवरील लोणी गळू दे
हल्ली ह्यांच्या समाजवादी पिंडांनाही कावळे शिवू लागलेत
ह्या कावळ्यांनी सर्व शहरच घाण करून सोडलय "

अशा प्रकारची भयाण वास्तवता कवी नामदेव ढसाळ यांच्या कवितेतून व्यक्त झालेली आहे. समाजाला पोखरणारी जमात प्रत्येक शहरात उदयास आल्याचे दुःख कवी नामदेव ढसाळ यांनी व्यक्त केलेले आहे.

समकालीन कविता अधिक दाहक वास्तव व्यक्त करणारी आहे. समकालीन दलित कवितेत समकालीन सामाजिक दाहकता चित्रित झालेली आहे. दलित समूह जीवनाचे होणारी होरपळ कवी मंगेश बनसोड यांच्या कवितेतून व्यक्त झालेली आहे. त्यांनी आपल्या कवितेतून असे म्हटले आहे की, सध्याचा काळ हा स्पर्धेचा काळ ठरलेला आहे, ज्याचा वशिला नाही त्याला नोकरी नाही, ज्याला नोकरी नाही त्याला बायको सुद्धा कोणी देत नाही, लग्न न झाल्यामुळे मानसिक विकृती निर्माण झालेली आहे. असे वास्तव मंगेश बनसोड यांनी आपल्या कवितेतून अधोरेखित केलेले आहे. जसे –

" आता- वशिला नाही म्हणून नोकरी नाही
नोकरी नाही म्हणून छोकरी नाही
छोकरी नाही म्हणून लग्न नाही
लग्न नाही म्हणून भोगणं नाही
भोगणं नाही म्हणून
मानसिक विकृती ची जळमटं अशीच पसरत जाणाऱ्या शरीरभर आंतबाहेर "

समकालीन कालखंडामध्ये आदिवासी कवितेचे सुद्धा खूप मोठे योगदान आहे. आदिवासी समाजातील विविध समस्या विविध प्रश्नांची उकल जगण्याचा संघर्ष आदिवासी कवींनी आपल्या कवितेतून समर्थपणे मांडलेले आहे. आदिवासी समाज हा अन्यायग्रस्त जंगलात राहणाऱ्या, उपेक्षित जीवन जगणाऱ्या समूहाचे दर्शन कवितेतून झालेले आहे. डॉ. विनायक तुमराम यांनी आदिवासी कवितेच्या संदर्भात पुढील मार्मिक विधान केलेले आहे," आदिवासी कविता हे आदिवासी साहित्य सृष्टीचे नक्षीदार कोरीव व भक्कम महाद्वार आहे. आदिवासी साहित्याची नोंदच मूळ कवितेने झाली आदिवासी कविता नावाची वाङ्मयीन उपज अलीकडची आहे." आदिवासी कविता हे आदिवासी जीवनाचा आरसा म्हटले जाते.

आदिवासींचे पारंपारिक जीवन आणि समकालीन परिस्थिती याचे प्रतिबिंब आदिवासी कवितेतून बघायला मिळतात. आदिवासी समाज जंगलात राहत असला तरी त्याचा शहराशी संपर्क आल्यामुळे व्यसनाधीन बनून जिवाला धोका निर्माण झालेला आहे. विकासाच्या नावाखाली जंगले नेस्तनाबूत झाल्यामुळे आदिवासींच्या जीवनाला हानी पोहोचत आहे, अशी भावना कवी बाबाराव मडावी व्यक्त केली आहे. जसे-

" तुमचे काळेकुट्ट
मनसुबे आम्हाला
पारतंत्र्य करणारे
आमच्या हिरव्या
वनाला आग लावणारे"

कवी वसंत कन्नाके यांनी आदिवासी समाजाचा शहरांशी परिचय झाल्यामुळे कसा व्यसनाधीन बनला याचे वास्तव त्यांनी रेखाटलेली आहे. जसे-

" आदिवासींच्या पोटात मोहलत
देशी दारूचे दुकान

पत्त्याचा क्लब मटक्याचे अड्डे
खुलेआम सुरू आहे.

अर्थातच आदिवासींच्या जीवनावर समकालीन परिस्थितीचा खूप मोठा आघात झाल्याची परिस्थिती दिसून येते.

समकालीन आदिवासी कवितेत भुजंग मेश्राम यांची कविता आशयधन आहे. त्यांच्या कवितेला शेकडो वर्षाचा अनुभव आहे. सावकार आणि भांडवलदार आणि आदिवासींचे कसे शोषण केले याचे चित्रण त्यांच्या कवितेतून आलेले आहे. जसे-

"कापूस आतूनच पेटत असतो भुरभुर
हे त्यांना माहीत असावे
म्हणून तर तुझ्या ओटीतला कापूस पाहून
ते गुपचप निघून गेले"

समकालीन आदिवासी कवितेत कवयित्री उषाकिरण आत्राम यांचेही मौलिक योगदान आहे. त्यांनी इथून आदिवासी स्त्री जन्मापासूनच निसर्गाच्या सानिध्यात ते समर्पित होऊन आपली शारीरिक प्रतिकारक्षमता विकसित करते त्यामुळे दुःख व्यक्त करण्यासाठी अश्रू काढण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांनी सूचित केले आहे. जसे-

" बाय ! तू रडू नगंस गं
रडणं सुखी बायाचं काम आहे.
आपल्याले रडाची जन्मापासून सवंनाय
तू जन्मले तवा दगडाने नाळ कापली"

असे आदिवासी समाजाचे विदारक दुःख कवयित्री उषाकिरण आत्राम यांनी आपल्या कवितेतून मांडले आहे.

**समारोपः**

समकालीन कविता हे समाजाच्या सर्वांगीण अंतरंगाचे चित्रण करणारे असून समाजाचे भयावह वास्तव मांडणारी आहे. ग्रामीण कविता, दलित कविता, स्त्रीवादी कविता, आदिवासी कविता, महानगर जाणिवांची कविता समकालीन कालखंडाचा आलेख उभा करणारी आहे. समाजातील दुःख, दैना, वेदना, गरीबी नैसर्गिक संकटे, मानवनिर्मित संकटे आदी सर्व बाजूंची विचार करणारी ही कविता आहे. या कालखंडात कविता लिहिणाऱ्या सर्वच कवींच्या कविता ह्या महत्त्वपूर्ण योगदान देणारे आहेत. समकालीन कालखंडातील सर्वच कवींनी समाजाच्या विदारक वास्तवतेचे वर्णन केलेले आहे म्हणून समकालीन कविता ही खूप महत्त्वपूर्ण कविता आहे. समाजाला व माणसाला विकासाचे वाटेवर घेऊन जाणारी समकालीन कविता आहे. समकालीन कविता ही मानवाच्या सर्व दुःखाला स्पर्श करणारी कविता आहे. हे समकालीन कवितेचे खास वैशिष्ट्य आहे. समकालीन कविता ही मौलिक कविता असून कवितेच्या प्रांतातील महत्वपूर्ण कविता होय.

**संदर्भ ग्रंथ :**


१) *नामदेव शेतकरी - जगदीश कदम*
२) *तुही यत्ता कंची? तुही यत्ता....- नामदेव ढसाळ*
३) *मराठी दलित कविता - संपादक बी रंगराव*
४) *कपाशीची चंद्रफुले - वाघ विठ्ठल वाघ*
५) *पाढा - केशव सखाराम देशमुख*
६) *मी भिडवू पाहतेय समग्रशी डोळा - प्रज्ञा पवार*
७) *जागतिकीकरणात माझी कविता- उत्तम कांबळे*
८) *कुळवडी अभंग- माधव जाधव*
९) *स्त्रीगणेशा – नीरजा*
१०) *मी येणाऱ्या पिढीची दिशा घेऊन फिरतोय- मंगेश बनसोड*
११) *वेदनेच्या खोल तळाशी- स्वाती शिंदे पवार*
१२) *समकालीन मराठी साहित्यप्रवाह - डॉ. राहूल रजनी*
१३) *समकालीन मराठी कविता: एक निरीक्षण- डॉ. प्रकाश केजकर*
१४) *मोहोळ - भुजंग मेश्राम*
१५) *म्होरकी - उषाकिरण आत्राम*
१६) *टाहो - बाबाराव मडावी*
१७) *गोंडवन पेटली आहे- विनायक तुमराम*

# समकालीन मराठी कथा '' लाल चिखल '' एक आकलन

**प्रा. डॉ. निलीमा दिगंबर कापसे**

*मराठी विभाग प्रमुख, विदर्भ महाविद्यालय, लाखणी,जि- भंडारा*

*मोबाइल न – 9921424397 मेल – kapsendk@gmail.com*

मराठी साहित्य मध्ये जे विविध साहित्यप्रकार आहे त्यामध्ये कथा हा एक साहित्यप्रकार आपले आगळेवेगळे रूप घेऊन मराठी साहित्यात आलेला दिसून येतो मराठी साहित्याच्या प्रत्येक कथेत समकालीन समाजाचे दर्शन होते. सामाजिक वास्तव आणि समस्या समजतात भोवताली घडणाऱ्या चांगल्या-वाईट घडामोडी यांचे समाजातील मानवी जीवनावर होणारे परिणाम आणि प्रभाव ''कथा'' या साहित्य प्रकारात कळतात साहित्याचे अध्यापन आणि अध्ययन म्हणजे जीवनभान जानण्याच्या विविध क्षितिजापर्यंत नेऊन पोहोचवने होय साहित्य ही जिवंत वाटणारी व तात्काळ जीवनाला भिडणारी अशी गोष्ट आहे साहित्याचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन होणे वेगळे आणि अस्वादाच्या मार्गाने अध्ययन-अध्यापन होणे हे वेगळे असते.

मराठी मध्ये जी विविध साहित्यप्रकार आहे त्यामध्ये कथा हा वांडग्मय प्रकार इतर साहित्य प्रकारांपेक्षा वेगळा आहे कथेचा जन्म व काळ सांगणे जरी कठीण असले तरी कथेचा वावर हा मानवा बरोबर सतत राहिला आहे. आदि मानव रानटी अवस्थेत राहणारा मानव त्याच्या चालीरीती रूढी, परंपरा, श्रद्धा, देवता, पशुपक्षी, प्राणी, सभोवतालचा निसर्ग या संदर्भातले अनुभव आणि कल्पना यातून कथा प्रवाहित होत राहिली मानवाच्या भटकंतीच्या काळातही कथा मानवा सोबतच होती त्यामुळे कथा मानवाच्या प्रवासातही त्याच्यासोबत असल्यामुळे तिने सर्व खंड व्यापलेले दिसून येतात मानवाच्या विकासाबरोबर कथा या वांडग्मय प्रकाराचाही विकास होत गेला. त्यात बरीच स्थित्यंतरे होत गेली. महाभारत ,रामायण, पंचतंत्र, इसापनीतील, कथा कीर्तनामधून शाहीरांच्या वाणीतुन मौखिक परंपरेतून कथा ही जिवंत राहिली कथा ही लिखित स्वरूपात सापडण्याचे प्राथमिक श्रेय महानुभाव साहित्यला जाते. लिळा चरित्रात श्री चक्रधर स्वामींनी शारंगधर या पंडिताची कन्या धनाई हिला ''चिऊ काऊची'' गोष्ट सांगितली लिळा चरित्रातील श्री चक्रधर स्वामींच्या संदर्भात आलेल्या लिळा ह्या कथा स्वरूपातच आहे. आधुनिक मराठी कथेला सव्वाशे वर्ष पूर्ण झाली असून 1890 मध्ये हरिभाऊ आपटे यांनी ''करमणूक'' या साप्ताहिकातून पहिली स्फुट कथा लिहिली पुढे 1920 ते 40 या काळातील कथा तंत्र विषय आणि प्रकाराच्या दृष्टीने विविधतेने नटलेली दिसते . रूपक कथे सारखे प्रकारही या काळात उदयाला आले. ग्रामीण आणि शहरी लोक जीवनाचे चित्र कथे मध्ये येऊ लागले. या काळात रत्नाकर, यशवंत, किर्लोस्कर, ज्योत्स्ना, प्रतिभा यासारख्या नियतकालिकांनी कथेला चांगलेच विकसित केले पुढे 1940 ते 1945 च्या कालखंडात गंगाधर गाडगीळ, पु भा भावे ,अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर यांनी कथांची निर्मिती केली. नवकथाकारा नंतर पुढे शंकर पाटील, द मा मिरासदार,

जयवंत दळवी, बाबुराव बागुल, कमल देसाई, दिलीप चित्रे, चारुता सागर, आशा बगे ,सानिया, प्रिया तेंडुलकर अशा अनेक कथाकारांनी मराठी कथेला आणखी प्रगल्भ बनविले.

1980 पासून पुढे समकालीन मराठी कथा उदयास आली अनेक कथाकारानी कथा लेखन केले त्यातील एक ''भास्कर चंदनशिव'' हे ग्रामीण भागातील साहित्यिक आहे. ''मराठवाड्यातील दुष्काळ'' हा त्यांच्या कथालेखनाचा विषय आहे °1980 मधील ग्रामीण जीवनातील ते महत्वाचे कथालेखक आहे ''जांभळढव, मरणकळा, अंगारमाती, बिरुड,नवी वारूळ'' हे त्यांचे कथासंग्रह अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांची ''लाल चिखल'' अशीच ग्रामीण जीवनातील शेतकऱ्यांच्या जीवनाचे कष्टाचे भावनांचे विदारक सत्य मांडणारी कथा आहे. लाल चिखल भास्कर चंदनशिव यांची कथा असून अवघ्या एक दिवसाच्या भाजीपाला विकण्याच्या प्रक्रियेतून ही कथा जन्माला येते. या कथेमध्ये शेतकऱ्यांची जीवन व्यथा ,पीक पाणी, त्यातून उभ्या राहिलेल्या समस्या यावर भाष्य आलेले आहे. शेती व त्यावर आधारित जीवन विषय हा केंद्रवर्ती विषय या कथेत असून एक दाहक वास्तव या कथेतून मांडले आहे बापू हा शेतकऱ्याचा मुलगा असतो आई वडील भाजीपाला विक्रीसाठी बाजारात आणतात तो टोमॅटो ला बाजारात योग्य भाव मिळत नाही रस्त्यावर फेकून द्यावा लागतो सोन्यासारख्या टमाटर चा लाल चिखल होतो शेतकऱ्यांचे कष्ट त्यांची मेहनत त्यांचे श्रम अश्रू मध्ये परावर्तित होतात माल विकताना दिवसभरात त्याला योग्य भाव न मिळाल्यामुळे व आहे त्या भावापेक्षाही कमी भावात माल विकत घेण्यासाठी तयार असलेले ग्राहक या सर्व गोष्टीत कथेमध्ये कथानायकाच्या भावनांचा लाल चिखल होतो ग्रामीण जीवनाच्या केंद्रवर्ती ठिकाणी असणाऱ्या शेतकऱ्याचे जीवन या कथेत आलेले आहे परंतु शेतकऱ्यांच्या अपरिमित कष्टाचे मोल हे माती मोल ठरते. त्यामुळे ग्रामीण जीवनातील हतबलता या ठिकाणी दिसून येते. ''लाल चिखल'' या कथेतील शेतकऱ्यांची जीवन बघितल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे तो आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे ,आरोग्याकडे पुरेसे लक्ष देऊ शकत नाही. शेतकऱ्याचे कष्टप्रद जीवन त्याच्या जीवनामध्ये असलेला घोर अंधकार शेतकऱ्यांच्या व्यथेला नेटकेपणाने मांडण्याचा प्रयत्न लाल चिखल या कथे मध्ये झाला आहे. दहावी मध्ये शिकत असलेला शेतकऱ्याचा मुलगा बापू या शाळकरी मुलाभोवती ही कथा फिरताना दिसते. बापूची आई वडील म्हणजे माई आणि बाबा होय . शेतकरी आई बापाला आपली मुलं मदतीसाठी आणि आपल्या शेतातील कामासाठी हाती आवश्यक असतात . बापूला शेतीपेक्षा अभ्यासात आवड असते पण आपल्या मुलाने आपल्याला शेतीत मदत करावी ही त्याच्या आईवडिलांची अपेक्षा असते त्यामुळे बापूला नाईलाजाने बाजारामध्ये माल विक्रीसाठी बसावे लागते. बाजारात टमाटरची आवक वाढल्यामुळे टमाटर चे दर कोसळतात त्यामुळे बापूच्या आई-वडिलांना खूप तोटा होतो. पडलेल्या भावातही ग्राहक किस किस करतात किलोचा भाव विचारून पावशेरची खरेदी करतात, सुटे पैसे नाहीत म्हणून कमी पैसे देतात तरीही माल विकला जात नाही त्यामुळे माय आणि बाबा यांच्या चेहऱ्यावरील नैरास्य पाहून बापूच्या मनाची घालमेल होते. ग्राहकांच्या आणखी पडून भाव मागण्याच्या बोलण्यामुळे बाबांचा राग वाढतो त्यांच्या मनात प्रचंड संताप होतो शेवटी टमाटर खाली ओतून बाबा त्याच्यावर नाचतात. बाबांच्या भावनांचा श्रमाचा ''लाल चिखल'' होतो . शाळेत शिकणाऱ्या बापूचे शेतीमुळे शाळेकडे दुर्लक्ष होते पुस्तक आणि वास्तव यातील विदारक सत्य बापूला कळते पुस्तकातले तत्वज्ञान जगताना उपयोगी येत नाही ही गोष्ट जरी बापूच्या लक्षात आली असली तरी शिक्षण मध्येच सुटले तर बाबां प्रमाणे प्रचंड कष्ट आपल्या वाट्याला येतील हा संदेश ही कथा बापू च्या माध्यमातून आपल्याला देताना दिसते.

**समकालीन मराठी साहित्य कविता**

**प्रा. ए. ए. नांदगावकर**
*मराठी विभाग प्रमुख, स्वा. से. श्री. क. रा. इन्नाणी महाविद्यालय, कारंजा (लाड)*
*जि. वाशिम ४४४१०५.*

**प्रस्तावना**

मराठी साहित्याचा विचार करताना मराठीचे विविध प्रकार आपणा समोर उभे राहिलेले दिसून येईल. या सर्वामधे कविता हा प्रकार सर्वमान्य आहे. व यांचे कारण म्हणजे कविता हा मराठी साहित्यातील सर्वात प्राचीन व आज ही मान्य असलेला म्हणजेच अक्षरवाड्.मय प्रकार आहे. आज या कवितेने समृध्द रूप धारण करीत आपले विश्व सुंदर व व्यापक केलेले आपणास दिसून येईल. त्यातील काही विभागांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधातून केला गेला आहे. यातून समकालीन काव्य साहित्याच्या मांडणीचा धावता आढावा आपणासमोर ठेवण्याचा प्रस्तून शोधनिबंध लेखकाचा प्रयत्न आहे. कवितेतून जाणवणाऱ्या भावभावनांचा विचारही यात केलेला दिसून येईल.

**ग्रामीण कविता**

ग्रामीण कविता म्हणताच आपल्या नजरेसमोर नाव उभे राहते ते ना. घ. देशपांडे यांचे ग्रामीण कविता सहजसरळ शब्दांमधे फुलवत नेण्याचे ना. घ. देशपांडे यांचे सामर्थ्य प्रत्येकानेच मान्य केले आहे. त्यांचा 'शीळ' हा १९३२ मधे प्रथम काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर 'अभिसर' 'खुणगाठी' यासारखे दमदार कवितासंग्रह वाचकांचे भेटीस आले. मात्र या सर्वात 'सुगी' ही कविता प्रत्येक वाचकाचे मनात घर करून राहणारी कविता ठरली. गेयता व प्रेमासोबत ग्रामीण ठसका आपणास त्यांच्या कवितेतून दिसून येतो.

'रानावनात गेली बाई शिळ
राया तुला रे काळयेळ नाही
राया तुला रे ताळमेळ नाही
थोर राया तुझ रे कुळशिळ

या सारख्या कवितेतून प्रेमासोबत नैतिकतेचा पाठ देणारी कविता आपल्या नजरे समोर उभी राहते व येथेच ही कविता वाचकाचे मनात घर करून राहतांना आपणास दिसून येते.

मात्र याच समवेत आता ग्रमीणभागातील कविंनी आपले भावविश्व बदलवत आपला ठसा उमटवायला सुरवात केली आहे. कारण या कविंनी आधूनिक परिस्थितीचा अभ्यास

केल्याचे आपणास दिसून येते. आधूनिकीरणाच्या नावाखाली होणारी लुट हे कवी आपल्या नजरेने बघताना आपणास दिसतात. मग इंद्रजीत भालेराव सारखा कवी म्हणतो.

काटया कुटयान भरलाय रस्ता
माझ्या गावाकड चाल माझ्या दोस्ता
तिथ शेतात,
माझ्या बापाच्या हाताला फोड
भाव ठरतोय त्याला न पुस्ता
माझ्या गावकड ...

जागतिकीकरणाच्या नावाखाली आजच्या शेतकऱ्याची, ग्रामीण जीवन परंपरा, रीती, नाती सर्वच उध्वस्त केल्याजात असल्याची खंत व चिंता आजच्या कवींना असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. आजचा शेतकरी आत्महत्या करतोय व त्याचे हे राजकारणी भांडवल करून आपल्या मताच्या तिजोऱ्या भरण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात.

शंकर बढे सरखा कवी स्पष्टपणे प्रश्न विचारतो,

'शेतमालाची दलाली करून
लोक म्हाडया बांधू लागलेत
चोराला मलिदा अन्
मालकाला धतोरा
आसं किती दिवस चालणार हाय?

याच समवेत विठ्ठल वाघ, श्रीकांत देशमुख, अनिल पाटील, महेंद्र भंवरे, मीरा ठाकरे, उत्तम कांबळे, सुनिल अवचार या व सारख्या अनेक कवींच्या कवितांनी ग्रामीन कविता संपन्न झाल्याचे आपणास दिसून येईल.

**आदिवासी कविता**

आधूनिक काळात जे विविध साहित्यप्रकार जन्मास आले त्यामधे आदिवासी साहित्य हा एक महत्वाचा प्रकार जन्मास आला. आदिवासी साहित्य हे रानावनातील वंचितांचे साहित्य आहे. महत्वाचे म्हणजे ज्यांना जीवन जगताना माणून म्हणून जगु दिले नाही त्यांच्या संघर्षाचे साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय. जनसाहित्याच्या भूमिकेशी, व्याख्येशी विचाराशी जवळीक साधणारे सदर साहित्य आहे. आजही आदिवासींवर होणारे अन्याय आपणास जागोजागी दिसतात. त्यांनी विद्रोह करताच त्यांच्या विद्रोहाला दाबून टाकण्याचे काम आजही होताना आपणास दिसून येते. मग त्यांच्या कवितेतून साकारत जाणारा विद्रोह अतिशय उग्र स्वरूप धारण करताच तो नष्ट करण्याचा प्रयत्न हा समाज करताना दिसतो. माग त्याला उत्तर देताना दमदार कवी बाबाराव मढावी म्हणतात,

पण ज्याले बोट दाखवल
त्यान बोट कापल
ज्याले हात दाखवले
त्यान हात छाटले
आता आम्ही
लाचारी पत्करून
काही सांगणार नाही
शोषनकर्त्यांचे मुर्दे
पाडल्याशिवाय थांबनार नाही!

हा विद्रोह प्राचीनते समवेत आधूनिक असल्याचे आपल्याला स्पष्टपणे दिसून येते. कारण सर्वसमावेशक समाजव्यवस्था आजच्या काळात संपूर्णतः नष्ट करण्याचेच राजकारण घडत आहे हे मान्य करावे लागते. या समाजात आईस अनन्यसाधारण महत्व आहे. व हे महत्व भुजंग मेश्राम आपल्या कवितेतून स्पष्ट करतात.

मा वो, तुझ्या मोळीवर ओळी शिकतानी आता
मनामंदी करतो बापजाद्यांचे पडीत बावर
तुझे करपलेले हात आणि मन
तुझ्या हातामंदून निसटलेले शेहर...

ही आई फक्त लेकराची नसून समाजाची, निसर्गाची, जगाची आई असल्याचे आपणास जाणवल्याशिवाय राहत नाही. अतिशय सहज व निसर्गाच्या सानिध्यात राहणारा हा आदिवासी समाज कुठल्याही पसाऱ्याशिवाय, मोठेपणाशिवाय राहतो. मात्र त्यांचेत असलेले प्रेम आपणास ठायी ठायी जाणवत राहते.

पण ह्या समाजाचा हा सरळपणाचा त्यांना होणाऱ्या त्राचे कारण ठरला या समाजाचा साधेपणा बघून लोकांनी त्यांना दिलेला त्रास अनेक कविता व लेखातून प्रगट होताना दिसतो, मग आपल्या पत्नीला चेहरा रंगवू नको तर आग हो सांगणारा पती, राज्यकर्त्यांच्या विरोधात जावून रनांगणावरचे शिंग फुंकनारा सैनिक असे विविध रूप आपण कवितेतून अभ्यासायला लागतो. डॉ. विनायक तुकराम, बाबाराव मढावी, उषाकिरण आत्राम व सारख्या अनेकांची नावे मग या यादी मधे समाविष्ट होतात. डॉ. सरिता जांभूळे सारख्या आधूनिक कवयित्रीही मग आपला विद्रोह सहज शब्दात मांडताना दिसून येतात.

**विद्रोही कविता**

विद्रोही साहित्य हे मराठी साहित्यातील मैलाचा दगड म्हटले जाणारे साहित्य आहे. जीवनाभुतीच्या जाणिव स्पष्ट पणे मांडत जावून समाजाला प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करून देण्याचा

प्रयत्न विद्रोही साहित्याने केलेला दिसून येतो. विद्रोहाचा हुकार देणारा आद्य संतकवी म्हणजे संत चोखामेळा. पण नंतर या विद्रोहाचा खऱ्या अर्थाने विचार झाला नाही आधूनिक काळात मात्र जीवनजाणिवा जागृत होत जावून हा विद्रोह स्पष्टपणे व तिव्रतेने जानवायला लागला. मात्र या करीता एकोणवीसावे शतक उजडावे लागले.

या साहित्याला फुले—आंबेडकरी जाणिवेने प्रचंड पाठबळ दिलेले दिसते. मराठी कवितेच्या प्रवाहात आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने विद्रोही कविता चटकन उठून दिसनारी आहे. म्हणूनच आज विद्रोही कवितेस मराठी साहित्यात मानाचे स्थान प्राप्त झालेले आपणास दिसून येते. जाचक सढी प्रथा परंपरामुळे सनातनी समाजाबध्दल विद्रोहाची व बंडाची भावना समाजमनात निर्माण होवून त्याचा स्फोट विविध कवितांच्या माध्यमातून झालेला आपणास दिसून येतो. दलित समाजातील वास्तव अनुभवाचे चित्रणच या कवितांमधून झालेले दिसते, नामदेव ढसाळ आपल्या कवितेतून ह्या जाणिवा स्पष्टपणे मांडताना दिसून येतात. ते 'गोलपीठा' या काव्यसंग्रहात म्हणतात.

इथ जन्म घेवून तुम्ही बर्बाद झालात
आता मलाही जन्म देवून तुम्ही बर्बाद केलेत
मी हे सार काही बोलनार नव्हतो
पण माझे हात जागे झालेत
हजारो वर्ष मी होतो खंगत
या गुहागुहातल्या प्रचंड अंधारात
कालच तो गुहेच्या तोंडाशी
ठेवून गेला पिसाळलेला जाळ
मी शिलगावीत जाणार आहे
या पुढचा काळ...

ही जागरूकता समाजात निर्माण व्हायला लागली आहे. आणि म्हणूनच विद्रोही साहित्य एक महत्वाचे साहित्य ठरते. त्यात पुढे आपल्या कविता 'गांडू बगीचा' मधे कवी म्हणतात.

'तुटल्या तटातट मुसक्या
आणि शेवटी माझ्या लोकांच
स्वातंत्र्य ठरल अबाधीत
मी जाणतो, झाला आहे
माझ्या युगाचा उष:काळ
आता उभारली जाईल मृण्मयी नगरी
जिच्यात नसेल सक्त मजुरीचा काळोख

जिच्यात नसेल दैनंदिनवेदनांच
महाभयंकर चिघळण
विछिन्नतेच्या आभाळानंतर.

यातून जागृतता स्पष्ट होत जाते. विद्रोही कवितेतील विद्रोह गुलामी आणि मुक्ती अश्या व्दंदातून प्रगट होते. व अंतिमत: स्वातंत्र्याच्या उर्मिमधे त्याचे परिवर्तन होत गेल्याचे दिसून येते. यातही महत्वाचे बुध्दीप्रामाण्य हा याचा विषेश असल्याने त्याचे महत्वही अनन्य आहे. यातून दांभीकता नष्ट झालेली दिसते. या कवितेवरही जागतिकीकरणाचा प्रभाव झाल्याचे स्पष्टपणे दिसून येतो. या कवितांनी बदलती समाजव्यवस्था स्विकारून ज्याचे नवे व प्रभावी रूप समाजासमोर मांडले असल्याचे आपणास सातत्याने जागवते.

या प्रकारे कवितेने आपले विविधांगीरूप सादर करण्यास केलेली सुरवात आपणास दिसून येते. पुढे यामधे विविध साहित्यप्रकार व त्यावरील आधारीत कवितांचा समावेश होत गेलेला दिसून येतो मात्र सर्व प्रकारात उपरोक्त प्रकार प्राथमिक व महत्वाचे ठरतात.

**निष्कर्ष**

१) मराठी साहित्याचा अभ्यास करीत असताना कविता हा साहित्यप्रकार अत्यंत महत्वाचा असल्याचे आपल्याला मान्य करावे लागते.
२) कवितेमधे विविध साहित्यप्रकारांचा अंतर्भाव होतो. त्याचा अभ्यास करीत असताना त्याचे गुण वैशिष्टयांचाही अभ्यास करणे महत्वाचे ठरते.
३) समाजाच्या विविध घटकांच्या जाणिवा जागृत होत असल्याचे सदर कविता विभागांच्या माध्यमातून सिध्द होते.
४) जनजाणिवांचा एक जागृत आधारस्थंभ म्हणून आपण कविता प्रकाराकडे बघू शकतो.
५) समाजमनाचा आरसा म्हणजे कविता होय. हे विधान आज सत्य ठरत असल्याचे आपणास दिसून येईल.
६) जागतिकिकरणाचा प्रभाव आज माजाच्या विविध क्षेत्रासमवेत कवितेवर ही होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

**समारोप**

आजच्या काळामधे मानवी भावभावनाचे प्रभावी चित्रण करणारा साहित्यप्रकार म्हणजे कविता होय, हे सर्वमान्य झाले आहे. मात्र त्यात झालेले बदल हे अत्यंत ऱ्हदयस्पर्शी व समाजमान्य असल्याचे आपणास दिसून येईल. समाजजागृतीचे हे घातक मानले जाते. व म्हणूनच साहित्य प्रकारात उपरोक्त प्रकार महत्वाचे ठरतात.

**संदर्भ ग्रंथ**

*१) दलित साहित्य, वेदना आणि विद्रोह – भालचंद्र नेमाडे.*
*२) जिगाब – संपा. प्रा. भैरव कुंभार, हिरव्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर.*
*३) आदिवासी साहित्य दिशा दर्शन – प्रा. डॉ. विनायक तुकराम, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद.*
*४) प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास – डॉ. अ. ना. देशपांडे.*

# समकालीन निवडक दलित आत्मकथने

**प्रा. डॉ. संजय के. लाटेलवार**
*सहयोगी प्राध्यापक, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा जि. चंद्रपूर*
*भ्रमणध्वणी : 7798684525 ई—पत्ता : sanjaylatelwar@gmail.com*

**सारांश**

*दलित साहित्यात कवितेनंतर अतिशय लोकप्रिय ठरलेला वाङ्मय प्रकार म्हणजे आत्मकथा हा होय. दलित आत्मकथनांचा विचार करतांना सदर शोध निबंधात तीन आत्मकथनांचा विचार करण्यात आलेला आहे. या तीनही आत्मकथा समकालीन असून यातील विचार आणि तत्कालीन दलित जीवनाचे वास्तव मांडणारे आहेत. ती जशी लोकप्रिय ठरली आहेत, तशीच ती प्रेरणादायीसुद्धा ठरली आहेत. या तीनही आत्मकथा तत्कालीन समाज जीवन आणि भारतीय परंपरांचा वेध घेतात.*

***बीजसंज्ञा*** *: आत्मकथा, बलुतं, आठवणीचे पक्षी, तराळ—अंतराळ*

**प्रस्तावना :**

दलित आत्मकथनांची निर्मिती आणि स्वरूप लक्षात घेतांना दलित साहित्याची पार्श्वभूमी लक्षात घेणे क्रमप्राप्त आहे. १९६० नंतर म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिणिर्वानानंतर दलित साहित्य खऱ्या अर्थाने निर्माण होऊ लागले. दलित साहित्याचा प्रगल्भ आविष्कार प्रथम काव्यातून होऊ लागला. वेगवेगळे वाङ्मय प्रकार आकार घेऊ लागले. दलित साहित्याची समीक्षा होऊ लागली आणि दलित साहित्य संकल्पना सिद्ध होऊ लागली. डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्वालाग्राही तत्त्वज्ञानातून जन्माला आलेले दलित साहित्य; दलितांनी दलितांसाठी लिहिलेले नव्हे. क्रांतिसन्मुखता आणि क्रांतिविन्मुखता यांच्या संघर्षातून निमाण झालेले साहित्य बंधमुक्त माणसाचा विचार करते असे म्हणता येईल. हा बंधमुक्त माणूस भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भातील आहे."[१]

दलित साहित्याच्या केंद्रस्थानी माणूस असून माणसाचे मूल्य नाकारणाऱ्या अश्लाघ्य बाबींना विरोध करणारे आहे. सामाजिक जाणिवेने 'दलित साहित्य' ओतप्रात भरलेले आहे. दलित साहित्य विश्वात्मक जाणिवांचा वेध घेणारे आहे. दलित जाणीव सामाजिक जाणीव असून ती व्यापक आहे.

अशा या दलित साहित्याची एकमेव प्रेरणा ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आणि विचार यातून दलित साहित्य आविष्कृत झालेले आहेत. दलित साहित्याच्या उदयामागे डॉ. आंबेडकरांची प्रेरणा अहे. या विषयी भास्कर खाडगे लिहितात, "कोणत्याही वाङ्मयीन प्रवृत्ती निर्माण होण्यासाठी त्या अगोदर त्या प्रवृत्तीच्या संदर्भात वैचारिक पार्श्वभूमी तयार व्हावी लागते. विशिष्ट अशा स्वरूपाची जीवनविषयक दृष्टी

अगोदर विचारातून मांडल्या जाते. तिच्याच आधारावर सृजनशील साहित्यिक साहित्यातून ती मांडत असतो. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी वैचारिक जीवनदृष्टी मांडली तीच नंतर दलित साहित्यात व्यक्त झालेली आहे, असे दिसून येते."[२]

दलितांना जातीयतेची बंधने तोडून मानवतेचा मार्ग एकाएकी सापडलेला नाही. त्यासाठी चंदनासाारखे झिजावे लागले. दलितांना माणूसकीचे जीवन डॉ. आंबेडकरांमुळे मिळाले. आंबेडकर हे थोर विचारवंत, साहित्यिक, अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, संशोधक, पत्रकार, क्रांतीमानव होत. त्यांचे स्फूर्तिदायक वादळी विजेसारखी लखलखनारी जीवनगाथा आणि आपल्या ग्रंथात सांगितलेले क्रांतीकारी विचार व तत्त्वज्ञान हीच दलित साहित्याची मूळ प्रेरणा व स्फूर्ती स्थान आहे. आंबेडकरवादातून विविध वाङ्मय प्रकार आकाराला आले. त्यात दलित आत्मकथने महत्त्वाची आहेत.

दलित साहित्याचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. आंबेडकरवाद हीच दलित साहित्याची प्रेरणा आहे. दलित आत्मकथनं हा दलित साहित्याचा प्रगल्भ आणि संपन्न आविष्कार आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हीच दलित आत्मकथनांची प्रेरणा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेमुळेच दलित समाजाचे आत्मभान जागृत झाले हे सर्वमान्य आहे. प्रस्थापित जातीव्यवस्थेविरूद्ध आवाज उचलण्याची हिम्मत दलित आत्मकथनकारांना आली. तत्पूर्वी दलित समाज मूका होता. मूकनायक जागा झाल्यानंतर मुकसमाज बोलू लागला. आत्मकथनातून आपली जगण्याची कैफियत मांडू लागला. दया पवार लिहितात, "बलुत्यात आंबेडकरवाद नाही, अस बोलल्या जातं. प्रत्येक पात्राच्या तोंडी बाबासाहेब असे म्हणाले, बाबासाहेब तसं म्हणाले, अशी पात्रे त्यांच्या मगदुराप्रमाणे बोलू लागली असती म्हणजे त्यांना आंबेडकरवादाचा साक्षात्कार झाला असता. आंबेडकरवाद त्यांच्या शब्दातून, प्रतिमातून व्यक्त होतो. नुसत्या सांगितलेल्या तत्त्वज्ञानातून होत नाही. प्रत्यक्ष कृतीतून साक्षात्कार होणे महत्वाचे आहे."[३]

प्र. ई. सोनकांबळेच्या 'आठवणीचे पक्षी'वर आरोप केल्या जातो की नायक 'जयभीम' सुद्धा म्हणत नाही. भीत—भीत प्रल्हाद हा नायक जयभीम करतो. यावर भाष्य करताना डॉ. आरती कुसरे—कुलकर्णी म्हणतात, "खरे म्हणजे ही टिका बरोबर नाही. सोनकांबळे जेव्हा 'आठवणीचे पक्षी' मधून आपले दु:ख मांडतो तेव्हा त्यामागे आंबेडकरी विचार, दलित चळवळीचा परिणाम आणि सामाजिक जाणीव या गोष्टी असतात. प्रल्हाद भीत—भीत 'जयभीम' करतो तो इथल्या समाजव्यवस्थेने त्याच्या मनात जो न्युनगंड निर्माण केला त्याचे प्रतीक आहे."[४]

दलित आत्मकथनाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये मांडताना डॉ. वासुदेव मुलाटे लिहितात, "सर्व आत्मकथनांच्यामधून एखाद दुसरा अपवाद वगळला तर या ना त्या स्वरूपात डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांचे, त्यांच्या विचारांचे, कार्यांचे कृतज्ञापूर्वक उल्लेख येतात. किंबहुना त्यांच्या विचारांची प्रेरणाच या लेखनाच्या मागे असलेली दिसते."५

दलित साहित्याने आधुनिक मराठी साहित्यविश्वात जाणिवेचा एक नवा प्रवाह आणला. दलित आत्मकथने दलित साहित्य निर्मितीचा मौलिक असा अविष्कार आहे. दलित आत्मकथनातील समाजविषयक जाणिवा स्पष्ट होतात.

**बलुतं :**

३० डिसेंबर १९७८ ला दया पवारांचे 'बलुतं' हे आत्मकथन ग्रंथालीतर्फे प्रकाशित झाले आणि साहित्यक्षेत्रात प्रचंड वादळ निर्माण झालं. 'बलुतं'मध्ये आलेले कोंडवाड्यातलं जीवन समग्र मराठी साहित्यात आलेलं नव्हतं. त्यामुळे मराठी साहित्यप्रांत हादरून गेले. हा दगड इमारतीच्या बांधकामातून निकामी केलेला असं जॅक लंडनचं वाक्य पुस्तकाच्या सुरवातीलाच छापलेलं आहे. हे वाक्य म्हणजे बलुतंचा सार आहे. या पुस्तकामुळे दया पवारांच्या वाट्याला स्तुती आणि निंदाही आली. 'बलुतं'वर 'आत्माचार' नावाचा चित्रपट निघाला. हिंदी, कन्नड, गुजराती, जापनीज, जर्मन भाषेत बलुतं भाषांतरीत झाले. फोर्ड फॉऊंडेशन, अमेरिकाचा पुरस्कारही मिळाला. हे सारे मराठी साहित्यात पहिल्यांदा घडले.

'बलुतं' ही स्वत:चीच आत्मकहानी दया पवारांनी जरा वेगळ्या भूमिकेतून वाचकांसमोर मांडली. दगडू मारूती पवार हा दया पवार यांना स्वत:ची आत्मकहानी सांगतो. अशी पोझ या आत्मकथनात घेतलेली आहे. दया पवार आणि दगडू मारोती पवार दोघेही एकच. दया पवारांचा आत्मशोध हा केवळ दया पवार एक व्यक्ती व तिचे जीवन जीवनानुभव एवढ्या पातळीवरच थांबत नाही, तो त्यापुढेही जातो आणि भारतीय समाजव्यवस्थेची, भीषण जातिभेदाची एक तीव्र व सतत जाणवणारी चौकट 'बलुतं'ला आहे. 'बलुतं' ची सुरवात ही आईपासून होते आणि बलुतंचा शेवटही आईच्या मरणानी होते. या आत्मकथनात 'आई' केंद्रस्थानी आहे. 'बलुतं' ही दलित जिवनाचीच सामाजिक प्रतिमा आहे. समाजानी हक्काने द्यावे व घेणाऱ्याने हक्काने घ्यावे म्हणजे 'बलुतं' बारा बलुतेदारांच्या संदर्भात फक्त महारांच्याच बाबतीत हे घडले. 'बलुतं' मध्ये खेडे व मुंबईतील जीवन आलेले आहे.

दगडूचे आयुष्य धामणगावच्या महारवाडा, मुंबईचा कावाखाना आणि वडाळ्याच्या झोपडपट्टीत गेले. यातील अनुभव विदारक आहेत. 'बलुतं' मध्ये स्त्री—पुरूष संबंधाचे चित्रण आहे. या नंतर फार वादळ उठलं दगडूच्या आयुष्यातील पहिल प्रकरण 'बानू'चे होत. नंतर दगडूच्या आयुष्यात 'सई' आहे. त्याची लग्नाची बायको. प्रा. भास्कर खाडगे म्हणतात त्याप्रमाणे "या आत्मकथेचा दु:खपूर्ण ठसा वाचकांच्या मनावर उमटतोय. जीवनातल्या भोगवट्याला सामोरे जाताना अनेक प्रश्न त्याच्या मनात उभे राहिले. आणि तेच प्रश्न वाचकांच्याही मनात उभे राहतात. हे बलुत्याचं यश नव्हे काय? दगडू पवारांचा दया पवार

झाल्यावर आपल्याला काही वेगळी जाणीव आली. हे लक्षात आल्यावर स्वतःच्या तटस्थ आणि परखड आत्मपरीक्षणाला सिद्ध होऊन व्यक्तिच्याबरोबर गावकुसाबाहेरचे दलित जिणे, बलुतेदारीच्या व्यथा, मुंबईतील पांढरपेशा वर्ग आणि कावाखाना यातील संदर्भ जिवंत करतो. हे या दृष्टीने बलुत्याचे फार मोठे यश आहे."[६]

'बलुत्यात' आंबेडकरवाद नाही असे बोलल्या जाते. त्याविषयी दया पवार स्वतः म्हणतात, "आंबेडकरी चळवळीमुळे सापाने कात टाकावी असा सळसळणारा दलित समाज अनेक जुन्या रूढीचे, देवधर्माचे व्यवसाय परिवर्तनाचे झालेले लढे एवढेच काय पण चळवळ इतक्या तीव्र टोकाला गेली की शिरसाट गुरूजीसारखा की लोक ज्याला वेडे समजत होते, त्याने शेंदराच्या देवाची केलेली उचलबांगडी, दगडूच्या आई की जिने दगडूच्या आयुष्यासाठी स्वतःच्या आयुष्याचा होम केला. ती मेल्यानंतर तिची रक्षा गंगेत नेऊन टाकावी म्हणून नातेवाईकांनी केलेला आग्रह आणि त्यावर दगडू म्हणतो की 'ही तर नुसती माती आहे' हा सर्वच विचार आंबेडकरी प्रेरणेत बसत नाही काय?"[७]

जगण्यातील भीषणपणा सोप्या शब्दात दया पवारांनी अलगतपणे मांडलेला आहे. माणसाचे अवमूल्यन होतांना दया पवार डोळसपणे न्याहाळतात तेव्हा त्यांचे सर्जनशील मन या दुःखाला शब्दात प्रकट करते.

**आठवणीचे पक्षी :**

प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी' हे आत्मकथन 'बलुतं'च्या पाठोपाठ आले. डॉ. मा. का. कागणे म्हणतात त्याप्रमाणे 'आठवणीचे पक्षी' हे वेदनेचे वाङ्मय आहे. 'आठवणीचे पक्षी' हे आत्मकथन पुस्तक रूपाने येण्याआधी लेख रूपाने विविध नियतकालिकात प्रकाशित झाले. या आत्मकथनाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. डॉ. कमलाकर कांबळे म्हणतात त्याप्रमाणे,

"आठवणीचे पक्षी' ही एका व्यक्तीच्या जीवनाची कहानी तर आहेच; पण त्याबरोबर एका समूहाची, एका प्रदेशाची आत्मकथा आहे. दलित आणि ग्रामीण समाजातील सुख—दुःख, रूढी—परंपरा, बरे—वाईट त्यांनी आपल्या आत्मकथनात मांडले आहे. दलित ग्रामीणांचे आर्थिक जीवन, सामाजिक जीवन, सांस्कृतिक जीवन, धार्मिक जीवन यातून चित्रीत झाले आहे."[८]

यातले अनुभव शाळकरी मुलाच्या दृष्टिकोनातून आलेले आहेत. 'आठवणीचे पक्षी' हे आत्मकथन आत्मकथनात्मक आठवणींचे संकलन आहे. प्र. ई. सोनकांबळे यांचे जीवन म. ना. वानखेडे यांच्या सहवासामुळे घडले असे स्वतः लेखक आपल्या मनोगतात लिहितात. दलितांचे गुलामा सारखे जगणे, अस्पृश्यतेची दाहकता, शोषणाचे रौद्र रूप, हे लेखणीच्या माध्यमातून सहजरीत्या मांडताना प्र. ई. सोनकांबळे यांच्या निर्मळ, समभावी स्वभावाची प्रचिती घडते.

२७ जानेवारी १९७९ ला प्रकाशित झालेल्या या आत्मकथनात विद्रोहापेक्षा वेदना व्यापक आहेत. महार—मांग समाजाचे चित्रण यात असून जनावराचे मांस आणण्यासाठी महार—मांगाची चाललेली धावपळ जिवंतपणे या आत्मकथनात आलेली आहे. प्र. ई. सोनकांबळे यांचे आईवडील बालपणीच वारले. त्यामुळे ते पोरके जीवन जगले. चिंचोके भाजून खाणे, सागुती खाणे हे त्यांच्या वाट्याला आले. गव्हरनरच्या गाडीपुढे महारासारखे चालणे, मरून पडलेली कुत्रे ओढूण टाकणे अशी कामे त्यांना करावी लागतात. संघर्षमय जीवन सोनकांबळे यांना जगावे लागले. याविषयी प्राचार्य म. सु. पगारे लिहितात, “सोनकांबळे इंग्रजी शिकवत असत. त्यांचा अभ्यासही चांगला होता. त्यामुळे इंग्रजी शिकवणरा प्रोफेसर चांगला आहे असे उद्‌गारही विद्यार्थी काढीत. अतिशय परिस्थितून, आई वडील जिवंत नसताना प्र. ई. सोनकांबळे यांनी जीवनाची वाटचाल समर्थपणे चालण्याचा प्रयत्न केला. दिवस पाखरावाणी निघून गेले. जातीयतेच्या आणि अवहेलनेच्या असंख्य इंगळ्या डसल्या असल्या, तरी त्यांनी आपले कर्तृत्व सिद्द केले.”[९]

पोटासाठी बिदवा भरणे, शेण काढणे, लाकुडफाटा आणणे ही कामे करताना प्र. ई. ना उपासमारीला अनेकदा सामोरे जावे लागते. भूकेशी संघर्ष या आत्मकथनाचा स्थायीभाव आहे. या सर्व बाबींमुळे लेखकाला न्यूनगंडाला सामोरे जावे लागते. बोर्डिंगात अनेकदा भूकेला सामोरे जावे लागते. फाटक्या कपड्यावर राहणे असं अडगळीतले जीवन वाट्याला आले. ‘आठवणीचे पक्षी’तील जीवनावर भाष्य करताना डॉ. का. मा. कागणे म्हणतात, “खरे म्हणजे गेली शेकडो वर्षे शुद्रातिशुद्राची ही पिळवणूक शोषण इतके अंगवळणी पडले की, त्यात कुणालाच नवल वाटण्याचे कारण नाही. परंतु या आगीतून होरपळत अनवानी पायाने वाटचाल करणाऱ्या ‘परलाद’ची धडपड ती मोलाची आहे. ती परिस्थिती शरणावत होत नाही. पुढे—पुढे जाते. शिक्षण घ्यावे, कमावता व्हावे उत्तम लोकासारखे जगावे अशी त्याला आंतरिक ओढ आहे. त्याची ही ओढच त्याला जाती बांधवापासून वेगळा काढते. आणि या वाटचालीत जे—जे वाट्याला येईल ते निमूटपणे भोगण्यावाचून गत्यंतर नाही. या उपजत शहाणपणाने तो जगत राहतो. त्यामुळे त्याच्या भोवती पसरलेल्या परिस्थितीची क्रूरता डोंगराएवढी वाटते.”[१०]

प्र. ई. सोनकांबळे यांच्या वाट्याला आलेले जीवन हे आठवणीच्या रूपाने जगासमोर आले. हाडामासाच्या माणसाला अशा खालच्या पातळीवरचे जीवन येते याचा माणूस विचार करायला लागतो. यातलं जीवन जगातील श्रमजीवींचे होऊ शकते असे बाबुराव बागूल म्हणतात. या आत्मकथनातून गरिबी आणि अस्पृश्यतेचे विदारक दर्शन व्यवस्थेच्या वास्तवतेचे आहे. पाणी पीत असताना प्रल्हादला अडवणे हे मानवतेला कलंक आहे. प्र. ई. सोनकांबळे यांनी मांडलेले दु:ख डॉ. यशवंत मनोहर शब्दात पकडतात. ते म्हणतात, “रूसोने आपल्या स्वकथनाला कंन्फेशन हे नाव दिले होते. पण आंबेडकरी लेखकाच्या जीवनकथा प्रकृतीत

प्रश्नाकार आहेत. हे लेखण तक्रारपुस्तिकेच्या स्वरूपाचे आहे. प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणीचे पक्षी' या स्वकथनाने अशा प्रकारच्या लेखनाचा प्रारंभ झाला आहे. त्यांच्या या आठवणींच्या पक्षांनी आठवणींचा उध्वस्त पटच आपल्या समाजापुढे व साहित्यापुढे मांडला. एका कोंडलेल्या प्रल्हादच्या निमित्ताने अशा सर्व प्रल्हादांच्या आयुष्यांच्या जखमांची पासोडीच या लेखकाने दुनियेसमोर पसरविली."११

या आत्मकथनात प्र. ई. सोनकांबळे यांच्या आगळ्या वेगळ्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. स्वत: सोबत समूहमनाचा शोध या स्वकथनात आहे. बदलत्या समाजमनाचा वेध आहे. या आत्मकथनाचे विशेष महत्त्व भाषाशैली या दृष्टीने असून या आत्मकथनाची निवेदन शैली आकर्षक आहे.

एकूणच 'आठवणीचे पक्षी' हे आत्मकथन सर्व दलित आत्मकथनांचा मुकुटमणी आहे. दलित आत्मकथनांचे मूळच या आत्मकथनात आढळते.

**तराळ—अंतराळ :**

शंकरराव खरात यांचे 'तराळ—अंतराळ' हे आत्मकथन असून आत्मचरित्राच्या जवळ जाणारे आहे असं अभ्यासकांचे मत आहे. पण परंपरागत आत्मचरित्रापेक्षा निराळे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहवास शंकरराव खरातांना लाभला. त्यांचा आंबेडकरी चळवळीशी जवळ—जवळ तीस वर्ष संबंध आला. शंकरराव खरातांनी बालपणी सोसलेल्या व्यथा आणि वेदना या आत्मकथनातून जाणवतात. आजच्या दलित पिढीला अपरिचित असलेला इतिहास या आत्मकथनाद्वारे नवीन पिढीला ज्ञात झाला, हे या आत्मकथनाचे वैभव आहे. खरातांचा प्रवास हा गुर—ढोरं राखण्यापासून तर मराठवाडा विद्यापीठाचा कुलगुरू होण्यापर्यंत आहे. तराळातून—अंतराळातला आहे. प्रा. दत्ता भगत या आत्मकथना संदर्भात म्हणतात, "एक व्यक्ती, एक कार्यकर्ता आणि लेखक म्हणून खरातांचे हे निराळेपण नजरेआड करता येत नाही म्हणूनच त्यांची आत्मकथा हातात घेण्यापूर्वी वाचक म्हणून आपल्या मनात काही अपेक्षा निर्माण होतात. एक कलात्मक आविष्कार आणि तत्कालीक सामाजिक इतिहासाच्या आकलनाचा साधनग्रंथ ह्या दोन्ही दृष्टीने ह्या आत्मकथेकडे पाहण्याचा मोह वाचकाला होतो. "१२

शंकरराव खरातांचे बालपण गुलामगिरीच्या गडद काळोखात न्हाऊन निघाले आहे. हे आत्मकथन तीन खंडात असून आटपाडी गावात माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. इथे पहिला खंड संपतो. दुसऱ्या खंडात औध येथील आठवणी आहेत. तर तिसऱ्या खंडात खरातांचे ३०—३५ वर्षाचे आयुष्य येते. शंकरराव खरात वकील झाल्यापासून मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होईपर्यंतचा जीवनपट यात आहे. शंकरराव खरातांनी वयाच्या ३५ व्या वर्षी पहिली कथा लिहिली. त्यानंतर ते सातत्याने लेखन करू लागले आणि समाजकारण व राजकारणात आले.

'तराळ—अंतराळ' या आत्मकथनाबद्दल स्वत: शंकरराव खरात लिहितात, "दलित समाजाच्या माझ्या समाजाला शिक्षणाचा गंध नव्हता. विद्या, शिक्षण, संस्कृतीपासून तर या दलित समाजाला दूरच लांब कुंपणाच्या बाहेर ठेवलेलं होतं. म्हणूनच दोन ओळीचं पत्र वाचून घेण्यासाठी माझ्या बापावर गाव मास्तराच्या घरी गाडीभर लाकडं फोडून देण्याचा प्रसंग आला होता. हे सर्वच मला सर्व भारतीयांना सांगायचे होते. खरं तर त्यातून माझी आत्मकथा, 'तराळ—अंतराळ' हिचा जन्म झालेला आहे. अर्थात ही माझी आत्मकथा मी प्रामाणिकपणे, सच्चेपणाने आणि तटस्थपणे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. अशी ही 'तराळ—अंतराळ' मागील कथा आहे."[१३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार आपल्या आत्मकथेचा आधारभूत पाया शंकरराव खरात मानतात. आणि या विचारातूनच मला स्फूर्ती मिळते आणि पुढच्या वाटचालीकरिता अधिक उत्साह येतो, असे स्पष्ट करतात. "क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले आहे. आसासह चाक पूर्ण फिरल्याशिवाय खरी क्रांती होऊच शकत नाही ते चक्र आम्ही फिरवू."[१४] असा आत्मविश्वास शंकरराव खरात व्यक्त करतात. शंकरराव खरात स्वत:च्या 'तराळ—अंतराळ' या आत्मकथनास 'स्टोरी ऑफ अनटचेबल' म्हणतात.

'तराळ—अंतराळ' या आत्मकथनाचे महाराष्ट्रात चांगले स्वागत झाले आणि चांगल्या प्रतिक्रिया नोंदवल्या गेल्या. वास्तव चित्रण यात आल्याबद्दल दाद दिल्या गेली. यात वेदना आहेत, आक्रेस्ताळपणा नाही असे म्हटले. या आत्मकथनाला कलाकृतीचे मूल्य आहे असे म्हटले. हे आत्मकथन वाचून प्रभावित झाल्याची आणि मन अस्वस्थ झाल्याची नोंदही करण्यात आली. यावरून 'तराळ—अंतराळ' या आत्मकथनाचं वाङ्मयीन मूल्य लक्षात येते.

दया पवार, प्र. ई. सोनकांबळे आपल्या आत्मकथनाच्या माध्यमातून आपल्या आयुष्याचा संघर्ष, भोगावा लागलेला भोगवटा, हलाकिच्या जीवनाची कहाणी सागून आपले मन हलका करण्याचा प्रयत्न करतात. तर शंकरराव खरात आपल्या आत्मकथनेतून संघर्षाने माणूस तराळातून अंतराळापर्यंतचा प्रवास कसा साध्य करू शकतो याचे उदाहरणच वाचकांसमोर सादर करतात.

**निष्कर्ष :**

१. दलित साहित्य हे माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे असून माणसांचे साहित्य आहे.
२. दलित आत्मकथेला, स्वकथने, आत्मकथने, आत्मवृत्तपर लेखन, आत्मचरित्र अशा संकल्पना वापरल्या जाऊ लागल्या. आत्मकथन ही संकल्पना प्रामुख्याने वापरल्या जात आहे.
३. दलित साहित्याचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. आंबेडकरवाद हीच दलित साहित्याची प्रेरणा आहे. दलित आत्मकथने हा दलित साहित्याचा प्रगल्भ आणि

संपन्न आविष्कार आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हीच दलित आत्मकथनांची प्रेरणा आहे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य कर्तृत्व, त्यांची ग्रंथरचना व चळवळी यातून आकाराला आलेला आंबेडकरवाद हीच दलित आत्मकथनांची प्रेरणा आहे.

५. तीनही आत्मकथने दलित लेखक आणि वाचकांना प्रेरणादायी ठरल्या आहेत.

**संदर्भ टिपा :**


१. *पानतावणे गंगाधर, 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' (मनोगत), विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९७६, पृ. १४*

२. *खाडगे भास्कर, 'दया पवार यांच्या साहित्याचा अभ्यास', विमल प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८९, पृ. ७२*

३. *पवार दया, 'बलुतं' एक झाडा झडती', अस्मितादर्श, दिवाळी अंक, औरंगाबाद, १९८३, पृ. १६*

४. *कुसरे—कुलकर्णी आरती, 'दलित स्वकथने : साहित्यरूप', विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९९१, पृ. १९*

५. *मुलाटे वासुदेव, 'दलितांची आत्मकथने : संकल्पना आणि स्वरूप' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, द्वि. आ. २००३, पृ. ७२*

६. *खाडगे भास्कर, उ. नि. पृ. ९७*

७. *पवार दया, 'बलुतं' एक झाडा झडती' (लेख), अस्मितादर्श, औरंगाबाद, दलित आत्मकथा विशेषांक, १९८३, पृ. १६०*

८. *कांबळे कमलाकर, 'आठवणीचे पक्षी एक चिकित्सक अभ्यास', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र. आ. २०१०, पृ. ३४*

९. *पगारे म. सु., 'दलित साहित्याचा इतिहास', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्र. आ. २००५, पृ. १३४*

१०. *कागणे मा. का., 'आठवणीचे पक्षी वेदनेचे वाङ्मय' (लेख), अस्मितादर्शन, दिवाळी अंक १९८३, पृ. ७४*

११. *मनोहर यशवंत, 'आंबेडकरवादी मराठी साहित्य', युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, द्वि. आ. २०१२, पृ. २८६*

१२. *भगत दत्ता, 'तराळ—अंतराळ', 'अस्मितादर्श' आत्मकथा विशेषांक, १९८३, पृ. ६१*

१३. *खरात शंकरराव, 'माझे आत्मकथन आणि तराळ अंतराळ', पृ. १३५*

१४. *तत्रैव, पृ. १३५*

**ग्रामीण समाजवास्तव आणि ग्रामीण कथा**

**डॉ. राखी जाधव**
*व्ही.एम.व्ही महाविद्यालय, नागपूर.*

ग्रामीण समाजवास्तव आणि ग्रामीण कथा या विषयाचा विचार प्रस्तुत विवेचनातून केला आहे. काळाचे परिणाम सगळ्याच कलांवर होत असतात, सभोवताल बदलला की कलांचे स्वरूप बदलताना दिसते. त्या त्या काळातल्या एकूण कलाव्यवहारांचाही चांगला—वाईट परिणाम सर्वच कलांवर होत असतो. सध्या आपला सभोवताल अनेक अंगांनी बदलला आहे. सर्वच कलांचे स्वरूप बदलले आहे. त्या आधुनिक आणि जागतिक होत आहेत. विशेषत: ग्रामीण साहित्यात येणारा परिसर कमालीचा बदललेला दिसतो.

ग्रामीण परिसरांचे भौगोलिक पर्यावरणात बराच बदल झालेला दिसून येतो. कधी काळी पावसाळा—हिवाळा—उन्हाळा हे ऋतू ज्या तीव्रपणे आपले अस्तित्व दाखवत असत, ती तीव्रता आता राहिली नाही. उन्हाळा वगळता बाकी दोन ऋतु फारसे जाणवत नाही. पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. थंडीची तीव्रता कमी झाली आहे. पावसाचा थंडीचा कालावधी कमी झाला आहे याचा परिणाम म्हणून ग्रामीण परिसराचे काळचे स्वरूप आप्त दिसत नाही. पाऊस, झाडे, मोठे पूर, कुडकुडायला लावणारी थंडी, शेकोट्या पाडण्यापर्यंत वाहणाऱ्या गावाशिवारातल्या नद्या त्या नद्यातील डोह, गावाशिवारातल्या आंबराया, चिंचेची झाडे वा इतर वृक्षवेली गावातल्या गायी वासरांची भरपूर संख्या अशा कितीतरी गोष्टी इतिहासजमा झाल्या आहेत. केवळ कथांचे विषय झाल्या आहेत. ग्रामीण परिसराचे जे भौगोलिक पर्यावरण बदलले आहे त्याचा थेट परिणाम ग्रामीण जीवनव्यवस्थेवर झाला आहे.

शिक्षणाचा प्रसार झाला खेडोपाडी शाळा सुरू झाल्या. नवी प्रसार माध्यमे आली. दळणवळणाच्या व्यवस्था अगदी वाडी—तांड्यापर्यंत पोहोचल्या सध्या खेड्यातल्या अनेकांच्या घरात टी.व्ही. आहे. अनेकांकडे मोबाईल आहे काहींकडे दोनचाकी—चारचाकी गाड्या आहेत. नव्या संशोधनातून पुढे आलेल्या अनेक जीवनोपयोगी वस्तू खेड्यांपर्यंत पोहोचल्या आहेत ग्रामीण समाज त्याच्या सभोवतालासह सर्वांगानी बदलला आहे. ग्रामीण माणसांच्या जीवनव्यवस्थेत, जीवन प्रेरणांत आणि जीवनमूल्यात जाणवण्याइतका बदल दिसत आहे. या बदलाचे चांगले वाईट परिणामही ग्रामीण समाज भोगत आहे.

'गावगाडा' पद्धतीचे काळाच्या पडद्याआड जाणे आवश्यक होते. अपवादाच्या कथा सांगता येतील, त्या सांगितल्याही जातात, मात्र त्यामुळे एकूण वस्तुस्थिती बदलत नाही आणि 'गावगाडा' पद्धतीची वस्तुस्थिती हीच आहे की, त्या व्यवस्थेत अलुतेदार—बलुतेदारांचे शोषण

आहे. देशमुख, पाटील, कुलकर्णी यांनी गावातल्या गोरगरिबांचे शोषण केले आहे. लेकीबाळींच्या अब्रु लुटल्या गेल्या आहेत. तेव्हा 'गावगाडा' पद्धतीचे समर्थन करता येणार नाही. स्वातंत्र्यानंतर अस्तित्वात आलेल्या नव्या सामाजिक व्यवस्थेचे स्वागत केले पाहीजे मग त्या व्यवस्थेत अनेक दोष दिसून येत असले तरीही, प्रसारमाध्यमे खेड्यापर्यंत पोहचली आणि त्याचे काही चांगले फायदे आहेतच शहरातल्या माणसांकडे असलेला मोबाईल चांगला पण खेड्यांतल्या माणसांकडे मात्र मोबाईल असू नये, असे म्हणता येणार नाही. परंतु या प्रसारमाध्यमांमुळे ग्रामीण समाजाचे काही नुकसानही झाले आहे. ग्रामीण माणूस आपल्या गरजांचा क्रम लावायला चुकत आहे. चित्रपट, मालिकातील चित्रणाच्या प्रभावामुळे आपल्यासह आपल्या सभोवतालच्या वास्तवाला विसरतो आहे, असे हं विसरणे, आपल्या वास्तवाचे भान नसणे ही बाब कोणत्याच समूहासाठी समर्थनीय ठरत नाही.

अण्णाभाऊ साठे, व्यंकटेश माडगुळकर, श्री.ना. पेंडसे, बी रघुनाथ अशा लेखकांनी तत्कालिन ग्रामीण वास्तव अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला निजामाच्या राजवटीत खेड्यापाड्यांतून रोहिल्यांनी जी सावकारी केली, सामान्य जनतेवर अन्याय केल, त्या अन्यायाचे, संरजामदारी जीवनपद्धतीचे भोगलालूप मनोवृत्तीचे वास्तव टिपणारी 'नागझरीचे पाटील' ही, बी. रघुनाथांची कथा असेल किंवा स्त्री जीवनाचे भोग मांडणारी 'काळी राधा' ही कथा असेल, यात तत्कालीन वास्तव आले आहे. बी रघुनाथांच्या 'आडगावचे चौधरी' या कादंबरीत तत्कालीन सरंजामी जीवनाचे अतिशय प्रत्ययकारी चित्रण आले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी अन्नाची भूक या माणसांच्या मूलभूत गरजेशी संबंधित ज्या कथा लिहिल्या आहेत, त्याला तोड नाही. 'स्मशानातील सोन' सारखी कथा लिहिणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांनी परिस्थिती मानवी जगण्याला आणि त्याच्या वर्तनाला कशी आकार देते, हे वस्तुस्थितीच्या आधारे अधोरेखित केले आहे. थोडक्यात म्हणजे अनेक ग्रामीण लेखक—कवींनी ग्रामीण जीवन वास्तवाचे उदारीकरण—विकृतीकरण केले तसे काहींनी ग्रामीण जीवनाचे वस्तुनिष्ठ चित्रणही केले आहे.

ग्रामीण कथेचा विचार केला तर प्रत्येक कथाकार हा आपला जीवनानुभव आपल्या कथेतून व्यक्त करीत असतो मानवी समाजजीवनातील बदलती नीती, मुल्ये, रूढी—परंपरा आणि त्यातून घडणारे बदल व ताणतणाव यांचा शोध घेण्याचा प्रयत्न कथा वाङ्मयातून केला जातो. व्यक्ती व समाज यांचे परिणाम कथेला प्राप्त होत असतात. कथा या वाङ्मयप्रकाराने मराठी साहित्याला समृद्ध केले आहे. विशेषत्वाने ग्रामीण कथा वाङ्मयप्रकार लोकप्रिय ठरला आहे. ग्रामीण कथेतून ग्रामीण परिसर शेती, निसर्ग माणसांचे मातीशी जुळलेले ऋणानुबंध रूढी—परंपरा ग्रामसंस्कृती, धार्मिकता, अंधश्रद्धा जीवनपद्धती सामाजिक बांधिलकी इत्यादी विषयांचे चित्रण कथेतून अविष्कृत होत असते.

साठोत्तरी काळातील रा.रं बोराडे, भास्कर चंदनशिव, मधु मंगेश कर्णिक, चंद्रकांत भालेराव, द.ता. भोसले यांनी ग्रामीण कथांचे लेखन करून मराठी ग्रामीण कथेला समृद्ध केल्याचे दिसून येते. या कथाकारांच्या कथांमधून ग्रामीण भागातील माणसाचं जगणं, त्यांच्या जगण्याचे संघर्ष यांचे चित्रण मोठ्या प्रमाणात झालेले दिसून येते.

१९९० नंतरच्या काळात भारतीय समाज व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. शेती, शेतकरी, शेतीवर अवलंबून असणारे घटक असुरक्षित झाले. जागतिकीकरण, खाजगीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाचे परिणाम ग्रामीण दलित, शोषित या सर्वच वर्गावर दिसू लागले ग्रामीण परिसरातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक सांस्कृतिक जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. या नव्या समस्यांना हे ग्रामीण कथाकार भिडताना दिसतात. चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, सदानंद देशमुख, आसाराम लोमटे या लेखकांनी बदलत्या कालसंदर्भानुसार कथालेखन करून मराठी कथेला समृद्ध केले आहे. आनंद यादव, नागनाथ कोतापल्ले, वासुदेव मुलाटे, रा.र. बोराडे, भास्कर चंदनशिव, राजन गवस, सदानंद देशमुख, रंगनाथ पठारे, विश्वास पाटील, पुरूषोत्तम बोरकर, आनंद विनकर, भारत काळे, गणेश आवटे, आसाराम लोमटे इत्यादी लेखकांनी समीक्षक या नात्याने ग्रामीण साहित्यात स्वतंत्र ओळख निर्माण करून दिली आहे. हे आजही लिहित आहेत त्यांनी आपल्या लेखनाला जेव्हा सुरूवात केली तो प्रारंभीचा काळ आणि सध्या ते ज्या वास्तवाचा काळ होऊन जगताहेत ते आजचे वास्तव याची तुलना केली तर कमालीच्या बदलांचे स्वरूप लक्षात येईल. खरे तर दीर्घ आयुष्य लाभलेल्या कोणत्याही काळातल्या कोणत्याही माणसाला परस्परांपेक्षा थोड्याफार फरकाने का असेना वेगळ्या जीवनानुभवाला सामोरे जावेच लागते वयाच्या वीस पंचविसाव्या वर्षापर्यंतचा सभोवताल साठ सत्तराव्या वर्षी तसाच असतो असे नाही पण सध्या बदलांचा वेग एवढा आहे की पन्नास वर्षापूर्वीच्या सभोवतालाचा आणि आजच्या सभोवतालाचा ताळमेळ जुळवणे ही अवघड होत आहे. सध्या ज्यांचे वय साठ वर्षापेक्षा जास्त आहे, त्यांना त्यांच्या पूर्वजीवनापेक्षा बऱ्यापैकी भिन्न जीवन वास्तवाला सामोरे जावे लागत आहे. अर्थात अशा वेगवान काळात आपले पूर्वजीवन हातून निसटल्याचे दु:ख भोगावे लागते, हे खरे असले तरीही नवे काही हाती आल्याचा आनंदही असतोच. मात्र तरीही जे हातून निसटले आहे, हे विसरू म्हटले तरी विसरत नाही.

चंद्रकुमार नलगे हे मराठीतील एक महत्त्वाचे ग्रामीण कथाकार म्हणून परिचित आहेत त्यांचे वास्तव कोल्हापूर परिसरातील आहे त्यामुळे त्यांच्या कथांमधून प्रामुख्याने कौटुंबिक ताणतणाव, माणसांच्या मनातील गैरसमजातून निर्माण होणाऱ्या समस्या ग्रामीण कृषिसंस्कृतीतून निर्माण होणारी विलक्षण मानसिकता व संघर्ष ह्यांचे चित्रण केले आहे. तसेच त्यांच्या कथांमधील कौटुंबिकतेला एक प्रकारची सामाजिक संदर्भाची किनार आहे. त्यांच्या 'दारकोट'

ह्या कथासंग्रहामध्ये प्रामुख्याने व्यक्तिचित्रणावर कथा आहे. चंद्रकुमार नलगे ह्यांची ग्रामीण कथा प्रामुख्याने कौटुंबिक आणि भावनाप्रधान वाटते. विशेषत: काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रिया, त्यांची दु:खे हे नलगे ह्यांच्या कथांचे विषय बनलेले आहेत. ग्रामीण संस्कृती, तिथल्या निसर्गाचा होणारा प्रभाव, तिथल्या माणसाच्या जीवनातील भावनुभव मोठ्या तरलतेने व जरूर तेव्हा ग्रामीण बोलीभाषेतून परिणामकारक रीतीने वर्णन केले आहे. त्यामुळे ग्रामीण अस्सल, अनोखे व अनगड रूप नलगे ह्यांच्या कथांना लाभले नाही. उपेक्षित, दरिद्री, श्रमिक, दुदैवी, स्त्रीजीवन, भटके व दलित, शोषित ह्यांच्या जीवनाविषयीची करूणा त्यांच्या कथांमधून प्रत्ययास येते ग्रामीण वास्तवाने पुरेपूर भान नलगे ह्यांच्या कथालेखनाला आहे. खऱ्या अर्थाने त्यांच्या कथेने ग्रामीण संस्कृती व नव्या सुधारणांच्या वावटळीत सापडलेल्या माणसांच्या जीवनाची विविध रूपे चित्रित केली आहे.

नागनाथ कोतापल्ले हं मराठीतील सुप्रसिद्ध नामवंत साहित्यिक म्हणून परिचित आहे. त्यांचे सुमारे आठ कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. नागनाथ कोतापल्ले यांच्या आयुष्याचा बराच काळ मराठवाड्यातील ग्रामीण भागात गेला आहे. त्यामुळे त्यांच्या कथा अस्सल ग्रामीण आहेत. त्यांच्या बऱ्याचश्या कथांना ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी आहे आणि त्या कथांतून ग्रामीण जीवनातील सुख दु:खे, आशा—आकांक्षा असणाऱ्या व्यक्तिरेखा जिवंत होतात ग्रामीण जीवनाचा अनुभव वाचकांना देण्याची क्षमता त्यांच्या कथांमध्ये आहे. त्यांच्या 'रक्त आणि पाऊस' ह्या कथेतून लागोपाठ चार पाच वर्षापासून पाऊस न पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या साऱ्याच आशा—आंकाक्षा पल्लवित करणारा पाऊस आणि पावसाअभावी शेतकऱ्यांच्या जीवनाची होणारी होरपळ या दोन्ही बाबी कोतापल्ले यांनी या ग्रामीण कथेतून उभ्या केलेल्या आहेत कोतापल्ले यांची कथा ही त्यांच्या लेखनशैलीची स्वतंत्र कलाकृती असून ती त्यांच्या सखोल जीवनानुभव व चिंतनाची कसोटी आहे असे म्हणावे लागते नागनाथ कोतापल्ले यांनी आपले सर्वच प्रतिभासामर्थ्य कथेला देऊन मराठी वाङ्मयात ग्रामीण कथेला सबळ बनविले एवढेच नव्हे तर कादंबरीची शाश्वत लोकप्रियता त्यांनी मराठी कथेला मिळवून दिली.

वासुदेव मुलाटे यांनी बऱ्याच ग्रामीण कथा लिहिल्या आहेत सहकार खात्यात नोकरी करीत असताना मुलाटे यांचा अनेक खेड्याशी संबंध आला. या ग्रामीण भागातील खेड्यातील भ्रष्टाचार, नीतीमूल्यांचा होणारा ऱ्हास, शेतकऱ्यांची होणारी फसवणूक सोसायटीमधील राजकारण, भ्रष्ट कर्मचारी हे सर्व त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहीले, अनुभवले त्याला शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न मुलाटे यांनी आपल्या कथालेखनातून केला आहे.

बाबाराव मुसळे ग्रामीण कथाकारांमधील एक महत्त्वाचे नाव आहे त्यांच्या प्रत्येक कथा या स्वतंत्र विषय आणि आशयाने परिपूर्ण असलेल्या दिसतात. मात्र असे असले तरी मुसळे यांच्या कथेतून ग्रामीण भागातील शेतकरी जीवनाशीच अधिक जवळीक साधण्याचा प्रयत्न

झालेला दिसतो. ग्रामीण माणसांच्या भावभावना, त्यांचे अडाणीपण आणि त्यामूळे संसारात निर्माण झालेले अडथळे, मात्र त्यावरही मात करून जगण्याचा आटोकाट प्रयत्न, दुष्काळासारख्या संकटावर मात करण्याची कसोटी, दारिद्र्य जीवन जगत असतानाही मुलीच्या बोळवणासाठी गोठा रिकामा करणारे शेतकरी, अंधश्रद्धेने ग्रासलेले ग्रामीण समाजमन व त्यामुळे नाहक बळी जाणारी सामान्य माणसे, तरी ही इमानदार, कष्टकरी, शेतकरी माणूस नाते टिकविण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणारी खेडवळ पण प्रेमळ माणसे इत्यादी स्वरूपाचे विषय या कथांमधून आलेले आहे.

प्रा. डॉ. आनंद पाटील यांचे नाव मराठी साहित्यात विशेषत: मराठी ग्रामीण कथेच्या संदर्भात आवर्जुन घ्यावे लागते. यांच्या कथांना अस्सल ग्रामीण जीवनाचा स्पर्श झाला आहे. त्यांनी आपल्या सर्वच कथांमधून ग्रामीण भागातील अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. त्यामधील अनेक पात्रे, व्यक्तिरेखा यांच्या जाणिवेतून आपल्या समस्या, अन्याय, अत्याचार यांच्या अभिव्यक्तीसह जाणिवा व्यक्त केल्या आहेत. आनंद पाटील यांच्या कथांची सुरूवात आशयानुरूप होत असलेली दिसून येते पण कथानकाचा गाभाभूत घटक मात्र सुरवातीपेक्षा वेगळाच म्हणजे ग्रामीण भागातील वास्तवतेच्या वेदनेला स्पर्श करणारा केला आहे.

सदानंद देशमुख हे विदर्भातील ग्रामीण कथाकारांमधील अतिशय महत्वाचे असे नाव आहे. यांची कथा विदर्भातील वर्तमान ग्रामीण समाजाचे भेदक वास्तव टिपणारी आहे ग्रामीण समाजजीवनातील काबाडकष्ट, वेदना, भोग, भय, मूलभूत समस्या यांचे चित्रण देशमुखांच्या कथेतून आलेले आहे.

सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू आहे. महाराष्ट्रातील शेतकरी दारिद्र्य नापिकी आणि कर्जाच्या विळख्यात सापडलेला आहे. भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. बाजार समित्यांमधील दलाल अडते, सावकार, सधन शेतकऱ्यांचे वर्चस्व यामुळे सामान्य शेतकरी भरडून निघत आहे. शेतकी व्यवसायाबाबत शासनाचे उदासीन धोरण, बँकांची अकार्यक्षमता आणि बाजारपेठांमधील शेतमालाचे कोसळलेले दर, परंपरागत शेती व्यवसाय सण—उत्सव—परंपरा वाटत जाणारा कर्जबाजारीपणा या सगळ्यांमुळे शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाला आहे. या सद्यस्थितीचे चित्रण सदानंद देशमुखांच्या कथेतून प्रत्ययास येते.

लोमटे यांनी आपल्या कथांमधून गावगाड्यातील जीवनाचा वेध घेतला आहे. त्यांच्या कथांचे शेवट वाचकांना अस्वस्थ आणि विचारप्रवृत्त करणारे आहेत त्यांच्या कथांना गरीब, शोषित, पीडित माणसांच्या जगण्याचे संदर्भ लाभले आहेत लोमटे यांच्या कथा खेड्याच्या उजाडीकरणाचे भयाण वास्तव उघड करणाऱ्या आहेत. तसेच त्यांच्या कथांना गावातील

राजकारणाची व्यापक संदर्भ लाभलेले आहेत. आज खेडी उद्ध्वस्त होण्यास गावातील राजकारण जबाबदार आहे अशी त्यांची धारणा आहे. राजकारणातील अपप्रवृत्ती, हरवलेली नीतिमूल्ये आणि तत्त्वानिष्ठा यांचा प्रत्यय त्यांच्या अनेक कथांमधून येतो. असे अनेक ग्रामीण जीवनातील संदर्भ लोमटे यांच्या कथालेखनात आढळतात.

अशा अनेक कथाकारांनी आपल्या कथेतून बदललेले समाजजिवन चित्रित केले आहे. ग्रामीण जीवनाचा आलेख रेखाटतांना कथाकारांनी आपल्या अनुभवविश्वातून प्रत्ययास आलेल्या घटना कथेतून रेखाटलेल्या आहेत. आज बदललेले ग्रामीण जीवन लेखकांच्या कथेतून आपल्याला दिसत आहे.

ज्या निर्मितीचा संबंध कलावंतांच्या अंत:हृदयाशी आहे, ती निर्मिती वाचकांच्या हृदयापर्यंत पोहचत असतेच. भास्कर चंदनशिव यांची 'लाल चिखल' ही कथा असेल, उद्धव शेळके यांची 'धग' ही कादंबरी असेल, बाबुराव बागुलांच्या कथा असतील, अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य असेल ते वाचकमनाला भावतेच सच्चा कलावंत आपल्या सभोवतालाशी आणि आपल्या अनुभवांशी बेईमानी करू शकत नाही आणि अशाच कलावंतांच्या निर्मितीत या कलावंताचा काळ चित्रित होत असतो. अशा निर्मितीत उद्याच्या पिढ्यांचा इतिहास असतो. समकालीन ग्रामीण साहित्याच्या मर्यादा असल्या, तरीही अनेक ग्रामीण साहित्यिक समकालीन ग्रामीण वास्तवाचे चित्रण करीत आहेत. विशेष म्हणजे त्यांचे हे साहित्य आपल्या सामाजिक सांस्कृतिक इतिहासाचा दस्तऐवज आहे.

या निबंधाच्या माध्यमातून ग्रामीण समाज आणि ग्रामीण कथा यांचा थोडक्यात परामर्श घेतला आहे. शब्दमर्यादा असल्यामुळे ग्रामीण समाज आणि ग्रामीण कथा यांचा थोडक्यात आढावा घेताना काही कथाकारांच्या कथेचा ही आढावा घेण्याचा प्रयत्न यातून केला आहे. ग्रामीण समाजात झालेला बदल आणि त्याचे प्रत्यंतर ग्रामीण कथेतून आपल्याला दिसते थोडक्यात सांगायचे झाल्यास ग्रामीण कथेतून लेखकांनी ग्रामीण जीवनातील बदल, रेखाटलेला आपल्याला दिसून येतो. वास्तवता आपल्याला त्यांच्या कथेतून दिसते.

**संदर्भ**

*१. ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समीक्षा — आनंद यादव*
*२. मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप — चंद्रकांत बांदिवडेकर*
*३. ग्रामीण कथास्वरूप आणि विकास — वासुदेव मुलाटे*
*४. ग्रामीण कथा : वास्तव आणि रंजकता — रमेश जाधव*

# आदिवासी कविता आणि जागतिकीकरण

**डॉ. रामचंद्र मोरेश्वर वासेकर**
*मराठी विभाग, राष्ट्रपिता महात्मा गांधी कला वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय सावली जि. चंद्रपूर*
*मो.नं. ९६८९३६७०६०*

साठोत्तरी मराठी साहित्यात १९७० नंतर दाखल झालेला आदिवासी कवितेचा प्रवास आज एक विशिष्ठ वळणावर येऊन ठेपला आहे. १९७५ ला भुजंग मेश्राम यांच्या आदिवासी कविता या काव्यसंग्रहापासुन सुरु झालेली आदिवासी कविता पंचेचाळीशीत येऊन पोहचली आहे. या पंचेचाळीस वर्षाच्या कालखंडात प्रकाशित झालेल्या कवितेची चिकित्सा केली तर जागतिकीकरणच्या संदर्भात आदिवासी कवितेवर भाष्य फार तुरळकपणे झाले आहे.

१९९० नंतर जागतिकिकरणाचे वारे वाहू लागले एकूनच व्यवस्थेत अनेकांगी परिवर्तन आकारास आले. जागतिकीकरण ही भांडवलदारीची एक विशिष्ट अवस्था आहे. आज जागतिकिकरणाने साऱ्या समाजघटकांना कवेत घेतले आहे. जागतिकिकरणाच्या प्रक्रियेने एक नवी भांडवलावादी कार्पोरेट अर्थव्यवस्था उभी झाली असुन या भांडवली शक्तीरुपापुढे या देशातील सर्व वंचितांनी हतबल व्हावे असे वास्तव निर्माण झाले आहे. जागतिकिकरणाने सगळयाच गोष्टीचे बाजारीकरण होऊ घातले आहे. वस्तूचे बाजारीकरण, सेवांचे बाजारीकरण जीवनपध्दतीचे बाजारीकरण, यामुळे विशिष्ट भुप्रदेशाशी निगडीत देश, परंपरा आणि त्यांच्यातून निर्माण होणारी संस्कृती, मुल्यव्यवस्था, कालबाहय होणाच्या मार्गावर आहे. जागतिकिकरणाचा परिणाम केवळ नागरी समाजावर झालेला नाही तर ग्रामिण आदिवासी समाजावरही झालेला आहे. जागतिकरणाने सर्व निसर्गाला वेठीस धरले आहे असे म्हटले तर वावगे ठरु नये मोठया—मोठ्या प्रकल्पांसाठी जमीनीचे अधिग्रहण करुन बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भरभराटीसाठी शेतजमीन ताब्यात घेतल्या जात आहे. बहुतांश प्रकल्प आदिवासीच्या इलाख्यात राबवले जात आहेत. यामध्ये आदिवासी शेतकरी विस्थापित होत आहे. मात्र याचा लाभ आदिवासींना तसूभरही मिळत नाही.

जगतिकीकरणाच्या वादळवाटेवर आदिवासी समाजाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यांची भाषा, संस्कृती लोप पावत आहे. जल, जंगल, जमीन या नैसर्गिक संसाधनापासुन तो परागंदा होत आहे सर्वत्र असुरक्षितता वाढीस लागली आहे. या सर्व आशयव्यूहांना आदिवासी कविता काही प्रमाणात स्पर्श करताना दिसते. भुजंग मेश्राम, वाहरु सोनवणे, माधव सरकुंडे, प्रभु राजगडकर, तुकाराम धांडे आणि विनोद कुमरे, यांच्या कवितेतून जागतिक संदर्भ, बदलेल्या परिस्थितीचे भान व्यक्त होताना दिसते.

निसर्गाला भांडवली संस्कृतीने वेठीस धरले आहे. पाणी या नैसर्गिक संसाधनावर भांडवलवादी व्यवस्था आपला हक्क सांगु लागली आहे त्यामुळे पाण्याने ग्लोबल रुप धारण केले असुन युनोपर्यत पाणी पोहचले आहे. हे सांगतांना भुंजग मेश्राम म्हणतात—

" पायाखाली केली पृथ्वी, थेटरांगत
यथावकाश स्त्री—सृष्टी — संस्कृती
म्हणे पाळीवतेचा हा पुरुषार्थ उत्क्रांत
'हे ' पाणी मात्र
माती — पेशी — आकाश अंतराळ होत
पाळीव असण्यातून मुक्त
तरी कमी होईना अघोरी भूक
रचलाय् माणूस एकावर एक पूरुषसूक्त.....
आता न्हाय अमृतमंथन
किंवा संघर्ष
आधिच सज्जप्रलय अटळ
बहुदा, सुस्कृंत होण्यात चुकतंय
इतक की, युनोत पाणी घुसलं........"

(अभुजमाड पृ.क्र.६४)

या कवितेतील संदर्भ जागतिकीकरणाला स्पर्श करणारे असुन भांडवलवादी संस्कृती, पाण्यासाठी पेटणार राजकारण आणि पाण्यासाठी मानवी पातळीवरची अभावग्रस्तता व्यस्त करताना कवी मानवाच्या मतलबी धोरणांनी, पृथ्वीला पायाखाली करुन साऱ्या सृष्टीचा कायाकल्प करायला निघाला आहे. माती, पेशी—आकाश — अंतराळ या सर्वाना भोगण्याची माणसाची अघोरी भूक कधी संपणार. म्हणून सुस्कृंत होण्यात चुकलयं त्यामुळे पाण्यावरुन आज विवाद होत आहेत. पाण्याचा प्रश्न आज जागतिक झाला असुन युनोत पाणी घुसलं असं भाष्य कवी करतो. जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या व्यवस्थेतील अमानुषता, तिच्यातील विसंगती अंतविरोध सांगताना मेश्राम म्हणतात.

"राजकारणाचा फॅशन शो काहिक दिसांचा चाल्ला
चायना बाजारागत स्वप्नाचा महासेल लाग्लाय
सटवीचा फेरा यावी तशी गावोगावी संस्कृती
सौदर्य प्रसाधन, वस्त्र, तोडांत रंगल इंग्रजी माया
कर निकर्ज बुडवण्यासाठी सल्लागार कंसल्टंट
आचरुसंहितेला सीमोल्लघंन कर्तारी यंत्रणा

लाजेकाजेस्तव मुबलक वंशसातल्य पुरवठा
किल्लारी गोदावरी, नर्मदा माणसं नि प्राणी
बर्ड फ्ल्युड कोबंडयांना जो न्याय, नरदेहाचं काय ?
भीड भाड सोडुन माणुसकी व्यापक अवकाश करु
नि नंतर माणुसकीचा अधिकार आणू होय
भारताचा इंडीया होतो. जगाचा होतो व्हिलेज ग्लोब"

(अभुजमाड पृ.क्र. ११०)

समाजव्यवस्थेत निर्माण झालेली अराजकता समाजव्यवस्थेतला अंतर्विरोध सांगून कवी जग हे एक खेडे बनले असले तरी मानवी अधिकाराचे होत असलेले आकूंचन व्यवस्थेत आलेली निष्क्रियता या अराजकाचा भाग झाल्याचा कवी स्पष्ट इशारा देतो आहे.

जगतिकीकरणाने आदिवासीचे आदिवासी, श्रमकारी सर्वहार समाजाचे प्रश्न भीषन बनले आहे. हे सांगताना प्रभू राजगडकर म्हणतात.

"माणस येतील — जातील
लढत राहतील
वंचितांचा संघर्ष कधी संपला कारे ?
तो आहे
खाऊजाच्या वावटळीत
आपला मार्ग शोधीत खंबीरपणे "

(निवडुगाला आलेली फुल पृ.क्र. १३४)

खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाने वंचित घटकाचे हक्क आणि अधिकाराचे झालेले आकूंचन यामुळे निर्माण झालेला संघर्ष समाजाचे शोषण आहे, शोषणाची प्रक्रिया गतिमान करणारी व्यवस्था आहे. तोपर्यत संघर्ष सुरु राहणार हे कवी सांगतो.

जगतिकीकरणात नैसर्गिक संसाधन भांडवली लोकांच्या मालकीचे झाले असुन पाण्यासाठी सर्वसामान्य माणसाला पायपीट करावी लागते त्याला साधे पिण्याचे पाणी मिळत नाही तर मोठ–मोठया प्रकल्पासाठी पाणी मुबलक मिळते हे वास्तव कथन करताना कवी म्हणतो.

" चर्चा: एक बैध्दिक समागम
जग, देश, शहर अन् टोळे
पाण्याकरिता
चर्चेत व्हाऊन निघाले
इकडे निघाली जनता

डोक्यावर घागर घेऊन
पाणी द्या ! पाणी द्या !

(निवडुंगाला आलेली फुलं पृ. क्र.११२)

पाण्यासाठी टाहो होत असताना इथली व्यवस्था मात्र भांडवलवादी व्यवस्थेला नैसर्गिक संसाधने विकते. जागतिकीकरणाचे एकुणच व्यवस्थेत आमुलाग्र बदल झाले मात्र या बदलापासुन आदिवासी समाज अजूनही अनभिज्ञ आहे हे सांगताना 'गोंगलू' या कवितेत राजगडकर म्हणतात

" गोंगलू — गट्ट्याच्या जंगलातला पोरगा
त्याला नाही ठाऊक
झगमगते दिवे
झगमगते दिव्यातल्या विवस्त्र ललना
पायातल्या वाहाणा
करोना की बाटा
गुळ गुळीत रस्ते
मारोती, हुंदाई, सॅट्रो किंवा स्कोडा
शेवरलेट, ट्यावरीन, झुईझप टाटा "

या बदललेल्या बाजारु व्यवस्थेपासुन आदिवासी अनभिज्ञ असुन आजही रानवनात परंपरागत जीवन जगत आहे. शिक्षणाच्या प्रसाराने काही आदिवासीचे जीवनमान उंचावले शहरात राहु लागले मात्र अजुनही बहुसंख्य आदिवासी विपन्नवस्थेत जीवन जगत आहे.

युध्दानंतरचे बगदाद ही जागतिक संदर्भत कवेत घेत माणसाच्या हिसंकवृत्तीचे दर्शन घडवणारी माधव सरकुंडे यांची कविता आहे.

" इराकवरचे युध्दाचे काळे ढगं
आमच्या रानटीपणाचे प्रतिक वाटतात मला
मला चिंता वाटत नाही त्याची
माणसांच रक्त स्वस्त झालयं
हिच काळजी खाते मला "

(मी तोडले तुरुंगाचेदार पृ. क्र. ५८)

मानवाच्या साम्राज्यवादी युध्दपिपासू वृतीने माणूसपण हरवत चाललय जगात वाढत चाललेली ही असहिष्णूता कवीच्या चिंतेचा व चिंतनाचा विषय आहे. कारण युध्दापेक्षाही भयानक असतात पराभुत माणसं ! विजय असतो तात्पुरता युध्दविराम तर पराभव प्रारंभ असतो प्रदिर्घ युध्दाचा; हे वास्तव कवी अधोरेखित करतो.

“जागतिकीकरणाचे ऑक्टोपस
आपल्या वस्तीत घुसत आहेत
ते फस्त करत आहेत
ते उध्दस्त करत आहेत
आपले सारेच सुरक्षा कवचं
आपल्या वस्त्या हिरोशिमा होताहेत
क्षणाक्षणाला ”

( चेहरा हरवलेली माणसं. पृ.क्र. १३०)

जागतिकीकरणाने सर्वसामान्य माणसांचे नैसर्गिक अधिकार डावलून त्यांच्या जगण्याच्या संसाधनावर कब्जा केल्यामुळे त्यांच्या जगण्याचे प्रश्न गंभीर रुप धारण करीत आहे. त्यामुळे एक असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे कवी जागतिकीकरणाच्या संकटाशी मुकाबला करण्यासाठी आदिम समुदायाला लढण्यास सिध्द व्हा हे सांगताना म्हणतो

“आदिम पुत्रांनो
पुन्हा तुमच्या तिरकमठ्यांच्या दोऱ्या
आवळुन बांधा
बाणांना धार लावा
जागतिकीकरणाचे ऑक्टोपस
झुंडीने आपल्या वस्तीत घुसत आहेत
आता युध्द अटळ आहे “

(चेहरा हरवलेली माणसं पृ.क्र. १३०)

जागतिकीकरणाने आदिम माणसाचे हक्क हिरावल्यामुळे आता संघर्ष अटळ आहे. अशी भुमिका कवी माधव सरकुंडे घेतात.

मोठ मोठ्या प्रकल्पासाठी डोंगर, पहाडावर भांडवलवादी कंपन्या पाय रोवत आहे लवासा सारखे प्रकल्प निर्माण करुन तिथल्या आदिवासीना विस्थापित करुन पर्यावरण नियमांची ऐशी तैसी करुन मोठे मोठे प्रकल्प उभारल्या जात आहे. यामुळे निसर्गाला वेठीस धरल्या जात आहे हे सांगताना तुकाराम धांडे म्हणतात.

“दहा हजार एकर जमीन
तिथला माळ मैदान— टेकडी डोंगर — ओठा
त्याच्यावर खेळणारी मोकळी हवा
अन् आतलं पाणी
या सगळ्यासहित ती जमीन

एक माणसानं विकत घेतली ”

( रानफुलांच्या कविता पृ.क्र. १३३)

अशाप्रकारे जागतिकीकरणात निसर्गावर आक्रमण होत आहे म्हणून कवी भुगोल सांभाळण्याचे आवाहन करतो.

“आरं पण एक माणूस अर्धा अधिक भुगोल
विकत कसा घेऊ शकतो.
म्हणजे असे कोणत्या शास्त्रात लिवलं हाय
असं करा सगळया शास्त्रानी एकत्र जमा
अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र सगळी धर्मशास्त्र
त्याचप्रमाणे आयटी बायटी पोलिटेक्नीकी पोरींनो तुम्हीही या
सगळ्यांनी एकत्र जमून शांत डोक्यांन नीट
बारीक दुरवरचा इचार करा
आणि एवढा भुगोल सांभाळा”

( रानफुलांच्या कविता पृ.क्र. १३४)

भुगोल म्हणजे निसर्ग, या निसर्गाला सांभाळण्याचे आवाहन कवी करतो कारण सर्व शास्त्र माणसांन निर्माण केली. ती बिघडली तर दुरुस्त करता येतील दुसरी शंभर शोधून काढता येतील परंतू निसर्गान सजीवांसाठी निर्माण केलेला भुगोल बिघडला तर माणूसच शिल्लक राहणार नाही, एक नवी मुल्यदृष्टी आणि मुल्यभान देणारी हि कविता आहे.

जगतिकीकरणातील शोषणव्यवस्थेचे नवे रुप समजायला अतिशय कठिण होऊन बसले आहे. त्यापूवीचे सामाजिक पातळीवरचे शोषण दिसत तर होते पण या काळातील शोषण फक्त जावणते दिसत मात्र काहीच नाही जागतिकीकरणाने आदिवासी समाजाच्या शोषनाचे मनसुबे अधिक गडद आणि गहीरे झाले आहे. हे सांगताना विनोद कुमरे 'अरण्य' या कवितेत म्हणतात.

“त्यांनी आरंभलेल्या जागतिकीकरणाच्या पुसट बिंदुपासुन
तुझ्या काळजात रुतवताहेत खंजीर
तुला करताहेत रक्तबंबाळ, नि भुईसपाट
आखताहेत वेगवेगळे प्रोजेक्ट तुला घालताहेत कुंपण
रचताहेत तुझ्या कत्तलीचा इतिहास पुन्हा पुन्हा
आणि घडवताहेत जगभर तुझ्या कत्तलीचं चर्चासत्र”

( आगाजा पृ.क्र.२)

विविध प्रकल्पाच्या नावाखाली अरण्यात भांडवलवादी व्यवस्था शिरली असुन आदिवासीना त्यांच्या जागेवरुन हुसकावून लावत आहे. निसर्ग नियमाच्या सर्व मर्यादा मोडुन मोठमोठाले प्रकल्प उभे केल्या जात आहे. या सर्व आशयव्युहाना ही कविता व्यक्त करते.

अरण्यसंस्कृतीचे अस्तित्व ग्लोबलायझेशनमुळे धोक्यात येऊ लागले आहे. ज्या अरण्यातून सृष्टीची निर्मीती झाली, मानवादी प्राण्याची उत्कांती झाली ते अरण्य जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे धोक्यात आले आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मुठभराच्या हितसंवर्धानासाठी बहूसंख्या माणसाचा बळी दिल्या जात आहे. आदिवासी, श्रमकरी, शेतकरी, सर्वहारा समाजाचे नैसर्गिक हक्क आणि अधिकार डावलल्या जात आहे. राजकीय यंत्रणा भांडलवादी लोकांची बटीक बनत आहे. विकासाच्या आभासमयी स्वप्नाचा मनोरा उभा करुन बाजारी व्यवस्था निर्माण केल्या जात आहे. अशा अनेक आशयव्यूहांना आदिवासी कविता स्पर्श करताना दिसते.

जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली समाजव्यवस्थेतील अराजकता, असुरक्षितता, संघर्ष आणि सर्वसामान्या माणसाची हतबलता याही बाबीचा वेध ही कविता घेताना दिसते.

## संदर्भ ग्रंथ सुची

*१. भुजंग मेश्राम “ अभुजमाड” लोकवाङ्मय गृह मुबंई प्र. आ. २००८*
*२. प्रभु राजगडकर “ निवडुंगाला आलेली फुल” प्रनिल प्रकाशन चंद्रपूर*
*३. माधव सरकुडे “ मी तोडले तुरुंगाचे दार” देवयानी प्रकाशन यवतमाळ प्र. आ. २०११*
*४. माधव सरकुडे “ चेहरा हरवलेला माणसं” देवयानी प्रकाशन यवतमाळ प्र आ २०१५*
*५. तुकाराम धांडे “रानफुलांच्या कविता” सपांदक संजय लोहकरे, अक्षता प्रकाशक पुणे प्र. आ. २०१४*

# समकालीन मराठी कविता : एक दृष्टिक्षेप

**डॉ. सुधीर व. रायपुरकर**
*नागपूर मो. 9405750530*

## कविता म्हणजे काय :

कवितेची समीक्षा लिहिणार्या समीक्षकांनाही 'कविता म्हणजे काय'हा प्रश्न ऐरिस्टॉटलच्या काळापासून आजवर छळतोच आहे. पौर्वात्य आणि पाश्चिमांत्य या दोन्ही परंपरांमध्ये कवितेची व्याख्या करण्याचे अगणित प्रयत्न झाले. परंतु कवितेची सर्वमान्य किंवा अंतिम अशी व्याख्या कुणालाही करता आली नाही. याचे मूळ "व्याख्या" या संज्ञेची जी व्याख्या दिली जाते त्यात दडलेले आहे. "व्याख्येत वस्तुचे किंवा संज्ञेचे व्यवच्छेदक लक्षण देणे म्हणजे व्याख्या." कवितेच्या बाबतीत असे व्यवच्छेदक लक्षण किंवा एकच एक सत्व कुणालाही शोधता आले नाही. म्हणून व्याख्येच्या नावाखाली अनेक कवी-समीक्षकांनी कवितेची लक्षणे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. अगदी एरिस्टॉटलपासून विलियम वर्डसवथ, टी. एस. इलियट, मिशेल रिफातेरी, रिचर्डस, हर्बर्ट रीड, टेरी ईगलटन आणि मराठीत अलीकडच्या काळात सुधीर रसाळ, रमेश तेंडुलकर, म.सु. पाटील, गंगाधर पाटील, वसंत आबाजी डहाके, चंद्रकांत पाटील, मिलिंद मालशे यांच्या सारख्या जाणकार समीक्षकांनीही हा प्रयत्न केलेला आहे. वाचकाला जशी बा.भ. बोरकर, इंदिरा संत, शांता शेळके यांची कविता कविता वाटते तशीच बा.सी. मर्ढेकर, दि. पु. चित्रे, अरुण कोलटकर आणि नामदेव ढसाळांची कविता कविताच वाटत असते. अलंकार, प्रतिमा, प्रतीक, मिथक, आदिबंध आदींचा वापर करणारी छंदोबद्ध, वृत्तबद्ध किंवा मुक्तछंद-मुक्तशैलित लिहिली गेलेली संहिता आपण कविता म्हणून स्वीकारत असतो. सुधीर रसाळ यांनी प्रतिमेला केंद्रीभूत मानून "शब्दांनी घडविल्या गेलेल्या प्रतिमांची सेंद्रिय रचना म्हणजे कविता होय." अशी एक व्याख्या केली. (कविता आणि प्रतिभा-सुधीर रसाळ) त्यांच्या मते, प्रतिमा हा घटक कवितेला काव्यात्व मिळवून देणारा प्राणभूत घटक आहे. प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्रात वक्रोकितजीवितकार आचार्य कुन्तक यांची व्याख्या मूल्यवान आहे. "काव्यमर्मज्ञांना आनंद देणार्या सुंदर (वक्र) कवी. व्यापारयुक्त रचनेतील शब्द आणिअर्थ यांचा समन्वित रूपाला काव्य म्हणतात." त्यांच्यामते, वक्रोक्ती हा काव्याचा आत्मा आहे. या ठिकाणी ध्वन्यालोककार आनंदवर्धन यांच्या मते, "ध्वनी हा काव्याचा आत्मा असतो," 'वसंत आबाजी डहाके लिहितात. "नाद आणि अर्थ असलेला शब्दांची सममूल्यतेच्या तत्त्वानुसार केलेली मांडणी असलेल्या ओळींची, छंद, अक्षरगणवृत्त मात्रावृत्त अथवा मुक्तछंद-मुक्तशैली यांतील लय-तालात बांधलेली; अलंकार, प्रतिमा, प्रतीक, मिथक, आदिबंध यांच्या उपयोजनाचे अर्थसंपृक्त असलेली वाच्यार्थ आणि वाच्यार्थातून स्पंदित होणारा व्यंगार्थ असलेली रचना म्हणजे कविता, असे म्हणता येईल." (काव्यप्रतीती -वसंत आबाजी डहाके)

एकविसाव्या शतकातील विविध बदलांचा व्यक्तीच्या जिवनावर होणारा परिणाम आज आपण साहित्य प्रवाहांच्या विविधांगी लेखनातून अनुभवतो आहोत वाचणारा, लिहिणारा, व्यक्त होणारा वर्ग विकसित झाला

आहे. संवाद माध्यम आणि प्रसार मांध्यमांचे स्वरूप बदलले आहे. संवाद माध्यमांप्रमाणे प्रसार माध्यमांचा खरेखोटे पणा उघड होताना दिसतो आहे. जेवण, झोप अभ्यास, कौटुबिक कार्यक्रम, पाहुणे राहुणे, भेटीगाठी. आवडीनिवडी, इच्छा, अपेक्षा मानसिकता यांच्यावर या सार्यांचा प्रभाव होतांना दिसतो. इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमाने हे विश्व व्यापून टाकले आहे असे म्हणणेे अतिशयोक्ती ठरणार नाही.

या बदलत्या जीवन शैलीमुळे ज्ञान, सदगुण, सदाचार, सद्भाव, साधेपणा, सहृदयता, संवेदनशीलता, विचारीपणा, संतुलन या सार्यांना तिलांजली देणे सुरु आहे. जीवन म्हणजे प्रवाह आणि असेच प्रवाहित होत राहणेे मानव इष्ठ मानत चाललाय. ज्ञान, गुणसंपन्नता आणि आत्मभावलोप होतांना दिसतो. मन, बुद्धी, भावना, विचार, जाणिवा, सशक्त, सार्थक आणि व्यापाक होण्याएवजी संकुचित होताना दिसतात. जागतिक घडामोडी आणि भारतीय समाजजीवनातील अनेक क्षेत्रांमध्ये जी स्थित्यंतरे घडून आलीत त्यातून निर्माण झालेले पडसाद नव्वोदत्तरी साहित्यामध्ये प्रकर्षाणे कवितेच्या प्रांतात पहावयास मिळते.

भारत विविधतेने नटलेला देश आहे. इथे अनेक जाती, पंथ, धर्म, संप्रदाय आहेत. ह्या सर्वांना सामावून घेणारी भूमी इथल्या विविध्यपूर्ण जीवन जाणीवांनी सिद्ध आहे. भारतीय समाजजीवनात विविध क्षेत्रांमध्ये अनेक लहान-मोठ्या क्षेत्रातजी स्थित्यंतरे घडत गेली. त्या सर्व स्थित्यंतराचा परीणाम नव्वोदत्तर साहित्यामध्ये बघावयास मिळतो. आजचं युग हे ग्लोबल व्हिलेज बनलेलं आहे. जग संगणक, महाराजालाच्या सूक्ष्म धाग्यांनी बांधलं जावून सामान्य माणसाच्या जगण्याचे प्रश्नच आपल्या महाराजालातून अद्दश्य झाले आहे. विकासाच्या आणि नागरिकरणाच्या जगात जागतिकीकरणातील जगण्याचे प्रश्न सोडविण्याच्या चिंतेत सरकार आणि समाज गुंंतलेला आहे. मनुष्य ज्या समाजात, संस्कृतीत, मूल्य व्यवस्थेत आणि भौगौलिक पर्यावरणात जगत असतो त्याच वातावरणात आकार घेणार्या सांस्कृतिक मूल्यांना अखेर साहित्यात महत्त्व असते. मराठी कवितेचा वर्तमान काळाशी संबंध प्रस्थापित केली की नव्या तरुण नगरीय महानगरीय कवींनी जागतिकीकरणात गुदमरणार्या आपल्या सांस्कृतिक जीवनविश्वाची ससेहोलपट व्यक्त करण्यावर अधिक भर दिला आहे.

कवी संवेदनशील आणि प्रतिभावंत असतो. जगाच्या वर्तमानात तो जगत असतो. मराठी साहित्यात जागतिकीकरणाचे जे सर्वाधिक पडसाद उमटले असतील तर ते नव्या दमाने तरुणाईत काव्य लेखन करणार्या कविंच्या काव्यातून, हे लक्षात घेतले पाहिजे.

ग्लोबल व्हिलेजचा प्रारंभमुळ विसाव्या शतकाच्या अंतिम क्षणी आणि एकविसाव्या शतकाच्या सुरवातीला झाला आहे. या संक्रमणावस्थेत जगतांना मराठी कवी ह्या नव्या महाजालात किंबहुना मायाजालात गुंतलेल्या मानवी जिवन अवलोकन करतांना स्वानुभव, सामाजिक चिंतन त्याच्या कवितेतून मांडतो. बहुतांश नवतरुण कविंनी जागतिकिकरणाचा उपहास केला आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावर होणारा आधुनिक प्रभाव म्हणजे जागतिकीकरण होय. एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी जागतिकीरणाचा आधुनिक परिणाम अधिक प्रकर्षाने जाणवला. जगभरातील देशांची संस्कृती, परंपरा देशप्रेम, अस्मिता, मातृभाषा, ललित आणि ललितेतर कला, अर्थव्यवस्था-मानवीमूल्ये-ललितेतर कला, भाषा प्रभावित झाली आहेत. भालचंद्र नेमाडे, वंसत आबाजी

डहाके, सतीश काळसेकर, मनोहर ओक, चंद्रकांत पाटील, अरुण कोलटकर, तुलसी परब, मनोहर शहाणे, वसंत दत्तात्रेय गुर्जर आदीं कवींच्या कवितांमधून मानवी मूल्यांच्या, कलाचा र्हासाबद्दल प्रतिक्रिया उमटलेल्या आहेत.

विसाव्या शतकाच्या अस्तांचलावर उभ्या असणार्या कवींची नकारात्मक प्रतिक्रिया देशीय अस्मितेचे मापदंड सिद्ध करणारी आहे. श्रीकृष्ण राऊत, श्रीकांत देशमुख, अशोक कोतवाल-प्रवीण बांदेकर, अरुणकाळे, हेमंत जोगळेकर, उत्तम कोळगावकर, नारायण कुळकर्णी कवठेकर, श्रीपाद भालचंद्र जोशी, प्रकाश होळकर, इंद्रजित भालेराव, प्रमोद कोपर्डेकर, लोकनाथ यशवंत, भुजंग मेश्राम, अनुराधा पाटील, प्रकाश किनगावकर, निरजा, कविता महाराज आदींचा उल्लेख करता येईल.

आजच्या नवपिढीच्या कवितेतून एकविसाव्या शतकाच्या उंंबरठ्यावर आधुनिकीकरण आणि जागतिकीरणाविरुद्ध बदलत्या मानवी जीवनाचं चित्रण केलं गेलं आहे. मूल्यर्हास, गरिबांचे शोषण, शेतकर्यांच्या आत्महत्या, जागतिकीरकणामुळे अर्थव्यवस्थेत होणारे सामान्यांचे शोषण, मानवी जीवनावर होणारे दुष्परिणाम, प्रभाव जसे; कुटूंब व्यवस्था, विवाह संस्था, नात्यांमध्ये झालेले बदल, मानसिक अशांतता, ताणतणाव, भौतिक सुखसोयींचा फोलपणा, तुटलेपण-एकाकीपण-परात्मता-वैफल्य-निराशा आदींच्या गर्तेत सापडलेला तरुण, शिक्षण व्यवस्था त्यातून निर्माण होणारी मुल्यशिक्षणाची गरज आदी भाव व्यक्त करणार्या नवकवींमध्ये श्रीधर तिळवे, हेमंत दिवटे, सचिन केतकर, सलील वाघ, संजीव खांडेकर, ओंकार कुळकर्णी, नितीन कुळकर्णी, नितीन रिंढे, अभिजित देशपांडे, प्रल्हाद भावसार, मन्या जोशी, मंगेश बन्सोड, मनोज सुरेंद्र पाठक, प्रफुल्ल शिलेदार, दासु वैद्य, गणेश विसपुते, रत्नाकर धम्मपाल, संतोष पवार, बर्जेश सोलंकी, ज्ञानदा, संदीप देशपांडे, दिनकर मनवर, शामसुंदर मिरजकर, रमेश इंगळे उत्रादकर, रवींद्र इंगळे चावरेकर, दिलीप विरखेडे, अजिम नवाज राही, पी.विठ्ठल, वासुदेव श्रीरंग जोशी, मोहन बोरसे, वीरधवल परब, देविदास चौधरी, प्रदीप पाटील, मनोज बोरगावकर आदी कविंच्या काव्यात जाणवला. लोकवाङ्मय प्रकल्पातल्या कविंचा उल्लेख करतांना निशिकांत निरंजकर म्हणतात, “मराठी लोककाव्याने मराठी कवितेला विशिष्ट लय, भावनांचा सच्चेपणा आणि जीवनातील सत्याचा सोशीक स्वीकार ही वैशिष्ट्ये दिली आहेत.” (नव्या वाटा नवी वळण पृ. 15)

महाजाल-इंटरनेटच्या बदलांमुळे जग जवळ आल पण त्याचच चंगळवादात रुपांतर झालं. या माध्यमांमुळे अभिरुचीच्या ठिकाणी वाचन न राहता- बघण्यावर भर दिला गेला त्यातूनच वाचन संस्कृती नष्ठ होण्याच्या उंबरठ्यावर आपण उभे आहोत असे आज वाटायला लागले आहे.

भारतीय समाजालाही धार्मिक संस्कृतीची एक परंपरा आहे. त्याचप्रमाणे जातीयता, अस्पृश्यता, विषमता यांची अभेद्यभिंत माणसामाणसांत निर्माण केली गेली आहे. एकीकडे अंधश्रद्धा, आंधपणाने केलेला देवीदेवतांचा स्वीकार, तर दुसरीकडे वाढत चाललेली भौतिकवाद या द्वंद्वाची भयंकर व भयावह जाणीव कविला झाली आहे. जीवनातील हरवत जाणारी निरागसता आणि विज्ञान तंत्रज्ञानाने आविष्कृत केलेल्या माध्यमातून येणारी नवी संस्कृती कवी कवितेतून प्रकर्षाने मांडतो आहे. भाषा आकृतिबंध आणि आशयाच्या

दृष्टीने मराठी कविता मागील दोन-तीन दशकात विलक्षण आत्मस्वर व्यक्त करताना दिसते. व्यक्ती ते समष्टी असा प्रवास, चिंता आणि चिंतन निर्माण करणारे चित्र कवींनी कवितेत मांडलेले आहे.

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर माणसाचे जीवन स्वस्त झाले, पैसा महाग झाला. माणूस माध्यम बनला आणि राजकीय आक्रमक खेळाडू बनले. जीवनाचे निरागस आणि नैसर्गिक रुपही तंत्रज्ञानाच्या छायेत विकृत झाले. शहरे माणसांना खावू लागली आणि खेडी ओस पडू लागली. मानवी नातीगोती आणि मानवी संबंधातला ओलावा, प्रेम, आपुलकी, ममत्व, सहदयता औपचारिकतेपुरताच शिल्लक राहिला. एकूणच उदभवलेल्या विकृतीकरणाने मानवी संबंधाची ओल शोषून घेतली आहे.

जागतिकीकरण, उदारीकरण, बहुराष्ट्रीय कंपन्या, जागतिक वित्तसंस्था, खुली अर्थव्यवस्था, शेतीचाही खुला व्यापार अशा आर्थिक उलाढालींनी भारतीय अन्नधान्य आणि कृषी उत्पादनं, भाजीपाला, फळं, दुध, साखर आदींची आयात भारतात व्हायला लागली. पूर्वी नवलाईच्या असणार्या विदेशीवस्तू आज खेड्यापाडयात सहज उपलब्ध व्हायला लागल्या. खुल्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार देशभर झाला त्याचा परिणाम भारतीय शेती, उद्योगांवर झाला आणि ती दम टाकायला लागली. खुल्या अर्थव्यवस्थेमूळे कंगाल झालेला शेतकरी आत्महत्या करू लागला. ग्रामीण जीवनावर काव्यलेखन करणारी एक परंपरा विठ्ठलवाघ ते ना. धों. महानोर अशी तर श्रीकांत देशमुख, जयराम खेडेकर, इंद्रजित भालेराव, नारायण सुमंत, सदानंद देशमुख, प्रकाश होळकर संजिवनी तडेगावकर, आणि ऐश्वर्य वाहेकरांपर्यंत अनेक कवींनी देशीय जाणीवांना केंद्रवर्ती मानून काव्यनिर्मिती केली आहे. ग्लोबल व्हिलेजच वर्तमान मांडतांना उत्तम कांबळे म्हणतात.

"वैश्विक खेड शोधण्याचा प्रयत्न करतेय कविता  
पण हे खेडंही माल भाकरीतल्या चंद्रासारखं  
ते असून दिसत नाही आणि दिसत नसून असतं  
या अदृश्य खेड्यात जाण्यासाठी  
धनवंताची, बद्धीवंताची काय गर्दी!

संगणक, क्रेरडिट कार्ड, पासपोर्ट, फॉरेन करन्सी, एक्सपोर्ट, इम्पोर्ट, एटीएम, ऑनलाईन सर्व्हिस, पासवर्ड, कोडवर्ड, माऊस, साईट, मोबाईल, ई-मेल, चार्टिंग आणि चिटिंगही..."

आधुनिक आणि ग्लोबल व्हिलेजच्या ह्या संगणकीय विश्वात माणसाचा जीव गुदमरत चाललाय कारण कविला मुल्यांचा शोधक असतो म्हणून मूल्यांची पडझड त्याला मौनातही बोलायला भाग पाडते. तर 'अरुण काळे' आपल्या 'ग्लोबलचं गावकूस' या संग्रहातील कवितेत म्हणतात-

तुमचे महानायक  
तुमचे महाकवी  
तुमची अहिंसा आणिशून्य  
......  
माहितीच्या स्फोटात

उडतात जाहीरनामे
माहितीच्या बैलांना
माणूस नाही माहीत...

मनोरंजन, जाहिरात, लैंगिकता आणि फॅशन यांचीच इन्फरमेशन इंटरनेटवर असते. "अरुण काळेंची कविता ग्लोबल व्हिलेजचे केवळ दर्शन घडवित नाही, तर ग्लोबल व्हिलेजमध्ये भविष्यात घडणार्या आपत्तीचीही जाणीव करून देते. नव्वदोत्तरी दलित कवितेने आपली नाळ बांधिलकी, विद्रोह करूणा या तत्वाशी बांधून ठेवली आहे.

अशोक कोलवालांची कविता वाचकाला चिंतनाभिमुख आणि विचारसन्मुख करणारी आहे. यात आत्मशोध, आत्मसंवाद, व्याकुळता, करूणा, चिंतनशीलता, संवेदनशीलता थेट अभिव्यक्ती या विशेषांनी परिपूर्ण आहे. प्रवीण बांदेकरांच्या कवितेतून आधुनिक आणि ग्लोबल व्हिलेजनच्या संगणकीय विश्वात माणसाचा जीव गुदमरत चाललाय असं सडलेल जीवन स्वीकारण्याशिवाय त्यांच्यासमोर दुसरा पर्याय उरलेला नाही. जनसामान्य माणसाच्या तीव्र भावना ते उत्कटपणे व्यक्त करतात. तशी ही कविता आजच्या वर्तमानाचे जिवंतरुप वाचकांसमोर उभे करते. प्रत्यक्षात जगणं औपचारिक, भौतिक आणि तांत्रिक झाले असेल आणि जीवनमूल्ये, भाव-भावना संवेदना, प्रेम, नैसर्गिकपणा जर नष्ट झाला असेल तर येणारा काळ हा असह्य काळ आहे. ही जाणीव बांदेकरांच्या कवितेत प्रगट झाली आहे.

हेमंत दिवटे यांनी तर 'थांबताच येत नाही.' या कविता संग्रहात जागतिकीकरणानं आपलं संबंध नैसर्गिक जीवनच नासवून टाकण्याची भावना व्यक्त करतात. जागतिकीकरण आणि भांडवली साम्राजाच्या नफेखोरीचे भयावह वास्तवभान कविला आहे. दिवटे यांनी जागतिकीकरणाच्या भोवर्यात गरगरणार्या महानगरीय जीवनाच्या संवेदना सुक्ष्मपणे आपल्या कवितेतून मांडल्या आहेत.

नव्वदोत्तर कवयित्रीं अरुणाढेरे, नीरजा, अश्विनी धोंगडे, आसवरी काकडे, अनुराधा पाटील, प्रज्ञा लोखंडे, रजनी वरुळेकर, सुलभा हेर्लेकर, श्रद्धा पराते, आशा पांडे, स्वाती सुरगळीकर, सुचित्रा कातरकर, मनीषा साधू, विजया मारोतकर आदींनी समाज वास्तवाचे शब्दांकन मिस्कीलपणे, हळवेपणाने स्वप्नाळ शैलीत व्यक्त केले आहे.

दासू वैद्य - हा नव्या युगातील कवी वर्तमानात जगतांना भूत आणि भविष्याचा वेध घेत बदलते मानवी जीवन आणि बदलती मूल्य व्यवस्था अधोरेखित करतो. मुक्तछंदातही काव्यमूल्य अबाधित ठेवण्याची प्रतिभा या कवीमध्ये आहे. जागतिकीकरणाचा मारा सहन करीत बदलत्या युगाचा नवनवीन भावननिष्ठ समानतेने सकारात्मक विचार करणारा हा कवी अत्यंत सजगपणे कवितेचा विचार करतांना दिसतो. दासु वैद्य जागतिकीरण, कवींची घराणी वादविवाद, भांडणं काव्यपरंपरा आणि जुनी नवी दुखणी, भाषिक वाद, मानसन्मानाचे तंटेबखेडे आदिकडेही अत्यंत तटस्थपणे पाहतो आणि केवळ कवी म्हणून तो व्यक्त होतो.

श्रीधर तिळवे सारखे अनुभवी जाणकार कवी जागतिकीकरणाच्या विषाणुयुगाची कविता लिहितांना सामान्य माणसाची जाणीवपूर्वक दखल घेतांना दिसतात. त्यांच्या कवितेत जागतिकरणात क्षीण होणारा माणूस आणि जीवनमूल्यांच्या पतनाची गती व्यक्त झाली आहे. कवितेच काव्यापण जोपासणारा हा कवी मानवी जीवनांच

जागतिकीकरण होत असतांना बदलेली भाषा, मूल्ये, संस्कृती कवितेच्या अवकाशात बसवतांना काव्यमूल्यांकडे दुर्लक्ष करीत नाही. नव्या बदलत्या जगाला कवितेतून दिलासा देत आशावाद जपणारा हा कवी आहे.

एकूणच मराठी साहित्यातील विविध वाङ्मय प्रकारांतही जागतिकीकरण आणि आधुनिकीकरणाच्या प्रभावाचे चित्रण झालेले आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावात गुदमरणार्या मानवी जीवनाचे आणि मुल्याच्या र्हासाचे चित्रण मराठी कवितेतून व्यक्त झाले आहे. जागतिकीकरणाला देशीयतेच्या अंगाने विरोध करीत, नकारात्मक उपहासात्मक प्रतिक्रिया नव्वदोत्तर कवितेतून व्यक्त झाल्या आहेत. ग्लोबल आणि आधुनिक युगात विज्ञान तंत्रज्ञान-इंटरनेट महाजाल माहितीच्या युगात माणसाची द्विधावस्था झालेली आहे. भौतीकवादाखाली मानवी जीवन आणि मानवी संस्कृतीचा विनाश होतो आहे. बदलत्या काळातही मानवी जीवन आजच्या पिढीला सुखावह वाटत नाही असुरक्षित आणि कायम भितीग्रस्त असल्याची जाणीव होते.
अशाप्रकारे नव्वदोत्तर समकालीन मराठी कवितेवर आणि त्यातून प्रकट झालेल्या प्रमुख आशयसूत्रांवर एक दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न इथे केला आहे.

## समकालीन लौकिकतावादी समीक्षा

**प्रा. डॉ. रेखा जगनाळे—मोतेवार**
*सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, श्री. भय्याजी पंढरीपांडे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क, हनुमाननगर, नागपूर.*

समकालीन साहित्य हे द्वितीय महायुद्धानंतर उदयास आलेले साहित्य होय. समकालिनता ही अशी संकल्पना आहे की जी केवळ कालसापेक्ष नाही. तात्कालिक नाही. तर ती कालमानानुसार काहीतरी सुचवत असते. येथे लेखकाच्या दृष्टीला फार महत्त्व आहे. लेखक किंवा कलावंत जी कलाकृती निर्माण करतो. ती आशयगर्भ असते. केवळ अभिव्यक्तिला महत्त्व न देता आशयास महत्त्व देणे अधिक उचित असते. असे जीवनवादी समीक्षकांचे अट्टहासपणे सांगणे आहे. कलाकृती आकाराने, रूपाने कशी झाली यापेक्षा कलावंताने आशयदृष्ट्या त्यात काय सांगितले हे अधिक महत्त्वाचे आहे. यालाच 'लौकिकवादी समीक्षा'' असे म्हटले जाते.

'साहित्य समीक्षा' हा लेखन प्रकार साहित्य आस्वादनाला, मूल्यमापनाला योग्य ती दिशा, दृष्टी व चौकट पुरविणारा, साहित्याच्या रहस्याचा बुद्धीपुरस्सर वेध घेणारा असा ज्ञानमार्ग आहे. प्रत्येक आस्वादक त्या साहित्य कलाकृतीचा आस्वाद घेतो. तिचे स्वरूपही विविधांगी असे असते. त्यामुळे तीत अनेक प्रकार संभवतात. 'समीक्षा' म्हणजे साहित्याचे अंत:र्बाह्य स्वरूप उलगडून पाहण्याच्या दृष्टीने समीक्षकाने केलेला तो एक शोधप्रवासच असतो तिची दिशा कधी बहिर्वर्ती तर कधी अंर्तर्वर्ती असते. शोधाच्या पातळीवर तिच्या कक्षा कधी कधी तत्त्वज्ञान मानसशास्त्र, समाजशास्त्र, भाषाशास्त्र इत्यादी सारख्या ज्ञानशाखांशी भिडलेल्या असतात. संस्कृत, इंग्रजी साहित्यशास्त्राच्या गरजेनुसार केल्या गेलेल्या जुजबी मिश्रणावर एढीकतेवर, या समीक्षेची दीर्घकाळ गुजराण होत आलेली आहे. त्यामुळे तिची वाटचाल स्वातंत्र्योत्तर काळानंतरही लंगडतीच राहिली.

समीक्षालेखन म्हणजे एक कधी न संपणारा अखंड शोध. समीक्षेला सर्व वाङ्मय कृतींबद्दल सारखेच कुतूहल वाटले पाहिजे, तिने सर्व प्रकारचा वाङ्मयविचार मग तो कोणत्याही भाषेतील असो सारखाच जिज्ञासू बुद्धीने तपासला पाहिजे. मिळतील तेथून वाङ्मयाच्या अंतर्बाह्य स्वरूपासंबंधीच्या सत्याचे कण गोळा केले पाहिजेत. तिने भाषेचा, राष्ट्राचा, धर्माचा, विशिष्ट मतप्रणालींचा अभिमान बाळगून आपली दृष्टी संकुचीत होऊ देता कामा नये. ललित—वाङ्मयकृतींबरोबरच इतर ललित—कलां कृतींचाही डोळस आस्वाद समीक्षकाने घेतला पाहिजे. त्या कला व्यवहारांबद्दल त्याला तितकाच जिव्हाळा, तितकीच जिज्ञासा वाटली पाहिजे.

आपल्यासमोर असलेली साहित्यकृती ही काय व्यक्त करू पाहत आहे, ती कोणते रूप घेत आहे. जे तत्वत: अभिव्यक्त होऊ पाहत आहे, त्याच स्वत:चे रूप कितपत गवसले आहे, जे जाणवत आहे ते कितपत अपूर्व आहे, लक्षणीय आहे, अर्थपूर्ण आहे इत्यादिंचा विचार त्या साहित्यकृतीच्या संदर्भात करणे योग्य ठरेल. साहित्य समीक्षकाची भूमिका ही बोधकाची नसून शोधकाची आहे.

इ.स. १९५० नंतरची मध्यवर्ती साहित्यसमीक्षा नवसाहित्य समीक्षेची प्राधान्याने अनुबंधीत राहिलेली दिसते. मर्ढेकरपूर्वकाळातील मराठी साहित्यसमीक्षा बव्हंशी बहिर्मुख आणि तंत्रवादी होती. नवसाहित्य हे सांप्रदायिक अर्थाने 'जीवनवादी' नाही, परंतु ते आत्मनिष्ठ पद्धतीने जीवनाला भिडण्याचा प्रयत्न करते. १९५० नंतरच्या मराठी समीक्षेवर एका बाजूने नवकलावादाचा व दुसऱ्या बाजूने नवजीवनवादाचा प्रभाव अलगदपणे वा संकुलपणे पडत असलेला दिसतो. कलाजीवनाच्या अनुषंगाने या काळातील सौंदर्य विवेचनात प्रभाकर पाध्येचा 'सौंदर्यानुभव' (१९७९), रा.भा. पाटणकरांचा 'सौंदर्यमीमांसा' (१९७५) आणि मुक्तिबोधांचा 'सृष्टी सौंदर्य' आणि 'साहित्यमूल्य' हे तीनही साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळालेले, ग्रंथ महत्त्वाचे आहे.

पाटणकर मार्क्सवादी नाहीत, पण जीवनाचा कलेशी अनुबंध मानणारे आहेत. त्यांनी आपली साहित्य विषयक धारणा द्विधृवात्मक मानली आहे. शरच्चंद्र मुक्तिबोधांनी त्यांच्या 'सृष्टी सौंदर्य' आणि 'साहित्यमूल्य' या ग्रंथात मार्क्सवादाच्या प्रतिबिंबाच्या मर्यादिबाहेर जायचा प्रयत्न केला आहे, पण तो पारंपारिक मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या चौकटीत राहून कलावादाच्या विरोधात ते जीवनवादाची बाजू घेत असले तरी भारतीय जीवन हे ऐकेरी वा वर्गीय नसून दुहेरी वा जातवर्गीय आहे हे त्यांनी समजून घेतले नाही. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात जीवनवादाची सरशी होऊन मार्क्सवादी साहित्य बळावेल असे जे भाकित त्यांनी केले होते. ते चुकीचे ठरले. स्वातंत्र्योत्तर काळात उच्चजातीवर्गीय मराठी साहित्यात कलावादाची सरशी घेऊन मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राचे अधिराज्य सुरू झाले.

**लौकिकतावादी समीक्षा :—**

'लौकिकतावादी समीक्षा' म्हणजे जीवनवादी समीक्षा होय. यालाच अस्तित्त्ववादी, आंबेडकरवादी समीक्षा, पुरोगामी समीक्षा, आशयवादी समीक्षा, मानवतावादी समीक्षा, जनवादी समीक्षा, ग्रामीण साहित्य समीक्षा, अशी वेगवेगळी पण एकाच अर्थाची नावे आहे. सर्वांना जीवनासाठी कला अभिप्रेत आहे. 'कसे सांगितले' या पेक्षा 'काय सांगितले' याला जीवनवादात महत्त्वपूर्ण स्थान आहे. कलेतून मांडल्या जाणाऱ्या विषयांना कालबाह्य संस्कृतीच्या चौकटीतून उद्‌भवलेली मूल्य संदर्भ असतात. त्यांना वगळून कलेचा सकारात्मक विचार होऊ शकत नाही. असे लौकिकवाद मानतो. कोणत्याही तांत्रीक करामतीमुळे, आकृतीमुळे, कलाकृतीमुळे महत्ता

स्पर्श करू शकत नाही, तर जीवनाच्या मर्मज्ञ जाणिवांमुळे तिला महत्ता स्पर्श करीत असते. हाच खरा लौकिकतावादी सिद्धांत होय.

लौकिकतावादानुसार कलाव्यवहार पूर्णपणे लौकिकव्यवहार आहे. कला ही जीवनाची निर्मिती आहे. ज्ञानात्मक, व्यवहार मूल्ये कलेत प्रस्तुत असतात. सौंदर्यानुभव व लौकिक अनुभव यात जातीचा फरक नाही. कला नीतीयुक्त असून आस्वादकाच्या मनाचे ऊन्नयन करते. आशय व अभिव्यक्ती यांच्यातील संवादित्त्वाला लौकिकतावादी महत्त्व देतात. प्राचीन मराठी साहित्यविचार लौकिकतावादी असला तरी 'आध्यात्मनिष्ठ लौकिकतावाद' असे त्याचे वर्णन करायला हवे. बांधिलकी साहित्य, विद्रोह आणि साहित्य आणि संस्कृती यांचा घनिष्ठ संबंध असायला हवा. आजचा साहित्यविचार यापुढील साहित्यविचाराचा लौकिकतावादा कडील प्रवास सुचविणारा आहे. 'वास्तव जीवनाचे व्यापक व उच्चस्तर मूल्यशोधनाचे व ते भावनांच्या खेळातून प्रकट करण्याचे सामर्थ्य पाहिजे. व जीवनाचा मर्मज्ञ ठरेल असा प्रतिभावंत पाहिजे.' हे शरच्चंद्र मुक्तिबोधांचे मत हरिभाऊ आपटे, वि.स. खांडेकर, दि.के. बेडेकर, कुसुमावती देशपांडे, नरहर कुरंदकर, रा.ग. जाधव हे जीवनवादी समीक्षक तसेच शरच्चंद्र मुक्तिबोध, द. ग. गोडसे, आनंद यादव, बाबुराव बागुल, व का. शरद पाटील यांनीही मोठ्या प्रमाणात जीवनवादी साहित्यावर समीक्षा लिहून लौकिकवादी साहित्याचा पुरस्कार केला.

लौकिकवादाच्या विरूद्ध असलेली समीक्षा म्हणजे अलौकिकवादी समीक्षा यालाच कलावादी समीक्षाही म्हटले जाते. अलौकिकतावाद म्हणजे कलेसाठी कला, कलावाद साहित्यातील सौंदर्य, त्याच्या निर्मितीत मांडावीत त्यांचे अंतर्मुखतेने आस्वादन व विदारीकरण हे अलौकितावादी विमर्शकाचे कार्य या विवेचनासाठी सामाजिक संदर्भ न्यूनतम व अनिवार्य असल्यास ऊपयोजायचा, हे अलौकिकतावादी समीक्षकांचे गृहीत तत्त्वाचे अलौकिकतावादी साहित्याचे सौंदर्यमूल्य स्वायत्त मानतो. संपूर्ण कलाव्यवहार ही एक अलौकिक घटना स्वयंभू स्वायत्त सौंदर्यमूल्यमांडित असते, असे अलौकिकतावाद मानतो.

**लौकिकतावादी समीक्षेची वाटचाल :—**

साम्यवादी मूल्यांची जाणीव विष्णुबुवा ब्रम्हचारिंच्या लिखाणात स्पष्टपणे आणि ज्योतिबा फुले, आगरकर यांच्या लिखाणात अंधुकपणे आढळते. हरी नारायण आपटेंच्या कादंबरीने वास्तववादाचा स्वीकार केला होता. वा.म. जोशींच्या कादंबरी लेखणावर मार्क्सवादाचा स्पष्ट प्रभाव पडला आहे. त्यांच्या 'सुशिलेचा देव' (१९२९) या कादंबरीत मार्क्सवादी तत्त्वज्ञानाची नोंद आपल्या साहित्यकृतीं मधून घेताना आढळतात. श्री. व्य. केतकरांनी 'ब्राम्हण कन्या' (१९३०) कादंबरी लिहिली. १९५० पूर्वीची मराठी कादंबरी म्हणजे प्रामुख्याने फडके, खांडेकर आणि मांडखोलकर यांची. ह्या तीनही लेखकांवर मार्क्सवादाचा केव्हा ना केव्हा परिणाम झाला. सामाजिक विषमतेची तिव्र चीड आणि गरीबांबद्दल दया ह्यावरच खांडेकरांच्या

मानवतावादाची उभारणी झालेली आहे. मार्क्सवादाचे उल्लेख नगन्य असूनही मार्क्सवादी समीक्षेला स्वागतार्ह वाटेल अशी कादंबरी लिहिली ती विभावरी शिरूरकरांनी मराठी कादंबरीत 'बळी' च्या रूपाने प्रथमच मागासवर्गीय वस्तीचे वास्तव चित्रण आले आहे. मुक्तिबोधांच्या 'क्षिप्रा', 'सरहद्द', 'जन हे वोळतु जेथे' या कादंबऱ्यांवर मार्क्सवादाचा प्रभाव आहे.

मुक्तिबोधांप्रमाणे अण्णाभाऊ साठेंच्या कादंबरीमागील प्रेरणा मार्क्सवादी होती. ह.ना. आपटे, वा.म. जोशी, श्री. व्यंकटेश केतकर यांच्या कादंबऱ्यातून सामाजिक वास्तववादी प्रेरणा प्रकर्षाने दिसून येते. १९५० नंतर जी.ए. कादंबरीकर, भालचंद्र नेमाडे, श्री.ना. पेंडसे, जयवंत दळवी, खानोलकर इत्यादिंनी कादंबरीत अस्सल अनुभव आणला व कादंबरी जीवनस्पशी झाली. खांडेकरांप्रमाणेच कवी अनिल मानवतावाद व मार्क्सवाद या दोन विचार प्रणालित दोलायमान होतांना दिसतात. कुसुमाग्रजांच्या कवितेत अनेक धागे आहे. बा.भ. बोरकरांनी गांधीवादी प्रेरणेने स्पर्श केला, पण सामाजिक दृष्ट्या त्यांची कविता अनुल्लेखनीयच ठरते. वि.दा. करंदीकरांच्या कवितेत मार्क्सवादाचा प्रभाव मोठा आहे. मार्क्सवादी विचार प्रणालिची पूर्ण बांधीलकी न स्वीकारता करंदीकरांची कविता मार्क्सवादी प्रेरणेने जोमदार होते. सुर्व्यांच्या कवितेमागे मार्क्सवादी प्रेरणा शक्तीशाली स्वरूपात आहे.

मार्क्सवादी प्रेरणा घेऊन यशस्वी कादंबरी लिहिणाऱ्या मुक्तीबोधांचे काव्यक्षेत्रातील कर्तृत्त्व अधिक सरस आहे. मर्ढेकरांच्या निराश जाणिवेला प्रतिरोध करणारी कविता लिहिली ती मुक्तिबोध, करंदीकर आणि सुर्वे यांनी. अमरशेख, प्रणालीचे शस्त्रच बनविले होते. अलिकडे क्रांतिकारक जाणिवेचे प्रतीक बनलेली दलित कविता मात्र प्रामुख्याने आंबेडकरांपासून प्रेरणा घेते.

रा.ग. जाधवांसारखे दलित साहित्याचे समीक्षक दलित साहित्याला वर्गसंघर्षापासून व मार्क्सवादा पासून अलिप्त ठेवायचा प्रयत्न करतात. दलित साहित्य हे नवबौद्ध धर्मांतराचे अपत्त्य असले तरी ते डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर उदयाला आलेले आहे. ब्राम्हणी साहित्याशी नाळ जोडणारे ते पहिले आधुनिक साहित्य आहे. दलित साहित्यात आवर्त आलेला नाही असे नाटककार प्रेमानंद गज्वींपासून समीक्षक डॉ. भालचंद्र फडकेपर्यंत सर्वांनी म्हटले, आणि डॉ. फडके सोडून बाकी सर्व सहभागींनी दलित साहित्यात आवर्त आलेला नाही असे नाटककार प्रेमानंद गज्वीपासून समिक्षक डॉ. भालचंद्र फडके पर्यंत सर्वांनी म्हटले, आणि डॉ. फडके सोडून बाकी सर्व सहभागींनी दलित साहित्याला सौंदर्यशास्त्राची गरज नाही असे प्रतिपादिले. सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंबक साहित्य विद्रोही जरी असले. तरी ते ऊथळ असते. या ऊथळपणामुळेच दलित साहित्य आवर्तात सापडले आहे. सर्व कलाशाखांच्या शास्त्रांना सामावणारे आणि त्यांना तत्त्वज्ञानात्मक ऊंचीवर नेणारे शास्त्र म्हणजे सौंदर्यशास्त्र होय.

'ग्रामीण साहित्य' स्वातंत्र्यपूर्वकालीन आहे. पण त्याचे दिघे, माडगुळकर इ. सारखे निर्माते उच्चजातीय असल्यामुळे त्यांना ग्रामीण साहित्याचे वेगळे सौंदर्यशास्त्र असावे असे वाटायचा संभव नव्हता. शंकर पाटिल, रणजीत देसाईसारखे पहिल्या पिढीचे शूद्र साहित्यिक उदयाला आल्यानंतरही, ते जातीव्यवस्था अंतवादी नसल्यामुळे त्यांनाही वेगळ्या सौंदर्यशास्त्राची गरज वाटली नाही. ग्रामीण साहित्य संघटना त्यांनी ब्राम्हणी साहित्य संघटनेविरूद्ध अब्राम्हणी क्रांतिकारी पर्याय म्हणून ऊभारायची नाही. तर ती ब्राम्हणी साहित्य संघटनेवर दडपण आणण्यासाठी वापरायची आहे. अब्राम्हणी साहित्यांला सौंदर्यशास्त्राची गरज आहे. कारण देश जातवर्ग स्त्री दास्यान्ताच्या मन्वंतराकडे जात आहे. त्याचे गुंतागुंतीचे व विराट भावविश्व अब्राम्हणी साहित्यांत चित्तारणे ही काळाची गरज आहे.

जनसामांन्यांच्या जीवनात जननिष्ठ जानिवांनी घेतलेला कलात्मक वेध म्हणजे जनसाहित्य यात जनसाहित्याचे नायकत्त्व जनसामान्यांकडे असते. तसेच त्यांच्या जीवनाचा लौकिकवादाची संकल्पना भौतिकवादी संकल्पनेपेक्षा अधिक व्यापक आहे. त्यांच्यासाठी देवाचे अस्तित्त्व आधारापूरते व म्हणून दुय्यम स्वरूपाचे असते. 'धग' मधील कौतिक, 'माणूस' मधील शंकर, 'गोतावळा' मधील नारबा व 'पाचोळा' मधील गंगाराम शिंपी यांच्यापैकी कुणीच देवाचे अस्तित्त्व नाकारीत नाहीत. आपले जीवन सुंदर व अर्थपूर्ण करण्यासाठी ती पात्रे आयुष्यभर कमालिचा संघर्ष करतात. त्यांच्या जीवनसंघर्षाचे केंद्रीय लक्ष्य माणूस असतो.

मार्क्सवादी, आधुनिक ग्रामीण व दलित साहित्य हे जीवनवादी वा आशयवादी साहित्य आहे. वा.म. जोशी, वि.स. खांडेकर, य.गो. जोशी, मांडखोलकर, साने गुरूजी, वामन चोरघडे, मामा वरेरकर हे सर्व जीवनवादी लेखक होते. 'यमुना पर्यटन' (१८५७) ही बाबा पदमनजीची कादंबरी व तिच्या मागील प्रेरणा अस्सल परिवर्तनवादी, प्रस्थापित विरोधी व जनवादी आहेत. प्रस्थापित विरोधी संवेदनशिलतेतून जन्माला आलेल्या साहित्यधारांचे खरे तेज प्रकट झाले ते 'स्वातंत्र्योत्तर कालखंडात. विशेषतः १९६० नंतरच्या काळात. दलित साहित्य व आधुनिक ग्रामीण साहित्य प्रवाहांच्या रूपाने हरिभाऊ आपटे, केशवसुत, विभावरी शिरूरकर, श्री.ना. पेंडसे, उद्धव शेळके, मनोहर तल्हार यांचे लेखन प्रस्थापित व विरोधी आहे पण लक्षात कोण घेतो' 'बळी', 'रथचक्र', 'धग' व 'माणूस' एकूण मानवी स्थितीचे प्रत्ययकारी दर्शन घडवतात. नवजानिवांसहित आधुनिक ग्रामीण साहित्याला ठसठशित आकार देण्याचे आरंभिचे श्रेय मात्र आनंद यादव, रा.र. बोखडे यांचेच आहे.

जनसाहित्याची भूमिका मार्क्सवादी आधुनिक ग्रामीण व दलित साहित्याच्या विरोधाची मुळीच नाही. असे प्रा. या.वा. वडस्करांचे मत आहे. जनसाहित्याची भूमिका समग्र परिवर्तनाची आहे. ती संपूर्ण समतेचा पुरस्कार करते. त्यामुळे ती केवळ मार्क्सवादी, आंबेडकरवादी वा केवळ ग्रामीणवादी राहत नाही. ती परंपरा मान्य करते. समानतत्त्व शोधते.

'आत्मदुरावा' या गोष्टीचा अस्तित्त्ववादी गंभिरपणे विचार करतात. 'तत्त्वज्ञान' हे मानवी जीवनापासून दूर जात असल्याची तक्रार अस्तित्त्ववादी विचारवंत करतात. जीवनाच्या सर्व क्षेत्रात वाढत जाणाऱ्या सामान्य सत्तेच्या जोखडातून मुक्त होऊन व्यक्तिसत्ता पुन्हा प्रतिष्ठित करण्याच्या महत्त्वकांक्षेतून अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाची ऊत्पत्ती झाली. आत्यंतिक व्यक्तिनिष्ठता व समाजभिमुखता हा या तत्त्वज्ञानाचा पाया 'कोसला' कादंबरीपासून मराठी अभ्यासकांत अस्तित्ववादी साहित्याबाबत चर्चा सुरू झाली. दोन महायुद्धांनंतरच्या अस्थिरतेशी व वेदनेच्या अनुभूतीवर हे तत्त्वज्ञान सोयिस्कर आहे. जी.ए. चित्रे, नेमाडे, खानोरकर यांच्या साहित्यकृतितून अस्तित्ववादाचे स्पष्टास्पष्ट प्रतिबिंब आढळते.

दि.के. बेडेकर, द.ग. गोडसे, मुक्तिबोध, कुसुमावती देशपांडे प्रभुतिंची जीवनवादी समीक्षा ऊदीत झाली. कलेचे पूर्ण स्वायतत्त्व त्यांना मान्य नाही. कलेचा तत्कालीन युगप्रवृत्तींची जीवनविषयक धारणांशी, तत्त्वविचारांशी, मूल्यव्यवहारांशी निकटचा व दृढ अनुबंध असतो. यावर या समीक्षकांचा भर आहे. साहित्य आणि जीवन यांचे अनुबंध साहित्येत्तर कलांच्या आधारे स्पष्ट होण्याच्या दृष्टीने द.गं. गोडसेंच्या समीक्षेने केलेले कार्यही लक्षणीय ठरते. निखळ मार्क्सवादी विचारांच्या सातत्त्याने पुरस्कार करणारी समीक्षा मुक्तिबोधांनी लिहिली.

नव्या कलावादाचा व जीवनदृष्टीचा झालेला संस्कार पाहण्याच्या दृष्टीने प्रा.गं.बा. सरदार यांनी १९५० मध्ये लिहिलेल्या 'ज्ञानेश्वरांची जीवनदृष्टी' हा ग्रंथ लक्षणीय आहे. नवकलावंत व नवसमीक्षक, चित्रे, नेमाडे, करंदिकर, यांची संतसाहित्यविषयक बदलती दृष्टी दिसते. कथा कादंबरी, ऐतिहासिक विचाराच्या दृष्टीने इंदुमंती शेवडे यांनी मराठी लघुकथा हा ग्रंथ लक्षणीय आहे. मराठी कादंबरीच्या स्थितीगतीच्या दृष्टीने भालचंद्र नेमाडे यांनी मराठी कादंबरीचा आपल्या विस्तृत टीकालेखाद्वारे घेतलेला आमूलाग्र वेध मराठी कादंबरी विषयक विवेचनाला नवी दिशा पुरविणारा आहे. म.द. हतकंगवलेकरांनी कथेवर मोठ्या प्रमाणात समीक्षा केली.

ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने डॉ. आनंद यादवांचे 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समीक्षा' पुस्तक लक्षणीय आहे. 'जनवादी साहित्याचे ग्रामीण साहित्याशी व्यवस्थेला नकार' हे दलित साहित्याचे घोष वाक्य आहे. दलित साहित्य हे समूहनिष्ठ गावकुसाबाहेरील, जीवनवादी, वास्तववादी, आशावादी, क्रांतीवादी मार्क्सप्रणीत समाज शास्त्रावर भर देणारे बहिर्मुख असे विद्रोही साहित्य आहे. दलित साहित्य हे प्राधान्याने घटनाप्रधान, निवेदन प्रधान असे आहे. दलित जीवनातील वेदना विद्रोहांना मुखर करणे, तद्वत जागृती घडवून आणने, चेतावणी देणे, दलितांना स्वतःचे भान आणने, ही आपली बांधीलकी असल्याचे दलित लेखक मानतात.

मराठी समीक्षेत लौकिकतावाद आणि अलौकिकतावाद यांचे बीजारोपणही आरंभापासूनच झालेले दिसते. वामन मल्हार यांनी 'सत्यं शिवं सुंदरम' या मूल्यत्रयींचा स्वीकार करून लौकिकतावाद आणि अलौकिकतावाद यांच्यात समन्वय साधला. बा.सी. मर्ढेकर, वा.ल.

कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ, पु.शि. रेगे, वसंत दावतर, प्रभाकर पाध्ये, द.भि. कुळकर्णी आणि सुधीर रसाळ यांच्यासारख्या समीक्षकांनी मराठीतील अलौकिकतावादी साहित्यमूल्य विचाराला आणि समीक्षेला तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले तर..... दि.के. बेडेकर, कुसुमावती देशपांडे, शरच्चंद्र मुक्तिबोध, के.र. शिरवाडकर, स.रा. गाडगीळ, नरहर कुरूंदीकर, रा.भा. पाटणकर आणि रा.ग. जाधव या समीक्षकांनी मराठीतील लौकिकतावादी साहित्यमूल्य विचाराला समृद्ध करण्यात मोलाचा वाटा उचलला. त्यातून मराठीमध्ये अलौकिकतावादी साहित्यसमीक्षेची एक परंपरा निर्माण झाली.

नरहर कुरूंदीकर हे लौकिकतावादी समीक्षक आहेत. लोकशाही, समाजवाद, जातिधर्म निरपेक्षता या मूल्यांवर त्यांची निष्ठा आहे. स्वातंत्र्य हे मूल्य त्यांनी शिरोधार्य मानले असून त्यांच्या मते स्वातंत्र्य ही कल्पनाच नैतिक स्वरूपाची आहे. साहित्याचा अभ्यास केवळ वाङ्मयीन दृष्टीने न करता तो नैतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अंगांनी करणे त्यांना महत्त्वाचे वाटते. 'मूल्यांच्या भाषेत गुंफलेली कल्पना म्हणजे संस्कृती' अशी व्याख्या केली आहे. मात्र स्वातंत्र्य हे मूल्य ते शिरोधार्य मानत असले तरी कलामूल्य असू शकत नाही असे ते स्पष्ट करतात. येथे नरहर कुरूंदकर लौकिकतावाद आणि अलौकिकतावाद यांच्या सीमारेषेवर उभे असलेले दिसतात.

स्वातंत्र्योत्तर काळात दलित साहित्याप्रमाणे स्त्रीमुक्तिवादी साहित्याचाही आवाज ऊमटू लागला आहे. दलित समाजातही इतर कलांच्या जोडीने मौखिक स्वरूपाची साहित्यनिर्मिती होत होती. या समाजाला आता जी साहित्यनिर्मिती करावयाची आहे, ती ग्रांथिक स्वरूपाची आहे. यासाठी ग्रांथिक साहित्यनिर्मितीला पोषक ठरणारी द्रव्ये, या लेखकांनी प्रयत्नाने संपादीत करण्याची गरज जाणवते. सुधीर रसाळ हे अलौकिकतावादी समीक्षक आहेत. तसेच बा. सी. मर्ढेकर, वा.ल. कुलकर्णी आणि गंगाधर गाडगीळ हे देखील अलौकिकतावादी समीक्षक आहेत. या तीनही समीक्षकांच्या समीक्षालेखनाचे स्वरूप स्पष्ट करतांना रसाळ यांच्या वस्तुनिष्ठ दृष्टिचा प्रत्यय येतो. बा.सी. मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ आणि सुधीर रसाळ हे अलौकिकतावादी समीक्षक असून त्यांच्यात काही प्रमाणात भिन्नता आढळत असली तरी एकप्रकारचे सुसंवादित्त्व जाणवते. एस.एस. भोसले हे जीवनवादी साहित्यसमीक्षक असून ते एक साक्षेपी संपादक आहेत. त्यांनी प्र.के. अत्रे, वि.स. खांडेकर आणि नारायण सुर्वे यांच्या साहित्यावर केलेली समीक्षा अतिशय चिंतनीय स्वरूपाची आहे. नागनाथ कोतापल्ले हे जीवनवादी साहित्यसमीक्षक असून पारंपरिक मराठी समीक्षेपेक्षा ही समीक्षा वेगळी आहे. कारण जगता येणं 'जगण्याच्या तत्त्वज्ञानापेक्षाही श्रेष्ठ आहे' हे ते स्पष्ट करताना दिसतात.

कलाव्यवहार हा स्वायत्त आहे आणि कलाव्यवहार हा सर्वसामान्य जीवनव्यवहाराचा एक अविभाज्य भाग आहे. ह्या दोन परस्परविरोधी संकल्पनाव्यूहांचा विचार पाटणकरांनी केला

असून अनुक्रमे अलौकिकतावाद आणि लौकिकतावाद अशी नावे दिलेली आहेत. दोन ध्रुवांसारखे असणारे हे संकल्पनाव्यूह परस्परविरोधी असले तरी परस्परपुरकही आहेत आणि बहुतेक कलांमध्ये ते निदान मुख्यत्वे दिसतात, या दृष्टिने पाटणकरांचे प्रतिपादन यथार्थ ठरते. (सौंदर्य मिमांसा, १९७४)

'लौकिकवादी समीक्षा' ही जीवनवादाचा पक्ष घेणारी आहे. याच समीक्षेला 'अस्तित्त्ववादी', 'आंबेडकरवादी', 'जनवादी', 'ग्रामीण' स्त्रीवादी समीक्षा म्हटल्या जाते. मार्क्सवादी समीक्षाही याच पक्षाचे (समीक्षेचे) नेतृत्त्व करते. 'कसे सांगितले' यापेक्षा 'काय सांगितले' याला जीवनवादात महत्त्व आजही आहे. लौकिकवादी आणि अलौकिकवादी समीक्षा मराठी साहित्यक्षेत्रात आपआपली बाजू मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. आजचा साहित्यविचार यापुढील साहित्यविचाराचा लौकिकतावादाकडील प्रवास सुचविणारा आहे.

**आधार ग्रंथ सूची :—**


१. *आपटे हरी नारायण : 'विदग्ध वाङ्मय', 'निवडक मराठी समीक्षा', (संपादक गो.म.पवार/ म.द. हातकणंगळेकर), साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली २००७.*

२. *कोत्तापल्ले नागनाथ : 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प.आ. २००४.*

३. *गाडगीळ गंगाधर : 'साहित्य : चिंतन आणि शोध', सन पब्लिकेशन, पुणे, प.आ. १९९३.*

४. *गोरे दादा : 'साहित्य स्वरूप', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प.आ. २००२.*

५. *जाधव रा.ग. : 'वाङ्मयीन परिप्रेक्ष्य', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.*

६. *जाधव मनोहर (संपा.): 'साहित्य, समाज आणि संस्कृती', सुविद्या प्रकाशन,पुणे, प.आ. २०००.*

७. *नेमाडे भालचंद्र : 'टीकास्वयंवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दु.आ. २००१.*

८. *गो.मा. पवार : 'साहित्यमूल्य आणि अभिरूची', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प.आ. १९९४.*

९. *पानतावणे गंगाधर : 'साहित्य प्रकृती आणि प्रवृत्ती', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प.आ. १९९९.*

१०. *बेडेकर दि.के. : 'साहित्य निर्मिती व समीक्षा', चित्रशाळा प्रकाशन, पुणे. प.आ. १९५४.*

११. *मर्ढेकर बा.सी. : 'सौंदर्य आणि साहित्य', मौज प्रकाशन, मुंबई, ति.आ. १९७५*

१२. *रसाळ सुधीर : 'वाङ्मयीन संस्कृती', मौज प्रकाशन, मुंबई, प.आ. २०१०.*

१३. *क्षिरसागर श्री.के. : 'वाङ्मयीन लेखसंग्रह', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई, प.आ. १९८४.*

# समकालीन आव्हाने आणि मुक्तिबोधांच्या कवितेतील मानुषता

**प्रमोद नारायणे**
*सहयोगी प्राध्यापक, यशवंत महाविद्यालय, वर्धा*
*भ्रमणध्वनी ९८५०३०९६६५ ई मेल narayanepm123@gmail.com*

## प्रस्तावना

समकालीन जनजीवनाच्या संदर्भात प्रत्येक काळात साहित्याच्या माध्यमांतून चर्चा होताना दिसते. ही चर्चा त्या त्या काळाचे रूप प्रकट करताना दिसते. सध्याची कोरोनाची स्थिती ही मानवासमोर मोठे आव्हाने उभी करणारी ठरली आहे. या स्थितीने काही ठिकाणी मानवतेला तडे गेले आहेत तरी काही ठिकाणी नवमानवता जन्माला आलेली आहे. कोणतीही कला असेल ती परिस्थितीशी समरूप होऊन आपले नवे रूप प्रकट करीत असते. कलांमध्ये साहित्य हे अशा परिस्थितीशी समरूप होणारे प्रभावी माध्यम आहे. कोरोनाच्या काळात साहित्याच्या क्षेत्रात अनेक उलथापालथी झाल्या. या काळाने ज्याप्रमाणे आपले विद्रुप आणि अस्वस्थ करणारे रूप दाखविले. ते आव्हान स्वीकारून परिस्थितीशरण न होता, आव्हानांना कवेत घेत ही अस्वस्थता दूर करण्याचा प्रयत्न अनेक कवी लेखकांनी केला. मराठीतील समकालीन लेखकांनी मोठ्या प्रमाणात साहित्यातून ही समकालीनता प्रकट केली. सध्याच्या काळात कोरोनाचे सावट मोठ्या प्रमाणात निर्माण झालेले असले तरी कोरोनाचा प्रादूर्भाव हा फक्त आरोग्याचे संकट घेऊन उभा राहिलेला नाही तर त्यांनी मानवी जीवनात अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. कोरोनाकाळात आरोग्याबरोबर जगण्याचे विविध प्रश्न निर्माण झाले. भूकेच्या प्रश्नांनी लोकांचे जगणे असहाय केले. या कारणामुळे बेरोजगारांची समस्या मानवी जीवनासमोर अनेक आव्हाने उभी केली आहेत. या आव्हानांचे चर्चाविमर्शन या काळातील कवींच्या कवितांमधून दिसून **येते.**

## समकालीन आव्हाने आणि मुक्तिबोधांच्या कवितेतील मानुषता

शरच्चंद्र मुक्तिबोध हे नाव मराठी साहित्यविश्वासाठी अत्यंत महत्त्वाचे व सुपरिचित असे नाव आहे. मार्क्सवादी जाणिवेचे लेखक म्हणून त्यांना जसे ओळखले जाते तसेच मानुषतेची प्रस्थापना करणारे साहित्यमीमांसक म्हणूनही त्यांची ओळख सर्वज्ञात आहे. नव्या मळवाटेचे यात्रिक असलेले शरच्चंद्र मुक्तिबोध मराठी काव्य प्रांतात आशय व अभिव्यक्तीच्या नवप्रयोगासाठी ओळखले जातात. प्रखर आशावादी जाणिवेचे मानवतावादी कवी म्हणून त्यांच्या कवितांना वैश्विक आयाम प्राप्त झाला आहे. 'नवी मळवाट', 'यात्रिक' आणि 'सत्याची जात' व काही असंग्रहित कवितांनी संपूर्ण मराठी काव्यप्रांत उज्ज्वलित केला

आहे. त्यांचे तीन कवितासंग्रह प्रखर आशावादी व मानवतावादी जाणिवेची छाप पाडणारे आहेत. त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाने नवी मळवाट निर्माण केली. या कवितांनी नव्या अभिव्यक्ती व आशयासह काव्यप्रांत समृद्ध झाला.

मुक्तिबोधांचा आशयविषयाचे स्वरूप व्यापक आहे. या व्यापक भूमिकेतून पाहताना ते मानवी जीवनाचे उदात्त चित्र रंगवितात. त्या उदात्त चित्रणातून मानवी जीवनाचे समतावादी स्वरूप ते स्पष्ट करतात. मुक्तिबोधांच्या आशयाला सामाजिक जीवनजाणिवांचे अधिष्ठान आहे. आणि मानवाच्या उत्कर्षाचा जयघोषही आहे. ही कविता नव्या मळवाटेची निर्मिती करणारी कविता आहे. आणि या कवितेला प्रकाशपूजनाचे वेध लागलेले आहेत. मुक्तिबोधांची कविता मूळात मानुषता मूल्यांची प्रस्थापना करीत जीवनाचा वेध घेणारी आहे. असे दिसून येते. शरच्चंद्र मुक्तिबोधांचे मानुष मूल्य त्यांच्या कवितेमधून कशा पद्धतीने अवतीर्ण झाले आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरणारे आहे. ''मुक्तिबोध आपल्या कवितांमधून मनुष्याच्या सारतत्त्वाच्या जवळ जाण्याचा सतत प्रयत्न करतात आणि भविष्यगर्भी केंद्रामुळे त्यांची कविता प्रखर मूल्यभावी अशी कविता ठरते. आजच्या अंधारिमय, तिमिरग्रस्त परिस्थितीमुळे ते निराश न होता उद्याच्या मानवी अभ्युदयावर विश्वास ठेवून ते नि:शसंक मनाने वाटचाल करतात आणि तशा प्रकारची वाटचाल आपल्या कवितेतून अधोरेखित करतात.''[१] मुक्तिबोधांची ही आश्वासकता त्यांच्या मानवतेवरील, मानुषतेवरील प्रगाढ निष्ठेतून आकारास आलेली आहे. म्हणूनच त्यांच्या कविता नखशिखांत मानुषतावादी, मानुषताकेंद्री कविता ठरतात.

मानुषता हे मूल्य एकतेचा पुरस्कार करणाारे मूल्य आहे. या मूल्यांनी मानवामानवातील भेद कमी होऊन मानवांना एकसंग करण्याची भावना आहे. एकमेकांचे दु:ख समजून घेण्याच्या भावना आहेत. आणि या मानुषमूल्यांना समतेचे अंग आहे. म्हणून मुक्तिबोधांच्या कवितेमध्ये ***'कुणाच्या वेदना सादून सादून उरात माझिया दाटून राहती?/कुणाची आसवे वाहून वाहून/कपोली माझिया सांडून वाळती?' ( नवी मळवाट ....)*** अशी समरूपता येताना दिसते. ही एकरूपता जीवनाच्या सर्वच मर्यादांना ओलांडून जाणारी आहे. आणि सर्वांनाच एका कवेत घेणारी आहे. असे असले तरी या अनुभूतींतून या मानवतेच्या महासागराकडे करावयाची वाटचाल सोपी नव्हे. हा ऐतिहासिक विस्फोट व्यक्तीचा नसून जीवनाचा आहे. तो अत्यंत तेजस्वी, कठाकर, रौद्र, निर्मम, विराट व दुस्सह असा आहे. ते पाहण्याची, तो अनुभव पुरेपुर पेलण्याची शक्ती कवीजवळ कोठे आहे? असे मुक्तिबोधांना वाटणे साहजिकच आहे.

मुक्तिबोधांची काव्यसंवेदना तिव्र स्वरूपाची आहे. त्यांच्या काव्यसंवेदनांना माणुसकीचे परिमाण आहे. आणि या परिमानातून ते वास्तवतेकडे पाहताना दिसतात. त्यांच्या कवितेतील हे वास्तवचित्रण वाचकांशी थेट संवाद साधतो. त्यांच्यातील मानुषतेच्या जाणिवांमुळे मुक्तिबोधांची कविता वाचकांच्या मनापर्यंत जाऊन पोहचते. ही मानुष संवेदना त्यांच्या

अनुभूतीच्या प्रगल्भ होत जाण्यातून आली आहे. असे दिसून येते. कवीचे जीवनच मुळी संघर्षवत असते असे दिसून येते. त्यांला आंतरबाह्य सघर्ष करावा लागतो. हा संघर्ष त्याचा सतत सुरू असतो. त्यांला निरंतरता असते. त्यामुळे कवी म्हणतात,***'माझें जीवन संघर्षरत/संघर्षातच पूर्ण जिवंत/माझ्यासमोर उभे जाहलें आज साक्षात/आणि हृदयीं,/ कणाकणांत वाटे दाटलें त्याचें अमृत'' ( नवी मळवाट पृ. ७३ )*** या संघर्षवत होत जाण्यात घडत जाण्याची प्रक्रिया आहे. संघर्ष आहे तसा या संघषातून नवी उमेद जन्मणार आहे. हा आशावाद त्यांच्या ठायी आहे. मुक्तिबोधांच्या कवितेतून आढळून येणारे संघर्षतत्त्व मानुषतेचे तत्त्व म्हणून पुढे येताना दिसते. या मानुषतत्त्वातून नवा समाज उभा राहावा असे त्यांना वाटते. म्हणून मानुषतेच्या दृष्टीने त्यांच्या कवितेकडे पाहताना त्यांच्या संघर्षतत्त्वाला महत्त्व प्राप्त झाले आहे असे दिसून येते.

मुक्तिबोधांच्या कवितेनी मानवतावादी मूल्ये प्रस्थापित करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. त्यासाठी त्यांच्या कवितेने एक विचारधारा स्वीकारली. ही विचारधारा मार्क्सवादी होती ही त्यांनी वारंवार कबूल केले. या विचारधारेवर त्यांचा आशय उभाा असला तरी त्यांची कविता ही त्यापलिकडे जावून मानुषमूल्यांचा पुरस्कार करीत होती. आणि त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदूही ही मानुषता मूल्ये झालेली होती असे म्हटले तर वावगे ठरू नये. मुक्तिबोधांची कविता ही विविध प्रयोगांनी युक्त कविता होती. ''शरच्चंद्र मुक्तिबोध यांची कविता प्रगतिशील विचारांची कविता आहे. मार्क्सवादी गतिशीलतेचे द्वंद्वात्मक तत्त्वज्ञान जाणीवपूर्वक स्वीकारत त्यांची कविताा भावाविष्कार करू लागते. त्यांच्या कवितेतील भावाविष्कार हा मुळात संघर्षवादी आणि मानवतावादी विचाराविष्कार असतो. मानवाचे अस्तित्व हे सामाजिक पर्श्यावरणात आकारास येत असते आणि आपल्या अवतीभवतीचे सामाजिक—सांस्कृतिक पर्यावरण जी अंतर्विरोधी, अंतर्द्वंद्वाी ग्रस्त असेल तर त्या अंतर्विरोधग्रस्ततेला दूर सारण्यासाठी कवितेला समाज परिवर्तनवादी भूमिका घ्यावी लागते. 'माझे जीवन संघर्षवत, संघर्षातच पूर्ण जिवंत' असे म्हणणारी व मानणारी मुक्तिबोधांची कविता थेट मनुष्यत्वालाच आवाहन करते आणि मानुषतातत्त्वाचे प्रगटीकरण करू लागते.**''** २ अशी ही कविता म्हणून श्रेष्ठ कविता ठरते.

मुक्तिबोधांच्या कवितेतील आशय मानवतावादी मूल्यांनी ओतप्रोत भरला आहे. त्यांची निसर्गकविता किंवा प्रेमकवितेलाही सामाजिक मूल्याची रेखीव अशी विण आहे. मुक्तिबोध हे मानवाचा सामाजिक दृष्टीने विचार करतात. त्यामुळे व्यक्तीतील संकुचित भाव गळून पडतो आणि मानुषतेचा व्यापक संदर्भ त्याच्या जगण्याला प्राप्त होतो. मुक्तिबोधांनी ही मानुषमूल्ये आपल्या कवितेतून आशयबद्ध केला आहे. ''शरच्चंद्र मुक्तिबोधांची कविता मनुष्य आणि समाज यांच्या एकात्मभावावर अधिष्ठित असलेली कविता आहे. अर्थात ह्या दोन्ही घटकांमधील एकात्मभाव खंडित होत असल्याच्याच खाणाखुणा अवतीभवती दिसून येत

असतात. अशा परिस्थितीमध्ये मनुष्याचे आणि मानुषतेचे असणे ते सामाजिक—सांस्कृतिक परिवेशामध्ये घडवू इच्छितात. यासंबंधातील 'नवी मळवाट' मागील कवीची मानुषतावादी काव्यदृष्टी समजून घेणे आवश्यक ठरते.'' [३] ही काव्यदृष्टी नव्या मळवाटेचा प्रवास करीत जाताना दिसते. आणि या प्रवासाचा यात्रिक बनून सत्याच्या जातीला शोध घेऊ इच्छिते. ***''मानवा, मानवा,काय ही स्थिती/किड्यांचे मरण, जिण्याची भीती/काय ही लाचारी ! अलोट हे दूःख/जाळते जीवन भूक ही किती !/माणसेच का ही कोळियांची जाळी?/प्रेतेच उठून चालाया लागली ''*** कवीचे मन या सर्व घटनाक्रमाने उद्विग्न होते. किड्याचे मरण येण्याएवढी अवस्था पाहून कवी अतिशय दृ:खित होतात. हे दु:ख त्यांच्यात असलेल्या मानुषता मूल्यातून आले आहे. माणसांनी माणसांशी मानुषभावनेतून वागावे. हा नियम पाळणे माणसांना का कठीण जातो. असा प्रश्न त्यांना पडतो. या प्रश्नांचे उत्तर त्यांना अमानुष मूल्यांच्या ठेवणीत सापडतात. मानुष मूल्यांचा ऱ्हास होतो आहे हे त्यांना जाणवते आणि मानवता संकटात सापडली आहें याची जाणीव होते. त्यामुळे ते मानवतावादी मूल्यांची प्रस्थापना आपल्या कवितेतून करू इच्छितात. मानवता प्रस्थापित करणे कठीण असले तरी एक ना एक दिवस माणसाचे एकीकरण होईल अशी आशा त्यांना लागून आहे. यातूनच त्यांची कविता अवतीर्ण होत जाते.

मृत्यूचे जन्मोत्सवी रूप मानवाच्या जययात्रेत कवीला नेहमीच गवसले आहे. हजारो वर्षे चाललेल्या मानवी संघर्षाचे व प्रगतीचे चित्र त्याच्या डोळ्यासमोर उभे राहते. प्रकाशाचे स्वप्न पाहणारे कवीचे मन इथे प्रकट झाले आहे. आणि यात जाज्वल्य मानवता आहे. ***'मस्तकाभवती स्वप्नांची विराट/प्रकाश — घूमिल आवते नाचती/कोटिशः दुखऱ्या भेगांच्या पायांत/झंझेची झिंगली मस्तानी गती/प्रत्येक निःश्वास अनलोर्मिपूर्ण/नयनामधून विजेचे प्रपात/क्षणांत दीनांची भुकेली सेना की,/क्षणांत जाज्वल्य मानव विराट !' ( नवी मळवाट, पृ. अडतीस )*** जन्ममृत्यूची, स्थितीगतीची, अंधारप्रकाशाची, प्रगतीपरागतीची, सुष्टदृष्टपणाची, अहंकेंद्रित व विश्वकेंद्रित वृत्तीची, अगतिकतेची व विद्राहीची अशी जाणीव व तीमधून अधिकाधिक व्यापक व सखोल पातळीवर जीवनसत्याशी समरस होण्याची चालेली कवि—मनाची धडपड, मानव व निसर्ग यांत सुसंवाद पाहण्याची व अखेरीस त्या सुसंवादाकडे नेणाऱ्या पीडित क्रांतिकारी मानवतेच्या संघर्षाशी एकरूप होण्याची तीव्र भिलाषा 'नवी मळवाट' मध्ये व 'यात्रिक'मध्ये प्रकट झालेली आहे.***''मृत्यूचा जन्मोत्सव/करणारी/पहाटशीला ही कल्याणी नवमानवता'' ( नवी मळवाट पृ. शेचाळीस )*** हा मुक्तिबोधांचा आशावाद उथळ नाही. त्याला वैचारिकतेचे जसे अधिष्ठाण आहे. तसे मानुषता मूल्यांचे पाठबळ आहे. ही मानुषताच नवमानवतावादाकडे मुक्तिबोधांच्या कवितेला घेऊन जाते. या मानुषतेतूनच मानवतावादाचे मूल्य रूजू पाहतात. या मानतेला मानुषतेच्या विचारांना पुढे न्यायचे आहे. ही

नवमानवताही आणि हा नवनिर्मितीची मानवता आहे. तिच्या सृजनशीलता आहे. म्हणून मुक्तिबोध म्हणतात. ***'सृजनशीलता/ही मानवता./सृजनशीलतेचा आनंद :/मानवतेचा परमानंद./त्यांतच प्रीती, भक्ति, मुक्ति,/मानवतेची ही अनुरक्ति./व्यक्तिव्यक्तितुन व्यक्ति न व्यक्त;/सर्वात्मकता ती अभिव्यक्त./व्यक्ति अलग अन् स्फुरणें लुप्त,/सृजनचेतनााज्वाला सुप्त./मृत्यु नि चैतन्याचें युद्ध,/जीवनधारा ही अनिरुद्ध. /जय मानवते! सर्जनशक्ति!/मृत्यूसहि रूपस करते भक्ति./मानवतेची प्रगति अबाध :'' ( सत्याची जात पृ. ८ )'*** या मानवतेत सर्वात्मकता आहे. व्यक्तिव्यक्तितून जुळत गेलेली भक्ती आहे. त्यातून निर्माण झालेले प्रेम आहे. आणि मानवतेची प्रगती आहे असे मुक्तिबोधांना वाटते.

मुक्तिबोध आपले नाते समष्टीशी सांधतात. समष्टीप्रेम हा त्यांच्या साहित्याचा स्थायीभाव आहे. आणि समष्टीबद्दल असलेले त्यांचे प्रगाढ नाते हे त्यांच्या कवितेचे केंद्र आहे. मुक्तिबोधांचा समष्टीभाव कवितेत पदोपदी उमटला आहे. मुक्तिबोधांच्या काही व्यक्तिनिष्ठ कविता आहेत त्यासुद्धा समष्टीनिष्ठ आहेत. ही समष्टीनिष्ठा शोषित वर्गाशी घट्ट बांधली गेली आहे. मुक्तिबोधांनी शोषितरहित समाजाचे स्वप्न पाहिले आहे. त्यातून त्यांच्या मानुषतेला नवे धुमारे फुटले आहेत. 'रुधिराच्या लाल सड्यातच' या कवितेत शोषित मानवाने केलेले नव्या जीवनाचे स्तवन आहे. अश्रूंतूनही हसण्याचा प्रयत्न करीत, रुद्ध कंठांतूनही जयजय शब्दाद्वारे तो नव्या युगाचे स्वागत करीत आहे. आपले हजारो वर्षांचे ऐतिहासिक अनुभव सांगताना मुक्तिबोध म्हणतात, ***'ये नाशांतून, मृत्यूतून, पीडेतून ये —स्वागत/ये अश्रूतून, अपमानातून, दैन्यातून ये —स्वागत./ये तडफडत्या हृदयांच्या टपटपत्या रुधिरामधुनी/विश्वमक्षि रोषानलज्वालांमधुनी ये तू। स्वागत !'*** हे स्वागत बंडाचे निशान फडकवून निर्माण होऱ्या समाजव्यवस्थेचे आहे. या कवितेकडें पाहताना कुसुमाग्रजाच्या हिमलाट या कवितेची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या या कवितेमधूनही त्यांनी असाच पुकार केलेला आहे. हा पुकार वंचितांना समानता देणारा आहे. त्यांच्या एकत्वाचा पुकार आहे. कुसुमाग्रज मार्क्सवादी नसले तरी त्यांची ही कविता मार्क्सवादी भूमिकेतून आल्यासारखी वाटल्यावाचून राहत नाही. मुक्तिबोधांचा हा पुकार मानवतेच्या प्रकटनाच्या स्वागताचा पुकार आहे. विद्रोहातून आणि बंडातून निर्माण झालेल्या व्यवस्थापरिवर्तनासाठी करण्यात आलेला पुकार आहे त्यामुळे या पुकाराला मानुषमूल्य आहे.

ही दु:खितांच्या दु:खांशी एकरूप होण्याची वृत्ती तर सामान्यमाणसांमध्यसे जागृत होतेच पण कविमनाला ती जाणवल्यास त्यांतून महान कविता जन्मास येते. ही महान कविता मानवतेच्या मूल्यांना सामावून घेणारी असते. ***''तुझ्याही उरांत जाणीव — खंजीर/घुसून रक्ताचीं आसवें गळावी?/हृदयामधून शोणित झरून महान कविता अवतीर्ण झाली'' ( नवी मळवाट पृ. २१ ) ''अर्धा सत्य आणि असत्य अर्धा मी/अर्धा दिव्य आणि क्षुद्र अर्धा मी/अर्धा***

***सर्वजनजीवनविकलता मी/अर्धा मीपणाचा माज पुरता मी !'' ( यात्रिक पृ. २८ ) 'दु:ख सर्वांचेच आहे/तुमचे आहे, माझे आहे/पण दु:खादु:खाच्या जाती असतात'' ( यात्रिक पृ. ११० )*** पण ह्या दु:खाच्या जाती तोडून सर्वांच्या दु:खात सामील होणे हा कविभाव असतो. तो कवींनास पाळता आला पाहिजे असे मुक्तिबोधांची कविता सांगून जाते. मुक्तिबोध समष्टीशी नाते सांगताना समष्टीला स्वशोध घ्यायला लावतात.

मुक्तिबोधांची कविता मानवी जीवनव्यवहारांचे सूक्ष्म निरीक्षण करते. त्या निरक्षणातून काही तथ्ये बाहेर पडतात. त्यांची चर्चा त्यांच्या कवितांधून येताना दिसते. त्यांच्या कवितेला जीवनाचे वेध लागलेले आहेत. जीवनात चाललेल्या गतिविधींचे आणि व्यवहाराचा अस्मिताशोध त्यांची कविता घेऊ पाहते. त्यांनी मानवी व्यवहाराचे जीवनगाणे आपल्या कवितेतून गायिले. त्यामुळे त्यांच्या या जीवनव्यवहाराच्या आशयाला मानुषता मूल्यांचे परिमाण लाभले आहे.

कवी हा समाजशील प्राणी आहे. समाजाचा एक घटक म्हणून त्यांचे काही उत्तरदायित्व आहे. त्या उत्तरदायित्वावर लक्ष केंद्रित करून समाजनिष्ठ आशयविषय त्यांच्या कवितेतून येणे आवश्यक आहे. मुक्बिोधांच्या समाजनिष्ठ जाणिवा त्यांच्या कवितांमधून प्रखरपणे प्रकटताना दिसतात. त्यांची कविता ही समाजकेंद्री बनून समाजहितैष्णू प्रवास करू इच्छिते. या कवितेला समाजात असलेले वास्तव प्रभावीपणे जाणवते. माणसाची चाललेली हेळसांड दिसते. त्यांनी ते जसे व्यथित होतात. तसेच या व्यवस्थेला कारणीभूत असलेल्या प्रतिव्यवस्थेवर त्यांची कविता तुटून पडते. मुक्तिबोध समाजातील हे शोषित शोषकांचे द्वंद्व पाहतात. त्यांच्यातून निर्माण झालेले अस्ताव्यस्त जीवन पाहतात. त्यांचा आक्रोश पाहतात. आणि आपल्या कवितेतून त्यांची मांडणी करतात. ***''नारी ? माता ! दिसे ध्येयांत शोभून/मूठ धान्य द्या अन् साडी घ्या फेडून/धि:कार संकृती ! धि:कार जगास !/घृणेचे भुजंग, जागी चवताळून'' ( नवी मळवाट पृ. ९ )*** माय माता असणाऱ्या स्त्रियांची ही दुर्दशा त्यांना व्यथित करते. पण समाजात अशी अवस्था होण्यासाठी काही कारणे आहेत. ती कारणे जोपर्यंत नाहिसे होत नाही तोपर्यंत समाज समतामूल्यावर आधारित निर्माण होणार नाही. असे त्यांना वाटते. समाज परिवर्तन करायचे असेल तर तो ज्या पायावर उभा आहे तो पायाच बदलणे आवश्यक आहे. असे त्यांना वाटते.

मुक्तिबोधांचे मन समाजाशी एकरूप झाले आहे. समाजाच्या सुखदु:खांशी समरूप झाले आहे. त्यामुळे समातील दैना पाहून त्यांच्या मनात काहूर माजते. समाजातील वंचितांचे अश्रू त्यांच्या गालावरून वाहायला लागतात. त्यांची दु:ख ही आपलीच दु:खे आहेत हा प्रत्यय त्यांना क्षणोक्षणी येतो. ही त्यांची बांधिलकी त्यांच्यातील असलेल्या मानुषमूल्यांचा प्रत्यय आणून देणारी आहे. माणसाच्या पलीकडचा विचार करून मानवतेच्या पलीकडे जाण्याची ही

प्रक्रिया आहे. कवी दु:खिताच्या दृ:खाशी एकरूप कसे होतात त्यासाठी त्यांच्या तोंडून काही उद्‌गार बाहेर पडतात. ***''कुणाच्या रक्ताची संतप्त धारा ती /माझिया प्राणास फोडून वाहते? / कुणाची दुर्दशा, तक्रार मूकशी / रात्रीत वक्षास सारखी कापते?'' ( नवी मळवाट पृ. १३ )*** ही समरूपता कवीमध्ये आल्यानंतर त्यांना समाजाचे वास्तव प्रकर्षाने जाणवायला लागते. त्यांच्या मनाला समाजाची चित्रविचित्र स्थिती दिसते. त्यांचे जीवनमान दृष्टीस पडते. त्यांच्या हालअपेष्टा त्यातून सुटत नाहीत. कवीचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्थानिय किंवा कुठल्याही मर्यादित पातळीवरचा राहत नाही. तो मानुष बनून वैश्विक पातळीवर जातो. त्याकाळातील अवस्थांतरामुळे झालेल्या परिणामांचे चित्रण त्यांची कवि रेखाटत जाते. यात दुसरे महायुद्धाचे परिणाम असतात. तर कधी यंत्रयुगामुळे माणसाच्या जीवनात निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण असते. बदलेल्या परिस्थितीचा आर्थिक परिणाम असतो आणि सामाजिक साकृतिक परिणाम दिसतो. मुक्तिबोधांची कविता या सर्वच स्थितीचे काव्यबद्ध रूप प्रकट करते. त्यांच्या कवितांमधील काही ओळी यासाठी देता येतील. ***''मानवी दु:खाचा अतितीक्ष्ण फाळ /मनांची धरित्री भेदतो विशाळ/ मानवी शोणितपर्जन्य पिऊन /कोणते येणार पीक हो तेजाळ?'' ( नवी मळवाट पृ. १० ) ''आकांत कां मांडता हो माझे पंचप्राण / सशक्त व्हा, पाय रोवा, उद्याचीच आण /पालटतें कुणी विश्व—इतिहासाचे—पान /जीवनाची जय बोला, उंचवा निशाण'' ( नवी मळवाट पृ. १२ )*** मुक्तिबोधांची ही समाजनिष्ठ मानुषता दु:खितांच्या दु:खांशी समरूप होते. त्यांचा आकांत आपल्या शब्दातून मांडते. आणि जगातील त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न समाज घटकांच्या पुढे उभा करते. असे असले तरी त्यांची कविता तेवढ्यावरच थांबत नाही. या अवस्थेला तोंड फोडून समाजाच्या बदलाचा नारा ती देताना दिसते. त्यांना मानुषमूल्य असलेला समताधिष्ठित समाज हवा आहे. शोषणरहित समाजनिर्मितीचे स्वप्न त्यांच्या कवितेला पडलेले आहेत. त्यांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने उचललेली पावले त्यांच्या कवितेतून स्पष्टपणे जाणवतात.

**निष्कर्ष**

१. मुक्तिबोधांच्या कविता ही समकालीन आशय प्रकट करणारी ठरली आहे.
२. मानुषता मूल्य हे मुक्तिबोधांच्या कवितेचा प्राण आहे.
३. मुक्तिबोधांच्या कवितेतून मानवीय मूल्ये म्हणजे मानुष मूल्ये प्रकट होताना दिसतात.
४. मुक्तिबोधांच्या कवितेतून निर्माण होणारी मानुषता ही समष्टीभाच प्रकट करणारी आहे.

**उपसंहार**

शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या तिनही कवितासंग्रहातील कवितांमधून मानुषता तत्त्व प्रत्ययाला येते. मुक्तिबोधांची कविता समष्टी तत्त्वाला अंगिकारते तशी व्यक्तीच्या आंतरिक

भावनांचे चित्रण करते. मुक्तिबोधांचे एकूणच कविता विश्वात मानुषता तत्त्वाचा मोठ्या प्रमाणात आढळ आहे. हे त्यांच्या कवितांवरून दिसून येते. मुक्तिबोधांच्या जीवन जाणिवा समाजाच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. त्यांची कविता व्यक्ती आणि समूह यांचे प्रतिनिधित्त्व करणारी आहे. त्यामुळेच ती कोणत्याही काळात समकालीन ठरते आणि समकालीन आव्हानांना पुढे जाऊन त्यांचा सामना करणारीही ठरते.

**संदर्भग्रथसूची**

१. *संपा. राजेंद्र नाईकवाडे, अर्वाचीन मराठी काव्यमीमांसा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१४, पृ. ७१५*
२. *तत्रैव, पृ. ७१६*
३. *तत्रैव, पृ. ७१६*

# समकालीन साहित्यप्रकारांचे ठळक परिप्रेक्ष्य

**डॉ. जयश्री शास्त्री**
*सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय वरोरा*

'समकालीन' हा काळाचा निर्देश करणारा शब्द आहे. अशा विशिष्ट काळातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, पर्यावरण, तत्संबंधित विविध प्रकारच्या समाजविषयक धारणा आणि समस्या, तत्कालीन मानवी जीवनातील आणि नातेसंबंधातील ताणतणाव, सामाजिक आंतरसंबंधातील विसंगती आणि अंतर्विरोध इत्यादींचे प्रतिबिंब वेगवेगळ्या स्वरूपात साहित्यात पडत असते. त्यातूनच आधुनिक काळात मराठी साहित्याच्या आजपर्यंतच्या परंपरेला परिभाषित करण्याच्या प्रयत्नात प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन, आधुनिक, समकालीन इत्यादी संकल्पना मांडल्या जातात. अनेकदा १९४५ नंतरचे किंवा स्वातंत्र्योत्तर ते इ.स.२००० पर्यंतचे साहित्य आज २०२१ मध्ये ही 'समकालीन' कसे असा प्रश्न पडू शकतो. परंतु हाच निकष 'नव' किंवा 'आधुनिक' किंवा 'अर्वाचीन' किंवा 'प्राचीन' इ. कुठल्याही संज्ञांसाठीही लावता येऊन त्यावर प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामुळे आपण सर्वसाधारणपणे स्वीकारत असलेला समकालीन साहित्याचा कालखंड म्हणजे स्वातंत्र्योत्तर-नवसाहित्योत्तर कालखंड असाच अर्थ गृहीत धरला जातो.प्रत्येक युगाच्या, काळाच्या काही विशिष्ट जाणिवा असतात. ह्या युगजाणिवांच्या संदर्भातच समकालीन साहित्याची खरी 'समकालीनता'तपासता येते किंवा 'समकालीन जाणिवा+त्यांचे वाड्.मयीन प्रगटीकरण= समकालीन साहित्य' असेही एक समीकरण आचार्य अ. द.वेलणकर यांनी मांडले आहे. समकालीन जाणीव ही 'आधुनिकता','नवता' या संकल्पनांशी वा त्यांतील अर्थ वलयाची नाते सांगणारी अशी जाणीव आहे.

**समकालीनतेची वैचारिक पार्श्वभूमी :**

समकालीनतेत 'वर्तमान' हा महत्त्वपूर्ण ठरतो. परंतु असे नव्हे की कालदृष्ट्या 'आजचेच' साहित्य फक्त 'समकालीन' होऊ शकेल. ज्याप्रमाणे 'आधुनिक' ही संज्ञा अधिक व्यापक आणि इ.स.१८०० ते २००० अशा दोन दशकांतील मानवी जीवन जाणिवांना आणि ह्या काळात प्रकटलेल्या संपूर्ण साहित्याला लावली जाते त्याप्रमाणे मराठीच्या संदर्भात १९०० ते २००० हे शतक आधुनिक मराठी साहित्याचे शतक म्हणून मानले जाते. 'नव' हे विशेषण १९४५ नंतरच्या महायुद्धोत्तर मराठी वाड्.मयातील विशिष्ट प्रवृत्ती-प्रवाहाशी केवळ जोडले जाते. साधारणपणे १९४५ ते १९६० या छोट्याशा कालखंडातील साहित्याला नवसाहित्य म्हटले गेले आहे. समकालीन या संकल्पनेत कालिक भान सुचविले आहे. त्यामुळे समकालीनमध्ये कालसापेक्षता महत्त्वाची आहे."समकालीनतेत 'नवजाणीव' ही गृहीतच धरली जाते.मराठी साहित्यपुरता रूढ झालेल्या संकल्पनांच्या प्रकाशात विचार करता 'आधुनिक' हे एक मोठे वर्तुळ ,त्यात सामावणारे 'समकालीन' हे त्यापेक्षा छोटे वर्तुळ आणि त्याच्याही आत समाविष्ट होऊ शकणारे 'नव' हे अधिक छोटे वर्तुळ असल्याचे

निदर्शनास येते."११९९० नंतरच्या जागतिकीकरणाच्या प्रभावानंतर 'आज' व लगतच्या 'काल' मध्ये मराठीत निर्माण झालेल्या साहित्याला आजच्या संदर्भात 'समकालीन' ही संज्ञा लावता येते. प्रा. वसंत आबाजी डहाके यांनी समकालीन साहित्याची व्याख्या करताना म्हटले आहे की ,"समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे.ज्या काळात ते निर्माण होत असते, त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे. त्या काळातील विचार ,जाणिवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात, असे साहित्य"२अर्थातच आपल्या काळाशी आणि तत्कालीन परिस्थितीशी जवळचे नाते सांगणारे साहित्य समकालीन म्हटले जाते. कारण तसे पहाता जिवंत आणि प्रामाणिक साहित्यात नैसर्गिकरित्याच कलावंताच्या व्यक्तिमत्वाचे आणि त्याद्वारा त्यांच्या काळाचे पडसाद उमटलेले असतात. हा विचार लक्षात घेऊन डॉ.एम. पी.कुलकर्णी यांनी समकालीनतेची व्याख्या करताना म्हटले आहे, "आपल्या आणि आपल्या आसपासच्या बदलत्या कालखंडातील व्यक्ती,घटना, प्रसंग, जीवनजाणिवा, विचारप्रणाली, भावानुभूती यांचे चित्रण युगभान सांभाळून ज्या साहित्यात केले असेल ते साहित्य समकालीन म्हटले पाहिजे."३

**साहित्यप्रकार आणि समकालीनता:**

साहित्यप्रकारांच्या संदर्भात समकालीनतेचा विचार करू जाता केवळ १९९० नंतरच्या साहित्यात खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, अशा कितीतरी गोष्टींचा अंतर्भाव होतांना दिसतो.नव्वदोत्तर मराठी साहित्य प्रकारात म्हणजेच कथा, कादंबरी,नाटक,कविता,आत्मकथने,अनुवाद इ.वर समाज आणि जीवनातील बदल, ढासळलेली कुटुंबव्यवस्था,नव तंत्रज्ञानाने तरुण-तरुणींच्या जीवनाची झालेली वाताहात, बदलते पर्यावरण ,अवाजवी स्वातंत्र्याचा पुरस्कार, लिंगभाव प्रश्न,अस्तित्वभान अशा अनेक बाजूंचा परिणाम होऊन साहित्यिकांनी तो व्यक्त केलेला दिसतो. साठोत्तरी मराठी साहित्यावर प्रवाहांचा परिणाम जास्त होता. जसे दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, मुस्लिम साहित्य, मार्क्सवादी साहित्य, जनवादी, आंबेडकरवादी साहित्य इ. अशा विविध प्रवाहांवर ism चा प्रभाव जास्त होता. हे प्रवाह अस्तित्वात असले तरी नव्वदोत्तर साहित्यातून ते जागतिकीकरण आणि अनेक बदलांच्या मिश्रतेसह प्रगटताना दिसतात. उदा.कवी लोकनाथ यशवंत, अरुण काळे, राम दुतोंडे, विनोद बुरबुरे, आनंद गायकवाड अशा आगळ्या धाटणीने लिहिणाऱ्या नव्वदोत्तर दलित कवींची कविता समकालीन आधुनिकतेचे संदर्भ आत्मसात करून जागतिकीकरणाने निर्माण झालेल्या सामाजिक ,सांस्कृतिक स्थितीवर जळजळीत भाष्य करते.डॉ.आंबेडकर आणि गौतम बुद्ध या प्रेरणांशी नव्याने जुळत सामाजिक बांधिलकी आणि विद्रोहाची भूमिका कायम राखताना दिसते .

नव्वदोत्तरच्या कवयित्रिंच्या कवितांकडे नजर टाकली असता अरुणा ढेरे( मंत्राक्षर १९९० , निरंजन १९९४ ) नीरजा(निरन्वय १९८७,वेणा१९९४ ) अश्विनी धोंगडे( श्रीसूक्त१९८८ अन्वय-१९९२), आसावरी काकडे (आरसा-१९९०, आकाश-१९९१, लाहो-१९९५ ) अनुराधा पाटील (दिवसेंदिवस-१९९२) प्रज्ञा लोखंडे (अंत:स्थ १९९३) , रजनी परुळेकर (स्वीकार-१९९३) मल्लिका अमर शेख, अश्विनी धोंगडे, प्रज्ञा दया पवार, कविता महाजन, अंजली कुलकर्णी ,कविता दुधाळ ,योगिनी राऊल, स्वाती शिंदे, शरयू आसोलकर, कविता

मोरवनकर, संजीवनी तळेगावकर, सुनिता झाडे, पद्मरेखा धनकर अशी किती तरी स्त्री कवयित्रींची नावे लक्षणीय ठरतात. नव्वदोत्तर कालखंडातील स्त्रियांच्या कवितासंग्रहाची शीर्षके पाहिली तरी समकालीन पर्यावरणाचा प्रभाव आपल्याला दिसून येईल , जसे 'स्त्रीगणेशा, वाळूचा प्रियकर, माणूसपणाचं भिंग, बदलल्यावर स्त्रीसूक्त, बाई डॉट कॉम, दृश्यांचा ढोबळ समुद्र, उत्कट जीवघेण्या धगीवर, धुळीचा आवाज, मी एक स्त्री, जातीय अस्वस्थ आत्मा, अपौरुषेय, अन्वय, बदलत गेलेली सही, म्होरकी इ.'अशी शीर्षके स्त्रीला केंद्र ठेऊन निर्माण झालेली आहेत.४

कादंबरी हा असाच विस्तीर्ण आशयाला सामावून घेणारा साहित्यप्रकार. लघुकादंबरी हा कादंबरीचाच प्रकार असल्याने नव्वदोत्तर साहित्यात बऱ्याच प्रथि तयश लेखकांनी तो सहजी हाताळलेला दिसतो. जसे स्त्रीविषयक प्रश्नांचा वेध घेण्यासाठी गौरी देशपांडे यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.जसे 'मुक्काम' (१९९२), थांग(१९८९) यासारख्या कादंबऱ्यांमधून त्यांनी नव्या स्त्री जाणिवांचा सशक्त अविष्कार करण्याचा प्रयत्न केला आहे. 'रीटा वेलिणकर'१९९० ही शांता गोखले यांची कादंबरी, स्थलांतर(१९९४) ही सानिया यांची कादंबरी शरणकुमार लिंबाळे यांची 'भिन्नलिंगी' (१९९०), दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांची 'चतुरंग'(१९९५) राजन खान यांची 'आयात' आणि 'मजार'(१९९५), 'जातवन आणि विनशन'(२००३) 'शरियत' (१९९१) , बाबा भांड यांची 'दशक्रिया'(१९९५), ॲड.एकनाथ साळवे यांची 'एन्काऊंटर'(१९९८) अशोक पवार यांची 'इननमाळ'(२००८), भालचंद्र देशपांडे यांची 'अंधार इथला संपत नाही' (२००८) इ. अशा लघु कादंबऱ्यांच्या माध्यमातून त्या रूपबंधात सामावेल अशी ही कादंबरी मर्यादित पात्र प्रसंगाच्या आधारे समकालीन विषयांचा अंतर्भाव करीत प्रकट होते.

काही कादंबऱ्यांचा विचार करता १९९० नंतर भारतात अत्यंत वेगाने अनेक बदल होऊ लागले. जातीय दंगली, बॉम्ब स्फोट, अतिरेकी हल्ले यामुळे असुरक्षित झालेले जीवन शिवाय १९९० मध्ये भारतात खुले आर्थिक धोरण लागू करण्यात आले. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाची प्रक्रिया गतिमान झाल्याने नव्या संस्कृतीच्या आगमनाचे परिणाम साहित्यावर आणि त्यातही कादंबरीवर विस्तृतपणे दिसू लागले. श्याम मनोहर यांची 'खूप लोक आहेत'(२००२), कविता महाजन यांची 'भिन्न'(२०१०), विश्राम गुप्ते यांची 'नारी डॉट कॉम'(२०१०) सदानंद देशमुख यांची 'तहान', आशा बगे यांची 'सेतू', कविता महाजन 'ब्र', 'राहू-केतू', प्रतिमा इंगोले यांची 'बुढाई' अशा अनेक कादंबऱ्यांतून बदलत्या जीवनाचा स्तर, स्त्रीचे भावविश्व आणि अनेक ताणतणाव प्रकट झालेले दिसतात.

कथा साहित्याबद्दलही नव्वदोत्तर जीवनजाणिवा व्यक्त करताना कथाकारांनी नीती, मूल्ये ,रूढी-परंपरा आणि त्यातून घडणारे बदल व्यक्त केलेले दिसतात. विविध प्रवाहांच्या कथांमधून जसे कथा साहित्य प्रगटते त्यापैकी एक महत्त्वाचा ग्रामीण आणि आंबेडकरवादी कथा प्रवाह होय. मराठीतील महत्वाचे ग्रामीण कथाकार म्हणून चंद्रकुमार नलगे यांचे नाव घ्यावे लागेल. नव्वदोत्तरमध्ये ग्रामीण कथेमध्ये त्यांच्या 'दारकोंड

' (१९९४), 'आगराळ' (१९९५), 'रेघोट्या' (१९९८) 'फणसाखालचं घर'(२०००) या कथासंग्रहातून त्यांनी नव्या विकासाच्या वावटळीत सापडलेली ग्रामीण संस्कृती आणि माणसं यांचे जीवन चित्रित केले आहे. महादेव मोरे या कथाकाराचा 'चकवा'(१९९२) 'तिंगाड'(१९९३), 'काळोखातील काळोख'( १९९४), 'गब्रू' (१९९४),येडचाप(१९९४), 'ईगीन'(२००४), 'मत्तीर' (२००६), 'खेकट' (२०११) इ. कथानिर्माण त्यांनी केले. त्यांनी शहर आणि गाव या दोघांवर भाष्य केलेले दिसते. नागनाथ कोत्तापल्ले हे नामवंत साहित्यिक त्यांचे 'रक्त आणि पाऊस'(१९९२), 'देवाचे डोळे' (१९९१), 'राजधानी'(१९९९), 'कवीची गोष्ट' (१९९३) हे कथासंग्रह ग्रामीण जीवनावर भाष्य करणारे ठरतात.ग्रामीण भागातील नीतिमूल्यांचा ऱ्हास आणि भ्रष्टाचार याचे चित्रण वासुदेव मुलाटे यांच्या 'काळोख वेळा'(१९९९) 'झाड आणि समंध' (१९९९) यासारख्या रचनांतून प्रगटते. बाबाराव मुसळे या कथेतून वैदर्भीय शेतकऱ्यांचे जीवन चित्रण प्रखरतेने मांडले आहे. त्यांचा 'मोहरलेला चंद्र ' (१९९२), 'झिंगु लुखूलुखू' (१९९४) आणि 'नगरभोजन' (२००९) यासारख्या कथासंग्रहातून बदलते ग्रामीण जीवन चित्रित होतांना दिसते. राजन खान या प्रयोगशील लेखकाचा कथासंग्रह 'जिरायत'(२००७) हा शेतकऱ्यांचे सुखदुःख आणि भावविश्व साकारणारा आहे. डॉ. आनंद पाटील यांचे कथालेखन नव्वदोत्तर कालखंडातील आहे. त्यांचा 'फुगड्या' (१९९४) कथासंग्रह फ्रेंच आणि हिंदी भाषेतही अनुवादित आहे. याशिवाय त्यांचे 'दावण', 'कागुद', 'सावली',सुपर्ण वृक्षाखाली भर दुपारी', 'फेरा', 'खंडणी' 'शोध एका चळवळ्या मित्राचा' अशा प्रकारचे बहुआयामी ग्रामीण साहित्य लेखन त्यांनी केले. विदर्भातील ग्रामीण कथाकारांमधील सदानंद देशमुख हे महत्त्वाचे नाव होय. देशमुखांचे 'अंधारबन', 'लचांड'(१९९३),'रगडा' (२००६), 'महालूट'(१९९५), 'उठावण'(१९९४), 'बारोमास'(२००४ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) सदानंद देशमुख यांच्या कथांविषयी डॉ.वासुदेव मुलाटे म्हणतात की, "सर्व पातळीवर गाव कसा बदलला आहे त्याचे चित्रण, ग्रामपंचायत, खरेदी विक्री संघ, शिक्षण संस्था यांच्या माध्यमातून ते दाखवून देतात" ५अशाच प्रकारचे समकालीन मराठी साहित्यविश्वातील एक महत्त्वाचे कथाकार म्हणजे आसाराम लोमटे. 'ईडा पिडा टळो'(२००६), आणि 'आलोक' (२०१०चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कथासंग्रह) त्यातून त्यांनी समकालीन ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकलेला दिसतो.

नव्वदोत्तर दलित कथा साहित्यातील साहित्यिकांमध्ये प्रामुख्याने काही लक्षणीय लेखकांची नावे घेता येतील.उदा.जयंत पवार हे नाटककार व नाट्यसमीक्षक म्हणून सुपरिचित आहेत. त्यांचे 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहाला २०१२ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त आहे. मुंबईतील गिरण्यांचा संप, बाबरीकांड, धार्मिक पुनरुज्जीवनवाद, जागतिकीकरणाचे आघात इत्यादींचा परिणाम त्यांच्या साहित्यातून व्यक्त होताना दिसतो. डॉ.प्रकाश खरात 'अक्षरांची पहाट'(२००३), 'प्रवर्तनाचा

युगस्पर्श'(२००९), उपेक्षितांचे प्रतिनिधित्व करणारी कथा त्यांनी लिहिली. जयराज खुणे यांचा 'आगडोंब', 'विध्वंस', दीपध्वज कोसादे यांचा 'पंचनामा'(२०१०), गौतमीपुत्र कांबळे यांचा 'परिव्राजक', प्रज्ञा पवार यांचा 'अफवा खरी ठरावी म्हणून' (२०१०), प्रेमानंद गज्वी – ढीवर डोंगा (२००९), किशोर घोरपडे यांचा 'दलदल ','घुसमटणी', प्रकाश मोगले लिखित 'कावस', 'धर्मद्रोही', आत्माराम गोडबोले लिखित 'संगर', 'सूर्यस्तूप', संजय डोंगरे-'वप्रमंगल', सुदाम सोनुले-'डंख', डॉ.पद्माकर तामगाडगे-'पार कथा', रमेश बनसोडे-'सावलीची बहिण', योगिराज वाघमारे-'पिंपळपान'(२००३), 'बहिष्कार'(२००८) 'भीमयुग' इ. कथासंग्रह आंबेडकरांच्या प्रेरणेतून विद्रोहाच्या मुळाशी जाऊन स्वतःचा पुरस्कार करणाऱ्या बैठकीवर प्रकट झाले आहे.

मराठी नाटक या साहित्य प्रकारात देखील नव्वदोत्तर समकालीनतेचा अंतर्भाव झालेला दिसतो. जसे वसंत कानेटकर यांचे 'तू तर चाफेकळी'(१९९५) सतीश आळेकर यांचे 'अतिरेकी'(१९९२), 'दुसरा सामना'(१९९२) मधुकर तोरडमल रूपांतरित 'कलम ३०२' (१९९२), रत्नाकर मतकरी यांचे 'घर तिघांचं हवं'(१९९२) सुरेखा खरे यांचे 'कोणीतरी आहे तिथे'(१९९०), 'ती वेळच तशी होती' गो.पु. देशपांडे लिखित 'चाणक्य विष्णुगुप्त'(१९९४) श्याम मनोहर लिखित 'येळकोट'(१९९३), विश्राम बेडेकर लिखित "टिळक आणि आगरकर', वि.वा.शिरवाडकर यांचे 'किमयागार'(१९९२), महेश एलकुंचवारांचे 'क्षितिजापर्यंत समुद्र'(१९९५) अशा कितीतरी नाटकांमधून आणि नाट्य प्रवाहातून समकालीन मराठी रंगभूमी साकारत गेली. एकूणच सर्व प्रवाहांचा आवाका इतका मोठा आहे की याचा धावता आढावा घेणेच क्रमप्राप्त ठरले.

**समारोप:**

समकालीनतेची व्याप्ती बघता नव्वदोत्तर मराठी साहित्य प्रकारात समकालीनतेचे प्रतिबिंब वर्तमानाला धरून पडलेले दिसते. विविध प्रवाहातील कथा, कादंबरी ,नाटक ,कविता अशा साहित्य प्रकारातून साहित्यिकांनी नव्वदोत्तर बदलत्या परिस्थितीचे,समाजाचे आणि पर्यावरणाचे चित्रण तीव्रतेने केलेले दिसते. इतके प्रवाह आणि प्रकार एका शोधनिबंधात मांडण्याला मर्यादा पडतात त्यामुळे ठळक परिप्रेक्ष्याच्या अनुषंगाने प्रस्तुती करण्याचा प्रयत्न लेखातून केला आहे . मात्र १९९० नंतर परिवर्तन झालेल्या मराठी साहित्याचे दालन समकालीन जाणिवांच्या तीव्रतेने व्यामिश्ररित्या प्रगट झालेले आहे आणि ते वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त करते असा निष्कर्ष नक्कीच काढता येतो.

**संदर्भ :**


१) *समकालीन मराठी रंगभूमी : आचार्य अ.द.वेलणकर,विजय प्रकाशन, पृष्ठ-८*
२) *नवसाहित्य व नवसाहित्योत्तर साहित्य, पृष्ठ क्र.२*
३) *मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह, संपादक शरणकुमार लिंबाळे*
४) *नव्वदोत्तर मराठी साहित्य (प्रा. डॉ. सत्यवान मेश्राम गौरव ग्रंथ),विजय प्रका. पृष्ठ-६५*
५) *ग्रामीण कथा: स्वरूप आणि विकास, वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद-२०१६,पृष्ठ-३३६.*

# समकालीन साहित्य अभिव्यक्तीचे माध्यम : सोशल मीडिया

**डॉ. पल्लवी ताजने**
*लोकमान्य महाविद्यालय,वरोरा*

**प्रस्तावना :**

नव्वदोत्तर साहित्यात वैश्विकतेचे, जागतिकीकरणाचे त्याही पलीकडे जाऊन उत्तर आधुनिकतेचे सर्व संदर्भ मिळतात, याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या काळात समाज जीवनावर वैश्विक घडामोडींचा, जागतिकीकरणाचा आणि उत्तरआधुनिकतेचा प्रभाव पडलेला दिसतो. त्यामुळे याचे पडसाद अर्थातच साहित्यावर दिसतात मग इतर भारतीय साहित्याप्रमाणे ते मराठी साहित्यावरही दिसतात.'साहित्य हा समाजाचा आरसा आहे' असे म्हटले आहे, या संकल्पनेच्या आधारे नव्वदोत्तरी साहित्यात या सर्वांचे पडसाद आपल्याला दिसतील. म्हणजेच समकालिनता मराठी संहित्यातीयचा विषय ठरली. याखेरीज तत्कालीन परिस्थितीवरून साहित्याच्या मांडणीत, साहित्याचविषय आणि आशय म्हणजे एकंदर साहित्याच्या आकृतिबंधात बदल झालाच पण त्याही पलीकडे जाऊन लेखकांच्या अभिव्यक्तीसाठी समाज माध्यमे हे एक मोठे मंच उपलब्ध झाले. संगणकक्रांती, या समाज माध्यमाच्या सहाय्याने नव्वदोत्तर मराठी साहित्य एका मोठ्या प्रसार मंचावर येऊन पोचले. समकालीन वर्तमान काळाचा विचार केला तर आपण सोशल मीडियावर (समाजमाध्यम ) मोठ्या प्रमाणात वावर, आणि त्याचा वापर दिसतो. सोशल मीडिया इतर सर्व एक साहित्य प्रसार आणि प्रचारकांच्या भूमिकेतून कार्य करताना दिसते. सोशल मीडियाच्या सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही बाजूंचा परिणाम साहित्यावर विशेषतः मराठी साहित्यावर पडलेला दिसतो. मराठी साहित्य आणि सोशल मीडियाच्या बाबत विचार केला तर हा सर्वात मोठा लेखन मंच म्हणून सर्वसामान्यांसाठी, लेखकांसाठी उपलब्ध झाला हे विसरता येणे वा दुर्लक्षित करण्याजोगे नाही.याच माध्यमातून अनेक नवोदित लेखक आपले साहित्य प्रकाशित करीत आहे ही साहित्य जगताची एक मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. नव्वदोत्तर काळात संगणकक्रांती,इंटरनेट, ब्लॉग सुरू झाले. जिथे वेळेची मर्यादा नाही, निवडीची अट नाही, शिवाय सर्व प्रकारच्या अभिव्यक्तीला सामावून घेता येईल असे एकच मोठे माध्यम जगासमोर आले.अभिव्यक्तीसाठी एका खुल्या मंचाची गरज हे सोशल मीडियाचा उदय होण्यामागे मुख्य कारण आहे. या माध्यमातून साहित्याचा प्रचार आणि प्रसार झालाच आणि होतही आहे असे असले तरी या माध्यमाला काही मर्यादाही आहेत.हाच विषय या चिंतन निबंधाच्या माध्यमातून जाणीवपूर्वक, विस्ताराने,चिकित्सक पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न आहे.

**समकालीनता :**

समकालीन हा 'कालवाचक' किंवा 'कालनिर्देशक' शब्द आहे. या शब्दाची फोड केल्यास लक्षात येईल की सम म्हणजे 'सारखा', 'समान', 'समांतर', 'सोबत'.आणि कालीनता म्हणजे त्या काळाला धरून ज्या राजकीय, सांस्कृतिक सामाजिक वातावरण ,सामाजिक धारणा, समजुती आणि समस्या, तत्कालीन मानवी

जीवनातील आणि नातेसंबंधातील ताणतणाव, सामाजिक आंतरसंबंधातील विसंगती आणि अंतर्विरोध इ.या सर्वांचा अंतर्भाव 'समकालिनता' या संज्ञेत होतो.मग या समकालीन जाणिवा ज्या साहित्यात अवतरीत होतात ते 'समकालीन साहित्य' होय.

**समकालीन साहित्य संकल्पना :**

साहित्याच्या संदर्भात 'समकालीन' हा शब्द जे साहित्य काळाबरोबर ,काळासोबत किंवा तत्कालीन काळाशी तादात्म्य पावणारे असते. त्याला 'समकालीन साहित्य' म्हणता येईल.म्हणजे तत्कालीन समाज जाणिवा आणि व्यक्तिगत जाणिवांचे साहित्यातून झालेले प्रगटीकरण म्हणजे समकालीन साहित्य होय. याचा अर्थ एखादे साहित्य त्या काळात जन्माला आले नसेल आणि तरीही ते संबंधित काळातील समाज विषयांशी साम्यता दाखवीत असेल तर त्याला 'समकालीन साहित्य' म्हणत येईल.इ.स.१९९०नंतर आणि विशेषतः एकविसाव्या शतकात आपण समकालीनतेचा विचार अर्थातच जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरण, संगणकक्रांती ,इंटरनेटक्रांती,स्मार्ट फोन सोशल मीडिया आणि माध्यमक्रांतीच्या संदर्भात.म्हणून या सर्व अतीव घाईने शिरकाव केलेल्या घटनांचे पडसाद जेव्हा त्या काळातील समाजावर वेगाने पडले तेव्हा त्याच समाजातील घटकांनी निर्माण केलेले साहित्यही त्यातून सुटले नाही.समजमानचा आरसा घेऊन ते प्रकट झाले. १९९० नंतर निर्माण झालेल्या या दाबामुळे भारतीय जीवनपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल झाले. या बदलाचे पडसाद मोठया प्रमाणात भाषा आणि साहित्यावर दिसू लागणे स्वाभाविक आहे. इ.स.१९९० नंतरच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीतून आणि पार्श्वभूमीतून निर्माण झालेले, या काळाच्या जीवनवास्तवाचा वेध घेणारे साहित्य हेच खऱ्या अर्थाने नव्वदनंतरचे साहित्य म्हणून स्वीकारता येईल. या काळातील लेखकांचे दृष्टिकोन एकसारखे नाहीत. त्यामुळे या काळात लिहिलेले सर्वच प्रकारच्या साहित्यामध्ये आशय, अभिव्यक्ती, रूपबंध आणि भाषा या सर्वच पातळ्यांवर वैविध्यता दिसते.

**समकालीन मराठी साहित्य :** समकालीनतेत तंत्रज्ञानाचा एक मोठा घटक त्या त्या काळाचा भाग बनतात. म्हणजे उदा. कॉंप्युटर्स किंवा इंटरनेट हे सध्याच्या काळाचे घटक आहेत. ते आधी नव्हते. पण या तंत्रज्ञानाच्या पलिकडे काही समकालीनतेत उरतं का?

मराठी साहित्यात २० व्या शतकात वेगवेगळ्या काळात त्या त्या काळाला धरून समाजभान साहित्यातून अवतरले . मग ते महायुद्धोत्तर काळ असो,साठोत्तरी काळ असो व नव्वदोत्तर.१९४५ नंतर साहित्यात द्वितीय महायुद्धातिल भीषण विध्वंस ,जीवितहानी ,मानवी मूल्यांचा फोलपणा,अस्तित्ववादविषयीचा संभ्रम याचे पडसाद मराठी साहित्यावर पडून एका भाषा-घाट-तंत्र या बंधिस्त साच्यातून मुक्त मानवी मनाचे चित्रण या काळातील साहित्यातून प्रकटले.त्यात समकालीन साहित्याचे विशेष दिसतात.

इ.स.१९६० नंतर मराठी साहित्यात समकालीनता विशेषत्वाने दिसते.१९६० नंतर उदयाला आलेले दलित साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, ग्रामीण साहित्य, नागरी साहित्य इ . साहित्यातून त्या त्या जीवनाविषयीचे वास्तव, जाणिवा आणि आत्मभान या साहित्यातून प्रकट झाले.

१९९० नंतरच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीतून आणि पार्श्वभूमीतून निर्माण झालेले, या काळाच्या जीवनवास्तवाचा वेध घेणारे साहित्य हेच खऱ्या अर्थाने नव्वदनंतरचे साहित्य म्हणून स्वीकारता येईल. या काळातील लेखकांचे दृष्टिकोन एकसारखे नाहीत. त्यामुळे या काळात लिहिलेले सर्वच प्रकारच्या साहित्यामध्ये आशय, अभिव्यक्ती, रूपबंध आणि भाषा या सर्वच पातळ्यांवर वैविध्यता दिसते.

**समकालीन साहित्य आणि सोशल मीडिया :**

मराठी साहित्याचे अवतरण सर्वप्रथम हस्तलिखित ग्रंथाच्या माध्यमातून झाले. परंतु या हस्तलिखिताचा मोजका वाचक वर्ग होता,पुढे ते ग्रंथ विज्ञानातील शोधामुळे मुद्रित रूपात आपल्या समोर आले.तेव्हा या क्रांतीमुळे साहित्य बहुजणांपर्यंत पोहचले. तरीही या ग्रंथाचे वाचन उपलब्धता असेल तिथपर्यंतचाच वर्ग करू शकतो. ग्रंथ वाचनसंस्कृतीचा आत्मा असले तरी या पलीकडे जी संगणक क्रांती झाली त्याने अभिव्यक्तीचे माध्यम पूर्णतः बदलले. आणि २१ व्या शतकात एका विशिष्ट वाचक वर्गाला पर्यंतच मर्यादित होता परंतु हजार वर्षांचा प्रवास करून मराठी साहित्याला मोठा वाचक वर्ग उपलब्ध झाला आणि म्हणूनच एकविसाव्या शतकात या मोठ्या स्वरूपात उपलब्ध झालेल्या वाचक वर्गापर्यंत साहित्य पोहोचविण्याचे माध्यम हे अर्थातच सहज सोपे आणि सुलभ होणार हा काळाचा महिमा आहे

नव्वदोत्तर मराठी साहित्याचा संकल्पनात्मक विचार केल्यास असे काळाला धरून नवीन जाणिवा, नवीन दृष्टिकोन आपल्याला नव्वदोत्तर साहित्यात दिसेल.नव्वदोत्तर साहित्यावर जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवरील जी परिवर्तने झालीत त्याचे पडसाद आर्थिक क्षेत्रातील जागतिकीकरण, उदारीकरण ,खाजगीकरण याशिवाय संगणक क्रांती ,इंटरनेट क्रांती , माध्यमक्रांती या सर्वांचा परिणाम समाजावर झाला. त्या परिनामातून लोकांच्या अभिव्यक्तीचे माध्यम हळूहळू बदलायला सुरवात झाली. लोकांच्या गरजेनुसार माध्यम बदलले .२१ वे शकत ज्या धकाधकीने चालले आहे त्या अति गतीच्या काळात गतीला साजेसे असे नवे मंच लोकांसाठी तयार झाले ते म्हणजे सोशल मीडिया होय. या सोशल मीडियामुळे साहित्य निर्मिती आणि साहित्य वाचन यामध्ये आमूलाग्र बदल घडून आला. वर्तमान काळातील झालेला बदल म्हणजे वैज्ञानिक क्रांतीची देन होय. ती चांगली अथवा वाईट हा चिंतनाचा आणि चिंतेचा विषय जरी असला तरी तो टाळता येणार नाही, हे वास्तव आपणाला स्वीकारावेच लागेल. जागतिकीकरणाचा परिणाम सर्व क्षेत्रात झाला तसाच तो साहित्यक्षेत्रावर सुद्धा झाला साहित्य हा समाजाचा आरसा आहे असे म्हणतात मग समाजातील सर्व गोष्टींचा परिणाम साहित्यिकांच्या मनो भूमिकेवर झाल्यामुळे त्यांच्या आधी व्यक्त होण्याच्या साधनांवर म्हणजेच साहित्यावर त्याचे पडसाद दिसणारच. १९९० च्या दशकापासून मराठी साहित्यात असे पडसाद आशय-विषय आणि बदललेली जीवन मूल्य, संस्कार, संस्कृतीच्या स्वरुपात अधोरेखित झाली, परंतु यापलीकडे जाऊन साहित्य माध्यमात क्रांती घडून आली. साहित्य हे ग्रंथ स्वरूपाच्या दालनातून जागतिक पटलावर येऊ लागले आणि हळूहळू या साहित्याला दृकश्राव्य रूपही प्राप्त झाले .१९९० नंतर बदललेले जग बहुपेडी, व्यामिश्र आणि गुंतागुंतीचे झाले आहे. त्याचेच प्रतिबिंब आज साहित्यावर दिसून येते हे समकालीनतेचा वेध घेणारे किंवा समकालीनतेत अभिव्यक्त साहित्य माध्यम क्रांतीचा बदलही आपोआप स्वीकारते. गेल्या पंचवीस वर्षात जागतिकीकरणाने सर्व क्षेत्रात जे झपाट्याने बदल घडवून आणले ,संगणक

क्रांतीमुळे सामान्यांसाठी माहितीचे आणि ज्ञान संपादनाचे नवे दालन उघडले गेले. हळूहळू डिजिटल क्षेत्रात झालेली प्रगती सोशल मीडिया यामध्ये फेसबुक, व्हाट्सअप, ट्विटर,वैयक्तिक ब्लॉग, अशा बऱ्याच माध्यमातून मोठ्या प्रमाणात लेखक आणि वाचक वर्ग सक्रीय झाला त्याचे परिणाम म्हणजे अशा माध्यमातून मोठ्या प्रमाणात अभिव्यक्तीची साधने उपलब्ध झाली.याचा परिणाम म्हणजे अनेक लेखक या समाज माध्यमांचा वापर प्रभाविरीत्या करू लागले. कारण या माध्यमातून प्रस्थापित लेखक असो व नवोदित या सर्वांच्या साहित्याला फार मोठा वाचक वर्ग प्राप्त झाला.यात फेसबूक सारख्या मंच वर बरेच साहित्य समूह सक्रिय आहेत. याशिवाय व्यक्तिगत लिखानाही मोट्या प्रमाणात प्रसिद्ध होत आहे. पुनीत मतकर,नामदेव कोळी,बाबन सारडकर,मनीषा अतुल( साधू),ममता सिंधुताई सपकाळ यासारखे किती तरी कवी सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त होताना दिसतात.समाज जीवनातील बदल, बदललेली कुटुंबव्यवस्था, नवतंत्रज्ञानाने तरुणतरुणींच्या जीवनात झालेले बदल, नको तेवढा स्वातंत्र्याचा पुरस्कार, लैंगिकतेचे प्रश्न,व्यक्तिगत प्रश्न ,समाजात घडणाऱ्या प्रिय-अप्रिय घटना या सर्वांवर जळजळीत भाष्य करून त्यातील आपल्या मूळांचा शोध घेण्याचा प्रयत्न या सोशल मीडिया च्या माध्यमातून लेखक करताना दिसतात.एकीकडे अत्यंत व्यक्तिकेंद्रित आणि भान हरवलेल्या उत्तर आधुनिकतावादाने व्यक्तीला अधिक संकुचित स्वैर करण्याचा चंग बांधलेला असताना, भारतीयत्वकेंद्री दृष्टी वैश्विक भान जपत समाजकेंद्रिततेला अधिक व्यापक रूप देताना दिसते.अशा व्यक्ततेत कविता हा साहित्य प्रकार मोठ्या प्रमाणात अभिव्यक्तीचे माध्यम ठरला.कथा, समीक्षा ,प्रवासवर्णनपर लेख,इ . साहित्य आपणास मोठा प्रमाणात बघायला मिळेल.या सर्व साहित्यातून समकालिनतेची साक्ष आपणास पटते उदा. पुनीत मातकर सारखा कवी शेतकऱ्यांच्या पोराचे वास्तव भान 'उत्तर' नावाच्या कवितेतून जगासमोर मांडतात ,

"सरांनी विचारलं होतं,
सुतावरून स्वर्ग गाठणे म्हणजे काय?
कापऱ्या आवाजात मी बोललो
"फाशी घेणं"

मला कळलंच नाही
माझं उत्तर कसं चुकलं"

किंवा 'बाप' नावाच्या कवितेतून आप्त, गणगोणातून दुर्लक्षित झालेला पण अडचणींनी न डगमगता खंबीरपणे उभा राहणार बाप दिसतो.. आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रांतात असे आशावादी कष्टकरी बापचे चित्र समकाकालीन आहे. 'धुकं' नावाची त्यांची कविताही कितीतरी मनातील सुप्त कल्लोळ, आक्रसून टाकणारी अगतिकता वर्णन करणारी आहे.

याशिवाय मनीषा अतुल (साधू) यांचे बरेच साहित्य ग्रंथ रूपात प्रकाशित झाले आहेत.असे असले तरी फेसबूक च्या माध्यमातून या कवयित्रीने जगाशी संवाद साधला आहे.'फेसबुक जग' या कवितेतून सोशल मीडिया ची वास्तविक बाजू, अवाजवी गोष्टींचा मारा सोबतच,

"प्रत्येकाचे हवे तेवढे टॅलेंटस
थकेपर्यंत सोसतो
सोसावतो इतरांना आपलेही"

अशी अभिव्यक्तिच्या कलेच्या आस्वादात आलेली व्यवहारिकता आणि निखळ आनंदाचे हरवलेपण आपल्या समोर मांडतात.

याशिवाय ट्वीटर,वैयक्तिक ब्लॉग,Youtube या माध्यमातूनसुद्धा लेखक अभिव्यक्त होताना दिसतात. तत्कालीन घटनेवर मोठ्या प्रमाणात अभिव्यक्तता सोशल मीडियाच्या माध्यमातून आपणास दिसेल.यातील बहुतेक लेखक हे आधी प्रस्थापित किंवा प्रसिद्ध झालेले नव्हते.या जागतिक मंचाने त्यांना लोकांच्या मनात स्थान दिले.काही प्रस्थापित लेखकांनासुद्धा आपले साहित्य काळाबरोबर टाकून सोशल मीडिया च्या माध्यमातून अपडेट व्हावे लागले. कारण २१ व्या शतकात फार मोठा वाचक वर्ग या माध्यमातून एकत्र आला. आणि संहित्याशी जुळला आहे.

सोशल मीडिया व्यतिरिक्त छापील ग्रंथांची जागा ऑडिओ बूक घेत आहे. इ-बुक्स उपलब्ध झाले आहे. आणिया क्षेत्रात झपाट्याने प्रगती होत आहे. मराठीतील जून साहित्य सुद्धा ऑडिओ बूक kindle, storytel च्या माध्यमातून आपल्या पर्यन्त पोहचत आहे. यामुळे फार मोठा तरुण वर्ग साहित्य वचन आणि श्रवणाशी जोडला जात आहे. त्यामुळे तरुण पिढीचे अभिव्यक्ति आणि अभिरुची आस्वादाचे माध्यम म्हणून या काळातील अभिव्यक्ति माध्यमाकडे जगाने दुर्लक्ष,डोळेझाक करून चालणार नाही.काळाबरोबर पावले उचलणे हे तर्क आणि ज्ञानाला धरून आहे.पण जाणत्या लेखक वर्गाचे आणि विवेकी वाचक वर्गाचे याबाबत एक वेगळे कर्तव्य आहे. की या खुल्या अभिव्यक्ति मंचावर होणाऱ्या साहित्य चोऱ्या टाळणे होय.

**संदर्भ ग्रंथ-**


१ *नव्वदोत्तर मराठी साहित्य( प्रा. सत्यवान मेश्राम गौरवग्रंथ,विजय प्रकाशन ,२०१८*

२ *समकालीन साहित्य : जाणिवा आणि भाष्य,तनुजा प्रकाशन,नागपूर*

३ *समकालीन साहित्य : प्रवृती आणि प्रवाह , द. भि. कुळकर्णी ,विजय प्रकाशन*

४ *फेसबुक महाजाल*